सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०११-१२







DES

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०११-१२

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# प्रस्तावना

'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन राज्य विधान मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०११-१२ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ५१ वा अंक आहे. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी आवश्यक त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत.

२. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरूपातील आहेत.

३. केंद्र व राज्य शासनाचे संबंधित विभाग व संबंधित उपक्रम यांनी उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

शै. मु. अपराजित
अर्थ व सांख्यिकी संचालक,
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : २२ मार्च, २०१२

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | १ |
| अ. | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | ३ |
| ब. | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | ६ |
| १. | **राज्य अर्थव्यवस्था** | ९ |
| २. | **लोकसंख्या** | १३ |
| ३. | **राज्य उत्पन्न** | १९ |
| ४. | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | ३३ |
| ५. | **लोकवित्त** | ५१ |
| ६. | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | ६७ |
| ७. | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>दुग्ध विकास<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | ७९ |
| ८. | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | १०९ |
| ९. | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | १३३ |
| १०. | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल कल्याण<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय | १५७ |
| ११. | **मानव विकास** | २१३ |
| १२. | **विशेष अभ्यास** | २१९ |
| | **व्याख्या सूची** | २२१ |
| क. | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | २२५ |

# परिशिष्टे


| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | २०११ च्या गणनेवर आधारित जिल्हानिहाय महत्त्वाचे लोकसंख्याविषयक निर्देशक | १७ |
| **परि. २.२** | महाराष्ट्राची व भारताची गणनांवर आधारित लोकसंख्या | १८ |
| **परि. २.३** | महाराष्ट्राची गणनांवर आधारित ग्रामीण आणि नागरी लोकसंख्या | १८ |
| **परि. ३.१** | औद्योगिक स्रोतांनुसार स्थूल राज्य उत्पन्न - चालू किंमतीनुसार | २३ |
| **परि. ३.२** | औद्योगिक स्रोतांनुसार स्थूल राज्य उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | २४ |
| **परि. ३.३** | औद्योगिक स्रोतांनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - चालू किंमतीनुसार | २५ |
| **परि. ३.४** | औद्योगिक स्रोतांनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | २६ |
| **परि. ३.५** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत स्थूल उत्पन्न व राष्ट्रीय स्थूल उत्पन्न- चालू किंमतीनुसार | २७ |
| **परि. ३.६** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत स्थूल उत्पन्न व राष्ट्रीय स्थूल उत्पन्न- स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | २८ |
| **परि. ३.७** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न - चालू किंमतीनुसार | २९ |
| **परि. ३.८** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | ३० |
| **परि. ३.९** | जिल्ह्यांतर्गत स्थूल/निव्वळ उत्पन्न आणि दरडोई जिल्हा उत्पन्न | ३१ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ४० |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ४१ |
| **परि. ४.३** | महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४२ |
| **परि. ४.४** | औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४३ |
| **परि. ४.५** | महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४४ |
| **परि. ४.६** | महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४५ |
| **परि. ४.७** | अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक | ४६ |
| **परि. ४.८** | महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर | ४७ |
| **परि. ४.९** | जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या ३१-८-११ | ४८ |
| **परि. ४.१०** | महाराष्ट्रातील अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना देण्यात आलेला तांदुळ व गहू | ४९ |
| **परि. ४.११** | भारत सरकारकडून महाराष्ट्र राज्याला मिळालेले नियतन | ४९ |
| **परि. ४.१२** | जिल्हावार गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या (२०११-१२) | ५० |
| **परि. ५.१** | महाराष्ट्र शासन : दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प | ६० |
| **परि. ५.२** | महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल | ६१ |
| **परि. ५.३** | महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चातील कल | ६२ |
| **परि. ५.४** | महाराष्ट्र राज्यातील कृषि क्षेत्रावरील करांपासून महसुली जमा | ६३ |
| **परि. ५.५** | वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे | ६४ |
| **परि. ५.६** | शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च | ६५ |
| **परि. ६.१** | महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण, निमनागरी व नागरी / महानगर क्षेत्रातील सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्जे | ७६ |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०११-१२) | ७७ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ७.१** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, पिक आणि दर हेक्टरी उत्पादन | ९८ |
| **परि. ७.२** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | १०१ |
| **परि. ७.३** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | १०२ |
| **परि. ७.४** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र | १०३ |
| **परि. ७.५** | राज्यातील सिंचनावरील क्षेत्र | १०५ |
| **परि. ७.६** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी | १०६ |
| **परि. ७.७** | महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कोंबड्या व बदके | १०७ |
| **परि. ८.१** | महाराष्ट्र राज्यातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य | १२६ |
| **परि. ८.२** | महाराष्ट्र राज्यातील खनिजांचे उत्पादन | १२७ |
| **परि. ८.३** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | १२८ |
| **परि. ८.४** | महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी | १२९ |
| **परि. ८.५** | महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्त्वाची वैशिष्ट्ये | १३१ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेचा पुरवठा व वापर | १५३ |
| **परि. ९.२** | महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी<br>(सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील ) | १५४ |
| **परि. ९.३** | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील जिल्हानिहाय साध्य केलेली रूंदीनुसार रस्त्यांची लांबी | १५५ |
| **परि. ९.४** | महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने | १५६ |
| **परि. १०.१** | महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती | १९५ |
| **परि. १०.२** | राज्यनिहाय संयुक्त शिक्षणाचे विकास निर्देशांक सर्व शाळा : सर्व व्यवस्थापन | १९६ |
| **परि. १०.३** | राज्यातील वर्ष २०११-१२ मधील आरोग्य विज्ञान महाविद्यालये/ संस्थांची संख्या व त्यातील प्रवेशित विद्यार्थी | १९७ |
| **परि. १०.४** | राज्यातील वर्ष २०११-१२ मधील तंत्र, कला शिक्षणाची महाविद्यालये /संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेले विद्यार्थी | १९८ |
| **परि. १०.५** | महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक आणि शासन सहाय्यित) | २०० |
| **परि. १०.६** | महाराष्ट्र राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर | २०१ |
| **परि. १०.७** | काम करणाऱ्या लोकांची जनगणना २००१ अनुसार आर्थिक वर्गवारी | २०२ |
| **परि. १०.८** | दृष्टिक्षेपात आर्थिक गणना १९९८ आणि २००५ | २०३ |
| **परि. १०.९** | प्रमुख उद्योग गटांनुसार आस्थापनांची आणि कामगारांची संख्या (आर्थिक गणना २००५) | २०४ |
| **परि. १०.१०** | महाराष्ट्र राज्यातील प्रमुख उद्योग गटांनुसार कारखान्यांतील रोजगार | २०५ |
| **परि. १०.११** | महाराष्ट्र राज्यातील चालू कारखाने व त्यांतील रोजगार | २०६ |
| **परि. १०.१२** | महाराष्ट्र राज्यातील विविध उद्योगांतील रोजगार | २०७ |
| **परि. १०.१३** | राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | २०८ |
| **परि. १०.१४** | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत डिसेंबर, २०११ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या | २०९ |
| **परि. १०.१५** | महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विवाद | २१० |
| **परि. १०.१६** | महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च | २११ |
| **परि. १०.१७** | महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत रोजगार कार्यक्रमांची प्रगती | २१२ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा प्राकृतिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड - चिरोली - गायखुरी या डोंगर रांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत.

भौगोलिक क्षेत्र (३.०८ लक्ष चौ.कि.मी.) व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्याची लोकसंख्या सुमारे ११ कोटी (जनगणना २०११) असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून ४५ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

राज्यात ३५ जिल्हे असून प्रशासकीय प्रयोजनासाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा महसुली विभागात विभागले आहेत. जिल्हा स्तरावरील नियोजनासाठी राज्यात पूर्वापार काळापासून प्रभावी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थानिक प्रशासनासाठी राज्याच्या ग्रामीण भागात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २७,९०६ ग्रामपंचायती आहेत, तर नागरी भागात २३ महानगरपालिका, २२१ नगरपरिषदा, ५ नगरपंचायती व ७ कटक मंडळे आहेत.

महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून जवळजवळ सर्वच प्रमुख निगम व वित्तीय संस्था यांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार केंद्रे मुंबईत आहेत.

चालू किंमतींनुसार २०१०-११ या वर्षाचे स्थूल राज्य उत्पन्न ₹ १०,६८,३२७ कोटी असून देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सुमारे १४.९ टक्के हिस्सा आहे. गेल्या काही वर्षांपासून स्थूल राज्य उत्पन्न वेगाने वाढत आहे. राज्यातील औद्योगिक व सेवा या दोन्ही क्षेत्रांचा स्थूल राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा सुमारे ८७ टक्के आहे. कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील हिस्सा १३ टक्के आहे.

राज्यातील २२६.१ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आहे व ५२.१ लाख हेक्टर जमीन वनांखाली आहे. सिंचनात वाढ व्हावी यासाठी अनेक सिंचन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. बिगर सिंचन क्षेत्रात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम गतीने राबविण्यासाठी जलसंधारण अभियानाची स्थापना करण्यात आली आहे.

पशुसंवर्धन हे कृषि क्षेत्राशी संबंधीत महत्वाचे क्षेत्र आहे. देशातील पशुधन आणि कुक्कुटपालन यामध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे ६.८ व १० टक्के आहे आणि पशुधन आणि कुक्कुटपालनामध्ये राज्य हे देशात सहाव्या क्रमांकाचे राज्य आहे.

महाराष्ट्र सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. लघु उद्योगात हे राज्य अग्रेसर आहे. देशांतर्गत तसेच विदेशी संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याने सातत्य राखले आहे. हे राज्य मोटार वाहने उत्पादनाचे तसेच माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. मोठ्या प्रमाणावर स्थापित होणारे विशेष निर्यातवृद्धी झोन हे राज्यासाठी अभिमानास्पद आहेत.

राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार देशाचा साक्षरता दर ७४ टक्के होता, तर राज्याचा साक्षरता दर ८२.९ टक्के होता. राज्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या उत्कृष्ट संस्था आहेत.

मानव विकास निर्देशांकाची प्रगती ही अनेक वेळा राज्याच्या मुख्य विकास निर्देशकाची प्रगती दर्शविते. भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे व राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५७२ असून राज्याचा देशात पाचवा क्रमांक आहे.

राज्यात २.४१ लाख किलोमीटर लांबी असलेले (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या देखभालीखालील) व सर्वदूर पसरलेले रस्त्यांचे जाळे आहे. राज्यातील सुमारे ९७.८ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी जोडलेली आहेत. राज्यातील भूपृष्ठीय वाहतूक सुविधा उत्कृष्ट असून बंदरे व विमानतळांशी असणाऱ्या संपर्क व्यवस्थेमुळे राज्यात वाहतूक व्यवस्थेची चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. विजेची स्थापित क्षमता आणि निर्मितीच्या बाबतीत देशात हे राज्य अग्रस्थानी आहे. या सर्व बाबींमुळे गुंतवणुकीसाठी हे जास्त पसंतीचे राज्य बनले आहे.

हे राज्य प्रशासकीय क्षमता आणि नवनवीन कल्पनांबाबत सुपरिचित आहे. महिला धोरण राबविणारे तसेच महिलांच्या विकासासाठी 'महिला व बाल विकास' या स्वतंत्र विभागाची स्थापना करुन अर्थसंकल्पीय तरतूद करणारे हे पहिले राज्य आहे. 'रोजगार हमी योजना' राबविणारे हे आद्यप्रवर्तक राज्य असून केंद्र शासनाने ही योजना अंगिकारली आहे.

महाराष्ट्र राज्य हे केवळ भौगोलिक सीमांनी अधोरेखित केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. या राज्याची एकमेव मराठी संस्कृती विकसित होण्यास नैसर्गिक तसेच सांस्कृतिक विविधता सहाय्यभूत झाली आहे. या राज्यास स्वतःची अध्यात्मिक बैठक असून हे राज्य 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते. तत्कालीन संतांनी अध्यात्मिक सहभागाने राज्याच्या विविध भागात सांस्कृतिक पुनरूत्थानास हातभार लावला. अजंठा, वेरूळ व घारापुरीची लेणी, गेट वे ऑफ इंडिया आणि वास्तुशास्त्राच्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तु जसे विहार व चैत्य यामुळे जगभरातील पर्यटक राज्याकडे आकर्षित होतात. अविस्मरणीय स्मारकांबरोबरच विविध समुहातील लोकांची एकजूट व त्यांचा सांस्कृतिक वारसा यामुळे देशात राज्याने मानाचे स्थान प्राप्त केले आहे. मानव विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्तिमत्वे राज्यात उदयास आली आहेत. क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यामध्ये राज्याचे भरीव योगदान आहे. 'बॉलीवूड' नावाने जगप्रसिध्द असलेला चित्रपट उद्योग राज्यात आहे.

महाराष्ट्र हे या सर्व वैशिष्ट्यांमुळे सर्वोत्तम राज्य बनले आहे.

* * * * *

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब<br>(१) | | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११*<br>(७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **भौगोलिक क्षेत्र -** (हजार चौ.कि.मी.) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| २. | **प्रशासकीय रचना -** | | | | | | (२०११) |
| | महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ |
| | जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ |
| | तहसील | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५ |
| | वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४३,६६३ |
| | वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | |
| | शहरे # | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३५ |
| ३. | **जनगणनेनुसार लोकसंख्या -** (हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) |
| | एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७३ |
| | पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,३६१ |
| | स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,०१२ |
| | ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५४५ |
| | नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८२८ |
| | अनुसूचित जाती | २,२२७ | ३,१७७ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | - |
| | अनुसूचित जमाती | २,३९७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | - |
| | लोकसंख्या घनता (प्रती चौ.कि.मी.) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ |
| | साक्षरता प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५७.१ | ६४.९ | ७६.९ | ८२.९ |
| | स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२५ |
| | नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२२ | ३१.१७ | ३५.०३ | ३८.६९ | ४२.४३ | ४५.२ |
| ४. | **राज्य उत्पन्न -** (चालू किंमतीनुसार)<br>(२००४-०५ च्या मालिकेप्रमाणे) | | | | | | |
| | राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,८२,४५२+ |
| | कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२८,१९०+ |
| | उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,७९,२८६+ |
| | सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,७४,९७६+ |
| | दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८७,६८६+ |
| ५. | **कृषि -** (क्षेत्र हजार हेक्टरमध्ये ) | | | | | | (२००९-१०) |
| | निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०१ |
| | पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २२,६१२ |
| | स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | ४,०५० |
| | स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील<br>एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | १७.९ |
| ६. | **प्रमुख पिकांखालील क्षेत्र - (हजार हेक्टरमध्ये)** | | | | | | (२०१०-११) |
| | तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१८ |
| | गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ |
| | ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० |
| | बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ |
| | सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १९,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९९० |
| | सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ |
| | सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२८ |

* अस्थायी     + प्रारंभिक अंदाज     # गणना शहरांसह

## दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| | बाब (१) | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११* (७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | उ. ना. |
| | ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ |
| | कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ |
| | भुईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३५७ |
| ७. | **प्रमुख पिकांचे उत्पादन -** | | | | | | |
| | (हजार टनात) | | | | | | |
| | तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९६ |
| | गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ |
| | ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ |
| | बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ |
| | सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३२१ |
| | सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ |
| | सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३४ | १५,४१७ |
| | ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ |
| | कापूस (रुई) # | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ |
| | भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४५८ |
| ८. | **कृषि उत्पादनाचा निर्देशांक @ -** | - | - | - | १३६.५ | १२७.४ | २२३.८ |
| ९. | **कृषि गणना -** | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२००५-०६) |
| | वहित खातेदारांची संख्या (हजारात) | - | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,७१६ |
| | वहित क्षेत्र (हजार हेक्टर्समध्ये) | - | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | २०,००५ |
| | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | - | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४६ |
| १०. | **पशुधन गणना -** | (१९६१) | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) |
| | एकूण पशुधन (हजारात) | २६,०४८ | २५,४४१ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५५* |
| | एकूण कोंबड्या-बदके (हजारात) | १०,५७७ | ९,९०२ | १८,७९१ | २४,८३९ | ३५,३९२ | ६४,७५६* |
| | | | | | | | (२००३) |
| | ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ |
| ११. | **वन क्षेत्र** (चौ.कि.मी.) | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ |
| १२. | **औद्योगिक गुंतवणूक -** | | | | | | (२०११-१२)$ |
| | मंजूर प्रकल्प (संख्या) | - | - | - | - | - | १७,२०७ |
| | गुंतवणूक (₹ कोटी) | - | - | - | - | - | ८,७४,०५३ |
| | रोजगार (हजारात) | - | - | - | - | - | ४,३३६ |
| १३. | **वीज -** (दशलक्ष कि.वॅ.तास) | | | | | | |
| | एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ |
| | एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९७ |
| | औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ |
| | कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ |
| | घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४७ |

उ. ना. - उपलब्ध नाही  * अस्थायी  # कापसाचे उत्पादन १७० कि.ग्रॅ. ची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये

@ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १००  $ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०११

# दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब<br>(१) | | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११*<br>(७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१४.** | **बँका - (अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून,१९७१) | (जून, १९८१) | (जून, १९९१) | (जून, २००१) | (जून, २०११) |
| | बँक कार्यालये | उ.ना. | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,५१५ |
| | | | | | (मार्च, १९९१) | (मार्च, २००१) | (जून, २०११) |
| | ग्रामिण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ.ना. | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,२३१ |
| **१५.** | **शिक्षण -** | | | | | | |
| | प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ |
| | विद्यार्थी (हजारात) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६+ |
| | माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकांसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ |
| | विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११+ |
| **१६.** | **आरोग्य -** | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०१०) |
| | रुग्णालये | उ.ना. | २९९ | ५३० | ७६८ | १,१०२ | १,२६४ |
| | दवाखाने | उ.ना. | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,५४४ | २,९२४ |
| | दर लाख लोकसंख्येमागे खाटा | उ.ना. | ८८ | ११४ | १४४ | १०६ | १०२ |
| | | | | | | | (२०१०) |
| | जन्मदर @ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १७.१ |
| | मृत्युदर @ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.५ |
| | अर्भक मृत्युदर @ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २८ |
| **१७.** | **वाहतूक -** | | | | | | |
| | रेल्वे मार्गाची लांबी (किलोमीटर) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ |
| | एकूण रस्त्यांची लांबी (किलोमीटर) † | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ |
| | त्यापैकी पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ |
| | मोटार वाहने (हजारात) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९८९ |
| **१८.** | **सहकार -** | | | | | | |
| | प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ |
| | सभासद (लाखात) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० |
| | सहकारी संस्थांची एकूण संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,३०६ |
| | एकूण सभासद (लाखात) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५६० |
| | सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४९० | ५,२१० | २४,२८३ | १,३४,४४० | २,४८,३४१ |
| **१९.** | **स्थानिक स्वराज्य संस्था $ -** | | | | | | (२०११-१२) |
| | जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ |
| | ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९०६ |
| | पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ |
| | नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२१ |
| | महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ |
| | नगर पंचायत | - | - | - | - | ३ | ५ |
| | कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी    + अंदाजित    उ. ना. - उपलब्ध नाही

@ नमुना नोंदणी पाहणीनुसार

† सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते    $ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार

## ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजारात | १,१२,३७३ | १२,१०,१९३ | ९.३ |
| (अ) पुरुष | -”- | ५८,३६१ | ६,२३,७२४ | ९.४ |
| (ब) स्त्रिया | -”- | ५४,०१२ | ५,८६,४६९ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजारात | ६१,५४५ | ८,३३,०८८ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | टक्के | ५४.७७ | ६८.८४ | ... |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजारात | ५०,८२८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | टक्के | ४५.२३ | ३१.१६ | ... |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२५ | ९४० | ... |
| १.५ लोकसंख्येतील शेकडा वाढ (२००१-२०११) | टक्के | १५.९९ | १७.६४ | ... |
| १.६ साक्षरता प्रमाण | -”- | ८२.९१ | ७४.०४ | ... |
| १.७ अनुसूचित जाती व जमातींची लोकसंख्या (२००१) | हजारात | १८,४५९ | २,५०,९६२ | ७.४ |
| १.८ एकूण काम करणारे (२००१) | -”- | ४१,१७३ | ४,०२,२३५ | १०.२ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र (२०११) | लाख चौ.कि.मी. | ३.०८ | ३२.८७ | ९.४ |
| **२. कृषि (२००८-०९)*** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १७,४२६ | १,४१,३६४ | १२.३ |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -”- | २२,४२९ | १,९५,१०४ | ११.५ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -”- | ३,९७० | ८८,४१९ | ४.५ |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | १७.७ | ४५.३ | ... |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२००६-०७ ते २००८-०९ या वर्षाची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,५४० | ४४,४१९ | ३.५ |
| (२) गहू | -”- | १,१६८ | २७,९२७ | ४.२ |
| (३) ज्वारी | -”- | ४,२७९ | ७,९२० | ५४.० |
| (४) बाजरी | -”- | १,२०० | ९,२७८ | १२.९ |
| (५) एकूण तृणधान्ये | -”- | ९,०२२ | १,००,५६७ | ९.० |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -”- | १२,६८१ | १,२३,५४० | १०.३ |
| (७) ऊस क्षेत्र | -”- | उ.ना. | ४,८७५ | ... |
| तोडणी क्षेत्र | -”- | ९०३ | उ.ना. | ... |
| (८) कापूस | -”- | ३,१४९ | ९,३१९ | ३३.८ |
| (९) भूईमूग | -”- | ३९५ | ६,०२५ | ६.६ |

* अस्थायी                उ.ना. उपलब्ध नाही

# महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब | परिमाण | महाराष्ट्र | भारत | भारताशी तुलना (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन (२००७) | हजारात | ३५,९५५ | ५,२९,६९८ | ६.८ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -"- | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व इलेक्ट्रीक पंप (२००३) | -"- | १,१७४ | १५,६८४ | ७.५ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२००७) * | चौ.कि.मी. | ६१,९३९ | ७,६९,५१२ | ८.० |
| **५. उद्योग** $ | | | | |
| ५.१ औद्योगिक गुंतवणूक | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | १७,२०७ | ९६,३२२ | १७.९ |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | ८,७४,०५३ | ९३,१६,२९१ | ९.४ |
| (क) रोजगार | हजारात | ४,३३६ | २२,१४७ | १९.६ |
| ५.२ विदेशी थेट गुंतवणूक | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | ४,१७५ | २०,२९८ | २०.६ |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | ८३,७७९ | ३,५४,८०१ | २३.६ |
| **६. वीज (२००९-१०)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | ८१,३४५ | ७,९९,८५१* | १०.२ |
| ६.२ एकूण वापर | -"- | ७९,१३९ | ५,७२,०१५* | १३.८ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर | -"- | ३०,८६६ | २,१०,०८७* | १४.७ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३९.० | ३६.७* | ... |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (जून, २०११) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | ८,५१५ | ९०,१४७ | ९.४ |
| ७.२ बँक कार्यालये असलेली शहरे व गावे | -"- | २,४८८ | ३५,१४७ | ७.१ |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०१०-११)** | | | | |
| ८.१ चालू किंमतीनुसार उत्पन्न | ₹ कोटी | ९,८२,४५२ † | ६३,२५,०३८** | १५.५ |
| ८.२ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | ८७,६८६ † | ५३,३३१** | ... |
| ८.३ घटक उत्पादन मूल्यानुसार स्थूल राज्य उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ कोटी | १०,६८,३२७ † | ७१,५७,४१२** | १४.९ |
| ८.४ दरडोई स्थूल राज्य उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ | ९५,३५१ † | ६०,३४९** | ... |

* अस्थायी      $ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०११      † प्रारंभिक अंदाज      ** शीघ्र अंदाज

# १

# राज्य अर्थव्यवस्था



# १. राज्य अर्थव्यवस्था

### राज्य उत्पन्न

१.१ पूर्वानुमानानुसार स्थूल राज्य उत्पन्नात मागील वर्षाच्या ११.३ टक्क्यांच्या तुलनेत २०११-१२ मध्ये ८.५ टक्के इतकी वाढ अपेक्षित आहे. कृषि क्षेत्राच्या उणे ९.१ टक्के वृध्दीदरामुळे कृषि व संलग्न क्षेत्राचा वृध्दीदर उणे ५.१ टक्क्यावर सीमित राहीला आहे. उद्योग क्षेत्रात ९.१ टक्क्यांची वाढ , तर सेवाक्षेत्रात १०.१ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.

१.२ प्रारंभिक अंदाजानुसार राज्याचे २०१०-११ मधील स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न ११.३ टक्क्यांनी वाढून ₹ ७,४१,६९४ कोटी झाले तर मागील वर्षी ते ₹ ६,६६,१२३ कोटी होते. चालू किंमतीनुसार २०१०-११ मधील स्थूल राज्य उत्पन्न ₹ १०,६८,३२७ कोटी असून ते गतवर्षीच्या उत्पन्नापेक्षा २३.१ टक्क्यांनी अधिक आहे.

१.३ प्रारंभिक अंदाजानुसार, राज्य उत्पन्न म्हणजेच निव्वळ राज्य उत्पन्न २०१०-११ मध्ये चालू किंमतीनुसार ₹ ९,८२,४५२ कोटी होते जे गतवर्षीच्या उत्पन्नापेक्षा २४.७ टक्क्यांनी अधिक आहे. चालू किंमतीनुसार २००९-१० मधील दरडोई निव्वळ राज्य उत्पन्न ₹ ७१,३०० च्या तुलनेत २०१०-११ मध्ये ते ₹ ८७,६८६ होणे अपेक्षित आहे.

## किंमती

१.४ एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२ मध्ये राज्यातील ग्रामीण व नागरी भागाचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ९.४ टक्क्यांनी व ७.९ टक्क्यांनी वाढला.

१.५ अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचा दर जानेवारी, २०१२ साठी ६.६ टक्के होता तर जानेवारी, २०११ मध्ये तो ९.५ टक्के होता. खाद्य पदार्थ गटातील चलनवाढीचा दर जानेवारी, २०१२ मध्ये (-) ०.५ टक्के तर जानेवारी, २०११ मध्ये तो १६.७ टक्के होता. अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष ते वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०११ मधील ९.७ टक्क्यांवरुन कमी होऊन जानेवारी, २०१२ मध्ये ६.६ टक्के झाला.

## लोकवित्त

१.६ राज्य शासनाची २०११-१२ मधील (अर्थसंकल्पीय अंदाज) अपेक्षित महसुली जमा ₹ १,२१,५०४ कोटी असून ती २०१०-११ मध्ये (सुधारीत अंदाज) ₹ १,०७,१५९ कोटी होती. कर महसूल आणि करेतर महसूल अनुक्रमे ₹ ९७,४०४ कोटी आणि ₹ २४,१०० कोटी अपेक्षित आहे. एप्रिल ते डिसेंबर, २०११ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ ७९,३५३ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६५.३ टक्के) होती.

१.७ तेराव्या वित्त आयोगाने राज्याला विशिष्ट कारणांसाठी सहाय्यक अनुदाने देण्याची शिफारस केली आहे. सहाय्यक अनुदानापोटी २०११-१२ मध्ये ₹ २,८७६ कोटी मिळणे अपेक्षित असून त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता दिलेले ₹ ९३७ कोटी सर्वसाधारण मूलभूत अनुदान व ₹ ३२० कोटी सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान अंतर्भूत आहे.

१.८ राज्य शासनाचा २०११-१२ मधील (अर्थसंकल्पीय अंदाज) महसुली खर्च ₹ १,२१,४४६ कोटी अपेक्षित आहे तर २०१०-११ मध्ये (सुधारीत अंदाज) तो ₹ १,१२,८४७ कोटी होता.

१.९ वर्ष २०११-१२ मधील अंदाजित महसुली अधिक्य ₹ ५८ कोटी असून वित्तीय तूट ₹ २२,८०५ कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या १.८ टक्के) आहे. वर्ष २०११-१२ च्या अखेर ऋणभार ₹ २,२६,९२६ कोटी पर्यंत जाण्याची अपेक्षा आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

१.१० जून, २०११ च्या अखेरच्या शुक्रवारी बँकांतील एकूण ठेवी ₹ १४,०३,९५५ कोटी, एकूण कर्ज ₹ ११,७६,०८७ कोटी आणि कर्जाचे ठेवीशी असलेले प्रमाण ८३.८ टक्के होते.

१.११ ३१ मार्च, २०११ अखेर ७.६० लाख स्व-सहाय्यता गटांनी ₹ ६४८ कोटी जमा केले, तर ०.४४ लाख स्व-सहाय्यता गटांना ₹ २८६ कोटी कर्ज वाटप करण्यात आले आणि २.३३ लाख स्व-सहाय्यता गटांकडे ₹ १,०४५ कोटी कर्ज बाकी होते.

१.१२ वित्तीय समावेशामध्ये डिसेंबर, २०११ अखेरपर्यंत बँक नसलेल्या ४,२९२ गावांपैकी ३,८३९ (८७ टक्के) गावांमध्ये बँक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. डिसेंबर, २०११ पर्यंत १९.२८ लाख 'नो फ्रिल' खाते उघडण्यात आले. नोव्हेंबर, २०११ च्या अखेरपर्यंत जवळपास ९७.६ लाख इतके किसान क्रेडिट कार्डस् वितरीत करण्यात आले होते व ह्या कार्डांना एकूण ₹ ५३,२९६.२९ कोटी इतकी एकत्रित रक्कम मंजूर करण्यात आली.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१३ वर्ष २०११ मध्ये राज्यात सर्वसाधारण पडणाऱ्या पावसाच्या १०२.३ टक्के इतका पाऊस पडला. राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी ४६ तालुक्यात अतिवृष्टी, २०९ तालुक्यात सर्वसाधरण पाऊस तर केवळ १०० तालुक्यात अपुरी वृष्टी झाली.

१.१४ मराठवाडा आणि विदर्भात मोसमी पावसाचे उशीरा झालेले आगमन आणि अनियमित पावसामुळे खरीप पिकांच्या पेरण्या दोन ते तीन आठवडे उशीरा झाल्या आणि त्याचा पेरणी क्षेत्रावरती विपरीत परिणाम झाला. सप्टेंबर महिन्यात पडलेल्या अनियमित पावसामुळे आणि ऑक्टोबर महिन्यातील अपुऱ्या पावसामुळे रबी पिकांच्या क्षेत्रातही घट झाली असून परिणामी चालू वर्षात अन्नधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे.

१.१५ अन्नधान्याच्या उत्पादनात २०११-१२ मध्ये २३ टक्के घट अपेक्षित असून ते गत वर्षातील १५४.१९ लाख मे. टन उत्पादनाच्या तुलनेत ११८.०९ लाख मे. टन होईल. तेलबिया आणि कापूस यांचे उत्पादन देखील अनुक्रमे ८ टक्के व १५ टक्क्याने घटण्याचे अपेक्षित आहे. उसाचे उत्पादन ८५६.३५ लाख मे. टन इतके अपेक्षित आहे.

१.१६ वर्ष २०१०-११ मध्ये शेतीच्या हंगामी कामांसाठी ₹ १२,३२७ कोटी कर्ज वाटप करण्यात आले असून त्यापैकी ₹ ६,१५८ कोटी प्राथमिक कृषि पत संस्थांद्वारे, ₹ ५,५६६ कोटी अनुसूचित वाणिज्यिक बँकांद्वारे आणि ₹ ६०३ कोटी प्रादेशिक ग्रामीण बँकांद्वारे मंजूर केले.

१.१७ शासकीय व सहकारी दुग्धसंस्थांद्वारे ऑक्टोबर, २०११ पर्यंत दैनिक सरासरी दूध संकलन ३६.१६ लाख लिटर होते तर २०१०-११ मध्ये हे ३५.५७ लाख लिटर होते. वर्ष २०१०-११ मध्ये दुधाचे अंदाजित उत्पादन ८०.४४ लाख मे. टन होते.

१.१८ सागरी व गोड्या पाण्यातील अंदाजित मत्स्य उत्पादन डिसेंबर, २०११ अखेर अनुक्रमे ३.१२ लाख मे. टन व १.०० लाख मे. टन होते तर २०१०-११ मध्ये ते अनुक्रमे ४.४७ लाख मे. टन व १.३० लाख मे. टन होते.

## उद्योग

१.१९ ऑगस्ट, १९९१ ते सप्टेंबर, २०१० या कालावधीत राज्यात थेट विदेशी गुंतवणुकीचे ४,२२१ प्रस्ताव प्राप्त झाले व त्यातील गुंतवणूक ₹ ८४,९५८ कोटी होती. त्यापैकी, ४२ टक्के प्रकल्प पूर्ण झालेले असून ७ टक्के प्रकल्प प्रगतीपथावर आहेत व त्यांची गुंतवणूक अनुक्रमे ५२ टक्के व ९ टक्के आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात विदेशी गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये अमेरिका आणि मॉरिशस हे दोन प्रमुख देश असून या देशांचा एकूण थेट विदेशी गुंतवणुकीत अनुक्रमे १६ टक्के व १४ टक्के वाटा आहे.

## सहकार

१.२० ३१ मार्च, २०११ अखेर सुमारे ५६० लाख सभासद असलेल्या २.२४ लाख सहकारी संस्था होत्या. यापैकी, ९.६ टक्के कृषि पतपुरवठा, १०.४ टक्के बिगर-कृषि पतपुरवठा तर ८० टक्के पणन, उत्पादन, उपसा जलसिंचन, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, वाहतूक, सामाजिक क्षेत्र, इत्यादींमध्ये कार्यरत होत्या.

## ऊर्जा

१.२१ विजेची स्थापित क्षमता ३१ डिसेंबर, २०११ रोजी १९,८१६ मेगावॅट होती. डिसेंबर, २०११ अखेर ६७,१७७ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली, जी मागील वर्षापेक्षा २२ टक्क्यांनी अधिक होती.

१.२२ केंद्रिय वाटपाचे ५,३७६ मेगावॅट वगळता विजेची एकूण उपलब्ध स्थापित क्षमता मार्च, २०११ अखेर १९,१५३ मेगावॅट होती. नैसर्गिक वायुजन्य वीज निर्मिती २०१०-११ मध्ये २२.२ टक्क्यांनी वाढली. महापारेषण कंपनीची पारेषण हानी ४.३ टक्के होती. महावितरण कंपनीची वितरण हानी १७.३ टक्के तर एकत्रित/तांत्रिक व व्यावसायिक (ए.टी.ॲन्ड सी.) हानी १८.५ टक्के होती.

## परिवहन

१.२३ ३१ मार्च, २०११ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी (स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देखभालीअंतर्गत रस्त्यांची लांबी वगळून) २.४१ लाख कि.मी. इतकी होती, तर ९७.८ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी, १.६ टक्के गावे हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती व उर्वरित ०.६ टक्के गावे (२२७) कोणत्याही रस्त्यांनी जोडलेली नव्हती.

## सामाजिक क्षेत्र

१.२४ जनगणना २०११ नुसार, महाराष्ट्र हा लोकसंख्येप्रमाणे देशात दुसऱ्या क्रमांकावरील राज्य आहे. राज्याची एकत्रित लोकसंख्या ११.२४ कोटी असून स्त्रियांची टक्केवारी ४८.० टक्के आहे. नागरी भागातील लोकसंख्येची टक्केवारी ४५.२ टक्के आहे. लोकसंख्येची दशवार्षिक वाढ जवळपास १६ टक्के आहे.

१.२५ वर्ष २०१० मधील जन्म दर, अर्भक मृत्युदर व मृत्युदर हे अनुक्रमे १७.१, २८ व ६.५ होते तर २००९ मध्ये हेच दर अनुक्रमे १७.६, ३१ व ६.७ होते. २००७-२००९ या कालावधीत माता मृत्यू प्रमाण १०४ होते.

१.२६ राज्याकरिता असर - २०११ च्या अहवालानुसार प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांच्या उपस्थितीची (कोणत्याही एका दिवशी) टक्केवारी अनुक्रमे ८९.६ व ९०.० होती. तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रवेशित विद्यार्थ्यांची टक्केवारी ९९ होती.

१.२७ मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत सन २०१०-११ मध्ये १.२२ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला.

१.२८ इंदिरा आवास योजनेअंतर्गत २०१०-११ मध्ये १,५६,५७५ घरे बांधण्यात आली. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत योजनेच्या सुरूवातीपासून ते ऑक्टोबर, २०११ पर्यत ५२,८८० घरे बांधण्यात आली.

१.२९ पुरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत २०१०-११ मध्ये ग्रामीण (आदिवासीसह) व नागरी भागातील लाभार्थ्यांची संख्या अनुक्रमे ६२.३९ लाख आणि १३.१८ लाख होती.

१.३० घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली अथवा नाही याचा मागोवा घेणे यासाठी घातक कचना वाहून नेणाऱ्या वाहनांमध्ये ग्लोबल पोजिशनिंग सिस्टम (जी.पी.एस.) राज्याने अनिवार्य केली आहे. सद्यस्थितीत २०० घातक कचरा वाहतूक दारांनी ही प्रणाली आपल्या वाहनांवर बसवली आहे.

१.३१ भारत मानव विकास अहवाल-२०११, नुसार भारताचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ होता महाराष्ट्र ०.५७२ इतक्या मानव विकास निर्देशांकासह देशात पाचव्या क्रमांकावर असून, त्याआधी अनुक्रमे केरळ, दिल्ली, गोवा व पंजाब या राज्यांचा क्रम लागतो.

* * * * *

# २

# लोकसंख्या



# २. लोकसंख्या

२.१ भारतातील जनतेच्या विविध पैलुंवरील सांख्यिकीय माहितीचा जनगणना सर्वात मोठा स्रोत आहे. याद्वारे ठराविक वेळेची मौलिक माहिती भौगोलिक क्षेत्रानुसार उपलब्ध होते. नियोजनासाठी आवश्यक असलेले लोकसंख्येचे कल व त्याची विविध वैशिष्ट्ये देखील याद्वारे प्राप्त होतात. लोकसंख्या, श्रमशक्ती, साक्षरता, निवास व कुटुंबांच्या सुविधा, नागरीकरण, सामाजिक गट, भाषा, धर्म, स्थलांतर, अपंगत्व, इत्यादी माहितीचा हा अत्यंत विश्वसनीय स्रोत आहे. भारतीय जनगणनेस संपन्न परंपरा असून जगभरातील उत्तमांपैकी एक असा लौकीक आहे. जनगणना २०११ ही १८७२ पासूनच्या अखंडीत शृंखलेतील पंधरावी असून स्वातंत्र्योत्तर सातवी जनगणना आहे. भारताचे महानिबंधक यांच्यामार्फत भारतातील जनगणनेचे कामकाज पार पाडले जाते. भारताचे महानिबंधक यांनी जनगणना २०११ चे निवडक लोकसंख्याविषयक अस्थायी निष्कर्ष प्रकाशित केले असून ते येथे सादर केले आहेत.

**आलेख २.१ :दशकातील लोकसंख्या वाढ**




## जनगणना २०११

२.२ जनगणना २०११ नुसार राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी असून ती भारताच्या एकूण लोकसंख्येच्या (१२१.०२ कोटी) ९.३ टक्के इतकी आहे. लोकसंख्येच्या आकारमानानुसार उत्तर प्रदेशानंतर महाराष्ट्र भारतातील दुसरे सर्वात मोठे राज्य आहे. महाराष्ट्र व भारतासाठी लोकसंख्याविषयक आकडेवारी तक्ता २.१ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता २.१ महाराष्ट्रातील व भारतातील लोकसंख्येबाबत महत्वाचे निर्देशक**

| तपशील | | महाराष्ट्र | | भारत | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| लोकसंख्या (लाखात) | | | | | |
| एकूण | व्यक्ती | ९६९ | १,१२४ | १०,२८७ | १२,१०२ |
| | पुरूष | ५०४ | ५८४ | ५,३२२ | ६,२३७ |
| | स्त्री | ४६५ | ५४० | ४,९६५ | ५,८६५ |
| ग्रामीण | व्यक्ती | ५५८ | ६१५ | ७,४२५ | ८,३३१ |
| | पुरूष | २८५ | ३१६ | ३,८१६ | ४,२७९ |
| | स्त्री | २७३ | २९९ | ३,६०९ | ४,०५२ |
| नागरी | व्यक्ती | ४११ | ५०९ | २,८६२ | ३,७७१ |
| | पुरूष | २१९ | २६८ | १,५०६ | १,९५८ |
| | स्त्री | १९२ | २४१ | १,३५६ | १,८१३ |
| दशवार्षिक वृध्दी दर | | २२.७ | १६.० | २१.५ | १७.६ |
| नागरी लोकसंख्या (टक्केवारी) | | ४२.४ | ४५.२ | २७.८ | ३१.२ |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति '००० पुरुष) | | ९२२ | ९२५ | ९३३ | ९४० |
| क्षेत्रफळ (लाख चौ.कि.मी.) | | ३.०८ | ३.०८ | ३२.८७ | ३२.८७ |
| लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.) | | ३१५ | ३६५ | ३२५ | ३८२ |
| साक्षरता दर (टक्के) (वय ७ वर्षे व त्यावरील) | | ७६.९ | ८२.९ | ६४.८ | ७४.० |

*आधार* : भारताचे महानिबंधक

२.३ राज्याची २००१-११ या दशकातील लोकसंख्येची वाढ १६ टक्के असून ती १९४१ नंतरची सर्वात कमी वाढ आहे. यापूर्वीच्या दशकातील तत्सम वाढ २२.७ टक्के होती. २००१-२०११ या दशकातील राष्ट्रीय स्तरावर वाढ १७.६ टक्के आहे. राज्याच्या लोकसंख्येत ठाणे, पुणे व मुंबई उपनगर या जिल्ह्यांचा अनुक्रमे ९.८, ८.४ व ८.३ टक्के सहभाग आहे. उच्चत्तम दशवार्षिक वृध्दिदर ठाणे (३५.९ टक्के) जिल्हयामध्ये आढळून आला व त्या खालोखाल पुणे (३०.३ टक्के) जिल्हयात आढळून आला तर मुंबई शहर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्हयांत अनुक्रमे (-) ५.८, (-) ५.० व (-) २.३ टक्के असे ऋण वृध्दीदर आढळून आले. जिल्हानिहाय महत्वाचे लोकसंख्या विषयक निर्देशक परिशिष्ट २.१ मध्ये दिले आहेत.

## लोकसंख्येची घनता

२.४ जनगणना २०११ नुसार राज्यातील लोकसंख्येची घनता ३६५ असून ती भारताच्या लोकसंख्येच्या घनतेहून (३८२) कमी आहे. जनगणना २००१ नुसार राज्यातील लोकसंख्येची घनता ३१५ होती. लोकसंख्येच्या घनतेनुसार मुंबई उपनगर व मुंबई शहर हे जिल्हे अनुक्रमे प्रति चौ.कि.मी. २०,९२५ व २०,०३८ यासह अग्रस्थानी आहेत. ठाणे जिल्हयात लोकसंख्येची घनता १,१५७ आहे तर ५०० पेक्षा जास्त घनता असलेले पुणे (६०३) व कोल्हापूर (५०४) हे इतर जिल्हे आहेत. गडचिरोली जिल्हयाची लोकसंख्येची घनता सर्वात कमी (७४) असून त्यापाठोपाठ सिंधुदुर्ग (१६३), चंद्रपूर (१९२) व रत्नागिरी (१९६) हे जिल्हे आहेत.

## नागरी लोकसंख्या

२.५ जनगणना २०११ नुसार राज्यातील ४५.२ टक्के लोकसंख्या नागरी भागात आहे, तर ती अखिल भारतीय स्तरावर ३१.२ टक्के आहे. २००१ च्या तत्सम आकडेवारीनुसार ती अनुक्रमे ४२.४व २७.८ टक्के होती. तर या दशकात नागरी लोकसंख्या ९८ लाखांनी वाढली.

२.६ नागरी समूह हा एखादे शहर व त्यालगतची वाढ किंवा दोन अथवा जास्त भौगोलिदृष्टया संलग्न शहरे त्यांच्या लगतच्या वाढीसह वा वाढीशिवाय मिळून तयार झालेला समूह होय. नागरी समूहात (जनगणना २००१ नुसार) एकूण २०,००० किंवा त्याहून जास्त लोकसंख्या असलेले किमान एक शहर असते.

**आलेख २.२ : महाराष्ट्राची ग्रामीण व नागरी लोकसंख्या**




२.७ राज्यात दहा लाख व त्याहून जास्त लोकसंख्या असलेले पाच नागरी समूह व एक शहर आहे. बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद हे नागरी समूह असून वसई-विरार (महानगरपालिका) हे शहर आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येत या सहा नागरी समूह / शहरांचा हिस्सा २६.६ टक्के असून राज्यातील नागरी लोकसंख्येतील त्यांचा हिस्सा ५८.९ टक्के आहे. या नागरी समूह/शहराचा साक्षरता दर जास्त आहे. या नागरी समूह / शहरांचा तपशील तक्ता २.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता २.२ दहा लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेले नागरी समूह/शहरांची लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये**

| नागरी समुह/शहरे | लोकसंख्या (लाख) | लोकसंख्या (०-६ वर्षे) (लाख) | साक्षर (लाख) | स्त्री-पुरुष प्रमाण | बालकामधील स्त्री पुरुष प्रमाण (०-६ वर्षे) | साक्षरता दर (७ वर्षे व त्यावरील) (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | १८४ | १७ | १५१ | ८६१ | ९०० | ९०.८ |
| पुणे | ५१ | ६ | ४१ | ८९९ | ८८३ | ९१.४ |
| नागपूर | २५ | ३ | २१ | ९५८ | ९२० | ९३.२ |
| नाशिक | १६ | २ | १३ | ८९५ | ८५५ | ९१.० |
| औरंगाबाद | १२ | २ | ९ | ९१८ | ८५९ | ८९.२ |
| वसई-विरार (महानगर पालिका) | १२ | १ | १० | ८८० | ९१५ | ९१.१ |

*आधार* : भारताचे महानिबंधक

टीप : नागरी समुहाची रचना खालीलप्रमाणे आहे :

बृहन्मुंबई - बृहन्मुंबई, मीरा भाईंदर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर

पुणे - पुणे (महानगरपालिका), पुणे (कटक मंडळ), खडकी (कटक मंडळ), पिंपरी - चिंचवड, देहू रोड (कटक मंडळ), देहू,

नागपूर- नागपूर, दिघडोह, वाडी, नाशिक - नाशिक, एकलहरे, देवळाली, भगूर औरंगाबाद - औरंगाबाद (महानगरपालिका), औरंगाबाद (कटक मंडळ).

## ग्रामीण लोकसंख्या

२.८ जनगणना २०११ नुसार राज्यातील ग्रामीण लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५४.८ टक्के आहे तर ती राष्ट्रीय स्तरावर ६८.८ टक्के आहे. जनगणना २००१ च्या तत्सम आकडेवारीनुसार ती अनुक्रमे ५७.६ टक्के व ७२.२ टक्के होती. तथापि दहा वर्षाच्या कलावधीत राज्यातील ग्रामीण लोकसंख्या ५७ लाखांनी वाढली.







## स्त्री-पुरूष प्रमाण

२.९ जनगणना २०११ नुसार राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाण २००१ मधील ९२२ वरुन अल्पसे वाढून २०११ मध्ये ९२५ इतके झाले आहे तर राष्ट्रीय पातळीवर २००१ मध्ये ते ९३३ होते जे २०११ मध्ये वाढून ९४० पर्यंत झाले व भारतामध्ये राज्य २२ या स्थानावर आहे. मुंबई शहर (८३८), मुंबई उपनगर (८५७) आणि ठाणे (८८०) या जिल्हयांचे स्त्री-पुरुष प्रमाण कमी आहे. स्त्री-पुरुष प्रमाण सर्वात जास्त रत्नागिरी जिल्हयात (१,१२३) असून त्याखालोखाल सिंधुदुर्ग जिल्हयात (१,०३७) आहे. राज्यातील ०-६ वयोगटातील स्त्री-पुरूष प्रमाण २००१ मधील ९१३ वरुन २०११ मध्ये ८८३ पर्यंत घसरले. या स्त्री-पुरुष प्रमाणात २००१-२०११ या कालावधीत ३० बिंदूची इतकी तीव्र घसरण दिसते. राष्ट्रीय पातळीवर ०-६ वयोगटातील स्त्री-पुरूष प्रमाण (९१४) हे राज्यापेक्षा जास्त आहे. या वयोगटात राज्यातील बीड जिल्हयात स्त्री-पुरुष प्रमाणात सर्वाधिक घट झाली असून २००१ मधील ८९४ च्या तुलनेत २०११ मध्ये ८०१ अशी प्रतिकुल झाली. गडचिरोली जिल्हयाचे हे स्त्री-पुरुष प्रमाण राज्यात सर्वात जास्त (९५६) असून त्याखालोखाल चंद्रपूर (९४५) जिल्हयात आहे.







## साक्षरता

२.१० भारतातील प्रमुख राज्यामध्ये महाराष्ट्राने साक्षरतेमध्ये लक्षणीय वाढ नोंदविली आहे. सात वर्षे व अधिक वयाच्या लोकसंख्येचा साक्षरता दर २००१ मधील ७६.९ टक्क्यांवरून वाढून २०११ मध्ये ८२.९ टक्के झाला. राष्ट्रीय स्तरावर हे दर अनुक्रमे ६४.८ टक्के व ७४.० टक्के होते. असे असूनही देशामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार राज्याचे स्थान १२ आहे ते २००१ च्या जनगणनेनुसार १० होते. त्रिपुरा व







हिमाचल प्रदेश या दोन राज्यानी २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये महाराष्ट्राच्या वरचे स्थान प्राप्त केले आहे. पुरुष व स्त्रियांचा साक्षरता दर अनुक्रमे ८९.८ टक्के आणि ७५.५ टक्के आहे. पुरुष व स्त्रियांमधील साक्षरता दराच्या तफावतीत घट होत आहे. ही तफावत १९६१ मध्ये २९.५ बिंदू इतकी होती ती २०११ मध्ये १४.३ बिंदू इतकी घटली. राज्याने २००१-२०११ या दहा वर्षांच्या कालावधीत जरी लक्षणीय वाढ नोंदविली असली तरी सुमारे १.७० कोटी व्यक्ती अद्यापही निरक्षर असून त्यापैकी ६९.२ टक्के स्त्रिया आहेत. साक्षरता दर मुंबई उपनगर (९०.९ टक्के) जिल्ह्यात सर्वात जास्त असून नंदूरबार (६३.० टक्के) जिल्ह्यात सर्वात कमी आहे.

२.११ विभागनिहाय लोकसंख्येचे निवडक निर्देशक तक्ता २.३ मध्ये सादर केले आहेत.

**आलेख २.३ :स्त्री-पुरुष साक्षरता दरातील तफावत**




**तक्ता २.३ विभागनिहाय लोकसंख्येची निवडक निर्देशक- जनगणना २०११**

| विभाग | लोकसंख्या (लाखात) | | | स्त्री पुरुष प्रमाण | स्त्री पुरुष प्रमाण (०-६ वर्षे) | साक्षरता दर (टक्के) | साक्षरतेतील तफावत | घनता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | स्त्री | | | | | |
| कोकण (बृहन्मुंबई सह ) | २८६ | १५१ | १३५ | ८९१ | ९१३ | ८७.६ | ९.६ | ९३२ |
| कोकण (बृहन्मुंबई वगळून ) | १६२ | ८४ | ७७ | ९२२ | ९२१ | ८५.४ | ११.७ | ५३६ |
| नाशिक | १८६ | ९६ | ९० | ९३४ | ८६४ | ७८.२ | १६.५ | ३२३ |
| पुणे | २३५ | १२१ | ११४ | ९३७ | ८६८ | ८३.८ | १४.७ | ४०९ |
| औरंगाबाद | १८७ | ९७ | ९० | ९२६ | ८५६ | ७६.८ | २०.१ | २८९ |
| अमरावती | ११३ | ५८ | ५५ | ९४० | ८९० | ८४.२ | १४.१ | २४५ |
| नागपूर | ११७ | ६० | ५७ | ९६१ | ९३४ | ८५.१ | १२.७ | २२९ |
| **महाराष्ट्र** | **१,१२४** | **५८४** | **५४०** | **९२५** | **८८३** | **८२.९** | **१४.३** | **३६५** |

*आधार* : भारताचे महानिबंधक

## राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही

२.१२ सर्वकष ओळख माहिती संचयिका निर्माण करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही तयार करण्याचे ठरविले आहे. रहिवासी नागरिक आहे किंवा नाही हे विचारात न घेता 'नित्य रहिवासी' याबाबतचा तपशील राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवहीत असेल.

## आधार

२.१३ राज्यात आधार कार्यक्रम राबविण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालय प्रमुख संस्था म्हणून कार्यरत असून १ फेब्रुवारी, २०१२ पर्यंत ३.६६ कोटी व्यक्तींची नोंदणी झाली आहे व २.२२ कोटी आधार ओळखपत्र तयार करण्यात आली आहेत. वर्ष २०१०-११ मध्ये ३१.७४ कोटी रुपये खर्च झाले असून २०११-१२ साठी ६३.४८ कोटी रुपये अनुदान अपेक्षित आहे. आधार ओळखपत्र तयार करण्यामध्ये राज्याने देशात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

*****

## परिशिष्ट २.१
## २०११ च्या गणनेवर आधारित जिल्हानिहाय महत्त्वाचे लोकसंख्याविषयक निर्देशक

| अ. क्र. | जिल्हा | लोकसंख्या (लाखात) | | | साक्षरता दर | | | दशवार्षिक वृद्धिदर (%) (२००१-२०११) | प्रति चौ.कि.मी. घनता | स्त्री - पुरुष प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | मुंबई शहर | ३१.४६ | १७.१२ | १४.३४ | ८८.४८ | ९०.५४ | ८६.०३ | (-) ५.७५ | २०,०३८ | ८३८ |
| २ | मुंबई उपनगर | ९३.३२ | ५०.२५ | ४३.०७ | ९०.९० | ९४.२८ | ८६.९३ | ८.०१ | २०,९२५ | ८५७ |
| ३ | ठाणे | ११०.५४ | ५८.७९ | ५१.७५ | ८६.१८ | ९०.९० | ८०.७८ | ३५.९४ | १,१५७ | ८८० |
| ४ | रायगड | २६.३५ | १३.४८ | १२.८७ | ८३.८९ | ९०.६८ | ७६.७९ | १९.३६ | ३६८ | ९५५ |
| ५ | रत्नागिरी | १६.१३ | ७.६० | ८.५३ | ८२.४३ | ९१.४३ | ७४.५५ | (-) ४.९६ | १९६ | १,१२३ |
| ६ | सिंधुदुर्ग | ८.४९ | ४.१७ | ४.३२ | ८६.५४ | ९३.६८ | ७९.७३ | (-) २.३० | १६३ | १,०३७ |
| ७ | नाशिक | ६१.०९ | ३१.६४ | २९.४५ | ८०.९६ | ८८.०३ | ७३.४३ | २२.३३ | ३९३ | ९३१ |
| ८ | धुळे | २०.४९ | १०.५६ | ९.९३ | ७४.६१ | ८२.५९ | ६६.२१ | १९.९६ | २८५ | ९४१ |
| ९ | नंदुरबार | १६.४६ | ८.३५ | ८.११ | ६३.०४ | ७१.९८ | ५३.९० | २५.५० | २७६ | ९७२ |
| १० | जळगाव | ४२.२४ | २१.९८ | २०.२७ | ७९.७३ | ८७.९७ | ७०.९२ | १४.७१ | ३५९ | ९२२ |
| ११ | अहमदनगर | ४५.४३ | २३.४९ | २१.९४ | ८०.२२ | ८८.८१ | ७१.१५ | १२.४३ | २६६ | ९३४ |
| १२ | पुणे | ९४.२७ | ४९.३६ | ४४.९१ | ८७.१९ | ९२.७२ | ८१.१३ | ३०.३४ | ६०३ | ९१० |
| १३ | सातारा | ३०.०४ | १५.१३ | १४.९१ | ८४.२० | ९२.०९ | ७६.२९ | ६.९४ | २८७ | ९८६ |
| १४ | सांगली | २८.२१ | १४.३६ | १३.८५ | ८२.६२ | ९०.४० | ७४.६६ | ९.१८ | ३२९ | ९६४ |
| १५ | सोलापूर | ४३.१६ | २२.३४ | २०.८२ | ७७.७२ | ८६.३५ | ६८.५५ | १२.१० | २९० | ९३२ |
| १६ | कोल्हापूर | ३८.७४ | १९.८३ | १८.९१ | ८२.९० | ९१.३३ | ७४.१८ | ९.९६ | ५०४ | ९५३ |
| १७ | औरंगाबाद | ३६.९६ | १९.२८ | १७.६८ | ८०.४० | ८९.३१ | ७०.८१ | २७.३३ | ३६५ | ९१७ |
| १८ | जालना | १९.५८ | १०.१५ | ९.४३ | ७३.६१ | ८५.२५ | ६१.२८ | २१.८४ | २५५ | ९२९ |
| १९ | परभणी | १८.३६ | ९.४६ | ८.९० | ७५.२२ | ८५.६६ | ६४.२७ | २०.१८ | २९५ | ९४० |
| २० | हिंगोली | ११.७९ | ६.०९ | ५.७० | ७६.०४ | ८६.७३ | ६४.७३ | १९.४३ | २४४ | ९३५ |
| २१ | बीड | २५.८६ | १३.५२ | १२.३३ | ७३.५३ | ८३.९९ | ६२.२९ | १९.६५ | २४२ | ९१२ |
| २२ | नांदेड | ३३.५७ | १७.३३ | १६.२४ | ७६.९४ | ८६.६२ | ६६.६८ | १६.७० | ३१९ | ९३७ |
| २३ | उस्मानाबाद | १६.६० | ८.६५ | ७.९६ | ७६.३३ | ८५.३१ | ६६.६७ | ११.६९ | २१९ | ९२० |
| २४ | लातूर | २४.५६ | १२.७६ | ११.७९ | ७९.०३ | ८७.४२ | ७०.०२ | १८.०४ | ३४३ | ९२४ |
| २५ | बुलढाणा | २५.८८ | १३.४२ | १२.४६ | ८२.०९ | ९०.६९ | ७२.९५ | १५.९३ | २६८ | ९२८ |
| २६ | अकोला | १८.१९ | ९.३६ | ८.८२ | ८७.५५ | ९२.८९ | ८१.९१ | ११.६० | ३२१ | ९४२ |
| २७ | वाशिम | ११.९७ | ६.२१ | ५.७५ | ८१.७० | ९०.५४ | ७२.२६ | १७.२३ | २४४ | ९२६ |
| २८ | अमरावती | २८.८८ | १४.८३ | १४.०५ | ८८.२३ | ९२.७० | ८३.५२ | १०.७७ | २३७ | ९४७ |
| २९ | यवतमाळ | २७.७५ | १४.२६ | १३.५० | ८०.७० | ८८.५८ | ७२.४१ | १२.९० | २०४ | ९४७ |
| ३० | वर्धा | १२.९६ | ६.६६ | ६.३० | ८७.२२ | ९२.२७ | ८१..८९ | ४.८० | २०५ | ९४६ |
| ३१ | नागपूर | ४६.५३ | २३.८९ | २२.६५ | ८९.५२ | ९३.७६ | ८५.०७ | १४.३९ | ४७० | ९४८ |
| ३२ | भंडारा | ११.९९ | ६.०४ | ५.९४ | ८५.१४ | ९३.१७ | ७७.०२ | ५.५२ | २९३ | ९८४ |
| ३३ | गोंदिया | १३.२२ | ६.६३ | ६.६० | ८५.४१ | ९३.५४ | ७७.३० | १०.१३ | २५३ | ९९६ |
| ३४ | चंद्रपुर | २१.९४ | ११.२० | १०.७४ | ८१.३५ | ८८.७३ | ७३.६५ | ५.९५ | १९२ | ९५९ |
| ३५ | गडचिरोली | १०.७२ | ५.४३ | ५.२९ | ७०.५५ | ८०.२१ | ६०.६६ | १०.४६ | ७४ | ९७५ |
| | **एकूण** | **१,१२३.७३** | **५८३.६१** | **५४०.१२** | **८२.९१** | **८९.८२** | **७५.४८** | **१५.९९** | **३६५** | **९२५** |

*आधार* - भारताचे महानिबंधक

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट २.२
## महाराष्ट्राची व भारताची गणनांवर आधारित लोकसंख्या

| वर्ष | | एकूण लोकसंख्या (कोटी) | | दशवर्षीय वाढीची टक्केवारी | | साक्षरतेची टक्केवारी ££ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १९६१ | ... | ३.९६ | ४३.९२ | २३.६० | २१.५१ | ३५.१ | २८.३ |
| १९७१ | ... | ५.०४ | ५४.८२ | २७.४५ | २४.८० | ४५.८ | ३४.५ |
| १९८१ | ... | ६.२८ | ६८.५२ | २४.५४ | २५.०० | ५५.८ | ४३.७ § |
| १९९१ | ... | ७.८९ | ८४.६३ £ | २५.७३ | २३.८५ £ | ६४.९ | ५२.२ @@ |
| २००१ | ... | ९.६९ | १०२.८७ | २२.७३ | २१.५४ | ७६.९ | ६४.८ |
| २०११ | ... | ११.२४ | १२१.०२ | १५.९९ | १७.६४ | ८२.९ | ७४.० |

*आधार* - भारताचे महानिबंधक

£ जम्मू व काश्मीरची प्रक्षेपित केलेली लोकसंख्या धरुन

££ १९६१ व १९७१ ची साक्षरतेची टक्केवारी ५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येसाठी आहे. १९८१, १९९१, २००१ व २०११ ची साक्षरतेची टक्केवारी ७ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येसाठी आहे.

§ १९८१ च्या साक्षरतेची टक्केवारी आसाम आणि जम्मू व काश्मीर वगळून

@@ १९९१ च्या साक्षरतेची टक्केवारी जम्मू व काश्मीर वगळून

## परिशिष्ट २.३
## महाराष्ट्राची गणनांवर आधारित ग्रामीण आणि नागरी लोकसंख्या

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | | | | नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | स्त्री-पुरुष प्रमाण | | | प्रति चौ.कि.मी घनता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | पुरुष | स्त्रिया | | एकूण | ग्रामीण | नागरी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९६१ | २.८४ | १.१२ | ३.९६ | २.०४ | १.९१ | २८.२२ | ९३६ | ९९५ | ८०१ | १२९ |
| १९७१ | ३.४७ | १.५७ | ५.०४ | २.६१ | २.४३ | ३१.१७ | ९३० | ९८५ | ८२० | १६४ |
| १९८१ | ४.०८ | २.२० | ६.२८ | ३.२४ | ३.०४ | ३५.०३ | ९३७ | ९६७ | ८५० | २०४ |
| १९९१ | ४.८४ | ३.०५ | ७.८९ | ४.०८ | ३.८१ | ३८.६९ | ९३४ | ९७२ | ८७५ | २५७ |
| २००१ | ५.५८ | ४.११ | ९.६९ | ५.०४ | ४.६५ | ४२.४३ | ९२२ | ९६० | ८७३ | ३१५ |
| २०११ | ६.१५ | ५.०९ | ११.२४ | ५.८४ | ५.४० | ४५.२३ | ९२५ | ९४८ | ८९९ | ३६५ |

*आधार* - भारताचे महानिबंधक

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# ३

# राज्य उत्पन्न



# ३. राज्य उत्पन्न

## आर्थिक रुपरेषा

३.१ वर्ष २०११-१२ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नात मागील वर्षीच्या ११.३ टक्के वाढीच्या तुलनेत ८.५ टक्क्यांनी वाढ होणे अंदाजित आहे. पिकांखालील क्षेत्रात झालेली घट व विषम पर्जन्यमान यामुळे अन्नधान्य उत्पादन कमी होण्याची शक्यता असून त्यामुळे कृषि क्षेत्राच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो. कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राची सर्वसाधारण अंदाजित वाढ (-) ५.१ टक्के आहे. उद्योग क्षेत्राच्या ९.१ टक्के वाढीमध्ये बांधकाम या भक्कम क्षेत्राचे २२ टक्के वाढीसह भरीव योगदान आहे. दळणवळण, रेल्वे, बँक व विमा, व्यवसाय सेवा ही प्रत्येकी १० टक्क्यांहून अधिक वाढ असलेली उपक्षेत्रे सेवा क्षेत्राच्या अपेक्षित १०.१ टक्के वाढीस कारणीभूत आहे.

## स्थूल राज्य उत्पन्न २०११-१२ (पूर्वानुमान)

३.२ राज्यातील सर्वसाधारण पर्जन्यमानातील प्रसार व तीव्रता यातील असमानतेमुळे आणि त्याचबरोबर तृणधान्ये, कडधान्ये व तेलबिया या पिकांच्या क्षेत्रात घट झाल्याने कृषि उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामातील तेलबिया उत्पादनातील ४७ टक्के घट तसेच या हंगामात एकूण अन्नधान्य उत्पादनातील ४५ टक्के घट यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत एकूण अन्नधान्य उत्पादनात २३ टक्के, तेलबिया उत्पादनात ८ टक्के व कपास उत्पादनात १५ टक्के घट होणे अंदाजित आहे. कृषि क्षेत्रातील ९.१ टक्के इतक्या अंदाजित घटीमुळे कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रात ५.१ टक्के इतकी घट अंदाजित आहे. दरवाढच व जागतिक स्थितीच्या परिणामस्वरुप वस्तुनिर्माण क्षेत्रास अपेक्षित गती राखणे शक्य होत नसल्याने या क्षेत्रात ४.२ टक्के इतकी वाढ राहील. तथापि बांधकाम क्षेत्रातील अंदाजित २२.३ टक्के इतक्या भक्कम वाढीमुळे उद्योग क्षेत्रात ९.१ टक्के दराने वाढ होण्यास मदत होणार आहे. सतत वृध्दींगत होणारे सेवा क्षेत्र २०११-१२ मध्ये १०.१ टक्के वाढीचा दर राखून आपली गती कायम ठेवेल.

३.३ पूर्वानुमानानुसार स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न मागील वर्षीच्या तुलनेत ८.५ टक्के वाढून ₹ ८,०५,०३१ कोटी इतके होणे अंदाजित आहे.

## देशांतर्गत स्थूल उत्पन्न २०११-१२ (पूर्वानुमान)

३.४ केंद्रीय सांख्यिकी संघटनेने प्रसिध्द केलेल्या पूर्वानुमानानुसार स्थिर (२००४-०५) किंमतींनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्नात २०११-१२ मध्ये ६.९ टक्के अशी माफक वाढ अपेक्षित आहे. कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रात २.५ टक्के इतकी वाढ अपेक्षित आहे. जरी वस्तुनिर्माण क्षेत्र ३.९ टक्के इतक्या वृध्दीदरावर अडखळत असला तरी 'वीज, गॅस व पाणीपुरवठा' क्षेत्रातील ८.३ टक्के वृध्दीदरामुळे उद्योग क्षेत्रास ३.९ टक्के वृध्दीदर गाठणे शक्य होणार आहे. 'व्यापार, हॉटेल्स व उपहारगृह, वाहतूक व दळणवळण' यातील सर्वाधिक ११.२ टक्के वाढ, 'बँका व विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा' या क्षेत्रातील ९.१ टक्के वाढ व 'सामुहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा' या क्षेत्रातील ५.९ टक्के इतकी माफक वाढ यामुळे सेवा क्षेत्रात ९.४ टक्के वाढ अंदाजित आहे. सेवा क्षेत्रातील ९.४ टक्के इतक्या भरीव वाढीमुळेच देशांतर्गत स्थूल उत्पन्नात ६.९ टक्के इतकी माफक वाढ होणे शक्य आहे.

३.५ पूर्वानुमानानुसार स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ ५२,२२,०२७ कोटी तर चालू किंमतीनुसार ते ₹ ८२,७९,९७५ कोटी इतके अपेक्षित आहे.

## स्थूल राज्य उत्पन्न २०१०-११

३.६ प्रारंभिक अंदाजानुसार, २००९-१० मधील स्थिर (२००४-०५) किंमतींनुसार ₹ ६,६६,१२३ कोटी इतक्या स्थूल राज्य उत्पन्नात ११.३ टक्के इतकी भरीव वाढ होऊन ते २०१०-११ मध्ये ₹ ७,४१,६९४ कोटी इतके होणे अपेक्षित आहे. खरीप व रब्बी हंगामातील पिकांच्या भरघोस उत्पादनामुळे कृषि क्षेत्रात १८.८ टक्के वाढ होण्यास मदत झाली आहे. वर्ष २०१०-११ मध्ये अन्नधान्याच्या उत्पादनात २२.५ टक्के, तेलबियांच्या उत्पादनात ७९.३ टक्के, कापूस उत्पादनामध्ये ४६.२ टक्के आणि ऊस उत्पादनात ३३.६ टक्के वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या ०.८ टक्के इतक्या अल्प वाढीच्या तुलनेत कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रात १५.६ टक्के इतकी वाढ झाली आहे. वस्तुनिर्माण क्षेत्राने ८.३ टक्के वाढीसह सातत्यपूर्ण राखलेली गती तसेच 'वीज, गॅस व पाणीपुरवठा' क्षेत्रातील १०.० टक्के आणि भरभराट होणाऱ्या बांधकाम क्षेत्रातील १८.८ टक्के वाढ यामुळे उद्योग क्षेत्राची १०.८ टक्के वाढ होण्यास मदत झाली आहे. कृषि व वस्तुनिर्माण क्षेत्रातील उत्पादनावर मुख्यत: अवलंबून असणा-या 'व्यापार, हॉटेल व उपहारगृह' या सेवा क्षेत्रामध्ये १०.९ टक्के वाढ झाली आहे. 'दळणवळण' क्षेत्रात सर्वाधिक ३१.९ टक्के वाढ नोंदविण्यात आलेली असली तरी या क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पन्नातील हिस्सा २.० टक्के इतका अल्प असल्याने त्याचा स्थूल राज्य उत्पन्नाच्या वाढीत अत्यल्प सहभाग आहे. 'बँकींग व विमा' क्षेत्रातील १३.० टक्के वाढ आणि 'व्यवसाय सेवा' क्षेत्रातील ९.६ टक्के वाढ यासह वरील दोन उपक्षेत्रांमुळे सेवा क्षेत्रात ११.० टक्के वाढ शक्य झाली आहे. स्थूल राज्य उत्पन्न आणि देशांतर्गत स्थूल उत्पन्नामधील क्षेत्रनिहाय वार्षिक वृध्दीदराबाबतचा तपशील तक्ता ३.१ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता ३.१ स्थिर (२००४-०५) किंमतींनुसार क्षेत्रनिहाय वृद्धिदर**

*(टक्के)*

| क्षेत्र | राज्य स्थूल उत्पन्न | | | देशांतर्गत स्थूल उत्पन्न $ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००९-१० * | २०१०-११ + | २०११-१२ ++ | २००९-१० * | २०१०-११ + | २०११-१२ ++ |
| **कृषि व संलग्न कार्ये** | **०.८** | **१५.६** | **(-) ५.१** | **१.०** | **७.०** | **२.५** |
| i) कृषि | ३.९ | १८.८ | (-) ९.१ | ०.७ | ७.८ | -- |
| ii) वन संवर्धन | (-) १०.६ | ३.१ | १४.३ | २.८ | २.९ | -- |
| iii) मत्स्यव्यवसाय | (-) १.५ | २.६ | २.६ | ३.० | ३.० | -- |
| **उद्योग** | **१०.०** | **१०.८** | **९.१** | **८.४** | **७.२** | **३.९** |
| i) खाण व दगडखाण | ७.१ | १.३ | (-) २.९ | ६.३ | ५.० | (-) २.२ |
| ii) वस्तुनिर्माण | ७.२ | ८.३ | ४.२ | ९.७ | ७.६ | ३.९ |
| iii) वीज, वायू व पाणी पुरवठा | १०.९ | १०.० | ११.० | ६.३ | ३.० | ८.३ |
| iv) बांधकाम | १८.८ | १८.८ | २२.३ | ७.० | ८.० | ४.८ |
| **सेवा** | **१०.०** | **११.०** | **१०.१** | **१०.५** | **९.४** | **९.४** |
| i) व्यापार, हॉटेल व उपहारगृहे, वाहतूक, साठवण व दळणवळण | १९.८ | १२.८ | ८.७ | १०.३ | ११.१ | ११.२ |
| ii) वित्त, विमा, स्थावर मालमत्ता व व्यवसाय सेवा | ३.९ | १०.३ | ११.९ | ९.४ | १०.४ | ९.१ |
| iii) सामुहिक व वैयक्तिक सेवा | ५.० | ८.६ | ९.१ | १२.१ | ४.५ | ५.९ |
| **राज्यांतर्गत / देशांतर्गत स्थूल उत्पन्न** | **९.२** | **११.३** | **८.५** | **८.४** | **८.४** | **६.९** |

$ आधार : केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी + प्रारंभिक ++ पूर्वानुमान

## वाढीचा कल आणि हिस्सा

३.७ २००५-०६ व २००६-०७ या वर्षामध्ये स्थूल राज्य उत्पन्नात १३ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ दिसून आली. तथापि, २००७-०८ या वर्षामध्ये वाढीचा दर घटून ११.३ टक्के झाला. राज्य स्थूल उत्पन्नाची मालिका २००४-०५ या पायाभूत वर्षानुसार २०१०-११ मध्ये जरी सुधारित करण्यात आली असली तरी २०११-१२ मध्ये स्थूल व्यापार उत्पन्न (जीटीआय) या एका घटकाचे गुणोत्तर सुधारित करण्यात आले. सदर गुणोत्तर केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाकडून मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण मालिकेचे अंदाज २०११-१२ मध्ये सुधारित करण्यात आले. त्यानुसार २००८-०९ मधील स्थिर किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्नातील वाढ २.६ टक्के अशी सुधारित झाली आहे. चांगल्या सुगीच्या हंगामामुळे व आर्थिक संकटातून सावरल्याने २००९-१० मध्ये ९.२ टक्के वृध्दीदर गाठता आला. चांगले हवामान व मंदीच्या सावटाच्या स्थितीत फरक पडल्याने २०१०-११ मध्ये ११.३ टक्के इतक्या वाढीसह पूर्वपदावर येणे शक्य झाले. तपशील परिशिष्ट ३.१ ते ३.४ मध्ये दिलेला आहे.

३.८ देशपातळीवरील वस्तुस्थिती फारशी वेगळी नाही. वर्ष २००५-०६ पासून सलग ३ वर्षे देशांतर्गत स्थूल उत्पन्नात ९ टक्क्यापेक्षा जास्त वाढ साध्य केल्यानंतर वर्ष २००८-०९ मध्ये वृध्दीदर ६.७ टक्क्यांवर सीमित झाला. त्यानंतरच्या दोन वर्षामध्ये देशांतर्गत स्थूल उत्पन्नात प्रत्येकी ८.४ टक्के वाढ झाली आहे. स्थिर किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न २०१०-११ च्या शीघ्र अंदाजानुसार ८.४ टक्के वाढणे अपेक्षित असून ते ₹ ४८,८५,९५४ कोटी इतके होईल. स्थिर किंमतीनुसार राज्य स्थूल उत्पन्न व देशांतर्गत स्थूल उत्पन्न यांच्या वाढीची तुलनात्मक माहिती तक्ता ३.२ मध्ये दिली आहे. सविस्तर तपशील परिशिष्ट ३.५ ते ३.८ मध्ये दिलेला आहे.

३.९ चालू किंमतीनुसार २०१०-११ मधील स्थूल राज्य उत्पन्न (प्राथमिक अंदाज) ₹ १०,६८,३२७ कोटी इतके असून ते २००९-१० च्या तुलनेत २३.१ टक्क्यांनी अधिक आहे. चालू किंमतीनुसार २०१०-११ मधील देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ ७१,५७,४१२ इतके अंदाजित आहे. चालू किंमतीनुसार २०१०-११ मधील देशांतर्गत स्थूल उत्पन्नामध्ये राज्याचा १४.९ टक्के हिस्सा आहे.

३.१० चालू किंमतीनुसार वर्ष २००९-१० मधील दरडोई स्थूल राज्य उत्पन्न ₹ ७८,५५१ च्या तुलनेत वर्ष २०१०-११ मध्ये ₹ ९५,३५१ इतके अंदाजित आहे तर वर्ष २०१०-११ साठी चालू किंमतीनुसार दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ ६०,३४९ इतके आहे.

**तक्ता ३.२ स्थूल राज्य उत्पन्न व देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वृद्धिदर { स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार }**

*(टक्के)*

| वर्ष | स्थूल राज्य उत्पन्न | देशांतर्गत स्थूल उत्पन्न |
|---|---|---|
| २००५-०६ | १३.३ | ९.५ |
| २००६-०७ | १३.५ | ९.६ |
| २००७-०८ | ११.३ | ९.३ |
| २००८-०९ | २.६ | ६.७ |
| २००९-१० * | ९.२ | ८.४ |
| २०१०-११ + | ११.३ | ८.४ |
| २०११-१२ ++ | ८.५ | ६.९ |

*आधार* : केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार व अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र
* अस्थायी + प्रारंभिक ++ पूर्वानुमान

## क्षेत्रनिहाय रचना आणि वाढ

३.११ सध्याच्या मालिकेमध्ये, चालू किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्नात कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्राचा हिस्सा १० ते १३ टक्के या दरम्यान होता. खराब पर्जन्यमानामुळे २००८-०९ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नातील वाढ (-) १५.५ टक्क्यांवर घसरली तर चांगल्या पर्जन्यमानाच्या परिणामी २००७-०८ मध्ये (१३.८ टक्क्यांची वाढ) आणि आता २०१०-११ मध्ये (१५.६ टक्क्यांची वाढ) अशी चांगली वाढ दिसून आली. चालू किंमतीनुसार वर्ष २०१०-११ मध्ये कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राचे स्थूल राज्य उत्पन्न ₹ १,३६,५४० कोटी रुपये (एकूण स्थूल राज्य उत्पन्नाच्या १२.८ टक्के) इतके अंदाजित आहे.

३.१२ कमी दरात उपलब्ध असणारी श्रमशक्ती आणि मोठी देशांतर्गत बाजारपेठ या कारणांमुळे वस्तुनिर्माण क्षेत्राने आपले अस्तित्व टिकवले आहे. वस्तुनिर्माण क्षेत्रातील चढ-उतार उद्योग क्षेत्राच्या स्थूल राज्य उत्पन्नातील वाट्यात परिवर्तीत होत असून उद्योग क्षेत्राचा वाटा २९ व ३२ टक्के या दरम्यान आहे. वर्ष २००८-०९ हे जागतिक आर्थिक संकटाचे वर्ष सुध्दा होते, ज्याचा परिणाम उद्योग क्षेत्राच्या नकारात्मक वाढीत ((-) १.१ टक्के) दिसून येतो. स्थिर किंमतीनुसार वर्ष २००८-०९ व्यतिरिक्त उद्योग क्षेत्राने वर्ष २००४-०५ पासून आपल्या वाढीचा दर १० टक्के व अधिक कायम ठेवला आहे. वर्ष २०१०-११ मध्ये उद्योग क्षेत्राचे चालू किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३,२३,३११ कोटी (एकूण स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत ३०.३ टक्के) इतके अंदाजित आहे.

३.१३ सुधारित मालिकेमध्ये सेवा क्षेत्राने २००८-०९ वर्षाचा अपवाद वगळता स्थिर किंमतीनुसार १० टक्क्यांपेक्षा जास्त वृध्दीदराचे सातत्य राखलेले आहे. चालू किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्नात त्याचा वाटा ५५ टक्के व ६० टक्के या दरम्यान आहे. सेवा क्षेत्रातील प्रमुख हिस्सेदार असणाऱ्या 'व्यापार, हॉटेल्स व उपाहारगृहे', 'बँकींग व विमा' आणि 'स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी आणि व्यवसाय सेवा' यांचे मोठ्या प्रमाणावर योगदान असून त्यांचा वाटा प्रत्येकी १० टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

३.१४ देशपातळीवर वर्ष २००७-०८ आणि २०१०-११ मधील कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राचा वृध्दीदर जरी अधिक असला तरी चालू मालिकेनुसार या क्षेत्राचा वाटा धिम्यागतीने कमी होत १९ टक्क्यांवरुन १४ टक्क्यांवर आला आहे.

३.१५ उद्योग क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील हिस्सा २००७-०८ मध्ये सर्वाधिक होऊन २९ टक्क्यांवर गेला होता. परंतु त्यात पुन्हा घट होण्यास सुरुवात होऊन २०१०-११ मध्ये तो २८ टक्क्यांवर पोहचला. स्थिर किंमतीनुसार उद्योग क्षेत्रातील वाढ २००८-०९ वगळता ८ टक्क्यांपेक्षा अधिक होती. २००८-०९ मध्ये ती घसरुन ४.४ टक्के झाली व पुन्हा २०१०-११ मध्ये ७.२ टक्के अशी माफक प्रमाणात वाढली आहे.

३.१६ सेवा क्षेत्राच्या देशातंर्गत स्थूल उत्पन्नातील हिश्श्याचा कल स्पष्ट असून २००७-०८ मध्ये जेव्हा इतर दोन क्षेत्रांचा, मुख्यतः उद्योग क्षेत्राचा हिस्सा सर्वाधिक होता, तेव्हा तो सर्वात कमी होता. सेवा क्षेत्राचा हिस्सा देशांतर्गत स्थूल उत्पन्नात ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. स्थिर किंमतीनुसार सेवा क्षेत्रातील वाढीचा दर २०१०-११ चा अपवाद वगळता नेहमीच १० टक्क्यांपेक्षा अधिक होता. २०१०-११ मध्ये तो ९.४ टक्के इतका होता.

## राज्य आणि राष्ट्रीय उत्पन्न

३.१७ प्राथमिक अंदाजाप्रमाणे, राज्य उत्पन्न म्हणजेच निव्वळ राज्य उत्पन्न चालू किंमतीनुसार २००९-१० च्या ₹ ७,८७,७६१ कोटींच्या तुलनेत २०१०-११ मध्ये ₹ ९,८२,४५२ कोटी इतके असून त्यात मागील वर्षीच्या १६.२ टक्के वाढीच्या तुलनेत २४.७ टक्के इतकी वाढ झाली आहे. राज्य उत्पन्न स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार २०१०-११ साठी ₹ ६,६९,२७९ कोटी इतके अंदाजित करण्यात आले असून ते २००९-१० मध्ये ₹ ५,९८,४५५ कोटी होते. मागील वर्षीच्या ९.५ टक्के वाढीच्या तुलनेत त्यात ११.८ टक्के वाढ अपेक्षित आहे.

३.१८ चालू किंमतीनुसार २०१०-११ साठी ₹ ५३,३३१ कोटी इतक्या दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत दरडोई राज्य उत्पन्न (म्हणजे दरडोई निव्वळ राज्य उत्पन्न) ₹ ८७,६८६ इतके अंदाजित करण्यात आले आहे.

## इतर राज्यांशी तुलना

३.१९ प्रमुख राज्यांचे वृध्दिदर, राज्य स्थूल उत्पन्नाचा देशांतर्गत स्थूल उत्पन्नातील हिस्सा आणि दरडोई राज्य उत्पन्न तक्ता ३.३ मध्ये दर्शविण्यात आले आहेत. देशांतर्गत स्थूल उत्पन्नातील महाराष्ट्राचा हिस्सा १४.९ टक्के इतका असून तो या राज्यांमध्ये सर्वात अधिक आहे.

**तक्ता ३.३ राज्याची तुलना - २०१०-११**

| राज्य | वृध्दीदर (टक्के) (स्थिर किंमतीनुसार) | स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील हिस्सा (टक्के) (चालू किंमतीनुसार) | दरडोई उत्पन्न (₹) (चालू किंमतीनुसार) |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १०.० | ८.२३ | ६२,९१२ |
| बिहार | १४.८ | ३.०४ | २०,७०८ |
| गुजरात | १०.५ | ७.१७ | ७५,११५ |
| कर्नाटक | ८.९ | ५.६६ | ६०,९४६ |
| केरळ | ९.१ | ३.८७ | ७१,४३४ |
| मध्य प्रदेश | ८.२ | ३.६३ | ३२,२२२ |
| महाराष्ट्र | ११.३ | १४.९३ | ८७,६८६ |
| पंजाब | ७.० | ३.२० | ६९,७३७ |
| राजस्थान | ११.० | ४.५२ | ४२,४३४ |
| तामीळनाडू | ११.७ | ७.६५ | ७२,९९३ |
| उत्तर प्रदेश | ७.९ | ८.३१ | २६,३५५ |
| पश्चिम बंगाल | ७.१ | ६.६२ | ४८,५३६ |

आधार : इतर राज्यांसाठी केंद्रीय सांख्यिकी कार्यालय व महाराष्ट्रासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय

## चलनवाढ

३.२०  किंमतीमधील चलनवाढ हा साधारणपणे घाऊक किंमत निर्देशांकातील वाढीमध्ये मोजली जाते. परंतु हीच चलनवाढ स्थूल राज्य उत्पन्न/ देशांतर्गत स्थूल उत्पन्नातील क्षेत्रे ज्या विविध विक्रेय वस्तू/ बाबींच्या एकत्रित गटाने बनली आहेत त्यांच्या चलनसंकोचाद्वारे सुध्दा दिसून येऊ शकते. घाऊक किंमत निर्देशांकानुसार मोजण्यात आलेल्या तसेच स्थूल राज्य उत्पन्न/ स्थूल देशांतर्गत उत्पन्न यांच्या गर्भित चलनसंकोचकाद्वारे मोजण्यात आलेल्या चलनवाढीचा कल आलेख ३.१ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

३.२१  २०१०-११ या वर्षात कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रातील राज्यस्तरावरील गर्भित चलनवाढ २८.७ टक्के तर अखिल भारत स्तरावर ९.९ टक्के आहे. उद्योग व सेवा या दोन्ही क्षेत्रांसाठी राज्यस्तरावर गर्भित चलनवाढ अनुक्रमे ९.० टक्के आणि ७.८ टक्के होती तर देशस्तरावर ती अनुक्रमे ७.९ टक्के व ८.३ टक्के होती.

**आलेख ३.१ : चलनफुगवटा - स्थूल राज्य उत्पन्न/ देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न/ घाऊक किंमत निर्देशांक**




## जिल्हा उत्पन्न

३.२२  राज्य उत्पन्न अंदाज तयार करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या 'उत्पन्न स्त्रोत पध्दत' या पध्दतीचा जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यासाठी अवलंब करण्यात येतो. त्यामुळे राज्य उत्पन्न अंदाजातील सर्व अंगभूत मर्यादा जिल्हा उत्पन्न अंदाजानाही लागू आहेत. ज्या क्षेत्रांकरिता जिल्हास्तरावरील आकडेवारी उपलब्ध आहे त्या क्षेत्राकरिता राज्य उत्पन्न अंदाज तयार करण्याची कार्यपध्दती वापर करुन जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार केले आहेत. कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राकरिता बहुतांश आकडेवारी जिल्हास्तरावर वापरण्यात येते, मात्र इतर क्षेत्रांकरिता अत्यंत अपुरी माहिती उपलब्ध असल्यामुळे त्या क्षेत्रांकरिता जिल्हावार अनुरुप असे निर्देशक वापरुन त्या आधारे राज्यस्तरावरील अंदाज जिल्हावार विभागण्यात येत आहे. आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव, अनुरुप निर्देशकांचा वापर, तसेच अंदाज तयार करण्याच्या पध्दतीमधील विविध मर्यादा या सर्वांमुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज परिगणित करण्यामध्ये मर्यादा येत असल्याने, हे अंदाज जिल्हा उत्पन्नाचे स्तर ढोबळ मानाने अजमाविण्याकरिताच वापरावेत. जिल्ह्यांतर्गत उत्पन्नाचे अंदाज परिशिष्ट ३.९ मध्ये दर्शविले आहेत.

**दरडोई जिल्हा उत्पन्न (२०१०-११)**




* * * * *

# परिशिष्ट ३.१
## औद्योगिक स्त्रोतांनुसार स्थूल राज्य उत्पन्न - चालू किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ. क्र. | उद्योग | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१०* | २०१०-११+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | कृषि | ३४,४२३ | ३९,८९७ | ५०,९७१ | ६४,७१२ | ५९,११८ | ७३,६३१ | १,१५,१८६ |
| २ | वन संवर्धन | ९,१३० | ११,३३१ | १४,६१६ | १४,१७१ | १४,८१८ | १६,२२६ | १८,९८० |
| ३ | मासेमारी | १,३७४ | १,५३६ | १,६४२ | १,८०१ | १,७३७ | १,९४० | २,३७४ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य** | **४४,९२७** | **५२,७६४** | **६७,२२९** | **८०,६८४** | **७५,८३३** | **९१,७९७** | **१,३६,५४०** |
| | **(उप-बेरीज - १+२+३)** | *(१०.८)* | *(१०.८)* | *(११.५)* | *(११.८)* | *(१०.१)* | *(१०.६)* | *(१२.८)* |
| ५ | खाण व दगड खाणकाम | ३,४९१ | ३,८५२ | ३,२८६ | ३,८७३ | ५,१६८ | ४,३५३ | ४,६६४ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र** | **४८,४१८** | **५६,६१६** | **७०,५१५** | **८४,५५७** | **८१,००१** | **९६,१५०** | **१,४१,२०४** |
| | **(उप-बेरीज - ४+५)** | | | | | | | |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | ५८,५४५ | ८१,९४३ | १,०३,३१० | १,१८,२०९ | १,२०,७४८ | १,३०,०४६ | १,५२,०६० |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | २६,९३१ | ३१,०८२ | ३६,७६९ | ४४,१३३ | ४६,४३६ | ५१,१९४ | ५९,३९२ |
| ९ | बांधकाम | २६,१४३ | ३०,२०७ | ३४,३८७ | ४४,७४३ | ५२,५१२ | ६८,६२४ | ९०,२४३ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ७,९१२ | ७,५९९ | ९,१७५ | १०,५९८ | ११,२२५ | १३,३९७ | १६,९५२ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र** | **१,१९,५३१** | **१,५०,८३१** | **१,८३,६४१** | **२,१७,६८३** | **२,३०,९२१** | **२,६३,२६१** | **३,१८,६४७** |
| | **(उप-बेरीज - ७ ते १०)** | | | | | | | |
| **१२** | **उद्योग** | **१,२३,०२२** | **१,५४,६८३** | **१,८६,९२७** | **२,२१,५५६** | **२,३६,०८९** | **२,६७,६१४** | **३,२३,३११** |
| | **(उप-बेरीज - ५+११)** | *(२९.६)* | *(३१.८)* | *(३२.०)* | *(३२.४)* | *(३१.३)* | *(३०.८)* | *(३०.२)* |
| १३ | रेल्वे | २,८५३ | २,९२८ | ३,४४४ | ३,९०० | ४,५२२ | ६,०४२ | ६,११६ |
| १४ | परिवहन व साठवण | २१,८४७ | २४,४४१ | २९,४४९ | ३३,५८५ | ३८,९५८ | ४४,००७ | ५०,७५६ |
| १५ | दळणवळण | ८,२२९ | ९,१३४ | ९,८१९ | ११,१२१ | १२,९९५ | २०,०४० | २३,७०९ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ६७,१५६ | ७६,१३९ | ९३,१५४ | १,०५,७९३ | १,१२,७४० | १,३१,४८७ | १,५७,७८० |
| १७ | बँका व विमा उद्योग | ४७,४२६ | ५१,१३० | ५९,६१२ | ६९,५३५ | ८३,३२० | ८९,३०६ | १,०९,४६९ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा व विधी सेवा | ५३,२६२ | ६२,५९९ | ७४,५२० | ८९,१३५ | १,०६,३०२ | १,१८,११७ | १,४०,५६९ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १९,५३६ | २१,४३५ | २३,५९३ | २८,४०१ | ३५,९५३ | ४२,४८५ | ५१,५६३ |
| २० | इतर सेवा | २७,२२३ | ३१,५१२ | ३६,७५२ | ४१,१०५ | ४७,२५७ | ५६,८९१ | ६८,५१३ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा** | **२,४७,५३१** | **२,७९,३१८** | **३,३०,३४२** | **३,८२,५७६** | **४,४२,०४७** | **५,०८,४५५** | **६,०८,४७५** |
| | **(उप-बेरीज - १३ ते २०)** | *(५९.६)* | *(५७.४)* | *(५६.५)* | *(५५.८)* | *(५८.६)* | *(५८.६)* | *(५७.०)* |
| **२२** | **स्थूल राज्य उत्पन्न** | **४,१५,४८०** | **४,८६,७६६** | **५,८४,४९८** | **६,८४,८१७** | **७,५३,९६९** | **८,६७,८६६** | **१०,६८,३२७** |
| | **एकूण - (६+११+२१)** | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* |
| **२३** | **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न (₹)** | **४०,५०९** | **४६,७३२** | **५५,२७७** | **६३,८१०** | **६९,२३०** | **७८,५५१** | **९५,३५१** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे स्थूल राज्य उत्पन्नांशी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.२
## औद्योगिक स्त्रोतांनुसार स्थूल राज्य उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ. क्र. | उद्योग | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१०* | २०१०-११+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | कृषि | ३४,४२३ | ३८,३६४ | ४४,५८७ | ५१,८५५ | ४१,५४९ | ४३,१५९ | ५१,२७९ |
| २ | वन संवर्धन | ९,१३० | ९,१४७ | ९,८१७ | १०,१९७ | १०,७७५ | ९,६२९ | ९,९३० |
| ३ | मासेमारी | १,३७४ | १,५५१ | १,५४१ | १,५८९ | १,४८४ | १,४६२ | १,५०० |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य** | **४४,९२७** | **४९,०६२** | **५५,९४५** | **६३,६४१** | **५३,८०८** | **५४,२५०** | **६२,७०९** |
| | **(उप-बेरीज - १+२+३)** | *(१००.०)* | *(१०९.२)* | *(१२४.५)* | *(१४१.७)* | *(११९.८)* | *(१२०.८)* | *(१२७.८)* |
| ५ | खाण व दगड खाणकाम | ३,४९१ | ३,५७३ | ३,६६५ | ३,६९४ | ३,५७१ | ३,८२४ | ३,८७३ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र** | **४८,४१८** | **५२,६३५** | **५९,६१०** | **६७,३३५** | **५७,३७९** | **५८,०७४** | **६६,५८२** |
| | **(उप-बेरीज - ४+५)** | | | | | | | |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | ५८,५४५ | ७६,७८० | ९३,४३५ | ९९,३७७ | ९३,६८७ | १,००,६४८ | १,०९,०७१ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | २६,९३१ | २९,९९५ | ३३,३९५ | ३८,४९१ | ३८,२१४ | ४०,६९८ | ४४,०६६ |
| ९ | बांधकाम | २६,१४३ | २७,८७५ | ३०,३२६ | ३८,१२५ | ४१,८४४ | ४९,७१२ | ५९,०६९ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ७,९१२ | ८,०८५ | ८,६३० | ९,६४६ | १०,००७ | ११,०९७ | १२,२१२ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र** | **१,१९,५३१** | **१,४२,७३५** | **१,६५,७८६** | **१,८५,६३९** | **१,८३,७५१** | **२,०२,१५५** | **२,२४,४१८** |
| | **(उप-बेरीज - ७ ते १०)** | | | | | | | |
| **१२** | **उद्योग** | **१,२३,०२२** | **१,४६,३०८** | **१,६९,४५१** | **१,८९,३३२** | **१,८७,३२२** | **२,०५,९८०** | **२,२८,२९०** |
| | **(उप-बेरीज - ५+११)** | *(१००.०)* | *(११८.९)* | *(१३७.७)* | *(१५३.९)* | *(१५२.३)* | *(१६७.४)* | *(१५६.०)* |
| १३ | रेल्वे | २,८५३ | २,९८२ | ३,२०५ | ३,४२० | ३,९२१ | ४,६७५ | ४,९५६ |
| १४ | परिवहन व साठवण | २१,८४७ | २३,४३२ | २५,५३४ | २६,३०० | २६,६४५ | २९,०२९ | २९,६५२ |
| १५ | दळणवळण | ८,२२९ | १०,०२० | ११,५७९ | १३,६२५ | १६,००४ | २८,१५३ | ३७,१३३ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ६७,१५६ | ७२,६८८ | ८३,७२० | ९०,५९५ | ८९,७६९ | १,०१,५२१ | १,१२,५४६ |
| १७ | बँका व विमा उद्योग | ४७,४२६ | ५५,०४९ | ६५,६१६ | ७७,२१५ | ८८,६४७ | ९५,२८९ | १,०७,७११ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा व विधी सेवा | ५३,२६२ | ६०,१०५ | ६६,२८४ | ७३,०६५ | ८०,४८९ | ८०,४७७ | ८६,२३३ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १९,५३६ | २०,८१८ | २१,०७४ | २३,९१८ | २७,९८४ | २९,०६७ | ३१,८३२ |
| २० | इतर सेवा | २७,२२३ | ३०,४६५ | ३२,२४६ | ३३,७१९ | ३५,६०३ | ३७,६८४ | ४०,६३२ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा** | **२,४७,५३१** | **२,७५,५५९** | **३,०९,२५८** | **३,४१,८५७** | **३,६९,०६२** | **४,०५,८९४** | **४,५०,६९५** |
| | **(उप-बेरीज - १३ ते २०)** | *(१००.०)* | *(१११.३)* | *(१२४.९)* | *(१३८.१)* | *(१४९.१)* | *(१६४.०)* | *(१६३.६)* |
| **२२** | **स्थूल राज्य उत्पन्न** | **४,१५,४८०** | **४,७०,९२९** | **५,३४,६५४** | **५,९४,८३१** | **६,१०,१९१** | **६,६६,१२३** | **७,४१,६९४** |
| | **एकूण - (६+११+२१)** | *(१००.०)* | *(११३.३)* | *(१२८.७)* | *(१४३.२)* | *(१४६.९)* | *(१६०.३)* | *(१५७.५)* |
| **२३** | **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न (₹)** | **४०,५०९** | **४५,२१२** | **५०,५६३** | **५५,४२५** | **५६,०२८** | **६०,२९१** | **६६,१९८** |
| | | *(१००.०)* | *(१११.६)* | *(१२४.८)* | *(१३६.८)* | *(१३८.३)* | *(१४८.८)* | *(१४६.४)* |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.३
## औद्योगिक स्त्रोतांनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - चालू किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ. क्र. | उद्योग | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१०* | २०१०-११+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | कृषि | ३१,१३६ | ३६,१९१ | ४६,९३८ | ६०,३८४ | ५५,२०४ | ६८,६६४ | १,०७,४१५ |
| २ | वन संवर्धन | ९,००९ | ११,१९१ | १४,४४१ | १३,९९० | १४,७०५ | १६,०१६ | १८,७३४ |
| ३ | मासेमारी | १,१९६ | १,३४३ | १,४३७ | १,५७४ | १,४९३ | १,६६७ | २,०४१ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य (उप-बेरीज -१+२+३)** | **४१,३४१** *(११.२)* | **४८,७२५** *(११.१)* | **६२,८१६** *(११.९)* | **७५,९४८** *(१२.३)* | **७१,४०२** *(१०.६)* | **८६,३४७** *(११.०)* | **१२८,१९०** *(१३.१)* |
| ५ | खाण व दगड खाणकाम | २,९११ | ३,१६४ | २,५८७ | ३,०२८ | ४,०५६ | ३,४१६ | ३,६६० |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ४+५)** | **४४,२५२** | **५१,८८९** | **६५,४०३** | **७८,९७६** | **७५,४५८** | **८९,७६३** | **१,३१,८५०** |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | ४३,१७१ | ६६,०६६ | ८४,६९६ | ९८,६३३ | ९४,८६२ | १,०२,१६७ | १,१९,४६२ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | २४,१५७ | २७,९२३ | ३३,१८३ | ४०,२४३ | ४२,०९४ | ४६,४०७ | ५३,८३८ |
| ९ | बांधकाम | २५,१२५ | २९,०१० | ३२,९५२ | ४२,७७२ | ४९,८७४ | ६५,१७५ | ८५,७०८ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ३,५६३ | ३,२८५ | ३,५८५ | ३,८५४ | ६,१०८ | ७,२३६ | १६,६१८ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ७ ते १०)** | **९६,०१६** | **१,२६,२८४** | **१,५४,४१६** | **१,८५,५०२** | **१,९२,९३८** | **२,२०,९८५** | **२,७५,६२६** |
| **१२** | **उद्योग (५+११)** | **९८,९२७** *(२६.७)* | **१,२९,४४८** *(२९.७)* | **१,५७,००३** *(२९.८)* | **१,८८,५३१** *(३०.४)* | **१,९६,९९४** *(२९.१)* | **२,२४,४०१** *(२८.५)* | **२,७९,२८६** *(२८.४)* |
| १३ | रेल्वे | २,३४२ | २,४२२ | २,७७९ | ३,२०० | ३,७०६ | ४,९५२ | ५,०१२ |
| १४ | परिवहन व साठवण | १९,३६५ | २१,६८९ | २६,३६७ | ३०,११५ | ३४,४२८ | ३८,८९० | ४४,४४१ |
| १५ | दळणवळण | ६,९०९ | ७,६०५ | ८,१२८ | ९,३३९ | १०,५६६ | १६,२९५ | १९,२७९ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ६५,०६५ | ७३,६२३ | ९०,१९६ | १,०२,२४६ | १,०८,१४० | १,२६,१२२ | १,५१,३४३ |
| १७ | बँका व विमा उद्योग | ४६,४९९ | ५०,११४ | ५८,५१४ | ६८,३१८ | ८१,९९९ | ८७,८९० | १,०७,७३४ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा व विधी सेवा | ४८,२२९ | ५६,७७३ | ६७,८४० | ८१,२५० | ९६,७५० | १,१४,६९१ | १,४०,२३६ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १५,७०५ | १७,१९० | १८,८८० | २२,६२६ | ३०,१२७ | ३५,६०० | ४३,२०७ |
| २० | इतर सेवा | २५,६४१ | २९,५१५ | ३४,३८७ | ३८,३११ | ४३,६७० | ५२,५७३ | ६३,३१३ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा (उप-बेरीज - १३ ते २०)** | **२,२९,७५५** *(६२.१)* | **२,५८,९३०** *(५९.२)* | **३,०७,०९१** *(५८.३)* | **३,५५,४०५** *(५७.३)* | **४,०९,३८६** *(६०.३)* | **४,७७,०१३** *(६०.५)* | **५,७४,९७६** *(५८.५)* |
| **२२** | **निव्वळ राज्य उत्पन्न एकूण - (६+११+२१)** | **३,७०,०२३** *(१००.०)* | **४,३७,१०३** *(१००.०)* | **५,२६,९१०** *(१००.०)* | **६,१९,८८४** *(१००.०)* | **६,७७,७८१** *(१००.०)* | **७,८७,७६१** *(१००.०)* | **९,८२,४५२** *(१००.०)* |
| **२३** | **दरडोई निव्वळ राज्य उत्पन्न (₹)** | **३६,०७७** | **४१,९६५** | **४९,८३१** | **५७,७६०** | **६२,२३४** | **७१,३००** | **८७,६८६** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय,महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे निव्वळ राज्य उत्पन्नांशी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.४
## औद्योगिक स्त्रोतांनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. (१) | उद्योग (२) | २००४-०५ (३) | २००५-०६ (४) | २००६-०७ (५) | २००७-०८ (६) | २००८-०९ (७) | २००९-१०* (८) | २०१०-११+ (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि | ३१,१३६ | ३४,८१६ | ४०,९६६ | ४८,१९३ | ३८,३९८ | ३९,८८६ | ४७,३९१ |
| २ | वन संवर्धन | ९,००९ | ९,०१३ | ९,६५९ | १०,०४५ | १०,६२५ | ९,४९५ | ९,७९२ |
| ३ | मासेमारी | १,१९६ | १,३६४ | १,३४३ | १,३६५ | १,२८१ | १,२६२ | १,२९५ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य** | **४१,३४१** | **४५,१९३** | **५१,९६९** | **५९,६०३** | **५०,३०४** | **५०,६४३** | **५८,४७७** |
| | **(उप-बेरीज -१+२+३)** | *(१००.०)* | *(१०९.३)* | *(१२५.७)* | *(१४४.२)* | *(१२१.७)* | *(१२२.५)* | *(१२९.४)* |
| ५ | खाण व दगड खाणकाम | २,९११ | २,९२१ | ३,०३१ | २,९६० | २,६४४ | २,८३२ | २,८६८ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र** | **४४,२५२** | **४८,११५** | **५५,०००** | **६२,५६३** | **५२,९४९** | **५३,४७५** | **६१,३४५** |
| | **(उप-बेरीज - ४+५)** | | | | | | | |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | ४३,१७१ | ६१,५९९ | ७६,१२० | ८१,७२५ | ७१,२९८ | ७६,५९६ | ८३,००५ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | २४,१५७ | २७,०३६ | ३०,१७३ | ३५,१३० | ३४,५३६ | ३६,७८२ | ३९,८२५ |
| ९ | बांधकाम | २५,१२५ | २६,७२८ | २८,९८८ | ३६,३४४ | ३९,५६१ | ४६,९९९ | ५५,८४६ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ३,५६३ | ३,९९० | ३,६०२ | ३,९१९ | ५,६१७ | ४,४११ | ४,७५६ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र** | **९६,०१६** | **१,१९,३५३** | **१,३८,८८२** | **१,५७,११७** | **१,५१,०११** | **१,६४,७८८** | **१,८३,४३३** |
| | **(उप-बेरीज - ७ ते १०)** | | | | | | | |
| **१२** | **उद्योग** | **९८,९२७** | **१,२२,२७४** | **१,४१,९१३** | **१,६०,०७७** | **१,५३,६५५** | **१,६७,६२०** | **१,८६,३०१** |
| | **(उप-बेरीज -५+११)** | *(१००.०)* | *(१२३.६)* | *(१४३.५)* | *(१६१.८)* | *(१५५.३)* | *(१६९.४)* | *(१५२.४)* |
| १३ | रेल्वे | २,३४२ | २,५०७ | २,५९३ | २,८१८ | ३,२४३ | ३,८६७ | ४,१०० |
| १४ | परिवहन व साठवण | १९,३६५ | २०,७८४ | २२,६३१ | २३,१३२ | २२,६९९ | २४,७३० | २५,२६१ |
| १५ | दळणवळण | ६,९०९ | ८,५७७ | १०,०५८ | १२,०८३ | १३,९५६ | २४,५५० | ३२,३८० |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ६५,०६५ | ७०,२८९ | ८१,०१८ | ८७,५२४ | ८६,०९३ | ९७,३६५ | १,०७,९३८ |
| १७ | बँका व विमा उद्योग | ४६,४९९ | ५४,०८१ | ६४,६०२ | ७६,१२८ | ८७,५१३ | ९४,०६९ | १,०६,३३२ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा व विधी सेवा | ४८,२२९ | ५४,५९९ | ६०,३२८ | ६६,५३८ | ७३,२३४ | ७६,९७२ | ८४,८५५ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १५,७०५ | १६,७६८ | १६,७९४ | १८,९१७ | २३,२२१ | २४,११९ | २६,४१३ |
| २० | इतर सेवा | २५,६४१ | २८,५६१ | ३०,०७८ | ३१,२६२ | ३२,६१५ | ३४,५२१ | ३७,२२२ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा** | **२,२९,७५५** | **२,५६,१६५** | **२,८८,१०२** | **३,१८,४०१** | **३,४२,५७४** | **३,८०,१९२** | **४,२४,५०१** |
| | **(उप-बेरीज - १३ ते २०)** | *(१००.०)* | *(१११.५)* | *(१२५.४)* | *(१३८.६)* | *(१४९.१)* | *(१६५.५)* | *(१६५.७)* |
| **२२** | **निव्वळ राज्य उत्पन्न** | **३,७०,०२३** | **४,२३,६३२** | **४,८१,९८३** | **५,३८,०८१** | **५,४६,५३३** | **५,९८,४५५** | **६,६९,२७९** |
| | **एकूण - (६+११+२१)** | *(१००.०)* | *(११४.५)* | *(१३०.३)* | *(१४५.४)* | *(१४७.७)* | *(१६१.७)* | *(१५८.०)* |
| **२३** | **दरडोई निव्वळ राज्य उत्पन्न (₹)** | **३६,०७७** | **४०,६७१** | **४५,५८२** | **५०,१३८** | **५०,१८३** | **५४,१६६** | **५९,७३५** |
| | | *(१००.०)* | *(११२.७)* | *(१२६.३)* | *(१३९.०)* | *(१३९.१)* | *(१५०.१)* | *(१४६.९)* |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय,महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.५

## घटक खर्चावर आधारित देशांतर्गत स्थूल उत्पन्न व राष्ट्रीय स्थूल उत्पन्न - चालू किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ. क्र.. | उद्योग | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१०* | २०१०-११+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | कृषि | ४,७६,६३४ | ५,३६,८२२ | ६,०४,६७२ | ७,१६,२७६ | ८,०६,६४६ | ९,२४,५८१ | १०,९३,८०६ |
| २ | वन संवर्धन | ६१,६४० | ६९,२५१ | ८३,१३० | ८१,३११ | ९२,४८५ | १,०२,४२१ | १,१३,४८८ |
| ३ | मासेमारी | २७,१५२ | ३१,६९९ | ३५,१८२ | ३८,९३१ | ४४,०७३ | ५२,३६३ | ६२,५९४ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य (उप-बेरीज -१+२+३)** | **५,६५,४२६** (१९.१) | **६,३७,७७२** (१८.८) | **७,२२,९८४** (१८.३) | **८,३६,५१८** (१८.३) | **९,४३,२०४** (१७.८) | **१०,७९,३६५** (१७.७) | **१२,६९,८८८** (१७.८) |
| ५ | खाण व दगड खाणकाम | ८५,०२८ | ९४,४६२ | १,०६,७८७ | १,२४,८१२ | १,३९,८२८ | १,५७,४०० | १,९१,२०७ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र (उप बेरीज - ४+५)** | **६,५०,४५४** | **७,३२,२३४** | **८,२९,७७१** | **९,६१,३३०** | **१०,८३,०३२** | **१२,३६,७६५** | **१४,६१,०९५** |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | २,९२,३४४ | ३,४५,४४३ | ४,२७,०७५ | ४,९२,७५८ | ५,६१,४६० | ६,२६,४५२ | ७,२०,३७६ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | १,६०,८८१ | १,७६,२२६ | २,०७,७५३ | २,३९,९६२ | २,५६,८६२ | २,८०,५८० | ३,१९,९६९ |
| ९ | बांधकाम | २,२८,८५५ | २,६८,६३४ | ३,२२,४२९ | ३,८८,९०८ | ४,५१,०३४ | ५,०२,१९० | ५,८५,२६५ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ६२,६७५ | ६९,१०७ | ७६,१५३ | ८३,८३० | ९१,०७० | १,१२,५२२ | १,२४,०३८ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज -७ ते १०)** | **७,४४,७५५** | **८,५९,४१०** | **१०,३३,४१०** | **१२,०५,४५८** | **१३,६०,४२६** | **१५,२१,७४४** | **१७,४९,६४८** |
| **१२** | **उद्योग (उप-बेरीज -५+११)** | **८,२९,७८३** (२७.९) | **९,५३,८७२** (२८.१) | **११,४०,१९७** (२८.८) | **१३,३०,२७०** (२९.०) | **१५,००,२५४** (२८.३) | **१६,७९,१४४** (२७.६) | **१९,४०,८५५** (२७.१) |
| १३ | रेल्वे | २९,१६२ | ३०,७७१ | ३७,४२९ | ४३,६०८ | ४७,४७८ | ५८,२१६ | ५९,३८२ |
| १४ | परिवहन व साठवण | १,७१,९७५ | १,९४,८७१ | २,२६,९०९ | २,५७,१२० | २,९२,५४० | ३,२८,८७५ | ३,९१,३२६ |
| १५ | दळणवळण | ४९,२८० | ५४,०३५ | ५८,६९४ | ६६,०६९ | ७५,४३० | ८९,८३७ | ९८,२७४ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ४,७७,३०३ | ५,६६,९२९ | ६,७५,३४७ | ७,८३,२४७ | ८,९५,३९७ | १०,०८,५४८ | १२,०६,५४९ |
| १७ | बँका व विमा उद्योग | १,७१,०९८ | १,८४,११८ | २,१७,१९६ | २,५१,१९५ | २,९८,९३१ | ३,३१,६६० | ४,११,७४४ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा व विधी सेवा | २,६६,०७६ | ३,०८,९८४ | ३,६९,३९९ | ४,४०,२६९ | ५,४६,४३८ | ६,३०,५२६ | ७,५८,७७८ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १,७४,६३८ | १,८९,८२७ | २,०६,०८१ | २,३४,९९२ | ३,०६,६५३ | ४,०५,६३१ | ४,५२,०५६ |
| २० | इतर सेवा | २,३६,७२३ | २,६९,३२४ | २,९९,०४० | ३,३८,७९८ | ३,९७,२४२ | ४,७९,६८३ | ५,६८,५६० |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा (उप-बेरीज - १३ ते २०)** | **१५,७६,२५५** (५३.०) | **१७,९८,८५९** (५३.१) | **२०,९०,०९५** (५२.९) | **२४,१५,२९८** (५२.७) | **२८,६०,१०९** (५३.९) | **३३,३२,९७६** (५४.७) | **३९,४६,६६९** (५५.१) |
| **२२** | **देशांतर्गत स्थूल उत्पन्न एकूण - (६+११+२१)** | **२९,७१,४६४** (१००.०) | **३३,९०,५०३** (१००.०) | **३९,५३,२७६** (१००.०) | **४५,८२,०८६** (१००.०) | **५३,०३,५६७** (१००.०) | **६०,९१,४८५** (१००.०) | **७१,५७,४१२** (१००.०) |
| **२३** | **घटक खर्चावर आधारित परदेशातून प्राप्त निव्वळ उत्पन्न** | **(-)२२,३७५** | **(-)२६,११६** | **(-)३३,२३४** | **(-)२०,५१२** | **(-)३२,९२३** | **(-)३७,९००** | **(-)७८,९००** |
| **२४** | **राष्ट्रीय स्थूल उत्पन्न** | **२९,४९,०८९** | **३३,६४,३८७** | **३९,२०,०४२** | **४५,६१,५७४** | **५२,७०,६४४** | **६०,५३,५८५** | **७०,७८,५१२** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी संघटना, नवी दिल्ली.

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे देशांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.६

## घटक खर्चावर आधारित देशांतर्गत स्थूल उत्पन्न व राष्ट्रीय स्थूल उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१०* | २०१०-११+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | कृषि | ४,७६,६३४ | ५,०२,९९६ | ५,२३,७४५ | ५,५६,९५६ | ५,५५,४४२ | ५,५९,३७६ | ६,०२,९३९ |
| २ | वन संवर्धन | ६१,६४० | ६२,७४२ | ६४,७९५ | ६५,६९७ | ६६,९३२ | ६८,८१३ | ७०,८०२ |
| ३ | मासेमारी | २७,१५२ | २८,७४९ | ३०,६५० | ३२,४२७ | ३३,३१५ | ३४,३२० | ३५,३६२ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य (उप बेरीज -१+२+३)** | **५,६५,४२६** (१९.०) | **५,९४,४८७** (१८.३) | **६,१९,१९०** (१७.४) | **६,५५,०८०** (१६.८) | **६,५५,६८९** (१५.८) | **६,६२,५०९** (१४.७) | **७,०९,१०३** (१४.५) |
| ५ | खाण व दगड खाणकाम | ८५,०२८ | ८६,१४१ | ९२,५७८ | ९५,९९७ | ९८,०५५ | १,०४,२२५ | १,०९,४२१ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र (उप बेरीज - ४+५)** | **६,५०,४५४** | **६,८०,६२८** | **७,११,७६८** | **७,५१,०७७** | **७,५३,७४४** | **७,६६,७३४** | **८,१८,५२४** |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | २,९२,३४४ | ३,२७,७३९ | ३,७९,३७४ | ४,१७,५२८ | ४,४२,०५५ | ४,९३,८९३ | ५,३२,२१९ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | १,६०,८८१ | १,७१,२८१ | १,९१,०८४ | २,११,५४५ | २,१४,२४७ | २,२५,८३५ | २,४१,९४३ |
| ९ | बांधकाम | २,२८,८५५ | २,५८,१२९ | २,८४,८०६ | ३,१५,४९५ | ३,३२,३२९ | ३,५५,७१७ | ३,८४,१९९ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ६२,६७५ | ६७,१२३ | ७३,३६२ | ७९,४३० | ८३,०५० | ८८,२६६ | ९०,९४४ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज -७ ते १०)** | **७,४४,७५५** | **८,२४,२७२** | **९,२८,६२६** | **१०,२३,९९८** | **१०,७१,६८१** | **११,६३,७११** | **१२,४९,३०५** |
| **१२** | **उद्योग (उप बेरीज -५+११)** | **८,२९,७८३** (२७.९) | **९,१०,४१३** (२८.०) | **१०,२१,२०४** (२८.६) | **११,१९,९९५** (२८.७) | **११,६९,७३६** (२८.१) | **१२,६७,९३६** (२८.१) | **१३,५८,७२६** (२७.८) |
| १३ | रेल्वे | २९,१६२ | ३१,३३९ | ३४,८३२ | ३८,२३५ | ४१,१६१ | ४५,०३६ | ४८,११८ |
| १४ | परिवहन व साठवण | १,७१,९७५ | १,८७,८१४ | २,०४,६६५ | २,२२,३४४ | २,३४,२७५ | २,५१,२६९ | २,७२,३८८ |
| १५ | दळणवळण | ४९,२८० | ६०,८५७ | ७५,६६९ | ९३,९२८ | १,१७,४६५ | १,५४,७३० | १,९६,८७० |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ४,७७,३०३ | ५,३५,३९७ | ५,९४,९१८ | ६,५५,०१३ | ६,९२,२२४ | ७,४६,१७८ | ८,१३,०७९ |
| १७ | बँका व विमा उद्योग | १,७१,०९८ | १,९८,१५८ | २,३८,८९९ | २,७८,७७६ | ३,१७,८२६ | ३,५३,८८० | ४,०५,१३२ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा व विधी सेवा | २,६६,०७६ | २,९४,१८२ | ३,२२,१६४ | ३,४९,३४८ | ३,८५,८०३ | ४,१६,००३ | ४,४४,८६३ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १,७४,६३८ | १,८२,२१२ | १,८५,६३९ | १,९९,७७३ | २,३९,३४९ | २,८२,८९१ | २,८६,४५३ |
| २० | इतर सेवा | २,३६,७२३ | २,५८,२१४ | २,६७,१८४ | २,८४,१४४ | ३,०५,१४८ | ३,२७,२०५ | ३,५१,२२२ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा (उप-बेरीज - १३ ते २०)** | **१५,७६,२५५** (५३.१) | **१७,४८,१७३** (५३.७) | **१९,२३,९७०** (५४.०) | **२१,२१,५६१** (५४.५) | **२३,३३,२५१** (५६.१) | **२५,७७,१९२** (५७.२) | **२८,१८,१२५** (५७.७) |
| **२२** | **देशांतर्गत स्थूल उत्पन्न एकूण - (६+११+२१)** | **२९,७१,४६४** (१००.०) | **३२,५३,०७३** (१००.०) | **३५,६४,३६४** (१००.०) | **३८,९६,६३६** (१००.०) | **४१,५८,६७६** (१००.०) | **४५,०७,६३७** (१००.०) | **४८,८५,९५४** (१००.०) |
| **२३** | **घटक खर्चावर आधारित परदेशातून प्राप्त निव्वळ उत्पन्न** | **(-)२२,३७५** | **(-)२४,८९६** | **(-)२९,५१५** | **(-)१७,१७९** | **(-)२५,३८४** | **(-)२७,६६४** | **(-)५२,७७६** |
| **२४** | **राष्ट्रीय स्थूल उत्पन्न** | **२९,४९,०८९** | **३२,२८,१७७** | **३५,३४,८४९** | **३८,७९,४५७** | **४१,३३,२९२** | **४४,७९,९७३** | **४८,३३,१७८** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी संघटना, नवी दिल्ली.

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे देशांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.७
## घटक खर्चावर आधारित देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न - चालू किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१०* | २०१०-११+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | कृषि | ४,४२,७४१ | ४,९९,५२८ | ५,६२,३३३ | ६,६७,८७४ | ७,५०,६३१ | ८,५७,५९६ | १०,१०,५८२ |
| २ | वन संवर्धन | ६०,८१३ | ६८,३३२ | ८२,१३४ | ८०,२१६ | ९१,२४७ | १,०१,०६४ | १,१२,०५१ |
| ३ | मासेमारी | २३,७३५ | २७,८१९ | ३०,७७० | ३३,७५१ | ३७,८८४ | ४४,७९४ | ५४,१६६ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य (उप बेरीज -१+२+३)** | **५,२७,२८९** (१९.९) | **५,९५,६७९** (१९.७) | **६,७५,२३७** (१९.१) | **७,८१,८४१** (१९.१) | **८,७९,७६२** (१८.६) | **१०,०३,४५४** (१८.५) | **११,७६,७९९** (१८.४) |
| ५ | खाण व दगड खाणकाम | ७०,४६४ | ७७,०६६ | ८६,५१६ | १,००,९४८ | १,११,३१८ | १,२०,६६९ | १,५२,९८६ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र (उप बेरीज - ४+५)** | **५,९७,७५३** | **६,७२,७४५** | **७,६१,७५३** | **८,८२,७८९** | **९,९१,०८०** | **११,२४,१२३** | **१३,२९,७८५** |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | २,०५,८४४ | २,४६,०१५ | ३,११,४९९ | ३,५७,७४८ | ४,०७,०१७ | ४,४८,२५४ | ५,१४,४१९ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | १,४०,६५१ | १,५३,५१३ | १,८१,९२८ | २,१२,३१७ | २,२५,२१४ | २,४४,९८० | २,८१,०८४ |
| ९ | बांधकाम | २,१८,५११ | २,५६,३१३ | ३,०७,२२६ | ३,६९,९९७ | ४,२८,१३६ | ४,७५,५४२ | ५,५४,०५५ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ३३,७८९ | ३६,६५१ | ३९,३७१ | ४२,१७० | ४५,२९० | ५८,८४३ | ६४,७६६ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज -७ ते १०)** | **५,९८,७९५** | **६,९२,४९२** | **८,४०,०२४** | **९,८२,२३२** | **११,०५,६५७** | **१२,२७,६१९** | **१४,१४,३२४** |
| **१२** | **उद्योग (उप बेरीज -५+११)** | **६,६९,२५९** (२५.२) | **७,६९,५५८** (२५.४) | **९,२६,५४०** (२६.२) | **१०,८३,१८०** (२६.४) | **१२,१६,९७५** (२५.७) | **१३,४८,२८८** (२४.८) | **१५,६७,३१०** (२४.५) |
| १३ | रेल्वे | २१,६९६ | २२,९१५ | २८,५२९ | ३४,१४४ | ३६,३९८ | ४६,९४८ | ४६,६४६ |
| १४ | परिवहन व साठवण | १,५६,६६३ | १,७७,७०७ | २,०७,६६७ | २,३५,६२८ | २,६६,८०२ | २,९९,४०४ | ३,५८,०४६ |
| १५ | दळणवळण | ४१,२२६ | ४५,१५२ | ४९,७०४ | ५५,३९४ | ६१,६७५ | ७२,६३३ | ८१,५३६ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ४,६४,७५० | ५,५१,८६७ | ६,५७,२३१ | ७,६१,५२५ | ८,६८,५३० | ९,७७,३७५ | ११,६८,६१८ |
| १७ | बँका व विमा उद्योग | १,६८,११२ | १,८०,८४६ | २,१३,४४४ | २,४७,०१७ | २,९४,२८२ | ३,२६,४८१ | ४,०५,८३५ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी,व्यवसाय सेवा व विधी सेवा | २,२९,७६७ | २,६७,९९१ | ३,२१,७०४ | ३,८३,९९९ | ४,७७,९६३ | ५५१,३२६ | ६,६८,२६३ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १,४९,०२० | १,६१,४३५ | १,७४,२९८ | १,९८,८८४ | २,६६,४९५ | ३,६०,२०६ | ४,००,१८३ |
| २० | इतर सेवा | २,२३,७९१ | २,५३,६३३ | २,८०,१९४ | ३,१५,७८० | ३,६९,४८८ | ४,४७,४७२ | ५,३०,७०२ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा (उप-बेरीज - १३ ते २०)** | **१४,५५,०२५** (५४.९) | **१६,६१,५४६** (५४.९) | **१९,३२,७७१** (५४.७) | **२२,३२,३७१** (५४.५) | **२६,४१,६३३** (५५.७) | **३०,८१,८४५** (५६.७) | **३६,५९,८२९** (५७.१) |
| **२२** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न एकूण - (६+११+२१)** | **२६,५१,५७३** (१००.०) | **३०,२६,७८३** (१००.०) | **३५,३४,५४८** (१००.०) | **४०,९७,३९२** (१००.०) | **४७,३८,३७०** (१००.०) | **५४,३३,५८७** (१००.०) | **६४,०३,९३८** (१००.०) |
| **२३** | **घटक खर्चावर आधारित परदेशातून प्राप्त निव्वळ उत्पन्न** | **(-)२२,३७५** | **(-)२६,११७** | **(-)३३,२३५** | **(-)२०,५१४** | **(-)३२,९२३** | **(-)३७,९००** | **(-)७८,९००** |
| **२४** | **राष्ट्रीय निव्वळ उत्पन्न** | **२६,२९,१९८** | **३०,००,६६६** | **३५,०१,३१३** | **४०,७६,८७८** | **४७,०५,४४७** | **५३,९५,६८७** | **६३,२५,०३८** |
| **२५** | **दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **२४,१४३** | **२७,१३१** | **३१,२०६** | **३५,८२५** | **४०,७७५** | **४६,११७** | **५३,३३१** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी संघटना, नवी दिल्ली.

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे देशांतर्गत निव्वळ उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.

## परिशिष्ट ३.८
## घटक खर्चावर आधारित देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. (१) | उद्योग (२) | २००४-०५ (३) | २००५-०६ (४) | २००६-०७ (५) | २००७-०८ (६) | २००८-०९ (७) | २००९-१०* (८) | २०१०-११+ (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि | ४,४२,७४१ | ४,६७,२०० | ४,८५,५४२ | ५,१५,६४३ | ५,११,१७२ | ५,११,६६५ | ५,४८,५७३ |
| २ | वन संवर्धन | ६०,८१३ | ६१,८५९ | ६३,८९९ | ६४,७७१ | ६५,९७१ | ६७,८७४ | ६९,८९६ |
| ३ | मासेमारी | २३,७३५ | २४,९९१ | २६,४८९ | २७,७८१ | २८,१६६ | २८,२५७ | २८,९१९ |
| **४** | **कृषि व संलग्न कार्य (उप बेरीज -१+२+३)** | **५,२७,२८९** (१९.९) | **५,५४,०५०** (१९.१) | **५,७५,९३०** (१८.१) | **६,०८,१९५** (१७.५) | **६,०५,३०९** (१६.४) | **६,०७,७९६** (१५.२) | **६,४७,३८८** (१५.०) |
| ५ | खाण व दगड खाणकाम | ७०,४६४ | ६९,४३६ | ७३,९८२ | ७४,९४५ | ७४,२९९ | ७५,०९४ | ८०,९५६ |
| **६** | **प्राथमिक क्षेत्र (उप बेरीज - ४+५)** | **५,९७,७५३** | **६,२३,४८६** | **६,४९,९१२** | **६,८३,१४०** | **६,७९,६०८** | **६,८२,८९०** | **७,२८,३४४** |
| ७ | नोंदणीकृत वस्तुनिर्माण | २,०५,८४४ | २,३१,५३६ | २,७१,१२६ | २,९४,७४४ | ३,०८,४७७ | ३,४४,६२४ | ३,६५,६७८ |
| ८ | अनोंदणीकृत वस्तुनिर्माण | १,४०,६५१ | १,४९,५१४ | १,६७,४२३ | १,८७,१०३ | १,८७,४३२ | १,९६,६४० | २,११,४९५ |
| ९ | बांधकाम | २,१८,५११ | २,४६,२०८ | २,७०,५५६ | २,९८,२७० | ३,१२,५२० | ३,३३,५९१ | ३,५९,२८१ |
| १० | वीज, वायू (गॅस) आणि पाणीपुरवठा | ३३,७८९ | ३६,०१३ | ३९,७४६ | ४२,७३२ | ४४,७६४ | ४६,१८८ | ४६,८१० |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज -७ ते १०)** | **५,९८,७९५** | **६,६३,२७१** | **७,४८,८५१** | **८,२२,८४९** | **८,५३,१९३** | **९,२१,०४३** | **९,८३,२६४** |
| **१२** | **उद्योग (उप बेरीज -५+११)** | **६,६९,२५९** (२५.२) | **७,३२,७०७** (२५.२) | **८,२२,८३३** (२५.९) | **८,९७,७९४** (२५.९) | **९,२७,४९२** (२५.१) | **९,९६,१३७** (२५.०) | **१०,६४,२२०** (२४.६) |
| १३ | रेल्वे | २१,६९६ | २३,६४३ | २६,५४३ | ३०,०२० | ३२,३७० | ३५,८१६ | ३८,३१९ |
| १४ | परिवहन व साठवण | १,५६,६६३ | १,७१,१३५ | १,८६,४७३ | २,०२,६०० | २,११,८५७ | २,२६,४७३ | २,४५,३११ |
| १५ | दळणवळण | ४१,२२६ | ५२,३४८ | ६७,४३२ | ८४,४८४ | १,०५,८४३ | १,४१,०७२ | १,८४,५४२ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे | ४,६४,७५० | ५,२०,८३३ | ५,७८,३६६ | ६,३६,२६७ | ६,७०,७२९ | ७,२२,०५१ | ७,८५,३६६ |
| १७ | बँका व विमा उद्योग | १,६८,११२ | १,९५,००२ | २,३५,४०६ | २,७५,००३ | ३,१३,८२९ | ३,४९,५९३ | ४,००,४३७ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी,व्यवसाय सेवा व विधी सेवा | २,२९,७६७ | २,५४,५०८ | २,७९,३३४ | ३,०२,६९८ | ३,३३,७९४ | ३,५८,३८८ | ३,८३,५३८ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १,४९,०२० | १,५४,८८३ | १,५६,५४६ | १,६८,१७५ | २,०६,५२१ | २,४८,५७२ | २,५०,०५२ |
| २० | इतर सेवा | २,२३,७९१ | २,४३,०७० | २,४९,८०२ | २,६३,७७२ | २,८२,०२८ | ३,०१,४२१ | ३,२२,३१९ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा (उप-बेरीज - १३ ते २०)** | **१४,५५,०२५** (५४.९) | **१६,१५,४२२** (५५.७) | **१७,७९,९०२** (५६.०) | **१९,६३,०१९** (५६.६) | **२१,५६,९७१** (५८.५) | **२३,८३,३८६** (५९.८) | **२६,०९,८८४** (६०.४) |
| **२२** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न एकूण - (६+११+२१)** | **२६,५१,५७३** (१००.०) | **२९,०२,१७९** (१००.०) | **३१,७८,६६५** (१००.०) | **३४,६९,००८** (१००.०) | **३६,८९,७७२** (१००.०) | **३९,८७,३१९** (१००.०) | **४३,२१,४९२** (१००.०) |
| **२३** | **घटक खर्चावर आधारित परदेशातून प्राप्त निव्वळ उत्पन्न** | **(-)२२,३७५** | **(-)२४,८९५** | **(-)२९,५१६** | **(-)१७,१७९** | **(-)२५,३८४** | **(-)२७,६६६** | **(-)५२,७७७** |
| **२४** | **राष्ट्रीय निव्वळ उत्पन्न** | **२६,२९,१९८** | **२८,७७,२८४** | **३१,४९,१४९** | **३४,५१,८२९** | **३६,६४,३८८** | **३९,५९,६५३** | **४२,६८,७१५** |
| **२५** | **दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **२४,१४३** | **२६,०१५** | **२८,०६७** | **३०,३३२** | **३१,७५४** | **३३,८४३** | **३५,९९३** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी संघटना, नवी दिल्ली.

* अस्थायी + प्रारंभिक

टीप - कंसातील आकडे देशांतर्गत निव्वळ उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.

# परिशिष्ट ३.९
## जिल्ह्यांतर्गत स्थूल/निव्वळ उत्पन्न आणि दरडोई जिल्हा उत्पन्न

| अ. क्र. | जिल्हा | चालू किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | चालू किंमतीनुसार दरडोई जिल्हा उत्पन्न (₹) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिल्ह्यांतर्गत स्थूल उत्पन्न | | जिल्ह्यांतर्गत निव्वळ उत्पन्न | | जिल्ह्यांतर्गत स्थूल उत्पन्न | | जिल्ह्यांतर्गत निव्वळ उत्पन्न | | | |
| | | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | मुंबई # | १,९१,५५५ | २,२८,२२८ | १,७४,५५३ | २,१२,३९६ | १,५३,४०८ | १,६८,९७३ | १,३८,४७४ | १,५३,६८५ | १,१८,६१५ | १,४१,१३८ |
| २ | ठाणे | १,१२,१८९ | १,३४,९२१ | १,०१,२८१ | १,२३,४२५ | ८९,५१२ | ९९,६५४ | ८०,०३२ | ८९,२९८ | १,०४,९६३ | १,२५,५६२ |
| ३ | रायगड | २२,९५० | २६,७५९ | २०,१३८ | २३,९६१ | १७,५६९ | १८,८८३ | १५,११९ | १६,३०४ | ८१,९७७ | ९६,४६८ |
| ४ | रत्नागिरी | ११,७७१ | १३,७३८ | १०,५९१ | १२,५२० | ९,०८६ | ९,८३६ | ८,०६५ | ८,७४६ | ५७,११६ | ६६,९२१ |
| ५ | सिंधुदुर्ग | ६,०१० | ७,०८४ | ५,६०२ | ६,६४३ | ४,४२४ | ४,७७५ | ४,१०१ | ४,४३७ | ५९,१५७ | ६९,५५२ |
| **कोकण विभाग** | | **३,४४,४७४** | **४,१०,७२९** | **३,१२,१६६** | **३,७८,९४५** | **२,७३,९९९** | **३,०२,१२२** | **२,४५,७९१** | **२,७२,४७०** | **१,०५,३७९** | **१,२५,५२७** |
| ६ | नाशिक | ४३,०६३ | ५४,५१२ | ३८,१५४ | ४८,८१४ | ३२,७६१ | ३७,२४८ | २८,६७६ | ३२,७६२ | ६७,३२१ | ८४,९८२ |
| ७ | धुळे | ९,८५६ | १२,०७७ | ९,००३ | ११,२८७ | ७,४३४ | ८,५१२ | ६,६९९ | ७,७२३ | ४७,२५५ | ५८,५७५ |
| ८ | नंदुरबार | ५,१५७ | ८,२१४ | ४,८०९ | ७,७०४ | ३,७५८ | ४,१०१ | ३,४८१ | ३,८१६ | ३३,३५६ | ५२,९२३ |
| ९ | जळगाव | २६,९९९ | ३१,७२८ | २४,२१८ | २८,७३७ | १९,९६४ | २१,७७५ | १७,७२२ | १९,४३० | ५८,७५५ | ६८,९०० |
| १० | अहमदनगर | २४,०५३ | ३४,४३२ | २२,२५२ | ३,२०८३ | १७,७५४ | २०,७२७ | १६,३३४ | १८,९१८ | ४९,७९५ | ७१,०५४ |
| **नाशिक विभाग** | | **१,०९,१२९** | **१,४०,९६३** | **९८,४३७** | **१,२८,६२४** | **८१,६७०** | **९२,३६४** | **७२,९१३** | **८२,६४९** | **५५,९१४** | **७२,२०९** |
| ११ | पुणे | १,००,७८६ | १,२१,०३३ | ९०,०७५ | १,०८,८७४ | ७६,८८६ | ८५,२१६ | ६७,८६४ | ७५,४३३ | १,०६,९५७ | १,२७,१७६ |
| १२ | सातारा | १९,५५१ | २२,४१४ | १८,०२२ | २०,८८६ | १४,५२५ | १५,५३० | १३,२७७ | १४,२३७ | ५८,४७२ | ६७,१३४ |
| १३ | सांगली | १७,२९२ | २२,१३७ | १५,९६० | २०,७०१ | १३,१५५ | १५,२८२ | १२,०५३ | १४,०६० | ५५,५०४ | ७१,१९६ |
| १४ | सोलापूर | २५,९६४ | ३३,४३७ | २३,७८७ | ३०,८७३ | १९,३०५ | २२,३४४ | १७,५६८ | २०,४३१ | ५४,९६३ | ७०,४६५ |
| १५ | कोल्हापुर | २९,५६३ | ३६,३६२ | २७,११५ | ३३,६१८ | २२,६१७ | २५,३५१ | २०,६२३ | २३,१९१ | ६८,६४४ | ८४,०९५ |
| **पुणे विभाग** | | **१,९३,१५६** | **२,३५,३८३** | **१,७४,९५९** | **२,१४,९५२** | **१,४६,४८८** | **१,६३,७२४** | **१,३१,३८६** | **१,४७,३५४** | **७७,२२१** | **९३,६२६** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ३.९ (समाप्त)

| अ. क्र. | जिल्हा | चालू किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | चालू किंमतीनुसार दरडोई जिल्हा उत्पन्न (₹) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिल्ह्यांतर्गत स्थूल उत्पन्न | | जिल्ह्यांतर्गत निव्वळ उत्पन्न | | जिल्ह्यांतर्गत स्थूल उत्पन्न | | जिल्ह्यांतर्गत निव्वळ उत्पन्न | | | |
| | | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ | २००९-१०* | २०१०-११@ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १६ | औरंगाबाद | २६,६१० | ३१,५६३ | २३,४८३ | २८,०३५ | २०,०२२ | २२,५३३ | १७,४०२ | १९,६६४ | ७१,५४८ | ८४,२९५ |
| १७ | जालना | ८,२३३ | ९,७१७ | ७,६०८ | ९,०४८ | ५,८९२ | ६,५७५ | ५,३९७ | ६,०४७ | ४२,६९८ | ५०,२६२ |
| १८ | परभणी | ७,८४२ | ९,४२४ | ७,२७९ | ८,८१७ | ५,६१४ | ६,२९३ | ५,१७८ | ५,८२६ | ४२,३८५ | ५०,७१६ |
| १९ | हिंगोली | ३,९८७ | ५,७६७ | ३,७२७ | ५,४२१ | २,७५६ | ३,०८३ | २,५६१ | २,८७६ | ३४,३४० | ४९,४७० |
| २० | बीड | १०,१२४ | १३,३८२ | ९,३९६ | १२,५६३ | ७,३३४ | ८,३३७ | ६,७४२ | ७,६९७ | ३९,४१५ | ५२,१७७ |
| २१ | नांदेड | १२,५५२ | १५,४६२ | ११,७०२ | १४,५४८ | ९,१०० | १०,६१६ | ८,४३२ | ९,८७७ | ३६,५८१ | ४४,९७८ |
| २२ | उस्मानाबाद | ६,६६५ | ८,६०५ | ६,१९३ | ८,०६८ | ४,७५१ | ५,३६२ | ४,३८० | ४,९६६ | ३७,८९० | ४८,८८७ |
| २३ | लातूर | १०,६०७ | २०,३३५ | ९,८९७ | १९,०६७ | ७,५०५ | ८,५५१ | ६,९५२ | ७,९५१ | ४२,७९७ | ८१,५५७ |
| **औरंगाबाद विभाग** | | **८६,६२१** | **१,१४,२५५** | **७९,२८५** | **१,०५,५६७** | **६२,९७२** | **७१,३५१** | **५७,०४४** | **६४,९०४** | **४५,५७५** | **६०,०१३** |
| २४ | बुलढाणा | १०,०९३ | १२,१८६ | ९,३७५ | ११,४२४ | ७,४१७ | ८,३२३ | ६,८४१ | ७,७१० | ३७,८९९ | ४५,६९९ |
| २५ | अकोला | ९,७१७ | ११,७६६ | ८,९८४ | १०,९८८ | ७,२३४ | ८,०७६ | ६,६४९ | ७,४४८ | ४८,५८० | ५८,६२७ |
| २६ | वाशिम | ४,५४८ | ६,२३८ | ४,२७२ | ५,९१५ | ३,१८८ | ३,७११ | २,९६९ | ३,४८२ | ३७,९८४ | ५२,०७५ |
| २७ | अमरावती | १५,७२५ | २०,१२९ | १४,६१८ | १८,८५१ | ११,५९७ | १२,७७८ | १०,७०१ | ११,७९६ | ४९,६९२ | ६३,२७० |
| २८ | यवतमाळ | १२,१२१ | १८,८५९ | ११,०८१ | १७,४०० | ९,१३२ | १०,७०९ | ८,२२१ | ९,६४० | ४०,८२९ | ६३,४६९ |
| **अमरावती विभाग** | | **५२,२०४** | **६९,१७८** | **४८,३२९** | **६४,५७७** | **३८,५६८** | **४३,५९८** | **३५,३८१** | **४०,०७६** | **४३,५२७** | **५७,५००** |
| २९ | वर्धा | ७,५८२ | ९,१९१ | ७,००१ | ८,५६८ | ५,७५९ | ६,४६२ | ५,२७५ | ५,९४३ | ५०,७३५ | ६१,३९१ |
| ३० | नागपूर | ४३,७९१ | ५१,३३६ | ३९,४५७ | ४६,८६१ | ३३,८७४ | ३६,७०९ | ३०,२२५ | ३३,०११ | ८२,६३६ | ९६,४५८ |
| ३१ | भंडारा | ६,३९२ | ७,७५४ | ५,८९० | ७,१९९ | ४,५७६ | ५,२१५ | ४,१८८ | ४,७८४ | ४७,१६४ | ५७,०९४ |
| ३२ | गोंदिया | ५,८७१ | ७,०९३ | ५,४४७ | ६,६३२ | ४,३२४ | ४,८२५ | ३,९८६ | ४,४७० | ४१,४७७ | ५०,०४२ |
| ३३ | चंद्रपुर | १४,६७६ | १७,५९२ | १३,१०८ | १५,९५१ | ११,०८५ | १२,३९६ | ९,७०३ | १०,९०७ | ५६,२७५ | ६७,६४१ |
| ३४ | गडचिरोली | ३,९७२ | ४,८५१ | ३,६८१ | ४,५७५ | २,८०९ | २,९३० | २,५६२ | २,७१२ | ३४,९२८ | ४३,०५८ |
| **नागपूर विभाग** | | **८२,२८३** | **९७,८१८** | **७४,५८५** | **८९,७८६** | **६२,४२६** | **६८,५३६** | **५५,९४०** | **६१,८२७** | **६१,६४०** | **७३,२३१** |
| **महाराष्ट्र** | | **८,६७,८६६** | **१०,६८,३२७** | **७,८७,७६१** | **९,८२,४५२** | **६,६६,१२३** | **७,४१,६९४** | **५,९८,४५५** | **६,६९,२७९** | **७१,३००** | **८७,६८६** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी    @ प्रारंभिक    # मुंबई शहर    + मुंबई उपनगर जिल्हा

# ४

# किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था



# ४. किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था

## किंमती

४.१ किंमतींचा परिणाम वस्तू व सेवा यांच्या वापराच्या पध्दती, प्रमाण आणि जनतेची क्रयशक्ती यांवर होतो. किंमती निर्देशांक हे वस्तूंच्या किंमतींच्या स्तरामध्ये होणारे तुलनात्मक बदल मोजण्याचे एक सांख्यिकी साधन आहे. ग्राहक किंमती निर्देशांक व घाऊक किंमती निर्देशांक ही अनुक्रमे किरकोळ व घाऊक स्तरावरील चलनवाढ मोजण्याची साधने आहेत.

### महाराष्ट्रातील किंमती विषयक स्थिती

४.२ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेतर्फे राज्याच्या ग्रामीण व नागरी भागाकरिता स्वतंत्र मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) तयार करण्यात येतात. ग्रामीण भागातील ६८ केंद्रांमधून १०६ वस्तू व ७४ नागरी केंद्रांमधून १२७ वस्तू यांच्या साप्ताहिक किरकोळ किंमती संकलित केल्या जातात.

**आलेख ४.१ : ग्राहक किंमती निर्देशांक**




४.३ राज्यातील ग्रामीण भागासाठी ग्राहक किंमती निर्देशांक एप्रिल, २०११ मध्ये १८९.४ होता, त्यात सातत्याने वाढ होऊन नोव्हेंबर, २०११ मध्ये तो २०२.१ झाला. त्याचप्रमाणे नागरी भागासाठी ग्राहक किंमती निर्देशांक एप्रिल, २०११ मध्ये १८०.० होता, त्यात सातत्याने वाढ होऊन नोव्हेंबर, २०११ मध्ये तो १९३.१ झाला. मात्र डिसेंबर, २०११ मध्ये ग्रामीण व नागरी दोन्ही भागांचा निर्देशांक कमी होऊन अनुक्रमे २००.८ व १९२.२ झाला. जानेवारी, २०१२ मध्ये नागरी भागाच्या निर्देशांकात तोच कल दिसून येतो, तर ग्रामीण भागाच्या निर्देशांकात किंचित वाढ दिसून येते. राज्यातील ग्रामीण व नागरी भागाचा एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२ मधील सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ९.४ व ७.९ टक्क्यांनी वाढला.

४.४ ग्रामीण भागाच्या ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष ते वर्ष चलनवाढीचा दर जानेवारी, २०११ मध्ये १०.५ होता, तो जानेवारी, २०१२ मध्ये कमी होवून ४.७ झाला. तर नागरी भागासाठी याच कालावधीत तो १०.२ वरुन ४.६ इतका कमी झाला. सर्व वस्तू व खाद्यपदार्थ गट यांच्या चलनवाढीचा दर अनुक्रमे आलेख ४.२ व ४.३ मध्ये दर्शविण्यात आला आहे. खाद्यपदार्थ गटातील चलनवाढीतील घट ही प्रामुख्याने 'भाजीपाला व फळे' या उपगटामुळे आहे.

### अखिल भारतीय स्तरावर किंमतीविषयक स्थिती

४.५ केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने कालखंडांतर्गत किंमतींची तुलना करण्याच्या दृष्टीने अखिल भारतीय व राज्य /केंद्र शासित

**आलेख ४.२ : ग्राकिंनि - ग्रामीण वर आधारित चलनवाढीचा दर**




**आलेख ४.३ : ग्राकिंनि – नागरी वर आधारित चलनवाढीचा दर**



प्रदेशातील ग्रामीण, नागरी भागाची व एकत्रित अशी २०१० या पायाभूत वर्षावर आधारित स्वतंत्र ग्राहक किंमती निर्देशांकांची नवीन मालिका जानेवारी, २०११ पासून सुरू केली आहे. जानेवारी, २०१२ साठी ग्रामीण, नागरी आणि एकत्रित अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ११५.०, ११२.८, आणि ११४.० होते तर महाराष्ट्रासाठी सदर निर्देशांक अनुक्रमे ११५.४, ११२.३ आणि ११३.४ असे होते.याशिवाय श्रम केंद्र, भारत सरकार हे तीन प्रकारचे ग्राहक किंमती निर्देशांक, जसे शेत मजुरांकरीता ग्राहक किंमती निर्देशांक, ग्रामीण मंजुरांकरीता ग्राहक किंमती निर्देशांक आणि औद्योगिक कामगारांकरीता ग्राहक किंमती निर्देशांक (औका-ग्राकिंनि) दरमहा संकलित व प्रकाशित करतात.

४.६ महाराष्ट्रासह देशातील २० राज्यांकरीता दरमहा शेतमजूर आणि ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक संकलित केले जातात. ह्या निर्देशांकांचा उपयोग कृषी क्षेत्रातील शेतमजुरीचा दर निश्‍चित करण्यासाठी तसेच सुधारित करण्यासाठी होतो. सदर निर्देशांक तयार करण्यासाठी शेतमजूर आणि ग्रामीण मजुरांच्या मजुरी संबंधीची आकडेवारी भारतातील ६०० केंद्रांमधून गोळा करण्यात येत असून त्यापैकी ५४ केंद्रे राज्यातील आहेत. एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२ मध्ये राज्यासाठी आणि अखिल भारतासाठी शेत मजूरांकरीता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ६७२.२ आणि ६०८.२ असा होता, जो गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे १३.० व ८.५ टक्क्यांनी जास्त होता. तर राज्यासाठी आणि अखिल भारतासाठी ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ६६४.४ आणि ६०८.३ होता जो अनुक्रमे १२.७ व ८.६ टक्क्यांनी जास्त होता. शेतमजूर आणि ग्रामीण मजुरांकरीता ग्राहक किंमती निर्देशांकाची मालिका परिशिष्ट ४.३ मध्ये दिली आहे.

४.७ औद्योगिक कामगारांकरीता ग्राहक किंमती निर्देशांकाचा (औका-ग्राकिंनि) वापर वर्गीकृत रोजगारातील किमान वेतन निश्‍चित करणे व सुधारीत करणे यासाठी तसेच सार्वजनिक क्षेत्रांतील लाखो कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा महागाई भत्ता ठरविण्यासाठी केला जातो. हा निर्देशांक देशातील औद्योगिक दृष्ट्या विकसित अशा निवडक ७० केंद्रांमधील जीवनावश्यक वस्तू व सेवा यांच्या किरकोळ किंमतींवर आधारीत असून त्यापैकी मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर व नाशिक ही पाच केंद्रे राज्यातील आहेत. सदर पाच केंद्रांव्यतिरिक्त जळगांव, नांदेड, औरंगाबाद, कोल्हापूर व अकोला या राज्यातील पाच केंद्रांसाठी श्रम आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून औका-ग्राकिंनि स्वतंत्रपणे संकलित करण्यात येतात. एप्रिल, २०११ ते डिसेंबर, २०११ दरम्यानच्या कालावधीतील सरासरी औका-ग्राकिंनि गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत ८.८ टक्क्यांची वाढ दर्शविते. गटनिहाय औका-ग्राकिंनि परिशिष्ट ४.४ मध्ये देण्यात आले आहेत. राज्यातील केंद्रीय केंद्रांसाठी औका-ग्राकिंनि परिशिष्ट ४.५ मध्ये तर राज्यातील अतिरिक्त केंद्रांसाठी औका-ग्राकिंनि परिशिष्ट ४.६ मध्ये देण्यात आले आहेत.

**आलेख ४.४ : औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राकिंनि व त्यातील चलनवाढीचा दर**




टीप :उजव्या बाजूचा Y- अक्ष चलनवाढीचा दर दर्शवितो

## घाऊक किंमती निर्देशांक

४.८ घाऊक किंमती निर्देशांकाचा वापर मोठ्या प्रमाणावर शासन, बँका, औद्योगिक आणि व्यावसायिक वर्तुळात केला जातो. महत्त्वाच्या आर्थिक आणि वित्तीय धोरणातील बदल हे बऱ्याचदा घाऊक किंमती निर्देशांकातील चढ-उताराशी निगडीत असतात. घाऊक किंमती निर्देशांकातील चढ-उतारांच्या तीव्रतेवर कच्च्या मालाचा पुरवठा, यंत्रसामग्री आणि बांधकाम यांतील सेवांचे दर अवलंबून असतात. मासिक घाऊक किंमती निर्देशांक आर्थिक सल्लागार, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत प्रकाशित केले जातात. यामध्ये एकूण १,२२४ वस्तुंचा समावेश असून 'प्राथमिक वस्तु गटात' १०५ वस्तु, 'वस्तुनिर्माण' गटात १,१०० वस्तु आणि 'इंधन व शक्ती' गटात १९ वस्तुंचा समावेश आहे.

४.९ घाऊक किंमती निर्देशांकाची वैशिष्ट्ये :

- एप्रिल, २०११ मध्ये घाऊक किंमती निर्देशांक १५२.१ होता त्यात वाढ होवून तो जानेवारी, २०१२ मध्ये १५७.७ इतका झाला.

- 'प्राथमिक वस्तू ' गटाचा एप्रिल, २०११ मधील निर्देशांक १९६.८ होता व त्यात वाढ होवून तो जानेवारी, २०१२ मध्ये १९९.७ झाला, तर 'प्राथमिक वस्तु' गटातील 'खाद्य पदार्थ' उपगटाचा एप्रिल, २०११ मधील निर्देशांक १८६.८ वरून जानेवारी, २०१२

मध्ये १९१.४ इतका वाढला. याच कालावधीत 'प्राथमिक वस्तु' गटातील 'खाद्येतर' उपगटाचा निर्देशांक १९२.२ वरून १८२.८ इतका कमी झाला.

- 'इंधन व शक्ती ' या गटाचा एप्रिल, २०११ मधील निर्देशांक १५९.५ वरुन जानेवारी, २०१२ मध्ये १७२.८ इतका वाढला.
- याच कालावधीत 'वस्तुनिर्माण ' गटाचा निर्देशांक सातत्याने वाढून १३६.६ वरुन १४१.२ झाला.

४.१० घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष ते वर्ष चलनवाढीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

**आलेख ४.५ : घाकिंनि वर आधारित चलनवाढीचा दर**




- सर्व वस्तूंसाठीचा चलनवाढीचा दर एप्रिल, २०११ मधील ९.७ टक्क्यांवरून घसरुन जानेवारी, २०१२ मध्ये ६.६ टक्के झाला.
- 'प्राथमिक वस्तु' गटातील चलनवाढीच्या दरात घसरण होऊन तो १५.१ वरुन २.३ झाला.
- 'प्राथमिक वस्तु' गटातील ' खाद्य पदार्थ ' उपगटाच्या चलनवाढीच्या दराची तीव्रता कमी होवून एप्रिल,२०११ मधील १०.७ वरुन जानेवारी,२०१२ मध्ये तो (-) ०.५ झाला. मागील वर्षातील किंमतीच्या निर्देशांकातील तीव्र वाढीमुळे चलनवाढीचा दर ऋण झाला. 'खाद्येतर' उपगटातील चलनवाढीचा दर एप्रिल, २०११ मध्ये २६.९ होता त्यात सतत घट होऊन (ऑगस्ट,२०११ वगळता) जानेवारी,२०१२ मध्ये तो ०.६ इतका कमी झाला.
- 'वस्तुनिर्माण' गटातील चलनवाढीचा दर प्रथम एप्रिल,२०११ मध्ये ६.८ होता तो वाढून नोव्हेंबर,२०११ मध्ये ८.२ झाला. तर तो जानेवारी,२०१२ मध्ये कमी होवून ६.५ झाला.
- 'इंधन व शक्ती' गटातील चलनवाढीचा दर १३.० वरुन १४.२ इतका वाढला.

४.११ एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२ या कालावधीसाठी सरासरी घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित चलन वाढीचा दर ९.१ टक्के होता, जो गतवर्षीच्या तत्सम कालावधीतील ९.६ पेक्षा कमी होता. प्रमुख गटांसाठी वर्ष निहाय निर्देशांक व चलनवाढीचा दर आलेख ४.६ व ४.७ मध्ये दर्शविला आहे. 'वस्तुनिर्माण' आणि 'इंधन व शक्ती' या दोन्हींसाठी चलनवाढीच्या दरात २००९-१० पासून वाढ होत आहे. 'प्राथमिक वस्तु' गटासाठी चलनवाढीचा दर २००७-०८ पासून २०१०-११ पर्यंत वाढत होता. परंतु २०११-१२ मध्ये तो २००६-०७ च्या पातळीवर आला. अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांकाची मालिका परिशिष्ट ४.७ मध्ये दिली आहे तर महत्त्वाच्या किंमतींच्या निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर परिशिष्ट ४.८ मध्ये दिले आहे.

**आलेख ४.६ : 'प्राथमिक वस्तू' गटासाठी घाकिंनि व चलनवाढीचा दर**




टीप :उजव्या बाजूचा Y- अक्ष चलनवाढीचा दर दर्शवितो *अस्थायी

**आलेख ४.७ : 'इंधन व शक्ती' व 'वस्तुनिर्माण' गटांसाठी घाकिंनि व चलनवाढीचा दर**




टीप :उजव्या बाजूचा Y- अक्ष चलनवाढीचा दर दर्शवितो *अस्थायी

# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१२ जनतेला वाजवी दरात अन्नधान्य उपलब्धतेची हमी तसेच गरीबांच्या अन्न सुरक्षेत वाढ या शासनाच्या आर्थिक धोरणामधील महत्त्वाचे साधन म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्था विकसित झाली. ती दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा घटक असून कुपोषणाचा धोका असलेल्या बहुसंख्य गरीबांसाठी संरक्षक जाळे म्हणून वापर हे या व्यवस्थेचे उद्दिष्ट आहे. अन्नधान्याचे प्रापण, साठवणूक, वाहतूक आणि नियतन करणे इ. जबाबदारी केंद्र शासनाची तर रास्त भाव दुकानांचे जाळे निर्माण करून अन्नधान्याचे नियतन व वितरण करणे, दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची निश्चिती करणे, शिधापत्रिका देणे आणि रास्त भाव दुकानांचे नियंत्रण इ.ची जबाबदारी राज्यशासनाची आहे. रास्त भाव दुकानांच्या जाळ्याद्वारे गहू, तांदूळ, साखर आणि केरोसीन यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे नियमित मासिक वितरण केले जाते तर वर्ष २०११-१२ मध्ये पाम तेलाचे सुद्धा वितरण करण्यात येत आहे.

४.१३ रास्त भाव दुकान शिधापत्रिका धारकांची सोय आणि भौगोलिक संरचना विचारात घेऊन सुरू करण्यात येते. ३१ डिसेंबर, २०११ अखेर राज्यात ५०,६४५ रास्त भाव दुकाने कार्यरत होती. त्यांची नियमित निरिक्षणे घेतली जातात. २०११ मध्ये ऑक्टोबर अखेरपर्यंत ४९,४०५ रास्त दुकांनाची निरिक्षणे घेण्यात आली असून ५३१ दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले आणि ₹ २.१२ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला. शिधापत्रिकाधारकांची गेल्या तीन वर्षातील संख्या तक्ता ४.१ मध्ये देण्यात आली आहे आणि जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट ४.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ४.१ शिधापत्रिकाधारकांची संख्या**

( लाखात )

| वर्ष | शिधापत्रिका | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | पिवळया | | केशरी | सफेद | अन्नपूर्णा | |
| | अंअयो | दारेखा | दारेव | | | |
| २००९ | २४.६९ | ४५.१३ | १४४.४९ | ८.८२ | १.०८ | २२४.२१ |
| २०१० | २३.४० | ४३.७५ | १३८.४० | ९.५४ | ०.८६ | २१५.९५ |
| २०११# | २२.९४ | ४२.७२ | १३३.४७ | १४.०८ | ०.७५ | २१३.९६ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. # ३१ ऑगस्ट, २०११ अखेर

४.१४ अपात्र व बनावट शिधापत्रिका शोध मोहिम २००५ ते २००८ या कालावधीत राबविण्यात आली होती. २००९-१० व २०११ मध्ये आणखी दोन शोध मोहिमा राबविण्यात आल्या. आतापर्यंत ५४.०७ लाख शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या आहेत. रद्द केलेल्या शिधापत्रिकांची संख्या तक्ता ४.२ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ४.२ रद्द करण्यात आलेल्या शिधापत्रिकांची संख्या**

( लाखात )

| वर्ष | शिधापत्रिका | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | पिवळया | | केशरी | सफेद | अन्नपूर्णा | |
| | अंअयो | दारेखा | दारेव | | | |
| २००५-२००८ | ०.८५ | ३.६० | २२.३५ | २.५६ | ०.०८ | २९.४५ |
| २००९-२०१० | ०.८२ | १.५० | १०.३० | ० | ०.१२ | १२.७६ |
| २०११# | ०.४७ | १.२५ | १०.०२ | ०.०२ | ०.०९ | ११.८६ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. # ३१ ऑगस्ट,२०११ अखेर

## द्वार वितरण योजना

४.१५ द्वार वितरण योजना ही आदिवासी तसेच अवर्षणप्रवण भागात राबविली जाते. या योजने अंतर्गत गोदामांतून रास्त भाव दुकानापर्यंत शासकीय वाहनाद्वारे धान्याची वाहतूक केली जाते. आदिवासी भागात ही योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास संघ मर्यादित तर अवर्षणप्रवण भागात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांच्या द्वारे राबविली जाते.

## लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१६ दारिद्रय रेषेखालील जनतेला सेवा पुरविण्यातील अपयश, लक्षणीय नागरी पूर्वग्रह, राज्यांतील गरीबांचे जास्त प्रमाण असलेल्या ग्रामीण भागातील कमी व्याप्ती आणि वितरणासाठी पारदर्शक व ठोस व्यवस्थेचा अभाव यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर टीका होत होती. त्यामुळे केंद्र शासनाने लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था जून, १९९७ मध्ये सुरू केली. लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गरीब वर्गाची निश्चिती करून रास्त भाव दुकानांमार्फत पारदर्शकतेने व जबाबदारीपूर्वक अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी राज्यांना परिणामकारक व्यवस्थेची आखणी व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. राज्याच्या १ मार्च, २००० रोजीच्या लोकसंख्येच्या आधारे केंद्र शासनाने राज्यासाठी ६५.३४ लाख लाभार्थी कुटुंबांचे लक्ष्य निर्धारीत केले आहे. लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या गहू, तांदूळ, साखर, तूरडाळ व पामतेल या पाच वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

## अंत्योदय अन्न योजना

४.१७ अंत्योदय अन्न योजने (अंअयो) अंतर्गत सर्व भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक, ग्रामीण कारागीर, असंघटित क्षेत्रात रोजंदारीवर काम करणारी कुटुंबे, विधवा कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे किंवा दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ति, अपंग व्यक्ति, सामाजिक वा आर्थिक आधार नसलेली ६० वर्षे किंवा त्यावरील व्यक्ति आणि सर्व आदिम जमातीतील कुटुंबे यांना प्राधान्याने लाभ दिला जातो. त्यानुसार राज्य शासनाने २५.०५ लाख लाभार्थी कुटुंबांची निवड केली आहे. अंत्योदय अन्न योजने अंतर्गत १ मे, २००१ पासून सर्व लाभार्थ्यांना गहू व तांदूळ ही अन्नधान्ये अनुक्रमे दोन रुपये प्रति किलो व तीन रुपये प्रति किलो या दराने पुरविली जातात. एच्आयव्ही/एडस् ग्रस्त तसेच कुष्टरोग बाधित दारिद्रय रेषेखालील व्यक्ती जे इतर कुठल्याही योजने अंतर्गत समाविष्ट नाहीत आणि लक्ष्य मर्यादेत आहेत, त्यांना प्राथम्याने अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

## अन्नपूर्णा योजना

४.१८ अन्नपूर्णा ही शंभरटक्के केंद्र पुरस्कृत योजना राज्यामध्ये १ एप्रिल, २००१ पासून राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन अथवा राज्य निवृत्ती वेतन या योजनांतर्गत लाभ मिळत नसलेल्या ६५ वर्षे व त्यावरील निराधारांना अन्नपूर्णा योजनेअंतर्गत दरमहा १० किलो धान्य (गहू व तांदूळ) मोफत पुरविले जाते. या योजनेअंतर्गत राज्यासाठी १.२० लाख लाभार्थींचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सन २०११-१२ साठी केंद्र शासनाने ₹ ७.७८ कोटी इतका निधी मंजूर केला असून डिसेंबर, २०११ पर्यंत तो ₹ ४.११ कोटी खर्च करण्यात आला.

४.१९ सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या विविध योजनांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंचे परिमाण व दर तक्ता ४.३ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता ४.३ विविध योजनांतर्गत दरमहा वितरीत करण्यात येणाऱ्या वस्तूंचे परिमाण आणि दर**

(डिसेंबर,२०११ नुसार)

| वस्तू | एकक | परिमाण (दरमहा) | | | | दर (₹ / कि.ग्रॅ., ₹ /लीटर) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दारेखा | अंअयो | अन्नपूर्णा | दारेव | दारेखा | अंअयो | अन्नपूर्णा | दारेव |
| गहू व<br>तांदूळ | कि.ग्रॅ./कार्ड | ३५ | ३५ | १० | १५ | ५.००<br>६.०० | २.००<br>३.०० | मोफत | ७.२०<br>९.६० |
| पाम तेल $ | लि./कार्ड | १ | १ | १ | १ | ४५.०० | ४५.०० | ४५.०० | ४५.०० |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

$ मर्यादित कालावधीकरिता    अंअयो : अंत्योदय अन्न योजना :    दारेखा : दारिद्रय रेषे खालील    दारेव : दारिद्रय रेषे वरील

## अन्नधान्याचे नियतन व उचल

४.२० अन्नधान्याचे प्रापण करणे व त्याचे राज्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरणासाठी नियतन करणे ही जबाबदारी भारतीय अन्न महामंडळाची आहे. गहू व तांदूळ यांचे नियतन विविध प्रांतांसाठी भिन्न असून तेथील वस्तूंच्या उपभोग्य प्रकारांवर अवलंबून असते. दारिद्रय रेषेखालील (दारेखा) व दारिद्रय रेषेवरील (दारेव) कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल याचा तपशिल तक्ता ४.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ४.४ अं.अ.यो.,दा.रे.खा. (अं.अ.यो.वगळून) व दा.रे.व. कुटुंबासाठी अन्नधान्याचे नियतन व उचल**

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतन | उचल | टक्केवारी @ | नियतन | उचल | टक्केवारी @ |
| **अंअयो** | | | | | | |
| २००९-१० | ५.१० | ४.७३ | ९२.८ | ५.२५ | ४.९१ | ९३.५ |
| २०१०-११ | ५.०३ | ४.६१ | ९१.७ | ५.०५ | ४.६१ | ९१.३ |
| २०११-१२ # | ३.३१ | ३.०८ | ९३.१ | ३.२४ | ३.०२ | ९३.२ |
| **दारेखा (अंअयो वगळून)** | | | | | | |
| २००९-१० | ८.२४ | ७.५६ | ९१.८ | ८.८५ | ८.२७ | ९३.५ |
| २०१०-११ | ९.६५ | ८.११ | ८४.० | १०.८० | ८.६६ | ८०.२ |
| २०११-१२ # | ७.४४ | ५.८७ | ७८.९ | ७.९९ | ६.३९ | ८०.० |
| **दारेव** | | | | | | |
| २००९-१० | ३.९७ | २.३९ | ६०.२ | १५.०४ | ७.६९ | ५१.१ |
| २०१०-११ | ४.५२ | २.५६ | ५६.७ | १६.२७ | ७.८१ | ४८.० |
| २०११-१२ # | २.०३ | १.४७ | ७२.४ | १०.२९ | ४.८५ | ४७.१ |
| **एकूण** | | | | | | |
| २००९-१० | १७.३१ | १४.६८ | ८४.८ | २९.१४ | २०.८७ | ७१.६ |
| २०१०-११ | १९.२० | १५.२८ | ७९.६ | ३२.१२ | २१.०८ | ६५.६ |
| २०११-१२ # | १२.७८ | १०.४२ | ८१.५ | २१.५२ | १४.२६ | ६६.३ |

*आधार*: अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.. # नोव्हेंबर, २०११ पर्यंत @ उचलीशी नियतनाशी टक्केवारी

अंअओ: अंत्योदय अन्न योजना : दारेखा : दारिद्र्य रेषे खालील : दारेव : दारिद्र्य रेषे वरील

## नियंत्रित (लेव्ही) साखर

४.२१ केंद्र शासनाने, एकूण साखर उत्पादनातील खुल्या बाजारात विकण्यात येणारी साखर व नियंत्रित (लेव्ही) साखर यांचे प्रमाण ९:१ असे निश्चित केले आहे. अशा प्रकारे गोळा करण्यात आलेली नियंत्रित साखर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना वितरित करण्यात येते. दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका धारक आणि त्यांची लोकसंख्या यानुसार दरमहा राज्य शासनाला साधारणत: १३,९६० मे. टन नियंत्रित साखरेचे नियतन केंद्र शासनाकडून प्राप्त होते. ऑगस्ट, २०११ आणि नोव्हेंबर, २०११ मध्ये राज्याला साधारणत: ४,५०७ मे. टन नियंत्रित साखरेचा विशेष सणासुदीचा कोटा देण्यात आला होता. नियंत्रित साखरेचे नियतन व उचल याचा तपशील तक्ता ४.५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ४.५ नियंत्रित साखरेचे नियतन व उचल**

(लाख क्विंटल)

| वर्ष | नियतन | उचल |
|---|---|---|
| २००९-१० | १८.९६ | १०.३५ |
| २०१०-११ | १७.६३ | १२.८८ |
| २०११-१२ # | १४.८० | १०.३१ |

*आधार*: अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

# जानेवारी, २०१२ पर्यंत

## केरोसीन

४.२२ एप्रिल,२०१० ते मे,२०११ या कालावधीत राज्य शासनास अंदाजे १.३० लाख कि.लि. केरोसिनचे मासिक नियतन प्राप्त झाले. जून,२०११ पासून राज्यास दर महिना अंदाजे ०.९९ लाख कि.लि.इतके नियतन प्राप्त होते. सद्यस्थितीत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसीनची किरकोळ किंमत ₹ १४.१० प्रति लिटर आहे तर इतर जिल्ह्यांमध्ये ती ₹ १४.१० ते ₹ १६.२५ प्रति लिटर या दरम्यान आहे. केरोसिनचे वितरण गॅस कनेक्शनची आणि कुटुंबातील सदस्यांची संख्या यावर अवलंबून असते. केरोसीनचा गैरवापर टाळण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या केरोसीनचा रंग निळा करण्यात आला आहे व फक्त शिधापत्रिकाधारकांनाच देण्यात येते. केरोसीनची मागणी व नियतन याचा तपशील तक्ता ४.६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ४.६ केरोसीनची मागणी आणि नियतन**

(लाख कि.लिटर)

| वर्ष | मागणी | नियतन |
|---|---|---|
| २००९-१० | २०.२८ | १६.४१ |
| २०१०-११ | २०.२८ | १५.६४ |
| २०११-१२ # | ११.४७ | ९.५९ |

*आधार*: अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

# डिसेंबर,२०११ पर्यंत

## नियंत्रित (लेव्ही ) तांदूळ

४.२३ राज्यातील भात गिरणी धारकांना, भरडाई केलेल्या एकूण तांदूळाच्या काही तांदूळ (२०१०-११ मध्ये ३० टक्के) शासनास लेव्ही म्हणून भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करावा लागतो. नियंत्रित (लेव्ही) तांदूळ जमा करण्याचा कालावधी साधारणपणे नोव्हेंबर / डिसेंबर मध्ये सुरू होतो आणि त्यास खरीप पणन हंगाम असे संबोधले जाते. खरीप पणन हंगाम २०१०-११ मध्ये भात गिरणी धारकांकडून १,७७,९५७ मे.टन नियंत्रित (लेव्ही) तांदळाची वसुली करण्यात आली. लेव्ही तांदूळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी जमा केला जातो.

## अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य

४.२४ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याच्या वितरणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य, प्रतिकूल काळासाठी ठेवावयाच्या राखीव साठ्याचा देखभालीचा खर्च आणि अन्नधान्य प्रापणासाठीची किंमत व विक्रीची किंमत यातील तफावतीमुळे राज्य शासनास सहन करावी लागणारी तूट यांना एकत्रितरित्या अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य असे संबोधले जाते. वर्ष २०११-१२ साठी ₹ २८०.६८ कोटी अर्थसहाय्य अन्नधान्यासाठी देण्यात आले होते तर वर्ष २०१०-११ साठी ते ₹ २५२.५८ कोटी होते.

## गोदामे

४.२५ सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरीत करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून तर साठवणूक राज्य शासनाच्या मालकीच्या / भाड्याने घेतलेल्या गोदामात केली जाते. राज्यात २०११-१२ मध्ये १,०३९ गोदामे उपलब्ध असून त्यांची साठवण क्षमता ५.६८ लाख मेट्रिक टन आहे. त्यापैकी ०.७५ लाख मेट्रिक टन क्षमतेची १८४ गोदामे वापरासाठी अयोग्य असून ०.०८ लाख मेट्रिक टन क्षमतेची ११ गोदामे भाडे तत्वावर देण्यात आली आहेत. राज्य शासनाने ०.६४ लाख मेट्रिक टन क्षमतेची १३४ गोदामे अन्नधान्याच्या साठवणूकीसाठी भाड्याने घेतली आहेत. अयोग्य साठवणुकीमुळे होणारी अन्नधान्याची नासाडी थांबवण्यासाठी राज्य शासन गोदामांची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. नवीन गोदामांच्या उभारणीसाठी राज्य शासनाने मान्यता दिली असून २०११-१२ मध्ये ₹ ३६.८८ कोटी इतका निधी मंजूर केला आहे व २१ जिल्ह्यांमध्ये गोदामे उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. जिल्हानिहाय गोदामांची संख्या व त्यांची क्षमता परिशिष्ट ४.१२ मध्ये देण्यात आलेली आहे.

* * * * *

## परिशिष्ट ४.१
## महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वार्षिक चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | **...** |
| २००४-०५ | १०४ | १०५ | १०३ | १०२ | १०२ | १०४ | ... |
| २००५-०६ | १०९ | १०९ | १०८ | १०३ | १०५ | १०७ | ३.८ |
| २००६-०७ | ११८ | ११७ | १३२ | १०५ | १०८ | ११६ | ७.८ |
| २००७-०८ | १२८ | १२६ | १७६ | १०७ | ११५ | १२८ | १०.३ |
| २००८-०९ | १४२ | १३९ | २३८ | ११० | १२५ | १४५ | १३.२ |
| २००९-१० | १६६ | १५६ | २६१ | १११ | १३६ | १६३ | १२.८ |
| २०१०-११ | १८४ | १७४ | २९७ | ११४ | १५० | १८१ | १४.१ |
| २०११-१२ @ | २०१ | २०३ | ३२० | ११९ | १६३ | १९७ | ९.४ |
| एप्रिल, २०११ | १९१ | १९३ | ३१३ | ११५ | १५९ | १८९ | १०.८ |
| मे, २०११ | १९५ | १९७ | ३१३ | ११७ | १६० | १९२ | १०.७ |
| जून, २०११ | १९६ | १९७ | ३१६ | ११७ | १६१ | १९३ | १०.६ |
| जुलै, २०११ | १९८ | १९९ | ३१७ | ११८ | १६१ | १९४ | १०.२ |
| ऑगस्ट, २०११ | २०१ | २०१ | ३१९ | ११९ | १६२ | १९६ | ११.४ |
| सप्टेंबर , २०११ | २०३ | २०१ | ३२३ | ११९ | १६३ | १९८ | १०.० |
| ऑक्टोबर, २०११ | २०६ | २०६ | ३२४ | १२० | १६५ | २०१ | १०.३ |
| नोव्हेंबर, २०११ | २०८ | २०९ | ३२४ | १२० | १६५ | २०२ | १०.५ |
| डिसेंबर, २०११ | २०५ | २०९ | ३२५ | १२१ | १६५ | २०१ | ५.५ |
| जानेवारी, २०१२ * | २०५ | २१४ | ३२८ | १२२ | १६६ | २०१ | ४.७ |

आधार - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

@ १० महिन्यांची सरासरी        * अस्थायी

# परिशिष्ट ४.२
## महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वार्षिक चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४५.८०** | **१.५४** | **१०.२८** | **७.५१** | **३४.८७** | **१००.००** | **...** |
| २००४-०५ | १०५ | १०३ | १०३ | १०२ | १०४ | १०४ | ... |
| २००५-०६ | १०९ | १०७ | १०७ | १०३ | १०७ | १०८ | ३.२ |
| २००६-०७ | १२० | ११२ | १२४ | १०५ | ११० | ११५ | ७.२ |
| २००७-०८ | १२८ | १२१ | १६२ | १०६ | ११५ | १२५ | ८.७ |
| २००८-०९ | १४२ | १३४ | २२४ | १०९ | १२३ | १४१ | १२.९ |
| २००९-१० | १६५ | १४७ | २४५ | ११३ | १३१ | १५७ | ११.४ |
| २०१०-११ | १८६ | १६९ | २७८ | ११८ | १४३ | १७५ | ११.४ |
| २०११-१२ @ | २०० | २०४ | २९१ | १२६ | १५४ | १८८ | ७.९ |
| एप्रिल, २०११ | १८९ | १८६ | २८५ | १२३ | १५० | १८० | ८.६ |
| मे, २०११ | १९४ | १९४ | २८५ | १२४ | १५१ | १८३ | ८.६ |
| जून, २०११ | १९५ | १९७ | २८६ | १२४ | १५२ | १८४ | ८.३ |
| जुलै, २०११ | १९९ | २०० | २९१ | १२५ | १५३ | १८७ | ७.९ |
| ऑगस्ट, २०११ | २०० | २०१ | २९२ | १२६ | १५४ | १८८ | ९.२ |
| सप्टेंबर , २०११ | २०२ | २०४ | २९३ | १२७ | १५५ | १८९ | ८.२ |
| ऑक्टोबर, २०११ | २०६ | २०८ | २९३ | १२७ | १५६ | १९२ | ९.१ |
| नोव्हेंबर, २०११ | २०८ | २१२ | २९४ | १२८ | १५७ | १९३ | ९.५ |
| डिसेंबर, २०११ | २०६ | २१५ | २९४ | १२८ | १५७ | १९२ | ५.३ |
| जानेवारी, २०१२* | २०५ | २१७ | २९४ | १२९ | १५७ | १९२ | ४.६ |

*आधार -* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

@ १० महिन्यांची सरासरी     * अस्थायी

## परिशिष्ट ४.३

## महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष : १९८६-८७)

| वर्ष / महिना | शेतमजुरांकरिता ग्राहक किंमतींचा निर्देशांक | | | | ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचा निर्देशांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | अखिल भारत | | महाराष्ट्र | | अखिल भारत | |
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २०००-०१ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०५ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०७ |
| २००१-०२ | ३०७ | ३०३ | ३०२ | ३०९ | ३०८ | ३०४ | ३०३ | ३११ |
| २००२-०३ | ३२२ | ३१७ | ३१२ | ३१९ | ३२२ | ३१७ | ३१३ | ३२१ |
| २००३-०४ | ३४२ | ३३२ | ३२५ | ३३१ | ३४१ | ३३२ | ३२६ | ३३३ |
| २००४-०५ | ३५७ | ३४६ | ३३३ | ३३९ | ३५६ | ३४६ | ३३४ | ३४१ |
| २००५-०६ | ३६५ | ३६२ | ३४४ | ३५३ | ३६४ | ३६२ | ३४५ | ३५५ |
| २००६-०७ | ४०२ | ३९४ | ३७६ | ३८० | ४०० | ३९२ | ३७६ | ३८२ |
| २००७-०८ | ४३७ | ४२३ | ४०६ | ४०९ | ४३४ | ४२० | ४०६ | ४०९ |
| २००८-०९ | ४८४ | ४६४ | ४५२ | ४५० | ४८० | ४६० | ४५२ | ४५१ |
| २००९-१० | ५७४ | ५४० | ५२२ | ५१३ | ५७१ | ५३५ | ५२३ | ५१३ |
| २०१०-११ | ६३३ | ६०० | ५७२ | ५६४ | ६२९ | ५९५ | ५७३ | ५६४ |
| २०११-१२ @ | ६९८ | ६६८ | ६०० | ६०६ | ६९१ | ६६० | ६०१ | ६०६ |
| एप्रिल, २०११ | ६६२ | ६३७ | ५८५ | ५८७ | ६५६ | ६३१ | ५८५ | ५८७ |
| मे, २०११ | ६७६ | ६४८ | ५८८ | ५९२ | ६६९ | ६४१ | ५८९ | ५९२ |
| जून, २०११ | ६९० | ६६० | ५९३ | ५९८ | ६८२ | ६५२ | ५९४ | ५९७ |
| जुलै, २०११ | ६९६ | ६६६ | ५९९ | ६०४ | ६८९ | ६५८ | ६०० | ६०४ |
| ऑगस्ट, २०११ | ७०४ | ६७३ | ६०४ | ६१० | ६९७ | ६६५ | ६०५ | ६१० |
| सप्टेंबर , २०११ | ७१३ | ६८० | ६०८ | ६१५ | ७०५ | ६७२ | ६०९ | ६१४ |
| ऑक्टोबर, २०११ | ७२० | ६८७ | ६१३ | ६१९ | ७१२ | ६७८ | ६१४ | ६२० |
| नोव्हेंबर, २०११ | ७२५ | ६९२ | ६१२ | ६२१ | ७१६ | ६८३ | ६१३ | ६२१ |

*आधार* - श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

@ ८ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.४
## औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००१)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी, तंबाखू व मादक पदार्थ | इंधन व दिवाबत्ती | निवास | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्वसाधारण निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४६.१९** | **२.२७** | **६.४३** | **१५.२७** | **६.५८** | **२३.२६** | **१००.०** |
| २००५-०६ | ११५ | ११२ | १२३ | ११८ | ११० | १२० | ११७ |
| २००६-०७ | १२६ | ११६ | १३० | १२६ | ११४ | १२६ | १२५ |
| २००७-०८ | १३६ | १२८ | १३३ | १३१ | ११८ | १३१ | १३३ |
| २००८-०९ | १५३ | १३८ | १४४ | १३७ | १२२ | १४१ | १४५ |
| २००९-१० | १७६ | १५० | १४९ | १६६ | १२८ | १४९ | १६३ |
| २०१०-११ | १९४ | १६८ | १६३ | २०१ | १३६ | १५७ | १८० |
| २०११-१२ @ | २०४ | १९० | १८३ | २१८ | १५२ | १६६ | १९२ |
| एप्रिल, २०११ | १९७ | १८४ | १७१ | २१२ | १४६ | १६२ | १८६ |
| मे, २०११ | १९८ | १८५ | १७४ | २१२ | १४९ | १६३ | १८७ |
| जून, २०११ | २०१ | १८८ | १७७ | २१२ | १५० | १६५ | १८९ |
| जुलै, २०११ | २०४ | १९० | १८६ | २२३ | १५२ | १६६ | १९३ |
| ऑगस्ट, २०११ | २०५ | १९२ | १८८ | २२३ | १५३ | १६७ | १९४ |
| सप्टेंबर , २०११ | २०९ | १९३ | १९० | २२३ | १५५ | १६९ | १९७ |
| ऑक्टोबर, २०११ | २१२ | १९५ | १९२ | २२३ | १५७ | १७० | १९८ |

*आधार* - श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

@ ७ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.५
## महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

मुंबई (केंद्रिय केंद्रे)

| वर्ष / महिना | मुंबई | | सोलापूर | | नागपूर | | पुणे | | नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | (पायाभूत वर्ष - २००१) |
| **भारांक** | **४८.९** | **१००.०** | **५४.७** | **१००.०** | **४३.१** | **१००.०** | **३९.८** | **१००.०** | **४१.४** | **१००.०** |
| २००५-०६ | ११५ | ११८ | ११३ | ११५ | ११५ | ११९ | १२० | ११९ | ११९ | ११८ |
| २००६-०७ | १२६ | १२८ | १२६ | १२७ | १३३ | १३४ | १३४ | १३० | १३१ | १२६ |
| २००७-०८ | १३६ | १३६ | १४९ | १४२ | १४६ | १४२ | १४५ | १३८ | १४० | १३२ |
| २००८-०९ | १५१ | १४८ | १५९ | १५१ | १६६ | १५५ | १६० | १५० | १५५ | १४२ |
| २००९-१० | १७३ | १६३ | १७६ | १६६ | १९२ | १८३ | १८३ | १६७ | १८३ | १६५ |
| २०१०-११ | १९१ | १७८ | १८९ | १८२ | २०५ | २०७ | २०३ | १८५ | २०२ | १८६ |
| २०११-१२ @ | २०६ | १९४ | २१३ | २०२ | २१४ | २२२ | २२५ | २०२ | २१६ | २०६ |
| एप्रिल, २०११ | १९५ | १८४ | २०१ | १९३ | २०३ | २१४ | २१७ | १९६ | २०७ | १९७ |
| मे, २०११ | १९६ | १८६ | २०७ | १९८ | २०५ | २१५ | २१७ | १९७ | २२० | २०३ |
| जून, २०११ | २०० | १८९ | २०७ | १९८ | २०९ | २१७ | २२१ | १९९ | २१४ | २०१ |
| जुलै, २०११ | २०५ | १९४ | २१० | २०१ | २१७ | २२४ | २२२ | २०० | २१४ | २०४ |
| ऑगस्ट, २०११ | २०६ | १९५ | २११ | २०१ | २१८ | २२४ | २२५ | २०२ | २१६ | २०६ |
| सप्टेंबर, २०११ | २११ | १९९ | २१४ | २०४ | २२० | २२५ | २३० | २०४ | २१७ | २०७ |
| ऑक्टोबर, २०११ | २१५ | २०१ | २१९ | २०७ | २२३ | २२७ | २३० | २०६ | २१८ | २१० |
| नोव्हेंबर, २०११ | २१६ | २०१ | २१८ | २०७ | २२१ | २२८ | २३१ | २०७ | २२१ | २११ |
| डिसेंबर, २०११ | २१० | १९९ | २२१ | २०९ | २१३ | २२५ | २२८ | २०६ | २१९ | २११ |

*आधार* - श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.६
## महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(राज्य केंद्रे )

| वर्ष / महिना | अकोला | | कोल्हापूर | | जळगाव | | नांदेड | | औरंगाबाद | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | (पायाभूत वर्ष - २००१) |
| **भारांक** | **४५.८८** | **१००.०** | **४८.२२** | **१००.०** | **४७.७६** | **१००.०** | **४९.०५** | **१००.०** | **४०.७९** | **१००.०** |
| २००८-०९ | १३४ | १४४ | १५० | १४९ | १५१ | १५० | १५३ | १५४ | १४८ | १५० |
| २००९-१० | १५६ | १६१ | १६९ | १६४ | १७२ | १६७ | १६९ | १७४ | १७१ | १६४ |
| २०१०-११ | १७० | १७५ | १९१ | १८४ | १९५ | १८६ | १८७ | २०० | १८८ | १८३ |
| २०११-१२ @ | १८० | १८५ | २१५ | २०४ | २१७ | २०४ | २१३ | २२४ | २११ | २०३ |
| एप्रिल, २०११ | १७५ | १८० | २०५ | १९७ | २०७ | १९६ | २०३ | २१४ | २०२ | १९४ |
| मे, २०११ | १७४ | १८० | २१० | १९९ | २११ | १९८ | २०७ | २१६ | २०४ | १९५ |
| जून, २०११ | १७७ | १८२ | २११ | २०० | २१७ | २०२ | २१८ | २२२ | २०९ | १९७ |
| जुलै, २०११ | १७७ | १८५ | २११ | २०२ | २१९ | २०६ | २१८ | २२८ | २१२ | २०४ |
| ऑगस्ट, २०११ | १७८ | १८५ | २१७ | २०६ | २१७ | २०५ | २१३ | २२६ | २१२ | २०५ |
| सप्टेंबर , २०११ | १७७ | १८६ | २२० | २०८ | २२० | २०७ | २१३ | २२७ | २१२ | २०६ |
| ऑक्टोबर, २०११ | १८३ | १८८ | २१९ | २०८ | २१९ | २०७ | २१९ | २३० | २२३ | २११ |
| नोव्हेंबर, २०११ | १८८ | १९२ | २२१ | २१० | २२१ | २०८ | २१६ | २२९ | २१५ | २०८ |
| डिसेंबर, २०११ | १८५ | १९१ | २२० | २१० | २२१ | २०९ | २१३ | २२८ | २१४ | २०९ |

*आधार* - कामगार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.७
## अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक

| वर्ष/ महिना | प्राथमिक वस्तू | इंधन, वीज, दिवाबत्ती व वंगण | वस्तूनिर्माण उत्पादने | सर्व वस्तू |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | (पायाभूत वर्ष - २००४-०५) |
| **भारांक** | **२०.१२** | **१४.९१** | **६४.९७** | **१००.००** |
| २००५-०६ | १०४.३ | ११३.६ | १०२.३ | १०४.४ |
| २००६-०७ | ११४.३ | १२०.९ | १०८.० | १११.२ |
| २००७-०८ | १२३.९ | १२१.० | ११३.३ | ११६.५ |
| २००८-०९ | १३७.५ | १३५.० | १२०.२ | १२५.९ |
| २००९-१० | १५४.९ | १३२.१ | १२२.४ | १३०.४ |
| २०१०-११ | १८२.४ | १४८.३ | १३०.१ | १४३.३ |
| २०११-१२ @ | १९९.१ | १६७.० | १३८.९ | १५५.२ |
| एप्रिल, २०११ | १९६.८ | १५९.५ | १३६.६ | १५२.१ |
| मे, २०११ | १९४.९ | १६०.४ | १३७.४ | १५२.४ |
| जून, २०११ | १९५.९ | १६१.६ | १३७.९ | १५३.१ |
| जुलै, २०११ | १९८.२ | १६५.६ | १३८.० | १५४.२ |
| ऑगस्ट, २०११ | १९९.४ | १६७.१ | १३८.४ | १५४.९ |
| सप्टेंबर , २०११ | २०२.९ | १६८.३ | १३९.० | १५६.२ |
| ऑक्टोबर, २०११ | २०३.५ | १७०.० | १३९.६ | १५७.० |
| नोव्हेंबर, २०११ | २०१.८ | १७१.६ | १४०.४ | १५७.४ |
| डिसेंबर, २०११ * | १९७.९ | १७२.६ | १४०.६ | १५६.९ |
| जानेवारी, २०१२ * | १९९.७ | १७२.८ | १४१.२ | १५७.७ |

*आधार* - आर्थिक सल्लागारांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

@ १० महिन्यांची सरासरी     * अस्थायी

## परिशिष्ट ४.८
## महत्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर

| वर्ष / महिना | चलन वाढीचे दर | | | |
|---|---|---|---|---|
| | अखिल भारतीय घाऊक किंमतीचा निर्देशांक # | औद्योगिक कामगारांसाठी अखिल भारतीय ग्राहक किंमतीचा निर्देशांक + | शेतमजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतीचा निर्देशांक + | ग्रामीण मजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतीचा निर्देशांक + |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २०००-०१ | ७.१३ | ३.८२ | (-) ०.३३ | ०.०३ |
| २००१-०२ | ३.६२ | ४.३१ | १.०९ | १.३३ |
| २००२-०३ | ३.३८ | ३.९८ | ३.१६ | ३.१३ |
| २००३-०४ | ५.४९ | ३.८५ | ३.९० | ३.७९ |
| २००४-०५ | ६.४८ | ३.८३ | २.६० | २.५८ |
| २००५-०६ | ४.४३ | ४.४१ | ३.८५ | ३.८५ |
| २००६-०७ | ६.५१ | ६.८३ | ७.८५ | ७.५२ |
| २००७-०८ | ४.८१ | ६.४० | ७.४५ | ७.१८ |
| २००८-०९ | ८.०३ | ९.०९ | १०.२३ | १०.१९ |
| २००९-१० | ३.५७ | १२.३७ | १३.९१ | १३.७६ |
| २०१०-११ | ९.५६ | १०.४५ | १०.०० | १०.०१ |
| २०११-१२ @ | ९.११ | ८.८२ @@ | ८.५३ | ८.६४ |
| एप्रिल, २०११ | ९.७४ | ९.४१ | ९.११ | ९.११ |
| मे, २०११ | ९.५६ | ८.७२ | ९.६३ | ९.६३ |
| जून, २०११ | ९.५१ | ८.६२ | ९.३२ | ९.१४ |
| जुलै, २०११ | ९.३६ | ८.४३ | ९.०३ | ९.०३ |
| ऑगस्ट, २०११ | ९.७८ | ८.९९ | ९.५२ | ९.७१ |
| सप्टेंबर , २०११ | १०.०० | १०.०६ | ९.४३ | ९.२५ |
| ऑक्टोबर, २०११ | ९.८७ | ९.३९ | ९.३६ | ९.७३ |
| नोव्हेंबर, २०११ | ९.४६ | ९.३४ | ८.९५ | ९.१४ |
| डिसेंबर, २०११ | ७.४७ * | ६.४९ | ६.३७ | ६.७२ |
| जानेवारी, २०१२ | ६.५५ * | उ.ना. | ४.९२ | ५.२७ |

*आधार* - # आर्थिक सल्लागार , वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालय

+ श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला    @ १० महिन्यांची सरासरी    @@ ९ महिन्यांची सरासरी

* अस्थायी    उ.ना. उपलब्ध नाही

टीप - चलन वाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ.

# परिशिष्ट ४.९
## जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या ३१ - ८ -११

| जिल्हा | पिवळी | | केशरी | अन्नपूर्णा | सफेद | एकूण शिधापत्रिका |
|---|---|---|---|---|---|---|
| | दारिद्र्य रेषे खालील | अंत्योदय अन्न योजना | दारिद्र्य रेषे वरील | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई | ३०,६१२ | १९,९२२ | ३१,७४,०७२ | १०,७७७ | ६,१०,९८० | ३८,४६,३६३ |
| ठाणे | १,६०,८८१ | १,२८,९२९ | ४,३०,०२० | २,४२३ | २५,३४३ | ७,४७,५९६ |
| रायगड | ९७,३८४ | ६२,६०४ | ३,२५,४४१ | १,८७६ | ६१,२१३ | ५,४८,५१८ |
| रत्नागिरी | ७५,९०९ | ४४,१०१ | २,४७,४६९ | ८११ | २१,६५७ | ३,८९,९४७ |
| सिंधुदुर्ग | ४८,५१७ | २४,३८७ | १,२९,६२३ | ७२३ | १८,१५७ | २,२१,४०७ |
| नाशिक | २,९१,६१८ | १,६८,३७५ | ५,२४,५२४ | १,०२५ | ६३,३३७ | १०,४८,८७९ |
| धुळे | १,३९,९४९ | ६६,४३४ | १,५६,५४६ | १,९५९ | ४,१४४ | ३,६९,०३२ |
| नंदुरबार | १,०४,७२० | ८५,८९८ | १,१६,१२५ | १,३१९ | ७,८७४ | ३,१५,९३६ |
| जळगाव | २,०१,८१२ | १,३६,१०४ | ४,३८,३६७ | १,९८२ | ५२,२६४ | ८,३३,५२९ |
| अहमदनगर | २,४६,५७४ | ८२,१२१ | ५,२७,६९३ | २,०७१ | ५४,३३० | ९,१२,७८९ |
| पुणे | १,६०,८०७ | ६८,५५८ | १३,०४,९४६ | १,२४८ | १,१६,००१ | १६,५१,५६० |
| सातारा | १,३२,०३५ | ३५,२३५ | ४,२५,०८१ | १,९५८ | ४६,३५० | ६,४०,६५९ |
| सांगली | ७२,०४९ | ३४,८६८ | ४,०१,८२५ | १,३८१ | ५९,३०५ | ५,६९,४२८ |
| सोलापूर | २,३२,६६० | ८४,७८७ | ४,५४,०८९ | १,११८ | ६४,४४८ | ८,३७,११२ |
| कोल्हापुर | १,५६,३७८ | ५८,१८० | ५,६०,०३७ | ४९२ | २०,९७३ | ७,९६,०६० |
| औरंगाबाद | १,८२,०३७ | ६५,२६६ | ४,००,७६९ | २,५५५ | ७,३८५ | ६,५८,०१२ |
| जालना | १,१८,८४२ | ४०,०९३ | १,६८,९७४ | २,३४२ | ३,२०७ | ३,३३,४५८ |
| परभणी | ७३,०१७ | ४३,९०३ | २,१०,७४७ | १,९२१ | ० | ३,२९,५८८ |
| हिंगोली | ६०,५७१ | २७,४६३ | १,६१,७२४ | १,०९६ | २,६२६ | २,५३,४८० |
| बीड | २,४९,२६० | ४३,१२० | २,८३,३६४ | १,९८६ | ५,६२७ | ५,८३,३५७ |
| नांदेड | १,३९,२३७ | ७४,८६२ | २,९९,७७५ | १,८३५ | ३,२५२ | ५,१८,९६१ |
| उस्मानाबाद | १,०४,५३३ | ३८,१८३ | २,०५,२५२ | १,४४९ | १०,४११ | ३,५९,८२८ |
| लातूर | ८७,७३३ | ४१,२२९ | २,९६,१०१ | २,०५३ | ७,०६५ | ४,३४,१८१ |
| बुलढाणा | १,४२,२१५ | ६३,११३ | २,४९,६७७ | ३,८८८ | ४,१२१ | ४,६३,०१४ |
| अकोला | ९१,२५६ | ३९,२६६ | १,६३,७५० | १,९६३ | १२,१५६ | ३,०८,३९१ |
| वाशिम | ७०,६९२ | ३९,६४१ | ८३,०९८ | १,५२९ | २,२३० | १,९७,१९० |
| अमरावती | १,६९,६४८ | १,२०,४३८ | २,३९,५९३ | २,८९८ | १२,४२४ | ५,४५,००१ |
| यवतमाळ | १,३२,३३१ | १,१३,२६४ | २,४६,५०९ | ४,६७५ | ५,८२८ | ५,०२,६०७ |
| वर्धा | ४८,४३३ | ४२,७२७ | १,५७,३५९ | २,१५० | १०,०११ | २,६०,६८० |
| नागपूर | १,३०,३८१ | ९३,३०९ | ५,७६,६१५ | ६,५२१ | ४९,७४१ | ८,५६,५६७ |
| भंडारा | ७६,७०६ | ५३,२३७ | ८४,९०२ | १,३२९ | १०,६६८ | २,२६,८४२ |
| गोंदिया | ९५,१५६ | ६५,६०७ | ८७,४७९ | १,५६५ | ५,०९१ | २,५४,८९८ |
| चंद्रपुर | १,०४,०२३ | १,०८,६११ | १,५५,९६८ | १,५२९ | २४,४७६ | ३,९४,६०७ |
| गडचिरोली | ४४,२६८ | ८०,१४७ | ८९,५१२ | ० | २,५१२ | १,८६,४३९ |
| **एकूण** | ४२,७२,२४४ | २२,९३,९८२ | १,३३,४७,०२६ | ७४,५२७ | १४,०८,२१७ | २,१३,९५,९९६ |

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट ४.१०

## महाराष्ट्रातील अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना देण्यात आलेला तांदूळ व गहू

(लाख टनात)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (२) + (३) | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (५) + (६) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २००१-०२ (एकूण) | ०.०२ | ५.१६ | ५.१८ | ०.०५ | ८.४८ | ८.५३ |
| पैकी, लसाविव्य | ०.०२ | ५.०० | ५.०२ | ०.०४ | ८.२७ | ८.३१ |
| २००५-०६ (एकूण) | ०.०९ | ९.३७ | ९.४६ | ०.५५ | १४.९९ | १५.५४ |
| पैकी, लसाविव्य | ०.०७ | ९.२७ | ९.३४ | ०.१० | १४.३२ | १४.४२ |
| २००६-०७ (एकूण) | ०.२८ | १०.४५ | १०.७३ | ०.४७ | १२.८५ | १३.३२ |
| पैकी, लसाविव्य | ०.०८ | १०.२१ | १०.२९ | ०.०७ | १२.११ | १२.१८ |
| २००७-०८ (एकूण) | ०.१२ | ११.१६ | ११.२८ | ०.३२ | १२.६२ | १२.९४ |
| पैकी, लसाविव्य | ०.०६ | १०.९० | १०.९६ | ०.०६ | ११.८६ | ११.९२ |
| २००८-०९ (एकूण) | ०.१५ | ११.५४ | ११.६९ | ०.८० | १४.३० | १५.१० |
| पैकी, लसाविव्य | ०.०९ | ११.५२ | ११.६७ | ०.०७ | १२.४१ | १२.४८ |
| २००९-१० (एकूण) | ०.६७ | १४.०१ | १४.६८ | २.५० | १८.३७ | २०.८७ |
| पैकी, लसाविव्य | ०.१५ | १२.३५ | १२.५० | ०.०७ | १३.०७ | १३.१४ |
| २०१०-११ (एकूण) | ०.८७ | १४.६२ | १५.४९ | १.९९ | १९.४४ | २१.४३ |
| पैकी, लसाविव्य | ०.१३ | १२.७१ | १२.८४ | ०.०८ | १३.४१ | १३.४९ |
| २०११-१२ (नोव्हेंबर, २०११ पर्यंत) | ०.५४ | ९.९३ | १०.४७ | १.२० | १३.०४ | १४.२४ |
| पैकी, लसाविव्य | ०.११ | ८.८७ | ८.९८ | ०.०५ | ९.३४ | ९.३९ |

## परिशिष्ट ४.११

## भारत सरकारकडून महाराष्ट्र राज्याला मिळालेले नियतन

(लाख टनात)

| वर्ष | तांदुळ | गहू |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २००१-०२ (एकूण) | ९.२३ | १७.१३ |
| पैकी, लसाविव्य | ६.५५ | १२.१६ |
| २००५-०६ (एकूण) | २७.४० | ४७.०४ |
| पैकी, लसाविव्य | १०.९० | १६.५४ |
| २००६-०७ (एकूण) | २७.९० | १९.०२ |
| पैकी, लसाविव्य | १२.९४ | १४.५१ |
| २००७-०८ (एकूण) | १३.६९ | १५.४६ |
| पैकी, लसाविव्य | १३.३४ | १४.०४ |
| २००८-०९ (एकूण) | १३.८५ | १८.११ |
| पैकी, लसाविव्य | १२.२३ | १२.९३ |
| २००९-१० (एकूण) | १७.४१ | २९.१४ |
| पैकी, लसाविव्य | १३.३४ | १४.१० |
| २०१०-११ (एकूण) | १९.२० | ३२.१२ |
| पैकी, लसाविव्य | १४.६८ | १५.८५ |
| २०११-१२ (नोव्हेंबर, २०११ पर्यंत) | १२.७८ | २१.५२ |
| पैकी, लसाविव्य | १०.७५ | ११.२३ |

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

टीप - लक्षनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे (लसाविव्य ) अंतर्गत आकडेवारीमध्ये अंत्योदय अन्न योजनेची आकडेवारी समाविष्ट केलेली आहे.

# परिशिष्ट ४.१२
## जिल्हावार गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या (२०११-१२)

| जिल्हा | उपलब्ध गोदामे | | रास्त भाव दुकानांची संख्या २०११ |
|---|---|---|---|
| | संख्या | क्षमता (मे.टन) | |
| (१) | (२) | (३) | (४) |
| मुंबई | १३ | ८,७२४ | ४,०१० |
| ठाणे | ३५ | १६,७०० | १,६१४ |
| रायगड | ६२ | २५,८०० | १,२१० |
| रत्नागिरी | ४५ | १६,०५० | ८७९ |
| सिंधुदुर्ग | १४ | ६,५५० | ४१९ |
| नाशिक | २८ | १७,२०० | २,२८३ |
| धुळे | १७ | ८,५०० | ९७९ |
| नंदुरबार | २६ | १३,००० | ९८४ |
| जळगाव | ३२ | १४,१०० | १,९२८ |
| अहमदनगर | ७६ | ४९,१०० | १,६९३ |
| पुणे | ४८ | ३७,०२० | २,७८९ |
| सातारा | ४३ | १५,६४० | १,६०५ |
| सांगली | २९ | १३,७६० | १,१९६ |
| सोलापूर | ५४ | ३८,०२४ | १,७९५ |
| कोल्हापुर | २२ | १०,४५० | १,३९८ |
| औरंगाबाद | २७ | २६,१८८ | १,७९१ |
| जालना | २८ | १८,७०० | १,२८५ |
| परभणी | २१ | ९,३०० | १,१७८ |
| हिंगोली | ११ | ६,६०० | ७९७ |
| बीड | ३५ | २५,११० | २,०१८ |
| नांदेड | ४१ | १६,३५० | १,९३५ |
| उस्मानाबाद | ३० | १७,००० | १,०५९ |
| लातूर | २७ | १९,७०० | १,३५२ |
| बुलढाणा | २१ | ८,८०० | १,५६० |
| अकोला | २३ | १३,१०० | १,०७१ |
| वाशिम | ११ | ७,१५० | ७७५ |
| अमरावती | २९ | ११,७५० | १,९१४ |
| यवतमाळ | ३५ | १७,५०० | १,९९५ |
| वर्धा | १४ | ८,६८५ | ८३१ |
| नागपूर | ४९ | २६,१८२ | १,८४८ |
| भंडारा | १६ | ९,५०० | ८८७ |
| गोंदिया | २३ | १२,४०० | ९९० |
| चंद्रपुर | ३३ | १५,००० | १,४७४ |
| गडचिरोली | २१ | ९,०५० | ११०३ |
| **एकूण** | **१,०३९** | **५,६८,६८३** | **५०,६४५** |

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

# ५

# लोकवित्त



# ५. लोकवित्त

## अर्थसंकल्प २०११-१२

५.१ दोन वर्षाच्या कालावधीनंतर महसुली अधिक्य दर्शविणारा वर्ष २०११-१२ चा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. महसुली जमेचा मुख्य घटक असणारा कर महसूल २०१०-११ (सु.अं.) च्या कर महसुलापेक्षा १४.७ टक्क्याने तर २००९-१० च्या प्रत्यक्ष जमेपेक्षा ४४.६ टक्के वाढणे अपेक्षित आहे. अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ नुसार राज्याचा एकूण खर्च मागील वर्षापेक्षा ९.० टक्क्यांनी वाढून ₹ १,४४,७८४ कोटी होणे अपेक्षित आहे. महसुली खर्च महसुली जमेच्या मर्यादेत सीमीत ठेवल्याने राज्यास केंद्र पुरस्कृत योजनांसह ₹ ४५,७९६ कोटी इतक्या योजनांतर्गत खर्चासाठी तरतूद करणे शक्य झाले, जी मागील वर्षाच्या तुलनेत २०.३ टक्क्यांनी अधिक होती. राज्याची २०११-१२ मधील वित्तीय तूट ₹ २२,८०५ कोटी अपेक्षित असून ती स्थूल राज्य उत्पन्नाच्या १.८ टक्के इतकी कमी आहे. राज्य अर्थसंकल्पाचा सारांश तक्ता ५.१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ५.१ दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प**

(₹ कोटी)

| बाब | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|
| १. महसुली जमा | ८६,९१० | १,०७,१५९ | १,२१,५०४ |
| २. महसुली खर्च | ९४,९१६ | १,१२,८४७ | १,२१,४४६ |
| ३. महसुली तूट (२-१) | ८,००६ | ५,६८८ | (-)५८ |
| ३.१. स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | ०.९ | ०.५ | ०.० |
| ४. भांडवली जमा # | २६,५५८ | २५,७८६ | २३,३३५ |
| ५. भांडवली खर्च # | १८,६९० | १९,९३२ | २३,३३८ |
| ६. एकूण जमा (१+४) # | १,१३,४६८ | १,३२,९४५ | १,४४,८३९ |
| ७. एकूण खर्च (२+५) # | १,१३,६०६ | १,३२,७७९ | १,४४,७८४ |
| ८. अर्थसंकल्पीय तूट (७-६) | १३८ | (-)१६६ | (-) ५५ |
| ९. वित्तीय तूट | २६,१५६ | २५,०४२ | २२,८०५ |
| ९.१. स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | ३.० | २.३ | १.८ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # कर्ज परताव्याच्या निव्वळ रकमा
सु.अं. - सुधारीत अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज

## महसुली जमा

५.२ वर्ष २०११-१२ मध्ये ₹ १,२१,५०४ कोटी इतकी महसुली जमा अपेक्षित असून मागील वर्षापेक्षा १३.४ टक्क्यांनी जास्त आहे. वर्ष २०१०-११ मध्ये महसुली जमेमध्ये अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा १०.४ टक्के वाढ अपेक्षित होती. वर्ष २०१०-११ व २०११-१२ मध्ये कर वसुलीसाठी जोमाने करण्यात आलेले प्रयत्न व तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीमुळे केंद्रीय कर हिश्श्यात झालेली वाढ यामुळे महसुलामध्ये वाढ झाली आहे. याबाबतचा तपशिल तक्ता ५.२ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ५.२ महसुली जमा**

(₹ कोटी)

| वर्ष | कर महसूल | करेतर महसूल @ | एकूण महसुली जमा |
|---|---|---|---|
| २००६-०७ | ४६,१२२ | १६,०७३ | ६२,१९५ |
| २००७-०८ | ५५,१२६ | २४,४५७ | ७९,५८३ |
| २००८-०९ | ६०,०४९ | २१,२२२ | ८१,२७१ |
| २००९-१० | ६७,३५४ | १९,५५६ | ८६,९१० |
| २०१०-११ (सु.अं.) | ८४,९१५ | २२,२४४ | १,०७,१५९ |
| २०११-१२ (अ.अं.) | ९७,४०४ | २४,१०० | १,२१,५०४ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन
सु.अं. - सुधारीत अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज @ केंद्रीय अनुदानासह

## कर महसूल

५.३ वर्ष २०११-१२ मध्ये राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात १३.९ टक्के तर केंद्रीय करातील हिश्श्यामध्ये २०.१ टक्के इतकी वाढ अपेक्षित असून यामुळे कर महसुलात मागील वर्षापेक्षा १४.७ टक्के वाढ अपेक्षित आहे. राज्याच्या कर महसुलापैकी स्वतःच्या कर महसुलाचे वर्ष २००६-०७ मधील ६४.४ टक्के हे प्रमाण वाढून वर्ष २०१०-११ (सु.अं.) मध्ये ६८.६ टक्के इतके झाले व ते पुढे वर्ष २०११-१२ मध्ये ६८.९ टक्के इतके वाढणे अपेक्षित आहे. यामुळे वर्ष २००६-०७ मधील ₹ ४६,१२२ कोटी कर महसूल दुपटीपेक्षा जास्त वाढून तो वर्ष २०११-१२ मध्ये ₹ ९७,४०४ कोटी होणे अपेक्षित आहे. राज्याच्या कर महसुलाचा तपशिल तक्ता ५.३ मध्ये दिला आहे.

**आलेख ५.१ : रुपयाच्या स्वरुपात जमा व खर्च - २०११-१२ (अ.अं)**




**आलेख ५.२ : कर /स्वतःचा कर महसूल यांचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण**




**तक्ता ५.३ कर महसूल**

(₹ कोटी)

| वर्ष | राज्याचा स्वतःचा कर महसूल | केंद्रीय करातील हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|
| २००६-०७ | ४०,०९८ | ६,०२४ | ४६,१२२ |
| २००७-०८ | ४७,५२८ | ७,५९८ | ५५,१२६ |
| २००८-०९ | ५२,०३१ | ८,०१८ | ६०,०४९ |
| २००९-१० | ५९,१०६ | ८,२४८ | ६७,३५४ |
| २०१०-११ (सु.अं) | ७३,४९६ | ११,४१९ | ८४,९१५ |
| २०११-१२ (अ.अं) | ८३,६८६ | १३,७१८ | ९७,४०४ |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.४ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात प्रमुख हिस्सा असलेल्या मूल्यवर्धित कराचे (व्हॅट) प्रमाण ५५.० टक्के असून मुद्रांक व नोंदणी शुल्क आणि विजेवरील शुल्काचा हिस्सा अनुक्रमे १८.७ टक्के व ५.३ टक्के इतका आहे. राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचा तपशिल तक्ता ५.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.४ स्वतःचा कर महसूल**

(₹ कोटी)

| बाब | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) मूल्यवर्धित कर (व्हॅट) / विक्रीकर | २४,१३१ | २६,७५३ | ३०,६८० | ३२,६७६ | ४०,८१५ | ४६,००० |
| २) मुद्रांक व नोंदणी शुल्क | ६,४१६ | ८,५५० | ८,२८८ | १०,७७४ | १४,१४० | १५,६७७ |
| ३) राज्य उत्पादन शुल्क | ३,३०१ | ३,९६३ | ४,४३४ | ५,०५७ | ५,८०० | ८,५०० |
| ४) विजेवरील शुल्क | १,५७७ | २,६८८ | २,३९५ | ३,२८९ | ४,६८६ | ४,४०० |
| ५) उत्पन्न व खर्चावरील इतर कर | १,२४६ | १,४८८ | १,५६१ | १,६१२ | १,६०८ | १,७०० |
| ६) वाहनांवरील कर | १,८४१ | २,१४३ | २,२२० | २,६८२ | ३,४७१ | ४,००० |
| ७) विक्रेय वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क | ८७८ | १,०४३ | १,०१५ | १,३२५ | १,०४१ | १,०९९ |
| ८) माल व उतारुंवरील कर | २२४ | ३८८ | ८९२ | ९७७ | ७३९ | ८१३ |
| ९) जमीन महसूल | ४८४ | ५१२ | ५४६ | ७१४ | १,१९६ | १,४९७ |
| **स्वतःचा एकूण कर महसूल** | **४०,०९८** | **४७,५२८** | **५२,०३१** | **५९,१०६** | **७३,४९६** | **८३,६८६** |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.५ वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्याला केंद्रीय करातील हिस्सा प्राप्त होतो. तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय करांतील (सेवाकरांव्यतीरिक्त) राज्यांना वितरणासाठी निश्चित केलेल्या राज्याच्या हिश्श्यात ४.९९७ टक्क्यांवरुन ५.१९९ टक्के इतकी वाढ झाली आहे. तसेच राज्याचा सेवा करांतील हिस्सा ५.०६३ टक्क्यांवरुन वाढून तो ५.२८१ टक्के झाला आहे. राज्याला केंद्रीय करांतील हिश्श्यापोटी २०११-१२ मध्ये एकूण ₹ १३,७१८ कोटी प्राप्त होणे अपेक्षित आहेत.

## करेतर महसूल

५.६ राज्याच्या करेतर महसुलात केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानाचा प्रमुख वाटा आहे. वर्ष २०११-१२ मध्ये एकूण ₹ २४,१०० कोटी इतका करेतर महसूल अपेक्षित असून याबाबतचा तपशिल तक्ता ५.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.५ करेतर महसूल**

(₹ कोटी)

| वर्ष | व्याजाच्या जमा रकमा | इतर करेतर महसूल | केंद्रीय अनुदाने | एकूण करेतर महसूल |
|---|---|---|---|---|
| २००६-०७ | २,५०४ | ५,०१४ | ८,५५५ | १६,०७३ |
| २००७-०८ | १,१७० | १५,७७८ | ७,५०९ | २४,४५७ |
| २००८-०९ | १,०१७ | ८,७७३ | ११,४३२ | २१,२२२ |
| २००९-१० | १,३४२ | ७,०११ | ११,२०३ | १९,५५६ |
| २०१०-११ (सु.अं.) | १,६२१ | ७,३७२ | १३,२५१ | २२,२४४ |
| २०११-१२ (अ.अं.) | १,१५६ | ८,५७५ | १४,३६९ | २४,१०० |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## तेरावा वित्त आयोग

५.७ वित्त आयोगाने केंद्रीय करातील हिश्श्याव्यतिरिक्त राज्यांना काही विशिष्ट हेतुंकरीता सहाय्यक अनुदाने देण्याची शिफारस केली आहे. या सहाय्यक अनुदानांपोटी राज्याला वर्ष २०११-१२ मध्ये ₹ २,८७५.८५ कोटी इतकी रक्कम मिळणे अपेक्षित आहे. यात एकमेवाव्दितीय ओळखपत्रासाठी (UID), न्याय प्रक्रीया सुधारणेसाठी, जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण योजनांसाठी, राज्य व जिल्हा सांख्यिकी प्रणालीत सुधारणा करण्यासाठी आणि कर्मचारी व निवृत्तीवेतन विषयक माहितीकोष तयार करण्यासाठी सहाय्यक अनुदान यांचा समावेश आहे. आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीही सहाय्यक अनुदानांची शिफारस केली आहे. सहाय्यक अनुदानांचा तपशिल तक्ता ५.६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ५.६ तेराव्या वित्त आयोगानुसार - सहाय्यक अनुदाने**

(₹ कोटी)

| बाब | २०१०-११ | | २०११-१२ |
|---|---|---|---|
| | प्राप्त | झालेला खर्च # | अपेक्षित |
| १.सर्वसाधारण मुलभूत अनुदान | ७९८.०५ | ७९८.०५ | ९३६.९० |
| (अ) पंचायत राज संस्था | ५०५.७८ | ५०५.७८ | ५९३.८० |
| (ब) नागरी स्वराज्य संस्था | २९२.२७ | २९२.२७ | ३४३.१० |
| २.सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान | ०.०० | ०.०० | ३२०.३० |
| ३.विशेष क्षेत्र मुलभूत अनुदान | ७.९० | ७.९० | ७.८८ |
| ४.विशेष क्षेत्र कार्यात्मक अनुदान | ०.०० | ०.०० | ३.९४ |
| ५.राज्य आपत्ती मदत निधी (केंद्रीय हिस्सा) | ३३२.०२ | ३३२.०२ | ३४८.६२ |
| ६.क्षमता निर्मितीसाठी अनुदान | ५.०० | ४.८९ | ५.०० |
| ७.मुलभूत शिक्षणासाठी अनुदान | १३१.०० | १३०.९९ | १४०.०० |
| ८.वनांसाठी अनुदान | ३८.७० | ३२.९४ | ३८.७० |
| ९.एकमेवाव्दितीय ओळखपत्रासाठी (UID) प्रोत्साहनात्मक अनुदान | ३१.७४ | ३१.७४ | ६३.४८ |
| १०. न्याय प्रक्रिया सुधारण्यासाठी अनुदान | १०८.५३ | ४.६२ | १०८.५३ |
| ११. नाविन्यपूर्ण कल्पनांसाठी जिल्हा निधी अनुदान | ०.०० | ०.०० | १४.०० |
| १२.राज्य व जिल्हा सांख्यिकी प्रणालीत सुधारणा करण्यासाठी अनुदान | ०.०० | ०.०० | १४.०० |
| १३.कर्मचारी व निवृत्ती वेतन विषयक माहितीकोषासाठी अनुदान | २.५० | ०.०० | ३.७५ |
| १४. जलक्षेत्र | ०.०० | ०.०० | ९२.०० |
| १५. रस्ते व पूल यांचे परिरक्षण | ०.०० | ०.०० | ४७०.०० |
| १६.राज्याच्या विविध गरजा | ०.०० | ०.०० | ३०८.७५ |
| **एकूण** | **१,४५५.४४** | **१,३४३.१५** | **२,८७५.८५** |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # संबंधित विभाग

## महसुली खर्च

५.८ वर्ष २००६-०७ ते २००८-०९ या सलग तीन वर्षांमध्ये महसुली खर्च महसुली जमेच्या मर्यादेत सीमीत राहिल्याने राज्यात महसुली अधिक्य राहीले. त्यानंतर वर्ष २०१०-११ (सु.अं.) पर्यंत महसुली तूट होती. तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींचे अनुपालन करण्यासाठी वर्ष २०११-१२ पासून महसुली खर्च महसुली जमेच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

आलेख ५.३ : व्याज प्रदानांची स्वत:च्या कर महसुलाशी टक्केवारी




५.९ एकूण महसुली खर्चात होणाऱ्या वाढीसह विकास खर्चामध्येही दरवर्षी वाढ होत आहे. वर्ष २०११-१२ मध्ये एकूण महसुली खर्चातील विकास खर्चाचे प्रमाण ६३.८ टक्के इतके अपेक्षित आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार इत्यादिचा समावेश असणाऱ्या सामाजिक सेवा या क्षेत्राचा एकूण महसुली व विकास खर्चात मोठ्या प्रमाणात हिस्सा असून वर्ष २०११-१२ मध्ये यावरील खर्च ४६.६ टक्के इतका होणे अपेक्षित आहे. महसुली खर्चाचा तपशिल परिशिष्ट ५.३ मध्ये दिला आहे.

५.१० वेतन, मजुरी आणि निवृत्तीवेतन या घटकांवर झालेल्या खर्चाचा महसुली खर्चात मोठा हिस्सा असल्याचे बाबनिहाय महसुली खर्चावरुन दिसून येते. वेतन, मजुरी आणि निवृत्तीवेतनावरील खर्चाचे एकूण महसुली जमेशी २००८-०९ मध्ये असणारे ३७.९ टक्के प्रमाण लक्षणीय वाढून ते २००९-१० मध्ये ४८.५ टक्के इतके झाले. हेच प्रमाण २०१०-११ (सु.अं.) मध्ये ५१.१ टक्के इतके वाढले. वर्ष २०११-१२ मध्ये ते ४९.५ टक्के इतके कमी होणे अपेक्षित आहे. तसेच कर्जवाढीमुळे व्याजप्रदानात सातत्याने वाढ होत आहे. महसुली खर्चाचा तपशिल तक्ता ५.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.७ महसुली खर्चाची विभागणी**

(₹ कोटी)

| वर्ष | वेतन व मजूरी | निवृत्तीवेतन | व्याजप्रदाने | इतर | एकूण महसुली खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | १९,८८२ | ४,११९ | ११,९८३ | २५,४०१ | ६१,३८५ |
| | (३२.४) | (६.७) | (१९.५) | (४१.४) | (१००.०) |
| २००७-०८ | २२,८७९ | ४,६८२ | १२,९३२ | २४,२८७ | ६४,७८० |
| | (३५.३) | (७.२) | (२०.०) | (३७.५) | (१००.०) |
| २००८-०९ | २४,४७८ | ६,३३१ | १३,०२७ | ३१,८५८ | ७५,६९४ |
| | (३२.३) | (८.४) | (१७.२) | (४२.१) | (१००.०) |
| २००९-१० | ३५,१९३ | ६,९४६ | १४,८३८ | ३७,९३९ | ९४,९१६ |
| | (३७.१) | (७.३) | (१५.६) | (४०.०) | (१००.०) |
| २०१०-११ (सु.अं.) | ४३,३९१ | ११,३८४ | १६,१०२ | ४१,९७० | १,१२,८४७ |
| | (३८.४) | (१०.१) | (१४.३) | (३७.२) | (१००.०) |
| २०११-१२ (अ.अं.) | ४८,७६१ | ११,४३१ | १८,०४९ | ४३,२०५ | १,२१,४४६ |
| | (४०.१) | (९.४) | (१४.९) | (३५.६) | (१००.०) |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## अर्थसहाय्य

५.११ सामान्य जनतेला जीवनावश्यक वस्तू व सेवा किफायतशीर दरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी व / किंवा आर्थिक विकासासाठीही शासन अर्थसहाय्य देते. वर्ष २०१०-११ (सु.अं) मध्ये ₹ ७,९४९ कोटी इतक्या अर्थसहाय्याची तरतूद करण्यात आली होती, ती २०११-१२ या वर्षात ₹ ७,१०० कोटी इतकी अपेक्षित आहे. अर्थसंकल्पीत मुख्य अर्थसहाय्ये पुढीलप्रमाणे आहेत :

- कृषि / यंत्रमागाचा वापर करणाऱ्यांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. यांना भरपाईपोटी ₹ ३,००० कोटी.
- औद्योगिक घटकांसाठी (विशाल औद्योगिक प्रकल्पांसह) ₹ ४०० कोटी.
- जेष्ठ नागरीक, विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक इत्यादीं सारख्या काही प्रवासी वर्गांना दिलेल्या प्रवास खर्चातील सवलतींमुळे होणाऱ्या तोट्याची भरपाई करण्याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ₹ ५०५ कोटी.
- अन्नधान्य वितरण आणि अंत्योदय अन्न योजना सारख्या इतर संबंधित योजनांसाठी ₹ २८१ कोटी.

## कर वसुली

५.१२ 'महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन' नियमाचा एक भाग असणारे वाढविलेला परंतु वसूल न झालेला कर हे अनिवार्य विवरण पत्र विधी मंडळास सादर केले जाते. त्यानुसार ₹ २७,३२० कोटी इतका वाढविण्यात आलेला कर २००९-१० च्या अखेरपर्यंत वसूल झालेला नव्हता. तसेच ₹ ९,२४७ कोटी निर्विवाद रक्कमांपैकी ₹ ४,११० कोटी इतका कर चार वर्षापेक्षा जास्त काळ वसूल झालेला नाही.

५.१३ मूल्यवर्धित कर / व्हॅट (मोटार स्पिरिट व वंगण यावरील करांसह ) व केंद्रीय विक्रीकर यांचा वसूल न झालेल्या करांमध्ये अनुक्रमे ७६.० व १७.२ टक्के इतका मोठा वाटा आहे. याबाबतचा तपशिल तक्ता ५.८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.८ वाढविलेला परंतु वसूल न झालेला कर महसूल**

(₹ कोटी)

| विवरण | २००९-१० च्या अखेरीस रक्कम | | |
|---|---|---|---|
| | विवादास्पद | निर्विवाद | एकूण |
| १.मोटार स्पिरीट व वंगण यावरील करांसह विक्रीकर/मूल्यवर्धित कर (व्हॅट) | १४,८६४ | ५,९०९ | २०,७७३ |
| २.केंद्रीय विक्रीकर | २,४९० | २,२२० | ४,७१० |
| ३.व्यवसाय , व्यापार आणि रोजगार यावरील कर | ४ | ६२३ | ६२७ |
| ४.गौण खनिजे, इत्यादी | १८८ | १२० | ३०८ |
| ५.विद्युत शुल्क | २१० | १४ | २२४ |
| ६. इतर | ३१७ | ३६१ | ६७८ |
| **एकूण** | **१८,०७३** | **९,२४७** | **२७,३२०** |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## महसुली जमा २०११-१२

५.१४ डिसेंबर, २०११ अखेर एकूण महसुली जमा अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६५.३ टक्के इतकी आहे. मागील वर्षी याच कालावधीतील एकूण महसुली जमा २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ७१.४ टक्के इतकी होती. डिसेंबर, २०११ अखेर एकूण महसुली जमेत आधीच्या वर्षाच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत १४.६ टक्क्यांनी वाढ झाली. याच कालावधीत कर व करेतर महसुलात अनुक्रमे १४.७ व १३.७ टक्क्यांनी वाढ झाली. मागील वर्षाच्या तुलनेत राज्याच्या स्वत:च्या कर महसुलात १३.४ टक्के वाढ झाली असून त्यामध्ये समाविष्ट असलेल्या मूल्यवर्धित करांमध्ये (व्हॅट) १९.३ टक्के वाढ झाली आहे. महसुली जमेबाबतचा तपशिल तक्ता ५.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.९ महसुली जमा २०११-१२**

(₹ कोटी)

| बाब | एप्रिल ते डिसेंबर # | | अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ @ | अर्थसंकल्पीय अंदाजाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | | |
| **अ) कर महसूल (१+२)** | **५८,९९०** | **६७,६६६** | **९७,४०४** | **६९.५** |
| १) स्वत:चा कर महसूल (१ ते ९) | ५२,७७३ | ५९,८२६ | ८३,६८६ | ७१.५ |
| (१) व्हॅट | ३०,६८९ | ३६,६१९ | ४६,००० | ७९.६ |
| (२) मुद्रांक व नोंदणी शुल्क | १०,३२७ | ९,८७९ | १५,६७७ | ६३.० |
| (३) राज्य उत्पादन शुल्क | ३,९९७ | ५,६३० | ८,५०० | ६६.२ |
| (४) विजेवरील कर व शुल्क | २,३४४ | १,६४७ | ४,४०० | ३७.४ |
| (५) जमीन महसूल | ७३० | ५७५ | १,४९७ | ३८.४ |
| (६) वाहनांवरील कर | २,४४७ | २,९३७ | ४,००० | ७३.४ |
| (७) उत्पन्न व खर्चावरील इतर कर | १,२२४ | १,३३७ | १,७०० | ७८.६ |
| (८) माल व उतारुंवरील कर | ३६ | २६ | ८१३ | ३.२ |
| (९) वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क | ९७९ | १,१७६ | १,०९९ | १०७.० |
| २) केंद्रीय करांतील हिस्सा | ६,२१७ | ७,८४० | १३,७१८ | ५७.२ |
| **ब) करेतर महसूल (१+२)** | **१०,२८३** | **११,६८७** | **२४,१००** | **४८.५** |
| (१) करेतर महसूल | ४,२९१ | ५,८०० | ९,७३१ | ५९.६ |
| (२) केंद्रीय अनुदाने | ५,९९२ | ५,८८७ | १४,३६९ | ४१.० |
| **एकूण (अ+ब)** | **६९,२७३** | **७९,३५३** | **१,२१,५०४** | **६५.३** |

*आधार :* # महालेखापाल यांचे कार्यालय, महाराष्ट्र @ संक्षिप्त अर्थसंकल्प, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## महसुली खर्च २०११-१२

५.१५ डिसेंबर, २०११ अखेर राज्याचा एकूण महसुली खर्च ₹ ७७,२७२ कोटी इतका (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६३.६ टक्के) होता. यापैकी, योजनांतर्गत खर्च ₹ ९,७७७ कोटी तर योजनेतर खर्च ₹ ६७,४९५ कोटी होता.

## राज्य योजनेची कामगिरी

५.१६ योजनेच्या नियतव्ययात सातत्याने होणाऱ्या वाढीवरुन शासन विकास कार्याला अधिकाधिक प्रोत्साहन देत असल्याचे दिसून येते. दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी राज्याच्या वार्षिक योजनेचा एकूण नियतव्यय ₹ १४,८२९ कोटी होता व तो अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ₹ ४२,००० कोटी पर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस ₹ १,२७,५३८ कोटी मंजूर झालेला नियतव्यय वाढून योजनेच्या शेवटी ₹ १,६१,०७४ कोटी झाला. वर्षनिहाय राज्य योजनेचा मंजूर नियतव्यय व झालेला खर्च याचा तपशिल तक्ता ५.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१० वार्षिक योजना - नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय # | खर्च | नियतव्ययाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००६-०७ | १४,८२९ | १५,६८१ | १०५.७ |
| २००७-०८ | २०,२०० | १९,४२२ | ९६.१ |
| २००८-०९ | २५,००० | २२,८७० | ९१.५ |
| २००९-१० | ३५,९५८ | २७,७३१ | ७७.१ |
| २०१०-११ (सु.अं.) | ३७,९१६ | ३२,२१६ * | ८५.० |
| २०११-१२ (अ.अं.) | ४२,००० | -- | -- |

*आधार :* नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी # मंजूर नियतव्यय

## वार्षिक योजना २०११-१२

५.१७ वार्षिक योजना २०११-१२ साठी ₹ ४२,००० कोटी इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला असून त्यापैकी ₹ ४१,२७९ कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. विशेष घटक उपयोजनेसाठी ₹ ४,२८४ कोटी तर आदिवासी उपयोजनेसाठी ₹ ३,७३८ कोटी इतका नियतव्यय मंजूर केला आहे. वर्ष २०११-१२ च्या योजनेच्या नियतव्ययात जिल्हा योजनेकरीता ₹ ७,११५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

५.१८ वर्ष २०११-१२ मध्ये सर्वाधिक ₹ १९,५५८ कोटी इतका नियतव्यय सामाजिक व सामुहिक सेवा या क्षेत्रासाठी मंजूर करण्यात आला असून त्या खालोखाल पाटबंधारे आणि पूरनियंत्रण क्षेत्रासाठी ₹ ७,५७७ कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आला. याबाबतचा तपशिल तक्ता ५.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.११ वार्षिक योजनेचा क्षेत्रनिहाय नियतव्यय (२०१०-११ व २०११-१२)**

(₹ कोटी)

| क्षेत्र | अपेक्षित खर्च * २०१०-११ | २०११-१२ | |
|---|---|---|---|
| | | मंजूर नियतव्यय | नियतव्ययातील हिस्सा (%) |
| कृषि व संलग्न सेवा | २,३९१ | २,८२७ | ६.७ |
| ग्रामविकास | ७५६ | १,१८२ | २.८ |
| विशेष क्षेत्र कार्यक्रम | २२७ | १८६ | ०.४ |
| पाटबंधारे आणि पूरनियंत्रण | ८,७७७ | ७,५७७ | १८.० |
| उर्जा विकास | २,३३६ | ३,०४६ | ७.३ |
| उद्योग व खनिजे | २०७ | ३०२ | ०.७ |
| परिवहन व दळणवळण | ३,८८६ | ४,७७६ | ११.४ |
| विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | १५ | २९ | ०.१ |
| सर्वसाधारण आर्थिक सेवा | ५३१ | ७३९ | १.८ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १२,३८२ | १९,५५८ | ४६.६ |
| सर्वसाधारण सेवा | ७०८ | १,४१० | ३.४ |
| इतर कार्यक्रम | ० | ३६८ | ०.९ |
| **एकूण** | **३२,२१६** | **४२,०००** | **१००** |

*आधार*: नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## अर्थसंकल्पीत योजनांतर्गत खर्च

५.१९ वर्ष २००६-०७ मध्ये शासनाच्या अर्थसंकल्पातील एकूण खर्चामधील योजनांतर्गत खर्चाचा हिस्सा २१.८ टक्के इतका होता व तो वाढून २०११-१२ मध्ये २९.७ टक्के झाला. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत योजनांतर्गत खर्चातील भांडवली खर्च जरी वाढत असला तरी त्याचा हिस्सा कमी होत आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता शासन खाजगी संस्थांना सहभागी होण्यास प्रोत्साहीत करीत आहे. योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचा तपशिल तक्ता ५.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१२ योजनांतर्गत व योजनेतर खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | योजनांतर्गत खर्च | | | योजनेतर खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | महसुली | भांडवली | एकूण | | |
| २००६-०७ | ८,२०५ | ८,९३० | १७,१३५ | ६१,३७१ | ७८,५०६ |
| २००७-०८ | १०,२८९ | ९,७०९ | १९,९९८ | ६२,१९६ | ८२,१९४ |
| २००८-०९ | १२,४२० | १३,२७२ | २५,६९२ | ७४,२८० | ९९,९७२ |
| २००९-१० | १६,७२४ | १५,१५५ | ३१,८७९ | ८५,९०२ | १,१७,७८१ |
| २०१०-११ (सु.अं.) | २१,१६५ | १६,८९६ | ३८,०६१ | १,००,४९२ | १,३८,५५३ |
| २०११-१२ (अ.अं) | २५,९०४ | १९,८९२ | ४५,७९६ | १,०८,३२९ | १,५४,१२५ |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## भांडवली जमा आणि भांडवली खर्च

५.२० भांडवली जमा हा एकूण जमेचा लहान हिस्सा असून त्यामध्ये प्रामुख्याने ऋणांचा (कर्जे व इतर दायित्वे) समावेश होतो. ऋणाव्यतिरिक्त भांडवली जमेचे : (१) कर्जाची वसुली, (२) आंतरराज्यीय तडजोड, आकस्मिकता निधी व त्यातील विनियोजन इत्यादि सारख्या इतर जमा आहेत. आतापर्यंत कर्जाचा मोठा हिस्सा महसुली खर्च भागविण्याकरीता वापरला जात असे. तथापि, तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार २०११-१२ पासून कर्जाचा वापर प्रामुख्याने भांडवली विकास खर्च भागविण्याकरीता करण्यात येईल.

**आलेख ५.४ : योजनांतर्गत खर्च**




टिप : उजव्या बाजूचा य अक्ष ( Y- axis ) भांडवली खर्चाचा एकूण योजनांतर्गत खर्चातील वाटा दर्शवितो.

५.२१ एकूण भांडवली खर्चाचे प्रामुख्याने (१) महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च जो भांडवली खर्चातील मोठा हिस्सा आहे आणि (२) ऋण (राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा आणि कर्जाची परतफेड) असे दोन भाग आहेत. २०११-१२ मध्ये ₹ ३२,६७९ कोटी इतका भांडवली खर्च अपेक्षित असून तो शासनाच्या एकूण खर्चाच्या २१.२ टक्के आहे. याबाबतचा तपशिल तक्ता ५.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१३ भांडवली जमा व भांडवली खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | एकूण भांडवली जमा | पैकी राज्याचे अंतर्गत ऋण | एकूण भांडवली खर्च | पैकी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च | सरकारी ऋणांची परतफेड |
| २००६-०७ | १६,२९८ | १४,०५८ | १७,१२१ | १०,०९२ | ४,७०७ |
| २००७-०८ | ९,७९८ | १३,४३२ | १७,४१४ | ११,४९० | ४,६९९ |
| २००८-०९ | १९,०६५ | २१,२२७ | २४,२७८ | १८,८७३ | ४,१२५ |
| २००९-१० | ३०,३८३ | २०,८१२ | २२,८६५ | १७,४२९ | ४,१७५ |
| २०१०-११ (सु.अं.) | ३१,५६० | २४,६९८ | २५,७०६ | १८,८२३ | ५,७७४ |
| २०११-१२ (अ.अं.) | ३२,६७६ | २४,००० | ३२,६७९ | २२,४३९ | ९,३४२ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## तुटीचा कल

५.२२ शासकीय खर्चाला शिस्त लागावी व वारंवार कर्ज घेण्यापासून परावृत्त व्हावे यासाठी राज्य शासनाने २००५ मध्ये राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम पारित केला आहे. त्यानुसार शासनाला २००८-०९ पर्यंत महसुली तूट पूर्णपणे घालवून, वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण ३ टक्क्यांपर्यंत खाली आणणे आवश्यक होते. मागील काही वर्षामध्ये महसुली तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्ष २००७-०८ मध्ये सर्वात कमी म्हणजेच (-) २.२ टक्के होते. जरी २००८-०९ मध्ये राज्याकडे महसुली अधिक्य राहीले असले तरी वाढलेल्या वेतनाच्या ओझ्यामुळे २००९-१० मध्ये महसुली तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असणारे प्रमाण ०.९ टक्के इतके वाढले. वर्ष २०१०-११ मध्ये महसूल वसुलीकरीता करण्यात आलेले प्रयत्न व कायद्यातील पळवाटा बंद केल्यामुळे महसूल २३.३ टक्क्यांनी वाढणे व पर्यायाने महसुली तुटीमध्ये घट व परिणामस्वरुप स्थूल राज्य उत्पन्नाशी असणारे प्रमाण ०.५ टक्के इतके कमी होणे अपेक्षित होते.

**तक्ता ५.१४ राज्यांची वित्तीय एकत्रित सुधारणेकडे वाटचाल**

(स्थूल देशांतर्गत उत्पन्नाशी टक्केवारी)

| विवरण | वित्तीय तूट-राज्ये | ऋणभार-राज्ये |
|---|---|---|
| २००९-१० | २.८ | २७.१ |
| २०१०-११ | २.६ | २६.६ |
| २०११-१२ | २.५ | २६.१ |
| २०१२-१३ | २.५ | २५.५ |
| २०१३-१४ | २.४ | २४.८ |
| २०१४-१५ | २.४ | २४.३ |

*आधार* : तेरावा वित्त आयोग, भारत सरकार

५.२३ तेराव्या वित्त आयोगाने २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीकरीता केंद्र व राज्यांना घालून दिलेल्या वित्तीय एकत्रित सुधारणेच्या वाटचालीचा तपशिल तक्ता ५.१४ मध्ये देण्यात आला आहे. त्यानुसार २०१४-१५ पर्यंत सर्व राज्यांची वित्तीय तूट स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या २.४ टक्के व ऋणभार २४.३ टक्के इतका मर्यादित राहणे आवश्यक आहे.

५.२४ वित्तीय तुटीचा महसुली तुटीशी जवळचा संबंध आहे. वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले प्रमाण वर्षागणिक घटत आहे. वर्ष २००४-०५ मध्ये वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले ४.४ टक्के हे प्रमाण क्रमाक्रमाने कमी होऊन २००७-०८ मध्ये (-) ०.४ टक्के झाले. तथापि, २०११-१२ मध्ये हे प्रमाण १.८ टक्क्यांपर्यंत वाढणे अपेक्षित असून ते तेराव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या २.४ टक्क्यांच्या मर्यादेत आहे.

### ऋणस्थिती

५.२५ परतावा न केलेले कर्ज व इतर दायित्वे राज्य शासनावरील ऋणभार दर्शवितात. विकास कार्यक्रमांना अर्थसहाय्य करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या अंतर्गत ऋणात झालेली वाढ व अनिवार्य कर्ज परतावा यामुळे राज्याच्या एकूण ऋणात प्रतिवर्षी वाढ होत आहे. वर्ष २००४-०५ मध्ये असलेल्या ₹ १,०९,१६७ कोटी इतक्या ऋणात वाढ होऊन २०१०-११ च्या शेवटी ते ₹ २,०५,६८९ कोटी इतके झाले. त्यापैकी, खुल्या बाजारातून घेतलेले कर्ज ₹ ७३,८२५ कोटी (३५.९ टक्के) इतके होते. तथापि, याच कालावधीमध्ये एकूण ऋणाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले २६.३ टक्के हे प्रमाण कमी होऊन १९.३ इतके होणे अपेक्षित आहे.

५.२६ वर्ष २०११-१२ मध्ये खुल्या बाजारातून ₹ १९,००० कोटी इतके कर्ज घेणे अपेक्षित असून त्यापैकी ₹ १,४८० कोटी इतकी रक्कम कर्जांच्या परतफेडीकरीता वापरण्यात येईल. एकंदर ₹ २४,००० कोटी अपेक्षित अंतर्गत ऋणांपैकी ₹ ८,८२७ कोटी इतकी रक्कम कर्जांच्या परतफेडीकरीता आहे. शासनाचा एकूण ऋणभार ₹ २,२६,९२६ कोटी पर्यंत (स्थूल राज्य उत्पन्नाच्या १८.२ टक्के) वाढणे अपेक्षित असून त्यापैकी खुल्या बाजारातून घेतलेली कर्जे ₹ ९१,३४५ कोटी इतकी असतील.

**आलेख ५.५ : वित्तीय एकत्रित सुधारणेकडे वाटचालीच्या सापेक्ष राज्याची कामगिरी**




टिप : वित्तीय एकत्रित सुधारणेकडे वाटचाल - २००६-०७ ते २००८-०९ FRBM नुसार आणि २००९-१० ते २०११-१२ तेराव्या वित्त आयोगानुसार

**आलेख ५.६ : महसुली व वित्तीय तुटीची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी**




५.२७ खुल्या बाजारातून घेतलेली कर्जे आणि राष्ट्रीय अल्पबचत निधीमधील रोखे हे ऋणभाराचे दोन प्रमुख घटक असून त्यांचा ऋणभारामध्ये ७५ टक्के इतका वाटा आहे. खुल्या बाजारातील कर्जे प्रामुख्याने दिनांकीत रोखे या प्रकारात असतात. त्याचा परिपक्वता कालावधी ७ ते १० वर्षे इतका आहे. राज्याच्या वित्तिय स्थितीवरील ताणामुळे २००८-०९ व २००९-१० मध्ये खुल्या बाजारातील कर्जामध्ये वाढ झाली आहे. परिणामी वर्ष २०१३-१४ पासून रोख्याच्या परिपक्वतेमुळे कर्ज परत फेडीच्या रकमेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. राज्याला कर्जे

**तक्ता ५.१५ एकूण ऋणस्थिती आणि व्याजप्रदाने**

(₹ कोटी)

| वर्ष | ऋणस्थिती | व्याजप्रदाने | कर्जाचे सरासरी मूल्य (द.सा.द.शे.) |
|---|---|---|---|
| २००६-०७ | १,३३,७२३ | ११,९८३ | ९.६ |
| २००७-०८ | १,४२,३८३ | १२,९३२ | ९.७ |
| २००८-०९ | १,६०,६७२ | १३,०२७ | ९.१ |
| २००९-१० | १,८१,४४७ | १४,८३८ | ९.२ |
| २०१०-११ (सु.अं.) | २,०५,६८९ | १६,१०२ | ८.९ |
| २०११-१२ (अ.अं.) | २,२६,९२६ | १८,०४९ | ८.८ |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

टीप : कर्जाचे सरासरी मूल्य हे त्या वर्षातील व्याज प्रदानाचे त्याच्या अगोदरच्या वर्षातील एकूण ऋणाशी असलेले शेकडा प्रमाण होय.

कमी करण्याकरीता महसूल वाढवून वित्तिय स्थिती बळकट करण्याचे प्रयत्न करावे लागतील.

## शासकीय हमी

५.२८ राज्य शासनाने दिलेल्या विविध हमींची अदत्त रक्कम २००९-१० च्या अखेरपर्यंत ₹ १७,३२० कोटी इतकी होती. राज्याने मोठी हमी दिलेल्या विभागांमध्ये सार्वजनिक बांधकाम (₹ ३,६२८ कोटी ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग (₹ ३,३२८ कोटी ), उद्योग, उर्जा आणि कामगार (₹ ३,१६५ कोटी ), जलसंधारण (₹ २,६०८ कोटी ) आणि पाणीपुरवठा व स्वच्छता (₹ २,४०३ कोटी ) यांचा समावेश होता. याबाबतचा तपशिल तक्ता ५.१६ मध्ये दिला आहे.

**आलेख ५.७ : ऋणभार**




टिप : उजव्या बाजूचा य अक्ष ( Y- axis ) ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण (%) दर्शविते.

**तक्ता ५.१६ शासनाने २००९-१० मध्ये दिलेली हमी**

(₹ कोटी)

| अ.क्र. | विभागाचे नाव | २००९-२०१० वर्षात प्रारंभीची अदत्त रक्कम | वर्षभरात पडलेली भर | | २००९-२०१० वर्षात वगळलेल्या रकमा (मागणी केलेल्या रकमां व्यतिरिक्त) $ | २००९-२०१० वर्ष अखेरीस अदत्त असलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ अ | ४ ब # | ५ | ६ |
| १ | कृषी व पदुम | ४५१ | १५० | १० | ४४३ | १६८ |
| २ | उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) | ३३० | ० | ० | १२३ | २०७ |
| ३ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २७९ | ० | १४ | ६० | २३३ |
| ४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | ४ | ० | ० | २ | २ |
| ५ | नगरविकास | २२९ | ० | २ | २२ | २०९ |
| ६ | उद्योग, उर्जा व कामगार (उर्जा) | ४,१७७ | ० | २५० | १,२६२ | ३,१६५ |
| ७ | जलसंपदा | ३,१२३ | ० | ० | ५१५ | २,६०८ |
| ८ | गृह | १५ | ० | ० | १५ | ० |
| ९ | सार्वजनिक बांधकाम | ३,५३५ | १,०८५ | ० | ९९२ | ३,६२८ |
| १० | महसूल व वन | २ | ० | ० | ० | २ |
| ११ | आदिवासी विकास | ५० | २५ | ८ | १० | ७३ |
| १२ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ४,९१८ | ८५३ | ० | २,४४३ | ३,३२८ |
| १३ | ग्रामविकास व जलसंधारण | ८६ | ० | ० | ११ | ७५ |
| १४ | पाणी पुरवठा व स्वच्छता | २,८१२ | ० | ० | ४०९ | २,४०३ |
| १५ | अल्पसंख्यांक | २३ | ० | ५ | ६ | २२ |
| १६ | नियोजन | १,२६७ | ० | ० | ७० | १,१९७ |
| **एकूण** | | **२१,३०१** | **२,११३** | **२८९** | **६,३८३** | **१७,३२०** |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

टिप : १.# ठोक हमी देण्यात आल्यामुळे सन २००९-१० वर्षामध्ये प्राप्त झालेल्या कर्जाच्या रकमा तसेच सुधारीत व्याज दरामुळे बदललेल्या रकमा अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

२. $ २००९-१० या वर्षातील आवाहनीत रकमा निरंक आहेत.

* * * * *

# परिशिष्ट ५.१
## महाराष्ट्र शासन : दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

(₹ कोटी )

| | बाब | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | **४८,४३८** | **६२,१९५** | **७९,५८३** | **८१,२७१** | **८६,९१०** | **१,०७,१५९** | **१,२१,५०४** |
| | अ) कर महसूल | ३८,५२२ | ४६,१२२ | ५५,१२६ | ६०,०४९ | ६७,३५४ | ८४,९१५ | ९७,४०४ |
| | ब) कराव्यतिरिक्त महसूल | ९,९१६ | १६,०७३ | २४,४५७ | २१,२२२ | १९,५५६ | २२,२४४ | २४,१०० |
| **२.** | **महसूली खर्च** | **५२,२८०** | **६१,३८५** | **६४,७८०** | **७५,६९४** | **९४,९१६** | **१,१२,८४७** | **१,२१,४४६** |
| | ***त्यापैकी*** | | | | | | | |
| | अ) व्याज प्रदान | १०,५२३ | ११,९८३ | १२,९३२ | १३,०२७ | १४,८३८ | १६,१०२ | १८,०४९ |
| | ब) प्रशासकीय सेवा | ४,२०७ | ४,८२४ | ५,५०४ | ६,५६० | ८,१७३ | १०,७९३ | १२,५६१ |
| | क) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ४,१०४ | ४,३६४ | ४,२१५ | ५,१९९ | ६,२२९ | ९,१७७ | १०,००७ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | **३,८४२** | **(-)८१०** | **(-)१४,८०३** | **(-)५,५७७** | **८,००६** | **५,६८८** | **(-)५८** |
| **४.** | **भांडवली जमा** | **२४,१७६** | **१६,२९८** | **१,७१८** | **१९,०६५** | **३०,३८३** | **३१,५६०** | **३२,६७६** |
| | ***त्यापैकी*** | | | | | | | |
| | अ) कर्जाची वसूली | ५५१ | ५१ | ७३३ | ५६० | ५१५ | ५७८ | ४७५ |
| | ब) इतर भांडवली जमा | ० | ० | ० | १८ | २५ | ० | ० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | १७,८८३ | ११,५४० | (-)३,७१७ | १४,३६३ | २६,०१८ | २५,२०८ | २२,८६० |
| **५.** | **भांडवली खर्च** | **२०,०८२** | **१७,१२१** | **१७,४१४** | **२४,२७८** | **२२,८६५** | **२५,७०६** | **३२,६७९** |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | **७२,६१४** | **७८,४९३** | **८१,३०१** | **१,००,३३६** | **१,१७,२९३** | **१,३८,७१९** | **१,५४,१८०** |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | **७२,३६२** | **७८,५०६** | **८२,१९४** | **९९,९७२** | **१,१७,७८१** | **१,३८,५५३** | **१,५४,१२५** |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | **०** | **०** | **०** | **०** | **३५०** | **०** | **०** |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ - ६- ८)** | **(-) २५२** | **१३** | **८९३** | **(-)३६४** | **१३८** | **(-)१६६** | **(-)५५** |
| **१०.** | **वित्तिय तूट (९ + ४ क)** | **१७,६३१** | **११,५५३** | **(-)२,८२४** | **१३,९९९** | **२६,१५६** | **२५,०४२** | **२२,८०५** |
| | **स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी** | | | | | | | |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | १०.० | १०.६ | ११.६ | १०.८ | १०.० | १०.० | ९.७ |
| | अ) कर महसूल | ७.९ | ७.९ | ८.० | ८.० | ७.८ | ७.९ | ७.८ |
| | ब) कराव्यतिरिक्त महसूल | २.० | २.७ | ३.६ | २.८ | २.३ | २.१ | १.९ |
| **२.** | **महसूली खर्च** | १०.७ | १०.५ | ९.५ | १०.० | १०.९ | १०.६ | ९.७ |
| | ***त्यापैकी*** | | | | | | | |
| | अ) व्याज प्रदान | २.२ | २.१ | १.९ | १.७ | १.७ | १.५ | १.४ |
| | ब) प्रशासकीय सेवा | ०.९ | ०.८ | ०.८ | ०.९ | ०.९ | १.० | १.० |
| | क) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ०.८ | ०.७ | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.९ | ०.८ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | ०.८ | (-)०.१ | (-)२.२ | (-)०.७ | ०.९ | ०.५ | ०.० |
| **४.** | **भांडवली जमा** | ५.० | २.८ | ०.३ | २.५ | ३.५ | ०.३ | २.६ |
| | ***त्यापैकी*** | | | | | | | |
| | अ) कर्जाची वसूली | ०.१ | ०.० | ०.१ | ०.१ | ०.१ | ०.१ | ०.० |
| | ब) इतर भांडवली जमा | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | ३.७ | २.० | (-)०.५ | १.९ | ३.० | २.४ | १.८ |
| **५.** | **भांडवली खर्च** | ४.१ | २.९ | २.५ | ३.२ | २.६ | २.४ | २.६ |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | १४.९ | १३.४ | ११.९ | १३.३ | १३.५ | १३.० | १२.३ |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | १४.९ | १३.४ | १२.० | १३.३ | १३.६ | १३.० | १२.३ |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ - ६- ८)** | (-)०.१ | ०.० | ०.१ | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| **१०.** | **वित्तिय तूट (९ + ४ क)** | ३.६ | २.० | (-)०.४ | १.९ | ३.० | २.३ | १.८ |

*आधार -* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

सु.अं. - सुधारित अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज

## परिशिष्ट ५.२

## महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल

(₹ कोटी)

| | बाब | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **एकूण महसुली जमा (१ + २ + ३ + ४)** | **४८,४३८** | **६२,१९५** | **७९,५८३** | **८१,२७१** | **८६,९१०** | **१,०७,१५९** | **१,२१,५०४** |
| **(१)** | ***राज्याचा स्वत:चा कर महसूल (१ ते ९) -*** | **३३,५३९** | **४०,०९८** | **४७,५२८** | **५२,०३१** | **५९,१०६** | **७३,४९६** | **८३,६८६** |
| | (१) विक्रीकर | १९,६७७ | २४,१३१ | २६,७५३ | ३०,६८० | ३२,६७६ | ४०,८१५ | ४६,००० |
| | (२) मुद्रांक व नोंदणी शुल्क | ५,२६६ | ६,४१६ | ८,५५० | ८,२८८ | १०,७७४ | १४,१४० | १५,६७७ |
| | (३) राज्य उत्पादन शुल्क | २,८२४ | ३,३०१ | ३,९६३ | ४,४३४ | ५,०५७ | ५,८०० | ८,५०० |
| | (४) विजेवरील कर व शुल्क | १,६६१ | १,५७७ | २,६८८ | २,३९५ | ३,२८९ | ४,६८६ | ४,४०० |
| | (५) उत्पन्न व खर्च यावरील इतर कर | १,१५७ | १,२४६ | १,४८८ | १,५६१ | १,६१२ | १,६०८ | १,७०० |
| | (६) वाहनांवरील कर | १,३०९ | १,८४१ | २,१४३ | २,२२० | २,६८२ | ३,४७१ | ४,००० |
| | (७) विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क | ७१२ | ८७८ | १,०४३ | १,०१५ | १,३२५ | १,०४१ | १,०९९ |
| | (८) माल व उतारुवरील कर | ५०४ | २२४ | ३८८ | ८९२ | ९७७ | ७३९ | ८१३ |
| | (९) जमीन महसूल | ४२९ | ४८४ | ५१२ | ५४६ | ७१४ | १,१९६ | १,४९७ |
| **(२)** | ***कराव्यतिरिक्त महसूल (१ + २) -*** | **५,९३५** | **७,५१८** | **१६,९४८** | **९,७९०** | **८,३५३** | **८,९९३** | **९,७३१** |
| | (१) व्याजाच्या जमा रकमा | १,७३७ | २,५०४ | १,१७० | १,०१७ | १,३४२ | १,६२१ | १,१५६ |
| | (२) इतर करांव्यतिरिक्त महसूल | ४,१९८ | ५,०१४ | १५,७७८ | ८,७७३ | ७,०११ | ७,३७२ | ८,५७५ |
| **(३)** | ***केंद्रिय करांतील हिस्सा (१ ते ६) -*** | **४,९८३** | **६,०२४** | **७,५९८** | **८,०१८** | **८,२४८** | **११,४१९** | **१३,७१८** |
| | (१) निगम करांव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कर | ९६० | १,१४१ | १,६१८ | १,६५१ | १,८९१ | २,३५९ | २,७२६ |
| | (२) निगम कर | १,३७८ | १,८८१ | २,४११ | २,६२९ | ३,३९४ | ४,४६३ | ५,५४२ |
| | (३) संपत्ती कर | ३ | २ | ३ | २ | ८ | ९ | ११ |
| | (४) जकात | ९७१ | १,१७५ | १,४३६ | १,५३३ | १,१५४ | १,९९७ | २,३२३ |
| | (५) केंद्रिय उत्पादन शुल्क | १,३०९ | १,२४७ | १,३७१ | १,३३७ | ९३० | १,४५२ | १,७७१ |
| | (६) सेवा कर | ३६२ | ५७८ | ७५९ | ८६६ | ८७१ | १,१३९ | १,३४५ |
| **(४)** | ***केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने*** | **३,९८१** | **८,५५५** | **७,५०९** | **११,४३२** | **११,२०३** | **१३,२५१** | **१४,३६९** |
| **(ब)** | **एकूण भांडवली जमा (१ + २ + ३ + ४)** | **२४,१७६** | **१६,२९८** | **१,७१८** | **१९,०६५** | **३०,३८३** | **३१,५६०** | **३२,६७६** |
| **(१)** | ***सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (अ + ब) -*** | **२३,६५९** | **१४,५५७** | **१३,७६१** | **२१,६१२** | **२१,५६४** | **२५,५०७** | **२५,८७२** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण * | २३,१६९ | १४,०५९ | १३,४३२ | २१,२२७ | २०,८१२ | २४,६९८ | २४,००० |
| | (ब) केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा | ४९० | ४९८ | ३२९ | ३८५ | ७५२ | ८०९ | १,८७२ |
| **(२)** | ***राज्य शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (वसुली)*** | **५५१** | **५१** | **७३३** | **५६०** | **५१५** | **५७८** | **४७४** |
| **(३)** | ***इतर भांडवली जमा (निव्वळ)*** ‡ | **(-)१३४** | **१८३** | **०** | **७५** | **२४** | **०** | **०** |
| **(४)** | ***लोक लेखा (निव्वळ) (अ + ब + क + ड)*** | **१००** | **१,५०८** | **(-)१२,७७६** | **(-)३,१८२** | **८,२८०** | **५,४७५** | **६,३३०** |
| | (अ) अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इ. (निव्वळ) | ५८७ | ६४० | ६८५ | ८०४ | १,७९० | २,३४१ | २,३७२ |
| | (ब) राखीव निधी (निव्वळ) (१ + २) | १,०१९ | १,६४६ | (-)११,७१७ | १९० | (-)३५१ | ४०५ | ३११ |
| | (१) व्याजी | ३ | ७ | २४ | ४४ | ५१ | (-)५७ | (-)९ |
| | (२) बिनव्याजी | १,०१६ | १,६३९ | (-)११,७४१ | १४६ | (-)४०२ | ४६२ | ३२० |
| | (क) नागरी ठेवी (निव्वळ) (१ + २) | १,४२५ | १,७१४ | १,८७६ | १,२४० | ३,५०२ | २,६३२ | ४,१४८ |
| | (१) व्याजी | ५५४ | ५७० | ४६८ | ७६८ | १,८९९ | २,६१६ | ३,५०० |
| | (२) बिनव्याजी | ८७१ | १,१४४ | १,४०८ | ४७२ | १,६०३ | १६ | ६४८ |
| | (ड) इतर | (-) २,९३१ | (-)२,४९२ | (-)३,६२० | (-)५,४१६ | ३,३३९ | ९७ | (-)५०१ |
| | **एकूण जमा (अ + ब)** | **७२,६१४** | **७८,४९३** | **८१,३०१** | **१,००,३३६** | **१,१७,२९३** | **१,३८,७१९** | **१,५४,१८०** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

‡ यात 'आंतरराज्यीय तडजोड' (निव्वळ), 'आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन' (निव्वळ ) आणि 'आकस्मिकता निधी ' (निव्वळ) यांचा समावेश आहे.

* अर्थोपाय व आगाऊ रकमा धरुन सु.अं. - सुधारित अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज

## परिशिष्ट ५.३
## महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चातील कल

(₹ कोटी )

| | बाब | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **महसूली खर्च (१ + २)** | **५२,२८०** | **६१,३८५** | **६४,७८०** | **७५,६९४** | **९४,९१६** | **१,१२,८४७** | **१,२१,४४६** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब + क)** | **३०,५८३** | **३६,२७९** | **४०,९३४** | **४९,१०९** | **६२,८४५** | **७३,७०७** | **७७,४८८** |
| | **(अ) सामाजिक सेवा (१ ते ८)** | **१९,९१७** | **२३,५५९** | **२६,७७३** | **३१,०५२** | **४१,००५** | **५२,२८१** | **५६,५५२** |
| | (१) शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती | १०,७६२ | १२,३१६ | १३,६४२ | १६,४४७ | २२,२०८ | २७,९९४ | ३०,९४० |
| | (२) आरोग्य व कुटुंब कल्याण | २,१२४ | २,२५४ | २,६९५ | ३,१०५ | ३,६९६ | ४,७०५ | ४,८६४ |
| | (३) पाणीपुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगरविकास | २,३०२ | ३,५६५ | ५,०४४ | ४,४६० | ६,९३९ | ७,८३७ | ९,२२४ |
| | (४) माहिती व ध्वनी प्रसारण | २२ | २४ | २७ | ३१ | ४० | ४९ | ४९ |
| | (५) अ.जा., अ.ज. व इ.मा.व. यांचे कल्याण | १,६५३ | १,९०४ | २,३९२ | ३,२०० | ४,१४५ | ५,०१६ | ५,५४७ |
| | (६) कामगार व कामगार कल्याण | २७३ | ३१९ | ४०२ | ५२८ | ५९९ | ६९३ | ७१८ |
| | (७) समाज कल्याण व पोषण आहार | २,७४९ | ३,१३२ | २,५२७ | ३,२३७ | ३,३२५ | ५,९१२ | ५,१३१ |
| | (८) इतर | ३२ | ४५ | ४४ | ४४ | ५३ | ७५ | ७९ |
| | **(ब) आर्थिक सेवा (१ ते ९)** | **९,३१५** | **११,७०३** | **१३,२३७** | **१६,८१३** | **२०,३७२** | **२०,४९५** | **२०,०८३** |
| | (१) कृषि व संलग्न सेवा | २,७३२ | ३,३६३ | ३,४६८ | ६,४०३ | ६,४६० | ६,०७२ | ५,८५३ |
| | (२) ग्राम विकास | २,०१९ | २,५८९ | १,०६० | १,९८० | २,४९३ | २,४८२ | २,७९९ |
| | (३) विशेष क्षेत्र कार्यक्रम | २१ | ३३ | ३३ | ३१ | २८ | ६२ | ४० |
| | (४) पाटबंधारे व पूर नियंत्रण | १,३१८ | १,५१४ | १,६४८ | १,९३९ | २,३४० | २,४०२ | २,५६२ |
| | (५) ऊर्जा | १,९९३ | २,६०१ | ३,४११ | २,८०८ | ४,१३८ | ३,७१४ | ३,४०७ |
| | (६) उद्योग व खनिजे | ४५८ | ५६६ | १,०४३ | ६८२ | ९९८ | ९७४ | ६८४ |
| | (७) वाहतूक आणि दळणवळण | ५५४ | ६९७ | २,२५४ | २,६९१ | ३,२२७ | ३,६७३ | ३,३६४ |
| | (८) विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | १३ | २५ | २६ | ४२ | ७२ | ६७ | ७४ |
| | (९) सर्वसाधारण आर्थिक सेवा | २०७ | ३१५ | २९४ | २३७ | ६१६ | १,०४९ | १,३०० |
| | **(क) स्थानिक संस्था आणि पंचायत राज्य संस्था यांना सहायक अनुदाने व अंशदाने** | **१,३५१** | **१,०१७** | **९२४** | **१,२४४** | **१,४६८** | **९३१** | **८५३** |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब)** | **२१,६९७** | **२५,१०६** | **२३,८४६** | **२६,५८५** | **३२,०७१** | **३९,१४०** | **४३,९५८** |
| | **(अ) सर्वसाधारण सेवा (१ ते ५)** | **११,९४१** | **१२,९२५** | **११,०८१** | **१३,६८६** | **१७,१२९** | **२२,६७४** | **२५,४१०** |
| | (१) राज्यांची अंगे | ४३४ | ४६६ | ५४१ | ६४१ | १,१४९ | १,२७९ | १,२६८ |
| | (२) करवसुली खर्च | ७६१ | ४०५ | ७४३ | १,१९४ | १,४८६ | १,३३३ | १,४८२ |
| | (३) प्रशासकीय सेवा | ४,२०८ | ४,८२४ | ५,५०३ | ६,५६० | ८,१७३ | १०,७९३ | १२,५६१ |
| | (४) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ४,१०४ | ४,३६४ | ४,२१५ | ५,१९९ | ६,२२९ | ९,१७७ | १०,००७ |
| | (५) राखीव निधीकडे हस्तांतरण | २,४३४ | २,८६६ | ७९ | ९२ | ९२ | ९२ | ९२ |
| | **(ब) ऋण सेवा** | **९,७५६** | **१२,१८१** | **१२,७६५** | **१२,८९९** | **१४,९४२** | **१६,४६६** | **१८,५४८** |
| **(ब)** | **भांडवली खर्च (१ + २)** | **२०,०८२** | **१७,१२१** | **१७,४१४** | **२४,२७८** | **२२,८६५** | **२५,७०६** | **३२,६७९** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब)** | **१४,३४०** | **१२,४१४** | **१२,७१५** | **२०,१५४** | **१८,६९०** | **१९,९३२** | **२३,३३८** |
| | (अ) महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च | १०,०७८ | १०,०९२ | ११,४९० | १८,८७३ | १७,४२९ | १८,८२३ | २२,४३९ |
| | (ब) राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा | ४,२६२ | २,३२२ | १,२२५ | १,२८१ | १,२६१ | १,१०९ | ८९९ |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब + क) (सरकारी ऋणाची परतफेड)** | **५,७४२** | **४,७०७** | **४,६९९** | **४,१२४** | **४,१७५** | **५,७७४** | **९,३४१** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | ५,२१६ | ४,३०४ | ४,२८६ | ३,७०४ | ३,३९८ | ५,२९२ | ८,८२७ |
| | (ब) केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा | ५२६ | ४०३ | ४१३ | ४२० | ४२७ | ४८२ | ५१४ |
| | (क) आकस्मिकता निधीकडे विनियोजन | ० | ० | ० | ० | ३५० | ० | ० |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **७२,३६२** | **७८,५०६** | **८२,१९४** | **९९,९७२** | **१,१७,७८१** | **१,३८,५५३** | **१,५४,१२५** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

सु.अं. - सुधारित अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज

# परिशिष्ट ५.४
## महाराष्ट्र राज्यातील कृषि क्षेत्रावरील करांपासून महसुली जमा

(₹ लाख)

| अ. क्र. | तपशील | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | कृषि उत्पन्नावरील कर | ० | ० | ५ | ० | ० | ० | ० |
| २ | जमीन महसूल / कर - सर्वसाधारण वसुली | १५,८३६ | १८,९९४ | २०,५२८ | २२,७५५ | ३१,८७७ | २७,८४० | २५,०३४ |
| ३ | महाराष्ट्र कर (सुधारणा) अधिनियम, १९७५ अन्वये फेरबदल केलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४ च्या कलम ३ नुसार जमीन महसुलातील वाढ | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४ | रोजगार हमी योजनेकरिता जमीन महसुलातील वाढ | ३५४ | ३७२ | ७५८ | ९७५ | १,६८० | १,७५९ | १,७५९ |
| ५ | जमिनीवरील पट्टी व उपकर | ४,६६८ | ६,०३२ | ७,४५० | ७,७३२ | ८,५४३ | ८,४९१ | ६५,४८८ |
| ६ | ऊस खरेदीवरील कर | ५,६५१ | ३,९८९ | ३४६ | ११,५०३ | १२,२९७ | ३,९३१ | ४,४३९ |
| ७ | ऊस (विनियमन, पुरवठा आणि खरेदी, नियंत्रण) अधिनियमाखालील जमा रकमा | ० | ० | १ | ८१ | २३६ | ० | ० |
| ८ | शिक्षण उपकर अधिनियम - | | | | | | | |
| | (अ) वाणिज्यिक पिकांखालील शेत जमिनीवरील विशेष आकारणी | ९८३ | १,४५३ | ४६७ | ७२१ | १,१३० | १,४७० | १,४७० |
| | (ब) जलसिंचित कृषि जमिनीवरील रोजगार हमी उपकर | २२९ | १९१ | १८५ | १६९ | २४७ | २७५ | २०१ |
| | (क) महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी अधिनियम, १९७४ खालील विशेष आकारणीत वाढ | १२८ | १४ | ११ | १३९ | ३८ | १४ | १४ |
| | **एकूण** | **२७,८४९** | **३१,०४६** | **२९,७५२** | **४४,०७५** | **५६,०४८** | **४३,७८०** | **९८,४०५** |

*आधार -* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

सु.अं. - सुधारित अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज

# परिशिष्ट ५.५
## वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे

(₹ कोटी )

| | बाब | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) | २०११-१२ (अ.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(एक)** | **ऋण प्राप्ती (१ + २ + ३) (व्याजी)** | **१९,०६१** | **११,०६७** | **१०,२३९** | **१९,१०४** | **२१,४७९** | **२४,६३३** | **२२,३९३** |
| | १) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण (निव्वळ) | १७,९५२ | ९,७५५ | ९,१४६ | १७,५२३ | १७,४१४ | १९,४०७ | १५,१७३ |
| | २) केंद्र शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (निव्वळ) | (-)३५ | ९५ | (-)८३ | (-)३५ | ३२५ | ३२६ | १,३५८ |
| | ३) व्याजी गटबंधने (अ + ब + क) | १,१४४ | १,२१७ | १,१७६ | १,६१६ | ३,७४० | ४,९०० | ५,८६२ |
| | अ) भविष्य निर्वाह निधी (निव्वळ) | ५८७ | ६४० | ६८४ | ८०४ | १,७९० | २,३४१ | २,३७२ |
| | ब) राखीव निधी (निव्वळ) | ३ | ७ | २४ | ४४ | ५१ | (-) ५७ | (-)९ |
| | क) नागरी ठेवी (निव्वळ) | ५५४ | ५७० | ४६८ | ७६८ | १,८९९ | २,६१६ | ३,४९९ |
| **(दोन)** | **ऋण प्राप्ती (१ + २) (बिनव्याजी)** | **(-)१,१७८** | **४७३** | **(-)१३,९५६** | **(-)४,७४१** | **४,५३९** | ५७५ | **४६७** |
| | १) लोकलेख्यातील निव्वळ जमा @ | (-)१,०४४ | २९० | (-)१३,९५२ | (-)४,७९८ | ४,५४० | ५७५ | ४६७ |
| | २) इतर भांडवली जमा (निव्वळ) # | (-)१३४ | १८३ | (-)४ | ५७ | (-) १ | ० | ० |
| | **एकूण कर्जे व इतर दायित्वे (एक + दोन)** | **१७,८८३** | **११,५४०** | **(-)३,७१७** | **१४,३६३** | **२६,०१८** | **२५,२०८** | **२२,८६०** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

@ लोकलेख्याच्या निव्वळ प्राप्तीमध्ये राखीव निधी, ठेवी, निलंबन व संकीर्ण आणि वित्त प्रेषणे लेखा यांचा अंतर्भाव आहे.

# यामध्ये आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

सु.अं. - सुधारित अंदाज अ.अं. - अर्थसंकल्पीय अंदाज

# परिशिष्ट ५.६
# शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च

(₹ कोटी )

| खर्च | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (सु.अं.) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **अ. उपभोग्य बाबींवरील खर्च** | | | | | | |
| १ कर्मचाऱ्यांची भरपाई (१.१ +१.२) | ९,४०६ | ११,००५ | १३,२०८ | १४,७७१ | १८,३२२ | २४,३०८ |
| १.१ वेतन आणि मजूरी | ६,६३५ | ७,९३३ | ९,५३३ | १०,२४४ | १२,९१५ | १६,१९० |
| १.२ निवृत्तीवेतन | २,७७१ | ३,०७२ | ३,६७५ | ४,५२७ | ५,४०७ | ८,११८ |
| २ वस्तू आणि सेवांची निव्वळ खरेदी (२.१ + २.२ -२.३) | २,५८७ | ४,५७१ | ७,०७७ | ७,६०७ | ९,९९२ | ११,८८० |
| २.१ खरेदी | २,६२६ | ५,१२१ | ६,२१५ | ६,११७ | ८,६१४ | १०,०९९ |
| २.२ देखभाल | १,१७१ | १,६८२ | २,२०७ | २,५४५ | २,९३८ | ३,७२५ |
| २.३ वजा विक्री | १,२१० | २,२३२ | १,३४५ | १,०५५ | १,५६० | १,९४४ |
| **एकूण उपभोग्य बाबींवरील खर्च** | **११,९९३** | **१५,५७६** | **२०,२८५** | **२२,३७८** | **२८,३१४** | **३६,१८८** |
| **ब. भांडवल निर्मितीवरील खर्च** | | | | | | |
| १. इमारती | ६७३ | १,२१७ | १,१०३ | १,२६९ | १,१३९ | १,६७५ |
| २. रस्ते व पूल | ५३९ | ९७८ | ९७९ | १,७२३ | २,९७४ | २,३६८ |
| ३. इतर भांडवली खर्च | १,३३१ | २,०१२ | १,९९२ | २,२७० | २,४४८ | २,२८७ |
| ४. दळणवळणाची साधने | ३३ | ४५ | ५८ | ८२ | ६३ | १५१ |
| ५. यंत्रसामग्री आणि साधनसामग्री | २३७ | ३४० | ४२८ | ६५० | ७०४ | ६४८ |
| ६. लागवडीखालील मत्ता | ० | ५३ | ८२ | ४४ | ८६ | ४१ |
| ७. पशुधन | ३६ | १ | २ | ० | ० | ० |
| **८. एकूण भांडवल निर्मितीवरील खर्च (१ ते ७)** | **२,८४९** | **४,६४६** | **४,६४४** | **६,०३८** | **७,४१४** | **७,१७०** |
| ९. साठ्यातील बदल | (-) ७ | ३५ | ० | १ | (-) ७ | १ |
| **१०. स्थूल भांडवल निर्मितीवरील खर्च (८+९)** | **२,८४२** | **४,६८१** | **४,६४४** | **६,०३९** | **७,४०७** | **७,१७१** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

सु.अं. - सुधारित अंदाज

# ६

# संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार



# ६. संस्थाद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार

६.१ आर्थिक विकासामध्ये वित्तीय संस्था फारच महत्त्वाची भूमिका बजावत असतात. वित्तीय संस्थांचे उत्तम जाळे सातत्यपूर्ण आर्थिक विकासास सूकर करते. ह्या संस्था समाजातील सर्वच घटकांच्या कर्जविषयक गरज भागवतात. तसेच त्या पायाभूत प्रकल्पांनासुद्धा किफायतशीर दरात कर्ज उपलब्ध करून देतात. ह्या संस्था अतिरिक्त निधीची योग्यरित्या उलाढाल करून चांगले लाभ मिळतील या हेतूने उत्पादकतेसाठी भांडवल निर्मिती करण्यासाठी सहाय्यभूत ठरतात.

६.२ भारतात बँकीग संस्था मुख्य वित्तीय संस्था आहेत. बँकींग संस्थांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँका ह्या महत्त्वाच्या घटक असून त्या ग्रामीण भागात पतपुरवठा करण्यात सक्रियपणे गुंतलेल्या आहेत. बिगर बँकींग वित्तीय संस्था या हप्त्या हप्त्याने खरेदी, लीज फायनान्सवर साधन सामग्री व गुंतवणूक या सारख्या कार्यांमध्ये सक्रीय आहेत. नाविन्यपूर्ण क्लुप्त्या आखून या संस्थांनी गुंतवणूकदारांमध्ये मोठा विश्वास संपादित केला आहे. तसेच सार्वजनिक गुंतवणूक वाढविली आहे आणि मोठ्या संसाधनांना चालना दिली आहे.

## अनुसूचित वाणिज्यिक बँका

६.३ भारतातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमध्ये भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका, राष्ट्रीयीकृत बँका, विदेशी बँका, खाजगी क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांचा समावेश आहे. जून, २०११ च्या अखेरच्या शुक्रवारी, राज्यात ८,५१५ बँक कार्यालये होती. त्यापैकी, जवळपास २६ टक्के ग्रामीण भागाकरिता आणि ५४ टक्के नागरी भागाकरिता होती. ग्रामीण भागातील बँकांमध्ये एकूण ठेवी व कर्जाच्या प्रमाणात वाढ जास्त होती. एकूण ठेवी व कर्जामध्ये नागरी भागातील ठेवी व कर्जाचे प्रमाण जवळपास प्रत्येकी ९५ टक्के इतके होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जाबाबतचा तपशिल तक्ता ६.१ मध्ये दिला आहे, तर विस्तृत शृखंला परिशिष्ट ६.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज**

(जूनच्या अखेरच्या शुक्रवारी)

| विवरण | २०१० | | | | २०११ | | | | २०११ च्या एकूणचा २०१० च्या एकूणशी शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | |
| बँक कार्यालयांची संख्या | २,१७० | १,५४८ | ४,३१९ | ८,०३७ | २,२३१ | १,६७१ | ४,६१३ | ८,५१५ | ५.९ |
| ठेवी (₹ कोटी) | २३,५५५ | ४०,५२६ | ११,०३,४२३ | ११,६७,५०४ | २९,२३१ | ४९,१७४ | १३,२५,५५० | १४,०३,९५५ | २०.३ |
| कर्ज (₹ कोटी) | १७,४३७ | २१,८७८ | ९,५३,७९९ | ९,९३,११४ | २२,७०३ | २७,६०४ | ११,२५,७८० | ११,७६.०८७ | १८.४ |
| कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) | ७४.० | ५४.० | ८६.४ | ८५.१ | ७७.७ | ५६.१ | ८४.९ | ८३.८ | - |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.४ जून, २०११ च्या अखेरच्या शुक्रवारी भारतातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण कार्यालयांपैकी एक-दशांश बँक कार्यालये राज्यात कार्यरत होती. भारताातील या बँकाच्या एकूण ठेवी व कर्ज यामध्ये राज्याचे स्थान अग्रस्थानी अबाधित राहिले असून त्यांचा हिस्सा अनुक्रमे २६.१ टक्के व २९.१ टक्के, इतका होता. राज्यातील कर्जाचे ठेवीशी असलेले प्रमाण ८३.८ टक्के होते, तर भारताकरिता हेच प्रमाण ७५.२ टक्के होते. महत्त्वाच्या राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्जाचा तपशिल तक्ता ६.२ मध्ये दिला आहे.

**आलेख ६.१ : अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्ज**

(जून महिन्याच्या अखेरच्या शुक्रवारी)



**तक्ता ६.२ महत्त्वाच्या राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज**

(जूनच्या अखेरच्या शुक्रवारी)

| राज्य | २०१० | | | | २०११ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ कोटी) | कर्ज (₹ कोटी) | कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ कोटी) | कर्ज (₹ कोटी) | कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) |
| आंध्र प्रदेश | ७,०४० | २,४६,३२४ | २,६३,४०७ | १०६.९ | ७,४६५ | २,८८,९९१ | ३,२७,७७५ | ११३.४ |
| बिहार | ४,०५३ | १,०१,३६९ | २८,८२२ | २८.४ | ४,२४३ | १,१६,८९८ | ३३,६२८ | २८.८ |
| गुजरात | ४,६२१ | २,१७,६४४ | १,३७,६०५ | ६३.२ | ४,९४८ | २,६१,७६८ | १,७१,६६४ | ६५.६ |
| कर्नाटक | ६,०८७ | २,९२,८२४ | २,२२,४८५ | ७६.० | ६,३७८ | ३,४९,६७३ | २,५१,४४३ | ७१.९ |
| केरळ | ४,२८६ | १,५०,६११ | ९६,४२४ | ६४.० | ४,५५५ | १,७२,३१९ | १,२३,८९२ | ७१.९ |
| मध्यप्रदेश | ४,१६४ | १,२२,१७८ | ७२,९२९ | ५९.७ | ४,३७४ | १,४०,५७२ | ८६,०८५ | ६१.२ |
| **महाराष्ट्र** | **८,०३७** | **११,६७,५०४** | **९,९३,११४** | **८५.१** | **८,५१५** | **१४,०३,९५५** | **११,७६,०८७** | **८३.८** |
| पंजाब | ३,५०६ | १,३३,९४२ | ९४,६९६ | ७०.७ | ३,८५२ | १,५४,९३७ | १,१४,५८९ | ७४.० |
| राजस्थान | ४,११६ | १,०८,९८८ | ९४,४६० | ८६.७ | ४,४१४ | १,२८,१३८ | १,१६,२९७ | ९०.८ |
| तामिळनाडू | ६,२६८ | २,८२,५३५ | ३,२२,९८९ | ११४.३ | ६,६४५ | ३,३४,१६७ | ३,९४,३५८ | ११८.० |
| पश्चिम बंगाल | ५,३२० | २,७३,४६६ | १,६३,७५४ | ५९.९ | ५,५४२ | ३,३७,३८८ | १,९६,११३ | ५८.१ |
| **भारत** | **८४,९८६** | **४५,४०,१३०** | **३३,५६,७५७** | **७३.९** | **९०,१४७** | **५३,७०,६६९** | **४०,३८,३१०** | **७५.२** |

*आधार* : भारतीय रिझर्व्ह बँक

६.५ जून, २०११ च्या अखेरच्या शुक्रवारी, राज्यातील एकूण ठेवी व त्यांनी वितरीत केलेल्या स्थूल कर्जामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांचा (भारतीय स्टेट बँक आणि तिच्या संलग्न बँका वगळून) हिस्सा जवळपास ५० टक्क्यांहून अधिक होता. भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका यांचे कर्जाचे ठेवींशी असलेले प्रमाण सार्वत्रिक (११०.२ टक्के) असले तरी राष्ट्रीयीकृत बँकांच्या एकूण ठेवीमधील वाढ सर्वाधिक होती. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे दरडोई ठेवी व दरडोई कर्ज अनुक्रमे ₹ १,२४,०४८ व ₹ १,०३,९११ इतके होते. भारतासाठी तत्सम आकडेवारी ₹ ४४,६०६ व ₹ ३३,५४० इतकी होती. बँक गट निहाय अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज यांचा तपशिल तक्ता ६.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.३ बँक गटनिहाय अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज**

(जूनच्या अखेरच्या शुक्रवारी)

| बँक गट | २०१० | | | | २०११ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ कोटी) | कर्ज (₹ कोटी) | कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ कोटी) | कर्ज (₹ कोटी) | कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) |
| भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | १,४०३ | १,६०,११८ | १,७१,८९४ | १०७.४ | १,४४९ | १,७७,३७३ | १,९५,५३१ | ११०.२ |
| राष्ट्रीयीकृत बँका | ४,७२४ | ५,९३,४८४ | ५,१०,६९२ | ८६.० | ४,९६४ | ७,४८,३५६ | ६,०९,९९४ | ८१.५ |
| विदेशी बँका | ८२ | १,२६,३८७ | ७३,८०० | ५८.४ | ८५ | १,३३,७३२ | ८२,२९३ | ६१.५ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ५८३ | ३,८५९ | २,०६५ | ५३.५ | ५८७ | ४,४०४ | २,६३२ | ५९.८ |
| इतर अनुसूचित वाणिज्यिक बँका@ | १,२४५ | २,८३,६५६ | २,३४,६६१ | ८२.७ | १,४३० | ३,४०,०९१ | २,८५,६३७ | ८४.० |
| **एकूण** | **८,०३७** | **११,६७,५०४** | **९,९३,११२** | **८५.१** | **८,५१५** | **१४,०३,९५६** | **११,७६,०८७** | **८३.८** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

@ जून, २०११ करिता खाजगी क्षेत्रातील बँकांचा गट समजण्यात यावा

**आलेख ६.२: अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जाचा हिस्सा**

(जून, २०११ च्या अखेरच्या शुक्रवारी )




६.६ जरी २०१० मध्ये मुदत ठेव व चालू खात्यांची संख्या घटली असली तरी गतवर्षीच्या तुलनेत चालू आणि मुदत खात्यातील ठेवींमध्ये अनुक्रमे ३१.१ टक्के व १८.९ टक्के वाढ झाल्याचे दिसून येते. खात्यांच्या प्रकारानुसार अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवींचा तपशिल तक्ता ६.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.४ खात्यांच्या प्रकारानुसार अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी**

(३१ मार्च रोजी)

| खात्याचा प्रकार | २००९ | | २०१० | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या ('०००) | ठेवी (₹ कोटी) | खात्यांची संख्या ('०००) | ठेवी (₹ कोटी) |
| चालू | ३,२४९ | १,४०,४०८ | ३,१०९ | १,८४,०२५ |
| बचत | ४७,९८६ | १,३८,५८१ | ५१,३०० | १,६३,१४६ |
| मुदत ठेवी | १८,१३२ | ७,१९,०४० | १६,७८९ | ८,५४,८२० |
| **एकूण** | **६९,३६७** | **९,९८,०२९** | **७१,१९८** | **१२,०१,९९१** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.७ अनुसूचित वाणिज्यिक बँकानी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या एकूण कर्जापैकी, लघुउद्योग क्षेत्राचा हिस्सा ४२.४ टक्के इतका असून त्याखालोखाल गृहनिर्माण क्षेत्राचा हिस्सा २७.२ टक्के इतका होता. मार्च २०११, च्या अखेरच्या शुक्रवारी, सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या कर्जाबाबतचा तपशिल तक्ता ६.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.५ अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेली कर्ज**

(मार्चच्या अखेरच्या शुक्रवारी)

| प्राधान्य क्षेत्र | २००९ | | २०१० | | २०११* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या ('०००) | येणे कर्ज (₹ कोटी) | खात्यांची संख्या ('०००) | येणे कर्ज (₹ कोटी) | खात्यांची संख्या ('०००) | येणे कर्ज (₹ कोटी) |
| कृषि व संलग्न कार्ये | २,५६० | ४३,३०८ | २,८५७ | ५०,४७७ | २,५८७ | ५४,५७७ |
| लघु उद्योग | ४९८ | ६१,४५६ | ७७८ | ७१,५५६ | ९६३ | १,०९,४२७ |
| गृहनिर्माण | ७२७ | ५८,११७ | ७१५ | ५६,४२८ | ७३८ | ७०,१६२ |
| स्व-सहाय्यता गट $ | १११ | १,७०४ | १४५ | ७६५ | १७६ | ९९३ |
| इतर प्राधान्य क्षेत्रे # | ३७९ | ६,६३७ | १२९ | २,९७४ | १४४ | ३,५५१ |
| निर्यात कर्ज @ | १ | १४,१८० | १ | १५,२७३ | १ | १९,३९६ |
| **एकूण** | **४,२७६** | **१,८५,४०२** | **४,६२६** | **१,९७,४७३** | **४,६०९** | **२,५८,१०६** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक * अस्थायी @ केवळ विदेशी बँकानाच लागू (लघुउद्योगाव्यतिरिक्त)

$ सूक्ष्म कर्ज (स्व-सहायता गट/सह दायित्व गट यांची कृषि व संलग्न कार्येकरिता कर्ज वगळून)

# किरकोळ व्यापार , शिक्षण, इत्यादी मिळून

६.८ एकूण वितरीत केलेल्या कर्जापैकी, भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका मिळून सर्व राष्ट्रीयीकृत बँकांचा एकूण येणे कर्जामध्ये हिस्सा ७४.३ टक्के होता. २०१० मध्ये वस्तूनिर्माण क्षेत्राकडील येणे कर्ज सर्वाधिक म्हणजे ३०.८ टक्के होते. तथापि, याच कालावधीत वैयक्तिक कर्जाच्या येणे कर्जात १३ टक्क्यांनी घट झाली. अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे येणे कर्ज तक्ता ६.६ मध्ये तर राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांचा क्षेत्रनिहाय येणे कर्जाचा तपशिल तक्ता ६.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.६ अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे येणे कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| बँक गट | येणे कर्ज (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|
| | २००८ | २००९ | २०१० |
| भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | १,०२,९९९ | १,४९,५१६ | १,७१,८४९ |
| राष्ट्रीयीकृत बँका | ३,३६,२७२ | ४,१७,०८५ | ५,०५,१२५ |
| विदेशी बँका | ५६,४२७ | ५८,०४३ | ६१,४२३ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | १,५५७ | १,६५४ | १,९९१ |
| इतर अनुसूचित वाणिज्यिक बँका | १,३३,६५३ | १,५९,२२१ | १,७०,७८४ |
| **एकूण** | **६,३०,९०९** | **७,८५,५१९** | **९,११,१७२** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

**तक्ता ६.७ अनुसूचित वाणिज्यिक बँकांची क्षेत्रनिहाय येणे कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| क्षेत्र | येणे कर्ज (₹ कोटी) | | | २००९ च्या तुलनेत २०१० शी शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २००८ | २००९ | २०१० | |
| कृषि व संलग्न कार्ये | २६,५२० | २७,६६५ | ३५,३४३ | २७.८ |
| खाण व दगड खाणकाम | ७,९३३ | ७,५४४ | १२,७३५ | ६८.८ |
| वस्तूनिर्माण | १,९८,०९१ | २,४७,८७० | २,८०,३२५ | १३.१ |
| वीज, वायू व पाणीपुरवठा | १७,०५६ | १९,००१ | २५,०२८ | ३१.७ |
| बांधकाम | ५५,९८४ | ७३,८७० | ९५,४०१ | २९.१ |
| परिवहन | २०,६७५ | २८,१८७ | ४२,५७८ | ५१.१ |
| व्यावसायिक व इतर सेवा | ५७,०९७ | ८२,६११ | ९६,९५३ | १७.४ |
| व्यापार | ४९,७१६ | ७४,६१४ | ७५,६५१ | १.४ |
| वैयक्तिक कर्जे | ८३,४०६ | १,१०,७३३ | ९६,३०४ | (-)१३.० |
| इतर | १,१४,४३१ | १,१३,४२४ | १,५०,८५४ | ३३.० |
| **एकूण** | **६,३०,९०९** | **७,८५,५१९** | **९,११,१७२** | १६.० |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

## वार्षिक कर्ज योजना

६.९ ग्रामीण भागातील आर्थिक विकासासाठी ग्रामस्तरावर बँक कर्ज सुविधा उपलब्ध होणे ही महत्त्वाची निविष्टी आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने याकरिता 'सेवा क्षेत्र दृष्टीकोन' (Service Area Approch) ही संकल्पना अंगिकारली असून यात जिल्हा हा सेवा क्षेत्राचा घटक म्हणून मानला आहे. या दृष्टीकोनानुसार शासकीय कार्यालये, बँका व इतर संबंधितांशी समन्वय साधण्यासाठी तसेच जिल्हा वार्षिक कर्ज योजनेच्या नियोजन व आखणीसाठी प्रत्येक जिल्ह्याकरिता एक अग्रणी बँक निवडण्यात आली आहे. राज्यातील कर्ज योजनेच्या संनियंत्रनासाठी बँक ऑफ महाराष्ट्र ही नियंत्रक बँक म्हणून कार्यरत आहे. २०११-१२ च्या वार्षिक कर्ज योजनेच्या आकारमानात जवळपास २६ टक्के इतकी वाढ झाली आहे. वार्षिक कर्ज योजनेमध्ये कृषि व संलग्न कार्य क्षेत्राचा हिस्सा सर्वाधिक (६१.२ टक्के) असून ग्रामीण कारागीर, ग्राम व कुटीर उद्योग आणि लघू उद्योग क्षेत्राचा हिस्सा १२ टक्के इतका आहे. वार्षिक कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वितरणाची लक्ष्ये व साध्ये तक्ता ६.८ मध्ये दिली आहे व विस्तृत जिल्हानिहाय तपशिल परिशिष्ट ६.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.८ वार्षिक कर्जपुरवठा योजनेअंतर्गत राज्यात केलेले कर्जवाटप**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २००९-१० | | | २०१०-११ | | | २०११-१२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाखात) | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाखात) | लक्ष्य | साध्य + | लाभधारक + (लाखात) |
| कृषि व संलग्न कार्ये | २८,६४८ | १५,२१३ (५३) | १४.३० | २६,९१७ | १८,५०५ (६९) | १७.३९ | ३३,४२४ | १६,९२० (५१) | १५.९० |
| ग्रामीण कारागीर, ग्राम व कुटीर उद्योग आणि लघु उद्योग | २,७५८ | ३,३०४ (१२०) | ०.२६ | ५,०६७ | ५,२४७ (१०४) | ०.४१ | ६,४०२ | २,६६५ (४२) | ०.२१ |
| इतर क्षेत्रे | ७,९४४ | ८,३०१ (१०४) | १०.३४ | ११,४१८ | १२,६४६ (१११) | १५.७५ | १४,८३२ | ५,४९८ (३७) | ६.८५ |
| **एकूण** | **३९,३५०** | **२६,८१८ (६८)** | **२४.९०** | **४३,४०२** | **३६,३९८ (८४)** | **३३.५५** | **५४,६५८** | **२५,०८३ (४१)** | **२२.९६** |

*आधार* : बँक ऑफ महाराष्ट्र, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे नियंत्रक + सप्टेंबर २०११ अखेर
टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात

## सूक्ष्म पतपुरवठा

६.१० सूक्ष्म पतपुरवठा म्हणजे अल्पबचत, कर्ज पुरवठा व विमा या सेवा समाजातील सामाजिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्लक्षित घटकापर्यंत पोहचविणे हे आहे. सूक्ष्म पतपुरवठा म्हणजे गरीबांना त्यांच्या उत्पन्नाचा स्तर वाढविण्यासाठी आणि पर्यायाने राहणीमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी उपलब्ध करून दिलेले काटकसरीचे पर्याय, पतपुरवठा व इतर वित्तीय सेवा आणि अत्यल्प दराची उत्पादने उपलब्ध करून देणे होय. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी पतसंस्था या सूक्ष्म पतपुरवठा करण्याऱ्या प्रमुख वित्तीय संस्था आहेत. याशिवाय, सूक्ष्म पतपुरवठा करणाऱ्या इतरही पर्यायी संस्था आहेत जशा स्व-सहायता गट, राष्ट्रीयीकृत बँकांशी जोडलेले स्व-सहायता गट, इत्यादी. नाबार्डने गरीब जनतेस सुरळीत व सुलभ बँकीग सुविधांचा लाभ व्हावा यासाठी स्व-सहायता बचत गट-बँक दुवा कार्यक्रम सुरू केला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व सहकारी बँका याना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचे निर्देश दिले आहेत. २०१० च्या तुलनेत २०११ मध्ये एकूण स्व-सहायता गटांची संख्या १.४ टक्क्यांनी घटली आहे. एकूण स्व-सहायता गटांमध्ये, ६७.४ टक्के महिला स्व-सहायता गट असून एकूण ठेवींमध्ये त्याचा हिस्सा ५९.६ टक्के इतका होता. स्व-सहायता गटांच्या ठेवी व कर्जाचा तपशिल तक्ता ६.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.९ स्व-सहायता गटांच्या ठेवी, कर्जवाटप व थकीत कर्ज (३१ मार्च, २०११ रोजी)**

(₹ कोटी)

| बाब | बँक प्रकार | एकूण स्व-सहाय्यता गट | | एकूण पैकी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना व इतर पुरस्कृत योजनांतर्गत स्व-सहाय्यता गट | | फक्त महिलांचे स्व-सहाय्यता गट | |
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| **ठेवी** | **एकूण** | **७,६०,१६१** | **६४७.७९** | **२,५१,४३९** | **९१.९१** | **५,१२,४६२** | **३८५.८१** |
| | सहकारी | २,८७,२१७ | ३०२.५६ | ४१,१४४ | २६.७८ | २,०२,५४४ | ९६.८७ |
| | प्रादेशिक ग्रामीण | ५२,६८५ | ३३.५१ | १,०८,२६४ | १.१९ | ४५,७८६ | २५.५३ |
| | खाजगी वाणिज्यिक | ३,०६१ | ०.९३ | १४३ | ०.०६ | २,८५३ | ०.८६ |
| | सार्वजनिक वाणिज्यिक | ४,१७,१९८ | ३१०.७९ | १,०१,८८८ | ६३.८८ | २,६१,२७९ | २६२.५५ |
| **कर्जवाटप @** | **एकूण** | **४४,२७५** | **२८६.२३** | **५,६४१** | **६९.०२** | **३५,४१०** | **२२७.९८** |
| | सहकारी | २८,३९८ | १५८.३१ | ४,३१७ | ५२.६७ | २०,७९८ | ११०.९३ |
| | प्रादेशिक ग्रामीण | १३,०९८ | ११२.४५ | ८३६ | १३.५६ | ११,९८८ | १०२.४३ |
| | खाजगी वाणिज्यिक | ३७९ | ३.३९ | ९१ | ०.७५ | ३७२ | ३.३५ |
| | सार्वजनिक वाणिज्यिक | २,४०० | १२.०८ | ३९७ | २.०४ | २,२५२ | ११.२७ |
| **थकीत कर्ज** | **एकूण** | **२,३२,८३५** | **१,०४४.८२** | **६६,८७४** | **३८३.८४** | **१,८९,७४०** | **८३४.६३** |
| | सहकारी | ५७,८६४ | १७०.९४ | १३,६५४ | ८१.८६ | ३६,०३१ | १०८.६६ |
| | प्रादेशिक ग्रामीण | ३२,२०० | १६२.४७ | ७,१९७ | २९.०४ | २९,१७६ | १४७.३७ |
| | खाजगी वाणिज्यिक | २,७८० | १४.४५ | ५४ | ०.५८ | २,७४० | १४.३७ |
| | सार्वजनिक वाणिज्यिक | १,३९,९९१ | ६९६.९६ | ४५,९६९ | २७२.३६ | १,२१,७९३ | ५६४.२३ |

*आधार :नाबार्ड* @ वर्ष २०१०-११ मधील

## वित्तीय समावेश

६.११ भारतातील बँकीग सेवांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. तथापि, समाजातील विशेषतः कमकुवत व लाभापासून वंचित असलेले घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील जनता, बँकांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या बऱ्याच संधी व सेवांपासून वंचित राहिले आहेत. जनगणना २०११ नुसार, राज्यातील एकूण कुटुंबांपैकी, ६८.९ टक्के कुटुंबे बँकींग सेवांचा वापर करीत होती. वित्तीय संस्थांच्या या मर्यादित संपर्कामुळे जमीनदार, सावकार, इत्यादि सारख्या बिगर संस्था आजही अस्तित्वात आहेत. लाभापासून वंचित राहिलेल्या समाजातील घटकांना वाजवी दरात वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने 'वित्तीय समावेश' ही संकल्पना आणली आहे. या संकल्पनेनुसार, २००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना वित्तीय सेवा देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. अशा गावांना संबंधित बँकांद्वारे तिच्या नवीन शाखा उघडून/ सॅटेलाईट बँकींग/मोबाईल बँकींग/माहिती व दळणवळण तंत्रज्ञानावर आधारित बिझनेस करस्पॉन्डट मॉडेल च्या माध्यमातून बँकिंग सेवा पुरविण्याचे प्रस्तावित आहे. वित्तीय समावेशाखाली डिसेंबर, २०११ अखेरपर्यंत बँक नसलेल्या ४,२९२ गावांपैकी ३,८३९ (८७ टक्के) गावांमध्ये बँक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. डिसेंबर, २०११ पर्यंत १९.२८ लाख 'नो फ्रिल' खाते उघडण्यात आले. नोव्हेंबर, २०११ च्या अखेरपर्यंत जवळपास ९७.६ लाख इतके किसान क्रेडिट कार्डस् वितरीत करण्यात आले असून ह्या कार्डांकरिता एकूण ₹ ५३,२९६.२९ कोटी इतकी एकत्रित रक्कम मंजूर करण्यात आली.

## ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी

६.१२ भारत सरकारने ग्रामीण भागात पायाभूत चालू असलेले सुविधा प्रकल्प पूर्ण करण्याकरिता राज्य शासन व राज्य मालकीचे महामंडळे यांना कर्ज पुरविण्यासाठी ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीची (ग्रापासुविनि) स्थापना केली आहे. या प्रकल्पांमध्ये ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, मृद संधारण, ग्रामीण बाजारपेठ, ग्रामीण आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, अंगणवाडी व उर्जा संबंधीच्या कार्यांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत मंजूर करण्यात आलेले प्रकल्प, कर्ज वाटप व वापरलेल्या रकमेचा तपशिल तक्ता ६.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१० ग्रामीण पायाभूत विकास निधीअंतर्गत मंजूर प्रकल्प, कर्जवाटप व खर्चीत रक्कम**

(फेब्रुवारी, २०१२ पर्यंत)

| विभाग / प्रकल्प | संख्या / रक्कम (₹ कोटी) | ग्रापाविनि (१-१३) (१९९५-२००८) | ग्रापाविनि १४ (२००८-०९) | ग्रापाविनि १५ (२००९-१०) | ग्रापाविनि १६ (२०१०-११) | ग्रापाविनि १७ (२०११-१२) |
|---|---|---|---|---|---|---|
| जलसंपदा | संख्या | ८,५७४ | ५४ | २९ | २१ | १० |
| | कर्जवाटप | १,७७५ | ४०६ | १८४ | १२६ | - |
| दळणवळण (रस्ते व पूल) | संख्या | ८,४८२ | ७६८ | ९०५ | ५६३ | ७१४ |
| | कर्जवाटप | २,१०९ | ३१५ | २७० | ११३ | - |
| सामाजिक क्षेत्र (पिण्याचे पाणी पुरवठा) | संख्या | २२८ | ९ | ३ | - | - |
| | कर्जवाटप | ९८ | १२७ | १७ | - | - |
| अंगणवाडी | संख्या | ० | - | ५,००० | - | २,२२३ |
| | कर्जवाटप | ० | - | ३४ | - | - |
| पाणलोट क्षेत्र विकास | संख्या | ० | - | - | २३ | - |
| | कर्जवाटप | ० | - | - | २२ | - |
| मिठागर विकास | संख्या | ० | - | - | ३५ | ३५ |
| | कर्जवाटप | ० | - | - | ९ | - |
| मत्स्य | संख्या | ० | - | - | २० | - |
| | कर्जवाटप | ० | - | - | २२ | - |
| **एकूण** | **संख्या** | १७,२८४ | ८३१ | ५,९३७ | ६६२ | २,९८२ |
| | **कर्जवाटप** | ३,९८२ | ८४८ | ५०५ | २८३ | - |

*आधार : नाबार्ड*

## संयुक्त भांडवली संस्था

६.१३ ३१ मार्च, २०११ रोजी भारतातील एकूण ७,१४,५५५ संयुक्त भांडवली संस्थांपैकी, २० टक्के संस्था राज्यात कार्यरत होत्या. राज्यातील या संस्थांचा भरणा केलेल्या एकूण भांडवलामध्ये २२ टक्के इतका हिस्सा होता. भरणा केलेल्या भांडवलाबाबतचा तपशिल तक्ता ६.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.११ संयुक्त भांडवली संस्थांचे भरणा केलेले भांडवल**

(३१ मार्च रोजी)

| बाब | २०१०@ | | | | २०११* | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | भारत | | महाराष्ट्र | | भारत | |
| | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ कोटी) |
| खाजगी | १,६५,८३२ | १,०३,०४१ (९८,४७३) | ७,५३,०३८ | ४,०९,४८५ (४,७२,१०६) | १,३४,४५२ | १,०९,३३२ (१,०८,५२६) | ६,५४,९०९ | ४,४७,०५० (५,३३,३४३) |
| सार्वजनिक | १५,७५३ | १,६६,१०२ (९,४८३) | ८२,८२२ | ७,३५,८४० (४८,९५५) | १०,८९७ | १,६५,२३६ (९,३६७) | ५९,६४६ | ८,१०,१९० (४९,४७३) |
| **एकूण** | **१,८१,५८५** | २,६९,१४३ (१,०७,९५६) | ८,३५,८६० | ११,४५,१२५ (५,२१,०६१) | १,४५,३४९ | २,७४,५६८ (१,१७,८९३) | ७,१४,५५५ | १२,५७,२४० (५,८२,८१६) |

*आधार* : मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स, भारत सरकार    @ सुधारीत    * अस्थायी
टीप : कंसातील आकडे संस्थांची संख्या दर्शवितात

## भांडवली बाजार

६.१४ विकास व आर्थिक वाढीकरीता निकोप भांडवली बाजार अस्तित्वात असणे पूर्वावश्यक आहे. राज्यात मुंबई शेअर बाजार (बीएसई), राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) व पुणे शेअर बाजार (पीएसई) असे तीन प्रमुख बाजार आहेत. याशिवाय, ओव्हर द कांऊटर स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया, इंटर कनेक्टेड स्टॉक एक्स्चेंज आणि युनायटेड स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड अशी इतर तीन भांडवली बाजारसुद्धा कार्यरत आहेत.

६.१५ भारतीय शेअर बाजारातील राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजार यांच्या उपलब्ध समभागांच्या भांडवली मुल्यांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत २०१०-११ मध्ये अनुक्रमे ११.५ टक्के आणि १०.९ टक्के इतकी वाढ झाली आहे. राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजारातील एकूण भांडवली मूल्य एप्रिल ते ऑक्टोबर, २०१० या कालावधीत अनुक्रमे ₹ ६१,०१,८९१ कोटी व ₹ ६२,४०,१५५ कोटी इतके होते.

## प्राथमिक रोखे बाजार

६.१६ वर्ष २०११-१२ मध्ये ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत राज्यात १४ समभागांद्वारे (१२ सार्वजनिक समभाग व दोन हक्क समभाग) ₹ ५,१९० कोटीची तर भारतात ५१ समभागांद्वारे (४१ सार्वजनिक समभाग व १० हक्क समभाग) ₹ २३,००३ कोटीची उलाढाल झाली.

## दुय्यम रोखे बाजार

६.१७ भारतातील सर्व रोखे बाजारांच्या समभाग उलाढालीत २०१०-११ मध्ये घट दिसून आली. भारताच्या रोखे बाजारातील एकूण उलाढालीमध्ये राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजार यांचे मोठे योगदान आहे. शेअर बाजारनिहाय उलाढाल तक्ता ६.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१२ शेअर बाजारातील उलाढाल**

(₹ कोटी)

| शेअर बाजार | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय | ४१,३८,०२३ (७५.०) | ३५,७७,४१० (७६.४) | १९,७३,७३१ (८०.४) |
| मुंबई | १३,७८,८०९ (२५.०) | ११,०५,०२७ (२३.६) | ४,८२,२६३ (१९.६) |

*आधार* : सेबी    + ३१ डिसेंबर, २०११ रोजी    टीप : कंसांतील आकडे टक्केवारी दर्शवितात

**म्युच्युअल फंड**

६.१८ समान आर्थिक उद्देश असलेल्या विविध गुंतवणूकदारांच्या बचतीचे एकवटीकरण करण्याचे काम म्युच्युअल फंड करतात. अधिकाधिक परतावे मिळवून देण्याची क्षमता असलेले म्युच्युअल फंड हे गुंतवणुकीचे एक लोकप्रिय पर्याय ठरले असून या उद्योगाची झपाट्याने वाढ होत आहे. वर्ष २०१०-११ मध्ये नवीन म्युच्युअल फंडामध्ये ३.५ पटीने वाढ झाली आहे. ३१ डिसेंबर, २०११ रोजी राज्यात एकूण ४६ तर भारतात एकूण ४९ म्युच्युअल फंड कार्यरत होते. म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल तक्ता ६.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१३ म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल**

(₹ कोटी)

| वर्ष | नवीन म्युच्युअल फंड | अस्तित्वातील म्युच्युअल फंड |
|---|---|---|
| २००९-१० | ३६,१६६ | ९९,८२,८५७ |
| २०१०-११ | १,२४,८९० | ८७,३४,६२५ |
| २०११-१२+ | ४४,४९८ | ३९,५८,०९७ |

*आधार* : असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस् इन इंडिया + जानेवारी २०१२ पर्यंतची स्थिती

## विक्रेय वस्तू व्यापार केंद्र

६.१९ विक्रेय वस्तू व्यापर केंद्र आवश्यकतेनुसार विविध वस्तूंचा देशांतर्गत तसेच देशाबाहेरील व्यापारास त्याचप्रमाणे कृषि, धातू व उर्जा उत्पादने या मुख्य गटामध्ये मोडणाऱ्या वस्तूंच्या वायदा व्यापारास सहाय्यभूत ठरतात. शासनाने जवळपास सर्वच वस्तूंच्या वायदे व्यापारास परवानगी दिली आहे.

६.२० किरकोळ गुंतवणूकदारांच्या सहाय्यासाठी भारतात मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लि. व नॅशनल मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड या तीन प्रमुख विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रांची स्थापना करण्यात आली असून त्यापैकी नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लि. व नॅशनल मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड या दोन केंद्रांची मुख्य कार्यालये राज्यात कार्यरत आहेत. या विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रांच्या उलाढालीबाबतचा तपशिल तक्ता ६.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१४ विक्रेय वस्तू विनिमय व्यापार केंद्रांची उलाढाल**

(₹ '००० कोटी)

| विक्रेय वस्तू व्यापार केंद्र | विक्रेय वस्तूंची संख्या | | | | उलाढाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | एप्रिल - ऑक्टोंबर २०१० | एप्रिल - ऑक्टोंबर २०११ | २००९-१० | २०१०-११ | एप्रिल - ऑक्टोंबर २०१० | एप्रिल - ऑक्टोंबर २०११ |
| मल्टि कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. # | ४२ | ४२ | ४२ | ४५ | १२,७८७ (२२) | १९,६८३ (१९) | १०,३६४ (२०) | १८,६८२ (१८) |
| नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लि. | ५९ | ५९ | ४४ | ४४ | ९१८ (१५) | १,४११ (१५) | ५९६ (१३) | ९७० (१४) |

*आधार* : मल्टि कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. आणि नॅशनल कमॉडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लि.

टीप : कंसातील आकडे महाराष्ट्राचा टक्केवारी हिस्सा दर्शवितात

६.२१ एप्रिल ते ऑक्टोबर, २०११ या कालावधीत मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड व नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लि. यांची उलाढाल मागील वर्षाच्या याच कालावधीतील उलाढालीपेक्षा अनुक्रमे ८०.३ व ६२.८ टक्क्यांनी वाढली आहे. नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज एक्स्चेंज लि. च्या एकूण उलाढालीमध्ये राज्याचा हिस्सा एक टक्क्यांनी वाढला तर तर मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लि.च्या एकूण उलाढालीमध्ये राज्याचा हिस्सा ०.७ टक्क्यांनी घटला.

## विमा

६.२२ भारतातील विमाक्षेत्र जलद गतीने वाढत आहे. १९५६ मध्ये भारत सरकारने भारतीय जीवन विमा निगमची स्थापना केली तर १९७२ मध्ये सर्वसाधारण विमा निगम अस्तित्वात आले. भारत सरकारने विमा संस्थांना त्यांच्या प्रगतीत सुधारणा व्हावी व आर्थिक उद्दिष्टांसह स्वतंत्र संस्था म्हणून कार्य करता यावे यासाठी मोठ्या प्रमाणात स्वायत्तता देण्यासाठी विमा नियमक व विकास प्राधिकरणाची स्थापना केली.

६.२३ खाजगी स्पर्धकांच्या प्रवेशावरील सर्व निर्बंध उठवून येऊन तसेच विदेशी स्पर्धकांना या क्षेत्रात उतरता यावे म्हणून मार्च २००० मध्ये भारतातील विमा क्षेत्राचे उदारीकरण करण्यात आले. भारतातील बहुतांश लोकांना विमा सुरक्षा कवच नसल्याने विमा उद्योग क्षेत्रात वाढ होण्यास वाव आहे. नवीन वैयक्तिक जीवन विमा पॉलीसीबाबतचा तपशिल तक्ता ६.१५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१५ नवीन वैयक्तिक जीवन विमा पॉलिसी**

(₹ कोटी)

| बाब | | २००९-१० | | २०१०-११ | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या ('०००) | हप्ता | संख्या ('०००) | हप्ता |
| महाराष्ट्र | खाजगी # | १,७९९ | ५,१४५ | १,३५० | ४,७४७ |
| | जीविनि | ३,६७३ | ७,३३१ | ४,२७८ | ७,८२४ |
| | **एकूण** | **५,४७२** | **१२,४७६** | **५,६२८** | **१२,५७१** |
| भारत | खाजगी # | १४,३५७ | ३१,५९३ | ११,०९४ | ३०,४४२ |
| | जीविनि | ३८,८३९ | ५०,४१४ | ३७,०१२ | ५२,७३२ |
| | **एकूण** | **५०,९०५** | **८२,००७** | **४८,१०६** | **८३,१७४** |

*आधार* : विमा नियामक व विकास प्राधिकरण जीविनि - जीवन विमा निगम

# खासगी संस्थांमध्ये बिर्ला सनलाईफ, अविवा, एगन रेलिगेयर, इत्यादि संस्थांचा समावेश आहे

६.२४ २०१०-११ मध्ये बिगर जीवन विमा पोटी प्राप्त झालेल्या स्थूल विमा हप्त्याच्या रकमेत २१.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वैद्यकीय विमापोटी सर्वाधिक विमा हप्ता गोळा झाल्याचे दिसून येते. बिगर जीवन विमा धारकांकडून प्राप्त झालेल्या स्थूल विमा हप्त्याचा तपशिल तक्ता ६.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१६ बिगर जीवन विमा धारकांकडून प्राप्त झालेल्या स्थूल विमा हप्त्याचा तपशिल**

(₹ कोटी)

| वर्ष | अग्नी | मरीन (कार्गो) | मरीन (हल) | अभियांत्रिकी | मोटार (स्व हानी) | मोटार (तृतीय पक्ष) | दायित्व विमा | खाजगी अपघात | वैद्यकीय विमा | विदेशी वैद्यकीय विमा | पीक विमा | इतर सर्व संकीर्ण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००९-१० | १,२९४ | ३४३ | ७७८ | ४९७ | १,४०७ | ७३८ | ३३० | ३५९ | २,४८१ | १२१ | ११४ | १,०४९ | ९,५११ |
| २०१०-११ | १,४८८ | ४३६ | ७५९ | ५५१ | १,८८३ | ८८१ | ३५९ | ३६२ | ३,२६८ | १४७ | १४५ | १,२७५ | ११,५५४ |

*आधार* : विमा नियामक व विकास प्राधिकरण

*****

## परिशिष्ट ६.१
## महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण, निमनागरी व नागरी / महानगर क्षेत्रातील सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज

(₹ कोटी)

| वर्ष | वर्षाच्या जून महिन्यातील अखेरच्या शुक्रवारची स्थिती | | | | | | एकूण ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | निमनागरी | | नागरी / महानगर | | | |
| | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १९७१ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | १,४६० | १,२९१ † |
| १९८१ | ३०९ | २२६ | ७१४ | ३८४ | ६,५६८ | ५,३२१ | ७,५९० | ५,९३१ |
| १९९१ | १,७०१ | १,३५७ | २,३४७ | १,३५४ | ३६,१८१ | २६,९३६ | ४०,२३० | २९,६४७ |
| १९९६ | ३,२८६ | २,०४५ | ४,९५९ | २,४०९ | ८२,४१७ | ६१,०५९ | ९०,६६२ | ६५,५१३ |
| २००१ | ६,७६९ | ५,०२९ | १०,०३४ | ४,१३८ | १,५९,१९९ | १,३४,३४० | १,७६,००१ | १,४३,५०७ |
| २००७ | १२,४११ | ११,६०९ | २१,७०५ | १४,१११ | ६,५१,४२३ | ६,०८,००६ | ६,८५,५३८ | ६,३३,७२५ |
| २००८ | १६,१७२ | १३,५५९ | २७,१८० | १६,३६५ | ७,७२,७९६ | ७,८२,४१६ | ८,१६,१४७ | ८,१२,३७० |
| २००९ | १९,४२६ | १४,६१६ | ३३,७९२ | १८,५६० | ९,६६,८४७ | ८,३७,१५१ | १०,२०,०६५ | ८,७०,३२८ |
| २०१० | २३,५५५ | १७,४३७ | ४०,५२६ | २१,८७८ | ११,०३,४१३ | ९,५३,७९९ | ११,६७,५०४ | ९,९३,११४ |
| २०११ | २९,२३१ | २२,७०३ | ४९,१७४ | २७,६०४ | १३,२५,५५० | ११,२५,७८० | १४,०३,९५५ | ११,७६,०८७ |

| वर्ष | दरडोई ठेवी (₹) | दरडोई कर्ज (₹) | एकूण बँक कार्यालयांची संख्या | | | दर लाख लोकसंख्येमागे बँक कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण व निमनागरी | नागरी / महानगर क्षेत्रातील | एकूण | |
| (१) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| १९७१ | २९० | २५६ | उ. ना. | उ. ना. | १,४७१ | २.९ |
| १९८१ | १,२०४ | ९४० | उ. ना. | उ. ना. | ३,६२७ | ५.८ |
| १९९१ | ५,३४४ | ३,५८० | ३,३५३ | २,२३८ | ५,५९१ | ७.४ |
| १९९६ | १०,३६९ | ७,४९३ | ३,३३९ | २,५३८ | ५,८७७ | ६.७ |
| २००१ | १८,१०६ | १४,७६३ | ३,३८० | २,९१४ | ६,२९४ | ६.५ |
| २००७ | ६४,११७ | ५९,२७१ | ३,२९५ | ३,४३५ | ६,७२० | ६.३ |
| २००८ | ७५,२१७ | ७४,८६९ | ३,४२५ | ३,६६२ | ७,००८ | ६.५ |
| २००९ | ९२,६६२ | ७९,०६० | ३,५६६ | ३,९५४ | ७,५२० | ६.८ |
| २०१० | १,०४,५७१ | ८८,९७८ | ३,७१८ | ४,३१९ | ८,०३७ | ६.८ |
| २०११ | १,२४,०४८ | १,०३,९११ | ३,९०२ | ४,६१३ | ८,५१५ | ७.५ |

*आधार* - भारतीय रिझर्व्ह बँक

† आकडे जून, १९७१ च्या दुसऱ्या शुक्रवारचे आहेत. उ. ना. - उपलब्ध नाही

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट ६.२
# जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०११-१२)

(₹ कोटी)

| अ. क्र. | जिल्हा | प्राधान्य क्षेत्र | | | | | बिगर प्राधान्य क्षेत्र | एकूण योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कृषि व संलग्न | पैकी पीक कर्ज | बिगर प्राधान्य क्षेत्र | इतर प्राधान्य क्षेत्र | एकूण | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | ठाणे | ३०८ | ७३ | ७२१ | २,४५५ | ३,४८४ | ९११ | ४,३९५ |
| २ | रायगड | १७६ | ६० | ११५ | ४२१ | ७१२ | ११४ | ८२६ |
| ३ | रत्नागिरी | ३६७ | १८० | १०९ | ६२६ | १,१०२ | २२८ | १,३३० |
| ४ | सिंधुदुर्ग | २८६ | ११९ | ६२ | २५२ | ६०० | ३०९ | ९०९ |
| ५ | नाशिक | ३,१०२ | २,१२३ | ४५७ | ९२४ | ४,४८४ | ७३७ | ५,२२१ |
| ६ | धुळे | ५५६ | ३५० | ५३ | १४१ | ७५० | ५४ | ८०४ |
| ७ | नंदुरबार | ३६८ | २३९ | १० | ५५ | ४३३ | १९ | ४५१ |
| ८ | जळगाव | १,३०० | ९२५ | ६७७ | ४६० | २,४३७ | ८३ | २,५१९ |
| ९ | अहमदनगर | २,२५७ | १,२८१ | ३१२ | ४१४ | २,९८३ | १,०३३ | ४,०१५ |
| १० | पुणे | ३,२१७ | १,५८८ | ९२१ | २,३४४ | ६,४८२ | ३,४९५ | ९,९७७ |
| ११ | सातारा | १,६०० | ९३३ | २२८ | ८७२ | २,७०० | ३२३ | ३,०२३ |
| १२ | सांगली | १,५८० | ८३४ | २४४ | ३५० | २,१७४ | ५४९ | २,७२२ |
| १३ | सोलापूर | २,६२३ | १,६६८ | २०१ | ४३३ | ३,२५७ | ५०० | ३,७५७ |
| १४ | कोल्हापुर | २,५३० | १,५५० | ७२५ | १,००० | ४,२५५ | १८० | ४,४३५ |
| १५ | औरंगाबाद | ९८५ | ५९४ | ४९९ | ६६४ | २,१४८ | ६५३ | २,८०१ |
| १६ | जालना | ७८० | ६०० | १३४ | १३९ | १,०५३ | ११० | १,१६३ |
| १७ | परभणी | ५४६ | ४३४ | ३० | ९२ | ६६९ | ३ | ६७२ |
| १८ | हिंगोली | २६७ | २०१ | ११ | ५२ | ३३१ | २८ | ३५९ |
| १९ | बीड | ८५५ | ७०० | २९ | १८३ | १,०६६ | २५ | १,०९१ |
| २० | नांदेड | १,१०७ | ८७५ | ६४ | २८६ | १,४५८ | ३६ | १,४९४ |
| २१ | उस्मानाबाद | ८९५ | ५६९ | ५७ | १९५ | १,१४७ | ११ | १,१५८ |
| २२ | लातूर | १,०१० | ७२७ | १५६ | ३५८ | १,५२४ | १२ | १,५३६ |
| २३ | बुलढाणा | ७३६ | ५५० | २९ | ११५ | ८८० | ४५ | ९२४ |
| २४ | अकोला | ६३१ | ४०७ | ९१ | १८९ | ९१२ | ९१ | १,००३ |
| २५ | वाशिम | ५६२ | ४३९ | २६ | १२४ | ७१२ | १९ | ७३१ |
| २६ | अमरावती | १,००७ | ७८२ | ३० | १९७ | १,२३४ | ११३ | १,३४७ |
| २७ | यवतमाळ | १,१५२ | ९४० | ५१ | ३०६ | १,५१० | १८३ | १,६९३ |
| २८ | वर्धा | ५९३ | ४३९ | ५७ | १४५ | ७९५ | ३५ | ८३१ |
| २९ | नागपूर | ७८० | ५६५ | ७१ | २४९ | १,१०० | १०६ | १,२०६ |
| ३० | भंडारा | ३४१ | २६३ | ८२ | २३९ | ६६३ | ८० | ७४३ |
| ३१ | गोंदिया | २०८ | १४३ | ५२ | ६६ | ३२६ | ४१ | ३६८ |
| ३२ | चंद्रपुर | ५१९ | ३६२ | ८१ | ४०३ | १,००३ | १६५ | १,१६८ |
| ३३ | गडचिरोली | १८२ | ९१ | १४ | ८० | २७७ | २३ | ३०० |
| | **महाराष्ट्र** | **३३,४२४** | **२१,६०६** | **६,४०२** | **१४,८३२** | **५४,६५८** | **१०,३१४** | **६४,९७२** |

*आधार* - राज्यस्तरीय बॅकर्स समिती, बॅंक ऑफ महाराष्ट्र

# ७

# कृषि व संलग्न कार्ये



# ७. कृषि व संलग्न कार्ये

७.१ स्थूल राज्य उत्पन्नात २०१०-११ या वर्षात सुमारे १२.८ टक्के वाटा असलेल्या 'कृषि व संलग्न कार्ये' या क्षेत्राची अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांतील वार्षिक सरासरी वाढ ३.७ टक्के होती. पंचवार्षिक योजनेअंतर्गत या क्षेत्रासाठी निश्चित केलेले चार टक्के वाढीचे उद्दिष्ट राज्याने जवळ जवळ साध्य केले असले तरी, या क्षेत्रातील वर्षनिहाय प्रगतीचे चित्र वेगळे दिसून येते. राज्यातील स्थूल सिंचित क्षेत्राचे स्थूल पिकांखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण २००८-०९ मध्ये १७.७ टक्के होते, जे राष्ट्रीय स्तरावरील ४५.३ टक्के प्रमाणाच्या तुलनेत बरेच कमी आहे. ही बाब, तसेच जमीनीची कमी उत्पादकता ह्या राज्यापुढील या क्षेत्रातील प्रमुख चिंताजनक बाबी आहेत

## मान्सून २०११

७.२ यावर्षी मोसमी पावसाचे आगमन ३ जून रोजी दक्षिण कोकणातील वेंगुर्ला येथे झाले. उर्वरित कोकण विभागात आणि कोल्हापूर, सातारा, नाशिक व नंदुरबार या जिल्ह्यांत तो ५ जून पर्यंत पोहोचला. पूर्व विदर्भात तो १६ जून तर, पश्चिम विदर्भ व मराठवाड्यात २२ जून पर्यंत पोहोचला. अशाप्रकारे मोसमी पाऊस २२ जून पर्यंत राज्यात सर्वत्र पसरला. मागील वर्षाच्या तुलनेत मोसमी पावसास जरी लवकर सुरुवात झाली असली तरी, तो संपूर्ण राज्यात पसरण्यास दोन आठवडे विलंब झाला.




७.३ राज्यात जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या महिन्यांत सरासरीच्या अनुक्रमे ९४.७ टक्के, १०१.६ टक्के, १२२.३ टक्के, ९६.९ टक्के व ५८.९ टक्के इतका पाऊस पडला. २०११ मध्ये संपूर्ण राज्यात पडलेला पाऊस सरासरीच्या १०२.३ टक्के इतका होता. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सातारा या चार जिल्ह्यांत अतिरिक्त म्हणजेच सरासरीच्या १२० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस पडला. तर, उस्मानाबाद आणि नांदेड जिल्ह्यांत ८० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडला. राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी, १३ टक्के तालुक्यांत अतिरिक्त, ५९ टक्के तालुक्यांत सरासरी एवढा तर २८ टक्के तालुक्यांत अपुरा पाऊस पडला. राज्यात पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार जिल्हे व तालुक्यांचे वर्गीकरण तक्ता ७.१ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१ पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार जिल्ह्यांचे व तालुक्यांचे वर्गीकरण**

| पावसाची वर्गवारी (टक्केवारी) | जिल्ह्यांची संख्या # | | | तालुक्यांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ | २००९ | २०१० | २०११ |
| १२० पेक्षा अधिक (अतिरिक्त ) | १ | १७ | ४ | ८१ | १९५ | ४६ |
| ८१-१२० (सरासरी एवढा) | १६ | १६ | २७ | ८८ | १४५ | २०९ |
| ४१-८० (अपुरा) | १६ | ० | २ | १७८ | १५ | १०० |
| ०-४० (तुरळक) | -- | -- | ० | ८ | ० | ० |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन
# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून

## संभाव्य कृषि उत्पादन २०११-१२

७.४ मराठवाडा आणि विदर्भात मान्सूनचे उशीरा झालेले आगमन आणि पावसाची विषमता यामुळे खरीप पिकांच्या पेरण्या दोन ते तीन आठवडे उशीरा झाल्या आणि त्याचा पेरणी क्षेत्रावरही विपरीत परिणाम झाला. सप्टेंबर महिन्यातील पावसाचे विषम स्वरुपाचे वितरण आणि ऑक्टोबर महिन्यातील अपुऱ्या पावसामुळे रब्बी पिकांच्या क्षेत्रातही घट झाली असून परिणामी, अन्नधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. याबाबतचा तपशील तक्ता ७.२ मध्ये दिला आहे.

७.५ राष्ट्रीय नमूना पाहणीच्या ६६ व्या फेरीतील (२००९-१०) दरडोई उपभोगाच्या आधारे राज्यातील तृणधान्ये व कडधान्यांची गरज अनुक्रमे १३२.०६ लाख मे. टन आणि ११.९० लाख मे. टन इतकी आहे.

**तक्ता ७.२ राज्यातील अन्नधान्य व तेलबियांच्या उत्पादनाचे अंदाज**

(लाख मे. टन)

| पीक | २०१०-११ (अंतिम पुर्वानुमान) | २०११-१२ (तात्पूरते ) | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| तृणधान्ये | १२३.२१ | ९६.९२ | -२१ |
| कडधान्ये | ३०.९६ | २१.१७ | -३२ |
| एकूण अन्नधान्ये @ | १५४.१७ | ११८.०९ | -२३ |
| तेलबिया @ | ५०.४६ | ४६.३८ | -८ |
| कापूस + | ७४.७३ | ६३.६९ | -१५ |
| ऊस (तोडणीचे) | ८५६.९१ | ८५६.३५ | -- |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन
@ खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांचा समावेश + लाख गासड्या (प्रत्येकी १७० किलोची)

## खरीप पिके

७.६ राज्यात खरीप हंगाम २०११-१२ मध्ये १४७.१ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून ती मागील वर्षाच्या (१५० लाख हेक्टर) तुलनेत २ टक्के कमी होती. गेल्या वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये व कडधान्यांखालील क्षेत्र अनुक्रमे ८ व १८ टक्क्यांनी कमी झाले असून तेलबिया, कापूस व ऊस या पिकांखालील क्षेत्रात मात्र अनुक्रमे आठ, पाच व सहा टक्क्यांनी वाढ झाली. तृणधान्ये व कडधान्यांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या अनुक्रमे ६ व २४ टक्क्यांची घट अपेक्षित आहे. तसेच, तेलबिया व कापसाच्या उत्पादनातही मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ८ व १५ टक्के घट अपेक्षित आहे. याबाबतचा तपशील तक्ता ७.३ मध्ये दिला असून प्रमुख पिकांखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता याबाबतची समयमालिका परिशिष्ट ७.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०११-१२ (तात्पुरते) | शेकडा बदल | २०१०-११ | २०११-१२ (तात्पुरते) | शेकडा बदल |
| तांदूळ | १,४८६ | १,५१४ | २ | २,६२५ | २,७१२ | ३ |
| बाजरी | १,०३५ | ८३७ | (-) १९ | १,१२३ | ७९९ | (-) २९ |
| ज्वारी | १,०३२ | ८८२ | (-) १५ | १,३६७ | १,३२५ | (-) ३ |
| नाचणी | १२० | १३६ | १३ | ११७ | १४० | २० |
| मका | ७३१ | ६९४ | (-) ५ | २,२०९ | २,०१३ | (-) ९ |
| इतर तृणधान्ये | ५४ | ५८ | ७ | २७ | २७ | -- |
| **एकूण तृणधान्ये** | **४,४५८** | **४,१२१** | **(-) ८** | **७,४६८** | **७,०१६** | **(-) ६** |
| तूर | १,३०२ | १,२०९ | (-) ७ | ९७६ | ८१८ | (-) १६ |
| मूग | ५५४ | ३९८ | (-) २८ | ३७२ | २४४ | (-) ३४ |
| उडीद | ४८२ | ३३६ | (-) ३० | ३२९ | २२८ | (-) ३१ |
| इतर कडधान्ये | १२९ | ८८ | (-) ३२ | ६१ | ३४ | (-) ४४ |
| **एकूण कडधान्ये** | **२,४६७** | **२,०३१** | **(-) १८** | **१,७३८** | **१,३२४** | **(-) २४** |
| **एकूण अन्नधान्ये** | **६,९२५** | **६,१५२** | **(-) ११** | **९,२०६** | **८,३४०** | **(-) ९** |
| सोयाबीन | २,७२९ | ३,०६९ | १२ | ४,३१६ | ४,०२९ | (-) ७ |
| शेंगदाणा | २७५ | २२३ | (-) १९ | ३४६ | २७४ | (-) २१ |
| तीळ | ५३ | ४१ | (-) २३ | १९ | १५ | (-) २१ |
| कारळे | ३५ | ३७ | ६ | ८ | ११ | ३८ |
| सुर्यफुल | ६९ | ३३ | (-) ५२ | ३५ | १७ | (-) ५१ |
| इतर तेलबिया | १० | ८ | (-) २० | ४ | ३ | (-) २५ |
| **एकूण तेलबिया** | **३,१७१** | **३,४११** | **८** | **४,७२८** | **४,३४९** | **(-) ८** |
| कापूस (रुई)@ | ३,९४२ | ४,१२६ | ५ | ७,४७३ | ६,३६९ | (-) १५ |
| ऊस** | ९६५ | १,०२२ | ६ | ८५,६९१ | ८५,६३५ | -- |
| **एकूण** | **१५,००३** | **१४,७११** | **(-) २** | **--** | **--** | **--** |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

@ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये ** तोडणी क्षेत्र

## रब्बी पिके

७.७ परतीचा मोसमी पाऊस अपूरा पडल्याने रब्बी पिकांच्या पेरणी क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत २८ टक्क्यांची घट अपेक्षित असून, त्यामुळे रब्बी पिकांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. रब्बी पिकांच्या अंदाजाबाबतची विस्तृत माहिती तक्ता ७.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.४ प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०११-१२ (तात्पुरते) | शेकडा बदल | २०१०-११ | २०११-१२ (तात्पुरते) | शेकडा बदल |
| ज्वारी | ३,०२८ | २,३८१ | (-)२१ | २,०८५ | १,१२० | (-) ४६ |
| गहू | १,३०७ | ७९२ | (-) ३९ | २,३०१ | १,१८५ | (-) ४९ |
| मका | १३८ | ११५ | (-)१७ | ३६२ | २४० | (-) ३४ |
| इतर तृणधान्ये | ५ | १२ | १४० | ३ | ५ | ६७ |
| **एकूण तृणधान्ये** | **४,४७८** | **३,३००** | **(-)२६** | **४, ७५१** | **२,५५०** | **(-) ४६** |
| हरभरा | १,४३८ | १,०२३ | (-)२९ | १,३०० | ७५० | (-) ४२ |
| इतर कडधान्ये | १३३ | १०२ | (-) २३ | ५८ | ४२ | (-) २८ |
| **एकूण कडधान्ये** | **१,५७१** | **१,१२५** | **(-) २८** | **१,३५८** | **७९२** | **(-) ४२** |
| **एकूण अन्नधान्ये** | **६,०४९** | **४,४२५** | **(-) २७** | **६,१०९** | **३,३४२** | **(-) ४५** |
| तीळ | ३ | ३ | ० | १ | १ | -- |
| सुर्यफूल | १३९ | ५१ | (-) ६३ | ९० | २७ | (-) ७० |
| करडई | १७३ | १२३ | (-) २९ | ९४ | ६० | (-) ३६ |
| जवस | ३९ | ३० | (-) २३ | १० | १२ | २० |
| सरसू व मोहरी | ८ | १२ | ५० | ३ | ४ | ३३ |
| **एकूण तेलबिया** | **३६२** | **२१९** | **(-) ४०** | **१९८** | **१०४** | **(-) ४७** |
| **एकूण पिके** | **६,४११** | **४,६४४** | **(-) २८** | **--** | **--** | **--** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## उन्हाळी पिके

७.८ उन्हाळी पिकांचे अंदाज लक्ष्यांकावर आधारीत आहेत. प्रमुख उन्हाळी पिकांचे क्षेत्र व उत्पादन याबाबतची माहिती तक्ता ७.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.५ प्रमुख उन्हाळी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | उत्पादन ('००० मे. टन) | |
|---|---|---|---|---|
| | २०१०-११ (तात्पुरते) | २०११-१२ (लक्ष्य) | २०१०-११ (तात्पुरते) | २०११-१२ (लक्ष्य) |
| भात | ३२ | ४० | ७१ | ९७ |
| मका | २२ | १८ | ३१ | २८ |
| **एकूण तृणधान्ये** | **५४** | **५८** | **१०२** | **१२५** |
| शेंगदाणा | ८२ | १०७ | ११२ | १७० |
| सुर्यफुल | १० | १६ | ८ | १४ |
| **एकुण तेलबिया** | **९२** | **१२३** | **१२०** | **१८४** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## कृषि उत्पादनाचे निर्देशांक

७.९ राज्यातील कृषि उत्पादनाचा २०१०-११ चा निर्देशांक (पाया त्रैवार्षिक सरासरी : १९७९-८२=१००) २२३.८ अपेक्षित आहे व तो सन २००९-१० च्या निर्देशांकापेक्षा (१७५.९) २७.२ टक्क्यांनी जास्त आहे. सन २०१०-११ साठी गटनिहाय निर्देशांक तृणधान्यांसाठी १३४.२, कडधान्यांसाठी ३०५.६, अन्नधान्यांसाठी १६९.२, तेलबियांसाठी ७९.८, तंतूपिकांसाठी ५१०.४, संकीर्ण पिकांसाठी २७३.४ आणि अन्नधान्येतर पिकांकरिता २८५.६ इतका होता. या निर्देशांकाबाबतचा तपशील परिशिष्ट ७.२ मध्ये दिला आहे.

## जमिनीचा वापर

७.१० राज्याच्या एकूण जमीन वापराबाबतच्या २००९-१० च्या आकडेवारीनुसार एकूण ३०७.६ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी पिकांखालील एकूण क्षेत्र २२६.१ लाख हेक्टर होते. निव्वळ पेरणी क्षेत्र १७४ लाख हेक्टर, वनाखालील क्षेत्र ५२.१ लाख हेक्टर, शेतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र ३१.७ लाख हेक्टर, मशागतीसाठी योग्य नसलेले इतर क्षेत्र २४.१ लाख हेक्टर आणि पडीक जमिनीखालील क्षेत्र २५.६ लाख हेक्टर होते. सन २००५-०६ ते २००९-१० या मागील पाच वर्षाच्या कालावधीत बिगर-कृषि वापरासाठीच्या जमिनीचे प्रमाण २.६ टक्क्यांनी वाढले. जमीन वापराबाबतची विस्तृत सांख्यिकी परिशिष्ट ७.३ मध्ये दिलेली आहे.

**आलेख ७.१ राज्यातील जमिनीचा वापर (२००९-१०)**




## वहिती खातेदार

७.११ कृषि गणना २००५-०६ नुसार, राज्यात एकूण १.३७ कोटी वहिती खातेदार होते. त्यापैकी १.०३ कोटी खातेदार (७४.९ टक्के) दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन धारणा गटातील होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचे प्रमाण अनुक्रमे ७.८ टक्के आणि ६.४ टक्के होते व त्यांनी धारण केलेले क्षेत्र अनुक्रमे ६.२ टक्के व ७.६ टक्के होते. अ.जा. व अ.ज. करिता सरासरी जमीन धारणा आकार अनुक्रमे १.१६ हेक्टर व १.७४ हेक्टर असा होता. वर्गनिहाय वहिती खातेदारांची माहिती तक्ता ७.६ मध्ये आणि कृषि गणनेबाबतची समयमालिका परिशिष्ट ७.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.६ कृषि गणना २००५-०६ नुसार राज्यातील वहिती खातेदार व क्षेत्र**

| आकार वर्ग (हे.) | वहिती खातेदारांची संख्या ('०० ) | वहितीचे क्षेत्र ('०० हे.) | वहितीचे सरासरी क्षेत्र (हे.) | |
|---|---|---|---|---|
| | | | २०००-०१ | २००५-०६ |
| १.० पर्यंत | ६१,१८३ | २८,०१४ | ०.५१ | ०.४६ |
| १.० - २.० | ४१,५०३ | ५२,४७६ | १.४२ | १.२६ |
| २.० - ५.० | २८,५५३ | ७८,०१५ | २.९३ | २.७३ |
| ५.० - १०.० | ५,२१४ | ३२,१३५ | ६.५८ | ६.१६ |
| १०.० - २०.० | ६२२ | ६,७७६ | १२.८९ | १०.८९ |
| २०.० व अधिक | ८१ | २,६३४ | ३५.२४ | ३२.५२ |
| **एकूण** | **१,३७,१५६** | **२,००,०५०** | **१.६६** | **१.४६** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## सिंचन

७.१२ राज्यातील सिंचनाखालील स्थूल व निव्वळ क्षेत्र सन २००९-१० मध्ये अनुक्रमे ४०.५० लाख हेक्टर व ३३.२१ लाख हेक्टर इतके होते. सन २००९-१० मध्ये सिंचनाखालील एकूण क्षेत्राचे पिकांखालील एकूण क्षेत्राशी प्रमाण १७.९ टक्के होते. सिंचनाखालील निव्वळ क्षेत्रांपैकी, विहीरीद्वारे सिंचित क्षेत्र २१.५९ लाख हेक्टर (६५ टक्के) होते. राज्यातील सिंचनाखालील क्षेत्राबाबतची समयमालिका परिशिष्ट ७.५ मध्ये दिली आहे.

## सिंचन प्रकल्प

७.१३ राज्यात जास्तीत जास्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी शासनाने विविध मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले आहेत. तथापि, मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पातील निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष वापर यामध्ये बरीच तफावत आहे. राज्यातील २०१०-११ मध्ये एकूण वापर झालेली सिंचन क्षमता ४६.५८ लाख हेक्टर होती, ज्यापैकी २७.४४ लाख हेक्टर मोठे, ६.१६ लाख हेक्टर मध्यम आणि उर्वरित १२.९८ लाख हेक्टर लघुपाटबंधारे प्रकल्पांतील (राज्यस्तर व स्थानिक स्तर) होती. हाती घेतलेले सिंचन प्रकल्प आणि त्याद्वारे निर्माण करण्यात आलेली सिंचन क्षमता याबाबतचा तपशील तक्ता ७.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.७ पाटबंधारे प्रकल्पांची संख्या आणि निर्मित सिंचन क्षमता**

| बाब | मोठे | मध्यम | लघु (राज्य स्तर) | लघु (स्थानिकस्तर) | | | | | | एकूण लघु (राज्य +स्थानिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कोल्हापूर बंधारे | पाझर तलाव | उपसा जलसिंचन | लघु पाट बंधारे | इतर | एकुण लघु (स्थानिक) | | |
| (अ) ३० जून २०११ रोजी प्रकल्पांची संख्या | | | | | | | | | | | |
| (i) पूर्ण @ | ३२ | १८६ | २,५४९ | १०,७७५ | २१,४५२ | २,९१४ | २,०३९ | २५,९६५ | ६३,१४५ | ६५,६९४ | ६५,९१२ |
| (ii) प्रगतीपथावरील @ | ५४ | ७२ | ५५९ | १,४९६ | १,९९९ | १२१ | ३८५ | २,६८० | ६,६८१ | ७,२४० | ७,३६६ |
| (ब) सिंचन क्षमता (लाख हे.) | | | | | | | | | | | |
| (i) जून २०११ पर्यंत निर्मित* | २६.७२ | ८.५३ | १२.९९ | ३.०७ | ६.४६ | ०.४० | २.१२ | ३.४१ | १५.४६ | २८.४५ | ६३.७० |
| (ii) २०१०-११ मधील प्रत्यक्ष वापर * | १९.३२ | ४.४७ | ५.७६ | १.०७ | १.६२ | ०.१६ | ०.६४ | २.३९ | ५.८८ | ११.६४ | ३५.४३ |
| (iii) लाभ क्षेत्रातील विहिरीद्वारे २०१०-११ मधील अतिरिक्त सिंचन क्षेत्र* | ८.१२ | १.६९ | १.३४ | -- | -- | -- | -- | -- | -- | १.३४ | ११.१५ |
| (iv) एकूण वापरलेली सिंचन क्षमता | २७.४४ | ६.१६ | ७.१० | १.०७ | १.६२ | ०.१६ | ०.६४ | २.३९ | ५.८८ | १२.९८ | ४६.५८ |

आधार : १) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन
२) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक), महाराष्ट्र शासन

* अस्थायी
@ मोठे, मध्यम आणि लघु (राज्यस्तर) आकडेवारी ३० जून, २०१० रोजीची आहे

## पाटबंधारे क्षेत्रातील सुधारणा

७.१४ पाटबंधारे क्षेत्रात सुधारणा करण्याच्या दृष्टिने राज्य शासनाने यापूर्वीच काही उपाययोजना हाती घेतल्या असून यामध्ये जलनीतीची घोषणा, जलसंपत्ती नियामक मंडळाची स्थापना, सिंचन प्रणालीचे शेतकरी व पाणी वापर संस्थांकडून व्यवस्थापन या बाबींचा समावेश आहे. राज्यातील २१.२० लाख हेक्टर लाभ क्षेत्राकरिता सुमारे ४,५५३ पाणी वापर संस्था स्थापनेच्या विविध टप्प्यांवर आहेत. पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी याबाबतची समयमालिका परिशिष्ट ७.६ मध्ये दिली आहे.

## जलाशयांतील साठ्यांची स्थिती

७.१५ राज्यातील सर्व मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये १५ ऑक्टोबर, २०१० रोजीचा एकूण उपयुक्त जलसाठा २७,३०९ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प क्षमतेच्या सुमारे ८२ टक्के होता. जलाशयातील उपयुक्त साठे आणि पाण्याचा वापर याबाबतचा तपशील तक्ता ७.८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.८ जलाशयांतील उपयुक्त साठ्यांची स्थिती आणि पाणी वापर**

(दशलक्ष घनमीटर)

| वर्ष | प्रकल्पीय आराखड्या नुसार | १५ आक्टोबर रोजीचा उपयुक्त जलसाठा | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी | बाष्पी भवन व्यय | सिंचनासाठी वापरले जाणारे पाणी | बिगर सिंचना करीता/इतर पाणी वापर | एकूण पाणी वापर | पाणी वापराची १५ ऑक्टोबर रोजीच्या उपलब्ध जलसाठ्याशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००७-०८ | ३०,१५३ | २५,४८९ | ८४ | -- | १९,७६३ | ६,६७१ | २६,४३४ | १०४ |
| २००८-०९ | ३३,०७१ | २४,८०३ | ७५ | -- | १८,४८६ | ६,८८० | २५,३६६ | १०२ |
| २००९-१० | ३३,२११ | १९,३६६ | ५८ | ३,९७२ | १२,११३ | ४,७६३ | २०,८४८ | १०८ |
| २०१०-११ | ३३,३८५ | २७,३०९ | ८२ | ५,३८३ | १५,४४७ | ५,८७६ | २६,७०६ | ९८ |

*आधार* : जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन

टीप : सन २००७-०८ व २००८-०९ साठी बाष्पीभवन व्यय हा पाणी वापरात समाविष्ट आहे.

## तुषार व ठिबक सिंचन

७.१६ तुषार व ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब केल्याने सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची बचत होते व त्यामुळे २५ ते ४० टक्के अतिरिक्त क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होते. शिवाय त्यामुळे जमिनीची धूप कमी होते, मशागतीची कामे सुलभ होतात, खतांची कार्यक्षमता वाढते, किडींमुळे होणारे नुकसान घटते आणि परिणामतः पीक उत्पादनात वाढ होते. या सिंचनपध्दतीचा अवलंब करण्याच्या दृष्टिने जून २०१० पासून तुषार व ठिबक सिंचन संच खरेदी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मानकानुसार सर्वसामान्य शेतकऱ्यांना ५० टक्के व अल्पभूधारक व सीमांतिक शेतकऱ्यांना ६० टक्के अनुदान देऊन राज्य शासन उत्तेजन देते. या बाबतचा तपशील तक्ता ७.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.९ तुषार आणि ठिबक संचाचे वितरण आणि वर्षनिहाय खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | तुषार | | ठिबक | | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | संचाची संख्या | क्षेत्र (हे.) | संचाची संख्या | क्षेत्र (हे.) | |
| २००५-०६ | ११,४४८ | १२,८२४ | २८,०७९ | २७,८९४ | ६०.०६ |
| २००६-०७ | १३,२१५ | २६,९०१ | २९,८८५ | ४०,८२७ | १०९.९४ |
| २००७-०८ | ३५,२८८ | ३७,७१९ | ६३,२९८ | ६३,५४८ | १६७.२८ |
| २००८-०९ | ३४,७०१ | ४१,८५१ | ५८,०१४ | ७४,७८२ | १९७.५५ |
| २००९-१० | ३६,३२९ | ३७,५५२ | ९१,०५८ | ८१,६६० | १९२.११ |
| २०१०-११ | ३८,०३० | ३८,०२९ | १,४०,७६४ | १,२७,९६७ | ४०७.८८ |

*आधार* : जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन आणि कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## कृषि पंपाना वीज अनुदान

७.१७ राज्यात सुमारे ३१ लक्ष कृषि पंप असून सदर कृषि पंपांना पुरविण्यात येणाऱ्या विजेकरीता अनुदान देण्यात येते. कृषि पंपाना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यासाटी सन २०११-१२ या वर्षाकरिता ₹ ३,०५० कोटी इतकी तरतूद केली आहे.

## कृषि पंपाचे विद्युतीकरण

७.१८ सन २०१०-११ मध्ये महावितरण कंपनीने ३,२१,२९९ कृषिपंपांना वीज जोडणी उपलब्ध करुन दिलेली आहे. मागेल त्याला वीज जोडणी या स्थितीत येण्यासाठी तसेच कृषि पंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष दूर करण्यासाठी सन २०११-१२ करिता ₹ ८० कोटीची तरतूद केलेली आहे.

## सुधारित बियाणांचा वापर

७.१९ राज्यातील कृषि उत्पादन व त्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध पिकांच्या सुधारीत वाणांच्या प्रमाणित व दर्जेदार बियाणांचे वितरण होणे गरजेचे आहे. दर्जेदार बियाणांचे उत्पादन व वितरणामध्ये प्रामुख्याने महाबीज आणि राष्ट्रीय बिज निगम या सार्वजनिक संस्था कार्यरत आहेत. तसेच सुमारे ३२० खाजगी बियाणे उत्पादकांद्वारे विविध पिकांच्या बियाणांची विक्री केली जाते. केंद्र शासनाने स्वपरागसिंचीत पिकांच्या बाबतीत (उदा. भात, गहू, तूर, मूग, उडीद, इ.) ३३ टक्के, परपरागसिंचित पिके (उदा. मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, इ.) ५० टक्के व संकरीत पिके (उदा. संकरीत ज्वारी, बाजरी, कापूस, भात, इ.) १०० टक्के याप्रमाणे बियाणे बदल लक्ष्यांक निर्धारित केलेले आहेत. राज्याने तुर, भुईमूग, रब्बी ज्वारी, हरभरा आणि करडई ही पिके वगळता इतर पिकांच्या बाबतीत बियाणे बदल दर साध्य केला असून वरील पिकांचा बियाणे बदल दर साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यात खरीप व रब्बी हंगामात वितरीत करण्यात आलेल्या सुधारित बियाणांची माहिती तक्ता ७.१० मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.१० वितरीत करण्यात आलेले सुधारित बियाणे**

('००० क्विंटल )

| क्षेत्र | पीक | वर्ष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००७ | २००८ | २००९ | २०१० | २०११ * | २०१० च्या तुलनेत २०११ मधील शेकडा बदल |
| सार्वजनिक | खरीप | ६२२ | ७८१ | ७२७ | ८४४ | ८६९ | ३.० |
| | रब्बी | ३२६ | ३७८ | ३९३ | ४२३ | २९८ | (-) २९.६ |
| | **एकूण** | ९४८ | १,१५९ | १,१२० | १,२६७ | १,१६७ | (-) ७.९ |
| खाजगी | खरीप | ४६० | ६५४ | १,१८६ | ९७७ | ९७५ | ० |
| | रब्बी | २५० | ३३४ | ३०८ | ३३९ | ११६ | (-) ६५.८ |
| | **एकूण** | ७१० | ९८८ | १,४९४ | १,३१६ | १,०९१ | (-) १७.१ |
| **एकूण** | खरीप | १,०८२ | १,४३५ | १,९१३ | १,८२१ | १,८४४ | १.३ |
| | रब्बी | ५७६ | ७१२ | ७०२ | ७६२ | ४१४ | (-) ४५.७ |
| | **एकूण** | १,६५८ | २,१४७ | २,६१५ | २,५८३ | २,२५८ | (-) १२.६ |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन    * रब्बी हंगामाकरीता अस्थायी

## रासायनिक खताचा वापर

७.२० राज्यात सन २०११-१२ मध्ये रासायनिक खतांचा एकूण वापर ६७.४ लाख मे. टन इतका अपेक्षित असून प्रति हेक्टरी वापर १७२.८ कि. ग्रॅम इतका असेल. सन २०१०-११ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांना एकूण ३५,२४५ खत वितरण केंद्रामार्फत विविध रासायनिक खतांचे वितरण करण्यात आले. त्यापैकी, ३,९८९ (११.३ टक्के) सहकारी क्षेत्रात, २२० (०.६ टक्के) सार्वजनिक क्षेत्रात, तर उर्वरित ३१,०३६ (८८.१ टक्के) केंद्रे खाजगी क्षेत्रातील होती. मागील सहा वर्षांमध्ये रासायनिक खतांच्या वापराबाबतची माहिती तक्ता ७.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.११ रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर**

| वर्ष | एकूण वापर (लाख मे. टन ) | प्रति हेक्टरी वापर (कि. ग्रॅ. ) |
|---|---|---|
| २००५-०६ | ४२.६ | ९७.५ |
| २००६-०७ | ४८.२ | १००.२ |
| २००७-०८ | ४७.९ | १०९.७ |
| २००८-०९ | ५२.५ | १३३.० |
| २००९-१० | ६०.९ | १५३.४ |
| २०१०-११ | ७०.३ | १६३.८ |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर

७.२१ चालू वर्षासाठी रासायनिक किटकनाशकांचा वापर १०,५३१ मे. टन इतका अपेक्षित आहे. रासायनिक किटकनाशकांच्या वापरात झालेली वाढ ही मुख्यत्वेकरुन बुरशीनाशक, तणनाशक, पीकसंवर्धक आणि आंतर्प्रवाही किटकनाशकांच्या वाढीव वापरामुळे झाली आहे. चालू वर्षासाठी जैविक किटकनाशकांचा वापर २,५०० मे. टन इतका अंदाजित करण्यात आला आहे. याबाबतचा तपशील तक्ता ७.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१२ किटकनाशकांचा वापर**

| वर्ष | वापर (मे. टन) | |
|---|---|---|
| | रासायनिक | जैविक |
| २००७-०८ | ३,०५० | १,०५० |
| २००८-०९ | ३,६३७ | १,३०० |
| २००९-१० | ७,१८९ | १,७८८ |
| २०१०-११ | ८,३१७ | २,२०० |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## फ्लॅगशिप कार्यक्रम

७.२२ केंद्र सरकारने कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम यासारखे काही फ्लॅगशिप कार्यक्रम सुरु केले आहेत. शेतकऱ्यांचे हितसंरक्षण आणि चांगल्या कृषि निविष्ठांचा पुरवठा करुन अन्नधान्यांच्या उत्पादनात वाढ करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## राष्ट्रीय कृषि विकास योजना

७.२३ कृषि हवामानाच्या क्षेत्रानुसार नैसर्गिक संसाधने व तंत्रज्ञान आणि पशुधन, कुक्कूटपालन व मत्स्यव्यवसाय यांचा एकत्रित विचार करुन कृषि क्षेत्रासाठी अधिक प्रभावी योजना तयार करण्यास राज्यांना प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकारने 'राष्ट्रीय कृषि विकास योजना' ही केंद्र सहाय्यित योजना सुरु केली आहे. जमीन सुधारणांविषयक विशेष योजनांसह राज्यांच्या गरजेनुसार योजना तयार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेचा तपशील तक्ता ७.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१३ राष्ट्रीय कृषि विकास योजनेची स्थिती**

(₹ कोटी)

| वर्ष | केंद्र सरकारने दिलेल्या प्रशासकीय मान्यता | राज्यस्तरीय स्थायी समितीने मंजूर केलेले प्रकल्प | केंद्रशासनाकडून पाप्त अनुदान | खर्च |
|---|---|---|---|---|
| २००७-०८ | १३९.१० | १३२.१० | १२८.२० | १२८.२० |
| २००८-०९ | २६९.६३ | ४५०.९२ | २६१.७७ | २६१.७७ |
| २००९-१० | ४०७.२४ | ५२२.७९ | ४०४.३९ | ४०४.३९ |
| २०१०-११ | ६५३.०० | १,१९१.७८ | ६५३.०० | ६५३.०० |
| २०११-१२ + | ७२७.६७ | ९४२.५३ | ७२७.६७ | २५९.८० |
| एकूण | २,१९६.६४ | ३,२४०.१२ | २,१७५.०३ | १,७०७.१६ |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + फेब्रुवारी पर्यंत

## राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

७.२४ केंद्र सरकारने फलोत्पादनाखालील क्षेत्र मार्च, २०१२ पर्यंत दुप्पट करण्याच्या मुख्य हेतूने २००५-०६ मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सुरु केले. अकाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत या योजनेत ८५ टक्के केंद्र शासनाचा व १५ टक्के राज्य शासनाचा सहभाग आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना राबविण्यासाठी २००५ मध्ये महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सुरुवातीपासून जानेवारी, २०१२ पर्यत ₹ ८९५.०३ कोटी अनुदान प्राप्त झाले व राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजनांसाठी फेब्रुवारी, २०१२ पर्यत ₹ ७.६३ कोटी अनुदान प्राप्त झाले. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजनांवर फेब्रुवारी, २०१२ अखेरपर्यंत अनुक्रमे ₹ ८२९.८८ कोटी व ₹ ७.०५ कोटी खर्च झाला.

७.२५ राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत साध्य करण्यात आलेल्या बाबींमध्ये ५४ नवीन रोपवाटिकांची स्थापना, ४.८५ लाख हेक्टर क्षेत्रावर नवीन फळबागा, फुले, मसाले, इ. ची लागवड, सुमारे ०.८८ लाख हेक्टर क्षेत्रावरील जुन्या फळबागांचे पुनर्रुज्जीवन, ४,७६० सामूहिक शेततळयांची बांधकामे, ०.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय शेती, १,९६० बंदगृहे व कापणीपश्चात व्यवस्थापनासाठी पायाभूत सुविधा इत्यादींचा समावेश आहे. राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियानांतर्गत ४९५.५४ हेक्टर क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली असून ५५९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

७.२६ राज्यात सन २०१०-११ मध्ये विविध फळपिकांतर्गत १५.३७ लाख हेक्टर इतके क्षेत्र होते. यामध्ये आंबा ४.७७ लाख हेक्टर, संत्री १.२८ लाख हेक्टर, मोसंबी १.०७ लाख हेक्टर, डाळिंब ०.८२ लाख हेक्टर, केळी ०.८२ लाख हेक्टर, चिकू ०.७० लाख हेक्टर आणि द्राक्षे ०.८६ लाख हेक्टर ही प्रमुख फळपिके होती.

७.२७ राज्य शासनाने फलोत्पादन विकासाला चालना देण्यासाठी फळ रोपवाटिकांची स्थापना करणे, सीमांतिक व अल्पभूधारक शेतकरी, तसेच अनुसूचित जाती व जमातीचे शेतकरी यांना निवडक फळझाडे वाढविण्यासाठी भांडवली सहाय्य देणे असे कार्यक्रम हाती घेतले आहेत. हा कार्यक्रम १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत करण्यात आला आहे. परिणामी, १९९०-९१ मध्ये फळपिकांखाली असलेल्या २.४२ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते मार्च २०११ पर्यंत १७.८२ लाख हेक्टर इतके वाढले. सन २०११-१२ मध्ये ०.५० लाख हेक्टर अतिरिक्त क्षेत्र फळपिकांखाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सन २०१०-११ मध्ये या योजनेवर ₹ ११९.५८ कोटी इतका खर्च करण्यात आला.

## वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम

७.२८ वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमाची सुरुवात १९९६-९७ मध्ये झाली. या कार्यक्रमांतर्गत २००५-०६ पर्यंत केंद्रीय अर्थसहाय्य देण्यात येत असे. परंतू, २००६-०७ पासून राज्यातील सिंचन प्रकल्पांसाठी अनुदान स्वरुपात केंद्रीय अर्थसहाय्य देण्यात येत आहे. याबाबतचा तपशील तक्ता ७.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१४ वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत सिंचन प्रकल्प**

(₹ कोटी)

| वर्ष | मोठे आणि मध्यम | लघु | खर्च |
|---|---|---|---|
| २००६-०७ | २४ | ९६ | १,१४०.६३ |
| २००७-०८ | ३६ | ११७ | २,२०७.५३ |
| २००८-०९ | ३७ | १२१ | २,७३४.२७ |
| २००९-१० | २३ | - | २,३४९.४७ |
| २०१०-११ | १६ | ४६ | २,३६३.९४ |
| २०११-१२+ | १२ | ६ | १,३२६.६० |

*आधार* : जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन + फेब्रुवारी पर्यंत

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान

७.२९ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान हा राष्ट्रीय विकास परिषदेने कृषी क्षेत्रासाठी सुरु केलेला एक महत्वाकांक्षी उपक्रम असून त्याचे उद्दिष्ट तांदूळ, गहू व कडधान्ये यांच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ करुन त्यांचे उत्पादन वाढविणे, तसेच जमिनीची उत्पादकता वाढवून सुपीकता टिकवून ठेवणे हे आहे. तसेच रोजगाराची निर्मिती करुन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा देखील या योजनेचा उद्देश आहे. या अभियानाअंतर्गत राज्यातून सहा जिल्हे तांदळासाठी, आठ जिल्हे गव्हासाठी आणि सर्व ३३ जिल्हे कडधान्यांसाठी निवडण्यात आले आहेत. सन २०११-१२ मध्ये राज्याने फेब्रुवारी महिन्यापर्यंत तांदळासाठी ₹ १६.८४ कोटी, गव्हासाठी ₹ १२.१२ कोटी व कडधान्यांकरिता ₹ ५४.५६ कोटी खर्च केले आहेत. आधीच्या वर्षी (२०१०-११ मध्ये) हा खर्च तांदळासाठी ₹ १९.१५ कोटी, गव्हासाठी ₹ २०.२९ कोटी व कडधान्यांसाठी ₹ ५१.७१ कोटी इतका होता.

## मृद व जलसंधारण

७.३० राज्यातील शेती बहुतांशी पावसावर अवलंबून असल्याने राज्यात मृद व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येतात. कोरडवाहू शेतीतील उत्पादकता वाढविणे व जमिनीची धूप थांबविणे यासाठी १९९३ पासून पाणलोट आधारित मृद व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत अनेक योजना तयार करण्यात येऊन राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमांतर्गत दुष्काळग्रस्त भागातील तीव्र पाणी टंचाई असलेल्या गावांची निवड करण्यात येते. या अंतर्गत सन २०११-१२ मध्ये जानेवारी, २०१२ पर्यंत १५,५३१ गावांची निवड करण्यात आली असून सदर गावांमध्ये २६,९४७ पाणलोट क्षेत्रांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कार्यक्रमावर २०११-१२ मध्ये (जानेवारी, २०१२ पर्यंत) ₹ २६६ कोटी खर्च करण्यात आले. याबाबतचा तपशील तक्ता ७.१५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.१५ राज्यातील पाणलोटाची कामे**

(₹ कोटी)

| वर्ष | खेड्यांची संख्या | हाती घेतलेल्या पाणलोट कामांची संख्या | खर्च |
|---|---|---|---|
| २००५-०६ | १३,०७४ | २६,६७९ | ४४४ |
| २००६-०७ | १७,३५१ | २७,५७३ | ४९१ |
| २००७-०८ | १८,६४५ | २७,१५१ | ६८१ |
| २००८-०९ | १४,७७३ | २६,८५८ | ७६६ |
| २००९-१० | २०,२६३ | २६,८९७ | ५३० |
| २०१०-११ | १५,४४९ | २६,९८५ | ६६२ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## सेंद्रिय शेती

७.३१ सृष्टीचा समतोल राखण्यास मदत करणारी सेंद्रिय शेती ही काळाच्या कसोटीवर उतरलेली शेतीची पध्दत असून त्याचा प्रकर्षाने प्रसार करण्याची गरज आहे. राज्यात सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'गांडूळ खत उत्पादन' ही केंद्र पुरस्कृत योजना २०००-०१ पासून सुरु करण्यात आली. तथापि, सदर योजनेची अ) गांडूळ खत उत्पादन आणि ब) सेंद्रिय शेतीचा वापर व प्रोत्साहन देणे या दोन मुख्य घटकांत पुनर्रचना करण्यात आली. सन २००३-०४ या वर्षापासून खताचा एकात्मिक वापर, सेंद्रीय शेतीचे प्रोत्साहन व प्रमाणीकरण आणि मृद परिक्षण व मृद आरोग्य पत्रिका वाटप या योजना सुरु करण्यात आल्या आहेत. सन २००८-०९ पासून हिरवळीचे खत हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. डिसेंबर, २०११ पर्यंत पारंपरिक शेतीच्या या योजनेद्वारे ७.३१ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्यात आले आहे. त्यापैकी १.५ लाख हेक्टर क्षेत्र प्रमाणीकरणांतर्गत आहे. सन २०१०-११ पर्यंत या योजनेअंतर्गत करण्यात आलेला संचित खर्च ₹ ५७ कोटी इतका होता. चालू वर्षामध्ये या योजनेसाठी ₹ ४.३१ कोटी इतके अनुदान मंजूर करण्यात आले असून जानेवारी, २०१२ पर्यंत ₹ १.९७ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

## कृषि वित्तपुरवठा

७.३२ राज्यातील शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्पमुदतीचे कर्जे, पतपुरवठा, इत्यादींच्या माध्यमातून वित्तिय सहाय्य केले जाते. देशातील राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही शेती व ग्राम विकासास हातभार लावून उत्तेजन देणारी आणि कृषि क्षेत्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणारी शिखर बँक आहे. कार्यनिहाय वितरीत करण्यात आलेल्या कर्जांचा तपशील तक्ता ७.१६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.१६ अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/जिमसबँ/भूविकास बँकांनी कार्यनिहाय दिलेली कर्जे**

(₹ कोटी)

| कार्य | अनुसूचित वाणिज्यिक बँका $ | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक/भूविकास बँक | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ |
| हंगामी कृषि कार्ये | ३,७५१ | ५,५६६ | ५२४ | ६०३ | ७,३१६ | ७,२०५ | ११,५९१ | १३,३७४ |
| लघु सिंचन | ३११ | ४३० | १३ | १८ | २०६ | २२० | ५३० | ६६८ |
| भूविकास | ९२ | २०७ | ३ | ६ | ११ | १७ | १०६ | २३० |
| कृषि यांत्रिकीकरण | ३८२ | ५३३ | ९ | १६ | १४३ | १६० | ५३४ | ७०९ |
| फलोत्पादन | ४९८ | ५९० | ३ | ६ | ११६ | ५१७ | ६१७ | १,११३ |
| पदूम | २४६ | ३१९ | २० | २२ | १०० | ११९ | ३६७ | ४५९ |
| इतर | १,३१४ | १,७७४ | ३१ | २१ | १२४ | १५७ | १,४६९ | १,९५२ |
| **एकूण** | **६,५९४** | **९,४१९** | **६०३** | **६९२** | **८,०१६** | **८,३९५** | **१५,२१४** | **१८,५०५** |

*आधार* : राष्ट्रीय कृषि व ग्रामविकास बँक $ राष्ट्रीयकृत बँका धरुन

७.३३ राज्यात सर्वात निम्न स्तरावर कृषि वित्तपुरवठा करण्याशी थेट संबंधित अशा वित्तिय संस्था म्हणजे स्वत:च्या शेतकरी सभासदांना अल्प मुदतीची पीक कर्जे देणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था आहेत. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांचा तपशील तक्ता ७.१७ मध्ये देण्यात आलेला आहे.

**तक्ता ७.१७ शेतकऱ्यांना प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थानी दिलेली कर्जे**

(₹ कोटी)

| बाब | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २१,२३८ | २१,२४८ | २१,२८५ | २१,३९२ | २१,४५१ |
| सदस्य (लाख) | १२२ | १४७ | १४८ | १५० | १५० |
| एकूण कर्जे | ५,७८८ | ६,१८९ | ५,२८६ | ६,९९१ | ६,१५८ |
| *पैकी* लहान व सीमांतिक शेतकऱ्यांना | २,४७० | २,५६० | २,७२१ | ३,२८४ | ३,८४७ |

आधार : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## किसान क्रेडिट कार्ड योजना

७.३४ शेतकऱ्यांना अल्पमुदतीचे कर्ज व वाजवी प्रमाणातील दैनंदिन गरजांचा खर्च भागविण्याकरीता सर्वसमावेशक पतपुरवठा एक खिडकीद्वारे पुरेशा प्रमाणात व वेळेवर लवचिक आणि सुलभ कार्यपध्दतीतून करण्यासाठी राज्यात १९९९ मध्ये किसान क्रेडिट कार्ड योजनेची सुरुवात करण्यात आली. २००५-०६ पर्यंत ही योजना केवळ अल्प मुदतीच्या कर्जापुरती मर्यादित होती व तद्नंतर २००६-०७ पासून दीर्घ मुदतीची कर्जेसुध्दा मंजूर करण्यात येत आहेत. राज्यात नोव्हेंबर, २०११ अखेर ९७.६१ लाख किसान क्रेडिट कार्डे वाटप करण्यात आले.

त्यापैकी ५७.०१ लाख सहकारी बँकामार्फत, ३.८१ लाख प्रादेशिक ग्रामीण बँकामार्फत व ३६.७९ लाख वाणिज्यिक बँकामार्फत वाटप करण्यात आले आणि त्यांचेकडून अनुक्रमे ₹ ३३,६५७.९४ कोटी, ₹ १,४२९.६४ कोटी व ₹ १८,२०८.७१ कोटी मंजूर करण्यात आले विभागनिहाय वहितीधारकांची संख्या व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत वाटप करण्यात आलेल्या किसान क्रेडिट कार्डांची संख्या याबाबतचा तपशील तक्ता ७.१८ मध्ये देण्यात आलेला आहे, तर वर्षनिहाय कर्जपुरवठ्याचा तपशील तक्ता ७.१९ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ७.१८ वहिती खातेदारांची आणि म.रा.सह.बँकेने वाटप केलेल्या किसान क्रेडीट कार्डांची संख्या**

| विभाग | वहिती खातेदारांची संख्या (२००५-०६ च्या कृषि गणनेनुसार) (लाख) | ३० सप्टे.२०११ पर्यंत वाटप करण्यात आलेल्या क्रेडिट कार्डांची संख्या (लाख) | किसान क्रेडिट कार्डांची वहिती खातेदारांशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| कोकण | १३.३० | ३.१४ | २३.६ |
| पुणे | ३५.९५ | १३.७० | ३८.१ |
| नाशिक | २५.९३ | ११.६९ | ४५.१ |
| औरंगाबाद | ३३.२९ | १७.१४ | ५१.५ |
| अमरावती | १५.६१ | ७.२५ | ४६.४ |
| नागपूर | १३.०८ | ४.२१ | ३२.२ |

*आधार* : १. कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

२. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक

**तक्ता ७.१९ म.रा.सह.बँकेने शेतकऱ्यांना दिलेली कृषि कर्जे**

(₹ कोटी)

| वर्ष | लघु मुदतीची कर्जे | | दीर्घ मुदतीची कर्जे | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थींची संख्या (हजारात) | रक्कम | लाभार्थींची संख्या (हजारात) | रक्कम |
| २००७-०८ | २,८६७ | ४,३३२ | १०.८ | २०२ |
| २००८-०९ | २,३११ | २,३१० | १५.६ | २३७ |
| २००९-१० | ३,४७० | ६,३५३ | २०.३ | ५०९ |
| २०१०-११ | ३,४९९ | ७,११० | २६.८ | ५४६ |
| २०११-१२+ | ३,०१७ | ७,०६९ | २९.२ | ३२७ |

आधार : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक + नोव्हेंबर पर्यंत

## कृषि पणन

७.३५ शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळण्यासाठी, शेतकऱ्यांची दलालांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी तसेच ग्राहकाला शेतमाल वाजवी दरात उपलब्ध व्हावा यादृष्टीने शासन विविध मार्गाने शेतकऱ्यांना मदत करीत असते. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ (मराकृपमं) यांच्याकडे राज्यातील बाजार समित्यांच्या कामांमध्ये आवश्यक समन्वय साधणे, कृषि उत्पन्न बाजार समितीचा (कृउबास) विकास व प्रसार, कृषि निर्यात क्षेत्राची स्थापना, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र आणि प्रतवारी व संवेष्टन सुविधांची स्थापना करणे इत्यादी कार्ये मुख्यत्वे सोपविली आहेत. राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य याबाबतचा तपशील तक्ता ७.२० मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२० बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्याचे मूल्य**

| वर्ष | आवक (लाख मे. टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २००५-०६ | १७८.७७ | १७,२९३.४७ |
| २००६-०७ | १६४.६० | २३,१०१.६० |
| २००७-०८ | ११८.०४ | १७,०१९.४९ |
| २००८-०९ | २१०.९७ | ३२,५१५.५२ |
| २००९-१० | २२५.८७ | ३७,०७९.९५ |

टीप : २००६-०७ पर्यंत आर्थिक वर्ष ऑक्टोबर ते सप्टेंबर

२००७-०८ साठी आार्थिक वर्ष सप्टेंबर ते मार्च

२००८-०९ पासून आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्च

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

७.३६ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) अधिनियम, १९६३ यात २००५ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यामध्ये थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार, एकल अनुज्ञाप्त्या, कंत्राटी शेती इत्यादिचा अंतर्भाव करण्यात आला आहे. कायद्यातील या बदलानुसार आतापर्यंत १०१ थेट पणन अनुज्ञाप्त्या दिलेल्या असून त्यापैकी ५४ कापूस खरेदीकरिता व ४७ इतर कृषि मालाकरिता आहेत. या व्यतिरिक्त आठ खाजगी बाजारांना अनुज्ञाप्त्या देण्यात आल्या असून त्यापैकी सहा बाजार कार्यरत आहेत, तर नॅशनल स्पॉट एक्सचेन्ज आणि नॅशनल कमोडिटी अॅन्ड डेरिव्हिटिव्हज एक्सचेन्ज यांचे कामकाज इंटरनेटच्या माध्यमातून सुरु आहे.

## किमान आधारभूत किंमत योजना

७.३७ नैसर्गिक आपत्ती व व्यापारी देऊ करत असलेल्या कमी किंमतींपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच कृषि कार्ये आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र शासन काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. या योजनेअंतर्गत शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषि

सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांचेमार्फत केली जाते. सन २०१०-११ आणि २०११-१२ या वर्षांत जाहीर करण्यात आलेल्या किमान आधारभूत किंमतीबाबतचा तपशील तक्ता ७.२१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.२१ राज्यातील प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

| पीक | किमान आधारभूत किंमती (₹ / क्विंटल) | |
|---|---|---|
| | २०१०-११ | २०११-१२ |
| भात (साधारण वाजवी प्रत) | १,००० | १,०८० |
| भात (प्रत-अ) | १,०३० | १,११० |
| ज्वारी | ८८० | ९८० |
| मका | ८८० | ९८० |
| बाजरी | ८८० | ९८० |
| हरभरा | १,७६० | २,१०० |
| तूर | ३,००० | ३,२०० |
| मूग | ३,१७० | ३,५०० |
| सुर्यफुल | २,३५० | २,८०० |
| सोयाबीन (पिवळा) | १,४४० | १,६९० |
| भूईमुगाच्या शेंगा | २,३०० | २,७०० |
| कापूस | ३,००० | ३,३०० |

*आधार* : १. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, २. नाफेड
३. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ

## कृषि संजीवनी योजना -२०११

७.३८ विजेच्या दरात मोठी सवलत दिली तरी अनेक शेतकऱ्यांकडे विजेची देयके थकलेली आहेत. शेतकऱ्यांकडे डिसेंबर, २०१० अखेर विज बिलापोटी सुमारे ₹ ५,९०० कोटीची थकबाकी असून यापैकी ₹ २,९१० कोटी मुद्दल, ₹ २,९३० कोटी व्याज आणि ₹ ६० कोटी दंड व्याज आहे. या समस्येतून मार्ग काढता यावा म्हणुन राज्याने शेतकऱ्यांसाठी 'कृषि संजीवनी योजना २०११' लागू केली आहे. या योजनेनुसार ३१.१२.२०१० पर्यंतची मुद्दलाची थकबाकी ३०.६.२०११ पर्यंत पूर्णपणे भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज व विलंब आकार माफ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत ४,१२,२३३ ग्राहकांनी लाभ घेतला असून याद्वारे ₹ २५०.८२ कोटी थकीत रकमेची वसूली झाली.

## राष्ट्रीय कृषी विमा योजना

७.३९ राज्यामध्ये १९९९-२००० च्या रब्बी हंगामापासून राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये १६ खरीप आणि १० रब्बी पिकांचा समावेश होतो. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या लाभाचा तपशील तक्ता ७.२२ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.२२ राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत शेतकरी**

(₹ कोटी)

| वर्ष | लाभार्थी शेतकरी | | | नुकसान भरपाई | |
|---|---|---|---|---|---|
| | शेतकरी संख्या (लाखात) | विमा रक्कम | विमा हप्ता | शेतकरी संख्या (लाखात) | रक्कम |
| २००६-०७ | १६.७६ | ८५०.३५ | ३८.४५ | ६.२१ | १४०.५९ |
| २००७-०८ | १९.८३ | ८७९.२२ | ३२.१२ | २.६० | ८६.३१ |
| २००८-०९ | ३५.०२ | १,६६५.४५ | ७४.८१ | १७.२३ | ४७३.९१ |
| २००९-१० | ३१.८३ | २,५०७.१६ | १०३.०५ | १३.२९ | ३७६.२६ |
| २०१०-११* | २२.०४ | १,३२४.६४ | ५१.७२ | ०.८५ | १४.८४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## किसान जनता अपघात विमा योजना

७.४० अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी राज्य शासनाने २००५-०६ मध्ये शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत १३ प्रकारच्या अपघातांसाठी विमा संरक्षण देण्यात येते. आता या योजनेला किसान जनता अपघात विमा योजना असे नवे नाव देण्यात आले आहे. सन २०११-१२ मध्ये हप्त्यापोटी ₹ १९.१८ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली असून, फेब्रुवारी, २०१२ पर्यंत ४७२ नवीन प्रस्ताव प्राप्त झाले व १६१ प्रस्तावांची रक्कम अदा करण्यात आली. याबाबतचा तपशील तक्ता ७.२३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.२३ किसान जनता अपघात विमा योजनेंचा तपशिल**

(₹ कोटी)

| वर्ष | योजने अंतर्गत शेतकरी | | | शेतकऱ्यांना दिलेली नुकसान भरपाई |
|---|---|---|---|---|
| | शासनाने भरलेला विमा हप्ता | एकुण प्राप्त विमा प्रस्ताव (संख्या) | मंजूर विमा प्रस्ताव (संख्या) | |
| २००६-०७ | ७.७३ | २,६५१ | १,२९० | १२.९० |
| २००७-०८ | ९.५३ | २,८९५ | १,४४५ | १४.४५ |
| २००८-०९ | ९.५३ | २,७२८ | १,६५० | १६.५० |
| २००९-१० | १०.९६ | ३,०६७ | २,०४७ | २०.३४ |
| २०१०-११ | १९.१८ | ३,१३८ | २,३९७ | २३.८४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## पशुसंवर्धन

७.४१ ग्रामीण भागातील मुख्यतः कृषिवर उपजिविका अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबांना अतिरिक्त उत्पन्नासाठी मोठया प्रमाणात संधी उपलब्ध करण्यात पशुधन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसायाची महत्त्वाची भूमिका आहे. पशुधन गणना, २००७ नुसार राज्यातील एकूण पशुधन सुमारे ३६० लाख असून दर लाख लोकसंख्येमागे पशुधन ३१,९९५ इतके होते जे राष्ट्रीय स्तरावरील ४३,७७० पशुधनाच्या तुलनेत बरेच कमी होते. देशातील एकूण कुक्कुटपालनामध्ये राज्याचा हिस्सा १० टक्के होता. पशुधन व कुक्कुटपालनामध्ये राज्याचा देशात सहावा क्रमांक आहे. पशुधन व कुक्कुटपालनाची आकडेवारी तक्ता ७.२४ मध्ये दर्शविली असून तपशीलवार माहिती परिशिष्ट ७.७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता ७.२४ पशुधन व कुक्कुटपालन विषयक सांख्यिकी**

(लाख)

| तपशील | पशुधन गणना | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९७ | २००३ | २००७* | २००७ मध्ये २००३ च्या तुलनेत शेकडा बदल |
| गुरे | १८०.७१ | १६७.३८ | १६१.८४ | (-) ३.३ |
| म्हशी | ६०.७३ | ६०.८४ | ६०.७३ | (-) ०.२ |
| शेळया व मेंढया | १४८.०२ | १३६.२४ | १३३.०१ | (-) २.४ |
| इतर पशुधन | ६.९२ | ६.१२ | ३.९७ | (-) ३५.१ |
| **एकूण पशुधन** | **३९६.३८** | **३७०.५८** | **३५९.५५** | (-) ३.० |
| **कुक्कुटपालन** | **३५३.९२** | **३४५.९६** | **६४७.५६@** | **८७.३** |

*आधार* : पशुधन गणना, भारत सरकार   * अस्थायी   @ परसातील कुक्कुटपालन धरुन

## पशुधनासाठी पायाभूत सुविधा

७.४२ राज्यामध्ये मार्च,२०११ अखेर ३२ पशुवैद्यकीय बहुचिकित्सालये, १,७३८ पशुवैद्यकीय दवाखाने, २,८५३ प्राथमिक पशुवैद्यकीय उपचार केंद्रे, ६५ फिरती पशुवैद्यकीय चिकित्सालये आणि १७१ तालुका पशुवैद्यकीय लघु बहुचिकित्सालये याद्वारे पशुधनाच्या आरोग्याची निगा राखण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सर्व ४,८५९ केंद्रांमध्ये कृत्रिम रेतनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथे गोठवलेल्या वीर्याच्या नळया निर्मितीच्या तीन प्रयोगशाळा आहेत. याद्वारे व २७ जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रांद्वारे गोठीत वीर्याच्या नळयांचा पुरवठा राज्यातील सर्व कृत्रिम रेतन केंद्रांना केला जातो. विभागनिहाय कृत्रिम रेतन कार्यक्रमाची प्रगती तक्ता ७.२५ मध्ये दर्शविली आहे आणि कृत्रिम रेतन कार्यक्रमाची भौतिक प्रगती तक्ता ७.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२५ विभागनिहाय कृत्रिम रेतन कार्यक्रमाची भौतिक प्रगती**

| विभागाचे नाव | पशुधन (गणना-२००७) | पशुधन-पायाभूत सुविधा | कृत्रिम रेतनाचे वार्षिक लक्ष्य | कृत्रिम रेतनाचे साध्य (टक्केवारी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ |
| कोकण | २१,३५,५१९ | ५३७ | ९०,४४४ | ५९.० | ६६.५ | ३२.४ |
| नाशिक | ८४,१६,१६९ | ९०१ | ५,२९,४४७ | ५९.७ | ६६.३ | ३२.८ |
| पुणे | ८२,५१,४७४ | १,०६१ | १२,५७,७१० | ६२.७ | ६७.१ | ३१.३ |
| औरंगाबाद | ४०,९३,१७२ | ४७७ | २,६०,७७७ | ६१.५ | ६५.१ | ३०.८ |
| लातूर | ३५,०५,५९७ | ४८५ | २,१८,९६० | ८४.२ | ८९.९ | ३९.५ |
| अमरावती | ४५,६७,५०८ | ६२५ | २,१३,२२४ | ७७.४ | ८६.२ | ३९.७ |
| नागपूर | ४९,८४,१७१ | ८०० | १,८९,३०० | ६३.६ | ७१.४ | ३६.१ |
| महाराष्ट्र | ३,५९,५३,६१० | ४,८८६ | २७,५९,८६२ | ६४.६ | ७०.३ | ३३.२ |

*आधार*: पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन. + ऑक्टोबर पर्यंत

**तक्ता ७.२६ कृत्रिम रेतन कार्यक्रमाचे साध्य**

(लाख)

| तपशील | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| **१) गायी (कृत्रिम रेतन)** | | | | |
| अ) संकरित | ८.५६ | ८.७५ | ४.४२ | २.२ |
| ब) विदेशी | २.९० | २.९४ | १.४८ | १.४ |
| क) देशी | १.४२ | १.६१ | ०.८६ | १३.४ |
| **एकूण (कृत्रिम रेतन)** | **१२.८८** | **१३.३०** | **६.७६** | **३.३** |
| **जन्मलेल्या वासरांची संख्या** | ४.३० | ४.५० | २.४६ | ४.७ |
| **२) म्हशी (कृत्रिम रेतन)** | ६.०२ | ६.११ | २.३९ | १.५ |
| **जन्मलेल्या रेडकांची संख्या** | १.९१ | २.०२ | ०.९६ | ५.८ |

*आधार*: पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर पर्यंत

## राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प

७.४३ राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प हा १०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून तो पशु प्रजनन सेवेचे बळकटीकरण व विस्तारीकरण, देशी जातीचे संवर्धन तसेच ग्रामीण युवकांच्या स्वयंरोजगार निर्मितीसाठी महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी सन २०१०-११ मध्ये ₹ १६.५७ कोटी इतका निधी केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिला व त्यापैकी ₹ ८.६३ कोटी खर्च झाला आहे. डिसेंबर, २०११ पर्यंत केंद्र शासनाने ₹ १० कोटी इतक्या निधीची तरतूद केली असून त्यापैकी ₹ ५.३२ कोटी इतका खर्च झाला आहे. हा सर्व खर्च गोठीत वीर्यांसाठीच्या तीन प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण, कृत्रिम रेतनासाठी ९६ वळू खरेदी, ६३० वंध्यत्व निवारण शिबिरांचे आयोजन, गर्भ प्रत्यारोपण तंत्रज्ञान राबविणे आणि कृत्रिम रेतनासाठी कार्यरत २,४०० कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर झाला आहे.

७.४४ राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्पांतर्गत शुध्द देशी जातींच्या जनावरांचे प्रभावी जतन व संवर्धनाकरिता महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळामार्फत सन २०१०-११ मध्ये १४ खिल्लार,२० गवळाऊ, ३ सुरती व ३ जर्सी एचएफ जातीचे वळू नैसर्गिक संयोगाकरिता १०० टक्के अनुदानावर स्थानिक स्तरावर वाटप करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त राज्यातील देशी म्हशींची दूध उत्पादनाची कमी क्षमता लक्षात घेता नैसर्गिक संयोगाकरीता जानेवारी, २०१२ पर्यंत २५९ मुऱ्हा जातीचे रेडे १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यात आले असून गरजू शेतकऱ्यांना/ पशुपालकांना एकूण ३०० मुऱ्हा जातीचे रेडे वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## पशुधन विमा योजना

७.४५ पशुधन विमा योजना ही केंद्र पुरस्कृत असून राज्यात २००६-०७ पासून महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळामार्फत शेतकरी किंवा पशुपालकांकडे उपलब्ध असलेल्या जनावरांच्या कायमस्वरुपी अपंगत्व किंवा आकस्मिक मृत्यूमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणे आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पशुधन व तद्अनुषंगिक उत्पादनात गुणात्मक सुधारणा करणे या दुहेरी उद्देशाने राबविण्यात येत आहे.

७.४६ या योजनेअंतर्गत प्रति पशुपालक दोन दुधाळ जनावरांचा विमा उतरविण्यात येतो. केंद्रीय सहाय्यामधून विमा हप्त्याची ५० टक्के रक्कम दिली जाते व उर्वरित ५० टक्के रक्कम पशुधनाच्या मालकाने भरावयाची असते. वर्ष २०१०-११ पासून ही योजना नाशिक, जळगांव, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, बीड, लातूर, नांदेड, नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ आणि जालना या १८ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. प्रारंभापासून या योजनेंतर्गत विमा उतरविलेल्या जनावरांची व त्यासाठी झालेल्या खर्चाची माहिती तक्ता ७.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२७ पशुधन विमा योजनेच्या प्रगतीचा तपशील**

| वर्ष | योजनेंतर्गत जिल्ह्यांची संख्या | विमा उतरविलेल्या जनावरांची संख्या | झालेला खर्च (₹ लाख) |
|---|---|---|---|
| २००६-०७ | ६ | ३३,७५४ | २०७.५६ |
| २००७-०८ | ६ | २७,९३८ | २२८.५७ |
| २००८-०९ | ६ | ०० | ००.०० |
| २००९-१० | ६ | २,२९४ | ६५.९८ |
| २०१०-११ | १८ | १४,८७२ | ७५.३८ |
| २०११-१२ + | १८ | १३,७७० | १९२.५१ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + जानेवारी पर्यंत

## कुक्कुट विकास

७.४७ राज्यात कुक्कुटपालन मुख्यतः खाजगी कुक्कुटपालकांकडून केले जाते. राष्ट्रीय पोषण संस्थेने आपल्या देशासाठी प्रति वर्षी प्रति व्यक्ती १८० अंडी व ११ किलो कोंबडीचे मांस सेवनाची शिफारस केली आहे. सद्यस्थितीत राष्ट्रीय स्तरावर प्रति व्यक्ती कोंबडीच्या मासाची उपलब्धता १.६ किलो आणि अंडयांची उपलब्धता १.८ किलो किंवा ४२ अंडी अशी आहे. मोठया शहरात सरासरी सेवनाचे प्रमाण १७० अंडी असे असून छोटया शहरांमध्ये ४० अंडी तर विकसित ग्रामीण भागात २० अंडी व अविकसित ग्रामीण भागात फक्त ५ अंडी असे आहे. ही बाब हया क्षेत्राच्या विकासाची क्षमता दर्शविते. म्हणूनच राज्य शासनाने कंत्राटी पध्दतीद्वारे कुक्कुटपालनास चालना देण्याचे ठरविले आहे. यासाठी वर्ष २०११-१२ मध्ये ₹ २९.७५ कोटीची तरतूद केली व जानेवारीपर्यंत ती ३३ जिल्ह्यात वितरित केली. राज्यात कोल्हापूर व नाशिक जिल्हयात कंत्राटदाराची निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून उर्वरित जिल्हयात ही प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. राज्याच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा झालेल्या कुक्कुट पक्षांची माहिती आणि राज्यात व देशात अंडयांची वार्षिक दरडोई उपलब्धता तक्ता ७.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२८ कुक्कुट पालनाबाबत माहिती**

| वर्ष | पुरवठा करण्यात आलेल्या पक्षांची संख्या (लाख) | अंडयांची उपलब्धता (वार्षिक दरडोई) | |
|---|---|---|---|
| | | राज्य | देश |
| २००७-०८ | ६.४० | ३२ | ४७ |
| २००८-०९ | ५.०७ | ३३ | ४७ |
| २००९-१० | ५.७१ | ३५ | ५१ |
| २०१०-११ | ३.८७ | ३८ | ५३ |
| २०११-१२ + | १.२९ | उ.ना. | उ.ना. |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, उ.ना. उपलब्ध नाही
+ नोव्हेंबर पर्यंत.

## दुग्ध विकास

७.४८ दुग्धव्यवसाय हा असा कृषिपूरक व्यवसाय आहे की, ज्यामुळे ग्रामीण कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन अतिरिक्त उत्पन्नासह त्यांच्या आहाराच्या पोषण मूल्यात वृध्दी होते. दूध उत्पादनामध्ये राज्याचा भारतामध्ये सहावा क्रमांक आहे.दुग्ध उत्पादन व प्रति व्यक्ती दुधाच्या उपलब्धतेबाबतची माहिती तक्ता ७.२९ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.२९ दुधाचे उत्पादन व प्रति व्यक्ती उपलब्धता**

| वर्ष | दुधाचे उत्पादन (दशलक्ष मे.टन) | | प्रति व्यक्ती उपलब्धता (ग्रॅम प्रति दिन) | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | देश | राज्य | देश |
| २००७-०८ | ७.२ | १०४.८ | १८४ | २५२ |
| २००८-०९ | ७.५ | १०८.५ | १८७ | २५८ |
| २००९-१० | ७.७ | ११२.५ | १९० | २६४ |
| २०१०-११ | ८.० | १२१.८ | १९६ | २८१ |
| २०११-१२* | ८.२ | १२७.३ | उ.ना. | उ.ना. |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अपेक्षित उ.ना. उपलब्ध नाही

७.४९ राज्यात २०१०-११ मध्ये एकूण ६८ दुग्धप्रक्रिया प्रकल्प व १३९ शासकीय/सहकारी दुग्धशीतकरण केंद्रे कार्यरत होती व त्यांची प्रतिदिन क्षमता अनुक्रमे ७७.६८ लाख लिटर व २७.०७ लाख लिटर होती. राज्यातील शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे एकत्रित सरासरी दैनिक दूधसंकलन २०१०-११ मध्ये ३५.५७ लाख लिटर होते आणि २०११-१२ मध्ये (ऑक्टोबर पर्यंत) ३६.१६ लाख लिटर होते, जे राज्यातील एकूण दूध संकलनात खाजगी दुग्धशाळांच्या तुलनेत अत्यल्प आहे. शासकीय दूध योजनेतील दुग्ध उपउत्पादनांबाबत माहिती तक्ता ७.३० मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३० शासकीय आणि सहकारी दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादने**

| उप उत्पादन | परिमाण | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| दुध भुकटी | मे.टन | ३३९.०० | २५५.६३ | ३०.४३ | (-) २४.६ |
| पांढरे लोणी | मे.टन | १८९.०० | १४२.३० | १६.९२ | (-) २४.७ |
| तूप | मे.टन | ५२५.०० | १०३.८३ | १४.९२ | (-) ८०.२ |
| एनर्जी | लाख बाटल्या | ५८.२८ | ६१.५८ | ३२.५९ | ५.७ |
| लस्सी | लाख बाटल्या | ५८.४५ | ६०.४८ | २२.०९ | ३.५ |
| मसाला दूध | लाख बाटल्या | १०.२२ | १२.५३ | ४.२८ | २२.६ |
| गायीचे टिकाऊ दूध | लाख बाटल्या | २.२४ | १.७५ | ०.७३ | (-) २१.९ |

*आधार* : दुग्धव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर पर्यंत

## पशुधन व कुक्कुट उत्पादन

७.५० महाराष्ट्र हे पशुधन संबंधित उत्पादने व कुक्कुट उत्पादनांत देशातील प्रमुख राज्यांपैकी एक आहे. राज्यातील दूध, मांस, लोकर व अंडी यांचे उत्पादन तक्ता ७.३१ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता ७.३१ प्रमुख राज्यनिहाय दूध, अंडी, मांस व लोकर यांचे उत्पादन**

| राज्य | दूध ( '००० टन) | | अंडी (लाख) | | मांस ( '००० टन) | | लोकर ( '००० कि.ग्रॅ.) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ |
| आंध्र प्रदेश | १०,४२९ | ११,२०३ | १,९३,९५८ | २,०१,२७७ | ६७९ | ७४७ | ४,६०५ | ४,८३२ |
| गुजरात** | ८,८४४ | ९,३२१ | १२,७६२ | १३,२६९ | २१ | २२ | २,९११ | २,९१८ |
| कर्नाटक | ४,८२२ | ५,११४ | २९,०९४ | ३०,६७४ | ११९ | १२४ | ७,१६५ | ७,१७९ |
| मध्यप्रदेश | ७,१६७ | ७,५१४ | ७,०७५ | ७,५७७ | ३६ | ३८ | ३७० | ३७२ |
| **महाराष्ट्र** | **७,६७९** | **८,०४४** | **३८,६४०** | **४२,२४५** | **५४५** | **५६३** | **१,७२६** | **१,४४८** |
| पंजाब | ९,३८९ | ९,४२३ | ३२,८२८ | ३५,४४९ | १४७ | १७५ | ४८५ | ५०६ |
| तामिळनाडू | ५,७७८ | ६,८३१ | १,०८,४७६ | १,१५,१३७ | ४५७ | ४२४ | ३१ | १ |
| उत्तर प्रदेश | २०,२०३ | २१,०३१ | १०,५९६ | १०,९११ | ४९६ | ८४५ | १,५२३ | १,५४३ |
| पश्चिम बंगाल | ४,३०० | ४,४७१ | ३२,३०७ | ३९,९३९ | ३४८ | ५७७ | ६९७ | ७०५ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन ** असंघटित क्षेत्र वगळून

## मत्स्यव्यवसाय

७.५१ मत्स्यव्यवसाय क्षेत्राद्वारे मुख्यतः सागरी किनारी क्षेत्रात रोजगार निर्मिती होते. कृषि व संलग्न कार्यांच्या स्थूल राज्य उत्पन्नात मत्स्यव्यवसाय या क्षेत्राचा २०१०-११ मधील वाटा १.७ टक्के होता. राज्याला ७२० किलोमीटर सागरी किनारा लाभला असून १.१२ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र सागरी मासेमारीसाठी योग्य आहे. या व्यतिरिक्त, राज्यात ३.०१ लाख हेक्टर क्षेत्र गोड्यापाण्यातील व ०.१९ लाख हेक्टर क्षेत्र निमखा-या पाण्यातील मासेमारीस योग्य आहे. राज्याच्या सागरीतटावर मासळी उतरविण्याची १६२ केंद्रे आहेत. सागरी व गोड्या पाण्यातील अंदाजित मत्स्योत्पादन क्षमता ६.३ लाख मेट्रीक टन इतकी अंदाजित करण्यात आली असून मत्स्यव्यवसायाची महत्त्वाची सांख्यिकी तक्ता ७.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३२ मत्स्यव्यवसायाची महत्त्वाची सांख्यिकी**

| बाब | परिमाण | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२*+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** | लाख मे.टन | | | | |
| सागरी | | ४.१६ | ४.४७ | ३.१२ | ७.५ |
| गोडया पाण्यातील | | १.२३ | १.३० | १.०० | ५.७ |
| **एकूण** | | **५.३९** | **५.७७** | **४.१२** | **७.१** |
| **मत्स्य उत्पादनाचे स्थूल मूल्य** | ₹ कोटी | | | | |
| सागरी | | १,८७२ | २,१४७ | १,५६६ | १४.७ |
| गोडया पाण्यातील | | ६१६ | ८५२ | ६५० | ३८.३ |
| **एकूण** | | **२,४८८** | **२,९९९** | **२,२१६** | **२०.५** |
| **मत्स्य उत्पादनाची निर्यात** | | | | | |
| अ) उत्पादन | लाख मे.टन | १.३२ | १.५८ | १.३६++ | १९.७ |
| ब) मूल्य | ₹ कोटी | २,०२७ | २,२४४ | २,१२६.०४++ | १०.७ |
| **सागरी मासेमारी बोटी (वापरातील)** | संख्या | १३,७०७ | १४,४४६ | १५,००० | ५.४ |
| *यापैकी, यांत्रिकी* | | ११,५०५ | १२,१५४ | १२,७०० | ५.६ |

*आधार* : मत्स्यव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत ++ फेब्रुवारी पर्यंत * अस्थायी

## रेशीम उत्पादन

७.५२ रेशीम उत्पादन व्यवसाय हा कृषि-कुटीर उद्योग असून यामध्ये ग्रामीण भागात रोजगार निर्मितीबरोबर शेतकऱ्यांचे अतिरिक्त उत्पन्नाचे साधन बनण्याची क्षमता आहे. रेशीम उद्योगात तुती व ऐन या वृक्षांची लागवड, रेशीम किड्यांचे संगोपन, कोष व कच्च्या रेशमाचे उत्पादन यांचा समावेश आहे. राज्यातील वातावरण हे रेशीम उद्योगास पोषक आहे. देशात अपारंपारिक पध्दतीने रेशीम उत्पादन करणा-या राज्यांमध्ये महाराष्ट्र प्रथम स्थानावर आहे. राज्यात २३ जिल्ह्यांमध्ये तुती रेशीम विकास कार्यक्रम राबविला जात असून विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये टसर रेशीम विकास कार्यक्रम राबविला जात आहे. रेशीम उत्पादन कार्यक्रमाची प्रगती तक्ता ७.३३ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३३ रेशीम उत्पादन कार्यक्रमाची स्थिती**

| बाब | तुती रेशीम | | | | | | टसर रेशीम | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेत शेकडा बदल | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेत शेकडा बदल |
| लागवडीखालील क्षेत्र (हेक्टर) | ४,११२ | ४,३४५ | ३,७४३ | २,९३० | २,३२३ | (-) २१.७ | १८,५१९ | १८,५१९ | १८,५१९ | १८,८६६ | १८,८६६ | १.९ |
| रोगविरहीत अंडीपुजांचा पुरवठा (संख्या लाख) | २७.९९ | ३८.१४ | ३६.८१ | ३०.५९ | २०.६५ | (-) १६.९ | ४.०७ | ५.०२ | ५.६० | ५.७५ | ८.३७ | २.७ |
| कोष उत्पादन @ | १,१८४ | १,५९३ | १,७४४ | १,५९० | १,१०४ | (-) ८.८ | ९३ | ११० | २०८.२२ | १६८.६१ | ३०७.३६ | (-) १९.० |
| कच्चे रेशीम उत्पादन (मे.टन) | २०.८८ | २८.५३ | २१८.०० | १९८.७७ | १३८.०० | (-) ८.८ | ०.७५ | १.०८ | ७.०० | ६.७४ | १२.२९ | (-) ३.७ |
| रोजगार निर्मिती (संख्या) | ५२,७५० | ५७,६६५ | ४६,७९५ | ३६,६३० | २९,०३७ | (-) २१.७ | १३,०६० | १५,००० | १०,००० | ९,२५० | ११,६०५ | (-) ७.५ |

*आधार* : रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन @ तुती मे.टनात व टसर संख्या लाखात + फेब्रुवारी पर्यंत

## वने

७.५३ राज्यात कृषिव्याप्त क्षेत्रानंतर दुसरे मोठे क्षेत्र वनाखाली आहे. कृषि व संलग्न कार्यांच्या स्थूल राज्य उत्पन्नात वने या क्षेत्राचा २०१०-११ मधील वाटा १३.९ टक्के होता. राज्याचे एकूण वनक्षेत्र ६१,९३९ चौ.कि.मी. (अस्थायी) आहे जे राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के एवढे होते. राज्यातील वनक्षेत्र मुख्यत: वन विभाग, वन विकास महामंडळ (म.व.वि.म.) व महसूल विभाग यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली आहे. एकूण वनक्षेत्रापैकी ४९,२२३ चौ.कि.मी. राखीव वन, ८,१९४ चौ.कि.मी. संरक्षित वन व ४,५२२ चौ.कि.मी. अवर्गीकृत वन आहे. राज्यातील वनांच्या वृक्षाच्छादनाची वर्गवारी उपग्रहाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे करण्यात आली असून त्यानुसार वृक्षाच्छादन घनतेची वर्गवारी अति घनदाट जंगल, जेथे वृक्षाच्छादनाची घनता ७० टक्क्यापेक्षा जास्त आहे, मध्यम दाट जंगल, जेथे ही घनता ४० ते ७० टक्क्यांपर्यत आहे, खुले वन, जेथे ही घनता १० ते ४० टक्के इतकी आहे व खुरटे वन जेथे ही घनता १० टक्क्यापेक्षा कमी आहे, अशा चार वर्गात केली आहे. उर्वरीत वनक्षेत्रात वृक्षाचे अस्तित्व नसलेले व पाण्याखालील क्षेत्र यांचा समावेश आहे. कांदळवनाच्या क्षेत्राचा समावेश उपरोक्त घनतेच्या वर्गवारीप्रमाणे वनक्षेत्रात करण्यात आला आहे. वनव्याप्त क्षेत्राची वृक्षाच्छादित घनतेच्या वर्गवारीनुसार क्षेत्रफळाची माहिती तक्ता ७.३४ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३४ वृक्षाच्छादित घनतेच्या वर्गवारीनुसार वनक्षेत्राची माहिती**

(चौ.कि.मी.)

| वर्ष | वनाच्या वृक्षाच्छादनाच्या घनतेनुसार क्षेत्र | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अति घनदाट | मध्यम घनदाट | खुले जंगल | खुरटे जंगल | एकूण |
| २००१ | @ | ३०,८९४ | १६,५८८ | ६,१३७ | ५३,६१९ |
| २००३ | ८,०७० | २०,३१७ | १८,४७८ | ४,१७५ | ५१,०४० |
| २००५ | ८,१९१ | २०,१९३ | १९,०९२ | ४,२४८ | ५१,७२४ |
| २००७ | ८,७३९ | २०,८३४ | २१,०७७ | ४,१५७ | ५४,८०७ |
| २००९ | ८,७३९ | २०,८३४ | २१,०७७ | ४,१५७ | ५४,८०७ |

*आधार*: इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट, फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया, डेहराडून @मध्यम घनदाट वनाच्या क्षेत्रात समावेश

## वृक्षारोपण

७.५४ वृक्षारोपण हा २० कलमी कार्यक्रमाचा एक भाग असून याची अंमलबजावणी वन विभाग, म.व.वि.म. व सामाजिक वनीकरण संचालनालय यांचेमार्फत करण्यात येते. वृक्षारोपणाची विस्तृत माहिती तक्ता ७.३५ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३५ २० कलमी कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपणाची विस्तृत माहिती**

| वर्ष | वन विभाग | | म.व.वि.म. | | सामाजिक वनीकरण संचालनालय | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हे. ) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हे. ) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हे. ) | खर्च (₹ कोटी) |
| २००६-०७ | ३५,३६९.०९ | २१.५१ | २,५४३.४१ | २.२५ | ३,२६६.०५ | १०.०४ |
| २००७-०८ | ३१,११२.७४ | २४.५८ | २,६५०.०९ | २.३३ | १३,३७१.०० | १४.५६ |
| २००८-०९ | ५५,९६७.२३ | ३९.२१ | २,३३१.८७ | १.७५ | ११,१५४.८१ | १३.६७ |
| २००९-१० | ४८,०९९.४३ | ४३.४९ | २,९०६.७४ | @ | ६,५४०.३१ | ७.३७ |
| २०१०-११ | ३०,१८९.९७ | ३१.८८ | ३,२२३.३७ | ५.९८ | ४,८४६.९२ | ७.५४ |
| २०११-१२ + | ३१,३६८.७९ | ५३.५२ | ४,०११.२६ | ७.७४ | ३,८६९.२५ | ९.१५ |

*आधार* : सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र शासन @ वन विभागात समाविष्ट + जानेवारी अखेर.

## सामाजिक वनीकरण

७.५५ राज्यात सामाजिक वनीकरणाचा प्रकल्प वर्ष १९८२ पासून सुरु झाला. ग्रामीण लोकसंख्येची जळाऊ लाकडाची व वैरणाची गरज भागविण्यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. राष्ट्रीय वनधोरण १९८८ नुसार राज्यात ३३ टक्के क्षेत्र आणण्याचे उद्दिष्ट असून सद्यस्थितीत राज्यात २० टक्के क्षेत्र वृक्षाच्छादित आहे. यासाठी बिगर वनक्षेत्रास वृक्षाच्छादनाखाली आणण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाने अधिक व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे. सामाजिक वनीकरण विभागाने या संदर्भात केलेल्या वृक्षलागवडीची माहिती तक्ता ७.३६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३६ २० कलमी कार्यक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण विभागाने केलेल्या वृक्षारोपणाची माहिती**

| वर्ष | सामाजिक वनीकरण विभागाचे वृक्षारोपण | | पुरविलेल्या रोपांची संख्या (कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हे.) | रस्त्यालगत (कि.मी.) | सामाजिक वनीकरणाचे वृक्षारोपण | इतर संस्थांना | एकूण |
| २००६-०७ | २,८७६.८३ | ७२३.९५ | @ | @ | ३.६३ |
| २००७-०८ | १२,४८४.५९ | १,५०३.०० | @ | @ | ४.४८ |
| २००८-०९ | १०,५१४.७९ | १,१९०.४३ | १.५९ | १.१४ | २.७३ |
| २००९-१० | ६,१३२.७९ | ७५८.०० | १.२८ | १.२९ | २.५७ |
| २०१०-११ | ४,२४६.१५ | १,११७.४४ | ०.६५ | १.२९ | १.९४ |
| २०११-१२+ | ३,३४५.३५ | ९७४.४५ | ०.४५ | ०.६५ | १.१० |

*आधार* : सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र शासन @ विगतवारी उपलब्ध नाही + जानेवारी पर्यंत

७.५६ सामाजिक वनीकरण संचालनालय राज्यात वृक्ष लागवडीसाठी विविध योजना राबविते. त्यातील महत्त्वाच्या योजनांची वर्षनिहाय माहिती तक्ता ७.३७ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३७ वृक्षारोपणाच्या महत्वाच्या योजनांची माहिती**

(क्षेत्र हे.)

| योजना | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
| निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील वनेत्तर सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड | ४३७.५० | ०.०० | ०.०० | ३८५.८२ |
| पश्चिम घाट विकास कार्यक्रम | ८४९.६५ | ७६२.५० | ०.०० | ०.०० |
| रोजगार हमी योजनेंतर्गत खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड व कुरण विकास | ८,३८२.७५ | ३,६०९.०८ | २,९४२.८९ | १,१०३.९८ |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र | ४४१.८६ | १४६.१२ | ८२.०० | १३२.३० |
| एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम | ८८४.५२ | २६६.७७ | १७९.४२ | ३१२.४३ |
| राष्ट्रीय बांबू मिशन | १२२.५० | २८९.७६ | २२१.२० | १०५.९५ |
| **एकूण** | ११,११८.७८ | ५,०७४.२३ | ३,४२५.५१ | २,०४०.४८ |

*आधार* : सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## वन उत्पादने

७.५७ राज्यातील वनांद्वारे इमारती लाकूड, जळाऊ लाकूड ही प्रमुख व बांबू, तेंदू पत्ता, डिंक, गवत इत्यादी गौण वनउत्पादने मिळतात. ह्या सर्व वनोत्पादनांचा राज्याचे उत्पन्न वाढविण्यात व स्थानिकांना रोजगार पुरविण्यात महत्वाचा वाटा आहे. राज्यातील प्रमुख व गौण वनउत्पादने व त्यांचे मूल्य याबाबतची माहिती तक्ता ७.३८ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३८ वनोत्पादने व त्यांचे मूल्य**

( ₹ कोटी)

| वनोत्पादन | उत्पादनाचे परिमाण | २००९-१० | | २०१०-११* | | २०११-१२ (अपेक्षित) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य वनोत्पादने** | | | | | | | |
| इमारती लाकूड | लाख घन मीटर | १.१६ | २३८.१४ | १.१७ | ११०.३५ | १.४७ | २८१.१४ |
| जळाऊ लाकूड | लाख घन मीटर | ४.९७ | ४२.४३ | ४.२१ | ४२.१८ | ४.५९ | ३२.९६ |
| **एकूण (अ)** | | ६.१३ | २८०.२७ | ५.३८ | १५२.५३ | ६.०६ | ३१४.१० |
| **(ब) गौण वनोत्पादने** | | | | | | | |
| बांबू | लाख मे.टन | ०.७१ | २१.९० | १.५४ | २२.७४ | २.३२ | ५७.९१ |
| तेंदू | लाख स्टँडर्ड बॅग | ६.६४ | ६६.३४ | ६.४२ | ९०.५६ | ६.२० | १००.०८ |
| गवत | मे.टन | ५३,१०७ | ०.१९ | १७,६२९ | ०.३९ | १,१२५ | १.६७ |
| डिंग | क्विंटल | १५,०५३ | १.२२ | ५,५५२ | ०.८७ | ५३२ | ०.११ |
| इतर (लाख, हिरडा, शिकेकाई इ.) | | उ.ना. | ३.४२ | उ.ना. | ४.११ | उ.ना. | २.९९ |
| **एकूण (ब)** | | | ९३.०७ | | ११८.६७ | | १६२.७६ |
| **एकूण (अ + ब)** | | | ३७३.३४ | | २७१.२० | | ४७६.८६ |

*आधार* : मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन. उ.ना. - उपलब्ध नाही * अस्थायी

## संत तुकाराम वनग्राम योजना

७.५८ वनाच्या व वन्यजीवांच्या महत्वाबाबत जागृती निर्माण करणे, अवैध वृक्षतोड आणि अतिक्रमण, इत्यादीपासून वनांचे संरक्षण करण्याकरीता २००६-०७ मध्ये संत तुकाराम वनग्राम योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत एकूण १४,२३८ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठित करण्यात करण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत २०१०-११ मध्ये ₹ ३२.७० लाख खर्च करण्यात आले व २०११-१२ मध्ये जून अखेर ₹ ११२.६५ लाख खर्च अपेक्षित आहे.

## वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये

७.५९ राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण व राष्ट्रीय वन्यजीव संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली लाइन ट्रान्झॅक्ट पध्दतीने वर्ष २०१० मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या मार्च, २०११ च्या स्थितीदर्शक अहवालानुसार राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाने महाराष्ट्रातील वाघांची अंदाजित संख्या १६० ते १९६ च्या दरम्यान असून सरासरीने ती १६९ असल्याचे दर्शविले आहे. वाघांचा अधिवास अधिकाधिक नैसर्गिक व्हावा यासाठी वर्ष २०१०-११ मध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अकोट विभागातील अमोना,नागरतास व बरुखेडा या तीन गावांचे पुनर्वसन करण्यात आले व त्यावर ₹ १८.८७ कोटी खर्च करण्यात आला. राज्यातील वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये यावर केंद्र पुरस्कृत योजनेद्वारे झालेल्या खर्चाची माहिती तक्ता ७.३९ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३९ प्रकल्पनिहाय वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने/अभ्यारण्ये यांचे क्षेत्र व त्यावरील खर्च**

( ₹ कोटी)

| योजना | क्षेत्र (चौ.कि.मी.) | खर्च | | | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | |
| **१.व्याघ्र प्रकल्प** | | | | | |
| १) मेळघाट | १,५००.४९ | २.२१ | २२.२० | २.५५ | ९०४.५ |
| ब) ताडोबा-अंधारी | ६१९.७६ | २.१४ | २.५८ | १.१६ | २०.६ |
| क)पेंच | २५७.२६ | १.३७ | १.४४ | १.६८ | ५.१ |
| ड)सह्याद्री | ७४१.२२ | ०.०० | ०.७५ | ०.०७ | १००.० |
| **२. राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्ये यांचा विकास** | १४,०५०.७७ | २.८७ | ३.६८ | १.१६ | २८.२ |
| **३. हत्ती प्रकल्प कोल्हापूर** | उ.ना. | ०.२९ | ०.५० | ०.११ | ७२.४ |
| **एकूण** | | **८.८८** | **३१.१५** | ६.७३ | २५०.८ |

*आधार* : मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, उ. ना. -उपलब्ध नाही + जानेवारी पर्यंत

* * * * *

## परिशिष्ट ७.१
## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, पीक आणि दर हेक्टरी उत्पादन

**अन्नधान्ये** (क्षेत्र '०००हे., उत्पादन '००० मे.टन, उत्पादकता प्रति हे.कि.ग्रॅ.)

| अनु. क्रमांक | वर्ष | | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ... | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | ... | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | ... | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | ... | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | ... | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २००५-०६ | ... | १,५१३ | २,६६९ | १,७६५ | ९३३ | १,३०१ | १,३९४ | ४,७४० | ३,७११ | ७८३ |
| ७ | २००७-०८ | ... | १,५७७ | ३,०१२ | १,९११ | १,२५३ | २,३७१ | १,८९३ | ४,१४८ | ४,००३ | ९६५ |
| ८ | २००८-०९ | ... | १,५२२ | २,२८८ | १,५०३ | १,०२२ | १,५१६ | १,४८४ | ४,०७१ | ३,३५२ | ८२३ |
| ९ | २००९-१० | ... | १,४७१ | २,१८६ | १,४८६ | १,०८१ | १,७४० | १,६१० | ४,१७६ | ३,५६५ | ८५४ |
| १० | २०१०-११ | ... | १,५१८ | २,६९६ | १,७७६ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |

| अनु. क्रमांक | वर्ष | | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | ... | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | ... | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | ... | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | ... | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | ... | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २००५-०६ | ... | १,४३४ | ९३२ | ६५० | ६८३ | १,१६३ | १,७०३ | ९,३०३ | ९,७७६ | १,०५१ |
| ७ | २००७-०८ | ... | १,२८३ | १,१२७ | ८७८ | ८६५ | १,९५० | २,२५४ | ९,१२६ | १२,४६३ | १३,६६ |
| ८ | २००८-०९ | ... | ८६५ | ६६२ | ७६५ | ८४५ | १,७०६ | २,०१९ | ८,३२५ | ९,५२४ | १,१४४ |
| ९ | २००९-१० | ... | १,०३४ | ७६६ | ७४२ | ९७४ | १,९६१ | २,०१४ | ८,७३५ | १०,२१८ | १,१७० |
| १० | २०१०-११ | ... | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०७० | २,७४९ | २,५६९ | ८,९९० | १,२३,२१ | १,३७१ |

| अनु. क्रमांक | वर्ष | | तूर | | | हरभरा | | | मुग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ... | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ... | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ... | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | ... | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | ... | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २००५-०६ | ... | १,१०० | ७९२ | ७२० | १,०२० | ७०५ | ६९१ | ५३४ | १८९ | ३५४ |
| ७ | २००७-०८ | ... | १,१५९ | १,०७६ | ९२८ | १,३५३ | १,११६ | ८२४ | ६६१ | ३६७ | ५५६ |
| ८ | २००८-०९ | ... | १,००९ | ६०५ | ६०० | १,१४३ | ७७४ | ६७७ | ४२७ | १०६ | २४८ |
| ९ | २००९-१० | ... | १,०९३ | ९१९ | ८४१ | १,२९१ | १,११४ | ८६३ | ४२८ | १४२ | ३३२ |
| १० | २०१०-११ | ... | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.१ (पुढे चालू)

**अन्नधान्ये** (क्षेत्र '०००हे., उत्पादन '००० मे.टन, उत्पादकता प्रति हे.कि.ग्रॅ.)

| अनु. क्रमांक | वर्ष | | उडिद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ... | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ... | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ... | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ... | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ... | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २००५-०६ | ... | ४६८ | १९९ | ४२४ | ३०९ | १०७ | ३४६ | ३,४३१ | १,९९२ | ५८१ |
| ७ | २००७-०८ | ... | ५६४ | ३२० | ५६८ | ३२० | १४५ | ४५३ | ४,०५७ | ३,०२४ | ७४५ |
| ८ | २००८-०९ | ... | ३२४ | १०० | ३०८ | १८९ | ७६ | ४०२ | ३,०९२ | १,६६१ | ५३७ |
| ९ | २००९-१० | ... | ३५४ | ११७ | ३३२ | २०९ | ७९ | ३७८ | ३,३७५ | २,३७२ | ७०३ |
| १० | २०१०-११ | ... | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |

| अनु. क्रमांक | वर्ष | | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबिन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | ... | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ... | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ... | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | ... | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | ... | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २००५-०६ | ... | १२,७३४ | ११,७६८ | ९२४ | ४४९ | ४४० | ९९५ | २,३४७ | २,५२७ | १,०७७ |
| ७ | २००७-०८ | ... | १३,१८२ | १५,४८७ | १,१७५ | ४१९ | ५०६ | १,२०६ | २,६६४ | ३,९७६ | १,४९३ |
| ८ | २००८-०९ | ... | ११,४१७ | ११,१८५ | ९८० | ३१७ | ३५२ | १,१०८ | ३,०६३ | १,८४० | ६०१ |
| ९ | २००९-१० | ... | १२,१०९ | १२,५९० | १,०४० | ३२२ | ३६५ | १,१३३ | ३,०१९ | २,१९७ | ७२८ |
| १० | २०१०-११ | ... | १३,०२८ | १५,४१७ | १,१८४ | ३५७ | ४५८ | १,२८१ | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |

| अनु. क्रमांक | वर्ष | | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ... | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ... | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ... | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ... | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | ... | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २००५-०६ | ... | २६३ | १५९ | ६०४ | ६०१ | २७८ | ४६३ | ३,६६० | ३,४०४ | ९३० |
| ७ | २००७-०८ | ... | २३१ | १५४ | ६६७ | ५१० | २३८ | ४६७ | ३,८२४ | ४,८७४ | १,२७५ |
| ८ | २००८-०९ | ... | १८६ | १०५ | ५६७ | ४१३ | १९५ | ४७२ | ३,९७९ | २,४९२ | ६२६ |
| ९ | २००९-१० | ... | १८८ | १०९ | ५७९ | ३३३ | १५९ | ४७७ | ३,८८३ | २,८१४ | ७२४ |
| १० | २०१०-११ | ... | १७३ | ९४ | ५४४ | ३३६ | १७८ | ५३० | ३,६२४ | ५,०४६ | १,३९२ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ७.१ (समाप्त)

**नगदी पिके** (क्षेत्र '०००हे., उत्पादन '००० मे.टन, उत्पादकता प्रति हे.कि.ग्रॅ.)

| अनु. क्रमांक | वर्ष | | ऊस | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तोडणी क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | दर हेक्टरी उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | दर हेक्टरी उत्पादन |
| (१) | (२) | | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) |
| १ | १९६०-६१ | ... | १५५ | १०,४०४ | ६६.९२ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | ... | १६७ | १४,४३३ | ८६.५३ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | ... | २५८ | २३,७०६ | ९१.७४ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ... | ४४२ | ३८,१५४ | ८६.४० | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ... | ५९५ | ४९,५६९ | ८३.२७ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २००५-०६ | ... | ५०१ | ३८,८१४ | ७८.०० | २,८७५ | ३,१६० | १८७ | ६ | ६ | १,०७१ |
| ७ | २००७-०८ | ... | १,०९३ | ८८,४३७ | ८०.९१ | ३,१९५ | ७,०१५ | ३७३ | ६ | ७ | १,४३० |
| ८ | २००८-०९ | ... | ७६८ | ६०,६४८ | ७८.९७ | ३,१४६ | ४,७५२ | २५७ | ५ | ७ | १,४०० |
| ९ | २००९-१० | ... | ७५६ | ६४,१५९ | ८४.८७ | ३,३९२ | ५,१११ | २५६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| १० | २०१०-११ | ... | ९६५ | ८५६९१ | ८८.८० | ३९४२ | ७४७३ | ३२२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) माहिती अंतिम अनुमानावर आधारित आहे.

(२) कापसाचे उत्पादन १७० किग्रॅ./गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

## परिशिष्ट ७.२
## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया : १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २००५-०६ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | |
| **(अ) तृणधान्ये** | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२०.९ | ९८.९ | १२२.१ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | १३४.४ | १७९.७ | २३७.७ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७५.८ | ७२.८ | ७०.५ |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १२९.० | १०६.१ | १५५.५ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | ११.३ | २२.६ | १८८.७ |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | ८२८.६ | १,५३२.२ | २१८०.५ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ६२.५ | ५१.४ | ५५.५ |
| (८) कोदरा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २७.१ | २.४ | २३.६ |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | ५७.२ | ३४.० | २६.१ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१०५.८** | **१११.३** | **१३४.२** |
| **(ब) कडधान्ये** | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ४२८.९ | ६७७.७ | ७९०.७ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | १९९.१ | २३१.१ | २४५.३ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | ११८.६ | ८१.१ | १९६.५ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **२०४.३** | **२४३.४** | **३०५.६** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१२५.३** | **१३७.५** | **१६८.२** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | |
| **(अ) गळिताची धान्ये** | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७१.३ | ५९.२ | ७४.३ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ८४.२ | ४२.७ | ५८.९ |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ३८.९ | १८.३ | ५.१ |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ५००.० | १४१.० | ३३३.३ |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | ४१५.१ | २३२.३ | २६७.३ |
| **एकूण - गळिताची धान्ये** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **९१.२** | **६५.५** | **७९.८** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | २१६.७ | ३५०.४ | ५१२.३ |
| (२) मेस्टा | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २७.७ | २५.९ | २६.४ |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **२१५.९** | **३४९.१** | **५१०.४** |
| **(क )संकीर्ण** | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | १४६.३ | २४१.९ | २९७.२ |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ९०.६ | ३२.७ | ३२.७ |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | ९६.५ | उ.ना. | उ.ना. |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | ६८.९ | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **१४०.४** | **२२२.५** | **२७३.४** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **१४६.७** | **२१८.७** | **२८५.६** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **१३५.४** | **१७५.९** | **२२३.८** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - २००५ -०६ ते २०१०-११ चे निर्देशांक अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.३
# राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '०००हे.)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनां-खालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकां-खालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापीक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागत-योग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००१-०२ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६८ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,७१७ | १,३०३ | १७,२२२ | ३,७६९ | २०,९९१ |
| २००२-०३ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३७१ | ९५८ | १,१६८ | ३२८ | १,७३६ | १,३०८ | १७,१९५ | ३,७२० | २०,९१५ |
| २००३-०४ | ३०,७५८ | ५,२१४ | १,७२५ | १,३९० | ९१७ | १,२४९ | २५१ | १,३६४ | १,२१६ | १७,४३२ | ४,७५८ | २२,१९० |
| २००४-०५ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७२६ | १,३९३ | ९१८ | १,२५१ | २४९ | १,३१६ | १,२०४ | १७,४९० | ४,८७८ | २२,३६८ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २००६-०७ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७१९ | १,४१२ | ९१५ | १,२५२ | २४९ | १,३२४ | १,१९६ | १७,४७८ | ५,०७९ | २२,५५७ |
| २००७-०८ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७१८ | १,४२७ | ९१६ | १,२४८ | २४८ | १,३२७ | १,१८८ | १७,४७३ | ५,१८२ | २२,६५५ |
| २००८-०९ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७१८ | १,४३३ | ९१८ | १,२४६ | २४८ | १,३७२ | १,१८८ | १७,४२२ | ५,०३२ | २२,४५४ |
| २००९-१० | ३०,७५८ | ५,२१४ | १,७२९ | १,४४३ | ९१७ | १,२४२ | २५० | १,३७३ | १,१८९ | १७,४०१ | ५,२११ | २२,६१२ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - २००३-०४ ते २००९-१० चे आकडे अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.४
## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र

| अनु. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २२,४०९ | २७,४६२ | ३१,६५८ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २०,२५२ | २५,५९५ | २९,५२५ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३१,७५५ | ३६,०५६ | ४१,५०३ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १४,७४५ | १५,७९१ | १७,०२० |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,७७४ | ६,९४९ | ७,४९६ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,८७४ | ३,७८० | ४,०३७ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ५,५५८ | ४,८७३ | ५,२१४ |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | १,०२९ | ७७३ | ६२२ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | १३२ | ९७ | ८१ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,०६,५२८** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** |

| अनु. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती एकूण क्षेत्र ('०० हे.) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ |
| (१) | (२) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ५,७४६ | ७,३२८ | ७,७४० |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १५,१२० | १९,१५९ | २०,२७४ |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ४६,०५९ | ५१,२७१ | ५२,४७६ |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३५,४२० | ३७,४१४ | ३७,५४२ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,३०३ | २३,६७६ | २३,७५६ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १७,२१० | १६,७१७ | १६,७१७ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३७,१५० | ३२,०८४ | ३२,१३५ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | १३,५१४ | ९,९६१ | ६,७७६ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ५,२७४ | ३,४१८ | २,६३४ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **१,९८,७९६** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ७.४ (समाप्त)

| अनु. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती सरासरी क्षेत्र (हे.) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ |
| (१) | (२) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२६ | ०.२७ | ०.२४ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४५ | १.४२ | १.२६ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.४० | २.३७ | २.२१ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.६८ | ६.५८ | ६.१६ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १३.१३ | १२.८९ | १०.८९ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३९.९५ | ३५.२४ | ३२.५२ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.८७** | **१.६६** | **१.४६** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ७.५
## राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र

( '००० हे. )

| अ. क्र. | वर्ष | सिंचित क्षेत्र | | | | ओलिताखालील पिकांची सघनता | सिंचन विहिरींची संख्या (हजारात) | दर विहिरीमागे सिंचित निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये) | पिकांखालील एकूण क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिरी | इतर साधने | निव्वळ क्षेत्र | एकूण क्षेत्र | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,०७२ | १,२२० | ११४ | ५४२ | १.१० | १८,८२३ | ६.५ |
| २ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,३४७ | १,५७० | ११७ | ६९४ | १.११ | १८,७३७ | ८.४ |
| ३ | १९८०-८१ | १,०५५ | ७८० | १,८३५ | २,४१५ | १३२ | ८२६ | १.२८ | १९,६४२ | १२.३ |
| ४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | २,६७१ | ३,३१९ | १२४ | १,०१७ | १.६४ | २१,८५९ | १५.२ |
| ५ | १९९५-९६ | १,८७० | १,०१० | २,८८० | ३,५५० | १२३ | १,२२९ | १.५२ | २१,५०४ | १६.५ |
| ६ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,२४९ | ३,८५२ | ११९ | १,३१८ | २.४७ | २१,६१९ | १७.८ |
| ७ | २००१-०२ | २,१४६ | ९९० | ३,१३६ | ३,७२७ | ११९ | १,३२२ | २.३७ | २०,९९१ | १७.८ |
| ८ | २००२-०३ | २,१४५ | १,०७१ | ३,२१६ | ३,८०६ | ११८ | १,३३१ | २.४२ | २०,९१५ | १८.२ |
| ९ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | २,९४४ | ३,६३६ | १२३ | उ.ना. | उ.ना. | २२,१९० | १६.४ |
| १० | २००४-०५ | १,९४२ | १,००१ | २,९९३ | ३,६६५ | १२५ | उ.ना. | उ.ना. | २२,३७६ | १६.४ |
| ११ | २००५-०६ | २,०७७ | १,०७० | ३,१४७ | ३,८१० | ११८ | उ.ना. | उ.ना. | २२,५५६ | १६.९ |
| १२ | २००६-०७ | २,१०९ | १,१३७ | ३,२४६ | ३,९५८ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,५५७ | १७.६ |
| १३ | २००७-०८ | २,१५१ | १,१६० | ३,३११ | ४,०३७ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६५५ | १७.८ |
| १४ | २००८-०९ | २,११५ | १,१४० | ३,२५५ | ३,९७० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,४५४ | १७.७ |
| १५ | २००९-१० | २,१५९ | १,१६२ | ३,३२१ | ४,०५० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६१२ | १७.९ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

(२) स्तंभ क्र.७ मध्ये (स्तंभ क्र.६ ÷ स्तंभ क्र.५) X १०० हे सूत्र वापरून सघनता काढली आहे.

(३) २००३ -०४ ते २००९-१० चे आकडे अस्थायी आहेत.

## परिशिष्ट ७.६

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |

*आधार* - जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

## परिशिष्ट ७.७
## महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कोंबड्या व बदके

(हजारात)

| अनु. क्रमांक | वर्ष | | गाई-बैल | म्हशी-रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर + पशुधन | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | पिकांखालील दर शंभर हेक्टर निव्वळ क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्ये मागे पशुधन | एकूण कोंबड्या व बदके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६१ | .. | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| २ | १९६६ | .. | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| ३ | १९७२ | .. | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| ४ | १९७८ | .. | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७९१ |
| ५ | १९८२ | .. | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| ६ | १९८७ | .. | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३९ |
| ७ | १९९२ | .. | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४५ | ३२,१८७ |
| ८ | १९९७ | .. | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| ९ | २००३ | .. | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३९ | ३४,५९६ |
| १० | २००७* | .. | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५५ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,७५६ |

*आधार* - पशुधन गणना

टीप - * अस्थायी

+ इतर पशुधन या बाबीमध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, ऊंट, गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.

# ८

# उद्योग आणि सहकार



# ८. उद्योग आणि सहकार

## उद्योग

८.१ आर्थिक विकासामध्ये औद्योगिक क्षेत्राच्या भूमिकेचे महत्व जाणून भारत सरकारने १९९१ मध्ये उदारीकरणाचे धोरण अवलंबिले ज्यामुळे औद्योगिक क्षेत्राची वाढ सुलभ होवून त्यात संरचनात्मक बदल घडून आले. महाराष्ट्रातील विपुल नैसर्गिक साधन संपत्ती, कुशल मनुष्यबळ आणि दर्जेदार शिक्षण सुविधा यांमुळे औद्योगिक क्षेत्र वृध्दिंगत होण्यास मदत झाली. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या आव्हानाच्या अनुषंगाने राज्याने स्वतःचे औद्योगिक धोरण तयार केले. त्यानुसार १९९३ मध्ये राज्याने पहिले औद्योगिक धोरण निश्चित केले जे १९९५ व २००१ मध्ये सुधारित केले. नवीनतम औद्योगिक धोरण २००६ पासून राज्याने अंगिकारले असून त्यानुसार औद्योगिक क्षेत्रात १० टक्के वाढ, सेवा क्षेत्रात १२ टक्के वाढ व २०१० पर्यन्त अतिरिक्त २० लाख इतकी रोजगार निर्मिती ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती जी जवळपास साध्य केली आहेत. पुढील औद्योगिक धोरण, २०१२ मध्ये अपेक्षित आहे.

### महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाची ठळक वैशिष्ट्ये

### औद्योगिक गुंतवणूक

८.२ औद्योगिकीकरणास पोषक वातावरणामुळे राज्यात ₹ ८,७४,०५३ कोटी गुंतवणूकीचे १७,२०७ औद्योगिक प्रस्ताव आणणे सुलभ झाले. ज्यांची गुंतवणूक देशातील ऑगस्ट,१९९१ ते ऑक्टोबर,२०११ या कालावधीतील एकूण मंजूर गुंतवणूकीच्या ९.४ टक्के आहे. सदर प्रस्तावापैकी ४० टक्के प्रस्ताव पूर्ण झालेत व ११ टक्के प्रकल्प प्रगतीपथावर असून या प्रस्तावांची एकूण गुंतवणुकीत अनुक्रमे १७.८ टक्के व ७ टक्के वाटा आहे. तथापि, ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या (२००७-१२) पहिल्या चार वर्षात राज्य ₹ ४,५०,४४८ कोटीची गुंतवणूक आणण्यात यशस्वी झाले असून ती भारतातील एकूण गुंतवणुकीच्या ८.५ टक्के होती. निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्तावांचा तपशिल तक्ता ८.१ मध्ये दिला आहे. निवडक राज्यातील मंजूर गुंतवणूकीचे वर्षनिहाय कल आलेख ८.१ मध्ये दर्शविले आहेत.

आलेख ८.१ : औद्योगीक गुंतवणूकीतील कल (मंजूर)




**तक्ता ८.१ निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्ताव**

(ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०११)

| | **महाराष्ट्र** | गुजरात | तामिळनाडू | आंध्र प्रदेश | उत्तर प्रदेश | **अखिल भारत** |
|---|---|---|---|---|---|---|
| **आवेदनपत्रे** | | | | | | |
| संख्या | **१५,९९७** | १०,३२८ | ७,२६१ | ६,७२३ | ६,९६४ | ८७,५५४ |
| गुंतवणूक ( ₹ कोटी) | **८,४६,९२३** | १०,०३,३४७ | ३,७०,०३७ | ७,७३,७२० | २,३९,९८१ | ८९,४३,५५८ |
| रोजगार (लाख ) | **४१.०** | १९.८ | २१.८ | १३.० | १८.५ | २०५.१ |
| **इरादापत्रे** | | | | | | |
| संख्या | **६०३** | ४७१ | ८७४ | ५५० | ३७७ | ४,५०७ |
| गुंतवणूक ( ₹ कोटी) | **१८,९८१** | २७,५३४ | १४,३२८ | १५,८३९ | ९,९५६ | १,३७,१०१ |
| रोजगार (लाख ) | **१.४** | ०.८ | १.५ | १.० | १.० | ९.७ |
| **१००%निर्यातभिमूख** | | | | | | |
| संख्या | **६०७** | ५०९ | ६७६ | ४५८ | २२९ | ४,२६१ |
| गुंतवणूक ( ₹ कोटी) | **८,१४९** | ८,६२७ | ६१,१९९ | ४२,४४० | १६,८३९ | २,३५,६३२ |
| रोजगार (लाख ) | **०.९** | ०.७ | १.१ | ०.७ | ०.४ | ६.७ |
| **एकूण** | | | | | | |
| संख्या | **१७,२०७** | ११,३०८ | ८,८११ | ७,७३१ | ७,५७० | ९६,३२२ |
| | **( १७.९ )** | (११.७ ) | (९.२ ) | ( ८.० ) | ( ७.९ ) | |
| गुंतवणूक ( ₹ कोटी) | **८,७४,०५३** | १०,३९,५०८ | ४,४५,५६४ | ८,३१,९९९ | २,६६,७७६ | ९३,१६,२९१ |
| | **( ९.४ )** | ( ११.२ ) | ( ४.८ ) | ( ८.९ ) | ( २.९ ) | |
| रोजगार (लाख ) | **४३.४** | २१.२ | २४.४ | १४.७ | १९.९ | २२१.५ |
| | **( १९.६ )** | ( ९.६ ) | ( ११.० ) | ( ६.७ ) | ( ९.० ) | |

आधार : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

टीप - कंसातील आकडे एकूण भारताशी टक्केवारी दर्शवितात

## थेट विदेशी गुंतवणूक

८.३ ऑगस्ट,१९९१ ते सप्टेंबर,२०१० या कालावधीत राज्यात थेट विदेशी गुतवणूकीचे ४,२२१ प्रस्ताव प्राप्त झाले व त्यातील गुंतवणूक ₹८४,९५८ कोटी आहे. त्यापैकी ४२ टक्के प्रकल्प हे पूर्ण झालेले असून ७ टक्के प्रकल्प प्रगतीपथावर आहेत व त्यांची गुंतवणूक अनुक्रमे ५२ टक्के व ९ टक्के आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात विदेशी गुंतवणुक करणाऱ्या देशामध्ये अमेरिका आणि मॉरिशस हे दोन प्रमुख देश असून या देशांचा एकूण थेट विदेशी गुंतवणूकीत अनुक्रमे १६ व १४ टक्के वाटा आहे. निवडक राज्यातील थेट विदेशी गुंतवणूकीच्या प्रस्तावांचा तपशिल तक्ता ८.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२ निवडक राज्यातील थेट विदेशी गुंतवणूकीचे प्रस्ताव**

(ऑगस्ट, १९९१ ते सप्टेंबर, २०१०)

| राज्य | संख्या | भारताशी टक्केवारी | गुतवणूक (₹ कोटी) | भारताशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र** | **४,२२१** | **२०.७** | **८४,९५८** | **२२.४** |
| तामिळनाडू | २,२१७ | १०.९ | २८,४१८ | ७.५ |
| आंध्रप्रदेश | १,११७ | ५.५ | २०,७८१ | ५.५ |
| गुजरात | ७११ | ३.५ | २३,३९८ | ६.२ |
| उत्तर प्रदेश | ५६५ | २.८ | ५,५०५ | १.५ |
| **अखिल भारत** | **२०,४३६** | -- | **३,७९,४४३** | -- |

*आधार :* उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

८.४ राज्यामध्ये माहिती तंत्रज्ञान व वित्तीय सेवा ह्या उद्योग गटांनी मोठया प्रमाणात थेट विदेशी गुंतवणूक प्राप्त करण्यात सातत्य राखले आहे. ऑगस्ट, १९९१ ते सप्टेंबर,२०१० पर्यन्त उद्योग गटनिहाय थेट विदेशी गुंतवणुकीच्या मंजूर प्रस्तावांचा तपशील तक्ता ८.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.३ उद्योग गटनिहाय मंजूर विदेशी थेट गुंतवणुकीचे प्रस्ताव**

**(ऑगस्ट, १९९१ ते सप्टेंबर, २०१०)**

| उद्योग गट | प्रस्तावांची संख्या | प्रस्तावांची टक्केवारी | गुंतवणूक रक्कम (₹ कोटी) | गुंतवणूक रक्कमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| माहिती तंत्रज्ञान | ७६२ | १८.१ | १२,७६५ | १५.० |
| वित्तीय सेवा | ६६७ | १५.८ | ११,८५८ | १४.० |
| हॉटेल आणि पर्यटन उद्योग | ९५ | २.३ | ६,३२६ | ७.५ |
| व्यवसाय व्यवस्थापन सल्ला | ३६९ | ८.७ | ४,९६२ | ५.८ |
| परिवहन | १०८ | २.६ | ४,१२४ | ४.९ |
| सिमेंट आणि सिरॅमिक्स | ५८ | १.४ | ३,७२७ | ४.४ |
| उर्जा व इंधन | ३९ | ०.९ | २,८४१ | ३.३ |
| रसायने व खते | १९७ | ४.७ | २,६६६ | ३.१ |
| विद्युत सामुग्री आणि इलेक्ट्रॉनिक्स | २१२ | ५.० | १,४६७ | १.७ |
| कागद व कागदाचा लगदा | ३१ | ०.७ | १,३२३ | १.६ |
| वस्त्रोद्योग | १२२ | २.९ | १,०५१ | १.२ |
| अन्नप्रक्रिया | १७३ | ४.१ | १,०३९ | १.२ |
| औषधे व औषधी द्रव्ये | १२१ | २.९ | १,०१२ | १.२ |
| मोटार वाहने | ११२ | २.७ | ८९५ | १.१ |
| औद्योगिक यंत्रसामुग्री | २६१ | ६.२ | ७७१ | ०.९ |
| प्लॅस्टिक आणि रबर वस्तू | २७ | ०.६ | ७६७ | ०.९ |
| यंत्रसामुग्री / औद्योगिक उपकरणे | ८९ | २.१ | ७१७ | ०.८ |
| इतर | ७७८ | १८.४ | २६,६४७ | ३१.४ |
| **एकूण** | **४,२२१** | **१००.०** | **८४,९५८** | **१००.०** |

*आधार :* उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्रातून निर्यात

८.५ राज्यातून मुख्यत्त्वे रत्ने व आभूषणे, सॉफ्टवेअर, वस्त्र, तयार कपडे, सुती धागे, धातू व धातू उत्पादने, शेतमालावर आधारित उत्पादने, अभियांत्रिकी उपकरणे, औषधे व औषधी द्रव्ये आणि प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू यांची निर्यात होते. राज्यातील निर्यात वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी व निर्यातदारांनी केलेल्या प्रयत्नांची जाणीव घेवून 'सर्वोत्तम निर्यातदार पुरस्कार' देणे व परदेशांमध्ये मालाची प्रदर्शने आयोजित करणे याबाबतीत शासन पुढाकार घेत आहे. सन २००९-१० यावर्षी विविध देशात १६ आंतरराष्ट्रीय प्रदर्शने आयोजित करण्यात आली होती. राज्यातून आणि भारतातून झालेली निर्यात तक्ता ८.४ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ८.४ महाराष्ट्र आणि भारतातून निर्यात**

(₹ कोटी)

| वर्ष | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००५-०६ | १,१३,७०० | ४,५४,८०० | २५.० |
| २००६-०७ | १,४२,९४५ | ५,७१,७७९ | २५.० |
| २००७-०८ | १,७२,८४६ | ६,४०,१७२ | २७.० |
| २००८-०९ | २,२६,७९४ | ८,३९,९७८ | २७.० |
| २००९-१० | २,२८,१८४ | ८,४५,१२५ | २७.० |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## उद्योगांना वित्तीय सहाय्य

८.६ सिकॉम लि., महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ सारख्या राज्यस्तरीय वित्तीय संस्था आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय साधारण विमा महामंडळ, आयएफसीआय लि., भारतीय लघु उद्योग विकास बँक यासारख्या केंद्रस्तरीय वित्तीय संस्थांद्वारे राज्यातील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविले जाते. याबाबतचा तपशील परिशिष्ट ८.१ मध्ये दिला आहे.

## विशेष आर्थिक क्षेत्रे

८.७ राज्याने दिनांक १० फेब्रुवारी २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्विकारले आहे. राज्यात ३० नोव्हेंबर, २०११ पर्यन्त एकूण २३३ विशेष आर्थिक क्षेत्राबाबत प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्राप्त प्रस्तावापैकी ११६ प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मान्यता देण्यात आली आणि ६३ प्रस्ताव अधिसूचित झालेले आहेत. राज्यातील मंजूर तसेच अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्राचा तपशील तक्ता ८.५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ८.५ मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांमधील प्रस्तावित गुंतवणूक व रोजगार**

(३०नोव्हेंबर, २०११ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | क्षेत्र (हेक्टर) | | प्रस्तावित रोजगार (लाखात) | | प्रस्तावित गुंतवणूक (₹ कोटी ) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | मंजूर | अधिसूचित | मंजूर | अधिसूचित | मंजूर | अधिसूचित |
| कोंकण | ५६ | २७ | १२,७६९ | २,४०७ | ३३.५६ | ९.४५ | ७७,९७४ | ३२,३९६ |
| पुणे | ३४ | २० | २,९६० | २,४६२ | ९.६६ | ५.४७ | ४०,७३१ | ३४,६४० |
| नाशिक | ६ | १ | १,२७५ | १,००७ | २.१२ | १.२५ | २,८८३ | १,३८० |
| औरगाबाद | १० | ७ | ८९६ | ७८६ | १.१५ | ०.३१ | २,८४५ | १,७७५ |
| अमरावती | २ | २ | १,११० | १,११० | ०.३५ | ०.३५ | २,३६० | २,३६० |
| नागपूर | ८ | ६ | ३,२०६ | २,०९६ | ५.५० | ३.९७ | ९,२३५ | ४,५८८ |
| **एकूण** | **११६** | **६३** | **२२,२१६** | **९,८६८** | **५२.३४** | **२०.८०** | **१,३६,०२८** | **७७,१३९** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

८.८ अधिसूचित न झालेले व मागे घेतलेल्या एकूण २५ विशेष आर्थिक क्षेत्रामधील गुंतवणूक व रोजगार बाबत झालेली हानी तक्ता ८.६ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता ८.६ अधिसूचित न झालेले व मागे घेतलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांमधील गुंतवणूक व रोजगार यामध्ये झालेली हानी**

(३० नोव्हेंबर, २०११ पर्यंत)

| विभाग | अधिसूचित न झालेले | | | | मागे घेतलेले | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | क्षेत्र (हे.) | गुंतवणूकीतील हानी (₹ कोटी ) | रोजगारातील हानी (लाखात) | संख्या | क्षेत्र (हे.) | गुंतवणूकीतील हानी (₹ कोटी ) | रोजगारातील हानी (लाखात) |
| कोंकण | ३ | ३३ | १,१४० | १.२८ | ५ | २४४ | १,७२५ | ०.५६ |
| पुणे | ३ | १२३ | ८२७ | ०.३४ | ७ | ३६८ | १०,४७१ | १.७२ |
| नाशिक | - | - | - | - | - | - | - | - |
| औरंगाबाद | - | - | - | - | २ | ११२ | ३०७ | ०.१७ |
| अमरावती | २ | ३०८ | ७५६ | ०.१५ | - | - | - | - |
| नागपूर | २ | २१२ | २३०९ | ०.४३ | १ | ६३७ | १,३०० | ०.०५ |
| **एकूण** | **१०** | **६७६** | **५,०३२** | **२.२०** | **१५** | **१,३६१** | **१३,८०३** | **२.५०** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

८.९ नोव्हेंबर,२०११ अखेर एकूण २४ विशेष आर्थिक क्षेत्रातील १५९ घटक कार्यरत होते. त्यामधील गुंतवणूक ₹ १७,८३० कोटी होती व त्यामुळे सुमारे ८६ हजार रोजगार उपलब्ध झाला.

## माहिती तंत्रज्ञान संकुले

८.१० महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मऔविम) व सिडकोने ३७ माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत. माहिती तंत्रज्ञान उद्योगात खाजगी क्षेत्रातील सहभागासाठी ४५१ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर झाले असून त्यापैकी १०७ कार्यरत झाली आहेत व त्यामधील गुंतवणूक ₹ २,१०७ कोटी असून, त्यामधून २.३ लाख रोजगार निर्माण झाला आहे. उर्वरीत ३४४ माहिती तंत्रज्ञान संकुलांना इरादापत्रे दिली असून त्यात ₹ ६,३४५ कोटीची गुंतवणूक व ८.६ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होणे अपेक्षित आहे. खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले बृहन्मुंबई (१७१), या पाठोपाठ पुणे (१६१) व ठाणे (१०९) या जिल्हयांमध्ये केंद्रित (९८ टक्के) झाली.

## जैव तंत्रज्ञान संकुले

८.११ राज्य शासनाने २००१ मध्ये जैव तंत्रज्ञान धोरण जाहीर केले. राज्यात मऔविम परिसरात, जालना आणि हिंजेवाडी (पुणे) येथे सार्वजनिक क्षेत्रातील जैव तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली असून एकूण ₹ ३०० कोटी गुंतवणुकीची चार खाजगी जैव तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात येत आहेत. राज्यामध्ये आठ सार्वजनिक क्षेत्रातील जैव तंत्रज्ञानाची विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित असून त्यामध्ये अंदाजे ₹ ४,००९ कोटीची गुंतवणूक व ०.९३ लाख इतका रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे. नोंदणीकृत जैव तंत्रज्ञान घटकांचा तपशिल तक्ता ८.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.७ नोंदणीकृत जैव तंत्रज्ञान घटक**

(३० नोव्हेंबर, २०११ पर्यंत)

| जैव तंत्रज्ञान घटक | एकूण घटक | | गुंतवणुक (₹ कोटी) | | रोजगार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नोंदणीकृत | इरादा पत्रे | नोंदणीकृत | इरादा पत्रे | नोंदणीकृत | इरादा पत्रे |
| सूक्ष्म, लघु व मध्यम | ४७ | १४ | १९७.६३ | १४०.९० | ६३१ | २२८ |
| मोठे | १६ | ७ | १,११९.८६ | ५३१.२० | ७१२ | ९३१ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन.

## सहकारी औद्योगिक वसाहती

८.१२ रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे या मुख्य उद्देशाने म.औ.वि.म. क्षेत्राव्यतिरिक्त औद्योगिक वसाहती सहकारी तत्वावर विकसित करण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने हाती घेतला असून उद्योग स्थापित करण्यासाठी भाग भांडवलातील हिस्सा व तांत्रिक सल्ला यासारख्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी राज्य शासन एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के इतके भांडवल देते व वित्तीय संस्थां यांच्याकडून कर्ज घेण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के रकमेची शासन हमी देते आणि उर्वरित २० टक्के रक्कम सहकारी औद्योगिक वसाहतीतील उद्योग स्थापन करणाऱ्या सभांसदांना भाग भांडवल म्हणून जमा करावी लागते. नोव्हेंबर,२०११ अखेर एकूण १४२ सहकारी औद्योगिक वसाहती मंजूर झाल्या होत्या त्यापैकी १०१ वसाहती कार्यरत असून ३४ वसाहती अद्याप कार्यान्वीत व्हावयाच्या आहेत आणि उर्वरीत ७ अवसायनात गेल्या आहेत. यापैकी ९२ सहकारी वसाहतीना शासनाने अर्थ सहाय्य पुरविले आहे. नोव्हेंबर, २०११ अखेर एकूण ७,५५० घटक बांधण्यात आले असून ७,२२२ घटक कार्यरत आहेत व त्यामुळे १.३७ लाख रोजगार निर्मिती झाली. या सहकारी औद्योगिक वसाहतीच्या एकुण भागभांडवलामध्ये राज्य शासनाचा ₹ १५.४९ कोटीचा वाटा आहे. राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती तक्ता ८.८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.८ राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती**

(३० नोव्हेंबर, २०११ रोजी)

| विभाग | नोंदणीकृत | कार्यरत | कार्यरत उद्योग घटक | भाग भांडवल (₹ कोटी) | रोजगार |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ४ | ३ | १,२४८ | नगण्य | १७,२३० |
| कोकण (मुंबई वगळून) | १४ | १२ | ५१० | ०.७७ | ११,१५५ |
| नाशिक | ३३ | २८ | १,४५५ | ४.९२ | ४२,२९५ |
| पुणे | ४५ | ३८ | ३,१५० | ७.८२ | ५७,१५० |
| औरंगाबाद | २६ | १३ | ४६२ | ०.९६ | ५,२६० |
| अमरावती | १० | ३ | ९२ | ०.२३ | ६७७ |
| नागपूर | १० | ४ | ३०५ | ०.७९ | ३,३१५ |
| **एकूण** | **१४२** | **१०१** | **७,२२२** | **१५.४९** | **१,३७,०८२** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सूक्ष्म, लघु, मध्यम व मोठे उपक्रम

८.१३ वस्तुनिर्माण आणि सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांपैकी वस्तूनिर्माण उपक्रमांचे त्यांच्या यंत्रसामग्रीतील गुंतवणुकीच्या आधारे व सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांचे साधनसामुग्रीच्या मूल्याच्या आधारे सूक्ष्म,लघु,मध्यम व मोठे उपक्रम असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम आणि मोठ्या उपक्रमांचा तपशील तक्ता ८.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.९ सूक्ष्म, लघु , मध्यम आणि मोठ्या उपक्रमांचा तपशील**

(३१ डिसेंबर, २०११ रोजी)

| विभाग | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | रोजगार (लाखात) | मोठे उपक्रम | रोजगार (लाखात) |
|---|---|---|---|---|
| मुंबई | १७,२३५ | २.४९ | ३११ | ०.४७ |
| | (१०.६) | (१७.८) | (६.३) | (४.२) |
| कोकण (मुंबई वगळून) | २१,३८७ | २.०३ | १,२२२ | २.४५ |
| | (१३.१) | (१४.५) | (२४.९) | (२१.८) |
| नाशिक | २५,१९४ | २.०७ | ६६५ | १.५२ |
| | (१५.५) | (१४.८) | (१३.५) | (१३.५) |
| पुणे | ६६,५८८ | ४.३८ | १,४९० | ४.०७ |
| | (४०.९) | (३१.३) | (३०.३) | (३६.२) |
| औरंगाबाद | १२,२७१ | १.१७ | ५३८ | १.११ |
| | (७.५) | (८.४) | (११.०) | (९.९) |
| अमरावती | ४,६८९ | ०.३४ | १४८ | ०.३२ |
| | (२.९) | (२.४) | (३.०) | (२.८) |
| नागपूर | १५,६०९ | १.५१ | ५४१ | १.३१ |
| | (९.६) | (१०.८) | (११.०) | (११.६) |
| **महाराष्ट्र** | १,६२,९७३ | **१३.९९** | **४,९१५** | **११.२५** |
| | **(१००.०)** | **(१००.०)** | **(१००.०)** | **(१००.०)** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन.

*टिप* - कंसातील आकडे एकूणशी टक्केवारी दर्शवितात

## खनिज संपत्ती

८.१४ राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे क्षेत्र सुमारे ५८ हजार चौरस कि.मी. इतके असून ते विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि यवतमाळ, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहेत. या विभागांत कोळसा, चुनखडी, कच्चे मँगेनीज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, डोलोमाईट, लॅटराईट, कायनाईट,

फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट इत्यादी खनिजांचे साठे आढळून येतात. ३१ मार्च, २०११ पर्यंत राज्यात ०.६ लाख रोजगार असलेल्या प्रमुख खनिजांच्या २७७ खाणी कार्यरत आहेत. राज्यातील २०१०-११ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ ८,७०३ कोटी होते. यापैकी उत्खनन केलेल्या कोळशाचे मूल्य ₹ ५,०८२ कोटी असून ते राज्यातील उत्खनन केलेल्या सर्व खनिजांच्या एकूण मूल्याच्या ५८ टक्के होते. राज्यातील महत्त्वाच्या खनिजांचे उत्पादन व मूल्य परिशिष्ट ८.२ मध्ये दिले आहे.

# संस्थात्मक चौकट

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

८.१५ औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी म.औ.वि.म.ची स्थापना झाली आहे. म.औ.वि.म. ने रस्ते, पाणी, वीजपुरवठा व उद्योजकांसाठी इतर अंतर्गत सेवा यासारख्या अत्यावश्यक पायाभूत सोयींनी युक्त अशा औद्योगिक वसाहती विकसित केल्या आहेत. मार्च २०११ अखेर विकसित भूखंडाच्या ८९ टक्के भूखंड उद्योजकांना वितरीत करण्यात आले. म.औ.वि.म. अंतर्गत औद्योगिक घटकाचा तपशील तक्ता ८.१० मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता ८.१० महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक**

(३१ मार्च रोजी )

| विभाग | घटक संख्या | | गुंतवणूक (₹ कोटी) | | रोजगार (लाख) | | भूखंडाची संख्या @ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | २०१० | २०११ | २०१० | २०११ | विकसित | वितरीत | वितरीतची विकसितशी टक्केवारी |
| मुंबई | ३०५ | ३०५ | १,४०० | ३,७१५ | १.२० | ०.७२ | ३६० | ३५७ | ९९.२ |
| कोकण (मुंबई वगळून ) | १०,८२१ | ११,१२५ | १६,५२९ | १७,८४९ | २.५५ | २.६९ | १९,०९४ | १६,८२५ | ८८.१ |
| नाशिक | ६,०५७ | ६,१३५ | २,१५१ | १२,७३० | ०.५५ | ०.६६ | ९,३७० | ८,७२३ | ९३.१ |
| पुणे | ७,६०३ | ९,२७३ | २०,०३२ | २४,६४१ | ३.०७ | ३.५ | १६,३५६ | १५,००९ | ९१.८ |
| औरंगाबाद | ४,४७९ | ४,५७७ | ४,३०३ | ५,५७३ | ०.५३ | ०.५४ | १०,६७२ | ९,५४८ | ८९.५ |
| अमरावती | १,४४१ | १,५८९ | ७६८ | ७९५ | ०.१९ | ०.१९ | ४,६९७ | ३,३५० | ७१.३ |
| नागपूर | २,६४९ | २,६८७ | ८,६०९ | ८,६२८ | ०.७१ | ०.७१ | ५,५१८ | ४,६४८ | ८४.२ |
| **एकूण** | **३३, ३५५** | **३५,६९१** | **५३,७९२** | **७३,९३१** | **८. ८०** | **९.०१** | **६६,०६७** | **५८,४६०** | **८८.५** |

*आधार :* म.औ.वि.म. महाराष्ट्र शासन @ २०११

## महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

८.१६ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगाचा विकास करणेसाठी उद्योजकांना मदत करते. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल तक्ता ८.११ मध्ये देण्यात आली आहे.

## महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

८.१७ महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे प्रमुख कार्य म्हणजे राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तार करणे हे आहे. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना २०१०-११ मध्ये ₹ ३२.३५ कोटी वित्तीय सहाय्य अनुदानाच्या स्वरूपात देण्यात आले आणि २०११-१२ मध्ये ₹ १९.१९ कोटी वाटप करणे प्रस्तावित आहे. राज्याची खादी व ग्रामोद्योगाची प्रगती तक्ता ८.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.११ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ |
|---|---|---|---|
| कच्चामाल खरेदी | ११४.४१ | १११.५१ | ५४.९४ |
| पणन सहाय्य | २०३.६४ | ३५५.३१ | ३७५.३३ |
| इतर | ०.६४ | १.०८ | २०३.०७ |
| **एकूण** | **३१८.६९** | **४६७.९०** | **६३३.३४** |

*आधार :* महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ + डिसेंबर पर्यंत

**तक्ता ८.१२ खादी व ग्रामोद्योग घटकांची कामगिरी**

| वर्ष | सहाय्यित घटक (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २००८-०९ | २.६५ | १,६६१ | ६.६ |
| २००९-१० | २.७४ | १,९०८ | ६.९ |
| २०१०-११ | ४.२७ | २,८६२ | ५.५ |
| २०११-१२+ | ६.९१ | ४,६३१ | ८.९ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ + डिसेंबर पर्यंत

८.१८ कारागीर रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१०-११ मध्ये ५.० लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या ज्या मागील वर्षी ४.७ लाख होत्या. वर्ष २०११-१२ मध्ये ५.५ लाख कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

### महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

८.१९ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (मपविम) हे पर्यटन धोरण राज्यात राबविणारी प्रमुख्य संस्था आहे. पर्यटन क्षमता व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उपलब्ध होणारा रोजगार या दोन्ही बाबी विचारात घेऊन राज्य शासनाने 'पर्यटन धोरण, २००६'अंतर्गत पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी कृती आराखडा तयार केला आहे. राज्य शासनाने २०१०-११ या वर्षासाठी पर्यटन क्षेत्रासाठी केलेल्या ₹ २८३.३ कोटी रकमेच्या तुलनेत २०११-१२ या वर्षासाठी पर्यटन क्षेत्राकरीता ₹ ५१०.५ कोटी इतका नियतव्यय ठेवलेला आहे. ३१ डिसेंबर, २०११ अखेर राज्य शासनाकडून मिळालेल्या निधीपैकी ₹ ४७.८१ कोटी आणि केंद्र शासनाकडून मिळालेल्या निधीपैकी ₹ ३१.५१ कोटी इतका निधी म.प.वि.म.कडे अखर्चित होता.

८.२० म.प.वि.म. कडून हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांची माहिती तक्ता ८.१३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.१३ म.प.वि. महामंडळाने हाती घेतलेले प्रकल्प**

(₹ कोटी)

| वर्ष | प्रकल्पांची संख्या | पूर्ण प्रकल्पांची संख्या | मंजूर प्रकल्पांची अंदाजित किंमत | खर्च |
|---|---|---|---|---|
| २००५-०६ | ८ | ४ | २०.३१ | १२.६९ |
| २००६-०७ | १४ | ६ | २८.६९ | १८.८३ |
| २००७-०८ | ७ | ३ | २२.७९ | २.२७ |
| २००८-०९ | २ | - | ४०.९४ | ०.०८ |
| २००९-१० | १ | - | ४.८६ | ३.८८ |
| २०१०-११ | ८ | - | ६.०८ | २.०२ |

*आधार :* म.प.वि.म., महाराष्ट्र शासन

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

८.२१ औद्योगिक प्रदूषण ही पर्यावरणाच्या दृष्टीने एक प्रमुख चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे प्रदूषणासंबंधी कायद्याची अंमलबजावणी करणारे प्रमुख संस्था आहे. मार्च, २०११ अखेरीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारीतील एकूण ७५,०८० कारखान्यांपैकी वायु प्रदूषण करणारे १७ टक्के, जल प्रदूषण करणारे १८ टक्के आणि धोकादायक टाकाऊ पदार्थ निर्माण करणारे सात टक्के कारखाने होते. प्रदूषण कमी करण्याच्या हेतूने मंडळाने २०१०-११ मध्ये जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ अंतर्गत कलम ३३ अ खाली ६८० कारखान्यांना, तर वायु (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अंतर्गत कलम ३१अ खाली ३२१ कारखान्यांना निर्देश दिले आहेत. राज्यातील ८,००७ कारखान्यांचा समावेश असलेल्या २६ औद्योगिक वसाहतीत सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत. ह्या प्रयत्नांव्यतिरिक्त काही कारखान्यांकडून बँक हमी घेण्यात आली असून प्रदूषण नियंत्रण उपाययोजना अंमलात आणण्यापर्यन्त काही प्रदूषणकारी कारखान्यांचा विद्युत व जलपुरवठा खंडीत करण्यात आला होता.

### औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ

८.२२ आजारी उद्योग हा आर्थिक वाढीमधील एक प्रमुख अडथळा असून त्यामुळे भांडवली मालमत्ता, उत्पादकता व रोजगार यांच्यावर विपरीत परिणाम होतो. आजारी उद्योग संस्था (विशेष तरतूद), अधिनियम १९८५ अंतर्गत उद्योगाच्या पुनर्वसनासाठी केंद्र शासनाने औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळ (बी.आय.एफ.आर.) स्थापन केले आहे. कायदा अंमलात आल्यापासून नोव्हेंबर,२०११ पर्यंत मंडळाकडे पुनर्वसनासाठी राज्यातील एकूण ९४० मध्यम व मोठ्या उद्योगांकडून प्रकरणे प्राप्त झाली आहेत. त्यांपैकी १७० प्रकरणे पुनर्वसनासाठी मंजूर, १४० प्रकरणे उद्योग बंद करण्यासाठी शिफारस, ३७६ प्रकरणे फेटाळली, ९६ प्रकरणे राज्याबाहेरील आणि १५८ प्रकरणे प्रलंबीत आहेत.

## विविध पाहणीतील निष्कर्ष

### औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.२३ औद्योगिक क्षेत्राची वाढ औद्योगिक उत्पादन निर्देशांकाद्वारे मोजली जाते. सध्याच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकामध्ये खनिकर्म, वस्तुनिर्माण व वीज या क्षेत्रांचा समावेश आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालय अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक

संकलित करुन जाहीर करते. एप्रिल,२०११ ते जानेवारी,२०१२ या कालावधीत अखिल भारतीय स्तरावरील निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) गतवर्षीच्या तत्सम कालावधीतील १६२.५ वरुन १६९.० इतका वाढला. या निर्देशांकानुसार एप्रिल,२०११ ते जानेवारी, २०१२ या कालावधीतील वाढ ४.० टक्के होती जी गतवर्षाच्या तत्सम कालावधीत ८.३ टक्के होती. अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांकांचा तपशिल परिशिष्ट ८.३ मध्ये दिला आहे, तर एप्रिल,२०१० ते जानेवारी, २०११ आणि एप्रिल,२०११ ते जानेवारी,२०१२ या कालावधीतील गटनिहाय अखिल भारतीय निर्देशांकांचा तपशील तक्ता ८.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१४ भारतातील औद्योगिक उत्पादन निर्देशांक**

(पायाभूत वर्ष २००४-०५=१००)

| बाब | भार | औद्योगिक उत्पादन निर्देशांक एप्रिल ते जानेवारी २०१०-२०११ | २०११-२०१२ @ | मागील वर्षाच्या तुलनेत एप्रिल,२०११ ते जानेवारी,२०१२ या कालावधीतील शेकडा वाढ @ |
|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | १६२.५ | १६९.० | ४.० |
| खनिकर्म | १४.१६ | १२८.९ | १२५.५ | (-) २.६ |
| वस्तुनिर्माण | ७५.५३ | १७२.३ | १७९.९ | ४.४ |
| ऊर्जा | १०.३१ | १३६.८ | १४८.८ | ८.८ |

*आधार:* केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन @ शिघ्र अंदाज

## वार्षिक उद्योग पाहणी

८.२४ वार्षिक उद्योग पाहणीत (वाउपा) कारखाना अधिनियम, १९४८ खाली नोंद झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ खाली नोंद झालेल्या विडी व सिगारेट आस्थापनांचा समावेश आहे. अलिकडच्या उपलब्ध वार्षिक उद्योग पाहणी आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, वर्ष २००९-१० मध्ये देशातील एकूण नोंदणीकृत उद्योगांमध्ये राज्याचा वाटा १२.३ टक्के होता. याच कालावधीत राज्याचा वाटा एकूण उत्पादन मूल्यात १६.८ टक्के, स्थूल मूल्यवृद्धीत १९.६ आणि निव्वळ मूल्यवृध्दीत २०.२ टक्के इतका होता. राज्य व भारतीय स्तरावर निवडक औद्योगिक निर्देशकांची तुलनात्मक माहिती तक्ता ८.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१५ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत उद्योगांबाबत निवडक निर्देशक**

(₹ कोटी)

| तपशील | २००८-०९ | | | २००९-१० * | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी |
| उद्योग (संख्या) | २०,४५० | १,५५,३२१ | १३.२ | १९,४५७ | १,५८,८७७ | १२.३ |
| स्थिर भांडवल | १,७९,०१८ | १०,५५,९६६ | १७.० | १,९७,२७६ | १३,५१,३२४ | १४.६ |
| खेळते भांडवल | ४९,२७६ | ३,११,२३३ | १५.८ | ६३,४३७ | ३,८७,७६१ | १६.४ |
| एकूण उत्पादन | ६,००,१७४ | ३२,७२,७९८ | १८.३ | ६,२३,९९७ | ३७,२२,७७७ | १६.८ |
| एकूण निविष्टी | ४,७२,५६८ | २६,६१,४८६ | १७.८ | ४,८९,०८१ | ३०,३५,६०५ | १६.१ |
| स्थूल मूल्यवृद्धी | १,२७,६०५ | ६,११,३११ | २०.९ | १,३४,९१७ | ६,८७,१७२ | १९.६ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १,१२,८७८ | ५,२७,७६६ | २१.४ | १,१७,८०६ | ५,८२,०२४ | २०.२ |
| रोजगार (लाखात ) | १०.३४ | ८७.७७ | ११.८ | १०.६३ | ९१.५८ | ११.६ |
| नफा | ६६,२५९ | २,९६,९११ | २२.३ | ६८,४७८ | ३,२२,८३४ | २१.२ |

*आधार:* केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अंदाजित

८.२५ २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत राज्याचा निव्वळ मुल्य वृध्दीतील वार्षिक सरासरी चक्र वाढीचा दर १२.२ होता तर तो अखिल भारतीय स्तरावर १६.९ इतका होता. वार्षिक उद्योग पाहणीनुसार निवडक राज्यातील निव्वळ मुल्य वृध्दीचे कल आलेख ८.२ मध्ये दर्शविले आहेत.

८.२६ वर्ष २००९-१० मध्ये निव्वळ मूल्यवृध्दीच्या बाबतीत (i) कोळसा, शुध्द पेट्रोलियम उत्पादने इत्यादी (२५.९ टक्के) , (ii) रसायने व रासायनिक उत्पादने (१३.२ टक्के) आणि (iii) यंत्रे व यंत्रसामुग्री दुरुस्ती व उभारणी (९.० टक्के) हे प्रमुख उद्योग होते. या उद्योग गटांचे एकूण उद्योगातील प्रमाण ४८.१ टक्के असून स्थिर भांडवलातील प्रमाण २७ टक्के होते. वार्षिक उद्योग पाहणीनुसार राज्यातील उद्योगांची महत्त्वाची वैशिष्ट्ये परिशिष्ट ८.४ मध्ये दिली आहेत.

**आलेख ८.२ : निवडक राज्यातील निव्वळ मूल्यवृद्धी**




८.२७ राज्यातील २००९-१० मधील प्रति कारखाना स्थिर भांडवलातील गुंतवणूक, उत्पादित वस्तू व सेवांचे मुल्य आणि निव्वळ मुल्यवृध्दी भारतापेक्षा अनुक्रमे १९ टक्के, ३७ टक्के व ६५ टक्क्यांनी जास्त आहे. वाउपा २००८-०९ व २००९-१० वर आधारित महत्त्वाचे 'प्रति कारखाना' व 'प्रति कामगार' निर्देशक तक्ता ८.१६ मध्ये दिले असून त्यांचा निवडक राज्यांतील कल अनुक्रमे आलेख ८.३ व आलेख ८.४ मध्ये दर्शविला आहे.

**आलेख ८.३ : निवडक राज्यातील प्रति कारखाना निव्वळ मूल्यवृद्धी**




**आलेख ८.४ : निवडक राज्यातील प्रति कामगार निव्वळ मूल्यवृद्धी**



**तक्ता ८.१६ महत्त्वाचे निर्देशक**

(₹ लाख)

| निर्देशक | २००८-०९ | | २००९-१० * | |
|---|---|---|---|---|
| | *महाराष्ट्र* | *भारत* | *महाराष्ट्र* | *भारत* |
| **अ) प्रति कारखाना** | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | ८७५ | ६८० | १,०१४ | ८५१ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | २,९३५ | २,१०७ | ३,२०७ | २,३४३ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | ५५२ | ३४० | ६०५ | ३६६ |
| रोजगार (संख्या) | ५१ | ५७ | ५५ | ५८ |
| **ब) प्रति कामगार** | | | | |
| कामगार उत्पादकता (₹) (@) | ११.६ | ८.८ | १०.७ | ८.४ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १०.९ | ६.० | ११.१ | ६.४ |
| वार्षिक मजुरी | ०.९४ | ०.६८ | १.०३ | ०.७५ |

*आधार :* केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी

टीप: (@) निव्वळ मूल्यवृध्दी प्रती वेतन

८.२८ राज्यातील नोंदणीकृत उद्योग क्षेत्राच्या संरचनेत लक्षणीय बदल झाले आहेत. नोंदणीकृत उद्योग क्षेत्राच्या संरचनेत २०००-०१ आणि २००९-१० या कालावधीमध्ये झालेला बदल आलेख ८.५ मध्ये दर्शविला आहे.

**आलेख ८.५ : नोंदणीकृत क्षेत्रातील उद्योगांची संरचना**




## राष्ट्रीय नमुना पाहणी

८.२९ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय राष्ट्रीय स्तरावर सामाजिक व आर्थिक विषयासंबंधी वेळोवेळी नमुना पाहणी करीत असते. अर्थ व सांख्यिकी संचालनालय राष्ट्रीय नमुना पाहणीच्या फेऱ्यात सहभाग घेत असते. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ६७ व्या फेरीत ( जुलै,२०१० ते जून, २०११ ) 'अनिगमीत बिगरकृषि उपक्रम (बांधकाम वगळून)' या विषयावर माहिती घेण्यात आली. रानपा ६२ व्या फेरीत (वर्ष २००५-०६) 'असंघटित बिगर कृषि वस्तूनिर्माण' या विषयावर माहिती घेण्यात आली. रानपा ६७ व्या फेरीच्या (३१,००० राज्यातील उपक्रमांच्या नमुन्यावर आधारित) निष्कर्षावरुन असे दिसते की, वस्तुनिर्माण क्षेत्रातील वार्षिक स्थूल मुल्यवृध्दी प्रति उपक्रम ₹ १.५३ लक्ष आणि प्रति कामगार ₹ ०.७७ लक्ष इतकी होती. तर ६२ व्या फेरीनुसार ती प्रति उपक्रम ₹ ०.९८ लक्ष व प्रति कामगार ₹ ०.४४ लक्ष इतकी होती. प्रति उपक्रम व प्रति कामगार स्थूल मूल्यवृध्दी वार्षिक सरासरी चक्र वाढीचा दर ९.३२ व तो ११.८ होता. रानपा ६७ व्या फेरीच्या आधारे सेवा क्षेत्रात (व्यापार वगळून) प्रति उपक्रम स्थूल मूल्यवृध्दी ₹ १.८९ लाख तर प्रति कामगार ₹ ०.८६ लाख असल्याचे अंदाजित आहे. व्यापार क्षेत्रात प्रति उपक्रम स्थूल मूल्यवृध्दी ₹ २.०२ लाख आणि प्रति कामगार ₹ १.१३ लाख असल्याने व्यापार क्षेत्राची कामगिरी चांगली दिसून येते.

# सहकार

८.३० सहकार हि सहकार कायद्याखाली नोंदणी केलेली, लोकांनी पुढाकार घेऊन सामाजिक कार्य करून नफा कमविण्यासाठी चालविलेली सहकार चळवळ असुन हा नफा व्यवस्थापन करणाऱ्या लोकांमध्ये वाटला जातो त्यांना सदस्य असे म्हणतात. परंतु सहकारी चळवळ व्यावसायिक तत्वावर म्हणजे कृषी प्रक्रिया, दुग्ध, मत्स्य व्यवसाय, साठवणूक, विक्री, पणन, पतपुरवठा व बँकिंग, गृहनिर्माण इत्यादी क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे.

८.३१ संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण परिषदेने २०१२ हे वर्ष सहकाराचे आंतरराष्ट्रीय वर्ष (सआव) म्हणून घोषित केले आहे. यामध्ये सामाजिक व आर्थिक विकास विशेषतः आर्थिक व दारिद्रय निर्मुलन, रोजगार निर्मिती, सामाजिक ऐक्य यातील सहकाराचे योगदान विषद करण्यात आले आहे. या क्षेत्राबाबत लोकांमध्ये जागरूकता वाढविणे, वाढीला चालना देणे व योग्य धोरणे आखणे हे सआव चे ध्येय आहे .

८.३२ यानुसार सहकार चळवळीला उत्तेजन देण्यासाठी राज्याने पुढील कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले आहे.

- सहकार विभाग लघु मुदत सहकारी पतपुरवठा संरचना, नागरी पतपुरवठा संस्था, आंतरराष्ट्रीय सहकार परिषद, हातमाग व यंत्रमाग, वस्त्रोद्योग इ.विषयांवर महत्वाचे कार्यक्रम आयोजित करेल. या कार्यक्रमातून भविष्यातील पणनविषयक धोरण, आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत वस्तुंचे विनिमय इत्यादी विषय समाविष्ट आहेत.
- साखर आयुक्तालय, पणन संचालनालय विभाग त्यांचा वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करतील.
- प्रत्येक जिल्हयात कमीतकमी एक कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.
- या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या संस्थाना / व्यक्तींना पारितोषिक देण्यात येईल.

८.३३ राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी सुमारे ५६० लाख सभासद असलेल्या २.२४ लाख सहकारी संस्था कार्यरत होत्या. एकूण सहकारी संस्थांपैकी, ९.६ टक्के कृषी पतपुरवठा, १०.४ टक्के बिगर कृषी पतपुरवठा व उर्वरित ८० टक्के पणन, उत्पादन, उपसा जलसिंचन, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, वाहतूक, सामाजिक इत्यादी क्षेत्रात कार्यरत होत्या. या संस्थांचा तपशील तक्ता ८.१७ मध्ये दिला आहे व अधिक तपशिल परिशिष्ट ८.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१७ राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | बदल |
| संस्था (संख्या) | २,१८ ,३२० | २,२४,३०६ | २.७ |
| सभासद (लाख) | ५४२ | ५६० | ३.३ |
| भरणा भाग भांडवल | १५,०१२ | १५,५०५ | ३.३ |
| *या पैकी,* राज्य शासनाचे | २,०३७ | २,१९७ | ७.९ |
| खेळते भांडवल | २,४६,१६२ | २,४८,३४१ | ०.९ |
| ठेवी | १,२८,५७९ | १,३६,६९६ | ६.३ |
| स्थूल कर्ज | ८१,६८० | ९५,४८४ | १६.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६०,२१५ | ६१,०३८ | १.४ |
| तोटयाची रक्कम | ३,८६७ | ३,८२० | (-) १.२ |
| येणे कर्ज | १,१२,९६८ | १,१७,२०६ | ३.८ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## कृषि पतपुरवठा

८.३४ कृषी व संलग्न कार्य करण्यासाठी शेतकऱ्यांना व पतपुरवठा विषयक सेवा उपलब्ध करून देण्यामध्ये कृषी सहकारी पत संस्था महत्वाचे मध्यम म्हणून ओळखल्या जातात. कृषि सहकारी पतपुरवठा संरचना त्रिस्तरीय असून महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही शिखर संस्था, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व गाव पातळीवर प्राथमिक सहकारी पत संस्था आहेत. या बाबतचा तपशील तक्ता क्र. ८.१८ मध्ये दिला आहे.

**आलेख ८.६ : सहकारी संस्थांतील खेळते भांडवल व येणे कर्ज**



## तक्ता ८.१८ कृषि सहकारी बँकांच्या महत्त्वाच्या बाबी

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.** | | | |
| सभासद (संख्या) | २,१५५ | २,१५३ | नगण्य |
| खेळते भांडवल | २६,८९२ | २५,४४१ | (-) ५.४ |
| ठेवी | २१,४२१ | १७,४२९ | (-) १८.६ |
| स्थूल कर्ज | १०,३६४ | ११,८८८ | १४.७ |
| येणे कर्ज | ७,९९८ | १०,९८९ | ३७.४ |
| थकीत कर्ज | १,१४९ | १,८७४ | ६३.१ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | |
| सभासद (संख्या) | १,४८,३६० | १,५२,६८४ | २.९ |
| खेळते भांडवल | ५७,३६४ | ६२,१९४ | ८.४ |
| ठेवी | ४४,२७८ | ४६,६११ | ५.३ |
| स्थूल कर्ज | १९,४६३ | २७,९०४ | ४३.४ |
| येणे कर्ज | २५,१०० | ३०,१७३ | २०.२ |
| थकीत कर्ज | ५,२४८ | ५,८५० | ११.५ |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या. @** | | | |
| सभासद (संख्या) | ८२७ | ८२७ | ० |
| खेळते भांडवल | १,८५३ | १,९५५ | ५.५ |
| ठेवी | ०.०१ | ०.०१ | ० |
| स्थूल कर्ज | ० | ० | ० |
| येणे कर्ज | १,१६२ | १,१३३ | (-) २.५ |
| थकीत कर्ज | १,०९६ | १,०९४ | (-) ०.२ |
| **जिल्हास्तरीय सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका (२९)** | | | |
| सभासद (लाखात) | ११ | ११ | ० |
| खेळते भांडवल | १,३५७ | ८०८ | (-) ४०.३ |
| ठेवी | ४१ | ३० | (-) २६.८ |
| स्थूल कर्ज | ० | ० | ० |
| येणे कर्ज | ४८६ | ३९७ | (-) १८.३ |
| थकीत कर्ज | ४३१ | ३७७ | (-) १२ .५ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी @ अवसायनात गेल्याने कर्ज देणे बंद केले आहे

८.३५ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था (प्राकृपसं) मुख्यतः शेतीच्या हंगामी कामांकरिता अल्प मुदतीसाठी कृषि पतपुरवठा करण्यात मुख्य भूमिका पार पाडतात. प्राकृपसं मध्ये कृषि सेवा संस्था व आदिवासी सहकारी संस्थांचा समावेश आहे. ३१ मार्च, २०११ रोजी तोटयातील प्राकृपसंच्या संख्यामध्ये ३१ मार्च,२०१० तुलनेत २.५ टक्क्यांची घट झाली असली तरी ४८.८ टक्के प्राकृपसं तोटयात आहेत. थकबाकीचे मोठे प्रमाण, अपुरा किंवा अनुपलब्ध निधी आणि संसाधने उभारण्यामधील असमर्थता या कारणांनी प्राकृपसंच्या कार्यावर विपरीत परिणाम आहे. प्राकृपसंचा तपशील तक्ता ८.१९ मध्ये दिला आहे.

## तक्ता ८.१९ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचा तपशील

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| संस्था (संख्या) | २१,३९२ | २१,४५१ | ०.३ |
| सभासद (लाख) | १५० | १५० | ० |
| खेळते भांडवल | १५,३४७ | १६,२५५ | ५.९ |
| स्वनिधी | ३,२४० | ३,३४६ | ३.३ |
| भाग भांडवल | १,७६५ | १,७८१ | ०.९ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६ | ६ | ० |
| कर्जदार सभासद (लाख) | ३८.२२ | ३९.७३ | ४.० |
| *त्यापैकी,* १) अत्यल्प भूधारक (१ हेक्टर पर्यंत) @ | २६.२ | २५.४ | लागू नाही |
| २) अल्पभूधारक (१ ते २ हेक्टर) @ | २२.३ | २०.३ | लागू नाही |
| स्थूल कर्ज | ६,९९१ | ६,१५८ | (-) ११.९ |
| येणे कर्ज | १०,७२७ | ११,४२५ | ६.५ |
| कर्ज वसुली | ९,४७९ | ७,८७९ | (-) १६.९ |
| थकीत कर्ज | ४,३७५ | ४,८५२ | १०.९ |
| तोट्यातील संस्था | १०,७३९ | १०,४६९ | (-) २.५ |
| तोटा | ६१८ | ७१२ | १५.२ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन @ एकूण कर्जदार सभासदांशी टक्केवारी * अस्थायी

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

८.३६ पीक उत्पादन घेण्यास प्रोत्साहन देणे व लघु मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जाचा परतावा वेळेवर करण्यासाठी प्रेरीत करणे यास्तव शेतकऱ्यांना व्याज सवलत दिली जाते. पतपुरवठयाच्या त्रिस्तरीय संरचनेचे सभासद असलेले कर्जदार शेतकरी सवलत मिळण्यास पात्र आहेत. या योजनेअंतर्गत ₹ ०.२५ लाखापर्यंत कर्जावर चार टक्के व ₹ ०.२५ पेक्षा अधिक व रू.तीन लाख पर्यंतच्या कर्जावर दोन टक्के व्याज सवलत दिली जाते. शेतकऱ्यांनी दरवर्षी वर्षाच्या ३० जून पर्यंत कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेत ₹ १०.९३ कोटीची तरतूद होती व ₹ ८.८२ कोटी खर्च झाले. लाभार्थ्यांचे उद्दिष्ट १.९१ लाख होते व त्यापैकी १.५९ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. सन २०११-१२ मध्ये ₹ ८४.२८ कोटीचा नियतव्यय होता व माहे जानेवारी, २०१२ पर्यंत ₹ ६९ .६६ कोटी खर्च झाले. एकूण ९.८९ लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट साध्य झाले.

## सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना अर्थसहाय्य

८.३७ सहकारी उपसा जलसिंचन सहकारी संस्थाना प्रोत्साहन देण्यासाठी शासन त्यांना ₹ १ कोटी अथवा प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान स्वरूपात अर्थ सहाय्य म्हणून मंजुर करते, जेणेकरून या संस्थांच्या सदस्यांवरील आर्थिक बोजा कमी होईल. निधी अभावी व अर्थसहाय्यासाठी ज्यांचे प्रस्ताव अर्थ विभागाकडे प्रलंबित असल्याने प्रकल्पाचे काम सुरू न झालेल्या मार्च, १९९४ नंतर नोंदणी झालेल्या संस्था या योजनेच्या लाभार्थी आहेत. या योजनेसाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेत ₹ १६.३३ कोटी तरतूद होती व ₹ १८.०६ कोटी खर्च झाले. एकुण १३० संस्थांच्या उदि्ष्टापैकी १०१ संस्थांना लाभ देण्यात आला. सन २०१०-११ मध्ये तरतुद व खर्च दोन्ही अनुक्रमे ₹ ३.४३ कोटी होता. एकूण २५ संस्थांच्या उद्दिष्टांपैकी १५ संस्थाना अर्थसहाय्य देण्यात आले.

## कृषि प्रक्रिया सहकारी संस्था

८.३८ कृषि प्रक्रिया सहकारी संस्था शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा वाजवी मोबदला प्राप्त करून देण्याचे व ग्रामिण उद्योगांच्या वाढीला चालना देण्याचे माध्यम आहेत. राज्य शासन अशा सहकारी संस्थांना प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी अर्थ सहाय्य पुरविते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था व दुग्ध संघ आणि मत्स्य संस्था हे प्रमुख घटक आहेत. राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी ४८,८४८ कृषि प्रक्रिया सहकारी संस्था होत्या. या सर्व संस्थांची एकूण सभासद संख्या ७५.६२ लाख होती.

## साखर कारखाने

८.३९ सहकारी साखर कारखान्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात राज्याच्या ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी २०२ साखर कारखाने होते. याबाबतचा तपशील तक्ता ८.२० मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२० साखर कारखान्यांचा तपशील**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| नोंदणीकृत कारखाने (संख्या) | २०२ | २०२ | ० |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | १११ | १२३ | १०.८ |
| सभासद ('००) | १८,७०० | २१,२२० | १३.५ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (₹ कोटी) | ८५१ | ९२० | ८.० |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (लाख मे. टन) | ४.८७ | ५.१२ | ५.१ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) | ६१४.४७ | ८०२.५२ | ३०.६ |
| उसाची किंमत (₹ प्रति टन ) | | | |
| अ) खरेदी | १,२९८ | १,३९१ | ७.२ |
| ब) कारखान्यांनी अदा केलेली | २,१०० | २,०४८ | (-) २.५ |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) | ७१.०६ | ९०.७२ | २७.७ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.५६ | ११.३० | (-) २.२ |
| मळी (लाख मे. टन) | १६.५ | ३२.१ | ९४.५ |
| कारखान्यांची संख्या | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ६४ | ६५ | १.६ |
| ब) सह-वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | २७ | ३२ | १८.५ |
| वीज निर्मिती (दशलक्ष युनिट) | ३४९ | ४२५ | २१.८ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ४० | ४८ | २०.० |

आधार : साखर आयुक्त, निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी

८.४० देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३२ टक्के कारखाने राज्यात असुन त्यानंतर २३ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. दि.१५ जानेवारी, २०१२ रोजी देशातील एकूण गाळप झालेला ऊस व साखरेच्या उत्पादनात राज्याचा हिस्सा ६२.१ टक्के व ६६.४ टक्के होता, जो व ते उत्तर प्रदेशच्या अनुक्रमे सात टक्के व ५.२ टक्क्यांपेक्षा बराच जास्त होते.

८.४१ राज्यात ३१ मार्च, २०११ अखेर कापूस पिंजणी व गासड्या बांधणा-या १६४ सहकारी संस्था होत्या. या संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा हिस्सा २० टक्के होता. सुमारे ८१.१ टक्के संस्था तोट्यात होत्या. हा तपशिल तक्ता क्र. ८.२१ मध्ये दिला आहे.

८.४२ राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी १६७ सहकारी सूत गिरण्या होत्या. या सूत गिरण्यांच्या भाग भांडवलामध्ये राज्य शासनाचा हिस्सा ६४.३ टक्के होता. सुमारे ४३.७ टक्के सूत गिरण्या तोट्यात होत्या. सदर तपशील तक्ता ८.२२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२१ कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी २०१० | ३१ मार्च रोजी २०११* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | १८१ | १६४ | (-) ९.४ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | १५३ | १६४ | ७.२ |
| सभासद ('००) | २,२४५ | २,२५९ | ०.६ |
| भाग भांडवल | १० | १० | ० |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २ | २ | ० |
| खेळते भांडवल | ९० | ९५ | ५.६ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन ) | १५९ | १७८ | ११.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १२२ | १३३ | ९.० |
| तोटयाची रक्कम | २ | २ | ० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* अस्थायी

**तक्ता ८.२२ सहकारी सूत गिरण्यांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी २०१० | ३१ मार्च रोजी २०११* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| गिरण्यांची संख्या | १६६ | १६७ | ०.६ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ५८ | ५९ | १.७ |
| सभासद ('००) | ५,४७० | ५,२३८ | (-)४.२ |
| भाग भांडवल | १,००४ | १,११४ | ११.० |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६५६ | ७१६ | ९.१ |
| चात्यांची संख्या (लाख) | १३.३७ | १३.७४ | २.८ |
| उत्पादित सूताचे मूल्य | १,०८९ | १,०१६ | (-) ६.७ |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ७२ | ७३ | १.४ |
| तोटयाची रक्कम | १३७.९७ | १३३.४३ | (-) ३.३ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* अस्थायी

८.४३ राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी ६८५ सहकारी हातमाग व १,३७८ यंत्रमाग संस्था होत्या. हातमाग व यंत्रमाग संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा वाटा अनुक्रमे ८.६ व २४ टक्के होता. सुमारे ४९.३ टक्के सहकारी हातमाग व ७१.६ टक्के यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या. याबाबतचा तपशील तक्ता ८.२३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२३ सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी हातमाग २०१० | हातमाग २०११* | हातमाग शेकडा बदल | यंत्रमाग २०१० | यंत्रमाग २०११* | यंत्रमाग शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ६८५ | ६८५ | ० | १,३९० | १,३७८ | (-) ०.९ |
| सभासद ('००) | ९०२ | ८८७ | (-) १.७ | ४८९ | ५०७ | ३.७ |
| भाग भांडवल | ७७.७६ | ८३.३५ | ७.२ | ८४.५ | ८७.६५ | ३.७ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ७.४७ | ७.१४ | (-) ४.४ | २०.२१ | २१ | ३.८ |
| मागांची संख्या ('०००) | २७६ | ३०७ | ११.२ | ३०१ | ३११ | ३.३ |
| उत्पादनाचे मूल्य | ६९ | ७० | १.४ | ६६ | ७६ | १५.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३१९ | ३३८ | ६.० | १,०५८ | ९८७ | (-) ६.७ |
| तोटयाची रक्कम | १९ | २१ | १०.५ | ७.६० | ७.७५ | २.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## दूग्ध व्यवसाय

८.४४ राज्यात ३१ मार्च, २०११ अखेर २७,११० सहकारी दुग्ध संस्था व ७८ सहकारी दुग्ध संघ होते. सुमारे ४२.७ टक्के सहकारी दुग्ध संस्था व ३४.६ टक्के दुग्ध संघ तोट्यात होते. सदर तपशील तक्ता ८.२४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२४ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ याचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी दुग्ध संस्था | | शेकडा बदल | सहकारी दुग्ध संघ | | शेकडा बदल |
| | २०१० | २०११* | | २०१० | २०११* | |
| संस्था (संख्या) | ३१,३४५ | २७,११० | (-) १३.५ | १०६ | ७८ | (-) २६.४ |
| सभासद (लाख) | २१.६९ | १६ | (-)२६.२ | ०.५२ | ०.७८ | ५० |
| भाग भांडवल | २७.३४ | १६.७८ | (-) ३८.६ | ९२.८० | ७६.८३ | (-) १७.२ |
| खेळते भांडवल | २६.९६ | १०.८८ | (-) ५९.६ | ७८.८५ | ६२.५३ | (-) २०.७ |
| दूध खरेदी (किंमत) | १२४.३८ | १०८.२७ | (-) १३.० | १५०.८४ | ५३०.३१ | (-) २५१.८ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (किंमत) | ७४.८१ | १६९.७३ | १२६.९ | ७३.२१ | ९४.७७ | २९.४ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १४,३४९ | ११,५८३ | (-) १९.३ | ४२ | २७ | (-) ३५.७ |
| तोटा | १२.२२ | १२.२४ | ०.२ | १४.८३ | ६४.४७ | ३३४.७ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## मत्स्यव्यवसाय

८.४५ राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी ३,१८६ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, ३७ मत्स्यव्यवसाय सहकारी संघ आणि दोन महासंघ कार्यरत होते. या संस्थांनी सन २०१०-११ मध्ये ₹ ३९९.७३ कोटी किंमतीचे मासे व मत्स्योत्पादनाची विक्री केली.राष्ट्रिय सहकार विकास महामंडळामार्फत राज्यातील संस्थाना /मच्छिमार लोकांच्या गटांना बोटींच्या यांत्रिकीकरणासाठी कर्ज देण्यात येते. सन २०११-१२ या वर्षात ₹ ४२ कोटींची तरतूद आहे.माहे फेब्रुवारी,१०१२ अखेर ₹ २.५४ कोटी खर्च झाले. या योजनेअंतर्गत ३०० संस्थाना कर्ज देण्याचे साध्य ठरविण्यात आले होते तर आतापर्यंत १०२ संस्थाना कर्जाद्वारे अर्थसहाय पुरविण्याचे उद्दिष्टे पुर्ण झाले आहे.

## सहकारी पणन संस्था

८.४६ सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. ही शिखर संस्थाअसून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. मार्च, २०११ अखेर सुमारे ४३.४ टक्के सहकारी पणन संस्था तोट्यात होत्या तर मार्च, २०१० अखेर ४६.५ टक्के संस्था तोटयात होत्या. या बाबतचा तपशील तक्ता ८.२५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२५ सहकारी पणन संस्थांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| संस्था (संख्या) | १,७५४ | १,७७९ | १.४ |
| सभासद (लाखात) | १४ | १५ | ७.१ |
| भाग भांडवल | ७१ | ७५ | ५.६ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २६ | २६ | ० |
| खेळते भांडवल | १,४२४ | २,५०१ | ७५.६ |
| विक्री | | | |
| (अ) शेतमाल | ४५५ | ५३५ | १७.६ |
| (ब) खते | ६९७ | ८२५ | १८.४ |
| (क) बियाणे | ४४ | ४६ | ४.५ |
| (ड) ग्राहकपयोगी वस्तू | ३८४ | ४०० | ४.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ८१६ | ७७३ | (-) ५.३ |
| तोटा | १९ | १८ | (-) ५.३ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## बिगर कृषि पतसंस्था

८.४७ राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी ५४१ नागरी सहकारी बँका, १५,५७५ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था व ७,३१७ पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था होत्या. एकूण बिगर कृषि पतपुरवठा संस्थांपैकी २३.८ टक्के संस्था तोट्यात होत्या. या बाबतचा तपशील तक्ता ८.२६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२६ बिगर कृषि पतपुरवठा संस्थांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| संस्था (संख्या) | २३,८३९ | २३,४३४ | (-) १.७ |
| सभासद (लाख) | २३७ | २५३ | ६.८ |
| ठेवी | ५८,६५५ | ६२,३९२ | ६.४ |
| स्वनिधी | १४,४९६ | १५,४५३ | ६.६ |
| भाग भांडवल | ५,६०० | ६,३४९ | १३.४ |
| *त्यापैकी*, राज्य शासनाचे | ७ | ८ | १४.३ |
| खेळते भांडवल | १,०१,४६६ | १,०७,८७९ | ६.३ |
| कर्ज वाटप | ४०,७२७ | ४५,७२८ | १२.३ |
| येणे कर्ज | ४५,२०९ | ४७,४२६ | ४.९ |
| थकित कर्ज | ७,०५१ | ७,१७४ | १.७ |
| कर्ज वसुली | ४२,२७४ | ४३,१३७ | २.० |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,८४९ | ५,५७९ | (-) ४.६ |
| तोटा | ४८६ | ५४९ | १३.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## नागरी सहकारी बँकांची स्थिती

८.४८ देशातील एकूण नागरी सहकारी बॅकांपैकी ३२.९ टक्के बँका राज्यात आहेत. दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी ८६ बँका अवसायनात आहेत. यापैकी, ८३ बँकांतील विमा उतरविलेल्या, एक लाखापेक्षा कमी रक्कमेच्या ठेवींना परतावा देण्यासाठी ठेवी विमा पत हमी महामंडळाने मान्यता दिली असुन, ठेवींच्या वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. एका बँकेने लेखा परीक्षणाचे काम पूर्ण केलेले नाही व दोन बँकांनी मा.न्यायालयाकडून स्थगिती मिळविली आहे.

## इतर सहकारी संस्था

८.४९ राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी २१.६१ लाख सभासद संख्या असलेल्या ८५,३३५ सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. या संस्थांमध्ये एकूण २२,६७० कर्मचारी होते. तसेच ५.७४ लाख सदस्य संख्या असलेल्या ११,११३ कंत्राटी मजूर संस्था होत्या. त्याचप्रमाणे ६०,८६८ सदस्य संख्या असलेल्या ३०० श्रमिक वन संस्था होत्या व त्यापैकी, ११३ संस्था (३७.६ टक्के) नफ्यात होत्या.

८.५० महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. मागील वर्षाच्या तुलनेत मार्च, २०११ अखेर सहकारी संस्थांच्या ठेवी १३.३ टक्क्यांनी व कर्ज वसुली ३८.५ टक्क्यांनी वाढली आहे. याबाबतचा तपशील तक्ता ८.२७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२७ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळ मर्या. संस्थेचा तपशील**

( ₹ कोटी )

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| सभासद (संख्या) | ११,०५५ | १०,९३१ | (-) १.१ |
| ठेवी | १५ | १७ | १३.३ |
| खेळते भांडवल | १४४ | १२६ | (-) १२.५ |
| स्थूल कर्ज | ६४४ | ६४४ | ० |
| येणे कर्ज | १०८ | ९० | (-) १६.७ |
| थकीत कर्ज | ३६ | ३३ | (-) ८.३ |
| कर्ज वसुली | १३ | १८ | ३८.५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळ मर्यादित * अस्थायी

८.५१ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरित करतात. राज्यात ३१ मार्च, २०११ रोजी शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १७४ घाऊक ग्राहक भांडारे व २,८५५ प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. याबाबतचा तपशील तक्ता ८.२८ मध्ये दिला आहे

**तक्ता ८.२८ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्राहक महासंघ | | घाऊक ग्राहक भांडार | | प्राथमिक ग्राहक भांडार | |
| | २०१० | २०११* | २०१० | २०११* | २०१० | २०११* |
| संख्या | १ | १ | १६७ | १७४ | ३,९११ | २,८५५ |
| सभासद ('००) | ६ | ६ | ३,५८७ | ३,७८० | १७,७७४ | १७,९३२ |
| भाग भांडवल | १.६५ | १.६५ | १५.०२ | १५.४२ | ३०.७८ | ३१.८४ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १.१४ | १.१४ | १.३२ | १.९३ | ०.७४ | ०.७१ |
| तोटा | ०.२० | ०.६६ | ४.१८ | २.७६ | ५.५९ | ५.६७ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | ० | ० | ५२ | ४९ | १,०६० | १,०४२ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## खाजगी सावकारांचा तपशिल

८.५२ कृषी व बिगर कृषी पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त खाजगी सावकारांना वैयक्तिक कर्जाचे वाटप करण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. सहकारी संस्थांच्या तुलनेत खाजगी सावकार कर्जदाराला स्वीकारार्ह असलेल्या अनेक प्रकारच्या वस्तू तारण म्हणून स्वीकारतात. खाजगी सावकारांना कर्जे देण्यास प्राधिकृत करण्याचे परवाने सहकार आयुक्तालयामार्फत दिले जातात. खाजगी सावकारांचा तपशील तक्ता ८.२९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.२९ खाजगी सावकारांचा तपशील**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१० | २०११* | |
| परवाना धारक (संख्या) | ७,६३६ | ८,३२३ | ९.० |
| पारित केलेले नवीन परवाने (संख्या) | १,१८४ | १,३३१ | १२.४ |
| नुतनीकरण केलेले परवाने (संख्या) | ६,४५२ | ७,२९२ | १३.० |
| रद्द केलेले परवाने (संख्या) | ३८९ | ३०३ | (-)२२.१ |
| कर्जदार सभासद (व्यापारी / बिगर व्यापारी / शेतकरी ) | ५,५५,०१८ | ६,७७,१६५ | २२.० |
| स्थुल कर्ज (₹ कोटी) | ४७९ | ८५१ | ७७.७ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.५३ जरी सहकार क्षेत्राचा राज्यस्तरावरील ३१ मार्च,२०११ रोजी एकूण तोटा ठेवींच्या २.८ टक्के असला तरी साखर, कापूस पिंजणी व गासडया बांघणाऱ्या संस्था, सूतगिरण्या, हातमाग व यंत्रमाग, पणन संस्था इ.ची त्यांच्या क्षेत्रातील कामगिरी असमाधानकारक आहे. बिगर कृषी पतपुरवठा संस्थांची तुलनात्मक कामगिरी चांगली असल्याने ज्या एकूण संस्थांपैकी ज्या १०.४ टक्के आहेत व ज्यांचा तोटा एकूण ठेवींच्या तुलनेत किरकोळ ०.४ टक्के असल्याने एकूण संचित तोटा कमी झाला आहे.

* * * * *

# परिशिष्ट ८.१
## महाराष्ट्र राज्यातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य

(₹ कोटी)

| अनु. क्रमांक | वित्तिय संस्था | १९९०-९१ | | २०००-०१ | | २००९-१० | | २०१०-११* | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ मर्यादित | ४०७.७७ | २५१.९३ | २७५.६० (१६) | २८८.४९ (१३) | १,७०८.०६ (२६) | १,६११.३८ (२७) | उ.ना. | उ.ना. |
| २ | भारतीय लघु उद्योग विकास बँक | ३०६.७३ | २२७.२४ | २,०८१.८७ (१९) | १,३२०.७९ (२१) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ३ | भारतीय उद्योग गुंतवणूक बँक मर्या. | ३३.५४ | २५.५४ | ५७६.५९ (२७) | ५६०.२७ (३३) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ४ | भारतीय आयात - निर्यात बँक | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ६,५२५.२८ (२९) | ६,०५५.९० (३६) | ८३६२.०० (२२) | ७२३५.०० (२९) |
| ५ | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २५४.५५ | ११०.५८ | ५,१५०.६५ (४७) | ३,९१९.१२ (५५) | २४७१९.२४ (४६) | २२७१९.६९ (५३) | २०,७४६.९४ (५०) | १९,३४५,२७ (५५) |
| ६ | भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ $ | १०८.३४ | ५२.२५ | ६१.४१ (३९) | ८८.६० (५६) | ३४२.१८ (२८) | ३४२.१८ (२८) | ६२७.४० (४६) | ६२७.४० (४६) |
| ७ | महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ | १५७.९७ | ९४.६१ | ६८.६३ | ४७.१२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ८ | सिकॉम मर्यादित | ८५.४० | ६८.८७ | ५९३.०० | ४६३.०० | ४,१५५.०० | ३,९७०.०० | ४९४७.०० | ५३४०.०० |
| ९ | इतर # | ३,३९१.३८ | १,९६१.०३ | ६१,२२०.०९ | ३५,८८६.७५ | --- | --- | --- | --- |
| | **एकूण** | **४,७४५.६८** | **२,८१२.०५** | **७०,०२७.८४** | **४२,५७४.१४** | **३७,४४९.७६** | **३४,६९९.१५** | **३४,६८३.३४** | **३२,५४७.६७** |

*आधार* - ह्या तक्त्यात उल्लेखिलेल्या वित्तीय संस्था

* अस्थायी उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) कंसातील आकडे सदर संस्थेची भारतातील टक्केवारी दर्शवितात.

(२) # आयसीआयसीआय, भारतीय औद्योगिक विकास बँक व युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या वित्तीय संस्थांनी केलेल्या अर्थसहाय्याचा यात समावेश आहे. या संस्थांनी उद्योगांना अर्थसहाय्य देणे बंद केले आहे.

(३) $ यामध्ये वित्तीय संस्थांची रोखे हमी व शासकीय रोखे हमीचा अंतर्भाव आहे.

# परिशिष्ट ८.२
# महाराष्ट्र राज्यातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन : हजार टनात)
(मूल्य : ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन / मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००९-१० | २०१०-११ * |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | ... | ०.६ | ०.०६ | ... |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | ... | ८ | ४ | ... |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३८,६१३ | ३६,९३२ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ४,८०,८१३ | ५,०८,२४९ |
| ३ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | २३८ | १,०१८ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | १,६४९ | ७,१५४ |
| ४ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १४,८२७ | १,८४,८८२ |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | ९,५९५ | २,७७,३२२ |
| ५ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ८७१ | ५८९ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ४४,२७० | ५४,१०९ |
| ६ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२ | ... | ... |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | ... | ... |
| ७ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | १,८१४ | २,४९२ |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ५,३६९ | ४,५८५ |
| ८ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | ... | ... |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ८६ | ७९ |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | १५० | ७१ |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | २०८ | ३२७ |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ४५७ | ९८२ |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | ... | ... | ... | ३ | ३ | ४ | २८४ |
| | | मूल्य | ... | ... | ... | ... | २४ | १५३ | १२,४५७ |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | ... | ... | ... | ८५ | ८३ | १४२ | ४९ |
| | | मूल्य | ... | ... | ... | ७६ | १०७ | ११४ | ५८ |
| १३ | कायनाईट | उत्पादन | ... | ५ | २२ | १५ | ०.२ | १ | ३ |
| | | मूल्य | ... | ११ | ५३ | ८५ | १ | ११ | २४ |
| १४ | इतर $$ | उत्पादन | ... | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | २,७३४ | ४,०३४ |
| | | मूल्य | ... | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,७०८ | ५,२५८ |
| | **एकूण मूल्य (१ ते १४) †** | | **४५०** | **१,०३६** | **८,३१०** | **५२,१२६** | **२,२४,०३६** | **५,४८,२९३** | **८,७०,२६९** |

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

* अस्थायी

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ कोरंडम, क्ले, पायरोफायलाईट, स्फटिक, वाळू(इतर), सिलीमानाईट आणि शेल हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

† मिठाचे मूल्य एकूण मूल्यात अंतर्भूत केलेले नाही.

## परिशिष्ट ८.३
## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २००४-०५ = १००)

| अ.क्र. (१) | बाब (२) | **भार (३)** | २००५-०६ (४) | २००६-०७ (५) | २००७-०८ (६) | २००८-०९ (७) | २००९-१० (८) | २०१०-११+ (९) | २०११-१२+ (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१०८.६** | **१२२.६** | **१४१.७** | **१४५.२** | **१५२.९** | **१६५.५** | **१६९.०** |
| **II** | **खाणकाम व दगड खाणकाम** | **१४.१६** | **१०२.३** | **१०७.५** | **११२.५** | **११५.४** | **१२४.५** | **१३१.०** | **१२५.५** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७५.५३** | **११०.३** | **१२६.८** | **१५०.१** | **१५३.८** | **१६१.३** | **१७५.७** | **१७९.९** |
| | **उद्योग गट** | | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने व पेय | **७.२८** | ११३.२ | १३१.२ | १४७.५ | १३५.४ | १३३.५ | १४२.९ | १६९.६ |
| २ | तंबाखू उत्पादने | **१.५७** | १०१.० | १०२.९ | ९८.४ | १०२.७ | १०२.० | १०४.१ | ११०.६ |
| ३ | कापड उत्पादने | **६.१६** | १०८.३ | ११६.८ | १२४.६ | १२०.१ | १२७.४ | १३५.९ | १३३.० |
| ४ | परिधान करावयाची वस्त्रे व रंगाई करणे | **२.७८** | ११४.१ | १३७.२ | १४९.९ | १३४.६ | १३७.१ | १४२.२ | १३२.९ |
| ५ | प्रवास सामान पिशव्या, पादत्राणे, चामडे कमावणे, साफ करणे आणि चामडयाचे उत्पादन | **०.५८** | ९०.९ | १०४.० | ११०.० | १०४.४ | १०५.८ | ११४.३ | ११७.५ |
| ६ | लाकुड व लाकडाची उत्पादने (लाकडी बूच सोडून) | **१.०५** | १०६.८ | १२६.० | १४८.० | १५५३ | १६०.१ | १५६.५ | १५७.० |
| ७ | कागद आणि कागदाची उत्पादने | **१.००** | १०६.३ | १११.० | ११२.६ | ११८.० | १२१.१ | १३१.४ | १३७.० |
| ८ | प्रकाशने, छपाई आणि प्रसार माध्यमे यांची प्रतिलिपी नोंद ठेवणे | **१.९८** | ११३.७ | १२२.८ | १४०.२ | १४२.४ | १३३.८ | १४८.८ | १८३.८ |
| ९ | कोक, रिंफाईन्ड पेट्रोलियम उत्पादने आणि न्युक्लीक इंधन | **६.७२** | १००.६ | ११२.६ | ११९.६ | १२३.४ | १२१.८ | १२१.५ | १२४.७ |
| १० | रसायने व रासायनिक उत्पादने | **१०.०६** | १०१.० | ११०.४ | ११८.४ | ११५.० | १२०.७ | १२३.१ | १२२.५ |
| ११ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | **२.०३** | ११२.३ | ११९.६ | १३५.७ | १४२.६ | १६७.४ | १८५.२ | १८३.० |
| १२ | अधातू खनिज उत्पादने | **४.३१** | १०७.८ | ११९.५ | १३०.६ | १३४.९ | १४५.४ | १५१.४ | १५६.२ |
| १३ | मूलभूंत धातू | **११.३४** | ११५.५ | १३२.६ | १५६.३ | १५९.० | १६२.४ | १७६.७ | १९१.१ |
| १४ | फेब्रीकेटेड धातू उत्पादने (यंत्र व सामग्री सोडून) | **३.०९** | १११.१ | १३३.३ | १४३.८ | १४४.० | १५८.४ | १८२.८ | १९२.५ |
| १५ | यंत्रे व यंत्रसामग्री | **३.७६** | १२६.१ | १५०.९ | १८५.० | १७१.० | १९८.० | २५६.३ | २३१.५ |
| १६ | कार्यालयीन लेखा आणि संगणक सामुग्री | **०.३१** | १४५.३ | १५५.५ | १६४.८ | १४८.८ | १५४.४ | १४६.३ | १४४.८ |
| १७ | विद्युत सामुग्री आणि उपकरणे | **१.९८** | ११६.८ | १३१.६ | ३७३.० | ५३०.८ | ४५९.२ | ४७२.१ | ३८०.४ |
| १८ | रेडीओ, टि.व्ही. आणि दळण-वळणाची साधने आणि उपकरणे | **०.९९** | १२२.७ | ३१२.८ | ६०४.२ | ७२६.७ | ८०९.१ | ९११.५ | ९६६.८ |
| १९ | औषधे, चष्म्याची उपकरणे, भितीवरील घडयाळे व मनगटी घडयाळे | **०.५७** | ९५.४ | १०४.८ | १११.४ | ११९.८ | १००.९ | १०७.८ | ११६.६ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स, सेमी ट्रेलर्स | **४.०६** | ११०.१ | १३८.० | १५१.२ | १३८.० | १७९.१ | २३३.३ | २५१.२ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | **१.८३** | ११५.३ | १३२.९ | १२९.० | १३४.० | १७१.१ | २१०.७ | २३२.७ |
| २२ | फर्निचर, वस्तूनिर्माण व्यतिरिक्त | **३.००** | ११६.२ | १११.७ | १३२.७ | १४२.५ | १५२.७ | १४१.२ | १३९.० |
| **IV** | **विद्युत** | **१०.३२** | **१०५.२** | **११२.८** | **१२०.०** | **१२३.३** | **१३०.८** | **१३८.०** | **१४८.८** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी संघटना, भारत सरकार.

\+ एप्रिल, २०११ ते जानेवारी, २०१२

## परिशिष्ट ८.४
## महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी

(₹ कोटी)

| उद्योग गट (दोन अंकी) एनआयसी २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) सरकी काढणे, वटणी, सफाई | २००८-०९ | ५९७ | ४८६ | ३५७ | ३९ | १,५९३ | ९४४ | १,४१४ | १३२ |
| इत्यादी (०१) | २००९-१० | ५८२ | ६१३ | ४३८ | ३६ | ४,६५० | ३,३८५ | ४,३७१ | २१९ |
| (२) मिठाचे उत्पादन (०८) | २००८-०९ | १७ | १ | १४ | १ | ११ | १ | ६ | ५ |
| | २००९-१० | २५ | २१ | ३ | १ | ३ | - | २ | १ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०,११) | २००८-०९ | २,२८७ | १३,२९० | २,८२३ | ९२२ | ५८,०८८ | ४१,०८१ | ५१,९५० | ५,०३० |
| | २००९-१० | २,२५२ | १४,२८७ | २,३६४ | १,०७९ | ७०,८७४ | ४९,८७३ | ६२,८५५ | ६,८५४ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २००८-०९ | ९५ | ३०८ | ६७० | ८६ | १,६७१ | ७९० | १,२८२ | ३६१ |
| | २००९-१० | ११२ | ५९६ | ३४९ | ९८ | १,६३५ | ६४० | १,१८२ | ४३२ |
| (५) वस्त्रोद्योग (१३) | २००८-०९ | १,४४३ | १२,५४८ | २,३६३ | ७६१ | २३,६५९ | १४,८०२ | २०,०४३ | २,४६८ |
| | २००९-१० | १,३८९ | १२,७६६ | ६,६५८ | ८०० | २६,१९० | १३,५९२ | २१,३९० | ३,५८८ |
| (६) परिधान करण्याची वस्त्रे (१४) | २००८-०९ | ७११ | ७७३ | ५५० | १६४ | ४,८३० | १,८१८ | ३,४७४ | १,२७० |
| | २००९-१० | ५५७ | १,७४६ | १,२७६ | १९३ | ७,१७० | ३,५३१ | ५,३९६ | १,६१४ |
| (७) कातडी कमावणे व चामड्याची | २००८-०९ | १०२ | १२२ | १२७ | २५ | ८८७ | ४६१ | ७०३ | १६८ |
| उत्पादने (१५) | २००९-१० | ८९ | ८५ | ६३ | २८ | ५५५ | ३१८ | ४१२ | १३२ |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने (१६) | २००८-०९ | १७२ | ३१३ | ८३ | १७ | ५२८ | २५६ | ४२४ | ८२ |
| | २००९-१० | १९७ | २२५ | १५४ | २४ | १,१४० | ६१२ | ९७६ | १४१ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २००८-०९ | ६६५ | ३,१६३ | ५७२ | १३४ | ४,४८६ | २,६३३ | ३,५०४ | ७८७ |
| | २००९-१० | ७०२ | ४,५८९ | ७३७ | १५१ | ५,३६१ | ३,००८ | ४,०६९ | १,०५४ |
| (१०) प्रकाशन आणि मुद्रण (१८) | २००८-०९ | ६९५ | ३,०२८ | (-)१,४२७ | १६० | ५,८७१ | २,९८७ | ४,१८२ | १,३८५ |
| | २००९-१० | ६३१ | २,९८९ | (-)१३४१ | १९२ | ६,१३६ | ३,०६२ | ४,४०९ | १,४०७ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियम यांची | २००८-०९ | ९२ | ८,८६१ | ८३१ | २१२ | १,०१,२९० | ५९,३२४ | ६०,६२७ | ४०,०३१ |
| उत्पादने इत्यादी (१९) | २००९-१० | १४५ | ९,९११ | २,९९८ | २६८ | ९२,२०५ | ५८,८५४ | ६१,१७५ | ३०,४५७ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने | २००८-०९ | २,०३६ | ३१,५९४ | ११,२०७ | १,२१८ | ७८,८२६ | ३६,८८४ | ६१,५८८ | १४,५६२ |
| इत्यादी (२०,२१) | २००९-१० | १,८२३ | ३१,०५७ | १३,८१० | १,३०० | ७२,४५२ | ३७,८६२ | ५३,८११ | १५,५५० |
| (१३) रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने (२२) | २००८-०९ | १,२१७ | ७,२६१ | २,१०४ | ३८५ | १७,५३१ | ११,२२२ | १३,९८९ | २,९३९ |
| | २००९-१० | १,१४३ | ११,२९३ | ५,३३२ | ४८८ | २५,५७२ | १६,१३१ | १९,६६१ | ५,०३८ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २००८-०९ | ८२५ | ५,३०४ | १,१९८ | २१८ | १०,७०८ | ४,७५१ | ७,०६२ | ३,२६३ |
| | २००९-१० | ६८९ | ४,६६८ | १२०६ | १७८ | ८,३१३ | ३,२४६ | ४,९०७ | ३,०६२ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २००८-०९ | १,०९० | २६,२४१ | ४,४७१ | ७७७ | ७०,९३९ | ४९,५६२ | ६३,२३२ | ५,६४३ |
| | २००९-१० | १,०६२ | २९,७०८ | ६,४०५ | ८५३ | ७४,२७४ | ५२,९९८ | ६४,४१२ | ७,६६६ |
| (१६) धातूच्या तयार वस्तू (२५) | २००८-०९ | २,१०६ | ८,२३० | ३,५३९ | ६२८ | २५,७२५ | १५,०७२ | २०,१९८ | ४,८६७ |
| | २००९-१० | २,२११ | ७,२६३ | २,२३३ | ७९२ | २३,०७३ | १४,२२३ | १८,५७४ | ३,७४२ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.४ (समाप्त)
## महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी

| उद्योग गट (दोन अंकी) (एनआयसी २००८ ) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१७) कार्यालयीन लेखांकन व संगणना यंत्रसामग्री , रेडिओ, दूरदर्शन, दळणवळण सामग्री आणि उपकरणे, वैद्यकीय, अचूक मोजमापानाची व ऑप्टीकल साधने इत्यादी (२६) | २००८-०९ | ४४४ | ४,१७१ | २,२६९ | २१७ | १३,८१६ | ७,६८७ | १०,२६४ | ३,०९० |
| | २००९-१० | ३३७ | ५,३७२ | ४,६२५ | २७९ | १७,०५७ | ९,६०७ | १२,३११ | ४,१२० |
| (१८) विद्युत यंत्रसामग्री व उपकरणे (२७) | २००८-०९ | १,०३८ | ४,२१५ | २,४५१ | ४०३ | २२,९३८ | १३,६०१ | १७,२३० | ५,२५८ |
| | २००९-१० | ९६६ | ५,४२९ | २,९९० | ४७८ | २८,१६७ | १७,१३३ | २१,४२४ | ६,१४२ |
| (१९) यंत्रे व यंत्रसामग्री दुरुस्ती व उभारणी (२८,३३) | २००८-०९ | १,८५८ | ९,८३३ | ५,३८२ | १,१२६ | ५१,४४१ | २६,३३१ | ४१,८२४ | ८,६१० |
| | २००९-१० | १,८०६ | १२,३७२ | ९,२०५ | १,०६६ | ४४,२३० | २१,८९७ | ३२,३५५ | १०,६३९ |
| (२०) मोटार वाहने, ट्रेलर्स (२९) | २००८-०९ | ८५७ | १६,६५१ | ५३० | १,१३१ | ४०,२२६ | २७,६०० | ३२,५६४ | ६,१०६ |
| | २००९-१० | ९२६ | २१,३८८ | (-)६,११३ | १,६४३ | ५१,२४३ | ३७,६५५ | ४३,८२० | ५२,४८ |
| (२१) इतर परिवहन सामग्री (३०) | २००८-०९ | २७४ | ३,७८४ | ३२६ | ३४४ | १५,६९२ | १०,७७५ | १२,५७४ | २,७६९ |
| | २००९-१० | २४७ | ३,२८० | २,१४८ | ३३६ | १८,३३९ | १२,१०५ | १३,३०० | ४,७८० |
| (२२) फर्निचर (इतरत्र वर्गीकरण न केलेले) (३१,३२) | २००८-०९ | १,०९८ | ३,१८७ | ७,४०८ | ५१८ | ३०,७८३ | १७,७१८ | २८,३८९ | २,०९२ |
| | २००९-१० | ८७९ | २,५८९ | ६,०७८ | ४७९ | २५,२७५ | १६,८३० | २१,७५१ | ३,२६६ |
| (२३) इतर | २००८-०९ | ७३२ | १५,६५२ | १,४२९ | २४० | १८,६३३ | ३,१९४ | १६,०४५ | १,९६० |
| | २००९-१० | ६८९ | १५,०२१ | १,८१८ | २२६ | २०,०८३ | १,८८९ | १६,५२१ | २,६५५ |
| **एकूण** | **२००८-०९** | **२०,४५०** | **१,७९,०१८** | **४९,२७६** | **९,७२७** | **६,००,१७४** | **३,४९,४९३** | **४,७२,५६८** | **१,१२,८७८** |
| | **२००९-१०** | **१९,४५७** | **१,९७,२७६** | **६३,४३७** | **१०,९८९** | **६,२३,९९७** | **३,७८,४५४** | **४,८९,०८१** | **१,१७,८०६** |

*आधार* - वार्षिक उद्योग पाहणी, केंद्रीय सांख्यिकी संघटना, भारत सरकार.

## परिशिष्ट ८.५
## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्त्वाची वैशिष्ट्ये

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००९-१० | २०१०-११ * |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ३९ | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था $ | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,३९२ | २१,४५१ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १,६३० | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,८३९ | २३,४३४ |
| (४) पणन संस्था | ३४४ | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७५४ | १,७७९ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ४,३०६ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४७,९५३ | ४८,८४८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ३,८४६ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२३,३४८ | १,२८,७६० |
| **एकूण** | **३१,५६५** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,१८,३२०** | **२,२४,३०६** |
| **२. सभासदांची संख्या (०००')** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था $$ | ७६ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४१ | २४७ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २,१७० | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १४,९२३ | १५,०१७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १,०८७ | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २३,९१२ | २५,३३१ |
| (४) पणन संस्था | १४१ | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,८५१ | १,५५५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३२३ | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ६,६४८ | ७,५६२ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ३९४ | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,३९५ | ६,३२३ |
| **एकूण** | **४,१९१** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,९७०** | **५६,०३५** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ११९ | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ५८,०५८ | ८९,७१९ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५८ | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १५,१४७ | १६,२५५ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ४६ | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,३१,३०७ | १,०७,८७९ |
| (४) पणन संस्था | ६ | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | ६,३८३ | २,५०१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ४१ | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | १८,८९९ | २८,८३८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | २१ | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ९,११५ | ३,१४९ |
| **एकूण** | **२९१** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,३८,९०९** | **२,४८,३४१** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | १७५ | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | २८,२५९ | ४०,४३६ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ४३ | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ४,३८४ | ६,१५८ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ४७ | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ५२,२१९ | ४५,७२८ |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ३ | ८ | १८ | १५ | १२ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १ | ३ | १२ | १७ | १०३ | ३१२ | २,९६६ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १ | ४ | १२ | ६० | २३५ | १७२ | १८४ |
| **एकूण** | **२७०** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **८५,३६१** | **९५,४८४** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.५ (समाप्त)
## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्त्वाची वैशिष्ट्ये

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००९-१० | २०१०-११* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ८७ | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ३४,३९१ | ४२,३८५ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ४८ | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | ९,१०८ | ११,४२५ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३२ | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ३७,०२४ | ४७,४२६ |
| (४) पणन संस्था | १ | २ | ४ | ९ | १८२ | ११७ | ५,७३३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १ | ६ | ३० | ६९ | २३६ | २९७ | ९,३९७ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | २ | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ७५२ | ८४० |
| **एकूण** | **१७१** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **८१,६८९** | **१,१७,२०६** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १० | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ३८६ | ४८२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २ | ३ | १० | .. | ३८ | ११२ | ६२ |
| (४) पणन संस्था | ४८ | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,७९४ | १,६५८ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३६ | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | १०,९२९ | ४५,५०१ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ११ | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ३,५२६ | ५,६४० |
| **एकूण** | **१०७** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **१६,७४७** | **५३,३४३** |

*आधार* - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

टीप -१९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

* अस्थायी

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

ला.ना. लागू नाही

# १

# पायाभूत सुविधा



# ९. पायाभूत सुविधा

९.१ पायाभूत सुविधांमधील पध्दतशीर व नियोजनबध्द गुंतवणूक ही केवळ अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालनाच देत नाही तर त्याचबरोबर अर्थव्यवस्थेच्या सातत्यपूर्ण विकासाची खात्री देत असते. सामाजिक-आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ऊर्जा, वाहतूक व दळणवळण या भौतिक पायाभूत सुविधा आर्थिक विकासास चालना देतात व राहणीमानाच्या दर्जावर थेट परिणाम करीत असतात. पायाभूत सुविधांच्या विकासाचे अंतिम साध्य हे उच्च दर्जाच्या पायाभूत सेवा स्पर्धात्मक व किफायतशीर दरात उपलब्ध करणे हे असून जागतिक मानकांच्या तुलनेत सेवेचा दर्जा, परिमाण व या सेवांच्या अंतिम उपभोक्त्यांना आकारण्यात येणारे दर या तीन स्तरांवर त्याच्या यशाचे मोजमाप होणे आवश्यक आहे. मागील काही वर्षात पायाभूत सुविधा क्षेत्रात खाजगी गुंतवणूकीत लक्षणीय वाढ झालेली आहे. राज्यातील काही भौतिक पायाभूत सुविधांबाबतची माहिती खाली देण्यात आली आहे.

## ऊर्जा

९.२ आपल्या जीवनाच्या सर्व स्तरांवर वीज ही अत्यावश्यक गरज बनलेली आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी, औद्योगिक क्षेत्राला जागतिक स्पर्धात्मकता व रोजगारनिर्मितीसाठी आणि आर्थिक विकासात मोठा वाटा असलेल्या सेवाक्षेत्राच्या सातत्यपूर्ण विकासासाठी वाजवी दरात अखंडीत विजेची उपलब्धता अनिवार्य आहे. राज्य शासनाच्या ऊर्जा क्षेत्रावरील खर्चाची राज्याच्या स्थूल उत्पन्नाशी (चालू किंमतीवर आधारीत) टक्केवारी २००८-०९ च्या ५.३ टक्क्यांच्या तुलनेत २००९-१० मध्ये ५.१ टक्के होती.

## स्थापित क्षमता

९.३ स्थापित क्षमतेत २०१०-११ मध्ये १०.३ टक्के वाढ झालेली आहे, तर केंद्रिय क्षेत्रातील राज्यासाठीचा वाटा २.१ टक्क्याने वाढलेला आहे. ३१ मार्च, २०११ रोजीच्या राज्याच्या स्थापित क्षमतेत सार्वजनिक क्षेत्र (महानिर्मिती) ५४ टक्के, खाजगी क्षेत्र ३६ टक्के व सार्वजनिक-खाजगी प्रकल्प (आरजीपीपीएल) १० टक्के असा वाटा आहे. स्थापित क्षमतेचा तपशील तक्ता ९.१ मध्ये दिलेला आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील स्थापित क्षमता (३१ मार्च, २०११ रोजी)**




**तक्ता ९.१ स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | ३१ मार्च रोजी | | ३१ डिसेंबर, २०११ रोजी | २०१०-११ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | | |
| **राज्यामधील** | **१७,३७१** | **१९,१५३** | **१९,८१६** | **१०.३** |
| औष्णिक | ८,८२५ | ९,६६५ | १०,१२० | ९.५ |
| अक्षय ऊर्जा $ | २,८०७ | ३,४०८ | ३,६०४ | २१.४ |
| जलजन्य | २,९१६ | ३,३६६ | ३,३७८ | १५.४ |
| नैसर्गिक वायुजन्य | १,७७२ | २,७१४ | २,७१४ | ७३.४ |
| बंदिस्त वीज # | १,०५१ | उ.ना. | उ.ना. | -- |
| **केंद्रिय क्षेत्रातील राज्यासाठीचा वाटा** | **५,२६८** | **५,३७६** | **५,७९२** | **२.१** |

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, $ महाऊर्जा, # महावितरण ( आर.जी.पी.पी.एल नैसर्गिक वायुजन्य मधील राज्याचा वाटा आणि बंदिस्त वीज), केंद्रिय विद्युत प्राधिकरण/ डब्ल्यु.आर.पी.सी. (केंद्रिय क्षेत्रातील राज्यासाठीचा वाटा व जेएसडब्ल्यु एनर्जी, डब्ल्यु.पी.सी.एल., डी.एल.एच.पी.),
उ.ना. उपलब्ध नाही. -- लागू नाही.

## विद्युत निर्मिती

९.४ राज्यातील २०१०-११ मधील एकूण वीज निर्मिती (बंदिस्त व अक्षय ऊर्जेसह) ८३,०१७ दशलक्ष युनिटस् इतकी होती जी मागील वर्षापेक्षा २.१ टक्के अधिक होती.

**आलेख ९.२ : राज्यातील विद्युत निर्मिती २०१०-११**




**तक्ता ९.२ विद्युत निर्मिती**

(दशलक्ष युनिटस्)

| स्रोताचा प्रकार | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| **राज्यामधील** | **८१,३४५** | **८३,०१७** | **६७,१७७** | **२.१** |
| औष्णिक | ५४,९७८ | ५२,७९६ | ४३,००१ | (-) ४.० |
| नैसर्गिक वायुजन्य | १५,३२२ | १८,७२९ | १३,९५७ | २२.२ |
| जलजन्य | ५,६५४ | ६,३७४ | ५,७०४ | १२.७ |
| अक्षय ऊर्जा $ | ५,०२६ | ५,११८@ | ४,५१५@ | १.८ |
| बंदिस्त वीज # | ३६५ | उ.ना. | उ.ना. | -- |
| **केंद्रिय क्षेत्रातून राज्यास उपलब्ध #** | **३०,१५६** | **२९,९८२** | **२३,९८०** | **(-) ०.६** |

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, $ महाऊर्जा, # महावितरण ( आर.जी.पी.पी.एल - नैसर्गिक वायुजन्य मधील राज्याचा वाटा आणि बंदिस्त वीज), केंद्रिय विद्युत प्राधिकरण/ डब्ल्यू.आर.पी.सी. (खाजगी कंपन्यांच्या डिसेंबर पर्यंतच्या वीज निर्मितीच्या आकडेवारीसाठी), @ बंदिस्त वीजेसह, उ.ना. उपलब्ध नाही , -- लागू नाही , + डिसेंबर पर्यंत.
टिप : १ किलो वॅट तास = १ युनिट

९.५ एकूण विद्युत निर्मिती मध्ये महानिर्मितीचा वाटा ५७.८ टक्के, त्याखालोखाल आरजीपीपीएल १४.० टक्के, टाटा पॉवर १३.३ टक्के, अक्षय ऊर्जा ६.० टक्के व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ५.३ टक्के असा होता. २०१०-११ मध्ये केंद्रिय वाटपातून २९,९८२ दशलक्ष युनिटस् इतकी वीज राज्याला उपलब्ध झाली.

९.६ २०११-१२ मध्ये डिसेंबर अखेर राज्यात ६७,१७७ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली व ती मागील तत्सम कालावधीतील वीज निर्मितीपेक्षा २२ टक्के अधिक होती. २०११-१२ मध्ये डिसेंबर अखेर केंद्रिय क्षेत्रातील वीज निर्मितीमधून २३,९८० दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध झाली. राज्यातील विद्युत निर्मितीचा तपशील तक्ता ९.२ मध्ये दिला आहे.

## वीज खरेदी

९.७ महावितरण कंपनीने २०१०-११ मध्ये एकूण ₹ २८,९४९ कोटी किंमतीची ९०,३४१ दशलक्ष युनिटस् इतकी वीज खरेदी केली तर २००९-१० मध्ये ₹ २३,८४२ कोटी किंमतीची ८५,४७४ दशलक्ष युनिटस् इतकी वीज खरेदी केली होती. २०११-१२ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २४,७०० कोटी किंमतीची ७२,९६८ दशलक्ष युनिटस् इतकी वीज खरेदी केली. बेस्टने २०१०-११ मध्ये ४,६३५ दशलक्ष युनिटस् व २०११-१२ मध्ये डिसेंबर पर्यंत ३,६४५ दशलक्ष युनिटस् वीज खरेदी केली.

## विजेचा वापर

९.८ राज्यातील २०१०-११ मधील विजेचा एकूण वापर ८७,३९७ दशलक्ष युनिटस् इतका असून तो मागील वर्षापेक्षा १०.४ टक्के अधिक होता तर २०११-१२ मध्ये डिसेंबर पर्यंत ७१,८६७ दशलक्ष युनिटस् वापर २०१०-११ मधील समान कालावधीतील वापरापेक्षा २२.७ टक्क्यानी अधिक होता. राज्यातील विजेच्या वापराचा तपशील तक्ता ९.३ मध्ये दिलेला आहे. राज्यातील विजेचा

**तक्ता ९.३ विजेचा वापर**

(दशलक्ष युनिटस्)

| प्रकार | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ | २०१०-११ मध्ये २००९-१० च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| औद्योगिक | ३०,८६६ | ३४,४१६ | २६,६८७ | ११.५ |
| घरगुती | १८,१७१ | १९,५४७ | १६,४८४ | ७.६ |
| कृषि | १३,९२५ | १६,२५७ | १५,५१५ | १६.७ |
| वाणिज्यिक | १०,५४६ | ११,५७१ | ९,०४७ | ९.७ |
| सार्वजनिक सेवा @ | २,६५८ | २,३१० | २,२६० | (-)१३.१ |
| रेल्वे | २,११९ | २,७०७ | १,६५७ | २७.७ |
| संकीर्ण | ८५४ | ५८९ | २१७ | (-)३१.० |
| **एकूण** | **७९,१३९** | **८७,३९७** | **७१,८६७** | **१०.४** |

*आधार :* महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट
@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा + डिसेंबर पर्यंत.

**आलेख ९.३ : विजेचा वापर**




सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३९.४ टक्के), तर त्या खालोखाल घरगुती (२२.४ टक्के) आणि कृषि क्षेत्रात (१८.६ टक्के) आहे. या तीन क्षेत्रांचा एकत्रित वाटा राज्यातील एकूण वीज वापराच्या ८० टक्के होता. २००५-०६ व २०१०-११ मधील क्षेत्र निहाय तुलनात्मक वीज वापर आलेख ९.३ मध्ये दर्शविलेला आहे.

९.९ २०१०-११ मध्ये विजेचा एकूण, औद्योगिक आणि घरगुती दरडोई वापर अनुक्रमे ७८०.० युनिटस्, ३०७.२ युनिटस् आणि १७४.५ युनिटस् इतका होता तर २००९-१० मध्ये तो अनुक्रमे ७१६.३ युनिटस्, २७९.४ युनिटस् आणि १६४.५ युनिटस् असा होता. अखिल भारतासाठी २००९-१० मधील तत्सम वापर अनुक्रमे ४८६.७ युनिटस्, १७८.८ युनिटस् आणि १२१.२ युनिटस् होता. स्थापित क्षमता, विद्युत निर्मिती, क्षेत्रनिहाय विजेचा वापर आणि दरडोई विजेचा वापर यासंबंधीची समय मालिका परिशिष्ट ९.१ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

## विजेची मागणी व पुरवठा

९.१० २०१०-११ मध्ये दिनांक ९ मार्च रोजी असलेली विजेची १७,१५० मेगावॅट इतकी कमाल मागणी, ३,८८२ मेगावॅट इतक्या तुटीचे महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने निर्धारीत केलेल्या भारनियमनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भारनियमन करुन भागविण्यात आली. तसेच २०११-१२ मध्ये जानेवारी पर्यंत १८,१४५ मेगावॅट इतकी ६ डिसेंबर रोजीची कमाल मागणी ४,४६८ मेगावॅट विजेच्या भारनियमनासह भागविण्यात आली.

**तक्ता ९.४ कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**

(मेगावॅट)

| वर्ष | कमाल मागणी | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २००५-०६ | १४,०६१ | ९,८५६ | ४,२०५ |
| २००६-०७ | १४,८२५ | १०,२९८ | ४,५२७ |
| २००७-०८ | १५,६८९ | १०,४१२ | ५,२७७ |
| २००८-०९ | १५,६५६ | १०,७१५ | ४,९४१ |
| २००९-१० | १६,५८२ | १२,४१४ | ४,१६८ |
| २०१०-११ | १७,१५० | १३,२६८ | ३,८८२ |
| २०११-१२+ | १८,१४५ | १३,६७७ | ४,४६८ |

*आधार* : महावितरण + जानेवारी पर्यंत.

**आलेख ९.४ : कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**



## महाराष्ट्र वीज नियामक आयोग

९.११ राज्य शासनाने ५ ऑगस्ट, १९९९ रोजी केंद्रिय वीज नियामक आयोग कायदा, १९९८ (विद्युत कायदा, २००३ मधील तरतुदींनुसार पुढे चालू) मधील तरतुदींनुसार विजेचे दर नियमन, आर्थिक व्यवस्थापन आणि ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा यासाठी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (एम.इ.आर.सी.) स्थापन केला. या कायद्यान्वये आयोगाला विजेच्या दराचे सुसूत्रीकरणासाठी उपाययोजना राबविण्याचे जनादेश दिलेले आहेत. २०१०-११ साठीचे वीज दर तक्ता ९.५ मध्ये दिलेले आहेत. २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी दर निश्चिती प्रक्रियेच्या अभावी तेच दर पुढे चालू ठेवण्यात आलेले आहेत. महावितरण कंपनीस कृषि सिंचनासाठी उच्च दाब व लघु दाब करीता अनुक्रमे ₹ २.६९ व २.१९ प्रति युनिट आणि सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी उच्च दाब व लघु दाब करीता अनुक्रमे ₹ ४.५५ व २.४५ प्रति युनिट इतके दर निश्चित केले आहेत.

**तक्ता ९.५ २०१०-११ मधील वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहकाचा प्रकार | महावितरण | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | टाटा पॉवर | बेस्ट |
|---|---|---|---|---|
| घरगुती | ४.१७ | ५.२४ | ३.९५ | ३.६८ |
| वाणिज्यिक (लघु दाब) | ७.४५ | ९.५२ | ५.३७ | ६.६४ |
| उद्योग (लघु दाब) | ५.८५ | ७.८६ | ४.८७ | ६.३६ |
| उद्योग (उच्च दाब) | ६.१६ | ७.८८ | ५.२० | ५.७२ |
| सार्वजनिक दिवाबत्ती | ३.९८ | ८.८० | -- | ५.९१ |
| रेल्वे | ६.६४ | -- | ४.९९ | -- |

*आधार* : महाराष्ट्र वीज नियामक आयोग -- लागू नाही

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.१२ मागणी व पुरवठ्यातील तूट कमी करण्यासाठी प्रामुख्याने पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा आणि पारेषण व वितरण हानीत (तांत्रिक व अतांत्रिक) कपात ही पाऊले प्रामुख्याने उचलण्यात येत आहेत. महापारेषण कंपनीने अति उच्च दाबाच्या (इएचव्ही) उपकेंद्रांच्या आधुनिकीकरणाद्वारे पारेषण हानी कमी करण्याच्या उपाययोजना सुरु केलेल्या आहेत. महावितरण कंपनीने विविध योजनांतर्गत सदोष मापके बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर्स पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे आणि तारा टाकणे अशा उपाययोजना हाती घेतलेल्या आहेत. महापारेषण व महावितरण कंपनीच्या पारेषण व वितरण जाळ्याचा तपशील आणि एकूण तांत्रिक व व्यावसायिक (ए.टी.ॲन्ड सी.) हानीचा मागील पाच वर्षाचा तपशील तक्ता ९.६ मध्ये दिलेला आहे.

**आलेख ९.५ : पारेषण व वितरण हानी**




**तक्ता ९.६ पारेषण व वितरण जाळे आणि एकूण तांत्रिक व व्यावसायिक (ए.टी.ॲन्ड सी.) हानी**

| वर्ष | पारेषण जाळे (संचयी ) | | | वितरण जाळे (संचयी ) | | | एकूण तांत्रिक व व्यावसायिक (ए.टी. ॲन्ड सी.) हानी (%) @ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उपकेंद्रांची संख्या | पारेषण क्षमता (एमव्हीए) | तारा (सर्कीट कि.मी.) | उपकेंद्रांची संख्या | वितरण ट्रान्सफॉर्मर्स ची संख्या | तारा (सर्कीट कि.मी.) | |
| २००६-०७ | ४८६ | ५७,७१३ | ३५,६२६ | १,८२७ | २,७२,२३१ | ७,०७,०६७ | ३४.० |
| २००७-०८ | ४९८ | ६१,५३० | ३६,२८६ | १,८८९ | ३,००,९५७ | ७,२८,७५४ | २६.१ |
| २००८-०९ | ५१५ | ६६,११८ | ३६,७१६ | १,९४७ | ३,२७,३१४ | ७,५८,०९३ | २४.७ |
| २००९-१० | ५२० | ७३,७९२ | ३७,१३३ | २,०३३ | ३,५१,२४३ | ७,९२,७८५ | २१.४ |
| २०१०-११ | ५३६ | ८२,६१९ | ३८,०६८ | २,२३४ | ३,९१,५७४ | ८,३३,४७० | १८.५ |

*आधार* : महापारेषण, महावितरण @ महावितरण - २०११-१२ मध्ये डिसेंबर पर्यंतची ए.टी.एन्ड सी. हानी १७.९ टक्के.

९.१३ अनधिकृत वीज वापराविरुध्दची व्यापक मोहीम देखील चालू असून त्याचा तपशील तक्ता ९.७ मध्ये दिलेला आहे.

**तक्ता ९.७ वितरण हानी कमी करणेसाठीच्या उपाययोजना**

| वर्ष | मापके बसविणे | | जुनी मापके बदलून | वीज-चोरी विरुध्द मोहिम | |
|---|---|---|---|---|---|
| | फिडर्स (संचयी संख्या) | वितरण ट्रान्सफॉर्मर केंद्र (संचयी संख्या) | नवीन बसविणे (संख्या) | पकडण्यात आलेली प्रकरणे (संख्या ) | वसूल केलेली रक्कम (₹ कोटी) |
| २००६-०७ | उ.ना. | ६६,६४२ | ९,५१,४५८ | ५९,७९७ | ३८.७७ |
| २००७-०८ | ५,९९४ | ८७,७३१ | १०,९७,५४५ | ८९,८८० | ५५.४१ |
| २००८-०९ | ६,८५१ | १,०५,२३६ | ८,७५,५११ | ५७,०६५ | ४४.४८ |
| २००९-१० | ७,७५८ | १,२२,०८३ | १२,५७,३०८ | ५०,६९८ | ५४.२८ |
| २०१०-११ | ८,३७७ | १,८७,४४८ | १२,०५,३६४ | १७,२६९ | १४.२४ |
| २०११-१२+ | १०,१९६ | २,२९,८२७ | १०,५१,२५१@ | २८,३३७ | १६.६४ |

*आधार :* महावितरण   उ.ना. - उपलब्ध नाही   + डिसेंबर पर्यंत   @ जानेवारी पर्यंत

९.१४ जाळयांच्या सुधारणेसाठी व हानी कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या योजना तक्ता ९.८ मध्ये दिलेल्या आहेत.

**तक्ता ९.८ जाळयांच्या सुधारणेसाठी व हानी कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या योजना**

(संख्या)

| योजना | उद्दिष्टे/लक्ष (उपलब्ध असल्यास)/ अभिप्राय | साध्य | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१०-११ | २०११-१२ + | २०११-१२ + संचयी |
| **भारत निर्माण - *राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना (आर.जी.जी.व्ही.वाय.)*** केंद्र शासनाने २००५ पासून योजना लागू केली | विद्युतीकरण न झालेल्या खेडयांचे विद्युतीकरण करणे. | ३,९१५ | २०७ | ४,७०९ |
| | दारिद्रयरेषेखालील ग्रामीण कुटुंबाना मोफत वीज जोडणी देणे. | ३,२८,९७१ | १,२३,८०८ | ११,५८,२२३ |
| ***दुर्गम गावांचे विद्युतीकरण योजना*** (एम.एन.आर.ई., भारत सरकार) $ | अक्षय ऊर्जेच्या साह्याने दुर्गम गावांचे विद्युतीकरण करणे. | -- | -- | ३४० |
| अक्षय ऊर्जेद्वारा ग्रामीण विद्युतीकरण योजना (राज्य योजनांतर्गत योजना) $ | ३०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या लहान वाडया/पाडे ज्याचा समावेश केंद्र शासनाच्या ग्रामीण विद्युतीकरण योजनेत झालेला नाही त्यांचे अक्षय ऊर्जेद्वारा विद्युतीकरण. | ७७ | -- | ७७ |
| कृषि पंपांचे विद्युतीकरण | कृषि पंपांचे विद्युतीकरण करणे. | ३,२१,२९९ | २,०४,६६८ # | ३६,९५,०८२ # |
| सिंगल फेजिंग योजना | खेड्यातील गावठाणांना ८ तास थ्री फेजची वीज व एकूण १८ तास (सिंगल फेज व थ्री फेज एकत्रित) वीज पुरविणे. | २९४ | १७५ # | १३,८४२ # |
| स्वतंत्र फिडर योजना | गावठाण व कृषि पंपांसाठी स्वतंत्र फिडर्स उपलब्ध करुन देणे. | ३,५२३ | ९७९ # | १३,६५३ # |
| ***पुनर्रचित गतिमान ऊर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम (आर-एपीडीआरपी)*** | ३०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली नगरे व शहरे यांचा समावेश. | | | |
| भारत सरकारच्या अभियानाचा मुख्य उद्देश भाग-अ- पायाभूत माहिती यंत्रणा प्रस्थापित करणे, जबाबदारी निश्चिती. | ऊर्जा वित्त महामंडळ (पीएफसी) कडून वितरीत रक्कम (भाग-अ, ब आणि स्काडा/डीएमएस नियंत्रण केंद्र) | -- | -- | ₹ ६३८.४ कोटी |
| भाग-ब - एकूण तांत्रिक व व्यावसायिक हानी (ए.टी.ॲन्ड सी.) मध्ये कपात. | भाग-अ वर झालेला खर्च (२०११-१२ मध्ये डिसेंबर पर्यंत ) | -- | -- | ₹ ७८.८ कोटी |

*आधार :* महावितरण ,   $ महाऊर्जा   + डिसेंबर पर्यंत   # जानेवारी पर्यंत

## क्षमता वाढ

९.१५ **औष्णिक ऊर्जा निर्मिती** - औष्णिक ऊर्जा प्रकल्प त्यांच्या सद्यस्थितीसह तक्ता ९.९ मध्ये दिलेले आहेत. महानिर्मितीचे ९,७५० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित आहेत.

**तक्ता ९.९ महानिर्मिती व खाजगी कंपन्यांचे औष्णिक ऊर्जा प्रकल्प**

( मेगावॅट)

| प्रकल्प | क्षमता | सद्यस्थिती |
|---|---|---|
| महानिर्मिती - परळी संच -३, ४ आणि ६, ७ (प्रत्येकी २५० मेगावॅट) | १,००० | अकराव्या पंचवार्षिक योजनेत कार्यान्वित (२०११ पर्यंत) |
| महानिर्मिती - खापरखेडा संच -५ | ५०० | ३१.०१.२०११ रोजी कार्यान्वित |
| महानिर्मिती - भुसावळ संच -४ | ५०० | मार्च, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित |
| जेएसडब्ल्यु एनर्जी लि., जयगड, रत्नागिरी | १,२०० | डिसेंबर, २०११ मध्ये कार्यान्वित |
| वर्धा पॉवर प्रा.लि. वरोरा, चंद्रपूर | ५४० | डिसेंबर, २०११ मध्ये कार्यान्वित |
| मे.अदानी पॉवर महाराष्ट्र लि., तिरोडा, गोंदिया | ३,३०० | मार्च, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित |
| मे. आयडियल एनर्जी प्रा.लि., उमरेड, नागपूर | ५४० | मार्च, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित |
| मे. इंडियाबुल्स पॉवर लि.,नांदगाव पेठ,अमरावती | २,७०० | मे, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित |
| मे. एमको एनर्जी लि., वरोरा, चंद्रपूर | ६०० | मे, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित |
| मे. इंडियाबुल्स रिअलटेक लि.,सिन्नर, नाशिक | २,७०० | सप्टेंबर, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित |

*आधार* : महानिर्मिती, ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन (खाजगी कंपन्यांच्या प्रकल्पांबाबत)

९.१६ **अक्षय ऊर्जा** - पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक इ. अक्षय ऊर्जेचे स्रोत आहेत. राज्य शासनाने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणास (महाऊर्जा) ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ च्या तरतुदीची राज्यात समन्वयन, विनियमन व अंमलबजावणी करणेसाठी नियुक्त यंत्रणा म्हणून घोषित केले आहे.

९.१७ अकराव्या पंचवार्षिक योजनेत अक्षय ऊर्जेबाबतच्या महाऊर्जा या यंत्रणे मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांवर ₹ १३,६६० लाख इतका नियतव्यय मंजूर व खर्च झाला आहे. अक्षय ऊर्जेची संभाव्य क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमतेचा तपशील तक्ता ९.१० मध्ये दिलेला आहे. ३१ डिसेंबर, २०११ अखेर एकूण ३,५५४ मेगावॅट क्षमतेचे ₹ १९,००० कोटी गुंतवणूकीचे प्रकल्प खाजगी गुंतवणूकदारां-मार्फत स्थापित करण्यात आले आहेत.

**तक्ता ९.१० अक्षय ऊर्जेची संभाव्य व त्यापैकी स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| अक्षय ऊर्जा स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | |
|---|---|---|---|---|
| | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ |
| पवन | ५,४३९ | २,०७१ | २,३१० | २,५५२ |
| लघु जल विद्युत प्रकल्प # | ७३३ | २१९ | २४६ | २४६ |
| साखर कारखान्यांकडून विजेची सहनिर्मिती | १,२५० | २९९ | ५७६ | ५७६ |
| जैविक ऊर्जा | ७८१ | १०७ | १५५ | १५५ |
| शहरी घनकचरा | २८७ | ० | ० | ० |
| औद्योगिक कचरा | ३५० | ११ | ११ | ११ |
| सौर औष्णिक व | ३५/चौ.मी. | ० | ४ | १४ |
| सौर फोटोव्होल्टाईक (पी.व्ही.) | ४९/चौ.मी. | | | |
| **एकूण** | **८,८४०** | **२,७०७** | **३,३०२** | **३,५५४** |

*आधार* : महाऊर्जा # जलसंपदा विभागाने स्थापित केलेले प्रकल्प + डिसेंबर पर्यंत

९.१८ **पवन ऊर्जा** - वाऱ्याच्या वेगाच्या मोजमापाचा (डब्ल्यु.आर.ए.) सूक्ष्म अभ्यास ३१ डिसेंबर, २०११ अखेर १८१ ठिकाणी प्रगतीपथावर आहे. २०१०-११ मध्ये एकूण ३४ वारा मापन केंद्रे उभारण्यात आली असून ८० मी.उंचीच्या २० केंद्रांची उभारणी २०११-१२ मध्ये अपेक्षित आहे.

९.१९ **सौर ऊर्जा** -

- महानिर्मितीद्वारा १ मेगावॅट सौर फोटोव्होल्टाईक (पीव्ही), २ मेगावॅट सौर स्फटिक पीव्ही आणि २ मेगावॅट सौर पातळ पटल पीव्ही प्रकल्प चंद्रपूर येथे कार्यान्वित झालेले आहेत.
- २५ मेगावॅट क्षमतेचा सौर पीव्ही प्रकल्प साक्री, धुळे येथे १० मेगावॅट मार्च, २०१२ अखेर व १५ मेगावॅट जून, २०१२ अखेर अशा दोन टप्प्यात कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. याशिवाय १२५ मेगावॅट क्षमतेचा सौर पीव्ही प्रकल्प शिवाजीनगर, साक्री, धुळे येथे डिसेंबर, २०१२ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

- ३ मेगावॅट क्षमतेचा मुळशी-पुणे येथे टाटा पॉवर प्रकल्प, तर चंद्रपूर येथे ५ मेगावॅट , सुपा-बारामती येथे २ मेगावॅट आणि बामनी-उस्मानाबाद येथे १ मेगावॅट क्षमतेचे खाजगी प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

- बाराव्या पंचवार्षिक योजनेत १,३०५ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प महानिर्मिती द्वारा प्रस्तावित आहेत.

९.२० **लघु जलविद्युत प्रकल्प** - खाजगीकरणातून लहान जलविद्युत प्रकल्प विकसित करण्यास चालना मिळणेसाठी राज्य शासनाने १५ सप्टेंबर, २००५ रोजी धोरण घोषित केले. या धोरणांतर्गत २११.१ मेगावॅट क्षमतेच्या ७४ प्रकल्पांसाठी प्रवर्तक निश्चित करण्यात आलेले असून डिसेंबर, २०११ पर्यंत ५२.९ मेगावॅट क्षमतेचे ११ प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत. उर्वरित ६३ प्रकल्प विकासाच्या विविध टप्प्यांत आहेत.

## अक्षय ऊर्जा स्त्रोतांच्या नवीन योजना

९.२१ दिवसेंदिवस पारंपारिक ऊर्जा स्त्रोतात घट होत असल्याने, नवीन व अक्षय स्त्रोत जे भविष्यातील ऊर्जा स्त्रोत असणार आहेत त्यांचा शोध घेणे ही काळाची गरज आहे. या दिशेने महाऊर्जा मार्फत नवीन व अक्षय ऊर्जा मंत्रालय (एमएनआरइ), भारत सरकार यांच्या योजनांमधून केलेले काही उपक्रम खाली नमूद केलेले आहेत.

९.२२ **सौर संसाधन मूल्यांकन केंद्र** : सौर ऊर्जा क्षेत्राच्या विकासास गती देण्यासाठी, नवीन व अक्षय ऊर्जा मंत्रालयाने सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी योग्य जागा निश्चित करण्यासाठी सौर विकिरण मूल्यांकन केंद्रांचे जाळे उभारण्याचे ठरविले आहे. त्यानुसार सातारा, बुलढाणा व सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे कराड, शेगाव आणि पंढरपूर या तीन ठिकाणी केंद्रे कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. राज्याचा सौर नकाशा तयार करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या अतिरिक्त संनियंत्रणासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेत महाऊर्जाद्वारा सौर स्त्रोत मूल्यांकन केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे.

९.२३ **सौर वाफ निर्मिती यंत्रणा** - राज्यातील काही उपक्रम खाली नमूद केलेले आहेत.

- नवीन व अक्षय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या अनुदानातून शिर्डी साईबाबा संस्थान येथे प्रति दिवशी १७,००० लोकांसाठी अन्न शिजविण्याची जगातील सर्वात मोठी यंत्रणा बसविण्यात आलेली असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात एलपीजीची बचत होत आहे.

- महेंद्र व्हेइकल मॅन्युफॅक्चरींग लि., चाकण येथे पेन्ट शॉपकरीता उष्मा पुनःप्राप्ती यंत्रणेसाठी प्रत्येकी १६ चौ.मी. शफलर संकेंद्रक बसविण्यात आले असून त्यामुळे प्रतिवर्षी ७३९ टन एलपीजी / प्रति माह ८,१०० युनिटस् विजेची बचत होत आहे.

- ठाणे महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा, ठाणे येथे १६० टन सौर वातानुकुलीत यंत्रणा बसविण्याच्या कामाचा पहिला टप्पा पूर्ण केलेला आहे.

- भिलवडी, सांगली येथे २०११ मध्ये मोठे क्षेत्र असलेल्या दोन तबकड्या "अरुण-१६०" बसविण्यात आलेल्या असून त्याद्वारे २,००० कि.ग्रॅ. वाफेची निर्मिती स्वच्छ प्रकाशमान दिवशी होत आहे. त्यामुळे प्रति दिवशी ११३ कि.ग्रॅ. फर्नेस ऑइलच्या वापरात बचत होत आहे.

९.२४ **सौर शहर कार्यक्रम** - अक्षय ऊर्जेच्या स्त्रोतांतून शहरातील वीज पुरवठ्यात वाढ व ऊर्जा कार्यक्षमतेबाबत उपाययोजना अशा एकत्रित प्रयत्नातून शहराच्या पारंपारिक ऊर्जेच्या पाच वर्षाअखेरच्या प्रक्षेपित मागणीत कमीत कमी १० टक्के कपात हे सौर शहर विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. नवीन व अक्षय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार प्रति शहरासाठी लोकसंख्या व नगर प्रशासनाकडून उचलण्यात आलेली पावले या आधारे ₹ ५० लाख पर्यंत वित्तीय सहाय्य देणार आहे. राज्यातील सहा शहरांचा या योजनेत समावेश असून तीन शहरांनी प्राप्त अनुदानातून त्यांचे बृहत आराखडे सादर केले आहेत. नागपूर शहर या कार्यक्रमांतर्गत आदर्श सौर शहर म्हणून विकसित करण्यात येत आहे.

९.२५ **बायोगॅस आधारीत वितरण/ग्रीड ऊर्जा निर्मिती कार्यक्रम** - बायोगॅस तंत्रज्ञानामुळे मुख्यतः सेंद्रिय कचऱ्यापासून ऊर्जानिर्मितीसाठी पर्यायी स्त्रोत उपलब्ध झालेला आहे. गॅसचा वापर ऊर्जानिर्मितीसाठी आणि निर्माण झालेल्या गाळाचा वापर मूल्यवान सेंद्रिय खत म्हणून होतो.

- राज्यात डिसेंबर, २०११ अखेर ६४९.५ किलोवॅट क्षमतेचे ४९ प्रकल्प (देशात सर्वात अधिक) कार्यान्वित.

- पुणे महानगरपालिकेने वेगवेगळ्या करण्यात आलेल्या सेंद्रिय घन कचऱ्याचे निर्मूलन करण्यासाठी ५ टन प्रति दिवस क्षमतेचे ११ विकेंद्रित बायोमिथेनेशन-व-ऊर्जा निर्मिती प्रकल्प महाऊर्जा मार्फत नवीन व अक्षय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्राप्त झालेल्या वित्तीय सहाय्यामधून उभारलेले आहेत. हा अशा प्रकारचा राबविण्यात आलेला देशातील पहिला प्रकल्प.

९.२६ **भू-औष्णिक ऊर्जा** - या संदर्भातील प्राथमिक प्रयत्न म्हणून महाऊर्जा मार्फत राज्यातील भू-औष्णिक ऊर्जेच्या स्त्रोताच्या मूल्यांकन व उपयोजितेबाबतच्या शक्यता पडताळणीसाठी अभिव्यक्तीचे प्रकटीकरण मागविण्यात आलेले आहे.

९.२७ ***जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन*** - पर्यावरण बदलाविषयीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याअंतर्गत ११ जानेवारी, २०१० रोजी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन हा कार्यक्रम पंतप्रधानांनी घोषित केला. धोरणात्मक रचना व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली असून एनटीपीसी विद्युत व्यापार निगम (एनव्हीव्हीएन), एनटीपीसी ची व्यापारी उपकंपनी ही वीज वितरण जाळ्याला (ग्रीड) जोडलेल्या सौर ऊर्जा निर्मिती साठी कार्यान्वयीन यंत्रणा निवडण्यात आलेली आहे. भारतीय अक्षय ऊर्जा विकास यंत्रणेकडे (इरेडा) इच्छूक बँकांना ग्राहकांना पाच टक्के वार्षिक व्याजदराने कर्जपुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी पुर्नवित्त पुरवठा करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या मिशन खाली राज्यात जानेवारी, २०११ पर्यंत २१ मेगावॅट क्षमतेच्या सात ग्रीड सौर पीव्ही ऊर्जा प्रकल्पांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

## ऊर्जा संवर्धन

९.२८ मागणी व पुरवठ्यातील तूट कमी करण्यासाठी महाऊर्जा मार्फत राबविण्यात येणाऱ्या ऊर्जा संवर्धनाच्या विविध उपाययोजना तक्ता ९.११ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत.

**तक्ता ९.११ महाऊर्जा मार्फत राबविण्यात येणाऱ्या ऊर्जा संवर्धनासाठीच्या विविध योजना**

| योजना | उद्देश / लक्ष /अभिप्राय | साध्य | लक्ष |
|---|---|---|---|
| | | २०१०-११ | २०११-१२ |
| शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविणे. | ऊर्जा संवर्धनाची संकल्पनेच्या स्वीकार सुकर करण्याच्या दृष्टीने साह्यभूत होणे. | २ शासकीय इमारती | ६ शासकीय इमारती |
| ऊर्जा संवर्धन संयंत्रे नगरपालिकांमध्ये बसविणे. | महानगरपालिका/नगरपालिका/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाणी पुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्रे बसविण्यासाठी ₹ २५ लाख पर्यंत आर्थिक सहाय्य. | ३ नगरपालिका | १५ नगरपालिका |
| ग्रामपंचायतीमध्ये ऊर्जा बचत पथदिवे | एकूण २९,१७८ सीएफएल संच डिसेंबर,२०११ पर्यंत बसविण्यात आले आहेत. | ९,३७० संच | १३,६१२ संच |
| जैविक कांडी कोळसा (ब्रिकेटींग) योजना (यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या २० टक्के भांडवली अर्थसहाय्य -प्रति प्रकल्प ₹ ४ लाख पर्यंत) | सर्व प्रकारचे कृषि व वन्य अवशेष कांडीच्या आकाराच्या ओंडक्यामध्ये रुपांतरित करुन त्याचा उपयोग अ-पारंपारिक इंधन म्हणून करण्यात येतो. (डिसेंबर, २०११ पर्यंत एकूण ४७ प्रकल्प) | १५ प्रकल्प | १५ प्रकल्प |
| सामायिक अभ्यासिकेत सौर घरगुती दिवे (१० टक्के ग्रामपंचायतीचा वाटा व ९० टक्के शासनाचे अर्थसहाय्य) | ४१,००० गावांमध्ये सौर घरगुती दिवे सामायिक जागी (उदा. शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, मंदिर इ.) उपलब्ध करुन देणे. (डिसेंबर, २०११ पर्यंत ६,२९२ गावें ) | ३,६२३ गावें | ४,४३९ गावें |
| आश्रमशाळांमध्ये सौर ऊर्जा साधने | आश्रमशाळांमध्ये सौर ऊर्जा यंत्रणा बसविणे. | २२ आश्रमशाळा | १२ आश्रमशाळा |
| आश्रमशाळा व वसतीगृहांत पवन-सौर संकरित संयंत्रे | आश्रमशाळांत पवन-सौर संकरित संयंत्रे बसविणे. | १० आश्रमशाळा | १० आश्रमशाळा |
| तेजस्वी पथदिवे कार्यक्रम | नगरपालिका क्षेत्रात पथदिव्यांसाठी ऊर्जा कार्यक्षमता उपाययोजना राबविणे. | ९,७३० संच | १३,७३५ संच |
| ऊर्जा बचत कार्यक्रम<br>लघु व मध्यम उद्योगांसाठी वॉक-थ्रु ऊर्जा लेखा परिक्षण | या योजनेअंतर्गत पात्र असलेल्या संस्था / लघु-मध्यम उद्योग यांना ऊर्जा लेखा परिक्षणासाठी वित्तीय सहाय्य. | ३० संस्था<br>-- | ३५ संस्था<br>४००<br>लघु-मध्यम उद्योग |
| अपव्ययित उष्म्याचा पुनर्वापर योजना | प्रकियांमधून निर्माण होणाऱ्या उच्च तापमानाच्या उष्म्याचा ऊर्जा निर्मितीसाठी वापर करणे (प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सहाय्य) | २ | ४ |

*आधार* : महाऊर्जा

# वाहतूक व दळणवळण

९.२९ वाहतूक आणि दळणवळण हे पायाभूत सुविधांचे अत्यावश्यक घटक असून केवळ जागतिक स्पर्धेसाठीच नव्हे तर एकात्मिक राष्ट्रीय बाजारपेठेच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे मूलभूत घटक आहेत. इतर आघाड्यांवर कितीही प्रगती केली तरी अकार्यक्षम परिवहन व्यवस्थेमुळे आणि निकृष्ट दळणवळणामुळे उद्भवणाऱ्या वाढीव देवाण-घेवाण किंमती अर्थव्यवस्थेतील संपूर्ण वाढीच्या क्षमतेस बाधक ठरु शकतात. भूपृष्ठ वाहतूक, रेल्वे, जल वाहतूक व हवाई वाहतूक यांचा परिवहन यंत्रणेत समावेश असून टपालसेवा, दूरध्वनी व इंटरनेट सेवा हे दळणवळण यंत्रणेचे मुख्य घटक आहेत.

**तक्ता ९.१२ सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी**

(कि.मी.)

| प्रवर्ग | ३१ मार्च रोजी | | |
|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ |
| राष्ट्रीय महामार्ग | ४,३६७ | ४,३७६ | ४,३७६ |
| राज्य महामार्ग | ३३,९३३ | ३४,१०२ | ३४,१०३ |
| प्रमुख जिल्हा रस्ते | ४९,६२१ | ४९,९०१ | ४९,९३६ |
| इतर जिल्हा रस्ते | ४६,१४३ | ४६,८१७ | ४६,८९७ |
| ग्रामीण रस्ते | १,०३,६०४ | १,०४,८४४ | १,०६,४०० |
| **एकुण** | **२,३७,६६८** | **२,४०,०४०** | **२,४१,७१२** |
| **त्यापैकी** | | | |
| विदर्भ विभाग | **५९,४७९** | **६०,११३** | **६१,०१८** |
| मराठवाडा विभाग | **५२,३८५** | **५३,२०४** | **५३,४६८** |
| उर्वरित महाराष्ट्र | **१,२५,८०४** | **१,२६,७२३** | **१,२७,२२६** |

आधार : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

## वाहतूक

### वाहतूकीचे जाळे

९.३० राज्यातील रस्त्यांच्या जाळ्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते आणि ग्रामीण रस्ते यांचा समावेश होतो. राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, महानगरपालिका / नगरपरिषदा /नगर पंचायती, कटक मंडळे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, वन विभाग, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) राज्यातील रस्त्यांच्या विकासाची कामे पार पाडतात. मार्च, २०११ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देखभाली अंतर्गत रस्त्यांची लांबी वगळून) २.४१ लाख कि.मी. इतकी होती. त्यापैकी पृष्ठांकित रस्त्यांची लांबी २.२१ लाख कि.मी. (९१.५ टक्के) होती. राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या देखभालीखालील रस्त्यांची प्रवर्ग निहाय व विभागनिहाय लांबी तक्ता ९.१२ मध्ये आणि वर्षनिहाय व रस्त्यांच्या प्रकारानुसार रस्त्यांच्या लांबीची सविस्तर माहिती परिशिष्ट ९.२ मध्ये दिली आहे.

### रस्त्यांनी जोडलेली गावे

९.३१ ३१ मार्च, २०११ पर्यंत ९७.८ टक्के गांवे बारमाही रस्त्यांनी, तर १.६ टक्के गांवे हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती. राज्यातील २२७ गावे कोणत्याही रस्त्यांनी जोडलेली नव्हती.

९.३२
- सन २०११ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत रस्त्यांची लांबी १,६७२ कि.मी. ने वाढली.
- एकाही राज्य महामार्गाची राष्ट्रीय महामार्गात श्रेणीवाढ न झाल्याचे परिणामी राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीत बदल नाही.
- राज्य महामार्गाच्या एकूण लांबीत बदल नाही.
- प्रमुख जिल्हा रस्ते व इतर जिल्हा रस्त्यांच्या लांबीत अनुक्रमे ३५ कि.मी व ८० कि.मी. ने वाढ झाली.
- ग्रामीण रस्त्यांची लांबी १,५५६ कि.मी. ने वाढली.

**आलेख ९.६ : कुठल्याहि रस्त्यांनी न जोडलेली खेडी**



- गतवर्षीच्या तुलनेत फक्त ९ गावे रस्त्याने जोडण्यात आलेली आहेत.

९.३३ ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये राज्याच्या रस्ते विभागासाठी नियतव्यय व खर्चाचा तपशील तक्ता क्र. ९.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता क्र. ९.१३ ११ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत रस्ते विभागासाठी नियतव्यय व खर्चाचा तपशील**

(₹ कोटी)

| वार्षिक योजना | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| नियतव्यय | १,७०४.७२ | २,६०५.४८ | ३,७५६.१३ | ३,०२६.७५ | २,७५१.२५ |
| खर्च | १,७०२.७७ | २,६०७.६१ | ३,७५५.१६ | २,९४०.०३ | १,४९५.८६@ |

आधार : सां.बा.वि. महाराष्ट्र शासन @ तात्पुरती ३१ डिसेंबर २०११ पर्यंत

सन २०१० व २०११ मधील जिल्हानिहाय रस्त्यांच्या रुंदीनुसार लांबीची माहिती परिशिष्ट ९.३ मध्ये दिली आहे.

## पंतप्रधान ग्रामसडक योजना

९.३४ पंतप्रधान ग्रामसडक योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून, सन २००० पासून राज्यात राबविली जाते. सध्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास मंडळामार्फत ग्रामीण विकास विभाग ही योजना राबविली जाते. पंतप्रधान ग्रामसडक योजना या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील न जोडलेल्या १००० व अधिक लोकसंख्या (आदिवासी भागासाठी ५०० व अधिक) असलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा आहे. या योजनेंतर्गत ७,९६१ लोकवस्त्यांना २३,२०६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांनी जोडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यापैकी जानेवारी, २०१२ पर्यंत ६,८८७ वाडया/वस्त्यांना २०,८५० कि.मी. लांबीच्या रस्त्यांनी जोडण्यात आले आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत विभागनिहाय रस्त्यांची संचित लांबी तक्ता ९.१४ मध्ये दिली आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधील रस्त्यांच्या लांबीचा ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा रस्त्यांचा लांबीत समावेश आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनेचे भौतिक व आर्थिक साध्य तक्ता क्र. ९.१५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.१४ पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत विभागनिहाय रस्त्यांची संचित लांबी**

| विभाग | रस्त्यांची संचित लांबी (कि.मी.)+ |
|---|---|
| विदर्भ | ६,६७८ |
| मराठवाडा | ४,६९८ |
| उर्वरित महाराष्ट्र | ९,४७४ |
| **एकूण** | २०,८५० |

आधार : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

+ ३१ जानेवारी, २०१२ पर्यंत

**तक्ता ९.१५ पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत अकराव्या पंचवार्षिक योजनेतील भौतिक व आर्थिक साध्य**

| वार्षिक योजना | लाभार्थी लोकवस्त्यांची संख्या | साध्य रस्त्याची लांबी (कि.मी.) | झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १,२३९ | २,४९२.१९ | ६३७.३१ |
| २००८-०९ | १,०६० | ४,१३८.६४ | ९३८.७१ |
| २००९-१० | ९७० | ३,१११.५१ | ९८५.८८ |
| २०१०-११ | ९४२ | ३,६४९.०७ | १,००८.३१ |
| २०११-१२++ | ६८० | २,०९७.६७ | ४४३.९२ |

आधार : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन ++ ३१ जानेवारी, २०१२ पर्यंत

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

९.३५ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे प्रामुख्याने खाजगी क्षेत्राच्या सहभागातुन रस्ते आणि संलग्न पायाभूत सुविधा यांचा विकास करण्यात येतो. महामंडळाने हाती घेतलेले बहुतांश प्रकल्प ‘बांधा, वापरा व हस्तांतरित करा’ या तत्वावर आधारित असून महामंडळ प्रामुख्याने रस्ते प्रकल्प, उड्डाणपूल प्रकल्प, टोल वसुली अधिकार इ. कामे हाती घेते. महामंडळाच्या स्थापनेपासून अंदाजे ₹ ७,१८७ कोटी किंमतीच्या १८ प्रकल्पांची कामे पूर्ण केली असून त्यावरील प्रत्यक्ष खर्च ₹ ६,८२२ कोटी आहे. ३० सप्टेंबर, २०११ पर्यंत पूर्ण झालेल्या व अंशतः पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या टोल वसूलीची एकूण रक्कम ₹ ५,६८०.१५ कोटी इतकी होती. महामंडळाच्या प्रगती पथावरील प्रकल्पांचा तपशील तक्ता ९.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१६ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रगती पथावरील प्रकल्प**

(₹ कोटी )

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची एकूण अंदाजे किंमत | ऑक्टोबर, २०११ पर्यंतचा खर्च | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|
| नागपूर -औरंगाबाद-सिन्नर-घोटी रस्ता सुधार | ७२२ | ७११.८८ | २०११-१२ |
| नागपूर येथील रस्त्यांची कामे | ४२२ | ३९७.६६ | २०११-१२ |
| औरंगाबाद येथील रस्त्यांची कामे | १४२ | १११.९३ | २०११-१२ |
| नागपूर -काटोल-जलालखेडा रस्त्याचे रुंदीकरण | ११ | २.७१ | उ.ना. |
| कोल्हापूर येथील रस्त्यांची कामे | १७२ | ४.४० | २०११-१२ |
| एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प - अचलपूर | ४०.३४ | ०.११ | उ.ना. |
| एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प - सांगली | उ.ना. | ०.१२ | उ.ना. |
| सार्वजनिक जलद प्रवास प्रणाली - नागपूर | उ.ना. | २.०७ | उ.ना. |
| सार्वजनिक जलद प्रवास प्रणाली - ठाणे | उ.ना. | ६.२८ | उ.ना. |
| वर्सोवा वांद्रा सागरी सेतू प्रकल्प | २,३०० | २.०७ | उ.ना. |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | १,००० | २३.७८ | उ.ना. |
| जल वाहतूक प्रकल्प | १,३९० | ३.७१ | उ.ना. |
| पश्चिम मुक्त मार्ग सागरी सेतू | ४,१४३ | ११.७८ | उ.ना. |
| मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी) | ४७१.७३ | ३१८.८२ | २०११-१२ |
| मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) | ३९३.४० | १४८.१२ | २०११-१२ |
| विस्तारीत - मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प | २,०६५ | २०७.६४ | २०११-१२ |
| एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम-शिर्डी | ३५० | ४.१४ | २०११-१२ |
| एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम-नागपूर | ४०.८४ | ३५.२८ | २०११-१२ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ    उ. ना. - उपलब्ध नाही

## मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक

९.३६ मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत सात महानगरपालिका, १३ नगरपरिषदा आणि ठाणे व रायगड जिल्ह्यातील काही ग्रामीण भागाचा समावेश आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) नागरी पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देऊन महानगर प्रदेशास आर्थिक व्यवहाराचे महत्त्वाचे केंद्र बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मुंबई मेट्रो रेल प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येणारा देशातील पहिला सामूहिक वाहतूक प्रणाली (एमआरटीएस) प्रकल्प आहे. महत्त्वाचे प्रकल्प खाली नमूद केले आहेत.

### मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

- मुंबई मेट्रो रेल प्रकल्प तीन टप्प्यांचा असून त्यापैकी पहिला टप्पा वर्सोवा-अंधेरी -घाटकोपर (१४ कि.मी.) चे काम प्रगती पथावर आहे.

### मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी)

- टप्पा - १ : रेल्वे नविन मार्ग : माहिम-सांताक्रुझ, कुर्ला-ठाणे डिसीचे एसीमध्ये रूपांतर इत्यादी तसेच ईएमयु कोच (नवीन रेक्स) सह
- मुंबई मोनो रेल प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे.

### मुंबई शहर पायाभुत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी)

- या प्रकल्पांतर्गत खालील कामे पुर्ण झाली असून २०११-१२ मध्ये जनतेसाठी खुली करण्यात आली आहेत. भारतमाता लालबाग उड्डाणपूल (लांबी २,४४५ मी.), बर्फीवाला उड्डाणपूल (लांबी उत्तरबाजुला ३८४ मी. आणि दक्षिणबाजुला ३५४ मी.), सुमन नगर उड्डाणपूल (लांबी ५०० मी.) आणि किंग्ज सर्कल तुलपुले चौक उड्डाणपूल (लांबी १,५०० मी.).

### विस्तारीत एमयुआयपी :

- या प्रकल्पांतर्गत २४ उप प्रकल्प (११ रस्ते, ७ उड्डाणपूल, ३ खाडी पूल व ३ रेल्वे मार्गावरील पूल) वसई, विरार, मीरा-भाईंदर, ठाणे, डोंबिवली, कल्याण आणि पनवेल येथे हाती घेण्यात आलेले आहेत.

**मुंबई ट्रान्स हार्बर लिंक :**

- शिवडी येथील समुद्र तटापासून न्हावा हा २२ कि.मी. लांबीचा ट्रान्स हार्बर मार्ग

मुंबई महानगर क्षेत्राच्या (एमएमआर) प्रकल्पांची सविस्तर माहिती तक्ता ९.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१७ मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक प्रकल्प**

(₹ कोटी )

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची किंमत | ३१ ऑक्टोबर, २०११ पर्यंतचा खर्च | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|
| **एमयुटीपी : रेल्वेची कामे** | | | |
| **टप्पा-१:** नवीन मार्ग : माहिम-सांताक्रुझ, कुर्ला-ठाणे, डीसी चे एसी मध्ये रुपांतर, इ. नवीन रेक्ससह | ३,३८० | ३,१८६ | • काम प्रगती पथावर |
| विरार ते बोरिवली दरम्यानच्या रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण करणे. | ५१२ | ५८८.४२ | • काम पूर्ण |
| पूर्व व पश्चिम उपनगरांना जोडणा-या जोगेश्वरी-विक्रोळी आणि सांताक्रुझ-चेंबूर या दोन प्रमुख रस्त्यांचा विकास करणे. | ६२१ | ५६१.५३ | • जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यांचे काम प्रगती पथावर आहे. |
| एमयुटीपीसाठी पुनर्वसन | ५४५ | ५४५ | • पुनर्वसन करण्यात आले आहे. |
| **मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प :** (तीन टप्पे, ७५ कि.मी.)<br>**टप्पा -१** : वर्सोवा - अंधेरी- घाटकोपर (१४ कि.मी.) | २,३५६ | १,५७४ | • प्रत्यक्ष कामाची सुरुवात फेब्रुवारी, २००८ मध्ये ८० टक्के काम पूर्ण झाले असून काम प्रगती पथावर आहे. |
| **टप्पा -२** : चारकोप - बांद्रा - मानखुर्द (३२ कि.मी.) | ८,२५० | -- | • रेल्वेकडून तत्वतः मान्यता प्रलंबित. पर्यावरण मंत्रालयाकडून अटींच्या अधीन सीआरझेडला मान्यता आणि वन विभागाकडून मान्यता प्रलंबित. |
| **टप्पा -३** : कुलाबा - बांद्रा (२९ कि.मी.) | १८,००० | -- | • डीपीआर ची तयारी अंतिम टप्प्यात आहे. |
| **मुंबई मोनो रेल प्रकल्प :** अंदाजे २० कि.मी. संत गाडगेबाबा चौक (जेकब सर्कल) ते वडाळा आणि वडाळा ते चेंबूर | २,४६० | १,०७८ | • काम प्रगतीपथावर<br>टप्पा १ (वडाळा-चेंबुर) ७६ टक्के काम पूर्ण<br>टप्पा २ संत गाडगेबाबा चौक (जेकब सर्कल)<br>- वडाळा १७ टक्के कामपूर्ण<br>- एकूण ४६ टक्के कामे पूर्ण |
| **एमयूआयपी :** रस्ते, उड्डाण पूल, भुयारी मार्ग, इ. | ३,२०७ | २,४५४.७० | • १५ रस्ते पूर्ण |
| **विस्तारित एमयूआयपी :** एमयूआयपीचा सह प्रकल्प. या प्रकल्पाअंतर्गत २४ उप प्रकल्प (११ रस्ते, ७ उड्डाणपूल, ३ खाडी पूल व ३ रेल्वे मार्गावरील पुल) हाती घेण्यात आले आहे. | २,६०६.६१ | ३७४.०१ | • २४ उप प्रकल्पांपैकी २ पूर्ण व २२ ची कामे प्रगती पथावर आहेत. |
| **स्कायवॉक** : मुंबई व मुंबई महानगर क्षेत्रात ३६ स्कायवॉक बांधणे | ८००.०० | ६६७.३५ | • ३६ स्कायवॉक पूर्ण झाले असून ते जनतेसाठी खुले केले आहेत. |
| **विरार-अलिबाग मल्टी मोडल कॉरिडोर :** वाहनांसाठी ८ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला १४० कि. मी लांबीचा खुला मार्ग बांधणे | ९,५०० (भूसंपादना साठीचा खर्च वगळून) | - | • मुंबई व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तांत्रिक आर्थिक अभ्यास पूर्ण केला आहे. ७९ कि.मी. लांबीचा बहुउद्देशीय मार्ग प्रादेशिक नकाशामध्ये समाविष्ट करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक :** २२ कि.मी. लांबीचा हा मार्ग शिवडी ते न्हावा असून वाहतूक ३ तासांऐवजी ३० मिनिटात होणार आहे. | ८,८०० | ०.४४ | • या प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. |

*आधार:* मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण एमयूटीपी: मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प, एमयुआयपी: मुंबई शहर पायाभुत सुविधा प्रकल्प

## भूपृष्ठ वाहतूक

९.३७ रस्ते वाहतूक हा भौतिक पायाभूत सुविधांचा अत्यंत महत्वाचा घटक असून राज्यामध्ये यात अत्याधिक वाढ झाली आहे, जी वाहनांच्या प्रचंड संख्या वाढीवरून दिसून येते.

### मोटार वाहने

९.३८ राज्यात १ जानेवारी, २०१२ रोजी एकूण १८८.२७ लाख मोटार वाहने (दर लाख लोकसंख्येमागे १६,५७८ वाहने) वापरात होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत १०.८ टक्क्यांनी जास्त होती. राज्यात प्रति कि.मी. रस्ते लांबीला वाहनांची संख्या ७८ आहे. राज्यात वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकार निहाय संख्या तक्ता ९.१८ मध्ये व वापरात असलेल्या मोटार वाहनांचा तपशील परिशिष्ट ९.४ मध्ये दिला आहे.

९.३९ राज्यातील एकूण वाहनांपैकी १९.७९ लाख वाहने (१०.५ टक्के) बृहन्मुंबईत आहेत. बृहन्मुंबईत प्रति कि.मी. रस्ते लांबीला वाहनांची संख्या ६४७ असून हे प्रमाण चिंताजनक आहे.

**तक्ता ९.१८ वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रवर्गनिहाय संख्या**

(' 000)

| प्रकार | १ जाने. रोजी | | |
|---|---|---|---|
| | २०११ | २०१२* | शेकडा बदल # |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | १२,०६० | १३,४७७ | ११.६ |
| ऑटो रिक्षा | ६४४ | ६५५ | १.७० |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | २,५६५ | २,७९५ | ८.९ |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, स्कुल बसेस,पी.एस.व्ही.) | ८२ | ८७ | ६.१ |
| माल मोटारी {आर्टीक्युलेटेड/मल्टीअॅक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलेव्हरी व्हॅन्स (३ व ४ चाकी), इ.} | ९५५ | १,०४८ | ९.७ |
| ट्रॅक्टर्स | ३५८ | ४१४ | १५.६ |
| ट्रेलर्स | २८५ | ३०८ | ८.० |
| रूग्णवाहिका | १० | १० | ० |
| इतर वाहने | ३० | ३३ | १० |
| **एकूण** | **१६,९८९** | **१८,८२७** | **१०.८** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी पी.एस.व्ही.- जन सेवा वाहने
# २०११ च्या तुलनेत २०१२

९.४० मार्च, २०११ पर्यंत मोटार वाहने चालविण्याच्या वैध परवान्यांची संख्या २१३.१ लाख असून मागील वर्षाच्या तुलनेत ती ५.९ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात २०१०-११ मध्ये २२.८९ लाख शिकाऊ परवाने देण्यात आले.

**आलेख ९.७ : राज्यातील दुचाकी व हलकी मोटार वाहने (१ जानेवारी रोजी)**




# अस्थायी
टीप :उजव्या बाजूचा Y- अक्ष हलकी मोटार वाहने (लाखात) दर्शवितो.

९.४१ रस्ते अपघातांमुळे मानवी जीवन आणि संपत्तीचे नुकसान होते. रस्ता सुरक्षा सप्ताहाचे ब्रीद वाक्य "अपघातांमुळे अश्रु आणि सुरक्षेमुळे हसू" हे होते. राज्यामध्ये रस्ता सुरक्षाविषयक विविध पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. वाहनांची व वाहनचालकांच्या डोळयांची मोफत तपासणी मुंबई वाहतूक पोलिसांनी आयोजित केली होती. ऑटोरिक्षाचालक, बेस्ट वाहन चालक, बृहन्मुंबई महानगरपालिका वाहन चालक आणि शाळा बस वाहन चालक यांच्यासाठी वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन व शहर वाहतूक नियंत्रण शाखा यांचे द्वारे रस्ता सुरक्षेवर आधारित व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. राज्य व मुंबई शहरातील वर्ष २००६ ते २०१० पर्यंतची अपघातांची आकडेवारी तक्ता ९.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१९ राज्य व मुंबई शहरातील अपघात, मृत व जखमी व्यक्ती विषयक आकडेवारी**

| वर्ष | अपघातांची संख्या | | मृत व्यक्तींची संख्या | | जखमी व्यक्तींची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | मुंबई शहर | राज्य | मुंबई शहर | राज्य | मुंबई शहर |
| २००६ | ७५,७७९ | ३०,४४४ | ११,३०० | ६६९ | ५४,००६ | ७,४७१ |
| २००७ | ७६,६०१ | २९,६९९ | ११,८०४ | ६२३ | ५२,४०८ | ६,४०२ |
| २००८ | ७५,५२७ | २९,७८० | १२,३९७ | ६२१ | ५२,७८० | ६,४५३ |
| २००९ | ७१,९९५ | २९,४४० | ११,३९६ | ६२० | ४७,८७८ | ६,५८९ |
| २०१० | ६९,५७३ | २३,४९९ | १२,२८७ | ५४९ | ४६,५२८ | ४,८९६ |

आधार : महाराष्ट्र राज्य मोटार वाहतूक सांख्यिकी

## सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक

९.४२ राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व शहर प्रवासी वाहतूक व्यवस्था यांच्या मार्फत सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था पुरविण्यात येते.

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.४३ रा.प. महामंडळाकडून २०१०-११ या वर्षात प्रतिदिन सरासरी ६९.५ लाख प्रवासी वाहतूक केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सार्थ कि.मी. वाहतूक सुमारे २.७ टक्क्यांनी व मार्गस्थ गाड्यांच्या आसन क्षमतेचा सरासरी वापर १.५ टक्क्यांनी वाढलेला आहे. चालक-वाहक उत्पादकतेत मागील वर्षाच्या तुलनेत २०१०-११ मध्ये देखील वाढ झालेली आहे. रा.प. महामंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२० रा. प. महामंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | २००९-१० | २०१०-११ | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| वाहतूक केलेल्या प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या (लाख) | ६५.३६ | ६९.५० | ६.३ |
| रा.प.महामंडळाच्या मालकीच्या बसगाड्यांची सरासरी संख्या | १५,९५० | १६,२११ | १.६ |
| मार्गस्थ असणाऱ्या बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | १५,०४० | १५,३५९ | २.१ |
| वाहतूक केलेले प्रतिदिन सरासरी सार्थ कि.मी. (लाख) | ५०.६१ | ५१.९८ | २.७ |
| वाहन उत्पादकता (कि.मी.) | ३१७.२३ | ३२०.६ | १.१ |
| चालक/वाहक उत्पादकता (कि.मी.) | २२१.८० | २२८.१० | २.८ |
| मार्गस्थ गाड्यांच्या आसन क्षमतेचा सरासरी वापर (लोड फॅक्टर टक्के) | ६०.९ | ६१.८४ | १.५ |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (नियतप्रमाणे) (दि. ३१ मार्च रोजी) | ६.९७ | ७.०३ | ०.९ |
| एकूण वाहने (भाडयाची वाहने धरुन व निकामी वाहने वगळून दि. ३१ मार्च रोजी ) (संख्या) | १५,८३९ | १६,२१२ | २.४ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ
वाहन उत्पादकता = प्रति वाहनाने वाहतूक केलेले प्रतिदिन सरासरी कि.मी., चालक-वाहक उत्पादकता=चालक व वाहकांचे कि.मी. मध्ये प्रतिदिन सरासरी काम

९.४४ रा.प. महामंडळ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले), कॅन्सरचे रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इ. प्रवाशांना बस भाड्यात सवलत देत असते. २०१०-११ मध्ये समाजातील अशा घटकांना दिलेली एकूण सवलत ₹ ७६५.७६ कोटी होती. या सवलतीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली गेली. याशिवाय, दुर्गम भागात अल्प उत्पन्न देणाऱ्या 'क' वर्गाच्या फेऱ्या (ज्या फेऱ्यांपासून होणारे उत्पन्न हे निव्वळ चल खर्चापेक्षा कमी असते) चालविल्या जातात (ज्या प्रामुख्याने सामाजिक बांधिलकी स्वरुपाच्या आहेत), त्यामुळे रा.प. महामंडळाला २०१०-११ मध्ये सुमारे ₹ २३८.३१ कोटी एवढा तोटा झाला. तरी सुध्दा रा.प. महामंडळाला सुमारे ₹ २९.२९ कोटी इतका निव्वळ नफा झाला. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची वित्तीय सांख्यिकीचा तपशील ९.२१ मध्ये दिला आहे. २०१०-११ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे एकूण उत्पन्न व खर्च यांचे प्रमाण मागील वर्षापेक्षा अनुक्रमे १३.९ टक्क्यांनी व १४.८ टक्क्यांनी जास्त होते. रा.प. महामंडळात शासकीय भाग भांडवल व प्रवासी कर दर तक्ता ९.२२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.२१ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची वित्तीय सांख्यिकी**

(₹ कोटी)

| तपशील | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|
| अ) प्राप्ती | | |
| प्रवासी महसूल | ४,२७४.१६ | ४,८४०.८६ |
| इतर महसूल | ९६.०० | १३८.८१ |
| एकूण प्राप्ती | ४,३७०.१६ | ४,९७९.६७ |
| ब) खर्च | | |
| प्रवासी कर व मोटार वाहने कर | ५९३.८२ | ६७१.५१ |
| घसारा | २१८.७२ | ३२९.१८ |
| इतर खर्च | ३,४८७.८४ | ३,९३७.९८ |
| एकूण खर्च | ४,३००.३८ | ४,९३८.६७ |
| नफा (अ - ब) | ६९.७८ | ४१.०० |
| मागील ताळमेळ | (+) ०.२४ | (-) ११.७१ |
| निव्वळ नफा | ७०.०२ | २९.२९ |

आधार : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ

**तक्ता ९.२२ शासनाचे भाग भांडवल व प्रवासी कर आकडेवारी**

| तपशील | ३१ मार्च रोजी | |
|---|---|---|
| | २०१० | २०११ |
| **शासनाचे भाग भांडवल** | | |
| अ) केंद्र शासन (₹ कोटी) | ५६.७७ | ५६.७७ |
| ब) राज्य शासन (₹ कोटी) | १,३४१.२१ | १,३४१.२१ |
| प्रवासी कराच्या रकमेमधून देय मिळणारे राज्य शासन भागभांडवल (₹कोटी) | १७६.०४ | ३७५.३७ |
| **प्रवासी कराचा दर** | | |
| अ) ग्रामीण वाहतूकीच्या प्रवासी उत्पन्नावर | १७.५ % | १७.५ % |
| ब) वातानुकुलित वाहतूकीच्या प्रवासी उत्पन्नावर | ५.५ % | ५.५ % |
| क) शहरीवाहतूकीच्या प्रवासी उत्पन्नावर | ३.५ % | ३.५ % |

आधार : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ

९.४५ राज्यातील खेड्यांना शक्य तितक्या जवळ सेवा पुरविणे हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे ध्येय आहे. खेड्यांसाठी सेवेची सुगमता आणि सेवा पुरविलेल्या लोकसंख्येची टक्केवारी यांची माहिती तक्ता ९.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ रा. प. महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली खेडी आणि लोकसंख्येची टक्केवारी**

| तपशील | सेवा पुरविण्यात आलेल्या खेडयांची टक्केवारी | | सेवा पुरविण्यात आलेल्या लोकसंख्येची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ |
| थेट | ६७.७७<br>(२८,१२१) | ७०.९९<br>(२९,४६५) | ८८.९२<br>(९५८.०३) | ८९.८८<br>(१,०२२.६५) |
| ३ कि.मी. पर्यंत | १९.७३<br>(८,१८९) | १८.९४<br>(७,८६०) | ७.०६<br>(७६.०८) | ६.५९<br>(७४.९५) |
| ३ कि.मी. ते ५ कि.मी. पर्यंत | ७.४२<br>(३,०७९) | ६.०७<br>(२,५२१) | २.४०<br>(२५.९०) | २.२०<br>(२५.०८) |
| ५ कि.मी. ते ८ कि.मी. पर्यंत | ३.२४<br>(१,३४६) | २.५५<br>(१,०६०) | १.०२<br>(११.०२) | ०.८५<br>(९.६७) |
| ८ कि.मी. च्या पुढे | १.८४<br>(७६२) | १.४४<br>(५९९) | ०.६०<br>(६.४०) | ०.४८<br>(५.४८) |

आधार : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ

कंसातील आकडे खेडयांची संख्या आणि लोकसंख्या लाखात दर्शवितात.

९.४६ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वाहनांच्या अपघातांची मागील पाच वर्षांची आकडेवारी तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२४ वाहनांच्या अपघातांची आकडेवारी व रा. प. महामंडळाकडून दिलेली भरपाई**

| तपशिल /वर्ष | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|
| अपघातांची संख्या | ३,२६९ | ३,४५० | ३,२२० | ३,२०४ | ३,४०७ |
| मृत व्यक्तीची संख्या | ४६८ | ४४९ | ५५३ | ४५८ | ५४७ |
| जखमी व्यक्तीची संख्या | ६,५०३ | ७,३७२ | ६,८४८ | ६,४१२ | ६,५२३ |
| दर लाख कि.मी. मागे अपघातांचा दर | ०.१९ | ०.१९ | ०.१८ | ०.१७ | ०.१८ |
| घटनास्थळी दिलेली रक्कम (₹ लाख) | २०.६२ | २६.२३ | २६.४८ | २५.४२ | ३१.६७ |
| अंतिम भरपाई (₹ लाख) | ३,३१२.७३ | ३,२२१.१९ | ३,०४०.९९ | ३,३१८.७९ | ३,५४९.२० |

आधार : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ

## शहरी प्रवासी वाहतूक

९.४७ शहरातील नागरिकांसाठी शहरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हे वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. राज्यातील २२ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी नऊ शहरांत (अर्नाळा, वसई, नालासोपारा, रत्नागिरी, सांगली-मिरज, चंद्रपूर, नाशिक, औरंगाबाद आणि नांदेड) रा.प. महामंडळ वाहतूक सेवा पुरविते. बृहन्मुंबईत बेस्ट, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि उर्वरित १० शहरात संबंधित महानगरपालिका वाहतूक सेवा पुरवितात. २०१०-११ मध्ये रा.प. महामंडळाच्या प्रतिदिन सरासरी ४३५ बसगाड्या वापरात होत्या, तर राज्यातील १३ स्थानिक महानगरपालिका परिवहन सेवांच्या प्रतिदिन सरासरी ७,३१३ बसेस वापरात होत्या. त्यापैकी फक्त बृहन्मुंबईत बेस्टच्या प्रतिदिन सरासरी ४,६५२ बसेस वापरात होत्या. या शहरी परिवहन सेवांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२५ राज्यातील शहर वाहतूक विषयक आकडेवारी**

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | वर्ष | वाहतूकीस मार्गस्थ असलेल्या बसेसची प्रतिदिन सरासरी संख्या | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख कि. मी.) | निव्वळ नफा/तोटा (₹ लाख) |
|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट) | २००९-१० | ४,०७८ | ४३.७१ | ६.९२ | (-) १३,२०७ |
| | २०१०-११ | ४,६५२ | ४२.०६ | ७.१६ | (-)१९,३५२ |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | २००९-१० | २८६ | १.९३ | ०.३६ | (-)१,१४८.१७ |
| | २०१०-११ | ३५० | २.३५ | ०.३९ | (-)१,३२८.३६ |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | २००९-१० | ८९ | ०.८० | ०.२१ | (-)१०३.१८ |
| | २०१०-११ | ६४ | ०.७१ | ०.१६ | (-)११३.२२ |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | २००९-१० | २८९ | २.२० | ०.६१ | (-)७०६.५७ |
| | २०१०-११ | ३७६ | २.६७ | ०.६४ | (-)६५२.७९ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | २००९-१० | ला.ना. | ०.५४ | ०.११ | ला.ना. |
| | २०१०-११ | ला.ना. | ०.५३ | ०.०८ | (-)२५३.०० |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ | २००९-१० | १,२३६ | ११.७२ | २.९७ | (-)४,०६९.८९ |
| | २०१०-११ | १,२३५ | १२.३६ | २.८३ | (-)१,३८७.१५ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | २००९-१० | ७८ | ०.५८ | ०.१८ | (-)१९७.९३ |
| | २०१०-११ | ६६ | ०.४१ | ०.१४ | (-)३७८.४८ |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | २००९-१० | १२५ | ०.७० | ०.३० | (-)१८६.११ |
| | २०१०-११ | १२३ | ०.९० | ०.३० | (-)१३२.६८ |
| औरंगाबाद महानगरपालिका परिवहन | २००९-१० | ७३ | ०.३५ | ०.११ | १४.०८ |
| | २०१०-११ | ७३ | ०.३५ | ०.११ | ६०.०० |
| नांदेड महानगरपालिका परिवहन | २००९-१० | १६ | ०.०४ | ०.०३ | ० |
| | २०१०-११^ | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | २००९-१० | २५ | ०.०१ | ०.०४ | १८.६३ |
| | २०१०-११ | २५ | ०.०२ | ०.०४ | १९.१० |
| अकोला महानगरपालिका परिवहन | २००९-१० | १४ | ०.०२ | ०.०३ | (-)१०.४८ |
| | २०१०-११ | १४ | ०.०३ | ०.०३ | (-)१२.२० |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २००९-१० | ३०५ | १.०० | ०.४ | (-)३६१.१७ |
| | २०१०-११ | ३३५ | १.३० | ०.५३ | (-)१८.४६ |
| रा.प. महामंडळ (शहर वाहतूक) | २००९-१० | ३८४ | २.७४ | ०.७९ | (-)१,५२४ |
| | २०१०-११ | ४३५ | ३.१६ | ०.९० | (-)२,०२२ |

*आधार :* संबंधित महानगरपालिका, बेस्ट, पुणे महानगर वाहतूक महामंडळ व रा.प. महामंडळ  ला.ना. - लागू नाही  ^ २०१०-११ पासून शहर बस सेवा रा.प. महामंडळ पुरविते.

## रेल्वे

९.४८ भारतीय रेल्वे हा भारतीय वाहतुक व्यवस्थेचा कणा असून त्याच्या ६५,२०२ कि.मी. लोहमार्गाच्या जाळयाद्वारे देशाच्या बहुतांश भागाशी जोडलेला आहे. ३१ मार्च, २०११ रोजी राज्यातील लोहमार्गाची एकुण लांबी ५,९८४ कि.मी. (३८२ कि.मी. कोकण रेल्वेसह) होती व ती भारतातील एकूण लोहमार्ग लांबीच्या ९.२ टक्के एवढी होती. गेल्या ५१ वर्षात राज्यातील लोहमार्गाची लांबी केवळ १८.४ टक्क्यांनी वाढली आहे. ही वाढ मुख्यत: कोकण रेल्वेमुळे आहे. रेल्वेने हाती घेतलेल्या कामांमध्ये बहुतांश कामे मीटरगेज (१ मी.) आणि नॅरोगेज (०.७६२ मी./०.६१० मी.) लोहमार्गाचे ब्रॉडगेज (१.६७६ मी.) मध्ये रूपांतर करण्यासंबंधीची होती. ३१ मार्च, २०११ रोजी राज्यात लोहमार्गाच्या लांबीचे (कोंकण रेल्वेसह) प्रति १,००० चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्रामागे प्रमाण देशाच्या १९.८३ कि.मी. च्या तुलनेत १९.४३ कि.मी. होते. राज्यात चालू असलेल्या रेल्वेच्या कामांची डिसेंबर, २०११ अखेरची स्थिती तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२६ राज्यात चालू असलेली रेल्वेची कामे**

| मार्गाचे नांव | मार्गाची लांबी (कि.मी.) | एकूण अंदाजित किंमत (₹ कोटी) | सद्यःस्थिती (३१ डिसेंबर, २०११ रोजी) |
|---|---|---|---|
| अमरावती - नरखेड (नवीन मार्ग) | १३८ | ५४८.९५ | काम सुरू असून, ते २०१२-१३ पर्यत पूर्ण होणे अपेक्षित आहे. भौतिक प्रगती ९५ टक्के. |
| अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ (नवीन मार्ग) | २६१.२५ | ४६२.६७ | काम सुरु असुन, ते मार्च, २०१४ पर्यत पूर्ण होणे अपेक्षित आहे. भौतिक प्रगती ८५ टक्के. |
| बारामती - लोणंद (नवीन मार्ग) | ५४ | १३८.४८ | काम सुरू असून भौतिक प्रगती ४९.२ टक्के. |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्ग) | २७ | ४९५.४४ | काम सुरू असून भौतिक प्रगती १७ टक्के. |
| वर्धा - नांदेड (नवीन मार्ग) | २७० | ६९७.२० | काम सुरू असून, भौतिक प्रगती २ टक्के. |
| पनवेल - पेण (दुपदरीकरण) | ३५.४६ | ९९.३८ | काम सुरू असून, ते नजिकच्या भविष्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. भौतिक प्रगती ५७.५ टक्के. |
| पेण - रोहा (दुपदरीकरण) | ४० | २०४.२८ | काम सुरु असून भौतिक प्रगती ३०.९ टक्के. |
| पनवेल - रोहा (दुपदरीकरणाकरिता भूसंपादन) | ७५.४४ | १७.३२ | काम सुरू असून, ते नजिकच्या भविष्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| गोधाणी - कलूमना कॉर्ड (दुपदरीकरण) | १३.७ | ५९.१३ | नविन काम २०१०-२०११. |

*आधार :* दक्षिण पूर्व, मध्य, दक्षिण मध्य व पश्चिम रेल्वे आणि कोंकण रेल्वे महामंडळ,

९.४९ पंढरपूर मिरज विभाग (१५७ कि.मी.) आणि कुर्ला - ठाणे (अतिरिक्त ५ वी आणि ६ वी लाईन) (१७कि.मी.) टप्पा १ : कुर्ला - भांडुप व टप्पा २ : भांडुप - ठाणे काम एप्रिल २०११ मध्ये पूर्ण झाले असून रहदारीसाठी मार्ग खुला झाला आहे.

## मुंबई उपनगर रेल्वे

९.५० भौगोलिक दृष्टीने पसरलेली लोकसंख्या व व्यापारी क्षेत्रांची जागा यामुळे रेल्वे हे मुंबई मध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा पश्चिम रेल्वे (३६ स्थानके) आणि मध्य रेल्वे (६२ स्थानके) या दोन क्षेत्रीय रेल्वेद्वारे चालविली जाते. हार्बर मार्ग (३८ स्थानके) हा मध्य रेल्वेचाच भाग आहे. मुंबई उपनगरीय रेल्वे ही ४६५ कि.मी मार्गावरुन मुंबई महानगर प्रदेशासाठी सेवा पुरविते. उपनगरीय सेवा वीज बहुविध (इएमयु) संचाव्दारे चालविली जाते. दर दिवशी ९ डब्यांच्या, १२ आणि १५ डब्यांच्या मिळून १९१ गाडया २,३४२ फेऱ्यांद्वारे ६.९४ दशलक्ष प्रवाश्यांची ने-आण करतात. याची प्रवासी घनता जगातील सर्व रेल्वे यंत्रणेच्या प्रवासी घनतेमध्ये सर्वाधिक आहे. उपनगरीय रेल्वे यंत्रणा १,५०० व्होल्ट डिसी / २५,००० व्होल्ट एसी वीज प्रवाहावर उर्ध्वगामी वीज वाहक तारांव्दारे चालविली जाते.

९.५१ पश्चिम रेल्वे विभागाने फेब्रुवारी, २०१२ मध्ये चर्चगेट ते विरार स्थानकां दरम्यान १,५०० डिसी व्होल्ट ते २५,००० एसी व्होल्ट वीज प्रवाहाचे परिवर्तन पूर्ण केले आहे. हया परिवर्तनामुळे पश्चिम रेल्वेचा उपनगरीय विभाग पूर्वीपासून एसी वीज प्रवाहावर चालणाऱ्या देशाच्या उर्वरित भागाच्या यंत्रणेत सम्मिलित झाला आहे. यामुळे मालाची व प्रवासी गाडयांची वाहतूक एकसंध झाली आहे. या परिवर्तनामुळे रेल्वे गाडया वेगवान, सुरळीत आणि अधिक कार्यक्षम झाल्या असून देखरेखीची कमी आवश्यकता राहील व उर्जेची बचत होईल.

### भविष्यातील विस्तार

९.५२ नजीकच्या भविष्यात नवी मुंबईत १८० कि.मी. चा १४,००० कोटी अंदाजित किंमतीचा रेल्वे मार्ग तयार करणे अपेक्षित आहे. प्रस्तावित मार्ग याप्रमाणे आहेतः सीएसटी -पनवेल वेगवान मार्ग (६० कि.मी.), पनवेल-जिते-थल (६०.९ कि.मी.), रेवस बंदर (१०.६ कि.मी.), पनवेल-कर्जत (२७.६ कि.मी.), पनवेल- उरण (२६.९ कि.मी.), खारकोपर-जिते (२२.९ कि.मी.), रंजनपाडा- सीवुड (१३.९ कि.मी.), थल-अलिबाग (५.४ कि.मी.) आणि ठाणे- भिंवडी (१२.५ कि.मी.). मुंबई शहर वाहतूक प्रकल्प-II च्या अंतर्गत, मुंबई रेल्वे विकास महामंडळाद्वारे हार्बर मार्ग गोरेगाव पर्यंत वाढविण्याची योजना असून २०१४ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. मुंबई शहर वाहतूक प्रकल्प-III च्या अंतर्गत हार्बर मार्ग बोरीवली पर्यंत वाढविण्यात येणार आहे.

# जलवाहतूक

## मोठी बंदरे

९.५३ राज्यातील ७२० कि.मी. लांबीच्या किनारपट्टीवर मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी) व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) ही दोन मोठी बंदरे आहेत. जवाहरलाल नेहरू बंदर हे देशातील सर्वात मोठे कन्टेनर वाहतूक करणारे बंदर आहे आणि आंतरराष्ट्रीय कन्टेनर वाहतूक करणा-या प्रमुख १०० बंदरात २४ व्या स्थानावर आहे. २०११-१२ मध्ये (डिसेंबर, २०११ पर्यंत) एमबीपीटी व जेएनपीटी यांनी अनुक्रमे ४०२.१७ व ४९४.७८ लाख टन सागरी मालाची वाहतूक केली. एमबीपीटीचा वर्ष २०१०-११ चा कार्यन्वयीन आधिक्य ₹ १८०.१६ कोटी होता जो मागील वर्षापेक्षा ३ टक्क्यांनी अधिक होता. जेएनपीटीचा वर्ष २०१०-११ साठी कार्यान्वयीन नफा ₹ ६७८.१८ कोटी होता जो मागील वर्षापेक्षा ४.६ टक्क्यांनी अधिक होता. या मोठया बंदरांची २००९-१० व २०१०-११ ची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | एमबीपीटी | | शेकडा बदल | जेएनपीटी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | | २००९-१० | २०१०-११ | |
| एकूण माल वाहतूक क्षमता (लाख टन) | ४९७.०० | ४८७.०० | (-)२.० | ६०७.६३ | ६४३.१७ | ५.८ |
| कर्मचारी संख्या | १४,०५९ | १३,३९१ | (-)४.८ | १,७३९ | १,७३० | (-)०.५ |
| माल वाहतूक (लाख टन) | | | | | | |
| अ) आयात | ३५३.५७ | ३६७.५५ | ३.९ | ३१६.१ | ३२७.८४ | ३.७ |
| ब) निर्यात | १९१.८४ | १७८.३० | (-)७.१ | २७५.८ | ३०१.८४ | ९.४ |
| क) एकूण | ५४५.४१ | ५४५.८५ | ०.१ | ५९१.९ | ६२९.६८ | ६.४ |
| प्रवासी वाहतूक (हजारात) | ६४.४० | १६.०१ | (-)७५.१ | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| बंदरात आलेल्या बोटींची संख्या | ५,८३० | ५,६२२ | (-)३.६ | ३,०८० | ३,१२८ | १.८ |
| परिचालन उत्पन्न (₹ कोटी) | ८९५.१४ | ९५५.०७ | ६.७ | १,०४२.०६ | १,१२२.६४ | ७.७ |
| परिचालन खर्च (₹कोटी) | ७२०.२२ | ७७४.९१ | ७.६ | ३९३.७० | ४४४.४६ | १२.९ |
| परिचालन आधिक्य / नफा (₹कोटी) | १७४.९२ | १८०.१६ | ३.० | ६४८.३६ | ६७८.१८ | ४.६ |

*आधार* :एमबीपीटी व जेएनपीटी ला.ना. : लागू नाही

## लहान बंदरे

९.५४ राज्य शासनाने राज्यातील ४८ लहान बंदरे खाजगी क्षेत्राच्या सहभागाद्वारे बांधा-मालकीचा करा-वापरा-भागीदारी करा-हस्तांतरीत करा या पध्दतीने विकसित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात दिघी, रेवस-आवरे (जिल्हा-रायगड), धामणखोल-जयगड, लवगण-जयगड (जिल्हा-रत्नागिरी) आणि विजयदुर्ग, रेडी (जिल्हा-सिंधुदुर्ग) ही सहा लहान बंदरे महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड विकसित करणार आहे. या सहा बंदरांपैकी धामणखोल-जयगड हे बंदर कार्यान्वित झाले आहे. दिघी बंदराच्या पहिल्या दोन धक्क्यांचे काम पूर्ण झाले असून वापरासाठी तयार आहे. लवगण-जयगड या बंदराच्या माल धक्क्याचे काम वर्ष २०१२ च्या पहिल्या तिमाहीत पूर्ण होणे अपेक्षित आहे. रेवस-आवरे, विजयदुर्ग आणि रेडी बंदरांच्या बांधकामाची पूर्व तयारी प्रगती पथावर आहे. याशिवाय लहान बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय थांबे असून तेथे देखील मालाची वाहतूक केली जाते. सर्व लहान बंदरांनी मिळून सप्टेंबर, २०११ पर्यंत ८०.७३ लाख टन माल वाहतूक आणि ७८.८३ लाख प्रवासी वाहतूक केली आहे. लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २००९-१० | २०१०-११ | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख टन)** | | | |
| अ) आयात | १११.७३ | १२४.९५ | ११.८३ |
| ब) निर्यात | १३.३७ | २३.७९ | ७७.९४ |
| **एकूण** | **१२५.१०** | **१४८.७४** | **१८.९०** |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | | | |
| अ) यांत्रिकी बोटीतून | १४९.५६ | १४४.५३ | (-) ३.३६ |
| ब) बिगर - यांत्रिकी बोटीतून | १९.१५ | २२.८१ | १९.११ |
| **एकूण** | **१६८.७१** | **१६७.३४** | **(-) ०.८१** |

*आधार* : महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड

## विमान वाहतूक

९.५५ राज्यात तीन आंतरराष्ट्रीय व पाच देशांतर्गत विमानतळे आहेत. या विमानतळांवरून करण्यात येणाऱ्या प्रवासी व मालवाहतुकीबाबतचा तपशील तक्ता ९.२९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.२९ विमानतळनिहाय प्रवासी व माल वाहतूक**

(३१ मार्च रोजी)

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | माल वाहतूक (टन) | |
|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | २०१० | २०११ |
| **देशांतर्गत** | | | | |
| मुंबई | १७३.७२ | १९९.९५ | १,७४,१८४ | १,९९,८३१ |
| पुणे | २२.१० | २७.५२ | १७,८४५ | २७,८२८ |
| नागपूर | ७.६३ | ११.९९ | ४,७१७ | ९,१४५ |
| औरंगाबाद | २.१९ | २.६६ | १,२४७ | १,८४१ |
| कोल्हापूर | ०.२६ | ०.०६ | ० | ० |
| **एकूण** | **२०५.९२** | **२४२.२०** | **१,९७,९९३** | **२,३८,६४५** |
| **आंतरराष्ट्रीय** | | | | |
| मुंबई | ७८.५४ | ८७.४८ | ४,०८,४५२ | ४,७०,४०२ |
| नागपूर | ०.५१ | ०.३७ | २७९ | ३४६ |
| पुणे | ०.४१ | ०.५६ | ० | ० |
| **एकूण** | **७९.४६** | **८८.४१** | **४,०८,७३१** | **४,७०,७४८** |

*आधार :* भारतीय विमानतळ प्राधिकरण

९.५६ राज्य शासनाने विशेष उद्देश कंपनी म्हणून सन २००२ मध्ये, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (एमएडीसी) स्थापन केली आहे. नागपूर येथील बहुआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळ (मिहान) व नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ, हे प्रकल्प एमएडीसी मार्फत कार्यान्वित होत आहेत. 'मिहान' प्रकल्पामध्ये नागपूर येथील विमानतळाला आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळामध्ये विकसित करण्याचा समावेश आहे. प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेसाठी विमानतळालगत एका बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्राचा देखील विकास करण्यात येत आहे. एमएडीसी मार्फत महाराष्ट्रातील सोलापूर, शिर्डी, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, जळगाव अशी इतर अनेक विमानतळे आणि राजगुरुनगर (नवीन चाकण, जि.पुणे) येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्यात येत आहे.

९.५७ मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे अतिरिक्त विमानतळ उभारण्याचे प्रस्तावित असून प्रकल्पाची एकूण किंमत ₹ १४,५०० कोटी आहे. विमानतळ विकासासाठी एकूण नियोजित क्षेत्र २,०४२ हेक्टर आहे, त्यापैकी १,३०६ हेक्टर क्षेत्र (६४ टक्के) सिडकोच्या ताब्यात आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) रिलायन्स विमानतळ प्राधिकरणास ९५ वर्षाच्या भाडे कराराने विकास, सुधारणा, कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखरेख करण्यासाठी नोव्हेंबर २००९ पासून राज्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, यवतमाळ आणि बारामती ही पाच विमानतळे दिली आहेत. बारामती, यवतमाळ आणि उस्मानाबाद या विमानतळावरून केवळ अनियोजित विमानांची वाहतूक होते. नांदेड आणि लातूर या विमानतळावरून दोन्ही नियोजित आणि अनियोजित विमानांची वाहतूक होते. नांदेड विमानतळावरून वर्ष २०११ मध्ये ५९,३२८ प्रवासी आणि १,३२२ किलो मालाची वाहतूक झाली आहे.

९.५८ हलकॉन या हिंदुस्तान ऐरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) आणि कंटेनर कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांच्या संयुक्त कार्यकारी गटासह टर्मिनल ऑपरेटर क्ल्यॉरिऑन सोल्युशन यांनी ओझर विमानतळ, नाशिक येथे विमान मालवाहतूक सेवेस सप्टेंबर, २०११ पासून सुरुवात केली आहे. ओझर विमानतळ हे केवळ हवाई माल वाहतुकीसाठी कार्यरत असून त्यामुळे मुंबई विमानतळावरील माल वाहतूकीचा ताण कमी झाला आहे तसेच फलोत्पादने, औषधे, ऑटोमोबाईल इंजिनिअरींग आणि जलद उपभोग्य वस्तू इ. उत्पादनांची आयात - निर्यात करणाऱ्या व्यापारी क्षेत्रास वाजवी दरात विमानतळ उपलब्ध झाले आहे.

## दळणवळण

९.५९ दळणवळण प्रणालीमध्ये टपाल, तार, दुरध्वनी, आणि ध्वनी, दृक व माहिती दूरसंचार यांचा समावेश असलेली अत्याधुनिक संपर्क व्यवस्था हा विकास प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग आहे. डाक सेवेबाबतची आकडेवारी तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

९.६० खाजगी क्षेत्राच्या सहभागाने सपंर्क व्यवस्थेच्या क्षेत्रात वेगाने वाढ होत आहे. राज्यात खाजगी क्षेत्रातील चालकांचा भ्रमणध्वनी बाजारातील वाटा ९१.७ टक्के आहे तर दोन पीएसयु चालक बीएसएनएल आणि एमटीएनएल यांचा संयुक्त वाटा ८.३ टक्के आहे. ३ जी सेवा आणि भ्रमणध्वनी क्रमांक पोर्टेबिलिटी या क्षेत्रातील नवीन सुधारणा आहे.

९.६१ डिसेंबर, २०११ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ५६.६९ लाख होती. राज्यात दर लाख लोकसंख्येमागे डिसेंबर, २०११ अखेर भ्रमणध्वनी धारकांची संख्या ९४,१८१ होती. मंडल/चालकनिहाय दुरध्वनी जोडण्यांची व भ्रमणध्वनी धारकांची आकडेवारी तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० डाक सेवेबाबतची आकडेवारी**

( संख्या )

| बाब | क्षेत्र | २००९-१० | २००९-१० |
|---|---|---|---|
| डाक कार्यालये | ग्रामीण | ११,५२४ | ११,५३८ |
| | नागरी | १,३२९ | १,३२२ |
| | एकूण | १२,८५३ | १२,८६० |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ४२,६५५ | ४२,६६० |
| | नागरी | ९,९२९ | ९,८९२ |
| | एकूण | ५२,५८४ | ५२,५५२ |
| डिलिव्हरी पोस्टमन | ग्रामीण* | २०,७१९ | १९,५३९ |
| | नागरी | ७,३६० | ७,४०५ |
| | एकूण | २८,०७९ | २६,९४४ |

*आधार :* मुख्य डाक कार्यालय, मुंबई
* डाकसेवकांची संख्या मिळवून

**तक्ता ९.३१ दूरध्वनी व भ्रमणध्वनी धारक**

(संख्या लाखात)

| चालक | दूरध्वनी / भ्रमणध्वनी | दूरध्वनी व भ्रमणध्वनी धारक | | |
|---|---|---|---|---|
| | | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२+ |
| एमटीएनएल | दूरध्वनी | १९.५९ | १९.१७ | १८.९९ |
| | भ्रमणध्वनी | २६.९० | २८.३५ | २८.९८ |
| बीएसएनएल | दूरध्वनी | २६.९७ | २४.८२ | २२.७३ |
| | भ्रमणध्वनी | ४९.९४ | ६८.६६ | ५९.०४ |
| भारती | दूरध्वनी | ३.६७ | ४.०० | ४.०० |
| | भ्रमणध्वनी | ९६.७४ | ११८.९९ | १३०.२४ |
| बीपीएल | भ्रमणध्वनी | २८.४५ | ३०.९२ | ३२.३१ |
| आयडीया | भ्रमणध्वनी | १०८.९४ | १४८.२२ | १७५.७४ |
| रिलायन्स | दूरध्वनी | २.७२ | ३.१६ | ३.३० |
| | भ्रमणध्वनी | १२९.२५ | १६५.६३ | १९३.७५ |
| टाटा | दूरध्वनी | ६.६० | ७.२९ | ७.६६ |
| | भ्रमणध्वनी | १२३.४१ | १६१.२३ | १४७.८१ |
| व्होडाफोन | भ्रमणध्वनी | १२२.८३ | १७०.१६ | १८६.६८ |
| एअरसेल-डिशनेट | भ्रमणध्वनी | १२.७४ | २१.३७ | २३.५९ |
| सिस्टिमा शाम टेलिसर्व्हिसेस | भ्रमणध्वनी | ०.०८ | १०.६६ | १४.१३ |
| व्हिडिवोकॉन | भ्रमणध्वनी | ---- | १३.१३ | ९.१७ |
| इस्टीसॅलेट | भ्रमणध्वनी | ---- | २.३६ | ४.९९ |
| यूनिटेक | भ्रमणध्वनी | ---- | २८.१६ | ---- |
| युनिनॉर | भ्रमणध्वनी | ---- | ---- | ५१.९१ |
| **एकूण** | **दुरध्वनी** | **५९.५५** | **५८.४५** | **५६.६९** |
| | **भ्रमणध्वनी** | **७००.००** | **९६७.८४** | **१,०५८.३४** |

*आधार :* एमटीएनएल, बीएसएनएल व टेलिफोन रेग्यूलेटरी अँथॉरिटी ऑफ इंडिया + डिसेंबर २०११ पर्यंत

९.६२ भारतात इंटरनेट (२५६ किलो बाईटस प्रति सेकंद पेक्षा कमी) व ब्रॉडबॅन्ड (२५६ किलो बाईटस प्रति सेकंद पेक्षा जास्त) वापरणाऱ्यांची सर्वाधिक संख्या महाराष्ट्र राज्यात असून ती ३१ मार्च, २०११ पर्यंत अनुक्रमे १४.९३ लाख व २२.८८ लाख होती. डिसेंबर २०११ पर्यंत भ्रमणध्वनी वापरणाऱ्यांपैकी ३३.३६ लाख भ्रमणध्वनी धारकांनी वापरत असलेल्या चालकाशिवाय दुसऱ्या चालकाव्दारे सेवा पुरविण्यासाठी विनंती केली आहे. त्यापैकी १०.२३ लाख लोकांच्या विनंती मुंबईतून आहेत.

**आलेख ९.८ : भ्रमणध्वनी धारक व दुरध्वनी धारक**




टीप :उजव्या बाजूचा Y- अक्ष भ्रमणध्वनी धारक (लाखात) दर्शवितो.

* * * * *

## परिशिष्ट ९.१
## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. स्थापित क्षमता (मेगॉवॅट)** | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | |
| (१) औष्णिक | ४४३ | १,०५१ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ |
| (२) अक्षय उर्जा | --- | --- | --- | --- | --- | ३,४०८ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,३६६ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | --- | --- | --- | ६७२ | १,८२० | २,७१४ |
| (५) बंदिस्त (कॅप्टीव्ह) वीज | --- | --- | --- | --- | --- | उ.ना. |
| (६) तेलजन्य | ३४ | १४ | नगण्य | नगण्य | नगण्य | --- |
| **एकूण (अ-१) ..** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१९,१५३** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | |
| (१) राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २,०४८@ | ४,६८६ |
| (२) अणुशक्ती महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १३७ | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **२,१८५** | **५,३७६** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,५२९** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिटस्)** | | | | | | |
| (१) औष्णिक | १,८३५ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ |
| (२) नैसर्गिक वायुजन्य | --- | --- | --- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ |
| (४) अक्षय उर्जा | --- | --- | --- | --- | --- | ५,११८ # |
| (५) बंदिस्त (कॅप्टीव्ह) वीज | --- | --- | --- | --- | --- | उ.ना. |
| (६) तेलजन्य | ६८ | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | --- |
| **एकूण . .** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९ #** | **८३,०१७** |
| **क. वापर (दशलक्ष युनिटस्)** | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४७ |
| (३) कृषि | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५७१ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,७०७ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ.ना. | १,१९९ | १,४६४ |
| (७) सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ |
| (८) संकीर्ण | --- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ५८९ |
| **एकूण . .** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९७** |
| **ड. दरडोई विजेचा वापर (युनिटस्)** | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०३.३ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार, नवी दिल्ली.
(२) पश्चिम विभागीय उर्जा समिती, मुंबई (डब्लू.आर.पी.सी.)
(३) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मुंबई. (महानिर्मिती)
(४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मुंबई. (महावितरण)
(५) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट)
(६) टाटा पॉवर
(७) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर
(८) रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट मर्या. (आर.जी.पी.पी.एल.)
(९) जेएसडब्लू एनर्जी
(१०) वर्धा पॉवर कंपनी, मर्या. (डब्लू.पी.सी.एल.)
(११) डॉडसन लिंडब्लूम हायड्रो पॉवर (डी.एल.एच.पी.)

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.
(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.
(३) # यात बंदिस्त वीज व अक्षय उर्जेची आकडेवारी समाविष्ट आहे.
(४) १ युनिट = एक किलो वॅट तास
उ.ना. उपलब्ध नाही

## परिशिष्ट ९.२
## महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी
(सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)

(किलोमीटरमध्ये)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | राज्य महामार्ग | रस्ते | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | १९९५-९६ | २,९५८ | ३२,२५९ | ४०,५१४ | ४०,७३३ | ६८,८२९ | १,८५,२९३ |
| ६ | २०००-०१ | ३,६८८ | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ७ | २००५-०६ | ४,३६७ | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ८ | २००६-०७ | ४,३६७ | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ९ | २००७-०८ | ४,३६७ | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| १० | २००८-०९ | ४,३६७ | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| ११ | २००९-१० | ४,३७६ | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| १२ | २०१०-११ | ४,३७६ | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - (१) ग्रामीण रस्त्यांमध्ये अवर्गीकृत रस्त्यांचा समावेश आहे.

(२) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकासयोजनेनुसार केली आहे .

## परिशिष्ट ९.३

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील जिल्हानिहाय साध्य केलेली रूंदीनुसार रस्त्यांची लांबी

(कि.मी.)

| अ.क्र.. | जिल्हा / रूंदी (मीटर) | साध्य लांबी २०१० | | | | | साध्य लांबी २०११ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ७.० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | ७.० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ० | ० | ० | ४९ | ४९ | ० | ० | ० | ४९ | ४९ |
| २ | ठाणे | ३८१ | ७८१ | ५,१८४ | ५७४ | ६,९२० | ३८१ | ७८१ | ५,१८५ | ८१५ | ७,१६२ |
| ३ | रायगड | ४९६ | ५६८ | ४,१६१ | १४३ | ५,३६८ | ४९६ | ५६८ | ४,१६१ | १४४ | ५,३६९ |
| ४ | रत्नागिरी | ३७३ | २७७ | ६,५७८ | ९५ | ७,३२३ | ३७३ | २७७ | ६,५७८ | ९५ | ७,३२३ |
| ५ | सिंधुदुर्ग | १२९ | २७२ | ५,७८० | ० | ६,१८१ | १२९ | २७२ | ५,७८० | ० | ६,१८१ |
| | **कोकण** | **१,३७९** | **१,८९८** | **२१,७०२** | **८६१** | **२५,८४१** | **१,३७९** | **१,८९८** | **२१,७०४** | **१,१०३** | **२६,०८४** |
| ६ | पुणे | ६८७ | ९५२ | १२,२३१ | २३९ | १४,१०९ | ६८७ | ९५२ | १२,१९८ | २३९ | १४,०७६ |
| ७ | सातारा | १६४ | ८२७ | ७,२५३ | १,८०३ | १०,०४७ | १६४ | ८३२ | ७,२५७ | १,७९४ | १०,०४७ |
| ८ | सांगली | ३६२ | १,४१३ | ७,१७९ | ४३ | ८,९९७ | ३६२ | १,४१३ | ७,२१२ | ४३ | ९,०३० |
| ९ | कोल्हापुर | २८६ | १,५५९ | ५,२५७ | ४६ | ७,१४८ | २८६ | १,५५८ | ५,२५६ | ३०६ | ७,४०७ |
| १० | सोलापूर | १,२१५ | ८६३ | ११,२०२ | ५२ | १३,३३२ | १,२१५ | ८६३ | ११,२०२ | ५२ | १३,३३२ |
| | **पश्चिम महाराष्ट्र** | **२,७१४** | **५,६१४** | **४३,१२२** | **२,१८३** | **५३,६३३** | **२,७१४** | **५,६१८** | **४३,१२५** | **२,४३४** | **५३,८९२** |
| ११ | अहमदनगर | ८६६ | १,९०२ | ९,१८७ | ९३३ | १२,८८८ | ८६६ | १,९२० | ९,१६९ | ९३३ | १२,८८८ |
| १२ | नाशिक | ३४१ | ८८१ | १२,२८८ | ६६४ | १४,१७४ | ३४१ | ८८१ | १२,२८८ | ६६४ | १४,१७४ |
| १३ | धुळे | ३०९ | ३८९ | ४,६२२ | ११८ | ५,४३८ | ३०९ | ३९८ | ४,६१३ | ११८ | ५,४३८ |
| १४ | नंदुरबार | १७० | ४४८ | ४,०५४ | ० | ४,६७२ | १७० | ४४८ | ४,०५४ | ० | ४,६७२ |
| १५ | जळगाव | २७९ | ७८४ | ७,०८७ | १,९२८ | १०,०७८ | २७९ | ९७० | ६,९०२ | १,९२७ | १०,०७८ |
| | **उत्तर महाराष्ट्र** | **१,९६५** | **४,४०४** | **३७,२३८** | **३,६४३** | **४७,२५०** | **१,९६५** | **४,६१७** | **३७,०२६** | **३,६४२** | **४७,२५०** |
| १६ | औरंगाबाद | ४७७ | ६८३ | ६,९८० | १,६८३ | ९,८२३ | ४७७ | ६८३ | ७,२८८ | १,३७५ | ९,८२३ |
| १७ | जालना | २४४ | ६३१ | ३,७९१ | ८ | ४,६७४ | २४४ | ६३१ | ३,७९१ | ८ | ४,६७४ |
| १८ | परभणी | १६५ | ४४१ | १,८४५ | २,००७ | ४,४५८ | १६५ | ४४१ | १,९२४ | २,१०७ | ४,६३७ |
| १९ | हिंगोली | ११९ | ४१४ | १,४०९ | १,१५४ | ३,०९६ | ११९ | ४१४ | १,४०९ | १,२३८ | ३,१८० |
| २० | बीड | ४३८ | ५३७ | ४,६३० | ४,५९७ | १०,२०२ | ४३८ | ५५५ | ४,६१२ | ४,५९७ | १०,२०२ |
| २१ | नांदेड | ७०० | ७४९ | ६,३०२ | १,६९४ | ९,४४५ | ७०० | ७४९ | ६,३०२ | १,६९४ | ९,४४५ |
| २२ | उस्मानाबाद | ३६४ | ७९६ | ४,४२१ | २२२ | ५,८०३ | ३६४ | ७९६ | ४,४५७ | १८६ | ५,८०३ |
| २३ | लातूर | ३५४ | ७९२ | ४,४३९ | ११९ | ५,७०४ | ३५४ | ७९२ | ४,४३९ | ११९ | ५,७०४ |
| | **मराठवाडा** | **२,८६१** | **५,०४३** | **३३,८१७** | **११,४८४** | **५३,२०५** | **२,८६१** | **५,०६१** | **३४,२२२** | **११,३२४** | **५३,४६८** |
| २४ | बुलढाणा | ३१३ | ६८० | ३,६७१ | ७३ | ४,७३७ | ३१५ | ६८० | ३,६७० | ७४ | ४,७३९ |
| २५ | अकोला | २४३ | ३८३ | २,१७८ | १८ | २,८२२ | २४३ | ४०८ | २,१५३ | १८ | २,८२२ |
| २६ | वाशिम | १६९ | ४६४ | २,५३० | ७ | ३,१७० | १६९ | ४६४ | २,५३० | ७ | ३,१७० |
| २७ | अमरावती | ४५५ | ७८२ | ५,३९७ | ६४ | ६,६९८ | ४५५ | ८०८ | ५,३७१ | ६४ | ६,६९८ |
| २८ | यवतमाळ | ५५८ | ७५७ | ५,८६५ | १४५ | ७,३२५ | ५५८ | ७५७ | ५,८६६ | १४५ | ७,३२६ |
| | **अमरावती** | **१,७३८** | **३,०६६** | **१९,६४२** | **३०७** | **२४,७५३** | **१,७४०** | **३,११७** | **१९,५९०** | **३०८** | **२४,७५५** |
| २९ | वर्धा | २१७ | ३५४ | ३,००१ | ४७१ | ४,०४३ | २१७ | ३५४ | ३,००१ | ४७१ | ४,०४३ |
| ३० | नागपूर | ५६८ | ५११ | ६,२८२ | ३५७ | ७,७१८ | ५६८ | ५११ | ६,४७२ | ३५७ | ७,९०८ |
| ३१ | भंडारा | ९२ | ३३८ | ३,३७४ | ४९५ | ४,२९९ | ९२ | ३३८ | ४,१०६ | ६३ | ४,५९९ |
| ३२ | गोंदिया | ४२ | ३०७ | ३,५८३ | १,२०४ | ५,१३६ | ४२ | ३०७ | ५,०४६ | १५४ | ५,५४९ |
| ३३ | चंद्रपुर | ४०१ | ४९३ | ५,७२६ | ९८० | ७,६०० | ४०१ | ४९३ | ५,७६८ | ९३८ | ७,६०० |
| ३४ | गडचिरोली | २१४ | ५३९ | ४,७७९ | १,०३२ | ६,५६४ | २१४ | ५३९ | ४,७७९ | १,०३२ | ६,५६४ |
| | नागपूर | **१,५३४** | **२,५४२** | **२६,७४५** | **४,५३९** | **३५,३६०** | **१,५३४** | **२,५४२** | **२९,१७२** | **३,०१५** | **३६,२६३** |
| | **महाराष्ट्र** | **१२,१९१** | **२२,५६७** | **१,८२,२६६** | **२३,०१७** | **२,४०,०४०** | **१२,१९३** | **२२,८५४** | **१,८४,८३९** | **२१,८२६** | **२,४१,७१२** |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

## परिशिष्ट ९.४
## महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१२* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | १,३४,७७,२०६ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स् | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | २६,१३,८४० |
| ३ | टॅक्सी कॅबज् | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | १,८१,०२५ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | ६,५५,१४२ |
| ५ | स्टेज कॅरेजेस् | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ३५,३३० |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस् | . . | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ३४,६०७ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | ९,६४,४८५ |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | ८३,४५० |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | १०,०९३ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | ८,५५८ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | ८,६९० |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर ) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ३,०७,७७६ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ४,१३,८५९ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | ३३,१४३ |
| | **एकूण** | **३,११,६६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०५४** | **१,६९,८९,६५९** | **१,८८,२७,२०४** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | १६,७५८ |
| | दर चौ. कि. मी. रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | ७८ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | ८.९ |

*आधार* - परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी

टीप - वरील आकडे दर वर्षीच्या १ जानेवारीचे आहेत.

# १०

# सामाजिक क्षेत्र



# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ विकसनशील आणि उदयास येत असलेल्या अर्थव्यवस्थेत सामाजिक क्षेत्र महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सर्वसमावेशक वाढ व सामाजिक क्षेत्राचा जलद विकास असमानता झपाट्याने दूर करेल. सामाजिक क्षेत्राच्या विकासात राज्याने ठोस प्रगती केली आहे. सर्वसमावेशक वाढीस पूरक असलेल्या सामाजिक विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यात शिक्षणातील गुंतवणुकीची प्रमुख भूमिका आहे. उत्तम प्रशासन आणि जनतेच्या सहभागातून गुणात्मक सेवा सामाजिक क्षेत्राच्या विकासामध्ये सर्वोत्तम परिणाम घडवून आणतील.

## शिक्षण

१०.२ शिक्षण हा सर्वसमावेशक वाढ होण्यासाठी एक प्रमुख घटक असून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. शिक्षण सेवा देण्यात तंत्रज्ञानाचा वापर आणि शैक्षणिक क्षेत्रातील तंत्रज्ञान हस्तक्षेपास प्रोत्साहन यामुळे दर्जेदार शिक्षणसेवासह गरीबांना, विशेषत: समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या संधीही सहज उपलब्ध होतील. दर्जेदार मूलभूत शिक्षणामुळे सामाजिक आणि प्रादेशिक असमतोल कमी होवून त्याद्वारे संतुलित वाढ व विकास साध्य होईल. ‘बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९’ अन्वये मूलांना आठ वर्षे मूलभूत दर्जेदार शिक्षणाची मागणी करणे सुलभ होईल. वर्ष २०१०-११ मध्ये राज्याचा शिक्षणावरील खर्च स्थुलराज्य उत्पन्नाच्या २.९ टक्के होता.

## शालेय शिक्षण

१०.३ प्राथमिक आणि उच्च प्राथमिक असे घटक असलेले मूलभूत शिक्षण हे शिक्षण पध्दतीच्या मनोऱ्याचा पाया असून सर्व शिक्षा अभियानाच्या (स.शि.अ.) माध्यमाद्वारे हा पाया राज्यात चांगल्याप्रकारे प्रस्थापित झाला आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण या कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या घरापासून १.५ कि.मी.च्या अंतरात शिक्षण विषयक सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदान वितरीत करण्यात येते. वर्ष २०१०-११ व २०११-१२ मधील शाळां व त्यातील पटावरील विद्यार्थ्यांचा संख्येचा तपशील तक्ता १०.१ मध्ये दिला असून त्याची शृंखला परिशिष्ट १०.१ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.१ शैक्षणिक संस्था आणि त्यातील पटसंख्या**

(शिक्षक आणि पटसंख्या हजारात)

| प्रकार | | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|
| अ) शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आणि शिक्षकांची संख्या @ | | | |
| १) १ ली ते ७ वी | - शाळा | ७५,६९५^ | ७६,६२५^ |
| | - शिक्षक | ३४९ | ३५१ |
| २) १ ली ते १० वी | - शाळा | १५,७६२^ | १५,९५५ ^ |
| | - शिक्षक | १७५ | १७६ |
| ३) १ ली ते १२ वी | - शाळा | ४,६२६^ | ४,६७६ ^ |
| | - शिक्षक | १०८ | १०९ |
| ४) ११ वी ते १२ वी | - कनिष्ठ महाविद्यालये | ९६९^ | ९६९ ^ |
| | - शिक्षक | १५ | १५ |
| ब) पटसंख्या @ | | | |
| १) प्राथमिक (१ ली ते ७ वी) | - एकूण | १०,६२६ | १०,७२८ |
| | - पैकी, मुली | ४,९३५ | ४,९८९ |
| २) माध्यमिक (८ वी ते १० वी) | - एकूण | ५,६०३ | ५,६५६ |
| | - पैकी, मुली | २,६०२ | २,६३० |
| ३) उच्च माध्यमिक (११ वी ते १२ वी) | - एकूण | ४,२९१ | ४,३३२ |
| | - पैकी, मुली | १,९९३ | २,०१४ |
| ४) कनिष्ठ महाविद्यालये (११ वी ते १२ वी) | - एकूण | ८१७ | ८२३ |
| | - पैकी, मुली | ३७९ | ३८४ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन @ अंदाजित ^ आठव्या अखिल भारतीय शिक्षण सर्वेक्षणानुसार

१०.४ राज्य शासनाचा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणावरील मागील पाच वर्षाचा खर्च आलेख १०.१ मध्ये दर्शविला आहे.

## मुलींचे शिक्षण

१०.५ मुलींचे शिक्षण ही शासनाच्या दृष्टीने प्राथम्याची बाब आहे. पटावरील मुलींच्या संख्येमध्ये विशेषतः ग्रामीण भागातील आणि प्रतिकूल परिस्थितीतील गटांमध्ये स्त्री-पुरुष असमानता दिसून येते. ही असमानता अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या बाबतीत विशेषतः उच्च प्राथमिक स्तरावर अधिक तीव्र आहे. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचा राज्य शासनाचा निर्णय मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी वरदान ठरला आहे. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या काही योजना खालीलप्रमाणे आहेत :

**आलेख १०.१ : राज्य शासनाचा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च**




- **मुलींच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम:** मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने हा कार्यक्रम सुरु केला आहे. ग्रामीण स्त्री साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असलेले व स्त्री-पुरुष असमानतेचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असलेले शैक्षणिकदृष्ट्या मागास गट, जिल्हयातील ज्या भागात किमान पाच टक्के लोकसंख्या अजा/अज ची आहे आणि अजा/अज च्या स्त्री साक्षरतेचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी आहे असे गट तसेच काही निवडक शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये 'मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम' या अंतर्गत अतिरिक्त साधनांचा पुरवठा केला जातो. शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील अजा, अज, इमाव, अल्पसंख्यांक आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील उच्च प्राथमिक स्तरावरील मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण, जीवनोपयोगी कौशल्य विकास, बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण इत्यादी नाविन्यपूर्ण कार्यक्रमाद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी मध्ये वाढ करण्यावर भर दिला जात आहे.

- **कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय:** ही योजना २००४ मध्ये शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील अजा, अज, इमाव व अल्पसंख्यांक कुटुंबातील शाळाबाह्य मुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी निश्चित करण्याच्या हेतूने उच्च प्राथमिक स्तरावरील वस्तीशाळा स्थापन करण्यासाठी सुरु करण्यात आली. राज्यातील १० जिल्ह्यांत प्रत्येकी १०० मुली इतकी प्रवेशक्षमता असलेली ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये कार्यरत आहेत.

- **उपस्थिती भत्ता योजना :** प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून राज्य शासनाने मुलींना 'उपस्थिती भत्ता' देण्याची योजना जानेवारी, १९९२ मध्ये सुरु केली. या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्षात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त दिवस शाळेत उपस्थित असणाऱ्या १ ली ते ४ थी पर्यंतच्या मुलींच्या पालकांना एक रुपया प्रतिदिवस आणि जास्तीत जास्त रु. २२०/- इतका उपस्थिती भत्ता दिला जातो. या योजनेमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील अजा, अज आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुलींचा समावेश असतो.

- **अहिल्याबाई होळकर योजना :** विद्यार्थीनींना मोफत प्रवास सवलत देण्यासाठी १९९६-९७ पासून राज्यात 'अहिल्याबाई होळकर योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलींना त्यांच्या गावात शाळा उपलब्ध नसल्यास शाळेत उपस्थित राहण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात येते.

- वरील नमूद केलेल्या योजनांअंतर्गत लाभार्थ्यांचा तपशील तक्ता १०.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०. २ मुलींच्या शिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तपशील**

(लाखात)

| योजना | लाभार्थी | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
| मुलींच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम | ८.३० | ८.३५ | ८.५६ | ८.८४ | ८.८७ |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (संख्या) | उ. ना. | ३,३४२ | ३,३६६ | ४,०१८ | ४,१६३^ |
| उपस्थिती भत्ता | ७.०९ | ४.७९ | २.९० | ४.३० | ४.५९@ |
| अहिल्याबाई होळकर | १६.३० | १६.४० | १८.५० | १९.८५ | उ. ना. |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन , महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई @अपेक्षित उ. ना. - उपलब्ध नाही ^ जानेवारी, २०१२ पर्यंत

## सर्व शिक्षा अभियान

१०.६ सर्व शिक्षा अभियानाने सुरूवात (२००१-०२) झाल्यापासून ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांना मूलभूत शिक्षण प्राप्त करून देऊन मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. समाधानकारक दर्जाचे मूलभूत शिक्षण केंद्रबिंदू मानून सामाजिक आणि लिंगभेदावर आधारीत सर्व विषमता कमी करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. तक्ता १०.३ मध्ये सर्व शिक्षा अभियानाच्या अधिपत्त्याखालील शाळांची संख्या व त्यातील पटसंख्या दिली आहे.

**तक्ता १०.३ सर्व शिक्षा अभियानाच्या अधिपत्त्याखालील शाळांची संख्या व त्यातील पटसंख्या**

| शाळेचा प्रकार | २०१०-११ | | | | २०११-१२* | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळांची संख्या | पटसंख्या (लाखात) | | | शाळांची संख्या | पटसंख्या (लाखात) | | |
| | | मुली | मुले | एकूण | | मुली | मुले | एकूण |
| प्राथमिक | ४९,०८९ | १९.११ | २१.१९ | ४०.३० | ४९,९८३ | १८.८० | २०.८० | ३९.६० |
| उच्च प्राथमिक | २७,५६० | ३०.२२ | ३२.९७ | ६३.१९ | ३१,१३३ | ३४.९० | ३९.१० | ७४.०० |
| माध्यमिक/ उच्च प्राथमिक सह उच्च माध्यमिक | २०,४७० | २५.८१ | ३०.५२ | ५६.३३ | १९,०३८ | २२.३० | २६.१० | ४८.४० |
| **एकूण** | **९७,११९** | **७५.१४** | **८४.६८** | **१५९.८२** | **१,००,१५४** | **७६.००** | **८६.००** | **१६२.००** |

*आधार* : डीआयएसई-२०१०-११ * अस्थायी

१०.७ सर्व शिक्षा अभियानाची मागील पाच वर्षातील कामगिरी तक्ता १०.४ मध्ये दिली आहे :

**तक्ता १०.४ सर्व शिक्षा अभियानाची कामगिरी**

| वर्ष | बांधण्यात आलेल्या वर्गखोल्यांची संख्या | प्रशिक्षण देण्यात आलेल्या शिक्षकांची संख्या (लाखात) | स्थापन करण्यात आलेल्या कम्प्यूटर प्रयोगशाळांची संख्या | मोफत पुस्तके वाटण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या (लाखात) |
|---|---|---|---|---|
| २००७-०८ | ३,०६६ | २.४७ | २८० | ९२.४२ |
| २००८-०९ | ३,७१४ | ४.२७ | १,०८५ | १४०.०८ |
| २००९-१० | ४,८६५ | ४.४४ | ९४५ | १३७.४९ |
| २०१०-११ | १०,१०१ | ५.३३ | ६४३ | १३८.३६ |
| २०११-१२ | १४,५९९ | ४.२६ | ८०५ | १३८.५४ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

१०.८ शारीरिक अथवा मानसिक विकलांग मुलांना सर्वसाधारण परिस्थितीत सर्वसाधारण मुलांसोबत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे व त्यांना समाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी आणि त्यांच्या भावनिक उन्नतीसाठी राज्यात 'विकलांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विकलांग समावेशक शिक्षण कार्यक्रमामध्ये विशेष गरज असलेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना ब्रेल पुस्तक, चष्मा, श्रवणयंत्र आदी उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इत्यादि पुनर्वसन व शैक्षणिक आधार सुविधा पुरविणे यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत २०११-१२ मध्ये फेब्रुवारी, २०१२ पर्यंत ३.८६ लाख मुलांनी लाभ घेतला व एकूण ₹ ५९.५५ कोटी खर्च करण्यात आला.

**आलेख १०.२ : खर्च – सर्व शिक्षा अभियान**




**आलेख १०.३ : विद्यार्थी वर्गखोल्या प्रमाण**




**आलेख १०.४ : विद्यार्थी शिक्षक प्रमाण**




## मध्यान्ह भोजन योजना

१०.९ पटनोंदणी वाढविणे, उपस्थिती वाढविणे व गळतीचे प्रमाण कमी करणे याबरोबरच प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारणे यासाठी केंद्र शासनाने वर्ष १९९५ मध्ये 'मध्यान्ह भोजन योजना' सुरू केली. वर्ष २००८-०९ मध्ये 'राष्ट्रीय मध्यान्ह भोजन योजना' या नावाखाली उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता या योजनेचा विस्तार करण्यात आला. या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा, शासन अनुदानित, वस्ती शाळा, पर्यायी व नाविन्यपूर्ण शैक्षणिक केंद्रे, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे, आश्रमशाळा आणि अंध व अपंग मुलांकरिता चालविल्या जाणाऱ्या अनुदानित शाळा यांमधील विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारणे.
- गरीब व प्रतिकूल परिस्थितीतील मुलांना शाळेत नियमितपणे येण्यास आणि वर्गातील शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यास उत्तेजन देणे.
- उन्हाळ्याच्या सुट्टीत दुष्काळग्रस्त भागातील प्राथमिक स्तरांवरील मुलांना पोषक आहार पुरविणे.

१०.१० मध्यान्ह भोजन योजनेचा तपशील तक्ता १०.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५ मध्यान्ह भोजन योजनेचा तपशील**

| बाब | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
| लाभार्थी (लाखात) | ८५.५७ | १२१.७७ | १२२.२८ | १२२.०० | १२०.१८ |
| खर्च (₹ कोटीत) | ३५८.८६ | ६९९.९२ | ५६५.३० | ९२१.१३ | ६८८.७०@ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन @ डिसेंबर, २०११ पर्यंत

## शैक्षणिक स्थितीचा वार्षिक अहवाल - (असर - २०११)

- 'प्रथम' या संस्थेमार्फत ग्रामीण मुलांचे वार्षिक सर्वेक्षण.
- सर्वेक्षणामध्ये राज्यातील ३१ जिल्हयांमधील ९२५ गावांचा समावेश होता.
- एकूण १८,५०४ कुटुंबांची पाहणी घेऊन ३ ते १६ वर्षे वयोगटातील ३०,४३८ मुलांची माहिती गोळा करण्यात आली.
- ग्रामीण भागातील शाळांमध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील प्रवेशित विद्यार्थ्यांची टक्केवारी ९९ होती.
- प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील मुलांच्या उपस्थितीची (कोणत्याही एका दिवशी) टक्केवारी अनुक्रमे ८९.६ व ९०.० इतकी होती.
- इयत्ता १ ली मध्ये शिकणाऱ्या व काहीही वाचता न येणाऱ्या मुलांची टक्केवारी १३.१ होती.

*आधार* : प्रथम, अशासकीय संघटन

## शुल्क सवलती

१०.११ शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या सहभागाला उत्तेजन देण्यासाठी आणि पालकांवरील आर्थिक भार हलका करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलती देत आहे. याबाबतची सविस्तर माहिती खाली तक्ता १०.६ मध्ये दिली आहे:

**तक्ता १०. ६ शुल्क सवलती योजनांचा तपशील**

| योजना | लाभार्थी (लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण (XI आणि XII) | २.२५ | ३.८३ | ३.१७ | ३.११ | २.०० |
| १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | ३.९६ | ३.९४ | १५.०० | १०.०० | १०.११ |
| १ ली ते १० वी च्या शासन अनुदानित तसेच विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | ५०.५४ | ९.६३ | ३५.४२ | ३५.०७ | ४७.४९ |
| आदिवासी विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता | ०.६३ | २.८३ | २.१० | २.२१ | ०.३५ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र छात्र सेना

१०.१२ राज्य शासनाने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्व, सहकार, शिस्त, नेतृत्व, आत्मविश्वास, शौर्य आणि देशप्रेम या गुणांचा विकास करण्यासाठी 'महाराष्ट्र छात्र सेना' ही योजना सुरु केली. सर्व शाळांमधील इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वैकल्पिक स्वरूपात ही योजना राबविली जाते. वर्ष २०१०-११ मध्ये या योजनेमध्ये २४ लाख विद्यार्थ्यांचा समावेश होता.

## सैनिकी शाळा

१०.१३ राज्यात ३३ जिल्हयांमध्ये ४२ सैनिकी शाळा असून त्यांपैकी पाच शाळा फक्त मुलींसाठी, ३३ शाळा फक्त मुलांसाठी, चार सह शिक्षणासाठी आहेत. दोन शाळा विनाअनुदानित असून, या सर्व ४२ शाळांमधील पटावरील विद्यार्थी संख्या १५,०३२ आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.१४ खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी व क्रीडापटूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने १९९५ मध्ये पुणे येथे 'शिव छत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली. या क्रीडापीठाकडून ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडा नैपुण्य चाचण्या घेतल्या जातात आणि १७ विविध खेळांमधील निवडक विद्यार्थ्यांना सुमारे ८ ते १० वर्षे विशेष प्रशिक्षण दिले जाते. राज्यात ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. आतापर्यंत या प्रबोधिनीच्या १७ विद्यार्थ्यांनी *'शिव छत्रपती राज्य क्रीडा सन्मान'* प्राप्त केला आहे आणि ४६ खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व केले आहे. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी ₹ ६,००० खर्च करते. वर्ष २०११-१२ मध्ये निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या ५९८ इतकी होती. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाचा तपशील तक्ता १०.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७ क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाचा तपशील**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके | | | राष्ट्रीय स्तरावरील पदके | | | राज्य स्तरावरील पदके | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | सुवर्ण | रजत | कांस्य | सुवर्ण | रजत | कांस्य |
| २००८-०९ | ५०० | २ | ० | ० | ४६ | ५३ | २ | १६३ | ८९ | १२१ |
| २००९-१० | ५९० | ५ | २ | १ | ४६ | ३८ | ४० | २२९ | १२८ | ९१ |
| २०१०-११ | ५८६ | ३ | २ | ० | ६७ | ७० | ४६ | १७० | १११ | ९० |

*आधार* : क्रीडा व युवक कल्याण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## शिक्षण विकास निर्देशांक

१०.१५ राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ आणि मानव संसाधन व विकास मंत्रालय (शालेय शिक्षण व साक्षरता विभाग) यांच्या मार्फत प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरांवरील शिक्षण विकास निर्देशांक तसेच संपूर्ण मूलभूत शिक्षणाकरिता केवळ 'जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली' ह्या माहितीवर आधारित असणारा संयुक्त निर्देशांक परिगणित करण्यात येतो. शिक्षण विकास निर्देशांक हा राज्याच्या विशिष्ट निर्देशकांबरोबरच मूलभूत शिक्षणाचे नवीन पैलू दर्शवितो. भारतातील मूलभूत शिक्षण आणि सार्वत्रिक मूलभूत शिक्षणाच्या दिशेने प्रगती (फ्लॅश सांख्यिकी २००९-१०) अहवालानुसार महाराष्ट्र प्राथमिक स्तराकरिता १४ व्या क्रमांकावर तर उच्च प्राथमिक आणि संयुक्त स्तराकरिता १३ व्या क्रमांकावर असून शिक्षण विकास निर्देशांक अनुक्रमे ०.५८, ०.७५ आणि ०.६६ आहे. राज्यांचे प्राथमिक स्तर, उच्च प्राथमिक स्तर आणि संयुक्त स्तराकरिता शिक्षण विकास निर्देशांक परिशिष्ट १०.२ मध्ये दिले आहेत.

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१६ उच्च शिक्षणात सर्वसाधारण उच्च शिक्षणाबरोबरच कृषी, पशुवैद्यक, वैद्यकीय, औषध निर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, इत्यादि चा समावेश होतो. मुलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या सोबत, उच्च शिक्षणातील संधींचा देखील विस्तार करण्यासाठी शासन परिश्रम घेत आहे. राज्यात चार कृषी विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १३ अन्य सर्वसाधारण विद्यापीठे असून त्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, अनौपचारिक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन, विकास व प्रसार करण्यासाठीचे कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, नागपूर यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राज्यात २० अभिमत विद्यापीठे आहेत. वर्ष २०१०-११ व २०११-१२ मधील एकूण संस्था, प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची माहिती तक्ता १०.८ मध्ये दिली आहे. वर्ष २०११-१२ ची शाखा निहाय विस्तृत माहिती परिशिष्ट १०.३ व १०.४ मध्ये दिली आहे.

## तक्ता १०.८ संस्था आणि त्यांची प्रवेशक्षमता

| विद्याशाखा | २०१०-११* | | | २०११-१२* | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संस्थाची संख्या | प्रवेश क्षमता | पटसंख्या | संस्थाची संख्या | प्रवेश क्षमता | पटसंख्या |
| **सर्वसाधारण शिक्षण $** | | | | | | |
| कला, विज्ञान, वाणिज्य आणि विधी | २,३८७ | १२० प्रति तुकडी | १५,२०,९३७ | २,३८७ | १२० प्रति तुकडी | १४,४५,५३७ |
| बी.एड | ४६८ | १०० प्रति तुकडी | ४७,८५२ | ४६८ | १०० प्रति तुकडी | ३२,४३९ |
| व्यवसाय शिक्षण (नॉन एआयसीटी अभ्यासक्रमासह) | ४२२ | १०० प्रति तुकडी | २,१५,३२७ | ४२२ | १०० प्रति तुकडी | २,९०,९९९ |
| **तांत्रिक शिक्षण @** | | | | | | |
| अभियांत्रिकी (पदविका, पदवी, पदव्युत्तर) | ६९६ | २,६१,६२५ | ५,२९,२६७ | ९०१ | २,८९,३४१ | ६,२२,०४५ |
| स्थापत्यशास्त्र (पदवी, पदव्युत्तर) | ५५ | २,८६७ | ९,१३६ | ६१ | ३,०९७ | ५,८७१ |
| व्यवस्थापन शास्त्र (एमबीए/एमएमएस) | ३६६ | ३४,९९५ | ४१,७४१ | ४०८ | ४२,१६५ | ४९,८१९ |
| हॉटेल व्यवस्थापन आणि खाद्यपेय तंत्रज्ञान (पदविका, पदव्युत्तर) | २६ | १,५३० | १,५६२ | २६ | १,५३० | २,७०७ |
| औषधी द्रव्ये निर्माण शास्त्र (पदविका, पदवी, पदव्युत्तर) | ३४२ | २३,३४७ | ४४,४३७ | ३४४ | २५,३१८ | ५१,६५४ |
| मास्टर इन कम्प्यूटर ॲप्लिकेशन | १२७ | ८,३८३ | १५,९३१ | १४१ | १०,८७५ | १९,५०१ |
| औद्यागिक प्रशिक्षण संस्था | ७२६ | १,४९,१५६ | १,३४,७१२ | ७६६ | १,५४,७०२ | १,५७,५२३ |
| **वैद्यकीय शिक्षण ^** | | | | | | |
| ॲलोपॅथिक + | ४१ | ३,३८५ | ४,९९७ | ४१ | ३,३८५ | ५,१९१ |
| आयुर्वेदिक | ६२ | ३,६६१ | ३,३७६ | ६२ | ३,२१४ | ३,२४७ |
| दंतचिकित्सा | ३५ | २,५०३ | २,०९१ | ३५ | २,२२० | २,२३८ |
| होमियोपॅथिक | ४५ | ३,६११ | २,९७२ | ४५ | ३,५५७ | ३,२७६ |
| युनानी | ५ | ३३९ | ३३७ | ५ | ३२० | २६६ |
| डी.एम.एल.टी. | १० | ४४८ | १८७ | १० | ४०८ | १४३ |
| फिजिओथेरपी + | ३५ | १,०८५ | ७०७ | ३५ | १,०२५ | ७१५ |
| ऑक्युपेशनल थेरपी + | ६ | १९० | १०३ | ६ | १६० | ८० |
| ऑडियोलॉजी अँड स्पीच लॅंग्वेज पॅथॉलॉजी + | ३ | ११३ | ८१ | ३ | ११३ | ६८ |
| प्रोस्थेटिक्स व ऑर्थोटिक्स | १ | ३४ | १४ | १ | ३५ | २१ |
| बी.एस.सी.परिचारिका | ४७ | २,४४० | १,८२८ | ४७ | २,७२० | १,७८३ |
| **पशु विज्ञान आणि मत्स्य विज्ञान £** | | | | | | |
| पशुविज्ञान | ६ | ५८२ | १,३९२ | ६ | ५८० | १,३२३ |
| दुग्ध तंत्रज्ञान | २ | ८० | १८७ | २ | ८० | २१८ |
| मत्स्य विज्ञान | २ | ७२ | १६४ | २ | ७२ | १३७ |
| **कृषी §** | | | | | | |
| कृषी | ८२ | ६,७३७ | ६,६८७ | ८३ | ७,३४९ | ७,३७९ |
| फलोत्पादन | १६ | ४७८ | ४६९ | १६ | ५३२ | ५१७ |
| वने | ४ | ८५ | ८३ | ४ | ९४ | ८४ |
| मत्स्य विज्ञान | ३ | ७३ | ७० | ३ | ७३ | ६९ |
| कृषि अभियांत्रिकी | १६ | ७४२ | ७१२ | १७ | ८२३ | ७९० |
| अन्न तंत्रज्ञान | १६ | ८३९ | ७९० | १६ | ९१९ | ८६२ |
| गृह विज्ञान | ३ | ५४ | ३५ | ३ | ५४ | ३३ |
| जैव -तंत्रज्ञान | १९ | ६७५ | ५४९ | १९ | ७१५ | ६१२ |
| कृषि, पणन व व्यवस्थापन | ११ | ४९५ | ४३० | १३ | ५७५ | ३८० |
| काढणी पश्चात तंत्रज्ञान | ला. ना. | ला. ना. | ला. ना. | १ | ३० | १९ |

*आधार :* $ उच्च शिक्षण संचालनालय, पुणे    * अस्थायी

@ तंत्र शिक्षण संचालनालय आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई    £ महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ , नागपूर

^ वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक    § महाराष्ट्र कृषी व संशोधन परिषद, पुणे

\+ पदव्युत्तर प्रवेश क्षमता वगळून    ला. ना. लागू नाही

टिप: १) प्रवेश क्षमता फक्त प्रथम वर्षासाठीची आहे. २) वैद्यकीय शिक्षण आणि कृषी या विद्याशाखांसाठी दिलेली पटसंख्या फक्त पहिल्या वर्षासाठीची आहे.

# सार्वजनिक आरोग्य

१०.१७ आरोग्य, कुटुंब कल्याण व पोषण विषयक सुविधा सहजतेने उपलब्ध करून देशातील जनतेचे विशेषत: उपेक्षित व वंचित जनतेचे आरोग्यमान सुधारणे हे शासनाच्या नियोजन प्रक्रियेच्या प्रमुख उद्देशांपैकी एक असून त्यावर भर दिल्याचे सर्व पंचवार्षिक योजनांमधून तसेच विविध शासकीय धोरणांमधून दिसून येते. परिणामी भारताने आरोग्याच्या विस्तृत पायाभूत सुविधा निर्माण केल्या असून वेळोवेळी विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम सुरु केले आहेत. राज्य सरकारने देखील जीवनदायी आरोग्य योजना, नवसंजीवनी योजना, इत्यादी आरोग्यविषयक योजना सुरु केल्या आहेत. राज्यात आरोग्य सेवांवर २०१०-११ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या ०.८१ टक्के खर्च झाला होता.

१०.१८ राज्यामध्ये त्रिस्तरीय सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा अस्तित्वात आहे. प्राथमिक स्तरावर उप केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व सामाईक आरोग्य केंद्र या तीन प्रकारच्या आरोग्यसेवा संस्थांचा समावेश आहे. दुय्यम स्तरावर जिल्हा रूग्णालये तर तृतीय स्तरावर आरोग्य सेवा पुरविण्याचे काम नागरी भागातील निदान व तपासणी तंत्रज्ञान उपलब्ध असलेल्या रूग्णालयामार्फत होते. राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवा संस्थांबाबतची माहिती तक्ता १०.९ मध्ये व राज्यात उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांबाबतची विस्तृत मालिका परिशिष्ट १०.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९ राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवा संस्था**

(३१ ऑक्टोबर, २०११ रोजी)

| संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| राज्यस्तरीय रुग्णालय | ४९८ |
| जिल्हा रुग्णालय | २३ |
| उप जिल्हा रुग्णालय व क्षमता | |
| अ) ५० खाटा | ५६ |
| ब) १०० खाटा | २४ |
| क) २०० खाटा | ३ |
| सामाईक आरोग्य केंद्र | ४५८ |
| ग्रामीण रुग्णालय /कुटीर रुग्णालय | ३८६ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | १,८०९ |
| उप केंद्र | १०,५८० |
| प्राथमिक आरोग्य पथक | १७२ |
| फिरती आरोग्य पथक | १३ |
| स्त्री रुग्णालय | १० |
| मनोरुग्णालय | ४ |
| दंत रुग्णालय | ३ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.१९ अकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७-१२) जिल्हा तसेच गट स्तरावरील आरोग्य योजनेवर त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी, स्वच्छता, पोषण इत्यादी आरोग्य विषयक विविध क्षेत्रांवर भर देण्यात आला. बाराव्या पंचवार्षिक योजनेत (२०१२-१७) देखील योजना कालावधीच्या समाप्ती पर्यंत स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.५ टक्के इतका नियतव्यय आरोग्य क्षेत्रासाठी करून देशातील आरोग्य प्रणालीचा अधिक विस्तार करण्याचा उद्देश आहे. निवडक आरोग्य विषयक निर्देशकांची स्थिती तक्ता १०.१० मध्ये दर्शविली आहे तर विस्तृत मालिका परिशिष्ट १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१० निवडक आरोग्यविषयक निर्देशकांची स्थिती**

| आरोग्यविषयक निर्देशक | अकराव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत ठरविण्यात आलेले लक्ष्य | २००७ | २००८ | २००९ | २०१० |
|---|---|---|---|---|---|
| जन्मदर | १८ | १८.१ | १७.९ | १७.६ | १७.१ |
| मृत्यूदर | ६.४ | ६.६ | ६.६ | ६.७ | ६.५ |
| एकूण जननदर | २.१ | २.० | २.० | १.९ | उ.ना. |
| अर्भक मृत्यूदर | २५ | ३४ | ३३ | ३१ | २८ |

*आधार* : नमुना नोंदणी पाहणी, भारताचे महानिबंधक      उ. ना. उपलब्ध नाही

### *राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान*

१०.२० आरोग्य सेवा प्रदान प्रणालीत सुधारणा करणे व त्याद्वारे प्रभावी आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात व त्याचा वापर वाढावा या उद्देशाने राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न म्हणून भारत सरकारने एप्रिल, २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात केली. अर्भक व माता मृत्यु कमी करणे, साथीच्या व साथीचे नसलेल्या रोगांचा प्रादुर्भाव रोखणे, लोकसंख्या स्थिर करणे, स्त्री-पुरुष व लोकसंख्या विषयक समतोल राखणे, स्थानिक आरोग्यविषयक उपचार पध्दती पुनर्जिवित करणे, आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द व होमिओपॅथी (आयुष) या पद्धतींना मुख्य प्रवाहात आणणे व आरोग्यदायी जीवनमानास प्रोत्साहन देणे ही या अभियानाची मुख्य उद्दिष्टे आहेत.

१०.२१ या अभियानाअंतर्गत सर्व जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये/उप जिल्हा रुग्णालयांचे भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार (आयपीएचएस) श्रेणीवर्धन करणे, इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करणे, टेलिमेडीसीन प्रकल्प, "आशा" ची (अधिकृत सामाजिक आरोग्य कार्यकर्त्या) नेमणूक ही कार्ये केली जातात. या अभियानाचे महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे आहेत.

- प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम
- जननी सुरक्षा योजना
- सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम
- शालेय आरोग्य कार्यक्रम
- राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम
- राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम
- राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम
- राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम
- राष्ट्रीय आयोडिन न्यूनता विकार नियंत्रण कार्यक्रम

### *प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा*

१०.२२ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाचा दुसरा टप्पा हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा एक प्रमुख घटक असून, त्याचा उद्देश मातामृत्यू प्रमाण, अर्भक मृत्यू व एकूण जनन दर कमी करून त्याद्वारे बाल आरोग्य सुधारणे व लोकसंख्या स्थिर करणे हा आहे. या योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाचा तपशिल तक्ता १०.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.११ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (दुसरा टप्पा) - अंतर्गत झालेला खर्च**

( ₹ कोटी )

| वर्ष | खर्च |
|---|---|
| २००७-०८ | ९९.२२ |
| २००८-०९ | १७०.२५ |
| २००९-१० | १५८.९७ |
| २०१०-११ | २१४.५७ |
| २०११-१२ # | २३६.०५ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन

# जानेवारी, २०१२ पर्यंत

### *कुटुंब कल्याण कार्यक्रम*

१०.२३ लोकसंख्या स्थिर करणे व त्याद्वारे जनतेचे आरोग्यमान सुधारणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. कुटुंबकल्याण कार्यक्रमात यापूर्वी जरी मुख्य भर नसबंदी शस्त्रक्रियेवर होता, तरी दोन अपत्यांच्या जन्मात योग्य अंतर ठेवणे ही बाब सुध्दा तितकीच महत्त्वाची असल्यामुळे तांबी, इन्ट्रायुटेरीन साधने (आय. यु. डी.), पारंपारिक संततिप्रतिबंधक साधने, इत्यादी पध्दतींच्या प्रसारावर जास्त भर देत आहे. राज्यात हा कार्यक्रम २,६९२ अशासकीय संस्थांच्या सहाय्याने राबविला जातो. कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१२ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता १०.१२ कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती**

(हजारात)

| वर्ष | नसबंदी | | | | तांबी | | एकूण झालेला खर्च ( ₹ कोटी ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| २००७-०८ | ६२५ | २५.६ | ५२८.६ | ५५४.३ (८८.७) | ४५० | ४०८.७ (९०.८) | २३.८५ |
| २००८-०९ | ६०० | ३८.१ | ५०१.८ | ५४०.० (९०.०) | ४५० | ३९४.७ (८७.७) | ३६.०३ |
| २००९-१० | ६५० | ३४.५ | ४९९.४ | ५३३.९ (८२.१) | ४५० | ३८१.९ (८४.९) | ३९.६५ |
| २०१०-११ | ५५० | २४.३ | ४६८.० | ४९२.४ (८९.५) | ४५० | ३७४.१ (८३.१) | ३८.३१ |
| २०११-१२ # | ५५० | १७.९ | ३९८.५ | ४१६.५ (७५.७) | ४५० | २९२.७ (६५.०) | २४.८१ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात. # जानेवारी, २०१२ पर्यंत

### *जननी सुरक्षा योजना*

१०.२४ ग्रामीण व नागरी भागात संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देऊन त्याद्वारे दारिद्र्य रेषेखालील, तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या कुटुंबांतील, ज्यांचे वय प्रसूतीपूर्व नोंदणीच्यावेळी १९ वर्षाच्या वर आहे अशा लाभार्थ्यांमधील माता मृत्यु प्रमाण व अर्भक मृत्यूदर कमी करणे या उद्देशाने राज्यात २००५-०६ पासून जननी सुरक्षा योजना राबविली जात आहे. या योजनेचा उद्देश सर्व प्रसूती खात्रीने कुशल दाईंमार्फत होऊन त्याद्वारे माता मृत्यू प्रमाण कमी करणे हा आहे. या योजनेअंतर्गत संस्थेमधील प्रसुतीनंतर ७ दिवसांच्या आत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांस ₹ ७०० व शहरी भागातील लाभार्थ्यांस ₹ ६०० दिले जातात, तर कुशल दाईंच्या मदतीने घरी प्रसूत होणाऱ्या लाभार्थ्यांस ₹ ५०० दिले जातात. सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांस स्वतःची दोन जिवंत अपत्ये असेपर्यंत दिला जातो. राज्यातील २००४-०६ या कालावधीतील माता मृत्यू प्रमाण १३० वरुन कमी होऊन २००७-०९ मध्ये १०४ इतके झाले आहे. जननी सुरक्षा योजनेची प्रगती तक्ता १०.१३ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता १०.१३ जननी सुरक्षा योजनेची प्रगती**

(आकडेवारी लाखांत)

| वर्ष | लाभार्थ्यांची संख्या | मंजूर निधी (₹) | झालेला खर्च (₹) | मंजूर निधीशी झालेल्या खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २००७-०८ | २.२० | २,०१३ | १,८८० | ९३ |
| २००८-०९ | २.२४ | २,३८१ | २,३८१ | १०० |
| २००९-१० | ३.४८ | २,८९० | २,६८१ | ९३ |
| २०१०-११ | ३.५४ | २,२५९ | ३,११७ | १३८ |
| २०११-१२ # | २.४३ | ३,५२८ | २,६५८ | ७५ |

*आधार* : राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन # जानेवारी, २०१२ पर्यंत

### *नवसंजीवनी योजना*

१०.२५ आदिवासी भागातील माता मृत्यू प्रमाण आणि अर्भक मृत्यदर कमी व्हावे या उद्देशाने १५ जिल्हयातील आदिवासी भागातील ८,३७१ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गाव व पाड्यामधील आजारी व कुपोषित बालकांचा शोध घेऊन त्यांच्या घरी औषधोपचार करण्याकरिता व आवश्यकता भासल्यास नजिकच्या मदतकेंद्रात पोहोचविण्याकरीता वाहनासह एक वैद्यकीय अधिकारी व अन्य वैद्यकीय कर्मचारी असलेल्या १६२ भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

१०.२६ आदिवासी भागातील गरोदर महिलांची नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक त्या औषधांचा पुरवठा व्हावा या दृष्टीने नवसंजीवनी योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला प्रसूतीपूर्व आरोग्य तपासणी करीता वैद्यकीय केंद्राला भेट देण्यासाठी ₹ ४०० रोख व ₹ ४०० ची औषधे पुरविण्यात येतात. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या आणि झालेला खर्च तक्ता १०.१४ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.१४ मातृत्व अनुदान योजनेचा तपशिल**

(₹ कोटी)

| वर्ष | लाभार्थी माता | झालेला खर्च |
|---|---|---|
| २००७-०८ | ७८,८१८ | ७.०१ |
| २००८-०९ | १,१७,१३७ | ७.१६ |
| २००९-१० | ५९,८५५ | ५.०१ |
| २०१०-११ | ४४,९८५ | ३.८० |
| २०११-१२ # | ३४,२७८ | ४.१६ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन # जानेवारी, २०१२ पर्यंत

### *सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम*

१०.२७ राज्यात सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्याचा उद्देश क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व गोवर यांसारख्या लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येण्याजोग्या आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूंचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करणे यासाठी उत्तम दर्जाच्या लसीकरण सेवा पुरविणे हा आहे. लाभार्थ्यांची संख्या आणि झालेल्या खर्चाचा तपशिल तक्ता १०.१५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१५ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थ्यांची संख्या**

(आकडेवारी लाखात) ( ₹ कोटी )

| लस | २००७-०८ | | २००८-०९ | | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ # | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १९.७४ | २०.५४ | १९.२८ | २०.७० | १८.८० | १९.७३ | १९.२३ | २०.०६ | १९.८१ | १६.६० |
| डीपीटी III | १९.७४ | १९.८३ | १९.२८ | १८.९४ | १८.८० | १९.५१ | १९.२३ | १९.२१ | १९.८१ | १५.३८ |
| पोलिओ III | १९.७४ | १९.७१ | १९.२८ | १९.४६ | १८.८० | १९.५७ | १९.२३ | १९.२५ | १९.८१ | १५.३२ |
| एचआयबी | - | - | १९.२८ | ११.६३ | १८.८० | १५.५६ | १९.२३ | १८.४३ | १९.८१ | ७.५१ $ |
| गोवर | १९.७४ | १८.७३ | १९.२८ | १७.६६ | १८.८० | १८.८० | १९.२३ | १८.५३ | १९.८१ | १५.१६ |
| डीपीटी (बुस्टर) | २२.५४ | १९.०३ | १९.७४ | १७.९६ | १८.८० | १८.२४ | १९.७३ | १८.२६ | १९.०४ | १४.११ |
| पोलिओ (बुस्टर) | २२.५४ | १९.०१ | १९.७४ | १८.३८ | १९.२७ | १८.३३ | १९.७३ | १८.२२ | १९.०४ | १४.०३ |
| डीटी (५ वर्ष) | २४.६८ | २०.३४ | २१.५१ | १८.७८ | २१.८४ | १८.१२ | १९.१४ | १६.६३ | १८.७८ | १२.२३ |
| टीटी (१० वर्ष) | २४.६८ | १८.८३ | २१.५१ | १९.३१ | २१.८४ | २०.५८ | १९.९९ | २०.२० | १९.९३ | २०.२६ |
| टीटी (१६ वर्ष) | २२.५३ | १६.९७ | २२.८२ | १९.०६ | २३.१७ | १९.८२ | १९.९९ | १९.४९ | २०.७२ | १४.७६ |
| टीटी (गरोदर माता) | २२.५४ | १९.५२ | २१.९७ | २१.१८ | २१.३० | २०.२५ | २१.८७ | २१.११ | २१.७९ | १४.८७ |
| झालेला खर्च | | ६.२८ | | ११.४५ | | १४.७४ | | १५.४३ | | ११.४४ |

*आधार* : राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन # जानेवारी, २०१२ पर्यंत $ नोव्हेंबर, २०११ पर्यंत

## *पल्स पोलिओ कार्यक्रम*

१०.२८ पल्स पोलिओ कार्यक्रमाअंतर्गत पाच वर्षाखालील सर्व मुलांना तोंडाद्वारे पोलिओ मात्रा देण्यात येते. वर्ष २०१० मध्ये पोलिओचे पाच रुग्ण आढळले, तर २०११ मध्ये एकही रुग्ण आढळला नाही. या कार्यक्रमाचा तपशिल तक्ता १०.१६ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.१६ पल्स पोलिओ कार्यक्रमाचा तपशिल**

| वर्ष | मुलांची संख्या $ ( लाखात) | खर्च ( ₹ कोटी ) |
|---|---|---|
| २००७-०८ | ११९.६७ | २१.९२ |
| २००८-०९ | ११९.६१ | ३१.३१ |
| २००९-१० | १२०.०८ | ४१.०१ |
| २०१०-११ | १२०.७२ | ४१.१८ |
| २०११-१२ | ११९.९८ | १०.७६ # |

*आधार* : राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन
$ फेब्रुवारी, मधील # जानेवारी, २०१२ पर्यंत

## *शालेय आरोग्य कार्यक्रम*

१०.२९ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत शालेय आरोग्य कार्यक्रम सर्व शिक्षा अभियानाच्या सहकार्याने राबविला जातो. या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील १ ली ते १० वी व शहरी भागातील १ ली ते ४ थ्या इयत्तेतील विद्यार्थ्यांची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते व त्यांना हृदय शस्त्रक्रियेसारख्या मोठया शस्त्रक्रिया आणि अस्थिव्यंगोपचार, अपेंडिसायटिस, दंत इत्यादि इतर शस्त्रक्रियांसारख्या मोफत वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. गरजू विद्यार्थ्यांसाठी हृदय शस्त्रक्रियेसारख्या मोठया शस्त्रक्रियाही मोफत केल्या जातात. शालेय आरोग्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१७ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता १०.१७ शालेय आरोग्य कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | समाविष्ट शाळा | विद्यार्थ्यांची संख्या (लाखात) | | | मोठया शस्त्रक्रिया | हृदय शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तपासलेले | उपचार केलेले | विचारार्थ पाठविलेले | | |
| २००८-०९ | ७३,९८९ | ९७.६९ | २३.२५ | २.५५ | २,८२८ | १,०५३ |
| २००९-१० | ७७,५०० | १०४.९४ | २४.९९ | १.५१ | ४,१७३ | ९९५ |
| २०१०-११ | ८०,९९८ | १११.८९ | २०.३५ | ०.९५ | ५,६१० | १,४२२ |
| २०११-१२ # | ८१,३२९ | १०१.८३ | १६.४५ | ०.६८ | २,४४१ | १,५९७ |

*आधार* : राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, महाराष्ट्र शासन # जानेवारी, २०१२ पर्यंत

## *जीवनदायी आरोग्य योजना*

१०.३० जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत राज्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना त्यांच्या आवाक्याबाहेरील मोठया शस्त्रक्रियांसाठी ₹ १.५ लाख पर्यंत अर्थसहाय्य पुरविण्यात येते. या योजनेअंतर्गत उपचार व शस्त्रक्रियेसाठी १०६ रूग्णालयांना राज्य शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे. तक्ता १०.१८ मध्ये जीवनदायी आरोग्य योजनेची प्रगती दिली आहे.

**तक्ता १०.१८ जीवनदायी आरोग्य योजनेची प्रगती**

| वर्ष | केलेल्या शस्त्रक्रिया | | | | | खर्च (₹ कोटी ) |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुत्रपिंड | हृदय | मेंदू | कर्करोग | एकूण | |
| २००७-०८ | १९ | ३,१९५ | ६० | ४५२ | ३,७२६ | १९.०० |
| २००८-०९ | ३५ | ४,५१० | २९ | ७६५ | ५,३३९ | २३.४५ |
| २००९-१० | ७० | ७,२०५ | २०३ | २,३४५ | ९,८२३ | ४२.२६ |
| २०१०-११ | ७९ | ९,५४६ | ३८१ | ३,६१० | १३,६१६ | १११.२२ |
| २०११-१२ # | ६२ | ८,७४५ | २४० | २,९१४ | ११,९६१ | ७२.७३ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन # नोव्हेंबर, २०११ पर्यंत

१०.३१ दारिद्र्य रेषेखालील (पिवळी शिधापत्रिकाधारक) व दारिद्र्य रेषेवरील (केशरी शिधापत्रिकाधारक) कुटुंबांना आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या संस्थांच्या जाळ्यामार्फत शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात भरती होणे आवश्यक असल्यास अशा वैशिष्ट्यपूर्ण सेवा आणि उपचार पध्दती किंवा सल्ला याबाबतच्या उपलब्धतेत सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने सध्या अस्तित्वात असलेल्या जीवनदायी आरोग्य योजनेची पुनर्रचना करुन अधिक व्यापक व सर्वमावेशक 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना' राबविण्याचे निश्चित केले आहे. ही योजना राज्यात २०११-१२ मध्ये सुरु करण्यात आली आहे.

## *राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम*

१०.३२ हिवताप, हत्तीरोग, मेंदूज्वर, डेंग्युताप, चिकनगुनीया, चंडीपूरा, इत्यादी रोगांचा प्रतिबंध, रोगनिदान, उपचार व नियंत्रणासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. बहुतांश किटकजन्य रोग हे साथीचे असून हंगामानुसार होतात. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.१९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१९ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचा तपशील**

| रोग | २००७-०८ | | २००८-०९ | | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ # | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | ६७,८४४ | १७६ | ६९,००३ | १६५ | ९५,६५३ | २३२ | १,४६,०८८ | १९१ | ७८,८०९ | १०७ |
| हत्तीरोग | ५,१६७ | ० | ६,००४ | ० | ५,६९४ | ० | ४,४३९ | ० | ३,३८१ | ० |
| डेंग्यू ताप | ४,२१९ | २५ | ४,०७३ | २१ | ६,९५० | २० | ३,७४६ | ६ | ७,८९८ | २५ |
| मेंदूज्वर | २ | ० | १ | ० | ३ | ० | ७ | १ | ६ | ० |
| चिकनगुनिया ज्वर | १,४४६ | ० | ९५८ | ० | १,७०३ | ० | ७,५७४ | ० | ३,३५६ | ० |
| एईएस/चंडीपूरा | ० | ० | २८ | १६ | ८८ | ३० | ६६ | ३२ | २४ | १४ |
| एकूण झालेला खर्च (₹ कोटी ) | ५५.२६ | | १६.६१ | | १२.२८ | | ७.६५ | | २.९८$ | |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन # जानेवारी, २०१२ पर्यंत $ फेब्रुवारी, २०१२

## *सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम*

१०.३३ लागण झालेल्या क्षयरोग रुग्णांची डायरेक्टली ऑब्झर्व्हड ट्रिटमेंट शॉर्ट कोर्स (डॉटस्) द्वारे तपासणी करुन ते पूर्ण बरे होईपर्यंत प्रभावीपणे उपचार, संपूर्ण कालावधीसाठी औषधांचा खात्रीशीर पुरवठा व औषधोपचाराला रुग्णांचा प्रतिसाद नियमितपणे नोंदविण्याची यंत्रणा राज्यात सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येत आहे. वर्ष २०१० मध्ये एक लाख लोकसंख्येमागे संशयीत रुग्णांची संख्या १५६ होती तर रोगमुक्ततेचे प्रमाण ८५ टक्के होते तर वर्ष २००९ मध्ये एक लाख लोकसंख्येमागे संशयीत रुग्णांची संख्या १४९ होती व रोगमुक्ततेचे प्रमाण ८३ टक्के होते.

## *राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम*

१०.३४ राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे दृष्टीदोष शोधून काढून उपचाराद्वारे अंधत्वाचे प्रमाण कमी करणे, प्रत्येक जिल्हयात डोळयांची काळजी घेण्यासाठी व्यापक सुविधा निर्माण करुन सेवा देण्यासाठी मनुष्यबळ विकसित करणे ही आहेत. मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे २०१०-११ मधील उद्दिष्ट ७.२५ लाख होते व ते पूर्णतः साध्य करण्यात आले (१०१ टक्के). सन २०११-१२ मध्ये ७.२५ लाख उद्दिष्टापैकी ऑक्टोबर, २०११ पर्यंत ५४ टक्के साध्य करण्यात आले.

### *राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम*

१०.३५ राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे समाजातील कुष्ठरुग्णांचे प्रमाण कमी करणे, कुष्ठरोगाने पीडित सर्व व्यक्तिंना उच्च दर्जाच्या कुष्ठरोगविषयक सेवा पुरविणे आणि कुष्ठरोग्यांचे शारीरिक, सामाजिक व आर्थिक पुनर्वसन करणे ही आहेत. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२० नवीन शोधलेले रुग्ण आणि एकूण ग्रस्त रुग्णांचा तपशील**

(संख्या)

| वर्ष | नविन शोधलेले रुग्ण | एकूण ग्रस्त रुग्ण |
|---|---|---|
| २०१०-११ | १५,४९८ | १०,४३३ |
| २०११-१२ # | १५,१०३ | १३,०२६ |

*आधार* : राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, महाराष्ट्र शासन

# जानेवारी, २०१२ पर्यंत

### *राष्ट्रीय आयोडिन न्यूनता विकार नियंत्रण कार्यक्रम*

१०.३६ राष्ट्रीय आयोडिन न्यूनता विकार नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत गलगंडग्रस्त रुग्णांचे सर्वेक्षण करणे, आयोडिनयुक्त मिठाची निर्मिती आणि अ) प्रादुर्भाव झालेल्या जिल्हयांत साधे मीठ वापरण्यावर बंदी व ब) आयोडिनच्या प्रमाणावर लक्ष ठेवणे तसेच आयोडिनयुक्त मीठ वापराबाबत आरोग्य शिक्षण देणे, इत्यादी द्वारे आयोडिनयुक्त मीठाच्या वापरास उत्तेजन देणे ही महत्त्वाची कामे केली जातात.

### *राष्ट्रीय एडस् नियंत्रण कार्यक्रम*

१०.३७ राष्ट्रीय एडस् नियंत्रण कार्यक्रम हा राज्यात महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्थेमार्फत राबविण्यात येतो. जागृती मोहीम आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व तपासणी करणे हे राष्ट्रीय एडस् नियंत्रण कार्यक्रमाचे लक्ष्य आहे. त्याकरीता सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीज क्लिनिकमधील रोग्यांची व गर्भवती महिलांच्या रक्ताची नमुना तपासणी केली जाते. एचआयव्ही / एडस् विषयक आकडेवारी तक्ता १०.२१ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता १०.२१ एचआयव्ही/एडस् विषयक आकडेवारी**

| निर्देशक | २००७ | २००८ | २००९ | २०१० | २०११ |
|---|---|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती (हजारात) | १,१९९ | १,५६६ | २,०४२ | २,४६७ | २,८१८ |
| तीन चाचण्यांवरुन एचआयव्ही बाधीत (हजारात) | ६८ | ७० | ७२ | ७१ | ५७ |
| एचआयव्ही बाधीतांचे प्रमाण (टक्के) | ५.७ | ४.५ | ३.५ | २.९ | २.० |
| एडस् रुग्ण | ११,१३० | ११,७६५ | १०,१३० | १३,१८२ | १०,७५० |
| एडस्ने मृत्यू | ६६४ | १,०२७ | १,१८३ | १,५७४ | १,५८० |

*आधार* : महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था

### *आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द आणि होमिओपॅथी*

१०.३८ आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द आणि होमीओपॅथी (आयुष) हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा महत्त्वाचा घटक आहे. 'आयुष' कर्मचाऱ्यांकरीता प्रशिक्षण, 'आयुष' च्या पध्दतींना राष्ट्रीय आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या पध्दतींच्या मुख्य प्रवाहात आणणे, दर्जा राखण्यासाठी नियामक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे, संशोधन व विकास तसेच शासकीय व अशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट केंद्रांच्या निर्मिती व्यतिरिक्त अधिकृत प्रयोगशाळांसह प्रक्रिया तंत्रज्ञान केंद्र स्थापित करणे, इत्यादी कळीचे मुद्दे व व्यूहरचनांचा अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समावेश आहे. 'आयुष' अंतर्गत राज्यात ६२ आयुर्वेदिक महाविद्यालये, ४८९ आयुर्वेदिक दवाखाने, रुग्णालयाशी संलग्न आठ युनानी महाविद्यालये, २५ युनानी दवाखाने, रुग्णालयाशी संलग्न ४५ होमिओपॅथिक महाविद्यालये आणि एक शासकीय होमिओपॅथी रुग्णालय आहेत.

### *राज्य रक्त संक्रमण परिषद*

१०.३९ राज्य रक्त संक्रमण परिषद राज्यात सुरक्षित रक्ताचा व त्याच्या घटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करते. फेब्रुवारी, २०१२ पर्यंत परिषदेने १३४ ग्रामीण रुग्णालयांमध्ये रक्त साठवणूक केंद्रे स्थापन केली आहेत. सन २००० पासून सीकल सेल ग्रस्त मूले, थॅलेसेमिया व हिमोफेलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. राज्यात फेब्रुवारी, २०१२ अखेर २८१ नोंदणीकृत रक्तपेढ्या असून त्यापैकी ७७ शासकीय, १२ रेडक्रॉस सोसायटी संचलित, १७५ धर्मादाय संस्था संचलित व १७ खाजगी रक्तपेढ्या आहेत. रक्त संकलनाचा तपशिल तक्ता १०.२२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२२ रक्त संकलनाचा तपशिल**

(लाख युनिटमध्ये)

| वर्ष | रक्तपेढ्यांची संख्या $ | एकूण संकलन | पैकी ऐच्छिकपणे केलेले |
|---|---|---|---|
| २००७ | २५४ | १०.०७ | ८.१७ |
| २००८ | २५८ | १०.७८ | ८.९८ |
| २००९ | २६४ | ११.४६ | ९.७० |
| २०१० | २६९ | १२.६५ | १०.८१ |
| २०११ | २८० | १३.४३ | ११.९२ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

$ डिसेंबर अखेरची एकत्रित स्थिती

# महिला व बाल कल्याण

## महिला कल्याण

१०.४० संविधानातील विविध कलमांद्वारे स्त्री/पुरुष समानतेचे तत्व पालन करण्यास भारत वचनबद्ध आहे. या संविधानिक कटिबध्दतेच्या पूर्ततेसाठी महिला सक्षमीकरणासाठी विविध पाऊले उचलली आहेत जसे की, महिला केंद्रीत विविध विकास योजना, महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण २००१, इत्यादि.

## महिला कल्याण योजना

१०.४१ राज्य शासन महिलांच्या कल्याणासाठी अनेक महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी करीत असून त्या पुढिलप्रमाणे आहेत.

- शासकिय वसतीगृहे/आधारगृहे (सुधारित माहेर योजना): १६ ते ६० वर्ष या वयोगटातील निराश्रीत, अनाथ, परित्यक्ता, कुमारी माता, पीडित तथा संकटग्रस्त महिलांना आश्रय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासकिय वसतीगृहे/आधारगृहे स्थापन करण्यात आले आहेत. राज्यात अशाप्रकारची २० शासकीय वसतीगृहे व नऊ आधारगृहे आहेत.
- संरक्षणगृहे (महिला संरक्षणगृहे): अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९८५ अन्वये अनैतिक व्यवसायातून पोलिसांनी सोडवून आणलेल्या स्त्रियांचे व मुलींचे संरक्षण व त्यांच्या पुनर्वसनासाठी संरक्षणगृहे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात प्रत्येकी दोन शासकीय व स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणारी संरक्षणगृहे आहेत.
- व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी महिला मंडळाना अर्थसहाय्य: या योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यात एकूण ३३५ महिला प्रशिक्षण केंद्रे चालविली जात आहेत.
- आर्थिक दृष्टया मागास कुटुंबातील मुलींना शासन मान्य संस्थामध्ये व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी दरमहा ₹ १०० विद्यावेतन दिले जाते.
- गरीब, परित्यक्ता, अविवाहित माता, पीडित स्त्रिया यांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य: या योजनेअंतर्गत लाभार्थ्याला ₹ ५०० अर्थसहाय्य एक रकमी दिले जाते.
- दारिद्रय रेषेखालील विधवा स्त्रियांना त्यांच्या मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य : या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील विधवा स्त्रीस तिच्या मुलीच्या विवाहासाठी ₹ २,००० इतके अर्थसहाय्य दिले जाते.
- देवदासींच्या कल्याणासाठी राज्यशासनामार्फत निवृत्ती-वेतन योजना, विवाह अनुदान, मुला मुलींच्या शिक्षणासाठी सहाय्य, देवदासींच्या मुला मुलींकरिता वसतिगृह, इ. योजना राबविल्या जात आहेत.
- कौटुंबिक हिंसा, कलह, फूट, महिलांवरील अत्याचार, इ. बाबत सल्ला व मार्गदर्शन करण्याकरिता काही पोलिस ठाण्यांमध्ये महिला समुपदेशन केंद्रे स्थापन केली आहेत. ही योजना वर्ष २००६ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेंअंतर्गत राज्यात अशी ३९ महिला समुपदेशन केंद्रे असून प्रती केंद्रास वार्षिक ₹ २,३०,६६० इतका निधी देण्यात येतो.
- शुभमंगल योजना (सामूहिक विवाह योजना): लहान व सीमांतिक शेतकरी व शेतमजुरांमधील आत्महत्त्येच्या वाढत्या प्रमाणास आळा बसावा म्हणून शेतकरी व शेतमजुरांच्या मुलींच्या लग्नासाठी राज्य शासन सामुदायिक विवाह योजना राबवते. या योजने अंतर्गत, स्वयंसेवी संस्थेस ₹ २,००० प्रति जोडपे विवाह सोहळा आयोजित करण्यासाठी दिले जातात. वधूसाठी तिच्या वडिलांना घरगुती उपयोगाच्या वस्तू व मंगळसूत्र खरेदी करण्याकरीता ₹ १०,००० इतक्या रकमेचा धनादेश किंवा धनाकर्ष देण्यात येतो.
- समाजातील हुंडयाच्या प्रथेस आळा घालण्यासाठी प्रत्येक जिल्हयात जिल्हयाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, हुंडा निर्मुलन समितीस त्यांच्या कार्यासाठी प्रतीवर्षी ₹ ८,३०० अर्थसहाय्य देण्यात येते.

१०.४२ राज्यात अनेक केंद्रपुरस्कृत योजनांची सुध्दा अंमलबजावणी होते. सदर योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- वार्षिक उत्पन्न ₹ १६,००० पेक्षा कमी आहे अशा नोकरदार महिलांसाठी वसतिगृह : या योजनेअंतर्गत वसतिगृह चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस जमिनीच्या किंमतीच्या ५० टक्के व इमारतींच्या बांधकाम खर्चाच्या ७५ टक्के अनुदान केंद्र शासनामार्फत देण्यात येते. राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत ९,१७२ इतक्या महिलांकरीता १२७ वसतिगृहे आहेत.
- संकटात सापडलेल्या महिलांकरिता अल्पमुदती निवासस्थान : या योजने अंतर्गत राज्यात एकूण ९६० इतकी क्षमता असलेल्या ३२ संस्था कार्यरत आहेत.

- प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य (स्टेप) : या योजनेचे मुख्य उददीष्टे महिलांच्या छोटया गटांना चालना देणे, स्वयंरोजगार व कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे आणि रोजगार तथा उत्पन्न निर्मितीचे प्रकल्प सुरू करण्यासाठी मागे व पुढे अनुबंध पुरविणे ही आहेत. राज्यात एकूण तीन प्रकल्प कार्यान्वित असून त्याद्वारे ३९,७५० महिलांना लाभ मिळाला आहे.
- स्वाधार - संकटात सापडलेल्या महिलांसाठी योजना : संकटात सापडलेल्या महिलांना त्यांच्या पुनर्वसनासाठी संरक्षण, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेंतर्गत एकूण १,०५० इतकी क्षमता असलेले १८ प्रकल्प राज्यात कार्यान्वित आहेत.
- उज्वला : स्त्रियांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी उज्वला ही सर्वसमावेशक योजना असून या योजनेमध्ये पीडीतांची सुटका, पुर्नवसन तसेच कुटुंबाशी पुनर्मिलन करण्यासाठी सहाय्य करण्यात येते.

१०.४३ विविध महिला कल्याण योजनांचा तपशिल तक्ता १०.२३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२३ विविध महिला कल्याण योजनांचा तपशिल**

| योजना | २००७-०८ | | २००८-०९ | | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२# | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) |
| शासकिय वसतिगृहे / आधार गृहे /संरक्षण गृहे | १,४०० | ३.८६ | १,४०० | ४.६२ | १,४०० | ६.४१ | १,४०० | ६.३६ | १,४०० | ६.२७ |
| महिला मंडळांना अर्थसहाय्य | १४९ | ०.६४ | १११ | ०.४८ | ३७६ | ०.४५ | १०६ | ०.४६ | ८८ | ०.१९ |
| मुलींना विद्यावेतन | ४,९२५ | ०.४९ | २,५९० | ०.२६ | १,८८१ | ०.१९ | ८४८ | ०.९० | ९७६ | ०.०५ |
| स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य | २३,७१२ | १.१९ | १५,१२८ | ०.७६ | ७,४३० | ०.३७ | ३,४६६ | ०.१७ | १,५९२ | ०.०८ |
| विधवांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य | ५३७ | १०.७४ | ४२२ | ०.०८ | ३७३ | ०.०७ | ५२९ | ०.११ | २७१ | ०.०५ |
| देवदासींना निर्वाहनिधी | ४,००० | २.४० | ३,६४० | २.१८ | ३,७३९ | २.२४ | ३,४८६ | २.२४ | ५५७ | ०.३३ |
| शुभमंगल योजना | ५,७९८ | ६.३८ | ९,६२३ | ११.५५ | १०,५१८ | १२.६२ | ८,८९९ | १०.६८ | १५,८६७ | १९.०४ |

*आधार* : आयुक्तालय, महिला व बालविकास, महाराष्ट्र शासन # डिसेंबर, २०११ अखेर

## निर्णय प्रक्रियेत सहभाग

१०.४४ भारतीय महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत जरी महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात महिलांच्या सार्वजनिक जीवनातील सातत्यपूर्ण सहभागाच्या स्वरुपात त्याचे रूपांतर मात्र झाले नाही. भारत सरकारने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थातील लोकप्रतिनिधीत्वामध्ये एक-तृतियांश आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थातील हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. सदर ५० टक्के आरक्षण हे राज्यातील जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, तालुका पंचायतींचे सभापती व ग्रामपंचायतींचे सरपंच या पदांसाठी देखील लागू आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.४५ केंद्र व राज्य पुरस्कृत विविध विकास योजना राबविण्याकरीता, राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित केले आहे. माविम स्वसहाय्यित गट, वित्तिय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे संबंधित विभाग यांमधील समन्वय संस्था म्हणूनही काम करते.

१०.४६ आर्थिकदृष्टया सक्षमीकरणासाठी महिलांना उत्पादित संसाधनांची उपलब्धता व त्यावर त्यांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. तसेच त्यांना काही प्रमाणात आर्थिक स्वायतत्ता असणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणामध्ये महिलांनी एकत्र येणे याची महत्त्वाची भूमिका आहे. महिलांनी एकत्र येण्यासाठी स्व-सहायता गट हे एक चांगले माध्यम आहे. डिसेंबर, २०११ अखेर १२,२४३ गावांमधील ७.८९ लाख महिला ६१,०७२ स्व-सहाय्यित गटांमध्ये सहभागी झाल्या होत्या. या महिलांची एकूण बचत सुमारे ₹ १७६ कोटी होती आणि एकूण अंतर्गत कर्ज ₹ ४९३ कोटी होते. स्व-सहाय्यित गटांना विविध बँकांकडून ₹ ३८४ कोटी कर्ज मिळाले. गरीब महिलांचे सामाजिक, राजकीय

व आर्थिक सक्षमीकरणासाठी आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधीच्या सहाय्याने राज्यात जुलै, २००७ पासून 'तेजस्विनी, महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम' राबविला जात आहे. स्व-सहायता गटामार्फत महिलांची वैयक्तिक व सामुदायिक प्रगती हा सुध्दा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. योजनेची सुरवात झाल्यापासून ३१ डिसेंबर, २०११ अखेर एकूण ३,६८,८२२ इतके सभासद असलेले २७,८१३ स्व-सहायता गट स्थापन झाले आहेत. महिला सक्षमीकरणासाठी माविम मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा तपशिल तक्ता १०.२४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२४ महिला स्वसहाय्यित गट आणि त्यातील महिला सभासदांची संख्या (३१ डिसेंबर, २०११ रोजी )**

(संख्या)

| विवरण | स्वसहाय्यित गट | सभासद | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर मागासवर्गीय | अल्पसंख्यांक | भटक्या जमाती | इतर | एकूण |
| स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना | ९,६९० | २०,१८७ | २१,३०८ | ३३,८०३ | ३,४०७ | १३,०३० | २५,४६९ | १,१७,२०४ |
| स्वयंसिध्दा | ३,१२३ | ३,२९० | १६,४७८ | १०,६५४ | १,८८३ | ३,०४९ | ६,५७० | ४१,९२४ |
| माविम-अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत निधीतून | १८,००१ | २,१०,६१९ | ४,६७२ | ९,०४९ | १,९३१ | ४,४२९ | ३,८०० | २,३४,५०० |
| बिगर सरकारी संस्था-अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत निधीतून | ३,८९७ | ४३,९७२ | ६४३ | १,०८७ | ३८० | १,०३४ | ५४५ | ४७,६६१ |
| माविम-आदिवासी उपयोजना अंतर्गत निधीतून | ५,५६८ | ९४१ | ६४,५८९ | १,६८८ | १५६ | ८०२ | २६३ | ६८,४३९ |
| रमाई महिला सक्षमीकरण योजना | २,००१ | २,९४० | ४,२७९ | १४,२७८ | ५१७ | १,९१६ | १,५६८ | २५,४९८ |
| कृषी सप्तक योजना | २८६ | ४६२ | ४२२ | २,००२ | १४३ | ६३५ | २,४९२ | ६,१५६ |
| महिला स्वावलंबन निधी | १९७ | २६० | २१० | ४७७ | ३३९ | ३५८ | १,४८२ | ३,१२६ |
| तेजस्विनी | १४,१२८ | १२,४६६ | १३,००४ | ७०,६१३ | ८,५३४ | २०,१२१ | ५९,५६२ | १,८४,३०० |
| इतर | ४,१८१ | ६,७०७ | ९,४३३ | २५,९२३ | १,४६३ | ५,१३२ | ११,४९९ | ६०,१५७ |
| एकूण | **६१,०७२** | **३,०१,८४४** | **१,३५,०३८** | **१,६९,५७४** | **१८,७५३** | **५०,५०६** | **१,१३,२५०** | **७,८८,९६५** |

*आधार* : माविम, महाराष्ट्र शासन.

## बाल कल्याण

१०.४७ योजनाबद्ध, संरचित व शिस्तबध्द पध्दतीने बालकांचा विकास होण्यासाठी राज्य शासनाने २००२ मध्ये बालविकास धोरण लागू केले आहे. राज्यातील अनाथ, निराधार, बेघर व वाममार्गाला लागलेल्या बालकांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

## बाल कल्याण योजना

१०.४८ बालविकास धोरणातील उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरीता राज्यात बालकांचे संगोपन, त्यांचे संरक्षण व पुनर्वसन करण्याकरीता अनेक योजना राबविल्या जातात, त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

- बाल न्याय (मुलांचे संगोपन व संरक्षण) अधिनियम २००० (सुधारित नियम २००६) अंतर्गत, या अधिनियमाच्या कलम २९ अनुसार राज्य शासनाद्वारे गठीत बाल कल्याण समितीने शिफारस केलेल्या बालकांसाठी निरीक्षण गृहे, बालगृहे, स्वयंसेवी बालगृहे व राज्यगृहे कार्यरत आहेत. या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये ₹ २०.८० कोटी इतका खर्च झाला असून, वर्ष २०११-१२ मध्ये जानेवारी, २०१२ अखेर ₹ १५.१७ कोटी इतका खर्च झाला आहे.
- घरापासून वंचित असलेल्या मुला-मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात बालसंगोपन योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये ₹ १७.९८ कोटी इतका खर्च झाला असून, वर्ष २०११-१२ मध्ये जानेवारी, २०१२ अखेर ₹ २२.३६ कोटी इतका खर्च झाला आहे.

१०.४९ विविध बाल कल्याण योजनांचा तपशिल तक्ता क्र.१०.२५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२५ विविध बाल कल्याण योजनांचा तपशिल**

| योजना | २००७-०८ | | २००८-०९ | | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी | खर्च (₹ कोटी) |
| बालन्याय (मुलांचे संगोपन व संरक्षण) अधिनियम, २००० | ३४,२११ | ४५.५९ | ३३,९८१ | ५६.५६ | ३९,६८२ | ६०.३८ | ७१,८६६ | ७६.२७ | ७१,६८२ | ७३.२३ |
| बाल संगोपन योजना | ६,९०१ | ७.०६ | १४,०३४ | ७.७९ | १८,५४४ | ११.५३ | १७,४७८ | ९.५० | १७,६८१ | ३.७३ |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.५० ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील सहा वर्षाखालील बालकांचा योग्य विकास साधण्यासाठी, एकात्मिक सेवा पुरविणे ही 'एकात्मिक बाल विकास सेवा' या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत सहा वर्षाखालील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी लसीकरण, पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण आणि शालेय पूर्व शिक्षण अशा मूलभूत सेवा पुरविल्या जातात. हा कार्यक्रम ९७,४६२ अंगणवाड्या, १०,९०१ मिनी अंगणवाड्या आणि तालुका/गट पातळीवर स्थापन करण्यात आलेले ५५३ बालविकास प्रकल्प यांमार्फत राबविला जातो.

## पोषण कार्यक्रम

१०.५१ बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्या पोषण विषयक किमान गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी 'पूरक पोषण आहार' हा कार्यक्रम एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार, वर्ष २०१०-११ पासून बालकांचे सर्वसाधारण, साधारण कमी वजनाची व अति कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करण्यात आले आहे. पोषण श्रेणीनिहाय बालकांची टक्केवारी तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे. पोषण आहारावरील खर्च राज्य शासनाकडून केला जातो, तर पोषण आहाराव्यतिरिक्त इतर खर्चाची प्रतिपूर्ती ही पूर्णतः केंद्र शासनाकडून केली जाते. पूरक पोषण आहार कार्यक्रमाचा तपशिल तक्ता १०.२७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२६ बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | सर्वसाधारण बालके | साधारण कमी वजनाची | अति कमी वजनाची |
|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ग्रामीण | ७६.९ | २०.३ | २.८ |
| | आदिवासी | ६४.८ | २९.३ | ५.९ |
| | नागरी | ६७.१ | २९.२ | ३.७ |
| | **एकूण** | **७३.५** | **२३.१** | **३.४** |
| २०११-१२# | ग्रामीण | ८४.७ | १३.४ | १.९ |
| | आदिवासी | ७३.१ | २२.३ | ४.५ |
| | नागरी | ७३.३ | २४.७ | २.० |
| | **एकूण** | **८१.२** | **१६.५** | **२.३** |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन

# डिसेंबर, २०११ पर्यंत

**तक्ता १०.२७ पूरक पोषण आहार कार्यक्रमाचा तपशिल**

| वर्ष | क्षेत्र | लाभार्थी (संख्या लाखात) | झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| ग्रामीण (आदिवासी भागासह) | २००७-०८ | ५२.६१ | ३०५.४२ |
| | २००८-०९ | ५४.३७ | २९८.५२ |
| | २००९-१० | ५९.७१ | ४१८.०० |
| | २०१०-११ | ६२.३९ | ५८८.०० |
| | २०११-१२# | ६१.२८ | ५४३.२४ |
| नागरी | २००७-०८ | ९.५३ | ५२.४२ |
| | २००८-०९ | १०.२४ | ३३.०० |
| | २००९-१० | १२.८४ | ६९.०० |
| | २०१०-११ | १३.१८ | १४७.०० |
| | २०११-१२# | १२.४९ | १२५.७८ |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन

# डिसेंबर, २०११ पर्यंत

१०.५२ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत राज्यात राबविल्या जाणाऱ्या केंद्रपुरस्कृत योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) : ही योजना वर्ष २०११ पासून किशोरवयीन मुलींच्या (११ ते १८ वयोगट) सक्षमीकरणासाठी राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये २०७ प्रकल्पांमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत वर्ष २०११-१२ मध्ये डिसेंबर, २०११ अखेर ₹ २.१२ लाख इतका खर्च झाला आहे.
- गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य व पोषणाचा दर्जा सुधारावा या उद्देशाने इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यांमध्ये वर्ष २०११ पासून राबविण्यात येत आहे.

## महिला व बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे

१०.५३ स्त्रियांविरुध्द घडणाऱ्या विशेष गुन्ह्यांना स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे समजले जातात. स्त्री-पुरुष भेदभाव हेच अशा गुन्ह्यांमागचे एकमेव कारण असते. काही प्रमुख राज्यांतील स्त्रियांविरोधात गुन्ह्यांची २०१० मधील आकडेवारी तक्ता १०.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२८ काही प्रमुख राज्यांतील स्त्रियांविरोधात घडलेले गुन्हे (२०१०)**

(टक्केवारी)

| राज्य | गुन्ह्याचा प्रकार | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बलात्कार | अपहरण आणि पळवून नेणे | हुंडाबळी | पती व पतीच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार | विनयभंग | लैंगिक अत्याचार (छेडछाड) | अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा | इतर | एकूण |
| आंध्र प्रदेश | ६.१ | ५.१ | ७.० | १२.८ | ११.४ | ४५.८ | २१.९ | ३१.७ | १२.८ |
| बिहार | ३.६ | ८.६ | १५.० | २.४ | १.३ | ०.२ | १.० | १६.४ | ४.० |
| गुजरात | १.८ | ४.३ | ०.२ | ६.० | १.६ | १.१ | १.८ | ०.११ | ३.८ |
| जम्मु आणि काश्मिर | १.१ | २.८ | ०.१ | ०.२ | २.६ | २.६ | ०.२ | ०.०३ | १.२ |
| कर्नाटक | २.६ | २.० | ३.० | ३.७ | ६.३ | ०.८ | ९.७ | १७.६ | ४.१ |
| केरळ | २.९ | ०.६ | ०.३ | ५.१ | ७.२ | ५.४ | १२.४ | ०.७२ | ४.४ |
| मध्य प्रदेश | १४.१ | ३.५ | १०.६ | ४.० | १६.४ | ९.२ | ०.८ | १.१८ | ७.७ |
| **महाराष्ट्र** | **७.२** | **३.८** | **४.७** | **७.९** | **९.०** | **११.८** | **१२.२** | **०.६५** | **७.४** |
| राजस्थान | ७.१ | ८.३ | ५.५ | ११.९ | ५.८ | ०.२ | ३.३ | १.३६ | ८.५ |
| तामिळनाडू | ३.१ | ४.९ | २.० | १.७ | ३.५ | ६.४ | २२.७ | ३.४८ | ३.१ |
| उत्तर प्रदेश | ७.० | १८.४ | २६.४ | ८.५ | ६.९ | ०.१ | ०.९ | १.९ | ९.४ |
| पश्चिम बंगाल | १०.४ | ९.३ | ६.० | १८.९ | ६.१ | १.६ | २.२ | १.०३ | १२.२ |
| **भारतातील एकूण गुन्हे** | **२२,१७२** | **२९,७९५** | **८,३९१** | **९४,०४१** | **४०,६१३** | **९,९६१** | **२,४९९** | **५,६२४** | **२,१३,५८५** |

*आधार* : राष्ट्रीय गुन्हे अभिलेख केंद्र, भारत सरकार

१०.५४ सामान्यतः, बालकांवरील अत्याचार किंवा ज्या गुन्ह्यात बालक पीडित असतात असे गुन्हे बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे म्हणून विचारात घेतले जातात. याबाबतचा तपशिल तक्ता १०.२९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२९ बालकांविरुध्द घडलेले राज्यातील गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचे शीर्षक | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० |
| खून (एकूण) | २०७ | २१३ | १७८ | १८२ | २१४ |
| १) गर्भातील जीव | ४ | २ | ३ | १ | ३ |
| २) इतर | २०३ | २११ | १७५ | १८१ | २११ |
| बालकांवरील बलात्कार | ६५५ | ६१५ | ६९० | ६१२ | ७४७ |
| अपहरण आणि पळवून नेणे | ५५२ | ५९० | ५९८ | ५३४ | ७४९ |
| परित्याग | २५५ | २९७ | २७४ | २७४ | १९८ |
| इतर | १,१७२ | ९९२ | ९६९ | १,२९२ | १,३५६ |
| **एकूण** | **२,८४१** | **२,७०७** | **२,७०९** | **२,८९४** | **३,२६४** |

*आधार* : राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, महाराष्ट्र शासन

# रोजगार व दारिद्रय

## रोजगार

१०.५५ शासनाने रोजगार निर्मिती हा केंद्रबिंदू मानून नियोजन आराखडे व योजनांची आखणी केली आहे. कुशल व उत्पादक श्रमशक्तीचा सर्वसमावेशक विकास साधण्यामध्ये महत्वाचा सहभाग आहे. जरी रोजगार विषयक आकडेवारी व श्रमशक्तीबाबत, जनगणना हा विश्वासार्ह स्त्रोत असला तरी, जनगणना ही दर दहा वर्षांच्या अंतराने घेतली जाते, त्यामुळे मधल्या काळातील रोजगार विषयक माहितीसाठी दर पाच वर्षांनी 'रोजगार व बेरोजगार' या विषयावर राष्ट्रीय नमुना पाहणी तसेच आर्थिक गणना घेतली जाते. याशिवाय, संघटीत क्षेत्रातील रोजगार विषयक माहिती कारखाना अधिनियम, १९४८ नुसार नोंदणी झालेल्या कारखान्याकडून अनिवार्य विवरण पत्राद्वारे प्राप्त होते. याव्यतिरिक्त, रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम हा सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या आस्थापनातील रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देतो.

## जनगणना

१०.५६ जनगणना, २०११ मध्ये, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक कार्याबद्दलची माहिती गोळा करण्यात आली आहे. याबाबतचा तपशिल भारताचे महानिबंधक याच्याकडून अप्राप्त आहे. जनगणना १९९१ नुसार मुख्य कामगारांचे एकूण कामगारांशी टक्केवारी ९१.४ होती, ती कमी होऊन वर्ष २००१ मध्ये ८४.३ टक्के इतकी झाली. याचे मुख्य कारण कृषि व संलग्न क्षेत्रातील कामगारांच्या प्रमाणात झालेली घट हे होते. वर्ष १९६१ ते २००१ च्या जनगणनेप्रमाणे राज्यातील कामगारांची वर्गीकरणानुसार टक्केवारी तक्ता १०.३० मध्ये देण्यात आली असून २००१ च्या जनगणनेप्रमाणे विस्तृत आकडेवारी परिशिष्ट १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३० राज्यातील कामगारांच्या टक्केवारीची विभागणी**

| कामगारांचे वर्गीकरण | १९६१@ | १९७१@ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|
| **मुख्य कामगार** | **१००.०** | **१००.०** | **९१.०** | **९१.४** | **८४.३** |
| **(अ) कृषि व संलग्न कार्ये** | | | | | |
| शेतकरी | ४६.१ | ३५.५ | ३१.९ | ३०.० | २४.८ |
| शेतमजूर व मासेमारी | २३.८ | ३०.९ | २६.० | २५.९ | २०.३ |
| **(ब) बिगर कृषि कार्ये** | | | | | |
| खाणकाम व दगडखाण काम | २.२ | ०.३ | ०.३ | ०.३ | ०.४ |
| वस्तुनिर्माण (घरगुती व घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उद्योग) | ११.२ | १३.१ | १२.७ | १२.१ | ११.० |
| बांधकाम | १.३ | १.५ | २.० | २.४ | ३.४ |
| व्यापार | ४.५ | ६.७ | ६.५ | ७.८ | ७.१ |
| वाहतुक, साठवण व दळणवळण | २.४ | ३.० | ३.० | ३.४ | ४.३ |
| इतर | ८.५ | ९.० | ८.६ | ९.५ | १३.० |
| **सीमांतिक कामगार** | **-** | **-** | **९.०** | **८.६** | **१५.७** |
| **एकूण कामगार (कोटी)** | **१.८९** | **१.८४** | **२.६७** | **३.३९** | **४.१२** |

*आधार :* महानिबंधक भारत सरकार यांचे कार्यालय. @ सीमांतिक कामगार असे वर्गीकरण उपलब्ध नाही.

## आर्थिक गणना

१०.५७ आर्थिक गणना हा रोजगार विषयक माहितीचा आणखी एक स्त्रोत आहे. पीक उत्पादन व मळे वगळून सर्व आर्थिक कार्यांची (कृषि व बिगर कृषि), माहिती या गणनेत गोळा करण्यात येते. पाचवी आर्थिक गणना २००५ मध्ये घेण्यात आली. पाचव्या आर्थिक गणनेनुसार राज्यात कार्यरत व्यक्तींची संख्या १.१३ कोटी इतकी होती. आर्थिक कार्यानुसार रोजगाराचा तपशिल परिशिष्ट १०.८ व १०.९ मध्ये दिला आहे. देशात सहावी आर्थिक गणना एप्रिल-नोव्हेंबर २०१२ मध्ये घेण्याचे प्रस्तावित आहे.

## कारखान्यातील रोजगार

१०.५८ कारखाना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत कारखान्यांना संघटित क्षेत्र असे संबोधले जाते. वर्ष २०१० मध्ये, एकूण ३४,८६५ कार्यरत असलेल्या कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार सुमारे १७ लाख होता तर मागील वर्षी तो सुमारे १५ लाख होता. यापैकी, ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण १९ टक्के इतके होते. सर्वाधिक कामगार धातु व धातु उत्पादने (१७.९ टक्के), तर त्यापाठोपाठ वस्त्रोद्योग व परिधान करण्याची वस्त्रे (१२.४ टक्के), खाद्य उत्पादने, पेये व तंबाखूची उत्पादने (११.६ टक्के), रसायने व रासायनिक उत्पादने (१०.१ टक्के) आणि परिवहन सामग्री (९.० टक्के) या कारखान्यांमध्ये कार्यरत होते. सन २०१० मध्ये कारखान्यांतील रोजगारामधील महिला कामगारांचा हिस्सा अत्यल्प (चार टक्के) होता.

१०.५९ पुन:निर्माण वस्तू उद्योग प्रकारातील मूलभूत धातू व धातू उत्पादने या उद्योगामधील रोजगारात १९.७ टक्के वाढ झाली असून भांडवली वस्तु उद्योग प्रकारातील परिवहन सामग्री उद्योगामध्ये २६.३ टक्के इतकी लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार तक्ता १०.३१ मध्ये दिला आहे तर परिशिष्ट १०.१०, १०.११ व १०.१२ मध्ये महत्वाची औद्योगिक सांख्यिकी देण्यात आली आहे.

**तक्ता १०.३१ कारखान्यातील सरासरी दैनिक रोजगार**

(टक्के)

| उद्योग प्रकार | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० |
| ग्राहक वस्तू | ३३.० | ३१.३ | ३०.० | ३१.१ | २९.६ |
| पुन:निर्माण वस्तू | ३२.१ | ३२.० | ३४.६ | ३५.७ | ३६.२ |
| भांडवली वस्तू | २६.८ | २८.६ | २७.५ | २५.५ | २५.९ |
| इतर | ८.१ | ९.१ | ७.९ | ७.७ | ८.५ |

*आधार :* औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई.

## रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम

१०.६० रोजगार क्षेत्र माहिती हा केंद्रपुरस्कृत कार्यक्रम राज्यात राबविण्यात येतो. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामधील रोजगारविषयक माहिती गोळा करणे व रोजगार स्थितीत होणाऱ्या बदलांचे संनियंत्रण करणे हे रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक क्षेत्रामधील आकारमान विचारात न घेता सर्व आस्थापना व १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर कृषि खाजगी क्षेत्रामधील आस्थापनांकडून आकडेवारी गोळा केली जाते. तथापि, बृहन्मुंबईमध्ये २५ किंवा त्यापेक्षा अधिक कामगार असलेल्या बिगर कृषि आस्थापनांचा समावेश केला जातो. दिनांक ३१ डिसेंबर, २०११ रोजी राज्यातील एकूण अंदाजित रोजगार ६२.३ लाख असून त्यापैकी ४३ टक्के इतका रोजगार सार्वजनिक क्षेत्रातील होता. एकूण रोजगारात महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण २० टक्के होते. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगाराचा तपशिल तक्ता १०.३२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३२ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगाराचा तपशिल**

(संख्या हजारात)

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्र | | | खाजगी क्षेत्र | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| २००७-०८ | १,८०१ | ३८० | २,१८१ | १,३१० | २५६ | १,५६६ | ३,१११ | ६३५ | ३,७४६ |
| २००८-०९ | १,३३९ | २५५ | १,५९४ | १,२८० | २४९ | १,५२९ | २,६१९ | ५०४ | ३,१२३ |
| २००९-१० | १,२९१ | २९४ | १,५८५ | १,२५७ | २७७ | १,५३३ | २,५४७ | ५७१ | ३,११८ |
| २०१०-११ | १,७२१ | ४२३ | २,१४४ | २,०४८ | ४८५ | २,५३२ | ३,७६९ | ९०७ | ४,६७६ |
| २०११-१२$ | २,१५२ | ५५१ | २,७०३ | २,८३८ | ६९३ | ३,५३१ | ४,९९० | १,२४४ | ६,२३४ |

*आधार :* @ रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन $ अंदाजित

## रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे

१०.६१ बेरोजगार युवकांची रोजगार मिळण्यासाठी नोंदणी तसेच त्यांना स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन करण्याकरिता प्रत्येक जिल्हयामध्ये रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे स्थापन केली आहेत. राज्यात एकूण ३५ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांव्यतिरिक्त सहा विद्यापीठ अंतर्गत रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे, आठ अनुसूचित जमातीकरिता प्रशिक्षण तथा मार्गदर्शन केंद्रे आणि शारीरिक दृष्टया अंपगांकरीता एक विशेष केंद्र कार्यरत आहे.

१०.६२ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत नोंद असलेल्या व्यक्तींची संख्या २५.९६ लाख होती. वर्ष २०११ मध्ये या केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ७.४७ लाख इतकी असून अधिसूचित ३.४६ लाख रिक्त पदांपैकी १.९१ लाख व्यक्तींना रोजगार पुरविण्यात आला. या बाबतचा तपशिल परिशिष्ट १०.१३ मध्ये दिला आहे तर चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींची शैक्षणिक पात्रतेनुसार संख्या परिशिष्ट १०.१४ मध्ये दिली आहे.

## रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम

१०.६३ रोजगारास प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध कार्यक्रम राबवित असून त्यांचा तपशिल तक्ता १०.३३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३३ विविध रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थी**

| कार्यक्रम | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम @ | १०,८४९ | १०,९९५ | १३,३७९ | १९,५८२ | १०,८३६# |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम $ | ३३,५०० | ३५,९४३ | ३७,०८१ | ४१,२०७ | ४४,७३७ |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम + | ४२,३५२ | ४२,४४८ | ४३,३२९ | ३३,६६७ | १९,९३०# |

*आधार :* @ रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन # डिसेंबर २०११ पर्यंत
$ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.६४ राज्य शासन उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने वर्ष २००९-१० पासून राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करीत आहे. रोजगार मेळावे व त्याद्वारे पुरविण्यात आलेल्या रोजगाराचा तपशिल तक्ता १०.३४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३४ रोजगार मेळाव्यांचा तपशिल**

(संख्या)

| वर्ष | रोजगार मेळावे | उपस्थित उद्योजक | रोजगार मेळाव्यात उपस्थित असलेले बेरोजगार युवक | त्यापैकी रोजगार पुरविलेले |
|---|---|---|---|---|
| २००९-१० | १४४ | उ.ना. | ५१,२८३ | १०,९९४ |
| २०१०-११ | १९० | १,१३९ | ८९,५०० | २०,९०८ |

*आधार* : रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन उ.ना.- उपलब्ध नाही

## रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

१०.६५ दारिद्र्य निर्मूलन हे महत्त्वाचे उद्दिष्ट ठेऊन, देशातील श्रमशक्तीला रोजगार पुरविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध पाऊले उचलली आहेत. त्याचा तपशिल पुढे देण्यात आला आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम

१०.६६ राज्यात मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता सर्व जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम हा 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' या नावाने राबविण्यात येत आहे. ही योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम व पूर्वीची फक्त महाराष्ट्र शासनातर्फेच राबविण्यात येणारी देशातील एकमेव रोजगार हमी योजना (रोहयो) या दोन योजनांची एकत्रीत रोजगार योजना आहे. या योजनेअंतर्गत ज्या कुटुंबातील प्रौढ व्यक्ती अकुशल काम करण्यास इच्छुक आहे अशा कुटुंबाला ३६५ दिवस रोजगार पुरविण्याची हमी देण्यात आली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम योजनेची प्रगती तक्ता १०.३५ तसेच कामाच्या प्रकारानुसार संख्या व झालेला खर्च यांची माहिती परिशिष्ट १०.१६ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.३५ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम योजनेची प्रगती**

| तपशिल | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२# |
|---|---|---|---|---|---|
| रोजगाराची मागणी केलेल्या कुटुंबांची संख्या | ४,७४,६९५ | ९,०७,७८३ | ५,९१,६११ | ४,५३,९४१ | १०,६१,७३२ |
| रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या | ४,७४,६९५ | ९,०६,२९७ | ५,९१,५४७ | ४,५१,१६९ | १०,४९,२७३ |
| रोजगाराची मागणी केलेल्या कुटुंबाशी रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची टक्केवारी | १००.० | ९९.८ | १००.० | ९९.४ | ९८.८ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | १८९.०७ | ३६१.५४ | ३२१.०९ | ३५८.१२ | ९०४.७० |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | ४,७७८ | १०,७७८ | १०,६१३ | १८,७०७ | ४,९९० |
| रोजगार दिवस (कोटी) | १.९ | ४.२ | २.७ | २.० | ४.१३ |
| प्रती कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ३९ | ४६ | ४६ | ४४ | ३९ |
| रोजगारामध्ये अनु.जातीचा हिस्सा (टक्केवारी) | १८.४ | १६.५ | २५.६ | २२.० | ५.८ |
| रोजगारामध्ये अनु.जमातीचा हिस्सा (टक्केवारी) | ३८.५ | ४४.२ | ३३.२ | २५.६ | १७.७ |
| रोजगारामध्ये महिलांचा हिस्सा (टक्केवारी) | ४०.० | ४६.२ | ३३.७ | ४५.९ | ४६.० |
| एक दिवस रोजगार निर्मितीची किंमत (₹) | १०२ | ८६ | ११७ | १७९ | २१९ |

*आधार*: रोहयो व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन # १६ मार्च, २०१२ अखेर

## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

१०.६७ योजनेचा मुख्य उद्देश दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना बँकेचे कर्ज व शासनाचे अनुदान या दोन्हीद्वारे सातत्यपूर्व उत्पन्न निर्माण करणाऱ्या मत्ता पुरवून दारिद्र्य रेषेच्या वर आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील गरीब लोकांना स्वसहाय्यता गटांमध्ये संघटीत करणे, त्यांची क्षमता वृध्दी करणे, विविध कार्यसमूहांचे नियोजन, तसेच त्यांना पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, कर्ज व पणन संधी उपलब्ध करुन सूक्ष्म उद्योग विकास केला जातो. वर्ष २०११-१२ मध्ये, डिसेंबर, २०११ पर्यंत एकूण ८,०७९ वैयक्तिक स्वरोजगारींना ₹ ३०.४७ कोटीचे कर्ज (₹ ११.७१ कोटीचे अनुदान) तसेच ८,०३९ स्वसहाय्यता गटांना ₹ १८०.७८ कोटीचे कर्ज (₹ ७६.८७ कोटीचे अनुदान) वितरीत करण्यात आले. या योजनेची सविस्तर प्रगती परिशिष्ट १०.१७ मध्ये दिली आहे.

## स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना

१०.६८ स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना ही राज्यात राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टेः शहरी भागातील बेरोजगारांना आणि अल्प रोजगार मिळणाऱ्या गरीबांना पर्याप्त रोजगार उपलब्ध करुन शहरी दारिद्र्य निर्मूलन करणे, शहरी भागातील गरीबांना पणन किंवा स्वरोजगाराद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन त्यांना कौशल्य विकास व प्रशिक्षणासाठी सहाय्य करणे आणि स्वयंसंचालित समाज रचना आणि क्षमता वृध्दी कार्यक्रमांद्वारे शहरी भागातील दारिद्र्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी समाजाला सक्षम करणे ही आहेत. वर्ष २०१०-११ मध्ये स्वयंरोजगार कार्यक्रम अंतर्गत ७,४४९ लाभार्थ्यांवर ₹ १५.२१ कोटी खर्च झाला आहे. तर, वर्ष २०११-१२ मध्ये, डिसेंबर, २०११ पर्यंत सदर कार्यक्रम अंतर्गत १,३११ लाभार्थ्यांवर एकूण ₹ ४.६१ कोटी इतका खर्च झाला आहे. या योजनेची सविस्तर प्रगती परिशिष्ट १०.१७ मध्ये दिली आहे.

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.६९ पंतप्रधान रोजगार निर्मिती हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यामध्ये सन २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. मोठया प्रमाणावर विखुरलेल्या पारंपरिक कारागीर/बेरोजगार यांना एकत्रित आणण्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भागात नवीन स्वरोजगार उद्योगांची उभारणी करुन रोजगाराच्या संधी निर्माण करणे, ज्यायोगे ग्रामीण तरुणांचे शहरी भागात होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत करणे आणि ग्रामीण कारागीरांच्या वेतन अर्जित करण्याच्या क्षमतेमध्ये वाढ करणे, ही या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत सन २०१०-११ मध्ये एकूण ३,८९८ प्रकल्पांना ₹ ५५.३३ कोटी इतका निधी वितरित झाला होता, ज्यामधून ३१,७५२ इतका रोजगार निर्माण झाला. तर, सन २०११-१२ मध्ये डिसेंबर, २०११ पर्यंत एकूण १,२११ प्रकल्पांना ₹ १७.३० कोटी इतका निधी वितरित झाला असून त्यामधून ७,२९६ रोजगार निर्मिती झाली. या कार्यक्रमाची सविस्तर प्रगती परिशिष्ट १०.१७ मध्ये दर्शविली आहे.

## बीज भांडवल योजना

१०.७० बेरोजगार व्यक्तींना उद्योग, सेवा व व्यवसाय यासारखे स्वयंरोजगार सुरु करण्याकरिता वित्तिय संस्थांकडून प्राप्त करुन घ्यावयाच्या सुलभ कर्जासाठी बीज भांडवल पुरवून प्रोत्साहीत करणे असा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेखाली १८ ते ५० वयोगटातील सातवी पास झालेली स्थानिक बेरोजगार व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट लाभ घेण्यास पात्र आहे. वर्ष २०१०-११ मध्ये एकूण १,९७१ स्वरोजगार प्रकल्पांना ₹ १०.९६ कोटी इतके बीज भांडवल पुरवण्यात आले तर, वर्ष २०११-१२ मध्ये जानेवारी, २०१२ अखेर एकूण १,२०६ स्वरोजगार प्रकल्पांना ₹ ६.८५ कोटी इतके बीज भांडवल वितरीत करण्यात आले. या योजनेची सविस्तर प्रगती तक्ता १०.३६ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता १०.३६ बीज भांडवल योजनेची प्रगती**

| वर्ष | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|
| | प्रकल्पांची संख्या | वितरीत करावयाचे बीज भांडवल (₹ लाखात) | प्रकल्पांची संख्या | वितरीत केलेले बीज भांडवल (₹ लाखात) |
| २००७-०८ | ३,५२४ | १,५१७.६८ | १,३०३ | ८२७.९८ |
| २००८-०९ | १,७८० | १,११६.२२ | १,६४१ | ८८०.५५ |
| २००९-१० | १,६७८ | ९८८.७३ | १,८५५ | ९६३.८३ |
| २०१०-११ | १,०२८ | ७०१.२३ | १,९७१ | १,०९६.३० |
| २०११-१२# | १,९४९ | १,१६८.९५ | १,२०६ | ६८५.४७ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन # जानेवारी २०१२ पर्यंत

## औद्योगिक संबंध

१०.७१ वर्ष २०११ मध्ये काम थांबलेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) १३ होती. तर त्यामध्ये सहभागी कामगारांची संख्या ३,१६४ इतकी होती. तसेच मागील वर्षापासून चालत आलेल्या काम थांबण्याच्या प्रकरणासहित चालू वर्षातील संप व टाळेबंदीमुळे वाया गेलेल्या मनुष्यदिवसांची संख्या १५.७१ लाख होती. राज्यातील औद्योगिक विवादाबाबतचा तपशिल परिशिष्ट १०.१५ मध्ये दिला आहे.

## बंद उद्योग

१०.७२ वर्ष २०११-१२ मध्ये, फेब्रुवारी २०१२ अखेर बंद पडलेल्या लघु उद्योगांची संख्या १,७१४ होती तर त्यामधील बाधित कामगारांची संख्या ९,०५४ इतकी होती. तसेच, बंद पडलेल्या एकूण १४ मध्यम व मोठे उद्योगांमधील बाधित कामगारांची संख्या ११,३६० होती. राज्यातील बंद उद्योगांची सविस्तर माहिती तक्ता १०.३७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३७ बंद उद्योगांचा तपशिल**

| वर्ष | लघु उद्योग | | मध्यम व मोठे उद्योग | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | बाधित कामगार | संख्या | बाधित कामगार |
| २००७-०८ | ० | ० | १२ | ८६३ |
| २००८-०९ | ४२५ | ३,२७२ | ३० | ५,०१५ |
| २००९-१० | २,४१५ | १७,०२४ | १ | १२५ |
| २०१०-११ | ३४० | १,०१२ | ० | ० |
| २०११-१२# | १,७१४ | ९,०५४ | १४ | ११,३६० |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन # फेब्रुवारी, २०१२ अखेर

## दारिद्र्य

१०.७३ राष्ट्रीय नमुना पाहणीच्या 'उपभोग्य बाबीवरील खर्चाच्या' पंचवार्षिक फेऱ्यातील आकडेवारीवरुन योजना आयोगाकडून दारिद्र्याचे अंदाज प्रकाशित केले जातात. काही प्रमुख राज्यातील शिरगणतीचे गुणोत्तर (लोकसंख्येतील गरीबांचे प्रमाण) आणि दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची संख्या तक्ता १०.३८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३८ प्रमुख राज्यातील शिरगणतीचे गुणोत्तर आणि दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची संख्या**

| राज्य | शिरगणतीचे गुणोत्तर | | | | लोकांची संख्या (लाखात) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९७३-७४ | १९८३ | १९९३-९४ | २००४-०५# | १९७३-७४ | १९८३ | १९९३-९४ | २००४-०५# |
| आंध्र प्रदेश | ४८.९ | २८.९ | २२.२ | २९.९ | २२५.७ | १६४.६ | १५४.० | २३८.६ |
| बिहार | ६१.९ | ६२.२ | ५५.० | ५४.४ | ३७०.६ | ४६२.१ | ४९३.४ | ४८५.१ |
| गुजरात | ४८.२ | ३२.८ | २४.२ | ३१.८ | १३८.४ | ११७.९ | १०५.२ | १७१.७ |
| कर्नाटक | ५४.५ | ३८.२ | ३३.२ | ३३.४ | १७०.७ | १४९.८ | १५६.५ | १८५.६ |
| केरळ | ५९.८ | ४०.४ | २५.४ | १९.७ | १३५.५ | १०६.८ | ७६.४ | ६५.१ |
| मध्य प्रदेश | ६१.८ | ४९.८ | ४२.५ | ४८.६ | २७६.३ | २७८.० | २९८.५ | ३१६.९ |
| **महाराष्ट्र** | ५३.२ | ४३.४ | ३६.९ | ३८.१ | २८७.४ | २९०.९ | ३०५.२ | ३२१.५ |
| पंजाब | २८.२ | १६.२ | ११.८ | २०.९ | ४०.५ | २८.६ | २५.१ | ५३.७ |
| राजस्थान | ४६.१ | ३४.५ | २७.४ | ३४.४ | १२८.५ | १२६.८ | १२८.५ | २१०.० |
| तामिळनाडू | ५४.९ | ५१.७ | ३५.० | २८.९ | २३९.५ | २६०.१ | २०२.१ | १८७.० |
| उत्तर प्रदेश | ५७.१ | ४७.१ | ४०.९ | ४०.९ | ५३५.७ | ५५६.७ | ६०४.५ | ७३५.७ |
| पश्चिम बंगाल | ६३.४ | ५४.९ | ३५.७ | ३४.३ | २९९.३ | ३१८.७ | २५४.६ | २८९.४ |
| **भारत** | ५४.९ | ४४.५ | ३६.० | ३७.२ | ३,२१३.४ | ३,२२९.० | ३,२०३.७ | ४०८१.४ |

*आधार* : नियोजन आयोग, भारत सरकार # तेंडुलकर समितीच्या अहवालानुसार

१०.७४ केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना घेण्यास सुरुवात केली आहे. कुटुंबाच्या उपभोग्य बाबीवरील खर्चाच्या संकल्पनेवर आधारित 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना, १९९७' मध्ये काही मर्यादा होत्या. या मर्यादांवर मात करण्याकरिता दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना, २००२ मध्ये घेण्यात आली ज्यामध्ये जीवनमानाचा दर्जा दर्शविणाऱ्या घटकांना गुणांकन देण्याची पध्दत स्विकारण्यात आली. या पध्दतीमध्ये १३ सामाजिक-आर्थिक बाबी घेण्यात आल्या व प्रत्येक बाबीस शून्य ते चार गुण देण्यात आले. त्यापैकी काही महत्त्वाच्या बाबी कुटुंबाकडील लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र, घराचा प्रकार, कपडे परिधान उपलब्धता, अन्न सुरक्षा, स्वच्छता, इत्यादी होत्या. राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची ग्रामीण आणि नागरी भागानुसार टक्केवारी तक्ता १०.३९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३९ दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणनेनुसार टक्केवारी**

| क्षेत्र | १९९७ | | २००२ | |
|---|---|---|---|---|
| | एकूण कुटुंबे (हजारात) | एकूण कुटुंबांशी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची टक्केवारी | एकूण कुटुंबे (हजारात) | एकूण कुटुंबांशी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची टक्केवारी |
| ग्रामीण $ | ११,०५३ | ३४.६ | १२,५९३ | ३५.७ |
| नागरी # | ८,४८९ | ८.८ | ७,८१९@ | १८.२@ |

$ :- *आधार*: ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन # नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन @ आकडेवारी २००५ करीता.

## सामाजिक-आर्थिक व जातीनिहाय जनगणना २०११

१०.७५ वर्ष २०११ मध्ये भारत सरकारने प्रथमच देशात सामाजिक-आर्थिक व जातीनिहाय जनगणना घेण्याचे निश्चित केले आहे. या गणनेच्या क्षेत्र कामाला ऑक्टोबर, २०११ पासून सुरूवात झाली आहे. या गणनेअंतर्गत कुटुंबाचा धर्म व जात, निवास स्थिती, रोजगार व आर्थिक वैशिष्ट्ये, कुटुंबाकडील मत्ता, मालकीची जमिन, शैक्षणिक स्तर आणि कुटुंबातील सदस्यांचा व्यवसाय बाबत माहिती गोळा करण्यात येत आहे. काही पुर्वनिर्धारीत वैशिष्ट्यांवर आधारित बेघर कुंटुंब, निराधार/निराश्रित, सफाई कामगार, प्राचीन आदिवासी गट आणि कायदेशीर सुटका झालेले वेठबिगारी असे कुटुंबांचे वर्गिकरण केले जाईल. गोळा केलेल्या माहितीवरून वंचितता गुणांक तयार करून कुटुंबांना गुणानुक्रम दिला जाईल. महत्तम वंचित गुणांक असलेल्या कुटुंबाचा दारिद्र्य रेषेखालील यादीत प्रथम समावेश केला जाईल, त्यांनतर त्यापेक्षा कमी गुणांक असलेले कुंटुंब समाविष्ट करण्यात येईल. अशा प्रकारे नियोजन आयोगाने निश्चित केलेल्या दारिद्र्याच्या अंदाजानुसार कुटुंबांच्या संख्येची मर्यादा (कट्-ऑफ रेषा) ओलांडली जात नाही तोपर्यंत त्या सर्व कुटुंबांचा समावेश यादीमध्ये केला जाईल.

# गृहनिर्माण

१०.७६ आर्थिक वाढीमध्ये गृहनिर्माण क्षेत्र महत्वाचा घटक बनला आहे. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे घरांची मागणी आणि पुरवठा यामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे. ही दरी दुर करण्यासाठी राज्याने गृहनिर्माण धोरण आखले असून त्याचा उद्देश बेघर व्यक्तींना घरे उपलब्ध करुन देणे व राज्य झोपडपट्टीमुक्त करणे हा आहे. जनगणना २०११ नुसार, राज्यातील एकूण कुटुंबापैकी ८१.१ टक्के कुटुंबे हे स्वतःच्या घरात राहत होती तर १५.८ टक्के कुटुंबे ही भाडयाच्या घरात राहत होती.

# नागरी गृहनिर्माण

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

१०.७७ मुंबई तसेच राज्याच्या काही भागात किफायतशीर दरात घरे उपलब्ध करुन देऊन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाची (म्हाडा) गृहनिर्माण विकासात महत्वाची भूमिका आहे. स्थापनेपासून मार्च,२०११ अखेरपर्यंत, म्हाडाने एकूण ४,४७,१६९ सदनिकांचे बांधकाम व पुर्नविकास केला आहे. बांधलेल्या सदनिकांची संख्या आणि त्यावर झालेल्या खर्चाचा तपशिल तक्ता १०.४० मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४० म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिकांचा तपशिल**

| वर्ष | प्रवर्ग | | | | | एकूण सदनिका | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | |
| २००६-०७ | ९० | २,६७८ | १२८ | १,११३ | १५ | ४,०२४ | ३२६.५६ |
| २००७-०८ | १,६१८ | २,७२३ | ८८६ | ९४३ | २९ | ६,१९९ | २६६.३५ |
| २००८-०९ | १,५७८ | १,३०९ | ९३२ | ३४२ | २७ | ४,१८८ | ४९०.७६ |
| २००९-१० | ३,१८४ | ८,५४६ | १,१८५ | ८६० | २८ | १३,८०३ | ७८९.६९ |
| २०१०-११ | ३,२०४ | ३,८२९ | ८३६ | २७० | १०५ | ८,२४४ | ८५९.३३ |
| २०११-१२ @ | ३,१८१ | १,२९४ | ७१८ | ४६७ | १८० | ५,८४० | १,४५८.०७# |

*आधार* : म्हाडा, मुंबई @ नोव्हेंबर ,२०११ पर्यत # अर्थ संकल्पीय तरतुद

१०.७८ वर्ष २०१०-११ मध्ये म्हाडाच्या विविध गृहनिर्माण मंडळांमार्फत बांधलेल्या सदनिकांचा तपशिल तक्ता १०.४१ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.४१ वर्ष २०१०-११ मध्ये विविध गृहनिर्माण मंडळामार्फत म्हाडाने बांधलेल्या सदनिकांचा तपशिल**

| मंडळ | आर्थिक दुर्बल | अल्प उत्पन्न | मध्यम उत्पन्न | उच्च उत्पन्न | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ३,१६९ | ३,४१४ | ८४ | १४० | ७६ | ६,८८३ |
| कोकण | ० | ० | ५९० | ० | ० | ५९० |
| पुणे | ३५ | ११६ | ५६ | ० | ०८ | २१५ |
| नाशिक | ० | १५ | २३ | ६६ | १० | ११४ |
| औरंगाबाद | ० | ३९ | ४८ | ३० | ११ | १२८ |
| अमरावती | ० | ० | १६ | ०२ | ० | १८ |
| नागपूर | ० | ७५ | १९ | ३२ | ० | १२६ |
| मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्रचना | ० | १७० | ० | ० | ० | १७० |
| **एकूण** | **३,२०४** | **३,८२९** | **८३६** | **२७०** | **१०५** | **८,२४४** |

*आधार* : म्हाडा, मुंबई

## शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित

१०.७९ शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) ची स्थापना मुलतः नवी मुंबईचा विकास करण्यासाठी मार्च, १९७० मध्ये करण्यात आली. त्यानंतर सिडकोने औरंगाबाद, नांदेड व नाशिक शहरांमध्ये देखील विविध विकास प्रकल्प हाती घेतले. सिंधुदुर्ग जिल्हयाचे ओरस येथील जिल्हा मुख्यालय, वसई-विरार प्रकल्प व नागपूर जवळील बुटीबोरी क्षेत्रातील मेघदूतनगर यांच्या विकासासाठी राज्य शासनाने सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सिडकोने बांधलेल्या सदनिकांचा तपशिल तक्ता १०.४२ मध्ये दिला आहे

**तक्ता १०.४२ सिडकोद्वारे बांधण्यात आलेल्या सदनिका**

| प्रवर्ग | स्थापनेपासून २००७ पर्यंत | २००८ | २००९ | २०१० | २०११ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अत्यल्प/अल्प उत्पन्न गट | १,०८,३४९ | ० | ० | ० | १,१३६ | १,०९,४८५ |
| मध्यम उत्पन्न गट | ३७,४७५ | ० | ० | ० | ४७६ | ३७,९५१ |
| उच्च उत्पन्न गट | २८,१२४ | ४४० | ० | २५२ | ५३२ | २९,३४८ |
| एकूण | १,७३,९४८ | ४४० | ० | २५२ | २,१४४ | १,७६,७८४ |

*आधार* : सिडको

१०.८० सिडकोने स्थापनेपासून मार्च, २०११ पर्यंत एकत्रित मिळून १,७६,७८४ सदनिका नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक आणि नांदेड येथे बांधल्या आहेत. या एकूण सदनिकांपैकी ६९.२ टक्के सदनिका नवी मुंबईत बांधल्या असून त्या खालोखाल १३.९ टक्के नाशिकमध्ये तर १२.४ टक्के औरंगाबादमध्ये बांधल्या आहेत. माहे नोव्हेंबर, २०११ पर्यंत १,५२८ सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर असून त्यासाठी ₹ १३९ कोटी खर्च झाला आहे.

## जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

१०.८१ शहरांच्या सुयोजित विकासासाठी भारत सरकारने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान (जेएनएनयुआरएम) हा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. या अभियानाचे 'शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा' (बीएसयुपी) व 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' ( आयएचएसडीपी) या योजना राज्यात राबविण्यात येत असून सनियंत्रणासाठी म्हाडाची प्रमुख संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

## (१) शहरी गरीबांकरीता मूलभूत सुविधा

१०.८२ नागरी गरीबाच्या अनियोजीत व मुलभूत सुविधा नसलेल्या वसाहतीचा विकास करणे हे या अभियानाचा मुख्य उद्दिष्ट आहे. लाभार्थ्यांच्या गरजेनुसार मूलभूत सेवा व सामुहीक सुविधा असलेली घरे बांधणे हे या योजनेचे घटक आहेत. मुलभूत सुविधा असलेली घरे बांधण्यासाठी ५० टक्के भारत सरकारचे अनुदान, ३० टक्के अनुदान राज्य शासनाकडून, ९ टक्के अंमलबजावणी यंत्रणेकडून (राखीव वर्गासाठी १० टक्के) आणि उर्वरित ११ टक्के लाभार्थ्यांचे योगदान (राखीव वर्गासाठी १० टक्के) असते. संलग्न मूलभूत व सामूहिक सेवासाठी प्रकल्पाच्या किंमतीच्या ५० टक्के अर्थसहाय्य भारत सरकार देते तर प्रत्येकी २५ टक्के भार राज्य सरकार व अंमलबजावणी यंत्रणा उचलते. ही योजना राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व नांदेड या पाच शहरांमध्ये राबविण्यात येत आहे.

## (२) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम

१०.८३ पुरेसा निवारा व मुलभूत पायाभूत सुविधा झोपडपट्टीधारकाना पुरवून निरोगी वातावरण तयार करणे हा एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. जेएनएनयुआरएम-बीएसयुपी कार्यक्रमांतर्गत समाविष्ट केलेली पाच शहरे वगळून इतर शहरांमधील झोपडपट्टीवासियांसाठी ही योजना राज्य शासन राबवित आहे. या योजनेअंतर्गत भारत सरकारचे ८० टक्के अनुदान, आठ टक्के राज्य शासनाचे अनुदान (राखीव वर्गासाठी १० टक्के) आणि उर्वरित १२ टक्के लाभार्थ्यांचे योगदान (राखीव वर्गासाठी १० टक्के ) असते.

१०.८४ शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा व एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाची स्थिती तक्ता १०.४३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.४३ शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाची स्थिती (जानेवारी, २०१२ पर्यंत)**

| तपशिल | शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम |
|---|---|---|
| भारत सरकारने मंजूर केलेले प्रकल्प | ६१ | १०३ |
| घरांचे लक्ष्य | १,८२,८४१ | ९१,०६५ |
| प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | ६,८१८ | १,८२५.९२ |
| पूर्ण झालेल्या सदनिका | ४८,६३६ | १५,६९८ |
| प्रगतीपथावर असलेल्या सदनिका | ३७,०७० | २१,३२८ |

*आधार* : म्हाडा, मुंबई

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना

१०.८५ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मोठया प्रमाणात गरीबांना यशस्वीपणे निवारा पुरविण्यात आला आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाअंतर्गत योजनेच्या सुरुवातीपासून (१९९५) नोव्हेंबर,२०११ अखेरपर्यंत एकूण ८९३ प्रस्तावाची कामे पूर्ण करण्यात आली व १,५१,४८९ झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्यात आले.

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

१०.८६ झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम जलदगतीने होण्याच्या उद्देशाने १९९८ मध्ये " शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितची " स्थापना करण्यात आली. प्रकल्पाच्या स्थापनेपासून ऑक्टोबर,२०११ पर्यंत १०,६७३ सदनिका असलेल्या १११ इमारती बांधण्यात आल्या व त्यावर ₹ ४४६.५० कोटी खर्च झाला.

## बिडी कामगार घरकुल योजना

१०.८७ बिडी कामगारांचे राहणीमान सुधारण्यासाठी राज्य शासन जुलै, २००१ पासून बिडी कामगार घरकुल योजना राबवित आहे. या योजनेअंतर्गत सोलापूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नांदेड, औरंगाबादमधील गारखेडा व नागपूरमधील कामठी येथे घरे बांधण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत राज्य शासन व केंद्र शासन यांच्याकडून प्रतिघर ₹ २०,००० एवढे आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते. मार्च, २०११ पर्यंत एकूण ११,२८० इतकी घरे बांधण्याच्या लक्ष्यापैकी, ११,२४० घरे बांधून झाली आहेत. या शिवाय म्हाडाने पुणे, कोल्हापूर, नाशिक, नांदेड, सोलापूर, औरंगाबादमधील गारखेडा व नागपूरमधील कामठी येथील बिडी कामगारांसाठी ५,५९५ घरे बांधली आहेत.

# ग्रामीण गृहनिर्माण

## इंदिरा आवास योजना

१०.८८ इंदिरा आवास योजना राज्यात एप्रिल,१९८९ पासून ग्रामीण भागातील घरे नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी घरे बांधण्यासाठी राबविली जाते. ही केंद्र पुरस्कृत योजना असून यात केंद्र व राज्याचा हिस्सा ७५:२५ असा आहे. या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ६० टक्के व बिगर अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ४० टक्के अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. केंद्र शासनाने १ एप्रिल,२०१० पासून घराच्या बांधकामासाठी किंमत प्रत्येकी ₹ ४५,००० इतकी निश्चित केली आहे. राज्य शासनाने ही किंमत प्रत्येकी ₹ ७०,००० एवढी सुधारित केली आहे. हिस्स्याचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | केंद्र सरकार (७५ टक्के) | ₹ ३३,७५० |
| ब) | राज्य सरकार (२५ टक्के) | ₹ ११,२५० |
| | उप बेरीज | ₹ ४५,००० |
| क) | राज्य सरकारचा अतिरिक्त हिस्सा | ₹ २३,५०० |
| ड) | लाभार्थ्यांचा हिस्सा | ₹ १,५०० |
| | **एकूण** | ₹ ७०,००० |

**आलेख १०.५ : इंदिरा आवास योजनेखाली बांधलेली घरे व त्यावरील खर्च**




$ लक्ष्य, खर्च जानेवारी, २०१२ पर्यंत

टीप :उजव्या बाजूचा वाय - अक्ष खर्च दर्शवितो

१०.८९ भारत सरकारने २०११-१२ या वर्षासाठी १,५१,०६३ घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित केले असून त्यासाठी ₹ ५११.१७ कोटी इतक्या रकमेची अर्थसंकल्पिय तरतूद केली आहे तर राज्य शासनाने ₹ ५२४.९४ कोटीची तरतूद केली आहे. जानेवारी, २०१२ अखेरपर्यंत ८३,३८४ घरांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यासाठी ₹ ५९६.५२ कोटी इतका खर्च झाला. वर्ष २०१०-११ मध्ये १,५६,५७५ घरे बांधण्यात आली असून त्यासाठी ₹ १,०८० कोटी खर्च आला आहे

## राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना

१०.९० इंदिरा आवास योजनेअंतर्गत पात्र नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबांना निवारा पुरविण्यासाठी राज्य शासन २००५ पासून राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना राबवित आहे. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-I ही दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी आहे. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II ही दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांसाठी असून सदर योजना दारिद्र्य रेषेवरील परंतू अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी 'सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II' म्हणून सुधारित करण्यात आली आहे.

## राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-I

१०.९१ राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-I ही ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना स्वत:ची घरे बांधण्यासाठी ₹ २८,५०० इतके अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत ५१,५१० घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित केले असून त्यासाठी ₹ १४४.६१ कोटी इतका निधी ५०,८३४ लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे. या योजनेच्या सुरवातीपासून ऑक्टोबर,२०११ पर्यंत ४६,८१४ घरांचे काम पूर्ण झाले असून २,३३६ घरांचे काम प्रगतीपथावर आहे.

१०.९२ राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-१ अंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये ₹ ४५ कोटी रक्कम ३३ जिल्हयामध्ये सुवर्णमहोत्सवी ग्रामीण निवारा हक्क मोहीमेखाली ग्रामीण गरीबासाठी ६,५६० घरकुले बांधण्यासाठी वाटण्यात आली वर्ष २०११-१२ मध्ये ५७.६२ कोटी रुपयाची अर्थसंकल्पीय तरतुद या कामासाठी करण्यात आली असून त्यातील ₹ ३०.८१ कोटी इतकी रक्कम ४,४९१ घरकुलांसाठी वितरीत करण्यात आली.

## राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II

१०.९३ राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II ही ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांसाठी आणि बेघर व अत्यल्प भूधारकांसाठी राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत जिल्हयातील अग्रणी बँकेकडून लाभार्थ्यास ₹ ४५,००० इतके कर्ज पुरविण्यात येते. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून दिले जाते. या योजनेअंतर्गत ५१,५१० घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित केले असून ऑक्टोबर,२०११ पर्यंत ५७,९१२ घरांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३३,९१२ घरांचे प्रस्ताव विविध बँकांकडे सादर केले असून ३,९९६ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी ६७२ घरांचे काम पूर्ण झाले असून ९३३ घरांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

## सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II

१०.९४ सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II अंतर्गत दोन वर्षात दारिद्र्य रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी १,२५,००० घरे बांधण्याचे शासनाने ठरविले आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी जिल्हयातील अग्रणी बँकेकडून ₹ ९०,००० कर्ज पुरविले जाते. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून दिले जाते. या योजनेअंतर्गत ऑक्टोबर,२०११ पर्यंत ९१,१०७ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६६,७४४ घरांचे प्रस्ताव विविध बँकांकडे सादर केले असून १६,५६४ प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. एकूण ५,३९४ घरांचे काम पूर्ण झाले असून ४,२०१ घरांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

१०.९५ योजनेच्या सुरवातीपासून ऑक्टोबर,२०११ पर्यंत राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांचा तपशिल तक्ता १०.४४ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४४ राजीव गांधी ग्रामीण निवारा योजने अंतर्गत बांधण्यात आलेली घरे (योजनेच्या सुरुवातीपासून ऑक्टोबर,२०११ पर्यंत)**

| विभाग | राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना I | राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना II | सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना II | एकूण |
|---|---|---|---|---|
| कोकण | ७,७६२ | ९७ | ५३७ | ८,३९६ |
| पुणे | १०,७३० | १७५ | ३८१ | ११,२८६ |
| नाशिक | ११,१६३ | १९३ | ० | ११,३५६ |
| औरंगाबाद | ७,५४६ | ६ | ३५० | ७,९०२ |
| अमरावती | ३,६७६ | १३८ | १,९०२ | ५,७१६ |
| नागपूर | ५,९३७ | ६३ | २,२२४ | ८,२२४ |
| **एकूण** | **४६,८१४** | **६७२** | **५,३९४** | **५२,८८०** |

*आधार :* म्हाडा, मुंबई

# पाणी पुरवठा आणि स्वच्छता

१०.९६ मानवाचे आरोग्य हे प्रामुख्याने पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता आणि योग्य स्वच्छतेवर अवलंबून असते. केंद्र तसेच राज्य सरकार पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी विविध प्रकारच्या योजना राबवित आहे. जनगणना २०११ नुसार राज्यातील एकूण कुटुंबापैकी १) ६७.९ टक्के कुटुंबांकडे नळाद्वारे पाणी पुरवठा ही सुविधा होती. २) ३४ टक्के कुटुंबांकडे शौचालय सुविधा नव्हती.

## राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.९७ ग्रामीण पेयजल कार्यक्रम आता 'भारत निर्माण' हया कार्यक्रमांतर्गत ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधा व मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राबविण्यात येतो. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागात पिण्यायोग्य आणि पुरेसा पाणी पूरवठा कायमस्वरुपी करणे हा होय. २०१०-११ या वर्षात योजनेतंर्गत निर्धारीत केलेल्या ९,७४५ गावे/वाड्यापैकी ८,९८७ गावे//वाड्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून त्यासाठी ₹ १,३०० कोटी इतका खर्च झाला आहे. या कार्यक्रमांतर्गत मागील पाच वर्षात झालेल्या खर्चाची माहिती तक्ता १०.४५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४५ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत झालेला खर्च**

| वर्ष | हाताळलेली गावे /वाड्या | | खर्च (₹ कोटी ) |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | |
| २००६-०७ | ७,६७३ | ६,१५२ | ६९५.६० |
| २००७-०८ | १४,९७५ | ९,७८५ | १,०२१.१२ |
| २००८-०९ | १९,८७७ | १९,८७७ | ९४३.६४ |
| २००९-१० | ११,६३९ | ७,४६५ | १,०२६.७२ |
| २०१०-११ | ९,७४५ | ८,९८७ | १,३००.००* |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

१०.९८ वर्ष २०११-१२ मध्ये निर्धारित केलेल्या एकूण ६,५०२ वस्त्यांपैकी १,९३१ वस्त्या ऑक्टोबर, २०११ पर्यंत हाताळण्यात आल्या. वर्ष २०११-१२ मध्ये ऑक्टोबर, २०११ पर्यंत या कार्यक्रमांतर्गत वस्त्यांचा तपशिल तक्ता १०.४६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४६ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वस्त्यांचा तपशिल**

| विभाग | वस्त्यांची संख्या | |
|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य @ |
| कोकण | १,५८८ | ३०५ |
| पुणे | १,२८६ | ३२५ |
| नाशिक | १,२४९ | ४५७ |
| औरंगाबाद | १,१४५ | ४३६ |
| अमरावती | ५३२ | १८० |
| नागपूर | ७०२ | २२८ |
| **एकूण** | **६,५०२** | **१,९३१** |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन @ आक्टोबर ,२०११ पर्यत

## टंचाई निवारण कार्यक्रम

१०.९९ पाणी टंचाई निर्माण झालेल्या गावे/वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत टंचाई निवारण कार्यक्रम राबविला जातो. वर्ष २०११-१२ मध्ये राज्यात पडलेल्या असमान पावसामुळे टंचाई निवारण कार्यक्रम ३१ ऑक्टोबर, २०११ पर्यंत राबविला गेला. ऑक्टोबर, २०१० ते ऑक्टोबर, २०११ या कालावधीत हा कार्यक्रम राबविण्यात आलेल्या गावे/ वाड्यांची योजनानिहाय संख्या तक्ता १०.४७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४७ टंचाई निवारण कार्यक्रम राबविण्यात आलेली गावे / वाड्या**

| योजना | गावांची संख्या @ | | वाडयांची संख्या @ | |
|---|---|---|---|---|
| | २००९-१० | २०१०-११ | २००९-१० | २०१०-११ |
| नवीन विंधण विहिरी बांधणे | ३,१४१ | ८२९ | १,०६१ | ६७६ |
| नळ पाणी पुरवठा योजनेची विशेष दुरुस्ती | ८६३ | १९४ | ३२ | २६ |
| विंधण विहिरीची विशेष दुरुस्ती | ३,११८ | ६९१ | ६९० | २७८ |
| तात्पुरती पुरक नळयोजना | २७१ | ६९ | २० | ५ |
| टँकर / बैलगाडीने पाण्याचा पुरवठा | २,०७० | १,४८८ | १,५३५ | २५० |
| खाजगी विहिरीचे अधिग्रहण | ४,३४७ | २४ | ६१६ | ४० |
| विहिरी खोल करणे / गाळ काढणे | २३० | ० | १२७ | ० |
| बडक्या विहिरी बांधकाम | ४ | ६०५ | ० | ७४१ |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर ते ऑक्टोबर

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

१०.१०० महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात शासनाने महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियानांतर्गत तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा करण्याच्या उद्देशाने फायदेशीर सेवा शुल्क अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता साठीचीच दर्जेदार सेवा सुरु केली आहे. पाणी टंचाई व पाण्याच्या वाढत्या मागणीवर मात करुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा प्राथमिक उद्देश आहे फेब्रुवारी, २०१२ पर्यंत एकूण ₹ ७४३.१८ कोटी इतक्या खर्चाच्या ११० पाणी पुरवठा व मल:निसारण योजनांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून फेब्रुवारी,२०१२ पर्यंत ₹ २३५.६६ कोटी वितरित केले आहे.

१०.१०१ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांमधील कुटुंबियांना घरगुती नळ जोडण्या व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्याकरिता महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियानातंर्गत 'महाराष्ट्र गोल्डन ज्युबली नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना' सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत ९० टक्के अनुदान राज्य शासनाकडून व उर्वरीत १० टक्के हिस्सा लाभार्थी किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा

असतो. नळ जोडणीसाठी व शौचालय बांधकामासाठी कुटुंबाना अनुक्रमे ₹ ४,००० व ₹ १२,००० इतके अनुदान अनुज्ञेय असते. या योजनेंतर्गत ८४ स्थानिक संस्थांच्या ₹ ११८.६९ कोटी किंमतीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून यात ४०,००० लाभार्थ्यांचा समावेश आहे.

## शिवकालीन पाणी साठवण योजना

१०.१०२ पारंपरीक व अपारंपरिक उपाययोजनांद्वारे पाण्याचे संधारण करण्याच्या उद्देशाने पाण्याच्या स्त्रोतांचे सक्षमीकरण, छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक, पावसाचे पाणी अडविण्यासाठी डोंगराळ भागात तलाव बांधणी व या सारख्या इतर उपाययोजनांद्वारे पिण्याचे पाणी सातत्याने उपलब्ध होण्याच्या उद्देशाने राज्यात शिवकालीन पाणी साठवण योजना राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरुवातीपासून (२००१) ऑक्टोबर,२०११ पर्यंत, पाणी साठविण्याच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी ८,१८७ गावांची निवड केली होती. यापैकी ७,६३४ गावामध्ये पाणी साठवण्याचे काम हाती घेतले असून ७,६१३ गावांमधील कामे पूर्ण झाली आहेत व त्यासाठी एकूण ₹ २४५.५४ कोटी खर्च झाला.

१०.१०३ पावसाच्या पाण्याची साठवण ही जल संधारणाची पध्दत विशेषत: नागरी भागात लोकप्रिय झाली आहे. नगर रचनाकार व नागरी संस्था, रेन वॉटर हार्वेस्टींगमार्फत पाणी साठवण यंत्रणा निर्माण करणे कायदयाने सक्तीचे करीत आहेत. ऑक्टोबर,२०११ पर्यंत रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी ८,३४१ बांधकामे करण्यात आली. त्यापैकी ९४१ बांधकामे कोकण विभागात, ८७१ पुणे विभागात, २१२ नाशिक विभागात, २,७५० औरंगाबाद विभागात, १,६९२ अमरावती विभागात आणि १,८७५ नागपूर विभागात झाली आहेत.

## जलस्वराज्य योजना

१०.१०४ ग्रामीण भागातील पाणी पुरवठयाचा दर्जा आणि पर्यावरणास पूरक स्वच्छता सेवा सुधारणे ह्या उद्देशाने राज्य शासन सप्टेंबर, २००३ पासून 'जलस्वराज्य योजना' राबवित आहे. योजनेच्या सुरवातीपासून जुन,२०११ पर्यत ११.२७ लाख कुटुंबांना पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध केल्या असून त्यासाठी ₹ १,२२४.७६ कोटी इतका खर्च झाला आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे ३,००७ ग्रामपंचायती व ५,११९ गावे/वाडी/ वस्त्यांना नियमित पाणी पुरवठा होत आहे. जलस्वराज्य योजनेची जून,२०११ पर्यंतची प्रगती तक्ता १०.४८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.४८ जलस्वराज्य योजनेची जून, २०११ पर्यंतची प्रगती**

| विभाग | ग्रामपंचायतींची संख्या | | |
|---|---|---|---|
| | निवडलेल्या | प्रकल्पातील | पूर्ण |
| कोकण | ३५३ | ३२३ | ३१७ |
| पुणे | ५११ | ४७४ | ४७१ |
| नाशिक | ३८० | २८८ | २८६ |
| औरंगाबाद | ८५२ | ८१२ | ७९० |
| अमरावती | ५५४ | ४६४ | ४६१ |
| नागपूर | ७४१ | ६४६ | ६४१ |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन

## ग्रामीण पाणी पुरवठा 'आपलं पाणी' प्रकल्प

१०.१०५ जर्मन गव्हर्नमेंट डेव्हलपमेंट बँकेच्या अर्थसहाय्याने ग्रामीण पाणी पुरवठा 'आपलं पाणी ' प्रकल्प पुणे, औरंगाबाद व अहमदनगर हया तीन जिल्हयात राबविला जात आहे. शाश्वत पाणीपुरवठा, पाणलोट क्षेत्र विकास तसेच परिपूर्ण भूजल व्यवस्थापन, इत्यादी द्वारे आरोग्य व स्वच्छता यामध्ये सुधारणा करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पात सक्रीय सहभागासाठी स्थानिक संस्थांचे सबळीकरण करणे हे देखील त्यात समाविष्ट आहे. जलस्वराज्य योजनेच्या धर्तीवर हा प्रकल्प राबविला जात आहे. ३१ मार्च, २०११ पर्यंत २३५ ग्रामपंचायतींच्या, ८३३ लोकवस्त्यांमध्ये २५४ योजनांतर्गत पाणी पुरवठा करण्यात आला असून यासाठी एकूण ₹ १०२.६९ कोटी इतका खर्च झाला. या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून ते ३१ मार्च, २०११ पर्यंतची प्रगती तक्ता १०.४९ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता १०.४९ 'आपलं पाणी' प्रकल्पाची (सुरवातीपासून ३१ मार्च, २०११ पर्यंत) प्रगती**

| तपशील | संख्या |
|---|---|
| यशस्वीरित्या राबविण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजना | २५४ |
| प्रकल्प राबविण्यात आलेल्या ग्रामपंचायती | २३५ |
| प्रकल्प राबविण्यात आलेल्या वस्त्या | ८४० |
| पूर्वी टँकरग्रस्त असलेल्या व आता पाणीपुरवठा सुरु झालेल्या लोकवस्त्या | ८३३ |
| भौतिकदृष्टया पूर्ण झालेल्या योजना | २५३ |
| हागणदारीमुक्त ग्रामपंचायती | ९२ |
| निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती | ५२ |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन

## एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम

१०.१०६ पाणलोट विकास म्हणजे पाण्याचे संवर्धन, पुनर्निर्मिती आणि विवेकशील पध्दतीने नैसर्गिक साधन संपत्तीचा (जसे जमीन, पाणी, वनस्पती, प्राणी) वापर होय. वर्ष २००८ मध्ये, भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालयाने पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी सामाईक मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम हा कार्यक्रम २००९ मध्ये सुरु केला आहे. तक्ता १०.५० मध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाचा तपशिल दिला आहे.

**तक्ता १०.५० एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम**

| वर्ष | प्रकल्प संख्या | क्षेत्र (लाख हे.) | प्रकल्प किंमत (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २००९-१० | २४३ | ९.९६ | १,२५५.०८ |
| २०१०-११ | ३७० | १६.१४ | २,०२३.१६ |
| २०११-१२ | २१५ | ९.३७ | १,१९४.८० |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन

### संपूर्ण स्वच्छता अभियान

१०.१०७ शौचालये बांधून व त्याद्वारे उघड्यावरील उत्सर्गाची पध्दत पूर्णपणे बंद करुन आरोग्य व स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने २००२ मध्ये ग्रामीण भागात संपूर्ण स्वच्छता अभियानास सुरुवात केली. या योजनेत जून, २०११ पासून शासनाने वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी असलेला अनुदानाची मर्यादा ₹ २,५०० वरुन ₹ ३,५०० पर्यंत वाढविली आहे. यामध्ये केंद्राचे ₹ २,२००, राज्याचे ₹ १,००० व लाभार्थ्याचे ₹ ३०० असे हिस्याचे प्रमाण आहे. डोंगराळ व अतिदुर्गम भागासाठी, वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान ₹ ४,००० असून त्यापैकी केंद्र हिस्सा ₹ २,७००, राज्य हिस्सा ₹ १,००० व लाभार्थी हिस्सा ₹ ३०० इतका आहे. अभियानाच्या सुरवातीपासुन ते नोव्हेंबर,२०११ पर्यत एकूण ६७.६ लाख कुटुंबासाठी स्वतंत्र शोचालय बांधण्यात आली असून त्यापैकी, ३७ टक्के शौचालये दारिद्रय रेषेखालील कुटूंबासाठी होती. याच कालावधीत १,५०७ ग्रामीण आरोग्यकारी मार्ट बांधण्यात आले. तक्ता १०.५१ मध्ये राज्यात संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत झालेली भौतीक प्रगती दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता १०.५१ संपूर्ण स्वच्छता अभियानाची प्रगती**

| प्रवर्ग | भौतिक प्रगती (संख्या) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२@ |
| दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ४,४५,०७७ | ३,४४,३९७ | ३,५१,८९८ | २,६५,२१८ | ९६,५३३ |
| दारिद्रय रेषेवरील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ७,४६,५६६ | ५,१०,१६६ | ५,८२,९८१ | २,९६,९६५ | १,१५,२३० |
| सार्वजनिक शौचालय | ५८७ | ३६१ | ८५४ | १,४२४ | २८७ |
| शालेय शौचालय | २६,५६२ | ८,८७१ | ३,५४० | ४,२२२ | ५८ |
| अंगणवाडी शौचालय | २०,५५८ | ५,९९२ | ३,७३५ | १,५७४ | ६१ |

*आधार* : पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर, २०११ पर्यन्त

### संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान

१०.१०८ राज्यातील सर्व नागरी स्वराज्य संस्थामध्ये हे अभियान राबविल्या जात आहे. या अभियानामुळे पाणीपुरवठा, मलःनिसारण, कचरा व्यवस्थापन या क्षेत्रात सातत्याने सुधारणा होण्यास मदत झाली आहे. या अभियानाअंतर्गत वर्ष २०१०-११ मध्ये ₹ ६.५ कोटी एवढा खर्च झाला आहे. वर्ष २०११-१२ साठी ₹ ६ .५ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

### एकात्मिक कमी खर्चाची शौचकूप बांधकाम योजना

१०.१०९ एकात्मिक कमी खर्चाची शौचकुप बांधकाम योजना ही "मागणी नुसार" प्रकाराची योजना आहे. झोपटपट्टी व अनाधिकृत वसाहती जेथे शौचकूपे नाहीत किंवा कोरडी शौचालये आहेत त्यांचेसाठी शौचकुपे सुविधा देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेतंर्गत नागरी भागातील आर्थिक दृष्टया मागास गटातील (ज्याचे सर्व स्त्रोतांपासून मासीक उत्पन्न ₹ ३,३०० पेक्षा कमी आहे ) अशा व्यक्ती अनुदान मिळण्यास पात्र आहेत. शौचकूपे बांधण्यासाठी केंद्र शासनाकडून ७५ टक्के राज्याकडून १५ टक्के अनुदान पुरविले जाते तर लाभार्थ्याचा १० टक्के सहभाग आहे. या योजनेअंतर्गत केंद्रशासनाने १६ नागरी संस्थांच्या २१ प्रस्तावांना मान्यता दिली असून त्या अंतर्गत ३९,६६३ वैयक्तिक शौचालये बांधण्यात येणार असून त्यापैकी ६,९७८ शौचालये बांधण्यात आली आहेत तर ४,५८७ शौचालयाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. योजनेअंतर्गत नोव्हेंबर, २०११ पर्यत ₹ १२.८२ कोटी इतका खर्च झाला आहे. वर्ष २०११-१२ साठी ₹ ११.०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## पर्यावरण संवर्धन

१०.११० नैसर्गिक साधन संपत्तीचा वेगाने होणारा संख्यात्मक व गुणात्मक ऱ्हास यामुळे त्याचे व्यवस्थापन व संवर्धन यासाठी चिंता वाढवणारा आहे. केंद्र तसेच राज्य शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतलेला आहे.

१०.१११ महाराष्ट्र जल प्रदूषण प्रतिबंध अधिनियम १९६९ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना १९७१ साली झाली. जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९७४ राज्यात १९८१ साली लागू झाला. हे मंडळ राज्याला पर्यावरणाशी निगडीत विषयांवर मार्गदर्शन तसेच हवेची गुणवत्ता, नद्या, खाडी/समुद्र, भूजल दर्जा, औद्योगिक सांडपाणी व ध्वनी प्रदूषण यावर संनियंत्रण करते.

### वायू प्रदुषण

१०.११२ परिवहन, स्थिर साधनांतील इंधन ज्वलन, ज्वलनासाठी वापरलेले इंधन जसे कोळसा, लाकूड, वाळलेले गवत इ. आणि बांधकाम उद्योग ही वायू प्रदुषणाची प्रमुख कारणे आहेत. विविध शैक्षणिक संस्थांच्या मदतीने राज्याच्या १७ जिल्ह्यातील ८२ ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ वायुच्या गुणवत्तेचे संनियंत्रण करीत आहे. हे नियंत्रण राष्ट्रीय वायू गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम, राज्य वायु गुणवत्ता

संनियंत्रण कार्यक्रम व अखंडित वायू संनियंत्रण केंद्र इ.अंतर्गत करण्यात येत आहे. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कमी गंधक असलेले डिझेल वापरणे, शिसे रहीत पेट्रोल वापरणे, सीएनजी/एलपीजी हे पर्यायी इंधन वापरणे, पीयुसी अनिवार्य करणे, १५ वर्षे झालेल्या वाहनांवर बंदी घालणे आणि आठ वर्षे पूर्ण झालेल्या वाहनांना सीएनजी/एलपीजी वापरण्यासाठी रुपांतर करणे अशा उपाय योजना करण्यात येत आहेत.

### जल प्रदूषण

१०.११३ राष्ट्रीय जल गुणवत्ता कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे जागतिक पर्यावरण संनियंत्रण यंत्रणा (जेम्स) व भारतीय राष्ट्रीय जलस्त्रोत नियंत्रण (मिनार्स) प्रकल्प राबवित आहे. सद्य:स्थितीत, मंडळाद्वारे २०० ठिकाणी जमिनीवरील पाण्याचे व ५० ठिकाणी भूजलाचे असे २५० केंद्राचे संनियंत्रण करण्यात येत आहे. मंडळाने 'जल व वायू प्रदूषण अधिनियम' अंतर्गत २०१०-११ मध्ये विविध उद्योगांना स्थापना किंवा विस्ताराबाबत १३,८४३ संमती पत्रे दिली आहेत. या अधिनियमातील तरतूदीनुसार मंडळाने विशिष्ट उद्योग व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यांनी वापरलेल्या पाण्यासाठी ₹ ३०.४२ कोटी एवढी पाणी पट्टी वसूल केली आहे.

### ध्वनी प्रदूषण

१०.११४ ध्वनी प्रदूषण हा तिसऱ्या क्रमांकाचा अतिहानीकारक पर्यावरण प्रदूषणाचा प्रकार असून, हा एक प्रमुख पर्यावरणाचा प्रश्न आहे ह्याची संपूर्ण जगास जाणीव झाली आहे. ध्वनी प्रदूषणामुळे मनुष्याच्या आरोग्यावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामाच्या वाढत्या जाणीवे बरोबरच पर्यावरणातील ध्वनीप्रदूषणाबाबतची सहनशीलता कमी होणाऱ्या लोकांच्या संख्येत भर पडत आहे. ध्वनी प्रदूषण अधिनियम २०००-अन्वये औद्योगिक, निवासी, वाणिज्यिक आणि शांतता विभाग असे भाग पाडण्यात आले आहेत. यामुळे विशिष्ट भागात ध्वनी स्तर विशिष्ट डेसिबल पर्यंत मर्यादित केले आहेत. ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी सणासुदीच्या काळात १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या फटाक्यांवर बंदी तसेच सण साजरे करताना ध्वनिवर्धक लावणे व मोठ्या आवाजाचे फटाके वाजविणे यावर वेळेचे बंधन घालण्यात आले आहे.

### जमिनीचे प्रदूषण

१०.११५ जमिनीचे प्रदूषण म्हणजे एखाद्या विभागातील मातीची गुणवत्ता कमी होवून ती जमीन दूषित व वापरण्यास अयोग्य होते. फक्त खते आणि कीटकनाशके त्यासाठी जबाबदार नाहीत तर आणखीही काही बाबीसुध्दा त्यासाठी कारणीभूत आहेत. मातीच्या प्रदूषणाची इतर कारणे कारखान्यातील कचरा जसे घातक वायू व रसायने, अयोग्य व घातक सिंचन प्रक्रिया, कुजलेल्या वस्तुवरील अयोग्य प्रक्रिया व व्यवस्थापन, आम्लाचा पाऊस, कारखान्यातून निघणारा धूर पावसात मिसळणे, वाहनातील इंधन गळती तसेच मोठ्या डंपिंग ग्राऊंड किंवा नदी व तिच्या प्रवाहात टाकलेल्या कचऱ्याची चुकीची विल्हेवाट व अनारोग्यकारक व्यवस्थापन यामुळे भर पडली आहे. प्रदूषणाचे जमिनीवरील परिणाम भयावह असून ते पर्यावरणाचा समतोल व जमिनीवरील प्राणीमात्रांच्या आरोग्यास घातक ठरु शकतात.

### घातक कचरा

१०.११६ महाराष्ट्रात ५,४२८ घातक कचरा निर्माण करणारे कारखाने आहेत. राज्यामध्ये प्रतिवर्षी अंदाजित १८ लाख मे. टन एवढा घातक कचरा निर्माण होतो. एकूण ५,९६९ कारखान्यांनी घातक कचरा व त्याची विल्हेवाट लावणे यासाठी सभासदत्व घेतले आहे. कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विविध पाऊले उचलत आहे. राज्यात घातक टाकाऊ कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी तळोजा, ठाणे जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्र, पुणे जिल्ह्यातील रांजणगाव आणि नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी येथे चार प्रमुख केंद्रांची उभारणी केली आहे. ज्या उद्योगांनी घातक कच-याची आवारातच बेकायदा साठवण आणि विल्हेवाट केली आहे अशा ५९ उद्योगांना घातक कचरा व्यवस्थापन, हाताळणी व हद्द नियम २००८ अन्वये मंडळाने दंड आकारला आहे तसेच अशा उद्योगांना त्यांच्या आवारात असलेला घातक कचरा सार्वजनिक घातक कचरा प्रक्रिया साठवणूक व विल्हेवाटीची सुविधा असलेल्या केंद्रांवर पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सप्टेंबर, २०११ पर्यंत अशा दोषी उद्योगांकडून मंडळाने एकूण ₹ ४३.३० लाख एवढी दंडांची रक्कम वसूल केली आहे.

१०.११७ घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली अथवा नाही याचा मागोवा घेणे यासाठी घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांमध्ये ग्लोबल पोजिशनिंग सिस्टम (जी. पी. एस.) राज्याने अनिवार्य केली आहे. सद्यस्थितीत २०० घातक कचरा वाहतूकदारांनी ही प्रणाली आपल्या वाहनांवर बसविली आहे.

### प्रमुख अपघाती घातक कारखाने

१०.११८ जर कारखान्यातील घातक पदार्थांचा साठा किंवा वापर हा 'वस्तूनिर्माणासाठी घातक रसायनांची आयात अधिनियम १९८९' आणि 'रासायनिक दुर्घटना (विपत्काल, नियोजन, तयारी आणि प्रतिक्रिया अधिनियम,१९९६)' विहीत मर्यादेच्या बाहेर असतील तर सदर कारखाने प्रमुख अपघाती घातक या अंतर्गत येतात. सुरक्षा आणि आरोग्याच्या परिमाणाप्रमाणे व्यवस्थापनाला माहिती व खात्री द्यावी लागते. व्यवस्थापन कामगारांना, घातक रसायनांचा वापराबाबतची माहिती व हाताळणी याबाबत प्रशिक्षण देते. कारखान्यात होणारे अपघात टाळण्यासाठी अंतर्गत अपघात प्रतिबंधक योजना अनुसरावी लागते. काही अपघातांचे परिणाम फक्त कारखान्यांपुरतेच मर्यादित रहात नाहीत तर नजिकच्या क्षेत्रावर सुध्दा त्याचा परिणाम होतो. यासाठी बाह्यक्षेत्रातील अपघात प्रतिबंधक योजना अस्तित्वात आणली जाते. यासाठी दुर्घटना, अपघाताच्या ठिकाणी तांत्रिक मार्गदर्शन व नियंत्रणासाठी राज्य, जिल्हा आणि स्थानिक स्तरावर दुर्घटना प्रतिबंधक गट स्थापन केले

जातात. एमएसआयएचसी अधिनियम १९८९ अंतर्गत महाराष्ट्रात ३६५ ( मुंबई-१६, ठाणे-१८, वसई-२२, कल्याण-२५, रायगड-६०, नाशिक-२९, पुणे-१११, कोल्हापूर-२४, औरंगाबाद-३१, नागपूर-२३ आणि अकोला-६) प्रमुख घातक अपघात कारखाने आहेत. या कारखान्यांनी त्यांच्या ठिकाणी आपत्कालीन योजना तयार केल्या आहेत आणि त्याची प्रात्याक्षिके नियत कालावधीत आयोजित केली जातात.

## ई-कचरा

१०.११९ ई-कचऱ्यामध्ये हेलोजनेटेड कंम्पाउंडस, जड धातू तसेच किरणोत्सारी पदार्थ असे आरोग्य व पर्यावरणास अपायकारक असणारे घटक असतात. मंडळाने ई-कचरा यास अग्रक्रम क्षेत्र म्हणून घोषित केले असून या उद्योगातील गुंतवणुकदारांमध्ये याबाबत जाणीव निर्माण करण्यास पुढाकार घेतला आहे. मंडळाने पर्यावरणाच्या दृष्टीने प्रभावी तंत्रज्ञान असलेल्या सात उद्योगांना ई-कचरा पुन:प्रक्रियेसाठी अधिकृत केले असून त्यांची एकूण पुन:प्रक्रिया क्षमता प्रतिवर्षी १०,०५० मे. टन इतकी आहे. मंडळाने प्रतिवर्षी ५०,००० टन एवढा ई-कचरा निर्माण होण्याची धोक्याची सूचना दिली आहे. मंडळाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासोबत देशातील पहिले एकात्मिक ई-कचरा पुन:प्रक्रिया सुविधा केंद्र सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्त्वावर सुरु करण्याचे निश्चित केले आहे.

## जैव वैद्यकीय कचरा

१०.१२० राज्यात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत भारत सरकारच्या जैव-वैद्यकीय (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ कायद्याची अंमलबजावणी करण्यात येते. राज्यात एकूण ३५ सामूहिक जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व विल्हेवाट केंद्रे कार्यरत असून त्यापैकी २९ केंद्रे भस्मीकरणावर आधारीत व उर्वरीत केंद्रे जमिनीत खोलवर पुरण्याच्या पद्धतीवर आधारीत आहेत.

## वातावरण बदल

१०.१२१ राज्य सरकारने वातावरण बदलाच्या होणा-या परिणामाच्या अनुषंगाने 'द एनर्जी अॅड रिसोर्सेस ईन्स्टीट्युट (टेरी)' या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे. सदर संस्था दोन वर्षाच्या कालावधीत वातावरण बदलासंबंधी सविस्तर कृती आराखडा तयार करणार आहे. या आराखडयात प्रामुख्याने जलविज्ञान व जलस्त्रोत, कृषी व अन्न पध्दती, तटीय क्षेत्रातील सागरी जीवसृष्टी व जैविक विविधता व जीवनशैलीशी निगडित क्षेत्रे जसे मानवी आरोग्य, वने व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

## पर्यावरणविषयक अनुमती

१०.१२२ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एम.सी.झेड.एम.ए.), राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरण (एस.इ.आय.ए.ए.) व राज्य स्तर विशेषज्ञ मूल्यांकन समिती (एस.इ.ए.सी.) यांची पर्यावरणविषयक अनुमतीसाठी स्थापना केली आहे. या प्राधिकरणास सागरी पर्यावरणाचे संरक्षण व प्रदूषण नियंत्रण करुन सागरी पर्यावरणाच्या दर्जात सुधारणा करावयाच्या उपाययोजनांचे अधिकार देण्यात आले आहेत. हे प्राधिकरण राज्य शासन, राष्ट्रीय सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण किंवा केंद्रशासन यांनी संदर्भासाठी पाठविलेल्या सागरी नियंत्रण क्षेत्राशी संबंधित पर्यावरणाशी निगडीत बाबी हाताळेल.

## राष्ट्रीय नदी कृती आराखडा

१०.१२३ देशातील प्रमुख प्रदूषित नद्यांचे शुध्दीकरण करणे हा राष्ट्रीय नदी कृती आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय नदी कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत ७० टक्के निधी केंद्र शासनाकडून व उर्वरित ३० टक्के निधी संबंधित नगरपालिका/महानगरपालिका/राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला जातो. या योजनेअंतर्गत त्र्यंबकेश्वर, नाशिक, नांदेड, कराड व सांगली शहरातील नद्यांमधील पाण्याचे शुध्दीकरण करण्याचे काम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले असून कोल्हापूर व प्रकाशा येथील नदीच्या शुध्दीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

## राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना

१०.१२४ सरोवर हे ताज्या पाण्याचा मुख्य स्त्रोत असल्याने त्याची अवनती रोखण्यासाठी नियोजनबध्द, कायमस्वरुपी आणि शास्त्रशुध्द प्रयत्न करण्याची गरज आहे. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून त्याचे स्वरुप ७०:३० असे आहे. या योजनेअंतर्गत १२ तलावांचे काम पूर्ण झाले असून भिवंडीमधील वारलादेवी तलाव आणि सोलापूर मधील सिध्देश्वर तलाव यांचे काम प्रगतीपथावर आहे.

## राज्य सरोवर संवर्धन योजना

१०.१२५ सरोवरांचे महत्व लक्षात घेता तदनुषंगिक समस्यांची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने व सूक्ष्म हवामानावरील त्यांचा प्रभाव जाणून राज्य सरकार प्रदूषित सरोवरांचे संवर्धन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देते. या योजनेअंतर्गत यमाई तलाव-पंढरपूर, हनुमान तलाव-काटोल , शार्लेट तलाव-माथेरान, जयसिंगराव तलाव-कागल, देधरगाव तलाव-धुळे, गांधीसागर व सोनेगाव तलाव-नागपूर, पीअर तलाव-नंदुरबार , मोती तलाव-सावंतवाडी आणि गणेश तलाव व ऐतवाडे खुर्द तलाव-सांगली यांची कामे प्रगतिपथावर आहेत.

# सामाजिक न्याय

१०.१२६ 'सामाजिक न्याय' या संकल्पनेनुसार समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अपंग, जेष्ठ नागरीक व मादक द्रव्य दुरुपयोग पिडीत, यासारख्या प्रवर्गातील प्रत्येक व्यक्ती व गटांना न्याय्य वागणूक आणि सामाजिक लाभामध्ये समान वाटा मिळवून देते. शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासातील सर्व टप्पे व स्तरावर दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या बरोबरीने एकाच पातळीवर आणण्यासाठी शासनाने विविध विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्य शासनाने अनुसूचित जातीकरिता 'अनुसूचित जाती उपयोजना' व अनुसूचित जमातीकरिता 'आदिवासी उपयोजना' असे दोन स्वतंत्र कार्यक्रम हाती घेतले आहे. सर्वसाधारण योजना कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिल्या जाणा-या निधी व लाभाव्यतिरिक्त, अनुसूचित जाती व आदिवासी उपयोजना कार्यक्रमामध्ये त्या समुदायातील लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. गरीबी व बेरोजगारी कमी करणे आणि विकास कामांच्या माध्यमातून झालेली वाढ सातत्यपूर्ण राहावी यासाठी उत्पादक संसाधने निर्माण करणे, तसेच संबंधित समाजातील मानवी संसाधन विकास करणे ही अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेची ठळक उद्दिष्टे आहेत.

## अनुसूचित जाती उपयोजना

१०.१२७ या योजनेंतर्गत सहा विकास क्षेत्र आहेत. एकूण खर्चात सामाजिक व सामूहिक सेवा या क्षेत्रांतर्गत राज्य व जिल्हास्तरीय योजनेवरील एकत्रीत खर्चाचा मोठा वाटा आहे. सामाजिक व सामूहिक सेवा या क्षेत्रात शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, महिला व बालविकास, मागासवर्गीयांचे कल्याण, इत्यादी उपक्षेत्रांचा समावेश होतो. वर्ष २०१०-११ मध्ये अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत एकूण खर्चापैकी ८९ टक्के खर्च सामाजिक व सामूहिक सेवा या क्षेत्रावर झाला. तर सन २०११-१२ या मध्ये डिसेंबर, २०११ पर्यंत ८९ टक्के इतका होता. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांचा नियतव्यय व खर्च तक्ता १०.५२ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.५२ अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च**

( ₹ कोटी )

| क्षेत्र | २०१०-११ | | | २०११-१२ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्ययाशी टक्केवारी | नियतव्यय | खर्च (डिसेंबर, २०११ पर्यंत) | नियतव्ययाशी टक्केवारी |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **२,८१७.१०** | **१,९५३.५५** | **६९** | **३,४८२.००** | **१,२००.४१** | **३४** |
| कृषि व संलग्न सेवा | २५.०० | २२.५० | ९० | २५.०० | ०.०० | -- |
| ग्राम विकास | ४०.५० | ४०.०० | ९९ | ४८.३२ | २.०७ | ४ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | २,७५१.६० | १,८९१.०५ | ६९ | ३,४०८.६८ | १,१९८.३४ | ३५ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **६५०.००** | **६४९.८९** | **१००** | **८०२.००** | **४४८.५२** | **५६** |
| कृषि व संलग्न सेवा | ९७.२५ | ९७.२३ | १०० | १२५.१६ | ७८.२१ | ६२ |
| ग्राम विकास | ८४.३० | ८४.२९ | १०० | १३२.२१ | ८४.८६ | ६४ |
| उर्जा | २३.०६ | २३.०२ | १०० | २९.७३ | ०.६० | २ |
| उद्योग व खनिजे | ६.९० | ६.८७ | १०० | ७.७४ | ४.०१ | ५२ |
| वाहतूक व दळणवळण | १०.८३ | १०.८२ | १०० | १७.७६ | ७.०७ | ४० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ४२७.६६ | ४२७.६५ | १०० | ४८९.४० | २७३.७८ | ५६ |
| **एकूण (अ+ ब)** | **३,४६७.१०** | **२,६०३.४४** | **७५** | **४,२८४.००** | **१,६४८.९३** | **३८** |

*आधार*: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

१०.१२८ अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी सन २०११-१२ मध्ये ८४ राज्यस्तरीय योजना व ७६ जिल्हास्तरीय योजना राबविण्यात येत असून त्यापैकी काही योजनांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

## संजय गांधी निराधार अनुदान योजना

१०.१२९ या योजनेंतर्गत ६५ वर्षाखालील निराधार व्यक्ती, अनाथ मुले, सर्व प्रकारचे अपंग तसेच क्षयरोग, कर्करोग, एड्स व कुष्ठरोग या सारख्या आजारामुळे स्वतःचा चरितार्थ चालवू न शकणा-या व्यक्ती, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांसह निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या निराधार महिला, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त झालेल्या महिला यांना अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेखाली ₹ २१,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पात्र कुटुंबात एक लाभार्थी असल्यास ₹ ६०० तर दोन किंवा अधिक लाभार्थी असल्यास ₹ ९०० देण्यात येतात.

## श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

१०.१३० या योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील ६५ वर्ष व त्यावरील प्रत्येक निराधार व्यक्ती राज्य शासनाकडून प्रतिमहा ₹ ४०० निवृत्ती वेतन मिळण्यास पात्र आहे. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेखाली दरमहा ₹ २०० इतके सहाय्यही देण्यात येते.

## राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

१०.१३१ या योजनेचा उद्देश दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ६४ वर्षे वयोगटातील प्रमुख कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, त्या कुटुंबास सहाय्य देणे असून, बाधित कुटुंबास ₹ १०,००० चे सहाय्य देण्यात येते.

## आम आदमी विमा योजना

१०.१३२ ही केंद्रपुरस्कृत (५०:५०) योजना २००७ मध्ये सुरु करण्यात आली असून, या अंतर्गत भूमिहीन ग्रामीण कुटुंबातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील कुटुंब प्रमुख अथवा एका मिळवत्या व्यक्तीला विमा संरक्षण प्राप्त होते. याकरीता भारतीय आयुर्विमा महामंडळाला ₹ २०० इतका वार्षिक हप्ता दिला जातो. अकाली मृत्यू झाल्यास आश्वासित रक्कम ₹ ३०,००० इतकी आहे आणि अपघाती लाभ ₹ ३७,५०० ते ₹ ७५,००० च्या दरम्यान मिळतो. शिवाय विमा संरक्षित मृत व्यक्तीच्या ९ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या २ मुलांना प्रति माह प्रत्येकी ₹ १०० इतकी शिष्यवृत्ती मिळते.

## नागरी दलित वस्ती सुधार योजना

१०.१३३ मागासवर्गीय व नवबौध्दांची संख्या जास्त असलेल्या नागरी भागांसाठी राज्य शासन 'नागरी दलित वस्ती सुधार योजना' १९९५-९६ पासून राबवित आहे. या योजनेंतर्गत जोडरस्ता बांधणी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, दवाखाने, पथदिवे, इत्यादी विकास विषयक कामे घेतली जातात. सामाजिक न्यायासाठी राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या योजनेची प्रगती तक्ता १०.५३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५३ महत्वाच्या योजनांची प्रगती**

(₹ कोटी )

| योजना | २०१०-११ | | २०११-१२ (डिसेंबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | खर्च | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | खर्च | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) |
| संजय गांधी निराधार अनुदान योजना | ४१३.०० | ४.६९ | २८४.०० | ५.८ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना | ५३७.०० | ११.७३ | ४१४.०० | १२.३९ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना | ३३८.५० | १०.७५ | १८१.०० | ११.३४ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना | १५.०० | ०.१३ | १४.५५ | ०.१५ |
| आम आदमी विमा योजना | ३१.५० | १४.०० | उ.ना. | १७.०० |
| नागरी दलित वस्ती सुधार योजना | १२०.५९ | -- | १७७.५५ | -- |

*आधार*: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन    उ.ना. - उपलब्ध नाही

## संस्थात्मक रचना

१०.१३४ समाजातील आर्थिकदृष्टया मागास वर्गाच्या आर्थिक विकासास चालना देण्यासाठी राज्य शासनाने खालील महामंडळांची स्थापना केली असून त्यांच्यामार्फत विविध योजना राबविल्या जातात.

## संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.१३५ चर्मकार समाजाच्या विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित स्थापन करण्यात आले. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ (एन्एस्एफ्डीसी) अंतर्गत विविध योजना राबविण्यासाठी सदर महामंडळास राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. महामंडळाचे भागभांडवल ₹ ५० कोटी आहे. महामंडळाची मुख्य कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- चर्मोद्योगात कार्यरत असणा-यांसाठी कच्च्या मालाचे प्रापण व पुरवठा यांची व्यवस्था करणे तसेच त्यांच्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यक व्यवस्था करणे.
- स्वदेशी व विदेशातील बाजारांमध्ये तयार मालाच्या विक्रीसाठी मध्यस्थ म्हणून काम करणे तसेच त्यांना आवश्यक सहाय्य करणे.
- उत्पादन आणि पणन याबाबतच्या प्रशिक्षण सुविधा पुरविणे.

काही महत्त्वाच्या योजनांचा तपशील तक्ता १०.५४ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.५४ संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित तर्फे राबविल्या जाणा-या काही महत्त्वाच्या योजनांचा तपशिल**

(₹ लाख)

| योजना | २०१०-११ | | २०११-१२ (डिसेंबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | १५७ | १५.४० | ९० | ७.९० |
| मुदत कर्ज | ४०२ | ३९.८० | २१४ | २१.१० |
| पन्नास टक्के अनुदान | ७९३ | ७९.०५ | २३४ | २३.४० |
| सूक्ष्म पतपुरवठा | १,९९४ | १९९.४० | ७७९ | ७७.९० |
| महिला समृध्दी योजना | ६६७ | ६६.७० | २५३ | २५.३० |
| महिला किसान योजना | १२२ | १२.२० | ५६ | ५.६० |

*आधार* : संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

१०.१३६ राज्य शासनाने मातंग समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली आहे. सध्या या महामंडळाचे भाग भांडवल ₹ ७५ कोटी आहे. हे महामंडळ एन्एस्एफ्डीसी ची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. काही महत्त्वाच्या योजनांचा तपशील तक्ता १०.५५ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.५५ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित तर्फे राबविल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या योजनांचा तपशील**

(₹ लाख)

| योजना | २०१०-११ | | २०११-१२ (डिसेंबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल योजना | ६१९ | २४२.५१ | ३९१ | १६३.५१ |
| अनुदान योजना | ५,७२९ | ५७२.९० | ४३४ | ११२.२० |
| एन्एस्एफ्डीसी योजना @ | ३,६३२ | २,१००.३५ | ६१९ | ४२५.०८ |

*आधार* : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

@- मुदत कर्ज, सूक्ष्म पतपुरवठा , महिला समृध्दी व शैक्षणिक कर्ज.

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित

१०.१३७ विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उन्नतीसाठी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे भागभांडवल ₹ १०० कोटी आहे. या महामंडळामार्फत बीज भांडवल योजना राबविली जाते. वर्ष २०११-१२ मध्ये या योजनेअंतर्गत प्राप्त निधी आणि वितरित कर्ज अनुक्रमे ₹ ११.२५ कोटी व ₹ ३.३७(जानेवारी,२०१२ पर्यंत) कोटी होते तर लाभार्थ्यांची संख्या ५३४ इतकी होती.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

१०.१३८ राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी आहे. हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाची (एन्बीसीएफ्डीसी) राज्यातील वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. महामंडळामार्फत राबविलेल्या काही महत्त्वाच्या योजनांचा तपशिल तक्ता १०.५६ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.५६ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित तर्फे राबविल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या योजनांचा तपशिल**

(₹ लाख)

| योजना | २०१०-११ | | २०११-१२ (डिसेंबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | ५०० | १६२.१७ | २५१ | १००.०८ |
| मुदत कर्ज | १०५ | १४२.१६ | ४७२ | ४८०.०० |
| मार्जिन मनी | २२ | ४७.४६ | ७ | १४.५१ |
| सूक्ष्म पतपुरवठा | ० | ० | २० | ३.६० |
| महिला समृध्दी | ० | ० | १३१ | १०.२६ |
| स्वर्णिमा | १८ | ९.०० | १५ | ७.१२ |
| शैक्षणिक कर्ज | १५७ | ४०.८९ | ३९ | १३.६८ |
| स्वयंसक्षम | १ | २.८५ | ० | ० |

*आधार* : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

## महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित

१०.१३९ अनुसूचित जाती आणि नवबौध्दांच्या आर्थिक विकासासाठी राज्य शासनाने महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी आहे. या महामंडळामार्फत मार्जिन मनी योजना, विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत योजना, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळाच्या योजना यासारख्या योजना राबविल्या जातात. महामंडळामार्फत राबविलेल्या काही महत्त्वाच्या योजनांचा तपशिल तक्ता १०.५७ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.५७ महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित तर्फे राबविल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या योजनांचा तपशिल**

(₹ लाख)

| योजना | २०१०-११ | | २०११-१२ (डिसेंबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल योजना | १,२५४ | ५६६.९६ | ९० | ८५.४२ |
| पन्नास टक्के अनुदान योजना | ९,९३६ | १,४४६.२६ | १३६ | ३८.४४ |
| एन्एस्एफ्डीसी योजना @ | ३,२६५ | १,५४२.९८ | १७३ | २९५.१९ |

*आधार* : महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित .

@- मुदत कर्ज, सूक्ष्म पतपुरवठा , महिला समृध्दी व शैक्षणिक कर्ज.

## आदिवासी उपयोजना

१०.१४० राज्यातील आदिवासी लोकसंख्या ही धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, ठाणे या डोंगरी जिल्ह्यांमध्ये व चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदीया, नागपूर, अमरावती व यवतमाळ या जंगलव्याप्त जिल्ह्यांमध्ये मोठया प्रमाणात केंद्रित झाली आहे. आदिवासी उपयोजने अंतर्गत खावटी कर्ज, कन्यादान योजना, विविध शिष्यवृत्ती योजना, स्वाभिमान योजना, इत्यादि काही प्रमुख योजना आहेत. या खर्चात, सामाजिक व सामूहिक सेवाचा (५७ टक्के) मुख्य हिस्सा आणि त्या खालोखाल कृषि व संलग्न सेवा (१३ टक्के) यांचा वाटा होता. आदिवासी उपयोजनेवरील नियतव्यय व खर्च तक्ता १०.५८ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.५८ आदिवासी उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी )

| क्षेत्र | २०१०-११ | | | २०११-१२ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्ययाशी टक्केवारी | नियतव्यय | खर्च (जानेवारी, २०१२ पर्यंत) | नियतव्ययाशी टक्केवारी |
| कृषि व संलग्न सेवा | ७६.२७ | ६२.५१ | ८२ | १४१.५३ | २१५.३० | १५२ |
| ग्राम विकास | २८५.४७ | १५९.९७ | ५६ | २२९.१५ | १४०.२३ | ६१ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | २८४.६२ | २८४.६२ | १०० | १९१.८२ | १०४.५३ | ५४ |
| उर्जा | ४९.९१ | ४९.९१ | १०० | ७१.९८ | ४१.९४ | ५८ |
| उद्योग व खनिजे | १.१८ | ०.६६ | ५६ | ०.८० | ०.१७ | २१ |
| वाहतूक व दळणवळण | २२९.३६ | २२९.३६ | १०० | ३२७.०२ | २११.५९ | ६५ |
| सामान्य आर्थिक सेवा | ५.९४ | ३.५२ | ५९ | ८.२९ | ०.०० | - |
| सामाजिक व सामूहिक सेवा | १,५९१.४० | १,५३२.६० | ९६ | २,२८६.५९ | ९६०.६५ | ४२ |
| विशेष क्षेत्र कार्यक्रम | ४४.२९ | ०.०० | - | २४.६२ | ०.०० | - |
| अवितरीत निधी | ४५२.२९ | ०.०० | - | ४११.७० | ०.०० | - |
| **एकूण** | **३,०२०.००** | **२,३२३.५०** | **७७** | **३,६९३.५०** | **१,६७४.४१** | **४५** |

*आधार*: आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१४१ आदिवासीच्या आर्थिक कल्याणासाठी राज्य शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली आहे. या महामंडळाचे ₹ १०० कोटी इतके अधिकृत भाग भांडवल असून त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के इतका आहे. महामंडळामार्फत राष्ट्रीय आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या विविध योजना राबविल्या जातात. राबविल्या जाणा-या योजनांचा तपशिल तक्ता १०.५९ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता १०.५९ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविलेल्या योजनांचा तपशिल**

(₹ कोटी )

| योजनेचे नाव | २०१०-११ | | २०११-१२(डिसेबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | खर्च | लाभार्थी संख्या | खर्च |
| एनएसटीएफडीसी योजना | २४९ | ४.४० | २४५ | १२.३५ |
| एनएसटीएफडीसी महिला सक्षमीकरण योजना | ३१२ | १.३० | ६० | ०.२६ |
| राष्ट्रीयकृत बँक पुरस्कृत योजना | ७७ | ०.५८ | ६३ | ०.५८ |

*आधार* : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित

## अल्पसंख्यांक विकास

१०.१४२ राज्य शासनामार्फत अल्पसंख्याकांच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत, जसे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, अल्पसंख्यांक बहुक्षेत्रिय विकास योजना, अल्पसंख्यांक केंद्रित क्षेत्रातील क्षेत्रविकास योजनेकरीता सहाय्यक अनुदान योजना इत्यादी राबविल्या जातात. वर्ष २०१०-११ या कालावधीत अल्पसंख्यांक केंद्रित क्षेत्रातील क्षेत्रविकास योजनेकरीता सहाय्यक अनुदान, अल्पसंख्यांक बहुक्षेत्रिय विकास योजना यासाठी अनुक्रमे ₹ १४.६९ कोटी व ₹ ६२.३५ कोटी खर्च होता. वर्ष २०११-१२ मध्ये सदर योजनांकरीता अनुक्रमे ₹ २५ कोटी व ₹ ६५ कोटी नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ

१०.१४३ राज्य शासनामार्फत अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी या महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर महामंडळ अल्पसंख्याकांना स्वयंरोजगार, शिक्षण, इत्यादी साठी कर्ज पुरविण्याचे काम करते. या मंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी आहे. हे महामंडळ मौलाना आझाद थेट कर्ज योजना, उन्नती मुदत कर्ज, महिला समृध्दी व शैक्षणिक कर्ज या सारख्या योजना राबविते. वर्ष २०१०-११ मध्ये १२,४२६ एवढया लाभार्थ्याना ₹ ४७.२८ कोटी कर्ज वितरीत करण्यात आले, तर २०११-१२ मध्ये डिसेंबर, २०११ अखेर ७,६३० लाभार्थ्यांना ₹ ३०.६६ कोटी इतके कर्ज वितरीत करण्यात आले.

## अपंग विकास

१०.१४४ अपंगाच्या क्षमता ओळखणे, त्यांचे कौशल्यविकास, सर्व दृष्टिकोनातून त्यांना समान संधी व त्यांच्या अधिकारांचे रक्षण, सक्षमीकरण करणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. शासनात नियुक्ती तसेच बढतीमध्ये अपंगांना तीन टक्के आरक्षण दिले जाते. सरकारी नोकऱ्यांमध्ये अर्ज करण्यास अपंगासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष वयापर्यंत शिथिल करण्यात आली आहे. शासकीय कर्मचाऱ्याच्या मतिमंद मुलाला हयातभर निवृत्ती वेतन दिले जाते. अपंगांसाठी राबविण्यात येणा-या काही प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.६० मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता १०.६० अपंग व्यक्तींच्या विकासासाठी काही प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ कोटी )

| योजनेचे नाव | २०१०-११ | | २०११-१२ (डिसेंबर, २०११ पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च |
| शारीरिक दृष्टया अंपगव्यक्तींना पुनर्वसनासाठी वित्तिय सहाय्य | ६१३ | ०.०६ | ८३ | ०.०१ |
| शारीरिक दृष्टया अपंगव्यक्तींना कृत्रिम अवयव पुरविणे. | २,१७० | ०.६५ | २४१ | ०.०७ |
| मनोविकलांग, अस्थिव्यंग व्यक्तींसाठी असलेल्या अशासकीय संस्थांना सहाय्य | ४६,७४४ | २६४.९९ | ४६,७४४ | २३०.८७ |
| शारीरिक दृष्टया अपंग कार्यक्षम कर्मचाऱ्यांना आणि अपंगांसाठी नोकऱ्या देणा-या नियोजकांना पुरस्कार | २५ | ०.०२ | उ.ना. | ०.०० |
| लघुउद्योगासाठी शारीरिकदृष्टया अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य | १३,३१४ | ३.९९ | ५८० | १.७४ |

*आधार*: अपंग कल्याण आयुक्तालय , महाराष्ट्र शासन उ.ना. - उपलब्ध नाही.

## महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१४५ अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यात, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. या महामंडळामार्फत महिला समृध्दी, सूक्ष्म पतपुरवठा, मुदत कर्ज, कृषी संजीवनी, इत्यादी योजना राबविल्या जातात. वर्ष २०१०-११ मध्ये राज्य शासनाच्या योजनासाठी ₹ ३.२० लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले, तर राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाच्या योजनांसाठी ₹ ११२ लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले.

*******

## परिशिष्ट १०.१
## महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती

| संस्थांचा प्रकार † | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ (अं.) | २०११-१२ (अं.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१ प्राथमिक** | | | | | | | |
| (१) संस्था | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | ७६,६२५ |
| (२) विद्यार्थी (हजारात) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १०,७२८ |
| (३) शिक्षक (हजारात) | ११३ | १७८ | २२२ | २६८ | ३१३ | ३४९ | ३५१ |
| (४) प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थ्यांची संख्या | ३७ | ३७ | ३८ | ३९ | ३८ | ३० | ३० |
| **२ माध्यमिक (उच्च माध्यमिक सह)** @ | | | | | | | |
| (१) संस्था | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | २१,६०० |
| (२) विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | १०,८११ |
| (३) शिक्षक (हजारात) | ३५ | ७५ | ११४ | १९४ | २५५ | २९८ | ३०० |
| (४) प्रत्येक शिक्षकामागे विद्यार्थ्यांची संख्या | २५ | २६ | २९ | ३२ | ३६ | ३६ | ३६ |
| **३ उच्च (सर्व प्रकारचे)** $ | | | | | | | |
| (१) संस्था | २११ | ५४७ | ७३९ | १,१३४ | १,५२८ | ३,२७७ | ३,२७७ |
| (२) विद्यार्थी (हजारात) | ११० | ३२८ | ५८९ | १,१३५ | १,०८६ | १,७८४ | १,७६९ |

*आधार* - १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे.
२) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे.
३) उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे.

अं. - अंदाजित

† शालेय व पदवीपूर्व व्यवसाय शिक्षण संस्था वगळून

@ १९९४-९५ पासून कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश उच्च माध्यमिक शिक्षणामध्ये केला आहे.

$ १९९४-९५ पासून वैद्यकीय, अभियांत्रिकी व कृषि संस्था वगळल्या आहेत.

## परिशिष्ट १०.२
## राज्यनिहाय संयुक्त शिक्षणाचे विकास निर्देशांक
## सर्व शाळा : सर्व व्यवस्थापन

| अ. क्र. | राज्य / केंद्रशासित प्रदेश | प्राथमिक स्तर | | | | उच्च प्राथमिक स्तर | | | | संयुक्त स्तर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००८-०९ | | २००९-१० | | २००८-०९ | | २००९-१० | | २००८-०९ | | २००९-१० | |
| | | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | अंदमान व निकोबार | ०.६६४ | १२ | ०.६६३ | ५ | ०.८०९ | ४ | ०.८२९ | ४ | ०.७३६ | ७ | ०.७४६ | ४ |
| २ | आंध्र प्रदेश | ०.६५७ | १५ | ०.५६१ | १७ | ०.७४६ | ११ | ०.७६२ | १२ | ०.७०२ | १४ | ०.६६२ | १४ |
| ३ | अरुणाचल प्रदेश | ०.५१२ | २९ | ०.३२८ | ३५ | ०.५१९ | ३१ | ०.६२० | २५ | ०.५१६ | ३० | ०.४७४ | ३१ |
| ४ | आसाम | ०.४४६ | ३५ | ०.३८६ | ३१ | ०.५१९ | ३२ | ०.५०३ | ३२ | ०.४८३ | ३३ | ०.४४५ | ३२ |
| ५ | बिहार | ०.४८० | ३२ | ०.३७५ | ३२ | ०.४४७ | ३५ | ०.४६६ | ३५ | ०.४६३ | ३४ | ०.४२१ | ३५ |
| ६ | चंदिगड | ०.६८८ | १० | ०.६५५ | ७ | ०.७५६ | ९ | ०.८१४ | ५ | ०.७२२ | १० | ०.७३५ | ६ |
| ७ | छत्तीसगड | ०.५५४ | २६ | ०.४३९ | २६ | ०.६०० | २५ | ०.५५८ | २७ | ०.५७७ | २६ | ०.४९८ | २७ |
| ८ | दादरा व नगर हवेली | ०.५९४ | २२ | ०.४९३ | २२ | ०.६४० | २२ | ०.७१० | १९ | ०.६१७ | २२ | ०.६०२ | २० |
| ९ | दमण व दिव | ०.६५४ | १७ | ०.६१२ | ९ | ०.८०१ | ५ | ०.७८२ | १० | ०.७२८ | ९ | ०.६९७ | ९ |
| १० | दिल्ली | ०.७०१ | ६ | ०.६५१ | ८ | ०.७६२ | ७ | ०.७९० | ८ | ०.७३२ | ८ | ०.७२० | ८ |
| ११ | गोवा | ०.६५८ | १४ | ०.६०२ | ११ | ०.६९७ | १७ | ०.७८३ | ९ | ०.६७८ | १७ | ०.६९२ | १० |
| १२. | गुजरात | ०.६९८ | ७ | ०.५८४ | १३ | ०.७०६ | १६ | ०.७३० | १८ | ०.७०२ | १३ | ०.६५७ | १५ |
| १३ | हरियाणा | ०.७१४ | ४ | ०.५९० | १२ | ०.७८९ | ६ | ०.७७० | ११ | ०.७५२ | ४ | ०.६८० | ११ |
| १४ | हिमाचल प्रदेश | ०.६११ | २१ | ०.५६७ | १६ | ०.७४६ | १२ | ०.७४१ | १६ | ०.६७९ | १६ | ०.६५४ | १७ |
| १५ | जम्मू व काश्मीर | ०.५८६ | २४ | ०.४०४ | ३० | ०.६६१ | २१ | ०.६२१ | २४ | ०.६२३ | २१ | ०.५१२ | २५ |
| १६ | झारखंड | ०.४४९ | ३४ | ०.३६३ | ३४ | ०.४६४ | ३३ | ०.५०० | ३४ | ०.४५६ | ३५ | ०.४३१ | ३४ |
| १७ | कर्नाटक | ०.६९३ | ८ | ०.५६९ | १५ | ०.७२३ | १५ | ०.७४३ | १५ | ०.७०८ | १२ | ०.६५६ | १६ |
| १८ | केरळ | ०.६८९ | ९ | ०.७०० | ३ | ०.८२२ | ३ | ०.८४४ | ३ | ०.७५६ | ३ | ०.७७२ | ३ |
| १९ | लक्षद्विप | ०.७७३ | २ | ०.७०४ | २ | ०.८५१ | २ | ०.८८७ | २ | ०.८१२ | २ | ०.७९५ | २ |
| २० | मध्य प्रदेश | ०.५७१ | २५ | ०.४३३ | २७ | ०.५८५ | २६ | ०.५४० | २८ | ०.५७८ | २५ | ०.४८६ | ३० |
| २१ | महाराष्ट्र | ०.६६० | १३ | ०.५७६ | १४ | ०.७४० | १४ | ०.७५० | १३ | ०.७०० | १५ | ०.६६३ | १३ |
| २२ | मणिपूर | ०.४६४ | ३३ | ०.४११ | २९ | ०.६३० | २४ | ०.६२७ | २३ | ०.५४७ | २७ | ०.५१९ | २४ |
| २३ | मेघालय | ०.४९८ | ३१ | ०.३६५ | ३३ | ०.५२२ | ३० | ०.५०१ | ३३ | ०.५१० | ३१ | ०.४३३ | ३३ |
| २४ | मिझोराम | ०.६८६ | ११ | ०.५४४ | १९ | ०.७४१ | १३ | ०.७३८ | १७ | ०.७१४ | ११ | ०.६४१ | १८ |
| २५ | नागालँड | ०.६३३ | २० | ०.५४९ | १८ | ०.६७५ | २० | ०.६९९ | २० | ०.६५४ | २० | ०.६२४ | १९ |
| २६ | ओरिसा | ०.५५३ | २७ | ०.४६८ | २३ | ०.५३७ | २९ | ०.५२४ | ३० | ०.५४५ | २८ | ०.४९६ | २८ |
| २७ | पॉन्डेचरी | ०.७९७ | १ | ०.७३६ | १ | ०.८८४ | १ | ०.८९१ | १ | ०.८४१ | १ | ०.८१३ | १ |
| २८ | पंजाब | ०.७१४ | ५ | ०.६५६ | ६ | ०.७६० | ८ | ०.८०३ | ७ | ०.७३७ | ६ | ०.७३० | ७ |
| २९ | राजस्थान | ०.५८७ | २३ | ०.४५८ | २५ | ०.६३६ | २३ | ०.६२९ | २२ | ०.६१२ | २४ | ०.५४४ | २२ |
| ३० | सिक्कीम | ०.६५७ | १६ | ०.६०८ | १० | ०.६८३ | १८ | ०.७४८ | १४ | ०.६७० | १८ | ०.६७८ | १२ |
| ३१ | तामिळनाडू | ०.७४७ | ३ | ०.६७७ | ४ | ०.७५३ | १० | ०.८११ | ६ | ०.७५० | ५ | ०.७४४ | ५ |
| ३२ | त्रिपुरा | ०.५०१ | ३० | ०.४१५ | २८ | ०.५७७ | २७ | ०.५६७ | २६ | ०.५३९ | २९ | ०.४९१ | २९ |
| ३३ | उत्तर प्रदेश | ०.६५४ | १८ | ०.५३४ | २१ | ०.५७३ | २८ | ०.५११ | ३१ | ०.६१४ | २३ | ०.५२३ | २३ |
| ३४ | उत्तराखंड | ०.६४३ | १९ | ०.५३८ | २० | ०.६७९ | १९ | ०.६३६ | २१ | ०.६६१ | १९ | ०.५८७ | २१ |
| ३५ | पश्चिम बंगाल | ०.५२८ | २८ | ०.४६७ | २४ | ०.४५९ | ३४ | ०.५४० | २९ | ०.४९४ | ३२ | ०.५०३ | २६ |

*आधार* - एलीमेंटरी एज्युकेशन इन इंडीया प्रोग्रेस टुवर्डस् युईई रिपोर्ट (३० सप्टेंबर, २००९ रोजी )

## परिशिष्ट १०.३
## राज्यातील वर्ष २०११-१२ मधील आरोग्य विज्ञान महाविद्यालये/ संस्थांची संख्या व त्यातील प्रवेशित विद्यार्थी

| विद्याशाखा | शासकीय | | शासन अनुदानित | | विना अनुदानित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| *अ) वैद्यकीय* | | | | | | | | |
| **१. ॲलोपॅथिक** | | | | | | | | |
| १.१ पदवी | २० | २,२५९ | - | - | ११ | १,१२० | ३१ | ३,३७९ |
| १.२ पदव्युत्तर | २० | १,५७३ | - | - | १३ | २३९ | ३३ | १,८१२ |
| **२. आयुर्वेदिक** | | | | | | | | |
| २.१ पदवी | ४ | २१६ | १६ | ७७० | ४२ | १,७९५ | ६२ | २,७८१ |
| २.२ पदव्युत्तर | २ | ३४ | ८ | ९२ | १२ | ३४० | २२ | ४६६ |
| **३. होमिओपॅथिक** | | | | | | | | |
| ३.१ पदवी | - | - | - | - | ४४ | ३,०११ | ४४ | ३,०११ |
| ३.२ पदव्युत्तर | - | - | - | - | १४ | २६५ | १४ | २६५ |
| **४. युनानी** | | | | | | | | |
| ४.१ पदवी | - | - | ३ | १५० | ३ | १०० | ६ | २५० |
| ४.२ पदव्युत्तर | - | - | - | - | २ | १६ | २ | १६ |
| **५. दंत चिकित्सा** | | | | | | | | |
| ५.१ पदवी | ४ | २२७ | - | - | २१ | १,७७५ | २५ | २,००२ |
| ५.२ पदव्युत्तर | ५ | ५५ | - | - | १४ | १८१ | १९ | २३६ |

*आधार* - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## परिशिष्ट १०.४

### राज्यातील वर्ष २०११-१२ मधील तंत्र, कला शिक्षणाची महाविद्यालये/संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेले विद्यार्थी

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **१. अभियांत्रिकी** | | | | | | | | | | | | |
| १.१ पदविका | ४३ | १९,४२५ | १६,१२८ | १८ | ४,६४५ | ४,०२० | ३५३ | १,२२,६१७ | ९७,४१५ | ४१४ | १,४६,६८७ | १,१७,५६३ |
| १.२ पदवी | ७ | २,६८० | २,६६६ | ९ | २,६७२ | २,६८३ | ३३२ | १,२८,६१२ | ९२,५०८ | ३४८ | १,३३,९६४ | ९७,८५७ |
| १.३ पदव्युत्तर | ५ | १,१२९ | ९३६ | ९ | १,०३१ | ८७९ | १२५ | ६,५३० | ५,२४३ | १३९ | ८,६९० | ७,११५ |
| **२. वास्तुशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| २.१ पदविका | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २.२ पदवी | - | - | - | ३ | २०७ | २०४ | ४६ | २,४०० | १,२८१ | ४९ | २,६०७ | १,४८५ |
| २.३ पदव्युत्तर | - | - | - | - | - | - | १२ | ४९० | ५१ | १२ | ४९० | ५१ |
| **३. व्यवस्थापन शास्त्र** | २ | १८० | १८० | १३ | १,०२० | १,०२० | ३९३ | ४०,९६५ | २७,७०९ | ४०८ | ४२,१६५ | २८,९०९ |
| **४. हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| ४.१ पदविका | २ | १२० | ११९ | - | - | - | १४ | ८८० | उ.ना. | १६ | १,००० | उ.ना. |
| ४.२ पदवी | - | - | - | १ | ४० | ४० | ९ | ४९० | २८५ | १० | ५३० | ३०२ |
| **५. औषध निर्माणशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| ५.१ पदविका | ४ | २१० | २१४ | २० | १,२४० | १,१२० | १७३ | १०,४५२ | ८,९०८ | १९७ | ११,९०२ | १०,२४२ |
| ५.२ पदवी | ४ | २२० | २०३ | ५ | २४० | २४६ | १३८ | ८,९८० | ७,२९२ | १४७ | ९,४४० | ७,७४१ |
| ५.३ पदव्युत्तर | ३ | ८२ | ११० | ६ | २८४ | ४०० | ९२ | ३,६१० | २,३८० | १०१ | ३,९७६ | २,८९० |
| **६. मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन** | २ | ९० | ९० | ८ | ४५० | ४५० | १३१ | १०,३३५ | ९,६४१ | १४१ | १०,८७५ | १०,१८१ |
| **७. औद्योगिक प्रशिक्षण संस्था** | ४१६ | १,१३,७५८ | १,१७,५६१ | - | - | - | ३५० | ४०,९४४ | ३९,९६२ | ७६६ | १,५४,७०२ | १,५७,५२३ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट १०.४ (समाप्त)
## राज्यातील वर्ष २०११-१२ मधील तंत्र, कला शिक्षणाची महाविद्यालये/संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेले विद्यार्थी

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित / विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी |
| (१) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) |
| **८. ललित कला** | | | | | | | | | |
| ८.१ पदविका | ३ | २२० | २०५ | २०३ | १०,५६५ | ६,९३० | २०६ | १०,७८५ | ७,१३५ |
| मूलभूत, कला शिक्षक पदविका, रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध इंटिरिअर डेकोरेशन, वस्त्रकाम, धातूकाम, मातकाम, ए.एम. व डीप. ए.एड. | | | | | | | | | |
| ८.२ पदवी | ४ | १,१४० | १,०९२ | -- | -- | -- | ४ | १,१४० | १,०९२ |
| रेखाकला व रंगकला, शिल्पकला व प्रतिमानबंध, कला व शिल्प, उपयोजित कला | | | | | | | | | |
| ८.३ पदव्युत्तर | ३ | ७९ | ५७ | -- | -- | -- | ३ | ७९ | ५७ |
| एम.एफ.ए. (पेंटिंग), एम.एफ.ए. (उपयोजित कला) | | | | | | | | | |

*आधार* - (१) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
(२) व्यवसाय शिक्षण संचालनालय, मुंबई
(३) कला संचालनालय, मुंबई

## परिशिष्ट १०.५
## महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा
## (सार्वजनिक आणि शासन सहाय्यित)

| अनु. क्र. | वर्ष | रुग्णालये (संख्या ) | दवाखाने (संख्या ) | प्राथमिक आरोग्य केंद्रे (संख्या ) | प्राथमिक आरोग्य पथके (संख्या ) | क्षयरोग रुग्णालये आणि रुग्ण चिकित्सालये (संख्या ) | संस्थांतील @@ खाटा (संख्या ) | दर लाख @ लोकसंख्येमागे खाटा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९७१ | २९९ | १,३७२ | ३८८ | १ | ७२ | ४३,८२३ | ८८ |
| २ | १९८१ | ५३० | १,७७६ | ४५४ | ४०० | ९० | ७१,३८५ | ११४ |
| ३ | १९९१ | ७६८ | १,८९६ | १,६७२ | ८१ | १,९७७ | १,०९,२६७ | १४४ |
| ४ | १९९६ | ८२८ | १,३९९ # | १,६७५ | १६७ | २,४९७ | ८८,५३० | ९९ |
| ५ | २००१ | ९८१ | १,६२९ | १,७६८ | १६९ | २,५२० | १,०१,६७० | १०५ |
| ६ | २००२ | ९६४ | २,०८१ | १,८०६ | १७४ | २,५२० | ९२,१०६ | ९३ |
| ७ | २००३ | ९४५ | २,०१९ | १,८०७ | १७७ | २,५२० | ९२,४७२ | ९२ |
| ८ | २००४ | १,०२८ $ | २,०५८ | १,८०७ | १७७ | २,५२० | ९६,४६४ $ | ९३ |
| ९ | २००५ | १,०४७ | २,०७२ | १,८०९ | १७७ | २,५२० | ९५,७६२ $$ | ९२ |
| १० | २००६ | १,०५४ | २,०७२ | १,८१२ | १७७ | २,५२० | ९५,११५ $$ | ९० |
| ११ | २००७ | १,०९९ | २,०७२ | १,८१६ | १७७ | २,५२० | ९४,६०३ $$ | ८८ |
| १२ | २००८ | १,१८१ | २,०७२ | १,८१६ | १७७ | २,५२० | १,००,२४९ | ९१ |
| १३ | २००९ | १,१७८ | २,९०४ | १,८१६ | १९१ | २,५२० | १,०८,८०६ | ९७.५ |
| १४ | २०१० | १,२६४ | २,९२४ | १,८१६ | १९१ | २,५२० | १,१५,७०४ | १०२ |

*आधार* - राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन

@@ फक्त सार्वजनिक व शासन सहाय्यित रुग्णालयातील खाटांचा समावेश आहे. खाजगी रुग्णालयातील खाटांचा समावेश केलेला नाही.

@ संबंधित वर्षाच्या मध्याकरिता अंदाजित लोकसंख्येवर आधारित आहे.

# कंधार, बिलोली, हदगाव, मुखेड (जि.नांदेड) येथील नागरी दवाखाने बंद झाल्यामुळे .

$ महाराष्ट्र आरोग्यसेवा विकास प्रकल्पांतर्गत रुग्णालये कार्यान्वित झाल्यामुळे संख्या वाढली आहे.

$$ बृहन्मुंबई महानगरपालिकेची काही प्रसूतीगृहे व राज्यातील काही प्रसूतीपश्चात दक्षता केंद्रे बंद झाल्यामुळे.

## परिशिष्ट १०.६
## महाराष्ट्र राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर

| वर्ष | जन्मदर | | | मृत्युदर | | | अर्भकमृत्युदर | | | एकूण जननदर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९७१ | ३३.७ | २९.० | ३२.२ | १३.५ | ९.७ | १२.३ | १११ | ८८ | १०५ | ४.९ | ३.९ | ४.६ |
| | (३८.९) | (३०.१) | (३६.९) | (१६.४) | (९.७) | (१४.९) | (१३८) | (८२) | (१२९) | (५.४) | (४.१) | (५.२) |
| १९८१ | ३०.४ | २४.५ | २८.५ | १०.६ | ७.४ | ९.६ | ९० | ४९ | ७९ | ४.० | ३.० | ३.७ |
| | (३५.६) | (२७.०) | (३३.९) | (१३.७) | (७.८) | (१२.५) | (११९) | (६२) | (११०) | (४.८) | (३.३) | (४.५) |
| १९९१ * | २८.० | २२.९ | २६.२ | ९.३ | ६.२ | ८.२ | ६९ | ३८ | ६० | ३.४ | २.५ | ३.० |
| | (३०.९) | (२४.३) | (२९.५) | (१०.६) | (७.१) | (९.८) | (८७) | (५३) | (८०) | (३.९) | (२.७) | (३.६) |
| १९९६ * | २४.९ | २१.० | २३.४ | ८.७ | ५.४ | ७.४ | ५८ | ३१ | ४८ | ३.२ | २.४ | २.८ |
| | (२९.३) | (२१.६) | (२७.५) | (९.७) | (६.५) | (९.०) | (७७) | (४६) | (७२) | (३.७) | (२.४) | (३.४) |
| २००१ | २१.१ | २०.२ | २०.७ | ८.५ | ५.९ | ७.५ | ५५ | २८ | ४५ | २.६ | २.२ | २.४ |
| | (२७.१) | (२०.३) | (२५.४) | (९.१) | (६.३) | (८.४) | (७२) | (४२) | (६६) | (३.४) | (२.३) | (३.१) |
| २००६ | १९.२ | १७.५ | १८.५ | ७.४ | ५.८ | ६.७ | ४२ | २६ | ३५ | २.३ | १.८ | २.१ |
| | (२५.२) | (१८.८) | (२३.५) | (८.१) | (६.०) | (७.५) | (६२) | (३९) | (५७) | (३.१) | (२.०) | (२.८) |
| २००७ | १८.७ | १७.३ | १८.१ | ७.३ | ५.७ | ६.६ | ४१ | २४ | ३४ | २.२ | १.८ | २.० |
| | (२४.७) | (१८.६) | (२३.१) | (८.०) | (६.०) | (७.४) | (६१) | (३७) | (५५) | (३.०) | (२.०) | (२.७) |
| २००८ | १८.४ | १७.२ | १७.९ | ७.४ | ५.६ | ६.६ | ४० | २३ | ३३ | २.१ | १.७ | २.० |
| | (२४.४) | (१८.५) | (२२.८) | (८.०) | (५.९) | (७.४) | (५८) | (३६) | (५३) | (२.९) | (२.०) | (२.६) |
| २००९ | १८.१ | १६.९ | १७.६ | ७.६ | ५.५ | ६.७ | ३७ | २२ | ३१ | २.१$ | १.७$ | २.०$ |
| | (२४.१) | (१८.३) | (२२.५) | (७.८) | (५.८) | (७.३) | (५५) | (३४) | (५०) | (२.९)$ | (२.०)$ | (२.६)$ |
| २०१० | १७.६ | १६.४ | १७.१ | ७.५ | ५.३ | ६.५ | ३४ | २० | २८ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| | (२३.७) | (१८.०) | (२२.१) | (७.७) | (५.८) | (७.२) | (५१) | (३१) | (४७) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

*आधार* - (१) नमुना नोंदणी पाहणी पत्रिका, महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली
(२) $ नमुना नोंदणी पाहणी, २००८

टीप - (१) कंसातील आकडे भारताकरिता आहेत
(२) * जम्मू व काश्मिर वगळून
(३) जन्मदर व मृत्युदर दर हजार लोकसंख्येमागे
(४) अर्भकमृत्युदर दर हजार जीवित जन्मामागे आहेत
उ.ना. - उपलब्ध नाही.

## परिशिष्ट १०.७

## काम करणाऱ्या लोकांची जनगणना २००१ अनुसार आर्थिक वर्गवारी

(हजारात)

| काम करणाऱ्यांची वर्गवारी | मुख्यतः / सीमांतिक / एकूण | महाराष्ट्र | | | भारत # | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (अ) काम करणारे | | | | | | | |
| १. शेतकरी | मुख्यतः | ६,१८१ | ४,००१ | १०,१८२ | ७८,२५९ | २५,३६७ | १,०३,६२६ |
| | सीमांतिक | ५०० | १,१३२ | १,६३२ | ७,१५८ | १६,५२९ | २३,६८७ |
| | एकूण | ६,६८१ | ५,१३३ | ११,८१३ | ८५,४१६ | ४१,८९६ | १,२७,३१३ |
| २. शेतमजूर | मुख्यतः | ३,९४२ | ३,७०० | ७,६४१ | ४१,११९ | २२,३७८ | ६३,४९७ |
| | सीमांतिक | ९८२ | २,१९२ | ३,१७४ | १६,२१० | २७,०६८ | ४३,२७८ |
| | एकूण | ४,९२४ | ५,८९१ | १०,८१५ | ५७,३२९ | ४९,४४६ | १,०६,७७५ |
| ३. घरगुती उद्योग | मुख्यतः | ४९४ | ३१६ | ८१० | ७,५०९ | ४,६९७ | १२,२०६ |
| | सीमांतिक | ७३ | २०६ | २७९ | १,२३५ | ३,५१६ | ४,७५१ |
| | एकूण | ५६७ | ५२२ | १,०८९ | ८,७४४ | ८,२१३ | १६,९५७ |
| ४. इतर | मुख्यतः | १३,८०० | २,३१५ | १६,११५ | १,१३,२६१ | २०,४१५ | १,३३,६७६ |
| | सीमांतिक | ८८१ | ४६० | १,३४० | १०,२६४ | ७,२५० | १७,५१४ |
| | एकूण | १४,६८१ | २,७७५ | १७,४५५ | १,२३,५२५ | २७,६६५ | १,५१,१९० |
| एकूण (अ) | मुख्यतः | २४,४१६ | १०,३३२ | ३४,७४८ | २,४०,१४८ | ७२,८५७ | ३,१३,००५ |
| | सीमांतिक | २,४३६ | ३,९८९ | ६,४२५ | ३४,८६७ | ५४,३६३ | ८९,२३० |
| | एकूण | २६,८५२ | १४,३२१ | ४१,१७३ | २,७५,०१४ | १,२७,२२० | ४,०२,२३५ |
| (ब) काम न करणारे | एकूण | २३,५४९ | ३२,१५७ | ५५,७०५ | २,५७,१४२ | ३,६९,२३३ | ६,२६,३७६ |
| **एकूण (अ + ब)** | | **५०,४०१** | **४६,४७८** | **९६,८७९** | **५,३२,१५७** | **४,९६,४५४** | **१०,२८,६१०** |

*आधार* - १) महानिबंधक व गणना आयुक्त, भारत सरकार, नवी दिल्ली.
२) संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र, मुंबई.

# मणिपूर राज्यातील सेनापती जिल्ह्यातील माओ-मारम, पाओमाटा आणि पुरुल हे उपविभाग वगळून.

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट १०.८
## दृष्टिक्षेपात आर्थिक गणना १९९८ आणि २००५

(हजारात)

| बाब | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९८ | २००५ | शेकडा वाढ | १९९८ | २००५ | शेकडा वाढ | १९९८ | २००५ | शेकडा वाढ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. आस्थापनांची संख्या | | | | | | | | | |
| (अ) स्व-कार्यरत आस्थापना | १,२९५ | १,४४२ | ११.३७ | ९६९ | १,०७८ | ११.२५ | २,२६३ | २,५१९ | ११.३२ |
| (ब) किमान एक व्यक्ती मजुरीवर असणाऱ्या आस्थापना | ३१९ | ६६८ | १०९.६६ | ६५२ | १,०३७ | ५९.१३ | ९७१ | १,७०६ | ७५.७२ |
| (क) एकूण | १,६१३ | २,११० | ३०.८० | १,६२१ | २,११५ | ३०.५० | ३,२३४ | ४,२२५ | ३०.६५ |
| २. काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या | | | | | | | | | |
| (अ) स्व-कार्यरत आस्थापना | २,००८ | १,९२३ | (-) ४.२५ | १,३०५ | १,२९६ | (-) ०.७१ | ३,३१३ | ३,२१९ | (-) २.३६ |
| (ब) किमान एक व्यक्ती मजुरीवर असणाऱ्या आस्थापना | १,६८० | २,५०१ | ४८.८९ | ५,४५२ | ५,५८९ | २.५२ | ७,१३२ | ८,०९० | १३.४४ |
| (क) एकूण | ३,६८८ | ४,४२४ | १९.९५ | ६,७५७ | ६,८८५ | १.८९ | १०,४४५ | ११,३०९ | ८.२७ |
| ३. प्रति आस्थापना काम करणाऱ्यांची सरासरी संख्या | २.३ | २.१ | .. | ४.२ | ३.३ | .. | ३.२ | २.७ | .. |
| ४. प्रति आस्थापना (किमान एक व्यक्ती मजुरीवर असणाऱ्या) काम करणाऱ्यांची सरासरी संख्या | ५.३ | ६.६ | .. | ८.४ | ५.४ | .. | ७.४ | ४.७ | .. |
| ५. एकूण आस्थापनांमधील मजुरीवरील व्यक्ती | १,४९५ | २,०८२ | ३९.२६ | ४,७८२ | ४,६१९ | (-) ३.४० | ६,२७७ | ६,७०१ | ६.७५ |
| ६. प्रमुख वैशिष्ट्यांनुसार आस्थापनांची संख्या-- | | | | | | | | | |
| (१) हंगामी | १३७ | १९३ | ४०.८८ | २३ | ४७ | १०४.३५ | १६० | २४० | ५०.०० |
| (२) परिसर नसलेले | २१८ | ४०५ | ८५.७८ | २२६ | ३१६ | ३९.८२ | ४४४ | ७२१ | ६२.३९ |
| (३) शक्ती /इंधन वापरणारे | २३९ | ४७० | ९६.६५ | ३६३ | ६४४ | ७७.४१ | ६०२ | १,११४ | ८५.०५ |
| (४) मालकाचा सामाजिक गट | | | | | | | | | |
| (अ) अनुसूचित जाती | १२४ | १४८ | १९.३५ | १०० | १५१ | ५१.०० | २२४ | २९९ | ३३.४८ |
| (ब) अनुसूचित जमाती | ९२ | १०२ | १०.८७ | ४८ | ८५ | ७७.०८ | १४० | १८७ | ३३.५७ |
| (५) मालकीचा प्रकार -- | | | | | | | | | |
| (अ) खाजगी | १,४७२ | १,८७६ | २७.४५ | १,५६८ | २,०३२ | २९.५९ | ३,०४० | ३,९०८ | २८.५५ |
| (ब) सहकारी | २१ | ३० | ४२.८६ | १२ | २१ | ७५.०० | ३३ | ५१ | ५४.५५ |
| (क) शासकीय आणि सार्वजनिक उपक्रम | १२१ | २०४ | ६८.६० | ४० | ६२ | ५५.०० | १६१ | २६६ | ६५.२२ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने टक्केवारी जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट १०.९
## प्रमुख उद्योग गटांनुसार आस्थापनांची आणि कामगारांची संख्या
## (आर्थिक गणना २००५)

| प्रमुख उद्योग गट | आस्थापनांची संख्या (हजारात) | | | कामगारांची संख्या (हजारात) | | | मजुरीवरील कामगारांची संख्या (हजारात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. कृषि | ५८० | २४ | ६०४ | ९९९ | ५२ | १,०५१ | १७५ | १९ | १९४ |
| २. खाणकाम व दगड खाणकाम | ३ | २ | ५ | २१ | १४ | ३५ | १७ | १३ | ३० |
| ३. वस्तुनिर्माण | ३०९ | ३८५ | ६९३ | ८६० | १,५७४ | २,४३४ | ४९८ | १,१४४ | १,६४२ |
| ४. वीज, गॅस आणि पाणी पुरवठा | २ | २ | ४ | ११ | ३१ | ४२ | १० | ३० | ४० |
| ५. बांधकाम | २३ | २९ | ५२ | ४३ | ७६ | ११८ | १७ | ४५ | ८३ |
| ६. मोटार गाड्या / मोटार सायकल यांची विक्री, परिरक्षण व दुरुस्ती | २५ | ६१ | ८६ | ५४ | १८२ | २३७ | २७ | ११५ | १४२ |
| ७. घाऊक व्यापार | ४२ | ८९ | १३१ | ८३ | २२६ | ३०९ | ३८ | १२७ | १६५ |
| ८. किरकोळ व्यापार | ५६५ | ८५५ | १,४२० | ८९१ | १,८८३ | २,५७४ | २५९ | ७३२ | ९९० |
| ९. उपाहारगृहे आणि हॉटेल्स | ५४ | ८६ | १४० | १३४ | ३३६ | ४७० | ८८ | २३७ | ३०४ |
| १०. वाहतूक आणि साठवण | ५८ | १२२ | १८० | ११३ | ३२३ | ४३४ | ५५ | २०१ | २५७ |
| ११. टपाल व दूरसंचार | २७ | ५० | ७७ | ४६ | १८० | २०७ | २५ | ११० | १३५ |
| १२. वित्तीय सहाय्य देणाऱ्या संस्था | २४ | ३० | ५४ | १०८ | २५८ | ३६७ | ७९ | २३८ | ३१७ |
| १३. स्थावर मालमत्ता आणि सेवा | ५० | ९४ | १४४ | ९६ | ३८९ | ४६५ | ४२ | २७१ | ३१३ |
| १४. सार्वजनिक प्रशासन, संरक्षण, सामाजिक सुरक्षा | ५० | २२ | ७३ | १८९ | ५९२ | ७८१ | १७९ | ५८६ | ७६४ |
| १५. शिक्षण | १०० | ५३ | १५३ | ४४६ | ४०७ | ८५३ | ४३२ | ३६७ | ७९९ |
| १६. आरोग्य आणि सामाजिक कार्य | ३७ | ६० | ९७ | ९२ | २८६ | ३५७ | ६३ | २०४ | २६७ |
| १७. इतर सामाजिक व वैयक्तिक सेवा कार्य | १६२ | १५० | ३१२ | २४० | ३३३ | ५७३ | ९९ | १८० | २७९ |
| १८. इतर कार्ये (उल्लेख न केलेले उद्योग गट) | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य |
| **एकूण ...** | **२,११०** | **२,११५** | **४,२२५** | **४,४२४** | **६,८८५** | **११,३०९** | **२,०८२** | **४,६१९** | **६,७०१** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई .

टीप - स्तंभ क्रमांक ५ ते १० मधील आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट १०.१०
## महाराष्ट्र राज्यातील प्रमुख उद्योग गटांनुसार कारखान्यांतील रोजगार

| उद्योग गट | सरासरी दैनिक रोजगार (संख्या) | | | एकूणशी टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९६१ | २००९ | २०१० | १९६१ | २००९ | २०१० |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **(अ) ग्राहक वस्तू उद्योग** | **५,१०,२५४** | **४,६६,९६६** | **४,८९,४६४** | **६४.८** | **३१.१** | **२९.६** |
| १. खाद्य उत्पादने, पेये व तंबाखूची उत्पादने | ९०,१९० | १,७४,२५६ | १,९२,३६७ | ११.४ | ११.६ | ११.६ |
| २. वस्त्रोद्योग (परिधान करण्याची वस्त्रे धरुन ) | ३,६९,१५७ | २,०७,९९८ | २,०५,१२८ | ४६.९ | १३.९ | १२.४ |
| ३. लाकूड आणि लाकडाची उत्पादने | १०,८७३ | १८,७७६ | १९,४२३ | १.४ | १.३ | १.२ |
| ४.कागद आणि कागदाची उत्पादने, मुद्रण , प्रकाशन इत्यादी | ३८,९८२ | ६३,२९१ | ६९,२९४ | ५.० | ४.२ | ४.२ |
| ५. कातडी कमावणे व चामड्याची उत्पादने | १,०५२ | २,६४५ | ३,२५२ | ०.१ | ०.२ | ०.२ |
| **(ब) पुनर्निर्माण  वस्तू उद्योग** | **१,२९,६३१** | **५,३४,९७१** | **५,९८,७९४** | **१६.५** | **३५.७** | **३६.२** |
| ६. रसायने व रासायनिक उत्पादने | ३४,०४८ | १,५६,९१६ | १,६६,७०० | ४.३ | १०.५ | १०.१ |
| ७. पेट्रोलियम, रबर, प्लास्टिक यांची उत्पादने | १७,३७९ | ८३,१०२ | ९४,४७८ | २.२ | ५.५ | ५.७ |
| ८. अधातू खनिज उत्पादने | २८,३५१ | ४७,७५२ | ४१,६५८ | ३.६ | ३.२ | २.५ |
| ९. मूलभूत धातू व धातू उत्पादने | ४९,८५३ | २,४७,२०१ | २,९५,९५८ | ६.४ | १६.५ | १७.९ |
| **(क) भांडवली वस्तू उद्योग** | **१,२१,९२०** | **३,८२,९७८** | **४,२८,३५०** | **१५.५** | **२५.५** | **२५.९** |
| १०. यंत्रे व यंत्रसामग्री (परिवहन सामग्री वगळून) | ५९,३९६ | २,१३,९६९ | २,०९,१०७ | ७.५ | १४.३ | १२.६ |
| ११. परिवहन सामग्री | ४६,८६७ | १,१८,११० | १,४९,२२४ | ६.० | ७.९ | ९.० |
| १२. इतर वस्तूनिर्माण उद्योग | १५,६५७ | ५०,८९९ | ७०,०१९ | २.० | ३.४ | ४.२ |
| **(ड) इतर** | **२५,५७४** | **१,१४,८१६** | **१,३९,९९९** | **३.२** | **७.७** | **८.५** |
| १३. इतर | २५,५७४ | १,१४,८१६ | १,३९,९९९ | ३.२ | ७.७ | ८.५ |
| **एकूण** | **७,८७,३७९** | **१४,९९,७३१** | **१६,५६,६०८** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

टीप - १) २०१० चे आकडे अस्थायी स्वरुपाचे आहेत.

२) टक्केवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट १०.११
## महाराष्ट्र राज्यातील चालू कारखाने व त्यांतील रोजगार

(रोजगाराची संख्या हजारात)

| वर्ष | बाब ** | शक्तीवर चालणारे कारखाने | | | बिगर शक्तीवर चालणारे कारखाने | | | सर्व कारखाने | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५० पेक्षा कमी कामगार कामावर असलेले | ५० किंवा अधिक कामगार कामावर असलेले | शक्तीवर चालणारे एकूण कारखाने | ५० पेक्षा कमी कामगार कामावर असलेले | ५० किंवा अधिक कामगार कामावर असलेले | बिगर शक्तीवर चालणारे एकूण कारखाने | ५० पेक्षा कमी कामगार कामावर असलेले | ५० किंवा अधिक कामगार कामावर असलेले | एकूण सर्व कारखाने |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९६१ | कारखाने | ५,०९७ | १,७८१ | ६,८७८ | १,००४ | ३५१ | १,३५५ | ६,१०१ | २,१३२ | ८,२३३ |
| | रोजगार | ९९ | ६२६ | ७२५ | २१ | ४१ | ६३ | १२० | ६६७ | ७८७ |
| १९७१ | कारखाने | ६,३४१ | २,७०१ | ९,०४२ | ८५६ | ३४३ | १,१९९ | ७,१९७ | ३,०४४ | १०,२४१ |
| | रोजगार | १२३ | ८२४ | ९४७ | १५ | ३६ | ५१ | १३८ | ८६० | ९९८ |
| १९८१ | कारखाने | १०,२३८ | ३,१३२ | १३,३७० | ३,१५४ | ७० | ३,२२४ | १३,३९२ | ३,२०२ | १६,५९४ |
| | रोजगार | १८३ | ९८३ | १,१६६ | २० | ६ | २६ | २०३ | ९८९ | १,१९२ |
| १९९१ | कारखाने | १३,१३९ | ३,१९९ | १६,३३८ | ७,७४३ | ३८ | ७,७८१ | २०,८८२ | ३,२३७ | २४,११९ |
| | रोजगार | २१५ | ९१० | १,१२४ | ४० | ४ | ४४ | २५४ | ९१४ | १,१६९ |
| १९९६ | कारखाने | १४,७१० | ३,७५७ | १८,४६७ | ९,१६८ | ३३ | ९,२०१ | २३,८७८ | ३,७९० | २७,६६८ |
| | रोजगार | २४५ | ९८५ | १,२३१ | ४५ | ४ | ४८ | २९० | ९८९ | १,२७९ |
| २००१ | कारखाने | १५,९७७ | ३,९२९ | १९,९०६ | ८,३९३ | २५ | ८,४१८ | २४,३७० | ३,९५४ | २८,३२४ |
| | रोजगार | २६६ | ८९१ | १,१५७ | ४२ | २ | ४४ | ३०८ | ८९३ | १,२०१ |
| २००६ | कारखाने | १७,३२५ | ५,२१३ | २२,५३८ | ८,१४० | १९ | ८,१५९ | २५,४६५ | ५,२३२ | ३०,६९७ |
| | रोजगार | ३३० | ९०९ | १,२३९ | ४० | २ | ४२ | ३७० | ९११ | १,२८१ |
| २००८ | कारखाने | १९,५४२ | ४,७८६ | २४,३२८ | ८,३७६ | १४ | ८,३९० | २७,९१८ | ४,८०० | ३२,७१८ |
| | रोजगार | ३६१ | ९८७ | १,३४८ | ४३ | २ | ४४ | ४०४ | ९८८ | १,३९२ |
| २००९ | कारखाने | १८,६६८ | ६,११२ | २४,७८० | ९,२६३ | १७ | ९,२८० | २७,९३१ | ६,१२९ | ३४,०६० |
| | रोजगार | ३४५ | १,१०३ | १,४४८ | ५० | २ | ५२ | ३९५ | १,१०५ | १,५०० |
| २०१० | कारखाने | १९,१६५ | ६,५०७ | २५,६७२ | ९,१७८ | १५ | ९,१९३ | २८,३४३ | ६,५२२ | ३४,८६५ |
| | रोजगार | ३६३ | १,२४० | १,६०३ | ५२ | १ | ५३ | ४१५ | १,२४२ | १,६५७ |

*आधार* - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

* * कारखाने - चालू कारखान्यांची संख्या, रोजगार - रोजगारांची दैनिक सरासरी

१९७४ पासून विडी कारखान्यांची नोंद यातून काढून वेगळ्या अधिनियमाखाली समाविष्ट करण्यात आली आहे.

टीप - (१) रोजगारात प्रपत्र न पाठविणाऱ्या कारखान्यांतील दैनिक सरासरी रोजगारांचा समावेश आहे.

(२) वरील आकडे १९४८ च्या कारखाना अधिनियमांखाली येणाऱ्या कारखान्यासंबंधीचे आहेत.

(३) २०१० चे आकडे अस्थायी स्वरुपाचे आहेत.

(४) "बिगर शक्तीवर चालणारे कारखाने " यामध्ये कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग ८५ खाली नोंदविलेल्या शक्तीवर चालणाऱ्या लहान कारखान्यांचा समावेश आहे.

(५) रोजगाराचे आकडे संक्षिप्तात लिहिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट १०.१२
## महाराष्ट्र राज्यातील विविध उद्योगांतील रोजगार

(शंभरात)

| अ.क्र. | उद्योग गट | सरासरी दैनिक रोजगार | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | १९९६ | २००१ | २००६ | २००९ | २०१० |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | खाद्य उत्पादने, पेये व तंबाखूची उत्पादने | ९०२ | ९२१ | ९६५ | १,३३० | १,५९१ | १,६६२ | १,५४२ | १,७४३ | १,९२४ |
| २. | वस्त्रोद्योग (परिधान करण्याची वस्त्रे धरुन) | ३,६९१ | ३,५१६ | ३,५५४ | २,५२७ | २,४७७ | २,१६७ | १,८९२ | २,०८० | २,०५१ |
| ३. | लाकूड व लाकडाची उत्पादने | १०९ | ७५ | ७५ | १५२ | १५३ | १५४ | १६७ | १८८ | १९४ |
| ४. | कागद, कागदाची उत्पादने, मुद्रण व प्रकाशन इत्यादि | ३९० | ४९४ | ५४९ | ४९१ | ५४६ | ५२५ | ५९३ | ६३३ | ६९३ |
| ५. | कातडी कमावणे व चामड्याची उत्पादने | ११ | १४ | २५ | ३५ | ३६ | २५ | ३१ | २६ | ३३ |
| ६. | रसायने व रासायनिक उत्पादने | ३४० | ७६० | १,०५९ | १,२१५ | १,३६१ | १,२९९ | १,४५५ | १,५६९ | १,६६७ |
| ७. | पेट्रोलियम, रबर, प्लास्टिक यांची उत्पादने | १७४ | ३४९ | ४२१ | ४८२ | ५६३ | ५३५ | ६५६ | ८३१ | ९४५ |
| ८. | अधातू खनिज उत्पादने | २८४ | ४०२ | ४०३ | ४२३ | ३६८ | ३१७ | ३२२ | ४७८ | ४१७ |
| ९. | मूलभूत धातू, धातूची उत्पादने | ४९९ | ९२४ | १,३१० | १,३०१ | १,४४८ | १,३११ | १,६७२ | २,४७२ | २,९६० |
| १०. | यंत्रे व यंत्रसामग्री (परिवहन सामग्री वगळून) | ५९४ | १,३२२ | १,७८६ | १,६१४ | १,७७३ | १,७२० | १,७८४ | २,१४० | २,०९१ |
| ११. | परिवहन सामग्री | ४६९ | ६०८ | ९०३ | ८६७ | १,०१८ | १,०२५ | ९५९ | १,१८० | १,४९२ |
| १२. | इतर वस्तुनिर्माण उद्योग | १५७ | १८० | २०९ | २३१ | ३०१ | ३९५ | ६९७ | ५०९ | ७०० |
| १३. | इतर | २५६ | ४१२ | ६६३ | १,०१६ | १,१५२ | ८७० | १,०३८ | १,१४८ | १,४०० |
| | **एकूण** | **७,८७३** | **९,९७७** | **११,९२२** | **११,६८४** | **१२,७८७** | **१२,००६** | **१२,८०८** | **१४,९९७** | **१६,५६६** |

*आधार* - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.
(२) १९७४ पासून विडी कारखान्यांची नोंद यातून काढून वेगळ्या अधिनियमात करण्यात आली.
(३) २०१० चे आकडे अस्थायी स्वरुपाचे आहेत.

## परिशिष्ट १०.१३
## राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे

(हजारात)

| वर्ष | संदर्भ वर्षात नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या | अधिसूचित केलेल्या रिक्त पदांची संख्या | संदर्भ वर्षात भरलेल्या पदांची संख्या | वर्ष अखेरीस चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १९९१ | ५९१.८ | ६४.८ | ३०.३ | ३,१५९.८ |
| १९९३ | ५९९.७ | ५५.४ | २४.१ | ३,३४९.६ |
| १९९४ | ६३५.८ | ५२.१ | २४.७ | ३,४३९.२ |
| १९९५ | ७२०.१ | ४९.७ | १८.७ | ३,६३४.३ |
| १९९६ | ६८८.७ | ५३.७ | २२.६ | ३,७८७.२ |
| १९९७ | ६९२.८ | ४७.४ | २२.९ | ३,९३३.१ |
| १९९८ | ७२९.३ | ३७.९ | १६.८ | ४,१०९.६ |
| १९९९ | ८६१.१ | ५०.९ | १६.२ | ४,१८३.८ |
| २००० | ७५०.८ | ४३.९ | १८.१ | ४,३४८.८ |
| २००१ | ६२३.२ | ३२.३ | १२.५ | ४,४१९.७ |
| २००२ | ६२२.७ | ३०.९ | ९.५ | ४,२०३.३ |
| २००३ | ८१९.१ | ५९.६ | १६.४ | ४,०४४.१ |
| २००४ | ८८०.३ | ४३.४ | १५.१ | ४,१०५.७ |
| २००५ | ६४५.२ | ४४.२ | १३.९ | ४,०००.३ |
| २००६ | ६०८.१ | ६८.३ | १४.८ | ३,६०८.५ |
| २००७ | ६१६.७ | ९७.५ | ९.२ | ३,२१३.८ |
| २००८ | ७२१.५ | ९९.२ | ११.८ | ३,००७.२ |
| २००९ | ६९८.३ | १७६.६ | १७.२ | २,८७५.९ |
| २०१० | ८९२.९ | ३७८.८ | ३५३.९ | २,६८२.४ |
| २०११ | ७४७.५ | ३४६.२ | १९१.० | २,५९६.२ |

*आधार* - रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन, नवी मुंबई.

## परिशिष्ट १०.१४

## रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत डिसेंबर, २०११ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | व्यक्ती | पैकी स्त्रिया | स्त्रियांची टक्केवारी | एकूण बेरजेशी व्यक्तींची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | माध्यमिक शालांत परीक्षेपेक्षा कमी (निरक्षर धरुन ) | २,८३,२७० | १,४२,९२५ | ५०.५ | १०.९ |
| २. | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण | ५,८२,४८८ | १,१३,५७३ | १९.५ | २२.४ |
| ३. | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण | ९,३१,९५६ | २,०३,५२० | २१.८ | ३५.९ |
| ४. | औ.प्र.सं. प्रशिक्षित व शिकाऊ उमेदवार | २,०३,००८ | १७,४८४ | ८.६ | ७.८ |
| ५. | पदविकाधारक | | | | |
| | ५.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ४८,१३३ | ७,६९७ | १६.० | १.९ |
| | ५.२ वैद्यकीय, डी.एम.एल.टी. व फार्मसी | ८,१३५ | २,५८० | ३१.७ | ०.३ |
| | ५.३ इतर | ७६,४०८ | १७,२९१ | २२.६ | २.९ |
| | **एकूण (५.१ ते ५.३)** | १,३२,६७६ | २७,५६८ | २०.८ | ५.१ |
| ६. | पदवीधर | | | | |
| | ६.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | १५,०६० | ४,४०६ | २९.३ | ०.६ |
| | ६.२ वैद्यकीय | ५,०१० | १,४१८ | २८.३ | ०.२ |
| | ६.३ इतर | ३,९५,३५० | १,११,७२५ | २८.३ | १५.२ |
| | **एकूण (६.१ ते ६.३)** | ४,१५,४२० | १,१७,५४९ | २८.३ | १६.० |
| ७. | पदव्युत्तर पदवीधर | | | | |
| | ७.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ५५५ | १२६ | २२.७ | नगण्य |
| | ७.२ वैद्यकीय | ९० | ३० | ३३.३ | नगण्य |
| | ७.३ इतर | ४६,७२४ | २१,२४० | ४५.५ | १.८ |
| | **एकूण (७.१ ते ७.३)** | ४७,३६९ | २१,३९६ | ४५.२ | १.८ |
| | **एकूण बेरीज** | **२५,९६,१८७** | **६,४४,०१५** | **२४.८** | **१००.०** |

*आधार* - रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन, नवी मुंबई

## परिशिष्ट १०.१५
## महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विवाद **

(भाग घेतलेले कामगार व वाया गेलेले श्रमदिन शंभरात )

| बाब (१) | १९६१ (२) | १९७१ (३) | १९८१ (४) | १९९१ (५) | १९९६ (६) | २००१ (७) | २००६ (८) | २०१० (९) | २०११ (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. **कापड गिरण्या --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ३४ | १५६ | ६६ | १० | ११ | १२ | ६ | १ | ५ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | १७२ | ३,१९७ | ५६४ | ६१ | ३८ | ८६ | १७ | १ | २३ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ३५६ | ९,७०२ | ४७,३५६ | २,३६८ | ५,४९२ | ४,५३३ | ९३८ | १,०७५ | १,४८१ |
| २. **अभियांत्रिकी कारखाने --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ५७ | २११ | ११९ | ५९ | ४७ | २८ | ७ | ४ | १ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | १२२ | ४६९ | ४१२ | ११० | १८४ | ६५ | २० | ९ | १ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | १,०७१ | ५,६४१ | १६,२०९ | १४,४६२ | २६,७२० | २५,७८६ | २,८९० | १६,९९४ | ८,९३६ |
| ३. **संकीर्ण --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | १८३ | ३२३ | ४५१ | १४८ | ५४ | १९ | १० | ११ | ७ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ५४१ | ८४१ | १,०३१ | ४२३ | १४४ | ८५ | ३८ | ३० | ८ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ४,३२९ | ५,१८२ | ३१,४८९ | २९,६६३ | १५,१४८ | १५,८९६ | ७,०२४ | ९,०५७ | ५,२९६ |
| ४. **एकूण --** | | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | २७४ | ६९० | ६३६ | २१७ | ११२ | ५९ | २३ | १६ | १३ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ८३४ | ४,५०७ | २,००७ | ५९४ | ३६६ | २३७ | ७५ | ४० | ३२ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ५,७५६ | २०,५२५ | ९५,०५४ | ४६,४९३ | ४७,३६० | ५२,३०९ | १०,८५२ | २७,१२५ | १५,७१३ |

*आधार* - कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - (१) बाब क्रमांक ४ (ब) व ४ (क) समोरील आकडे संक्षिप्तात दिल्याने प्रत्यक्ष बेरजेशी जुळतीलच असे नाही.
(२) ** राज्य औद्योगिक संबंध यंत्रणेखालील.

## परिशिष्ट १०.१६
## महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च

(₹ लाखात)

| अ.क्र. | कामाचा प्रकार | २००७-०८ | | २००८-०९ | | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ @ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | ग्रामीण बारमाही जोड रस्ते | १७० | १,४६५.२८ | ३५१ | १,०७२.९७ | ३५६ | १,३५२.४२ | ३६६ | ९५१.९१ | ५१८ | २८४.४३ |
| २ | पूरनियंत्रण व पूर संरक्षण | ७ | २४.९९ | १८ | ५१.०९ | ३४६ | २३९.४० | ११५ | २९५.६१ | २ | ०.०० |
| ३ | जलसंधारण व जलसंवर्धन/ जलभरणा | ३,६३२ | ३,५५६.०२ | ७,३६२ | १०,५३१.७६ | ७,३०५ | ७,०३८.२५ | १६,४१२ | ४,५६०.८३ | २,२३९ | १,२८९.८० |
| ४ | दुष्काळ प्रतिबंधक काम | २५३ | १४८.१७ | ६७८ | ३१९.३१ | ६०२ | ६०६.२६ | ६९२ | १,२३६.५० | ५०८ | ३०.२५ |
| ५ | लघु व सूक्ष्म जलसिंचन | ११ | ४.४१ | ४ | ३.४ | ४० | ४७.८१ | १० | १.१९ | ५ | १.८८ |
| ६ | अनुसूचित जाती / जमाती व नवीन भूधारकांना सिंचन सुविधा | ६८ | २१.२९ | ३५३ | २७५.७५ | ६११ | ६८०.२९ | २६० | ५६६.५४ | ४८ | १४.९७ |
| ७ | पारंपारिक जलस्त्रोतांचे नुतनीकरण | २५१ | ३५७.७२ | ५१८ | ४८८.५३ | ५५२ | ८३६.८३ | ४२२ | ९७२.६४ | ९३७ | २२९.८९ |
| ८ | भूविकास / शेतीविकास | ३११ | ४३०.६७ | १,४८६ | १,६४४.०५ | ८०१ | १,००१.८६ | ४३० | २७६.६७ | ६८४ | ९०.३५ |
| ९ | केंद्र शासनाने अधिसूचित केलेली मान्यताप्राप्त इतर कामे | ७५ | १४९.८ | ८ | १७.३४ | ० | ०.०० | ० | ०.२४ | ४९ | ५.७१ |
| | **एकूण** | **४,७७८** | **६,१५८.३५** | **१०,७७८** | **१४,४०४.२०** | **१०,६१३** | **११,८०३.१२** | **१८,७०७** | **८,८६२.१३** | **४,९९०** | **१,९४७.२८** |

*आधार* - नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - @ १६ मार्च, २०१२ पर्यंत

## परिशिष्ट १०.१७
## महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत रोजगार कार्यक्रमांची प्रगती

| | रोजगार कार्यक्रम | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ # |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **१.** | **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना** | | | | | |
| | *१.१ सहाय्यीत स्वसहाय्य गट(संख्या)* | १०,२८१ | ११,५८७ | १२,६५० | १४,३८१ | ८,०३९ |
| | *१.२ एकूण स्वरोजगारी (संख्या)* | १,२०,६६८ | १,४४,४४२ | १,५२,६५४ | १,७४,१५६ | ९०,६९५ |
| | अ) स्वसहाय्य गट स्वरोजगारी (संख्या) | १,०८,२२५ | १,२४,३३० | १,३२,७५५ | १,५०,०९१ | ८२,६१६ |
| | ब) वैयक्तिक स्वरोजगारी (संख्या) | १२,४४३ | २०,११२ | १९,८९९ | २४,०६५ | ८,०७९ |
| | *१.३ स्वरोजगारींना एकूण अनुदान ( ₹कोटी)* | ११३.२३ | १३४.१६ | १४७.४२ | १६५.४३ | ८८.५८ |
| | अ) स्वसहाय्य गट स्वरोजगारी (₹ कोटी) | ९७.९४ | १११.९६ | १२३.१२ | १३७.२५ | ७६.८७ |
| | ब) वैयक्तिक स्वरोजगारी (₹ कोटी) | १५.४९ | २२.२१ | २४.३० | २८.१८ | ११.७१ |
| | *१.४ स्वरोजगारींना एकूण कर्ज ( ₹कोटी)* | २१५.४३ | २६३.६९ | ३००.८९ | ३७०.३० | २११.२६ |
| | अ) स्वसहाय्य गट स्वरोजगारी (₹ कोटी) | १८२.९१ | २११.२७ | २४२.४२ | २९८.३३ | १८०.७८ |
| | ब) वैयक्तिक स्वरोजगारी (₹ कोटी) | ३२.५२ | ५२.४२ | ५८.४७ | ७१.९७ | ३०.४७ |
| | *१.५ एकूण खर्च ( ₹कोटी)* | १८३.१९ | २१४.६५ | २३१.८७ | २५२.७६ | १३४.६६ |
| **२.** | **स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना** | | | | | |
| | *२.१ उपलब्ध निधी* | | | | | |
| | अ) केंद्र शासन (₹ कोटी) | ५९.४४ | ८९.९८ | ८०.७६ | ९०.२९ | ५१.५२ |
| | ब) राज्य शासन (₹ कोटी) | १९.८१ | २९.९० | २६.९३ | ३०.१० | ३.६७ |
| | *२.२ शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम* | | | | | |
| | अ) लक्ष्य (लाभधारकांची संख्या ) | २३,१२१ | २३,१२१ | ४,५२७ | ४,५२७ | ९,९७९ |
| | ब) साध्य (लाभधारकांची संख्या ) | ४२,२९८ | ५,९३५ | ६,०७४ | ७,४४९ | १,३११ |
| | क) झालेला खर्च (₹ कोटी) | ३२.३४ | ३.४१ | ९.९६ | १५.२१ | ४.६१ |
| | *२.३ प्रशिक्षण* | | | | | |
| | अ) लक्ष्य (प्रशिक्षणार्थींची संख्या ) | २८,९०२ | २८,९०२ | ३६,२०३ | ३६,२०३ | ३९,७७० |
| | ब) साध्य (प्रशिक्षणार्थींची संख्या ) | ७८,१९९ | ५५,५२३ | ४०,६९३ | ३८,६६९ | १,२६१ |
| | क) झालेला खर्च (₹ कोटी) | १७.५२ | १२.३२ | १३.०३ | १७.१५ | ०.४१ |
| | *२.४ शहरी वेतनी रोजगार कार्यक्रम* | | | | | |
| | अ) लक्ष्य (लाख मनुष्यदिवस ) | --- | --- | --- | --- | --- |
| | ब) साध्य (रोजगार निर्मिती लाख मनुष्यदिवस ) | ५.०२ | ५.५७ | ५.४० | ५.३७ | २.२२ |
| | क) झालेला खर्च (₹ कोटी) | १५.२१ | १८.६८ | १८.१३ | १६.५८ | ८.३० |
| **३.** | **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम** | | | | | |
| | अ) मंजूर कर्ज (₹ कोटी) | २२७.५८ $ | १८.५४ | ३६.६८ | ५५.३३ | १७.३० |
| | ब) लाभधारक (संख्या) | ३४,४०८ $ | १,५७३ | ३,४१३ | ३,८९८ | १,२११ |

*आधार* - (१) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
(२) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
(३) उद्योग संचालनालय, मुंबई

$ पंतप्रधान रोजगार योजनेची माहिती # डिसेंबर अखेरपर्यंत

# ११

# मानव विकास



# ११. मानव विकास

११.१ मानव विकास ही विकासाची संकल्पना असून ती राष्ट्रीय उत्पन्नाच्या चढ उताराच्याही पलिकडे आहे. ही संकल्पना वातावरण निर्मितीबाबत अशी आहे ज्यामध्ये व्यक्तींना त्यांच्या पूर्ण क्षमता विकसित करता येतील व ज्यामुळे त्यांच्या गरजा व रुची यांचा मेळ राखत सर्जनशील व फलदायी आयुष्य जगता येऊ शकेल. मानव विकास ही बदलती संकल्पना आहे. लोकांचे पर्याय निवडीचे जेवढे मार्ग आहेत तितके मानव विकासाचे पैलू आहेत. मानव विकासाशी निगडीत महत्त्वाचे घटक कालानुरुप तयार होतात आणि देश देशांमध्ये तसेच देशांतर्गत बदलत असतात, जोपर्यंत विकासाचे लाभ थेटपणे गरीब, स्त्रिया व इतर दुर्लक्षित समाजास मिळतात.

११.२ मानव विकास केंद्रीत अलिकडील विचारात घेतल्या जाणाऱ्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

- सामाजिक प्रगती - ज्ञानार्जन, चांगले पोषण आणि आरोग्य सेवा यांची मोठया प्रमाणावर उपलब्धता.
- आर्थिक - असमतोल कमी करण्यासाठी आणि मानव विकासाचे स्तर उंचावण्यासाठी आर्थिक वाढीचे महत्त्व.
- कार्यक्षमता - संसाधनांचा वापर व उपलब्धता या स्वरुपात.
- समानता - आर्थिक वाढ व इतर मानव विकास विषयक घटकांच्या स्वरुपात.
- सहभाग व स्वातंत्र्य - नागरी - ग्रामीण, स्त्री - पुरुष, वय, धर्म, वंश वाढ, भौतिक व मानसिक घटक इत्यादी नुसार कमकुवत ठरलेल्या गटाकरिता सक्षमीकरण, लोकाभिमुख प्रशासन, स्त्री-पुरुष समानता, नागरी व राजकीय हक्क, सांस्कृतिक स्वातंत्र्य.
- सातत्य - भावी पीढीसाठी पर्यावरण , आर्थिक व सामाजिक स्वरुपात.
- मानवी सुरक्षितता - उपासमार आणि बेकारी, दुष्काळ, दुफळी इत्यादी सारख्या आकस्मिक रित्या दररोज जीवनात येणाऱ्या अडथळयापासून संरक्षण.

११.३ मानव विकास निर्देशांक (माविनि) हे दीर्घायु (अपेक्षित आयुमर्यादा), ज्ञान (शिक्षण आणि पटसंख्या) आणि राहणीमान (स्थूल उत्पन्नानुसार दरडोई क्रयशक्ती सममूल्य चलनात) यांचे सर्वसाधारणपणे केलेले मोजमाप आहे. जरी, हा निर्देशांक मानव विकास ह्या संकल्पनेला सोपे करण्याचा प्रयत्न करीत असला तरी, इतर निर्देशांक अथवा निर्देशकांच्या गटापेक्षा जास्त जटील आहे.

## भारतातील मानव विकास निर्देशांक

११.४ भारत सरकारने २००१ मध्ये पहिला 'राष्ट्रीय मानव विकास अहवाल' प्रसिध्द केला. या मालिकेतील दुसरा अहवाल 'भारत मानव विकास अहवाल'- २०११ मध्ये प्रसिध्द झाला आहे. दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यात यशस्वी ठरणाऱ्या आर्थिक वाढीसाठी मानवरुपी भांडवल आणि मानवी कार्यशक्तीत वाढ या महत्त्वाच्या गरजा असल्याचे तर्क भारत मानव विकास अहवाल मांडत आहे. माविनि परिगणीत करण्यासाठी भारत मानव विकास अहवाल, राष्ट्रीय मानव विकास अहवाल - २००१ आणि जागतिक मानव विकास अहवाल - २०१० मध्ये वापरलेले निर्देशक तक्ता ११.१ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ११.१ विविध मानव विकास अहवालांमध्ये माविनि तयार करण्यासाठी वापरलेले निर्देशक**

| निर्देशक | राष्ट्रीय मानव विकास अहवाल २००१ | भारत मानव विकास अहवाल २०११ | जागतिक मानव विकास अहवाल २०१० |
|---|---|---|---|
| आरोग्य | • वय वर्ष एक असतानाचे अपेक्षित आयुर्मान<br>• अर्भक मृत्यू दर | • जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान | • जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान |
| शिक्षण | • साक्षरता दर (७ वर्षे व अधिक )<br>• औपचारिक शिक्षणाची तीव्रता | • साक्षरता दर (७ वर्षे व अधिक )<br>• समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे | • शिक्षणाची सरासरी वर्षे<br>• शिक्षणाची अपेक्षित वर्षे |
| उत्पन्न | • असमानतेच्या अनुषंगाने समायोजित केलेला दरडोई उपभोग्य बाबींवरील वास्तव खर्च | • असमानतेच्या अनुषंगाने समायोजित केलेला दरडोई उपभोग्य बाबींवरील वास्तव खर्च | • दरडोई राष्ट्रीय स्थूल उत्पन्न (अमेरिकन डॉलरमध्ये) |

*आधार* - भारत मानव विकास अहवाल, २०११

११.५ मानव विकास निर्देशांक परिगणीत करण्यासाठी वापरलेले मोजमापाचे मानक तक्ता ११.२ मध्ये दर्शविले आहेत. १९९९-२००० ते २००७-०८ या कालावधीत भारताच्या माविनि मध्ये २१ टक्क्यांनी तर राज्याचा माविनिमध्ये १४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. माविनित झालेल्या सुधारामध्ये शिक्षण निर्देशांक महत्त्वाचा घटक असून या कालावधीत त्यात झालेल्या वाढीमुळे ही वाढ दिसून येते. राज्याच्या आरोग्य निर्देशांकांत ०.६०१ वरुन ०.६५० इतकी वाढ, उत्पन्न निर्देशांकांत ०.२९७ वरुन ०.३५१ इतकी तर शिक्षण निर्देशांकांत ०.६०६ वरुन ०.७१५ इतकी वाढ झाली. हा अहवाल केवळ आंतर राज्यीय खुशाली निर्देशांकांच्या प्रगतीतील असमानतेवर केंद्रीत नसून, देशातील जाती

व सामाजिक गट यामधील असमानतेवर ही प्रकाश टाकतो. भारत मानव विकास अहवाल, २०११ प्रमाणे देशात केरळ पहिल्या क्रमांकावर असून त्या खालोखाल दिल्ली, गोवा, पंजाब व महाराष्ट्राचा क्रमांक आहे. देशातील निवडक राज्यांचे मानव विकास निर्देशांक तक्ता ११.३ मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

**तक्ता ११.२ माविनि परिगणित करण्यासाठी वापरलेले मोजपाचे मानक (उद्दिष्ट)**

| निर्देशक | किमान | कमाल |
|---|---|---|
| जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान (वर्षे) | ५० | ८० |
| साक्षरता (७ वर्ष व अधिक) (टक्के) | ० | १०० |
| समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे | ० | ७ |
| असमानतेच्या अनुषंगाने समायोजित केलेला दरडोई उपभोग्य बाबींवरील वास्तव खर्च (₹ ) | २५५ | १,०९१ |

*आधार* - भारत मानव विकास अहवाल , २०११

**तक्ता ११.३ भारतातील काही निवडक राज्यांचे मानव विकास निर्देशांक**

| राज्य | १९८१ | | १९९१ | | २००१ | | २०११ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मा.वि.नि | क्रमांक | मा.वि.नि | क्रमांक | मा.वि.नि | क्रमांक | मा.वि.नि | क्रमांक |
| आंध्र प्रदेश | ०.२९८ | ९ | ०.३७७ | ९ | ०.३६८ | १२ | ०.४७३ | ११ |
| बिहार | ०.२३७ | १५ | ०.३०८ | १५ | ०.२९२ | १५ | ०.३६७ | १७ |
| गुजरात | ०.३६० | ४ | ०.४३१ | ६ | ०.४६६ | ८ | ०.५२७ | ८ |
| हरियाणा | ०.३६० | ५ | ०.४४३ | ५ | ०.५०१ | ६ | ०.५५२ | ७ |
| कर्नाटक | ०.३४६ | ६ | ०.४१२ | ७ | ०.४३२ | ९ | ०.५१९ | ९ |
| केरळ | ०.५०० | १ | ०.५९१ | १ | ०.६७७ | २ | ०.७९० | १ |
| मध्य प्रदेश | ०.२४५ | १४ | ०.३२८ | १३ | ०.२८५ | १६ | ०.३७५ | १६ |
| **महाराष्ट्र** | **०.३६३** | **३** | **०.४५२** | **४** | **०.५०१** | **५** | **०.५७२** | **५** |
| पंजाब | ०.४११ | २ | ०.४७५ | २ | ०.५४३ | ४ | ०.६०५ | ४ |
| तामिळनाडू | ०.३४३ | ७ | ०.४६६ | ३ | ०.४८० | ७ | ०.५७० | ६ |
| उत्तर प्रदेश | ०.२५५ | १३ | ०.३१४ | १४ | ०.३१६ | १४ | ०.३८० | १४ |
| पश्चिम बंगाल | ०.३०५ | ८ | ०.४०४ | ८ | ०.४२२ | १० | ०.४९२ | १० |
| **भारत** | **०.३०२** | | **०.३८१** | | **०.३८७** | | **०.४६७** | |

*आधार* - राष्ट्रीय मानव विकास अहवाल, २००१ व भारत मानव विकास अहवाल, २०११

## राज्य मानव विकास अहवाल

११.६ राज्याने पहिला मानव विकास अहवाल तयार करुन तो २००२ मध्ये प्रकाशित केला आहे त्यासाठी खालील निर्देशकांचा वापर करण्यात आला आहे.

- अर्भक मृत्यू दराच्या स्वरुपात आयुर्मान.
- साक्षरता दर व शिक्षणाची सरासरी वर्षे यानुसार ज्ञानार्जन.
- दरडोई जिल्हा उत्पन्नानुसार आर्थिक साध्यता.

प्रत्येक जिल्ह्यासाठी वंचितता निर्देशांक वापरुन मानव विकास निर्देशांक परिगणित करण्यात आले आहेत. अशाप्रकारे, काढलेला राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५८ आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये गडचिरोली जिल्ह्याचा माविनि सर्वांत कमी (०.२१) आहे. महाराष्ट्र मानव विकास अहवालामध्ये दिसून आलेल्या १२ अतिमागास जिल्ह्यांचा माविनि सुधारण्यासाठी राज्य शासनाने २९ जून, २००६ रोजी “महाराष्ट्र मानव विकास मिशन” ची स्थापना केली. या मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी जिल्हा, तालुका व गावपातळीवर मानव विकास समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. शासनाने महाराष्ट्र राज्याचा दुसरा मानव विकास अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरु केली असून हा अहवाल २०१२ मध्ये प्रकाशित होणे अपेक्षित आहे.

## महाराष्ट्रासाठीचे मानव विकास निर्देशक

११.७ तीन दशकांपासून लोकांच्या हितांशी निगडीत असलेले व मानव विकासावर थेट परिणाम होणाऱ्या निर्देशकांचे पैलू संक्षिप्तात ठळकपणे दर्शविण्यासाठी तुलनात्मक आकडेवारी तक्ता ११.४ मध्ये देण्यात आली आहे. बहुतांश निर्देशकातील प्रगती संथ रित्या होत असल्याचे दिसून येते. तथापि, ०-६ वर्षे वयोगटातील स्त्री-पुरुष प्रमाणात मात्र मोठी घट झाल्याचे दिसून येते.

**तक्ता ११.४ महाराष्ट्र व भारतातील मानव विकास निर्देशकांचा तपशिल**

| विवरण | १९९१ | | २००१ | | २०११ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| साक्षरता दर (७ वर्षे व अधिक) (टक्के) | ६४.९ | ५२.२ | ७६.९ | ६४.८ | ८२.९ | ७४.० |
| स्त्री - पुरुष साक्षरतेतील फरक (टक्के) | २४.२ | २४.८ | १८.९ | २१.६ | १४.३ | १६.७ |
| ग्रामीण -नागरी साक्षरतेतील फरक (टक्के) | २१.६ | २८.४ | १५.१ | २१.२ | १२.८ | १६.१ |
| जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान, पुरुष (वर्षे) | ६३.५ | ५९.७ | ६५.८ | ६२.३ | ६८.९ | ६७.३ |
| जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान , स्त्री (वर्षे) | ६५.८ | ६०.९ | ६८.१ | ६३.९ | ७२.५ | ६९.६ |
| स्त्री-पुरुष प्रमाण | ९३४ | ९२७ | ९२२ | ९३३ | ९२५ | ९४० |
| स्त्री- पुरुष प्रमाण (०-६ वर्षे) | ९४६ | ९४५ | ९१३ | ९२७ | ८८३ | ९१४ |
| चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न (₹) | ८,६७२ | ६,१०० | २४,०७६ | १७,७८२ | ८७,६८६ | ५३,३३१ |
| अर्भक मृत्यू दर | ६० | ८० | ४५ | ६६ | २८$ | ४७$ |

*आधार* : जनगणना अहवाल, २०११, नमुना नोंदणी पाहणी
टिप: $ अर्भक मृत्यू दर वर्ष २०१० करिता

## सहस्त्रकातील विकास उद्दिष्टे

११.८ सहस्त्रकातील उद्दिष्टांबाबतच्या जाहिरनाम्यामध्ये आठ विकास उद्दिष्टे स्विकारली असून ती २०१५ पर्यंत साध्य करावयाची आहेत. ही उद्दिष्टे एकमेकांशी निगडीत असून अति दारिद्र्य, उपासमार, निरक्षरता आणि रोगराई यांच्या निर्मूलनासाठी संख्यात्मक मापदंड पुरवितात तसेच स्त्री-पुरुष समानता, महिला सक्षमिकरण, पर्यावरणाचा समतोल राखणे व जागतिक भागीदारी या माध्यमातून विकास साध्य करतात. सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांचा जागतिक स्तरावरील संनियंत्रणासाठी प्रमाणित केलेल्या ५३ निर्देशकांना सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांच्या चौकटीने मान्यता दिली आहे. त्यापैकी, ३६ निर्देशकांना भारत सरकारने देशाशी निगडीत मानले आहे व त्याचबरोबर सध्याच्या प्रणालीमध्ये सांख्यिकीदृष्ट्या प्रमाणित संनियंत्रण पध्दती निश्चित केली आहे. सहस्त्रकातील विकासाची उद्दिष्टे गाठण्यासाठी भारताने अकराव्या पंचवार्षिक योजनेत पुन्हा बांधिलकी जाहीर केली आहे व त्यातील सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांची लक्ष्ये संपादीत करण्यासाठी जी उद्दिष्टे निर्धारित केली आहेत ती अंदाजाप्रमाणे वेगाने साध्य होत आहेत. भारताशी निगडीत आठ उद्दिष्टे त्यांच्या १२ काल मर्यादित लक्ष्यांसह खाली दिले आहेत.

➢ उद्दिष्ट १- अति दारिद्र्य व उपासमारी निर्मूलन.
- १९९० ते २०१५ दरम्यान राष्ट्रीय दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण निम्म्यांवर आणणे.
- १९९० ते २०१५ दरम्यान उपासमारीने पिडीत लोकांचे प्रमाण निम्म्यावर आणणे.

➢ उद्दिष्ट २- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण साधणे.
- २०१५ पर्यंत सर्व मुले प्राथमिक शिक्षणाचा संपूर्ण पाठ्यक्रम पूर्ण करतील याची खातरजमा करणे.

➢ उद्दिष्ट ३- स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन.
- प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील स्त्री-पुरुष विषमता विशेषत: २००५ पर्यंत व शिक्षणाच्या सर्व स्तरावरुन स्त्री-पुरूष विषमता २०१५ पर्यंत दूर करणे.

➢ उद्दिष्ट ४- बाल-मृत्यू कमी करणे.
- १९९० ते २०१५ दरम्यान पाच वर्षाखालील बाल-मृत्यूदराचे प्रमाण दोन तृतियांशाने कमी करणे.

➢ उद्दिष्ट ५- माता स्वास्थ्य सुधारणे.
- १९९० ते २०१५ दरम्यान माता मृत्युदर तीन चतुर्थांशांने कमी करणे.

➢ उद्दिष्ट ६- एचआयव्ही / एडस्, मलेरिया आणि इतर आजारांशी प्रति लढा देणे.
- २०१५ पर्यंत निर्मूलन करणे व एचआयव्ही / एडस् चे संसर्ग प्रतिकूल करणे.
- २०१५ पर्यंत निर्मूलन करणे व मलेरिया आणि इतर प्रमुख आजारांचा संसर्ग प्रतिकूल करणे.

- उद्दिष्ट ७- पर्यावरणाचा समतोल राखणे.
  - देशाच्या धोरणांमध्ये व कार्यक्रमामध्ये शाश्वत विकासाची तत्वे एकात्मिक करणे आणि पर्यावरणाच्या संसाधनांची होणारी हानी प्रतिकूल करणे.
  - २०१५ पर्यंत दीर्घकालीन शुध्द पिण्याचे पाणी व मूलभूत स्वच्छता सुविधा सातत्याने उपलब्ध नसलेल्या लोकांचे प्रमाण निम्म्यावर आणणे.
  - २०२० पर्यंत झोपडपट्टीत राहणाऱ्या किमान १०० दशलक्ष लोकांच्या जीवनात सुधारणा साध्य करणे.
- उद्दीष्ट ८- विकासासाठी जागतिक स्तरावर भागीदारी निर्माण करणे.
  - खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने नवीन तंत्रज्ञानाचे, विशेषतः माहिती व दळणवळण, क्षेत्राचे लाभ जनतेला उपलब्ध करणे.

११.९ सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रीय स्तरावर परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी सहस्त्रकातील विकास उद्दिष्टे यावरील अहवालांची मालिका प्रसिध्द केली आहे. निर्देशकांची सद्यःस्थिती, त्यांची निर्धारित लक्षांसह व २०१५ पर्यंत अपेक्षित साध्यांसह माहिती तक्ता ११.५ मध्ये दिली आहे. तक्ता ११.६ मध्ये इतर काही निर्देशकांच्या स्थितीतील बदल दर्शविला आहे.

**तक्ता ११.५ राज्यासाठी सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांबाबतचे निर्देशक, लक्ष्ये व अपेक्षित साध्ये**

| निर्देशक | संदर्भ कालावधी | लक्ष्य २०१५ | सद्यःस्थिती | अपेक्षित साध्य २०१५ |
|---|---|---|---|---|
| दारिद्र्याचे अंदाज $ (टक्के) | २००४-०५ | २५.४ | ३८.१ | ३०.४ |
| अपुऱ्या वजनाची मुले (< ३ वर्षे) | २००५-०६ | २६.१ | ३२.७ | २५.४ |
| निव्वळ पटसंख्येचे प्रमाण (प्राथमिक) | २००९-१० | १००.० | १००.० | १००.० |
| पाच वर्षाखालील मृत्यू दर | २००९ | २४.९ | ३६.० | ३०.२ |
| अर्भक मृत्यू दर | २०१० | १९.३ | २८.० | २५.३ |
| गोवर लसीकरण केलेल्या एका वर्षाच्या मुलांची टक्केवारी (१२-२३ महिने) | २००९ | १००.० | ९१.२ | ९६.० |
| माता मृत्यू दर ( प्रति १,००,००० जीवीत जन्मामागे मृत्यू) | २००७-०९ | ५८.६ | १०४.० | ७७.१ |

*आधार :* भारत देशाचा सहस्त्रकातील विकास उदिष्टांबाबतचा अहवाल, २०११
टीप : $ तेंडुलकर पध्दती वापरुन तयार करण्यातआलेले दारिद्र्याचे अंदाज

**तक्ता ११.६ राज्याकरिता सहस्त्रकातील विकास उद्दीष्टांच्या इतर निर्देशकांची सद्यःस्थिती**

| निर्देशक | | संदर्भ कालावधी | सुरुवातीची स्थिती | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|
| जनगणना २००१ व राष्ट्रीय नमुना पाहणी (६४ वी फेरी) अन्वये साक्षर युवकांची टक्केवारी (१५ ते २४ वर्ष ) | | २००१ ते २००७-०८ | ९० | ९५ |
| एड्समुळे झालेले अंदाजित मृत्यू | | २००६ ते २००९ | ५१,७५० | ३६,७७१ |
| एच.आय.व्ही बाधीत गरोदर स्त्रिया (१५ ते २४ वयोगटातील) (टक्के) | | २००४ ते २००८ | ०.८६ | ०.५३ |
| हिवताप प्रमाण दर व संलग्न मृत्यू दर | प्रमाण | २००६ ते २०१० | ०.३२ | ०.८६ |
| | मृत्यू प्रति १०० हिवताप बाधित रुग्ण | | ०.२४ | ०.१४ |
| सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण योजना अंतर्गत एकूण नोंदणीकृत रोगी व झालेले मृत्यू | एकूण नोंदणीकृत रोगी | २००५ ते २००९ | १,४४,५६४ | १,३७,७०५ |
| | एकूण मृत झालेले रोगी | | ६,९३६ | ७,७९४ |
| एकूण भौगोलिक क्षेत्रांशी जंगल व्याप्त क्षेत्राची टक्केवारी | | १९९५ ते २००७ | २०.७५ | २०.१३ |
| सुधारित स्वच्छता सुविधा उपलब्धता असल्यास कुटुंबाचे प्रमाण (टक्के) | | २००५-०६ ते २००८-०९ | ५२.९ | ६१.६ |
| पिण्याच्या पाण्याचे सुधारित स्त्रोतांची उपलब्धता असण्याच्या कुटुंबांचे प्रमाण (टक्के) | | २००५-०६ ते २००८-०९ | ९२.७ | ९०.३ |

*आधार:* भारत देशाचा सहस्त्रकातील विकास उद्दिष्टचे अहवाल २०११

## असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक

११.१० बऱ्याचवेळा मानव विकास निर्देशांकांतील प्रगती राष्ट्राच्या मुख्य विकास निर्देशकांची प्रगती म्हणून दर्शविली जाते. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या जागतिक मानव विकास अहवाल, २०१० मध्ये समाजातील असमानता विचारात घेऊन नव्याने असमानता समायोजित माविनि निर्देशांक परिगणित करण्यात आला आहे. पूर्ण समानता असताना असमानता समायोजित माविनि माविनिच्या बरोबर असतो. पण जर विषमता वाढली तर तो माविनिपेक्षा कमी असतो. उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य या माविनिच्या तीन घटकांमधून त्यांच्या विषमतेच्या स्तराप्रमाणे प्रत्येक घटकातून संबंधित सरासरी मूल्य वगळून त्यामध्ये असमानता समायोजित करण्यात येते. यासाठी 'अटकिंसन' निर्देशांक वापरण्यात येतो. विशेषत: भारताबाबत असमानता समायोजित माविनि महत्त्वाचा आहे, कारण साधारण निर्देशक देशाच्या राज्यातील मानव विकासाच्या साध्यतेतील असमानता दर्शवित नाही. मानव विकास अहवाल २०११ मध्ये भारताचा माविनि ०.५४७ असून असमानता समायोजित माविनि ०.३९२ इतका आहे.

* * * * *

# १२

# विशेष अभ्यास



# १२. विशेष अभ्यास

१२.१ सामाजिक व आर्थिक पैलुंवर राष्ट्रीय नमुना पाहणी (रा.न.पा) कार्यालय, भारत सरकार, प्रतिवर्षी राष्ट्रव्यापी नमुना पाहण्या घेत असते, ज्यास फेरी असे संबोधले जाते. ऋतूमानाच्या बदलाच्या परिणामांची नोंद घेण्यासाठी ती चार उप-फेऱ्यांत विभागली जाते. अधिकृत सूत्रांकडून उपलब्ध होत नसलेल्या विशिष्ठ बाबींची माहिती पाहण्याव्दारे उपलब्ध केली जाते. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवव्या फेरीपासून (सन १९५५) नियमीत स्वरूपात अनुरूप तत्वावर राष्ट्रीय नमुना पाहणीत सहभागी होऊन राज्य स्तरीय अंदाज तयार करुन प्रसिध्द करते. विविध मापदंडावरील गोळा केलेल्या आकडेवारीचे संपूर्ण विश्लेषण करून अर्थ व सांख्यिकी संचालनालय प्रत्येक फेरीसाठी तपशीलवार अहवाल तयार करते. जुलै, २०११ ते जून, २०१२ या कालावधीत होणारी ६८ वी फेरी "रोजगार व बेरोजगार" आणि "कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च" या विषयांवर आधारित आहे. ६६ व्या फेरी अंतर्गत (जुलै, २००९ ते जून, २०१०) याच विषयावर पाहणी घेण्यात आली होती.

१२.२ ६६ व्या फेरीतील ४ उप फेऱ्या व ६८ व्या फेरीतील २ उप फेऱ्यांवर आधारीत काही महत्वाचे अस्थायी निष्कर्ष अंदाजित करुन खाली सादर करण्यात आले आहेत. ६६ व्या फेरीत व ६८ व्या फेरीत अनुक्रमे ३०,०९६ कुटुंबे व १५,१२० कुटुंबांची आकडेवारी गोळा करण्यात आली आहे.

## रोजगार व बेरोजगार

१२.३ एखाद्या भौगोलिक क्षेत्रातील एका निश्चित कालावधीत रोजगार व बेरोजगाराची स्थिती व्यक्तीच्या नित्य कार्यस्थितीवर ठरविली जाते. पाहणीपूर्वीच्या ३६५ दिवसात व्यक्तीने व्यतीत केलेला सापेक्ष जास्त कालावधी म्हणजे नित्य कार्यस्थिती होय.

१२.४ ६६ व ६८ व्या फेरीत नित्य कार्यस्थितीनुसार जवळपास ६०.० टक्के व्यक्ती श्रमशक्तीत असल्याचे निर्दशनास येते. ६६ व ६८ व्या फेरीतील नित्य कार्यस्थितीनुसार तुलनात्मक आकडेवारी तक्ता क्र. १२.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १२.१ १५-५९ वर्षे वयोगटातील व्यक्तींची नित्य कार्यस्थितीनुसार टक्केवारी**

| नित्य कार्यस्थिती | ६६ वी फेरी * | | | ६८ वी फेरी * | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| (१) रोजगार असलेले | ८०.५ | ३३.६ | ५८.४ | ८०.२ | ३७.८ | ५९.० |
| (२) रोजगार नसलेले परंतु रोजगाराच्या शोधात आणि/किंवा रोजगारासाठी उपलब्ध (बेरोजगार) | १.३ | ०.६ | १.० | १.५ | ०.३ | ०.९ |
| एकूण श्रमशक्ती (१ + २) | ८१.८ | ३४.२ | ५९.४ | ८१.७ | ३८.१ | ५९.९ |
| (३) श्रमशक्तीच्या बाहेर | १८.२ | ६५.७ | ४०.६ | १८.३ | ६१.९ | ४०.१ |

आधार : रानपाची राज्य नमुना आकडेवारी, (अवसांसं) * अस्थायी

१२.५ १५ - ५९ वर्षे वयोगटातील एकूण कामगारांपैकी ६८ व्या फेरीत नैमित्तिक मजूरांची टक्केवारी ३७.० टक्के असून, ही ६६ व्या फेरीतील ३०.६ टक्क्यांच्या तुलनेत वाढलेली दिसून येते. एकूण महिला कामगारात नैमित्तिक मजूर स्त्रियांची टक्केवारी ६६ व्या फेरीच्या ४२.३ टक्क्यांवरून ६८ व्या फेरीत ४८.३ टक्के इतकी वाढलेली आहे. तपशील तक्ता क्र. १२.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १२.२ १५-५९ वर्षे वयोगटातील कामगारांची प्रकारानुसार टक्केवारी**

| कामगारांचे वर्गीकरण | ६६ वी फेरी * | | | ६८ वी फेरी * | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| (१) स्वंयरोजगारी/ कौटुंबिक व्यवसायात मदतनीस | ४४.६ | ४२.१ | ४३.९ | ४९.० | ४३.९ | ४७.३ |
| (२) नियमित मजूरी / वेतनावरील कर्मचारी | २९.४ | १५.६ | २५.५ | १९.५ | ७.८ | १५.७ |
| (३) नैमित्तिक मजुर | २६.० | ४२.३ | ३०.६ | ३१.५ | ४८.३ | ३७.० |
| एकूण | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

आधार : रानपाची राज्य नमुना आकडेवारी, (अवसांसं) *अस्थायी

१२.६ दोन्ही फेऱ्यामधील १५-५९ या वयोगटातील व्यक्तींची नित्यकार्यस्थिती व शैक्षणिक स्तरानुसार टक्केवारी तक्ता क्र.१२.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १२.३ १५ - ५९ वर्षे वयोगटातील व्यक्तींची नित्य कार्यस्थितीनुसार व शैक्षणिक स्तरानुसार टक्केवारी**

| शैक्षणिक स्तर | ६६ वी फेरी * | | | ६८ वी फेरी * | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रोजगार असलेले | रोजगार नसलेले | श्रमशक्तीच्या बाहेर | रोजगार असलेले | रोजगार नसलेले | श्रमशक्तीच्या बाहेर |
| निरक्षर | ६३.७ | ०.३ | ३६.० | ६२.६ | ०.१ | ३७.३ |
| औपचारिक शालेय शिक्षणाविना साक्षर : ईजीएस / एनएफईसी / एईसी / टीएलसी $ / इतर | ६१.१ | ०.४ | ३८.५ | ३१.५ | ०.० | ६८.५ |
| साक्षर व उच्च प्राथमिक पर्यत | ६२.४ | ०.७ | ३६.९ | ६३.० | ०.७ | ३६.३ |
| माध्यमिक | ५०.१ | ०.९ | ४९.० | ५५.८ | ०.८ | ४३.४ |
| उच्च माध्यमिक | ४५.३ | १.२ | ५३.५ | ४२.१ | १.७ | ५६.२ |
| पदविका/ प्रमाणपत्र | ५७.९ | ४.८ | ३७.३ | ६४.४ | ४.७ | ३०.९ |
| पदवी | ६३.४ | २.९ | ३३.७ | ५८.५ | ३.० | ३८.५ |
| पदव्युत्तर आणि त्यापेक्षा जास्त | ६९.३ | २.४ | २८.३ | ७६.२ | २.४ | २१.४ |
| एकूण | ५८.४ | १.० | ४०.६ | ५९.० | ०.९ | ४०.१ |

*आधार* : रा.न.पा. ची राज्य नमुना आकडेवारी, (अवसांसं ) $ईजीएस : शिक्षण हमी योजना एनएफईसी : अनौपचारिक शैक्षणिक पाठ्यक्रम
एईसी : प्रौढ शिक्षण केंद्र टीएलसी : संपूर्ण साक्षरता अभियान *अस्थायी

## कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च

१२.७ कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च म्हणजे कुटुंबाने फक्त घरगुती उपभोगासाठी वापरलेल्या वस्तू व सेवांवरील खर्च होय. निवडलेल्या कुटुंबाने वस्तू व सेवा यावर केलेल्या खर्चाची व परिमाणांची आकडेवारी ६६ व्या व ६८ व्या फेरीत संकलित केली आहे.

१२.८ दरडोई मासिक खर्च हा खाद्यपदार्थ (ज्यात तृणधान्ये, डाळी, भाज्या व इतर खाद्यपदार्थ यांचा समावेश होतो) व खाद्येत्तर पदार्थ (ज्यात शैक्षणिक, वैद्यकिय व नाशवंत पदार्थ यांचा समावेश होतो) यावरील नोंदविलेल्या माहितीवर अंदाजित केला आहे. दोन्ही फेऱ्यामधील कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील मासिक खर्च सुमारे ₹ १५०० आहे. खाद्यपदार्थापेक्षा खाद्येत्तर पदार्थावरील खर्च जास्त आढळून आला आहे. तपशील १२.४ तक्त्यात दिला आहे.

**तक्ता १२.४ खाद्य व खाद्येत्तर बाबींवरील दरडोई मासिक खर्च**

| बाबी | ६६ वी फेरी* | | ६८ वी फेरी* | |
|---|---|---|---|---|
| | परिमाण (कि.) | खर्च (₹) | परिमाण (कि.) | खर्च (₹) |
| **खाद्य** | | | | |
| तृणधान्य व तृणधान्य उत्पादने | ९.४४ | १४९ | ९.५७ | १५९ |
| डाळी व डाळींची उत्पादने | ०.८९ | ५६ | १.०२ | ६० |
| इतर अन्नपदार्थ | ला.ना. | ४३५ | ला.ना. | ४६८ |
| **उप बेरीज** | ला.ना. | ६४० | ला.ना. | ६८७ |
| **खाद्येत्तर** | ला.ना. | ८६५ | ला.ना. | ८१९ |
| **एकूण** | ला.ना. | १५०५ | ला.ना. | १५०६ |

*आधार* : : रा.न.पा. ची राज्य नमुना आकडेवारी, (अवसांसं ) ला.ना. लागू नाही *अस्थायी

*******

# *व्याख्या सूची*

**राष्ट्रीय निव्वळ उत्पन्न (एनएनपी)** : याला सर्वसाधारण राष्ट्रीय उत्पन्न असे ही संबोधले जाते. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशाच्या भौगोलिक सीमांतर्गत विशिष्ट कालावधीमध्ये (साधारणपणे एक वर्ष) निर्माण झालेल्या सर्व वस्तू व सेवांची (द्विरुक्ति टाळून) आर्थिक स्वरुपात केलेले मोजमाप होय. यामध्ये विदेश व्यवहारातील देवाण-घेवणातील फरकाचा समावेश केला जातो.

**देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एनडीपी)** : जेव्हा राष्ट्रीय निव्वळ उत्पन्नात विदेशी व्यवहारातील देवाण-घेवाणातील फरकाचा समावेश केला जात नाही तेव्हा त्याला देशांतर्गत निव्वळ उत्पन्न म्हटले जाते.

**देशांतर्गत स्थूल उत्पन्न (जीडीपी)** : देशांतर्गत निव्वळ उत्पन्नात (एनडीपी) स्थिर भांडवलाच्या घसाऱ्याचा समावेश केला जातो तेव्हा त्यास देशांतर्गत स्थूल उत्पन्न म्हटले जाते तसेच जेव्हा स्थिर भांडवलाच्या घसाऱ्याचा राष्ट्रीय निव्वळ उत्पन्नात (एनएनपी) समावेश केला जातो तेव्हा त्यास राष्ट्रीय स्थूल उत्पन्न (जीएनपी) असे म्हटले जाते.

**राज्यांतर्गत निव्वळ उत्पन्न (एनएसडीपी)** : याला सर्वसाधारणपणे राज्य उत्पन्न असेही संबोधले जाते. राज्य उत्पन्न म्हणजे विशिष्ठ कालावधीमध्ये (साधारणपणे एक वर्ष) राज्याच्या भौगोलिक सीमांतर्गत निर्माण झालेल्या सर्व वस्तू व सेवांची (द्विरुक्ति टाळून) आर्थिक स्वरूपात केलेले मोजमाप होय.

**राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न (जीएसडीपी)** : राज्य निव्वळ उत्पन्नाात (एनएसडीपी) स्थिर भांडवलाच्या घसाऱ्याचा समावेश केला जातो तेव्हा त्यास राज्य स्थूल उत्पन्न असे म्हटले जाते.

**जिल्ह्यांतर्गत निव्वळ उत्पन्न (एनडीडीपी)** : याला सर्वसाधारणपणे जिल्हा उत्पन्न असे संबोधले जाते. जिल्हा उत्पन्न म्हणजे जिल्ह्यांच्या भौगोलिक सीमांतर्गत विशिष्ट कालावधीमध्ये (सर्वसाधारणपणे एक वर्ष) निर्माण झालेल्या सर्व वस्तू व सेवांची (द्विरुक्ति टाळून) आर्थिक स्वरुपात केलेले मोजमाप होय.

**जिल्ह्यांतर्गत स्थूल उत्पन्न (जीडीडीपी)** : जिल्ह्यांतर्गत निव्वळ उत्पन्नात (एनडीडीपी) स्थिर भांडवलाच्या घसाऱ्याचा समावेश केल्यास त्यास जिल्ह्यांतर्गत स्थूल उत्पन्न असे संबोधले जाते.

**प्रारंभिक अंदाज** : मागील वर्षाच्या पूर्वानुमानाची सुधारणा

**आगाऊ अंदाज** : उपलब्ध अनुरुप निर्देशांक वापरुन केलेले अंदाज

$$\text{राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न} = \frac{\text{नाममात्र राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न}}{\text{वास्तविक राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न}} \times १००$$

वास्तविक राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न = वास्तविक राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न स्थिर किंमती नुसार मोजले जाते. स्थिर किंमती म्हणजे एका विशिष्ट वर्षाच्या किंमती असून त्या वर्षाला पायाभूत वर्ष संबोधले जाते.

नाममात्र राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न = नाममात्र राज्यांतर्गत स्थूल उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न चालू किंमतीनुसार मोजले जाते.

**ग्रामीण विद्युतीकरण** (विद्युतीकरण केलेले खेडे**) :** ग्रामपंचायतीने (१) लोकवस्ती असलेले खेडे, तसेच जेथे किमान एक दलित वस्ती/ वाडी असेल तेथे वितरण रोहित्र आणि वितरण तारमार्ग यांसारख्या पायाभूत सोयी केलेल्या असतील, आणि (२) शाळा, पंचायत कार्यालय, आरोग्य केंद्रे, दवाखाने, समाजमंदिर यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी वीज पुरवलेली असेल, आणि (३) वीजपुरवठा केलेल्या कुटुंबांची संख्या, त्या खेड्यातील कुटुंबांच्या एकूण संख्येपैकी किमान १० टक्के एवढी असेल या मुद्यांवर दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे खेड्यांचे, विद्युतीकरण केलेले खेडे म्हणून वर्गीकरण करण्यात येईल.
(उर्जा मंत्रालय, भारत सरकारने ग्रामीण विद्युतीकरण धोरण २००६ अंतर्गत निश्चित केलेली व्याख्या)

**शैक्षणिकदृष्टया मागास गट** : शैक्षणिकदृष्ट्या मागास गट म्हणजे ज्या गटाचा ग्रामीण स्त्री साक्षरता दर हा राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा कमी असून स्त्री-पुरुष साक्षरतेतील दरी राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा जास्त असते.

**विशेष गरजा असलेली मुले** : विशेष गरजा असलेली मुले म्हणजे दृष्टीदोष, श्रवणदोष, हालचालदोष, आकलनदोष, सेरेब्रल पाल्सी किंवा मतीमंदत्व यांसारख्या रोगाने पिडीत असलेली सर्व मुले होय.

***एकूण प्रवेश प्रमाण :***

'क'वर्गातील 'ट' वर्षाकरिता शाळेतील पटावरील विद्यार्थ्यांच्या संख्येला 'अ' वयोगटातील 'क' या वर्गाकरीता संबंधित वयोगटातील मुलांच्या संख्येने भागले असता एकूण प्रवेश प्रमाण मिळते .

$$\text{एकूण प्रवेश प्रमाण} = \frac{\text{प्र}^{\text{ट}}_{\text{क,अ}}}{\text{प}^{\text{ट}}_{\text{अ}}} X \text{ १००}$$

**जन्म दर :** दर हजार व्यक्तींमागे त्या वर्षातील जिवित जन्मांची संख्या

**मृत्यू दर :** दर हजार व्यक्तींमागे त्या वर्षातील मृत्यूंची संख्या

**अर्भक मृत्यू दर :** दर हजार जिवित जन्मांमागे अर्भकांच्या (एक वर्ष किंवा त्यापेक्षा लहान) मृत्यूंची संख्या

**नवजात मृत्यू दर :** चालू वर्षातील जिवित जन्मांमागे २८ दिवसांपेक्षा कमी वय असलेल्या नवजात शिशुंच्या मृत्यूंची संख्या

**माता मृत्यू :** गरोदर पणात किंवा प्रसुतीपश्चात अल्प कालावधीत प्रसुतीमुळे झालेल्या स्त्रिच्या मृत्यूस माता मृत्यू असे म्हणतात.

**माता मृत्यू दर :** एक लाख जिवित जन्मांमागे माता मृत्यूंची संख्या. माता मृत्यू दराचा आरोग्य विषयक सेवांच्या दर्जाचे परिमाण म्हणून उपयोग केला जातो.

**एकूण जनन दर :** स्त्रीच्या जीवनकालावधीत स्त्रीला होणारी सरासरी जिवित मुले

**मुख्य कामगार :** गणनेपूर्वीच्या वर्षामध्ये १८३ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस काम केलेल्या कामगारांना मुख्य कामगार असे म्हणतात.

**सीमांतिक कामगार** : गणनेपूर्वीच्या वर्षामध्ये १८३ दिवसांपेक्षा कमी दिवस काम केलेल्या कामगारांना सीमांतिक कामगार असे म्हणतात.

चालू आठवड्याची कार्यस्थिती : एखाद्या व्यक्तीची पाहणीच्या दिनांकाच्या मागील सात दिवसांतील कार्यस्थिती.

**ग्राहक वस्तू :** स्वतःच्या व कुटुबांच्या वापरासाठी ग्राहकांनी खरेदी केलेल्या वस्तू.

**पुन:निर्माण वस्तू :** दुसऱ्या वस्तू तयार करण्याकरिता वापरात येणाऱ्या वस्तू.

**भांडवली वस्तू :** वस्तू तयार करण्यात येणारी यंत्रे, इत्यादि.

**सर्वसाधारण राज्य मानव विकास निर्देशांक मापनासाठी वापरण्यात आलेले सूत्र (भारत मानव विकास अहवाल, २०११) :**

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

$$\text{आरोग्य निर्देशांक} = \frac{\text{जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान - किमान (जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मान)}}{\text{जन्मवेळेचे अपेक्षित आयुर्मानाचा विस्तार}}$$

शिक्षण निर्देशांक = १/३ * (साक्षरता निर्देशांक) + २/३ * (समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे )

जेथे साक्षरता निर्देशांक = ७ वर्षे व अधिक वयाच्या लोकांचे साक्षरता दर निर्देशांक

समायोजित शिक्षणाची सरासरी वर्षे = ७ वर्षे व अधिक वयाच्या लोकांची शिक्षणाची सरासरी वर्षे, ६ ते १७ या शाळेत जाणाऱ्या वयातील शाळा सोडलेल्या मुलांना समायोजित केलेले

$$\text{उत्पन्न निर्देशांक} = \frac{\text{मासिक दरडोई खर्च (१-ग) - मासिक दरडोई खर्च}_{\text{किमान}}\text{ (१-ग)}}{\text{मासिक दरडोई खर्च}_{\text{कमाल}}\text{ (१-ग) - मासिक दरडोई खर्च}_{\text{कमाल}}\text{ (१-ग)}}$$

जेथे ग = मासिक दरडोई खर्चाच्या असमानतेचा गिनी गुणांक

मानव विकास निर्देशांक = आरोग्य निर्देशांक, शैक्षणिक निर्देशांक व उत्पन्न निर्देशांक यांची सर्वसाधारण सरासरी.

**राज्य मानव विकास निर्देशांक मापनासाठी पध्दती (राज्य मानव विकास अहवाल २००२) :**

प्रत्येक निर्देशांकासाठी विशिष्ठ देशाची वंचितता खालील सुत्राने परिगणीत करण्यात येते.

$$\text{निर्देशांक}_{(\text{क}, \text{ख})} = [\text{महत्तम}_{\text{ख}}\ \text{क्ष}_{(\text{क}, \text{ख})} - \text{क्ष}_{(\text{क}, \text{ख})}] / \text{विस्तार}_{(\text{क})}$$

जेथे

निर्देशांक $_{(\text{क}, \text{ख})}$ - ख देशाची क चलासाठीची वंचितता निर्देशक

महत्तम $_{\text{ख}}$ क्ष $_{(\text{क}, \text{ख})}$ - विविध देशांमधील सर्वाधिक क्ष $_{(\text{क}, \text{ख})}$

क्ष $_{(\text{क}, \text{ख})}$ - क चलाचे ख देशासाठीचे मूल्य

विस्तार $_{(\text{क})}$ - क चलाचा विस्तार

प्रत्येक ख देशाची सरासरी वंचितता निर्देशक - निर्देशांक $_{(\text{ख})}$ त्या देशाच्या प्रत्येक चलासाठीचा वंचितता निर्देशकांची सरासरी.

ख देशासाठीचा मानव विकास निर्देशांक - मानव विकास निर्देशांक $_{(\text{ख})}$ = १ - निर्देशांक $_{(\text{ख})}$

**असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक मापनासाठी पध्दती (जागतिक मानव विकास अहवाल, २०१०)**

'अटकिंसन' निर्देशांक $\text{अ}_{\text{क}} = १ - \dfrac{\text{क परिमाणाच्या वंटनाचे गुणोत्तर माध्य}}{\text{क परिमाणाची सरासरी}}$

असमानता समायोजित परिमाणाचे निर्देशांक $\text{ब}^{*}_{\text{क}} = (१ - \text{अ}_{\text{क}}) * \text{ब}_{\text{क}}$

जेथे $\text{ब}_{\text{क}}$ माविनी चे परिमाण निर्देशांक आहे.

असमानता समायोजित माविनी = $\sqrt[३]{(\text{ब}^{*}_{\text{आयुष्य}} * \text{ब}^{*}_{\text{शिक्षण}} * \text{ब}^{*}_{\text{उत्पन्न}})}$

* * * * *

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक



## क. भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | भौगोलिक क्षेत्र (लाख चौ.कि.मी.) | लोकसंख्या (लाख) | लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.) | नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | राज्याच्या लोकसंख्येची भारताच्या लोकसंख्येशी टक्केवारी | लोकसंख्येतील दशवर्षीय वाढ (टक्के) | स्त्री -पुरुष प्रमाण | अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | मुख्यतः काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | कृषि विषयक काम करणाऱ्यांची एकूण काम करणाऱ्यांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संदर्भ वर्ष किंवा दिनांक | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२००१-११) | (२०११) | (२००१) | (२००१) | (२००१) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| आंध्र प्रदेश | २.७५ | ८४६.६६ | ३०८ | ३३.४९ | ७.०० | ११.१० | ९९२ | २२.७८ | ३८.११ | ६२.१६ |
| अरुणाचल प्रदेश | ०.८४ | १३.८३ | १७ | २२.६७ | ०.११ | २५.९२ | ९२० | ६४.७९ | ३७.८० | ६१.७४ |
| आसाम | ०.७८ | ३११.६९ | ३९७ | १४.०८ | २.५८ | १६.९३ | ९५४ | १९.२६ | २६.६९ | ५२.३६ |
| बिहार | ०.९४ | १,०३८.०५ | १,१०२ | ११.३० | ८.५८ | २५.०७ | ९१६ | १६.६४ | २५.३७ | ७७.२५ |
| झारखंड | ०.८० | ३२९.६६ | ४१४ | २४.०५ | २.७२ | २२.३४ | ९४७ | ३८.१४ | २३.९२ | ६६.६८ |
| दिल्ली | ०.०१ | १६७.५३ | ११,२९७ | ९७.५० | १.३८ | २०.९६ | ८६६ | १६.९२ | ३१.१७ | १.१७ |
| गोवा | ०.०४ | १४.५८ | ३९४ | ६२.१७ | ०.१२ | ८.१७ | ९६८ | १.८१ | ३१.५६ | १६.४९ |
| गुजरात | १.९६ | ६०३.८४ | ३०८ | ४२.५८ | ४.९९ | १९.१७ | ९१८ | २१.८५ | ३३.६० | ५१.५८ |
| हरियाणा | ०.४४ | २५३.५३ | ५७३ | ३४.७९ | २.०९ | १९.९० | ८७७ | १९.३५ | २९.५२ | ५१.२९ |
| हिमाचल प्रदेश | ०.५६ | ६८.५७ | १२३ | १०.०४ | ०.५७ | १२.८१ | ९७४ | २८.७४ | ३२.३१ | ६८.४७ |
| जम्मू व काश्मीर | २.२२ | १२५.४९ | १२४ | २७.२१ | १.०४ | २३.७१ | ८८३ | १८.५० | २५.७२ | ४८.९६ |
| कर्नाटक | १.९२ | ६११.३१ | ३१९ | ३८.५७ | ५.०५ | १५.६७ | ९६८ | २२.७६ | ३६.६४ | ५५.७१ |
| केरळ | ०.३९ | ३३३.८८ | ८५९ | ४७.७२ | २.७६ | ४.८६ | १,०८४ | १०.९५ | २५.८७ | २२.८० |
| मध्य प्रदेश | ३.०८ | ७२५.९८ | २३६ | २७.६३ | ६.०० | २०.३० | ९३० | ३५.४४ | ३१.६५ | ७१.४९ |
| छत्तीसगड | १.३५ | २५५.४० | १८९ | २३.२४ | २.११ | २२.५९ | ९९१ | ४३.३७ | ३३.८६ | ७६.४७ |
| **महाराष्ट्र** | **३.०८** | **१,१२३.७३** | **३६५** | **४५.२३** | **९.२९** | **१५.९९** | **९२५** | **१९.०५** | **३५.८७** | **५४.९६** |
| मणिपूर | ०.२२ | २७.२२ | १२२ | ३०.२१ | ०.२२ | १८.६५ | ९८७ | ३६.९८ | ३०.४३ | ५२.१९ |
| मेघालय | ०.२२ | २९.६४ | १३२ | २०.०८ | ०.२४ | २७.८२ | ९८६ | ८६.४२ | ३२.६५ | ६५.८४ |
| मिझोराम | ०.२१ | १०.९१ | ५२ | ५१.५१ | ०.०९ | २२.७८ | ९७५ | ९४.४९ | ४०.७९ | ६०.६० |
| नागालँड | ०.१७ | १९.८१ | ११९ | २८.९७ | ०.१६ | -०.४७ | ९३१ | ८९.१५ | ३५.३८ | ६८.३८ |
| ओडिशा | १.५६ | ४१९.४७ | २६९ | १६.६८ | ३.४७ | १३.९७ | ९७८ | ३८.६६ | २६.०५ | ६४.७७ |
| पंजाब | ०.५० | २७७.०४ | ५५० | ३७.४९ | २.२९ | १३.७३ | ८९३ | २८.८५ | ३२.१७ | ३८.९५ |
| राजस्थान | ३.४२ | ६८६.२१ | २०१ | २४.८९ | ५.६७ | २१.४४ | ९२६ | २९.७२ | ३०.८६ | ६५.९१ |
| सिक्कीम | ०.०७ | ६.०८ | ८६ | २४.९७ | ०.०५ | १२.३६ | ८८९ | २५.६२ | ३९.३६ | ५६.३६ |
| तामीळनाडू | १.३० | ७२१.३९ | ५५५ | ४८.४५ | ५.९६ | १५.६० | ९९५ | २०.०४ | ३८.०७ | ४९.३३ |
| त्रिपूरा | ०.१० | ३६.७१ | ३५० | २६.१८ | ०.३० | १४.७५ | ९६१ | ४८.४२ | २८.५२ | ५०.८३ |
| उत्तर प्रदेश | २.४१ | १,९९५.८१ | ८२८ | २२.२८ | १६.४९ | २०.०९ | ९०८ | २१.२१ | २३.६७ | ६५.८९ |
| उत्तराखंड | ०.५३ | १०१.१७ | १८९ | ३०.५५ | ०.८४ | १९.१७ | ९६३ | २०.८९ | २७.३६ | ५८.३८ |
| पश्चिम बंगाल | ०.८९ | ९१३.४८ | १,०२९ | ३१.८९ | ७.५५ | १३.९३ | ९४७ | २८.५१ | २८.७२ | ४४.१५ |
| **भारत $** | **३२.८७** | **१२,१०१.९३** | **३८२** | **३१.१६** | **१००.००** | **१७.६४** | **९४०** | **२४.४०** | **३०.४३** | **५८.२०** |

$ केंद्रशासित प्रदेश धरुन

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग दर | मानव विकासाबाबतचे मूलभूत निर्देशक | | | | | | | | | मानव विकास निर्देशांक | लग्नाच्या वेळेचे सरासरी वय (स्त्रिया) | संपूर्ण लसीकरण झालेल्या बालकांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | साक्षरतेची टक्केवारी †† | | | जन्माच्या वेळेची आयुर्मर्यादा (वर्षे) | | जन्म दर | मृत्यु दर | अर्भक मृत्यू दर @ | चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न * (₹) (पायाभूत वर्ष २००४-०५) | | | |
| | पुरुष | स्त्रिया | एकुण | पुरुष | स्त्रिया | | | | | | | |
| (२००१) | (२०११) | (२०११) | (२०११) | (२०११-१५) | (२०११-१५) | (२०१०) | (२०१०) | (२०१०) | (२०१०-११) | (२०११) | (२००८) | (२००७-०८) |
| (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) |
| ३५.११ | ७५.५६ | ५९.७४ | ६७.६६ | ६६.९ | ७०.९ | १७.९ | ७.६ | ४६ | ६२,९१२ | ०.४७३ | १९.६ | ६७.१ |
| ३६.५४ | ७३.६९ | ५९.५७ | ६६.९५ | उ.ना. | उ.ना. | २०.५ | ५.९ | ३१ | ५५,७८९ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २०.७१ | ७८.८१ | ६७.२७ | ७३.१८ | ६३.६ | ६४.८ | २३.२ | ८.२ | ५८ | ३०,५६९ | ०.४४४ | २०.७ | ५०.९ |
| १८.८४ | ७३.३९ | ५३.३३ | ६३.८२ | ६८.६ | ६८.७ | २८.१ | ६.८ | ४८ | २०,७०८ | ०.३६७ | १९.५ | ४१.४ |
| २६.४१ | ७८.४५ | ५६.२१ | ६७.६३ | ६७.५ | ६६.० | २५.३ | ७.० | ४२ | २९,७८६ | ०.३७६ | २०.५ | ५४.१ |
| ९.३७ | ९१.०३ | ८०.९३ | ८६.३४ | ७२.२ | ७५.८ | १७.८ | ४.२ | ३० | १,५०,६५३ | ०.७५० | २२.१ | ६७.६ |
| २२.३६ | ९२.८१ | ८१.८४ | ८७.४० | उ.ना. | उ.ना. | १३.२ | ६.६ | १० | १,६८,५७२ | ०.६१७ | उ.ना. | ८९.८ |
| २७.९१ | ८७.२३ | ७०.७३ | ७९.३१ | ६९.२ | ७२.५ | २१.८ | ६.७ | ४४ | ७५,११५ | ०.५२७ | २१.० | ५४.९ |
| २७.२२ | ८५.३८ | ६६.७७ | ७६.६४ | ६८.९ | ७१.३ | २२.३ | ६.६ | ४८ | ९४,६८० | ०.५५२ | २०.१ | ५९.६ |
| ४३.६७ | ९०.८३ | ७६.६० | ८३.७८ | ७०.८ | ७४.३ | १६.९ | ६.९ | ४० | ६५,५३५ | ०.६५२ | २२.१ | ८२.३ |
| २२.४५ | ७८.२६ | ५८.०१ | ६८.७४ | ६६.५ | ६९.३ | १८.३ | ५.७ | ४३ | ३७,४९६ | ०.५२९ | २३.३ | ६२.५ |
| ३१.९८ | ८२.८५ | ६८.१३ | ७५.६० | ६८.० | ७२.३ | १९.२ | ७.१ | ३८ | ६०,९४६ | ०.५१९ | २०.३ | ७६.७ |
| १५.३८ | ९६.०२ | ९१.९८ | ९३.९१ | ७३.२ | ७७.६ | १४.८ | ७.० | १३ | ७१,४३४ | ०.७९० | २२.८ | ७९.५ |
| ३३.२१ | ८०.५३ | ६०.०२ | ७०.६३ | ६४.५ | ६५.३ | २७.३ | ८.३ | ६२ | ३२,२२२ | ०.३७५ | २१.४ | ३६.२ |
| ४०.०४ | ८१.४५ | ६०.५९ | ७१.०४ | ६३.० | ६६.० | २५.३ | ८.० | ५१ | ४१,१६७ | ०.३५८ | २०.२ | ५९.३ |
| **३०.८१** | **८९.८२** | **७५.४८** | **८२.९१** | **६८.९** | **७२.५** | **१७.१** | **६.५** | **२८** | **८७,६८६** | **०.५७२** | **२०.९** | **६९.१** |
| ३९.०२ | ८६.४९ | ७३.१७ | ७९.८५ | उ.ना. | उ.ना. | १४.९ | ४.२ | १४ | २९,६८४ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ३५.१५ | ७७.१७ | ७३.७८ | ७५.४८ | उ.ना. | उ.ना. | २४.५ | ७.९ | ५५ | ५०,४२७ | उ.ना. | उ.ना. | ३३.७ |
| ४७.५४ | ९३.७२ | ८९.४० | ९१.५८ | उ.ना. | उ.ना. | १७.१ | ४.५ | ३७ | ४८,५९१ | उ.ना. | उ.ना. | ५४.५ |
| ३८.०६ | ८३.२९ | ७६.६९ | ८०.११ | उ.ना. | उ.ना. | १६.८ | ३.६ | २३ | ५२,६४३ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| २४.६६ | ८२.४० | ६४.३६ | ७३.४५ | ६४.३ | ६७.३ | २०.५ | ८.६ | ६१ | ४०,४१२ | ०.३६२ | २०.५ | ६२.४ |
| १९.०५ | ८१.४८ | ७१.३४ | ७६.६८ | ६९.७ | ७२.८ | १६.६ | ७.० | ३४ | ६९,७३७ | ०.६०५ | २२.२ | ७९.९ |
| ३३.४९ | ८०.५१ | ५२.६६ | ६७.०६ | ६७.६ | ७०.७ | २६.७ | ६.७ | ५५ | ४२,४३४ | ०.४३४ | १९.८ | ४८.८ |
| ३८.५७ | ८७.२९ | ७६.४३ | ८२.२० | उ.ना. | उ.ना. | १७.८ | ५.६ | ३० | ८१,१५९ | उ.ना. | उ.ना. | ७७.८ |
| ३१.५४ | ८६.८१ | ७३.८६ | ८०.३३ | ६८.६ | ७१.८ | १५.९ | ७.६ | २४ | ७२,९९३ | ०.५७० | २१.९ | ८१.८ |
| २१.०८ | ९२.१८ | ८३.१५ | ८७.७५ | उ.ना. | उ.ना. | १४.९ | ५.० | २७ | ४४,९६५ | उ.ना. | उ.ना. | ३८.५ |
| १६.५४ | ७९.२४ | ५९.२६ | ६९.७२ | ६६.० | ६६.९ | २८.३ | ८.१ | ६१ | २६,३५५ | ०.३८० | २०.२ | ३०.३ |
| २७.३३ | ८८.३३ | ७०.७० | ७९.६३ | ६६.० | ६९.५ | १९.३ | ६.३ | ३८ | ६६,३६८ | ०.४९० | उ.ना. | ६२.९ |
| १८.३२ | ८२.६७ | ७१.१६ | ७७.०८ | ६९.२ | ७२.१ | १६.८ | ६.० | ३१ | ४८,५३६ | ०.४९२ | २०.२ | ७५.८ |
| **२५.६३** | **८२.१४** | **६५.४६** | **७४.०४** | **६७.३** | **६९.६** | **२२.१** | **७.२** | **४७** | **५३,३३१** | **०.४६७** | **२०.६** | **५४.१** |

* अस्थायी उ.ना. - उपलब्ध नाही

†† साक्षरतेची टक्केवारी सात वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येची आहे.

@ छोट्या राज्यांचे व केंद्रशासित प्रदेशांचे अर्भक मृत्यु दर हे २००८-१० या तीन वर्षाच्या कालावधीवर आधारित आहेत.

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | वित्तविषयक निर्देशक | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्याची दरडोई महसूली जमा (₹) | एकूण महसूली जमेतील राज्याच्या स्वत:च्या कर महसूलाचा हिस्सा (टक्के) | केंद्रिय करांतील दरडोई हिस्सा (₹) | केंद्राकडून प्राप्त दरडोई अनुदान (₹) | एकूण खर्चातील विकास खर्चाचा हिस्सा (टक्के) | योजनांतर्गत खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी | वार्षिक योजनेच्या नियतव्ययाची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी | महसूली तूट (+) / आधिक्य (-) ची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी | वित्तीय तूट (+) / आधिक्य (-) ची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी | राज्य शासनाच्या थकित दायित्वांची राज्यांतर्गत स्थूल उत्पन्नाशी टक्केवारी |
| संदर्भ वर्ष किंवा दिनांक | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (३१.३.२०११) |
| (१) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) |
| आंध्र प्रदेश | १०,७४९ | ५१.८ | १,७२० | १,५९४ | ६७.९ | ३६.१ | ६.२ | -०.६ | २.२ | ३१.३ |
| अरुणाचल प्रदेश | ४१,२०४ | २.८ | ५,५४१ | ३१,४०५ | ४३.२ | ४६.० | ३०.४ | -२१.४ | १.४ | ७७.८ |
| आसाम | ८,४९५ | १८.८ | २,४४३ | ३,५५६ | ६०.७ | ३४.२ | ७.३ | ५.७ | ९.० | २७.८ |
| बिहार | ४,८४३ | २२.५ | २,४२० | १,२०८ | ६६.९ | ३७.२ | ९.२ | -३.० | २.१ | ३९.५ |
| झारखंड | ६,४७७ | २९.७ | २,०४३ | १,५०३ | ६५.८ | ४६.२ | ८.७ | -३.३ | ०.६ | ३२.९ |
| दिल्ली | ११,७८५ | ७१.६ | उ.ना. | १,१५८ | ७०.७ | ४३.६ | ४.३ | -२.६ | १.२ | १२.० |
| गोवा | २८,४९१ | ४४.३ | ३,१७२ | ३,७५९ | ६६.४ | ३७.९ | ७.५ | नगण्य | ४.० | ३३.६ |
| गुजरात | ८,४२९ | ६१.२ | १,१२४ | १,०९६ | ६५.० | ३९.२ | ५.८ | ०.९ | ३.० | ३१.४ |
| हरियाणा | ९,९४५ | ६७.१ | ८८९ | ९४४ | ६९.५ | ३३.९ | ६.९ | १.५ | ३.३ | १८.९ |
| हिमाचल प्रदेश | १७,२९४ | २५.५ | २,४४० | ७,७८८ | ५८.४ | २०.८ | ५.५ | ०.९ | ४.५ | ५३.२ |
| जम्मू व काश्मीर | १६,८१५ | १५.५ | २,१६० | ११,०८५ | ६०.४ | ३०.९ | ११.० | -९.५ | ३.६ | ६७.१ |
| कर्नाटक | ९,१०० | ६७.५ | १,५३७ | ९३८ | ६८.० | ३९.४ | ७.७ | -०.१ | २.४ | २५.१ |
| केरळ | ८,८९६ | ६७.० | १,३७७ | ९०१ | ५१.३ | १९.१ | ३.६ | १.३ | ३.१ | ३३.४ |
| मध्य प्रदेश | ६,००० | ४३.० | १,५२६ | १,२९९ | ६३.७ | ४१.१ | ७.३ | -०.६ | ३.१ | ३७.२ |
| छत्तीसगड | ८,३३३ | ३६.६ | १,९५१ | १,५८१ | ७४.९ | ५३.५ | ११.३ | -०.७ | २.७ | १८.० |
| **महाराष्ट्र** | **८,६६१** | **६५.८** | **९७१** | **१,०८१** | **६५.१** | **२८.९** | **३.५** | **०.७** | **२.३** | **२६.७** |
| मणिपूर | १९,८०८ | ५.४ | ३,४८३ | १३,५७६ | ६७.० | ४९.१ | २८.३ | -१४.३ | ३.१ | ६६.३ |
| मेघालय | १६,७९० | १०.५ | ३,२६३ | १०,७६४ | ७२.२ | ५२.४ | १४.७ | -२.२ | २.५ | ३६.२ |
| मिझोराम | ३२,१८६ | ३.६ | ५,५६९ | २३,७९८ | ६२.५ | ३६.८ | २४.८ | -५.६ | ०.७ | ९८.१ |
| नागालँड | २३,७२२ | ३.८ | २,९११ | १९,१७६ | ५९.० | ३९.६ | १३.५ | -८.९ | २.७ | ५८.० |
| ओडिशा | ७,६८३ | ३२.९ | २,४४४ | १,९३४ | ६३.० | ३३.१ | ५.६ | ०.५ | ३.० | ३०.० |
| पंजाब | १०,४६७ | ५७.० | १,०६४ | १,००७ | ४६.६ | १४.५ | ४.० | २.१ | ३.४ | ३४.१ |
| राजस्थान | ६,३०३ | ४४.८ | १,८१९ | ९२३ | ६२.० | २७.१ | ७.४ | ०.३ | २.६ | ४०.९ |
| सिक्कीम | ५८,५७८ | ५.९ | ८,१७० | २६,१२७ | ५७.४ | ४२.६ | २०.८ | -९.४ | ६.४ | ८२.२ |
| तामीळनाडू | ९,३११ | ६५.७ | १,५३५ | १,०५५ | ६०.१ | ३१.८ | ३.७ | ०.६ | ३.० | २५.१ |
| त्रिपूरा | १५,२२५ | १२.१ | २,९५२ | ९,९०३ | ५५.७ | ४०.१ | १०.७ | -४.५ | ५.७ | ४३.२ |
| उत्तर प्रदेश | ५,५८४ | ३७.९ | १,७७७ | ९४१ | ५७.५ | ३२.४ | ७.१ | -०.१ | ३.८ | ४५.८ |
| उत्तराखंड | १२,३४४ | ३३.१ | २,३८१ | ४,७४६ | ६३.६ | ३४.७ | ९.० | -०.२ | २.३ | ३९.५ |
| पश्चिम बंगाल | ५,२५८ | ४२.१ | १,६८१ | ९७७ | ५५.६ | २५.१ | ३.८ | ३.५ | ४.७ | ४०.८ |
| **भारत $** | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

$ केंद्रशासित प्रदेश धरुन

उ.ना. - उपलब्ध नाही

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| अनुसूचित वाणिज्यिक बँका | | | | | प्रति हेक्टर उत्पादन (किलोग्रॅम) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर लाख लोकसंख्येमागे बँक कार्यालयांची संख्या | दरडोई ठेवी (₹) | दरडोई पतपुरवठा (₹) | पतपुरवठ्याचे ठेवीशी प्रमाण (टक्के) | प्राधान्य क्षेत्राच्या पतपुरवठ्याचा एकूण पतपुरवठ्यामधील हिस्सा (टक्के) | एकूण तृणधान्ये | एकूण कडधान्ये | एकूण अन्नधान्ये | एकूण तेलबिया | कापूस (रुई) | ऊस (टन) |
| (३०-६-२०११) | (३०-६-२०११) | (३०-६-२०११) | (३०-६-२०११) | (३१-३-२०११) | त्रैवार्षिक सरासरी (२००६-०७ ते २००८-०९) | | | | | |
| (३५) | (३६) | (३७) | (३८) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) |
| ८.८ | ३४,१३३ | ३८,७१४ | ११३.४ | ४२.५ | ३,१६६ | ७६७ | २,५२९ | ९०९ | ३९० | ८१ |
| ६.४ | ३७,१४० | ८,७८० | २३.६ | २८.६ | १,२४४ | १,००० | १,२३९ | ९२८ | - | २१ |
| ४.९ | १८,८०६ | ६,७६३ | ३६.० | ४५.० | १,४४४ | ५६१ | १,४०५ | ५१९ | १७० | ३८ |
| ४.१ | ११,२६१ | ३,२४० | २८.८ | ५८.९ | १,७४० | ७८० | १,६५६ | १,००० | - | ४२ |
| ५.९ | २२,८८६ | ७,८७५ | ३४.४ | ५०.३ | १,८४२ | ७१६ | १,६६० | ५१० | - | ४० |
| १५.० | ३,७८,१३८ | ३,२५,१५८ | ८६.० | १४.९ | ३,३९६ | - | ३,४४८ | ६२५ | - | - |
| ३१.३ | २,२५,८४५ | ६२,०४९ | २७.५ | ४४.१ | २,४३३ | १,१११ | २,१७९ | १,८०६ | - | ५४ |
| ८.२ | ४३,३५१ | २८,४२९ | ६५.६ | ४३.४ | १,८४० | ७३८ | १,६१६ | १,२९१ | ६१० | ७२ |
| १०.५ | ५०,८४६ | ३५,७९७ | ७०.४ | ४७.३ | ३,५०५ | ८०२ | ३,४०० | १,४३० | ६०९ | ६३ |
| १५.६ | ४७,६५४ | १८,६५१ | ३९.१ | ६८.६ | १,८३४ | ९२३ | १,७९७ | ४०८ | - | २२ |
| ८.१ | ३२,११५ | ११,७८३ | ३६.७ | ६३.३ | १,८०९ | ४८४ | १,७६४ | ७४० | - | - |
| १०.४ | ५७,२०१ | ४१,१३२ | ७१.९ | ३८.० | १,८७४ | ४५८ | १,४५० | ५७२ | २९३ | ८६ |
| १३.६ | ५१,६१२ | ३७,१०७ | ७१.९ | ५६.४ | २,६१९ | ७८३ | २,५५७ | ८०६ | २१० | ११२ |
| ६.० | १९,३६३ | ११,८५८ | ६१.२ | ५४.४ | १,३६४ | ७३२ | १,१३५ | १,०१५ | २२५ | ४३ |
| ५.५ | २२,२९५ | ११,३१८ | ५०.८ | ५१.७ | १,२६६ | ५७० | १,१४२ | ५१४ | - | ३ |
| **७.६** | **१,२४,९३७** | **१,०४,६५९** | **८३.८** | **२१.६** | **१,१९२** | **६२८** | **१,०३०** | **१,०३१** | **२९३** | **७८** |
| ३.० | ११,७९८ | ४,२७३ | ३६.२ | ५५.६ | २,३८४ | ५२० | २,२५५ | ७५० | - | २० |
| ७.४ | ३२,९३५ | ७,८४१ | २३.८ | ४६.९ | १,८१६ | ७६७ | १,७७९ | ६७९ | १८६ | - |
| ९.१ | २७,१८६ | १०,७७९ | ३९.६ | ७५.२ | ६४७ | ९३३ | ६६८ | १,००० | - | ७ |
| ४.७ | २५,४८२ | ६,६६५ | २६.२ | ३५.१ | १,६७७ | १,१९९ | १,६२० | ९७९ | - | ४८ |
| ७.२ | २५,०८७ | १२,४५६ | ४९.६ | ५४.१ | १,५७० | ४५८ | १,४०२ | ५८८ | ३८२ | ५९ |
| १३.९ | ५५,९२५ | ४१,३६२ | ७४.० | ५०.० | ४,१८२ | ८५१ | ४,१६७ | १,२२३ | ७२१ | ६० |
| ६.४ | १८,६७३ | १६,९४८ | ९०.८ | ४३.८ | १,४६३ | ४५३ | १,१८७ | १,१०४ | ३७४ | ५७ |
| १३.८ | ५६,१३१ | १९,९४४ | ३५.५ | ५४.२ | १,४२८ | ९०१ | १,३६१ | ७६३ | - | - |
| ९.२ | ४६,३२३ | ५४,६६६ | ११८.० | ४०.२ | २,७३८ | ३८४ | २,३२० | १,७८४ | ३६६ | १०६ |
| ६.६ | २४,८१९ | ७,१९१ | २९.० | ५२.२ | २,५४८ | ६६९ | २,४९६ | ७५० | २४९ | ४७ |
| ५.४ | १९,०५९ | ७,९७७ | ४१.९ | ५५.७ | २,३९६ | ७८५ | २,२०३ | ८५३ | २५८ | ५६ |
| १२.५ | ४८,२३४ | १६,६९५ | ३४.६ | ६६.३ | १,९२५ | ६८२ | १,८४७ | ९०६ | - | ५५ |
| ६.१ | ३६,९३४ | २१,४६९ | ५८.१ | ३४.३ | २,५६६ | ७३५ | २,५१० | ९१४ | ३७५ | ८० |
| **७.४** | **४४,३७९** | **३३,३६९** | **७५.२** | **३३.६** | **२,११८** | **६३२** | **१,८४२** | **१,०१२** | **४३०** | **८१** |

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | दरडोई अन्नधान्यांचे उत्पादन (कि.ग्रॅ.) | दर हेक्टर पिकांखालील क्षेत्रामागे खतांचा वापर (कि.ग्रॅ.) | एकूण सिंचित क्षेत्राची पिकांखालील एकूण क्षेत्राशी टक्केवारी | प्रति शेतकरी निव्वळ पेरणी क्षेत्र (हेक्टर) | निव्वळ पेरणी क्षेत्राची एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | पिकांची सघनता | वनांनी आच्छादलेल्या क्षेत्राची + एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी | झाडांनी आच्छादलेल्या क्षेत्राची ++ एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संदर्भ वर्ष किंवा दिनांक | (२००८-०९) | (२००८-०९) | (२००८-०९) | (२००८-०९) | (२००८-०९) | (२००८-०९) | (२०११) | (२०११) |
| (१) | (४६) | (४७) | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) |
| आंध्र प्रदेश | २४७.० | २२२.० | ४८.७ | १.४ | ३९.५ | १२७.३ | १६.९ | २.६ |
| अरुणाचल प्रदेश | २११.७ | २.९ | २०.२ | ०.८ | २.५ | १३०.६ | ८०.५ | ०.७ |
| आसाम | १३७.२ | ५५.४ | ३.८ | ०.७ | ३५.१ | १४४.७ | ३५.३ | २.० |
| बिहार | १२९.१ | १७४.० | ६१.० | ०.७ | ६०.१ | १३७.७ | ७.३ | २.५ |
| झारखंड | १३८.५ | ८७.२ | ९.७ | ०.४ | १८.९ | ११२.३ | २८.८ | ३.७ |
| दिल्ली | ६.८ | १४.९ | ७२.८ | ०.६ | १५.५ | १८७.८ | ११.९ | ८.१ |
| गोवा | ८०.९ | ४९.० | २२.० | २.७ | ३६.५ | १२३.३ | ५९.९ | ७.७ |
| गुजरात | ११३.५ | १४८.४ | ४५.६ | १.७ | ५०.० | ११८.१ | ७.५ | ४.० |
| हरियाणा | ६५१.२ | १९८.८ | ८५.३ | १.२ | ८०.९ | १८१.३ | ३.६ | ३.२ |
| हिमाचल प्रदेश | २१२.६ | ६१.३ | १९.७ | ०.३ | ९.७ | १७३.१ | २६.४ | १.१ |
| जम्मू व काश्मीर | १३६.४ | ९२.४ | ४१.४ | ०.५ | ३.३ | १५३.९ | १०.१ | २.९ |
| कर्नाटक | १९५.२ | १४८.१ | ३१.९ | १.५ | ५३.० | १२१.६ | १८.९ | ३.० |
| केरळ | १७.४ | ९६.८ | १७.० | २.९ | ५३.८ | १२९.० | ४४.५ | ७.१ |
| मध्य प्रदेश | १९८.८ | ६८.९ | ३२.५ | १.४ | ४८.५ | १३८.३ | २५.२ | २.३ |
| छत्तीसगड | २१६.५ | ८१.४ | २७.० | १.१ | ३४.८ | १२०.७ | ४१.२ | २.९ |
| **महाराष्ट्र** | **१०४.९** | **११६.१** | **१७.७@** | **१.५** | **५६.६** | **१२६.९** | **१६.५** | **३.०** |
| मणिपूर | १५६.९ | ५४.५ | २१.९ | ०.६ | १०.६ | १००.० | ७६.५ | ०.९ |
| मेघालय | ९२.० | १०.९ | २१.५ | ०.६ | १२.७ | ११८.७ | ७७.० | २.६ |
| मिझोराम | ५९.८ | ४५.८ | ११.८ | ०.४ | ४.५ | १००.० | ९०.७ | ०.९ |
| नागालँड | २३३.३ | २.३ | २०.५ | ०.६ | १९.१ | १२७.२ | ८०.३ | १.९ |
| ओडिशा | १८४.४ | ५९.० | ३५.० | १.३ | ३६.० | १६१.९ | ३१.४ | २.८ |
| पंजाब | १०२१.२ | २२३.४ | ९७.६ | २.० | ८२.८ | १८९.८ | ३.५ | ३.४ |
| राजस्थान | २५५.६ | ४६.२ | ३४.७ | १.३ | ५१.३ | १२९.७ | ४.७ | २.४ |
| सिक्कीम | १८०.६ | -- | ९.१ | ०.८ | १५.१ | १०९.८ | ४७.३ | ०.४ |
| तामीळनाडू | १०६.५ | २१७.२ | ५८.३ | १.० | ३८.८ | ११५.५ | १८.२ | ३.६ |
| त्रिपूरा | १७९.६ | ४७.० | ३५.४ | ०.९ | २६.७ | १०५.५ | ७६.१ | १.८ |
| उत्तर प्रदेश | २४२.२ | १५७.९ | ७६.४ | ०.७ | ६८.१ | १५५.६ | ६.० | ३.१ |
| उत्तराखंड | १८४.३ | १२८.६ | ४७.९ | ०.५ | १४.१ | १५७.७ | ४५.८ | १.२ |
| पश्चिम बंगाल | १८४.२ | १५५.० | ५६.२ | ०.९ | ५९.६ | १८५.१ | १४.६ | २.६ |
| **भारत $** | **२०२.३** | **१२७.७** | **४५.३** | **१.१** | **४३.०** | **१३८.०** | **२१.१** | **२.८** |

$ केंद्रशासित प्रदेश धरुन @ कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

\+ मालकी व विधीचा दर्जा लक्षात न घेता १० टक्क्यांपेक्षा जास्त झाडांच्या छताच्या घनतेसहीत एक हेक्टरपेक्षा जास्त जमीन (फळबाग, बांबू व पाम समाविष्ट).

++ किमान नकाशाच्या क्षेत्रापेक्षा (१ हे.) कमी व वन क्षेत्राव्यतिरिक्त अभिलिखीत वनक्षेत्राबाहेरील झाडांचे पट्टे.

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| कारखाने विषयक सांख्यिकी * | | वार्षिक उद्योग पाहणी | | रोजगार असलेल्या व्यक्तींची टक्केवारी # | | बेरोजगारीचा दर @ | | श्रमशक्ती सहभाग दर # | | एकूण संघटित क्षेत्राच्या रोजगारामधील महिला रोजगारांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर लाख लोकसंख्येमागे चालु कारखान्यांची संख्या | दर लाख लोकसंख्येमागे कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगार (संख्या) | दरडोई स्थूल उत्पादन (₹) | दरडोई निव्वळ मूल्यवृद्धी (₹) | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | |
| (२००९) | (२००९) | (२००८-०९) | (२००८-०९) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९) |
| (५४) | (५५) | (५६) | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) |
| ३७ | १,१४४ | २५,६९२ | ४,२९० | ५२ | ३६ | १.२ | ३.१ | ५२.७ | ३७.५ | २१.८ |
| उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ४० | ३० | १.३ | ३.४ | ४०.९ | ३१.३ | उ.ना. |
| ९ | ४५० | १२,१७८ | ९९८ | ३७ | ३२ | ३.९ | ५.२ | ३८.३ | ३३.९ | ३३.३ |
| ७ | १२८ | ३,१२० | ३३६ | २८ | २५ | २.० | ७.३ | २८.९ | २७.२ | ५.२ |
| उ.ना. | उ.ना. | १९,५४३ | ४,७२८ | ३३ | २९ | ३.९ | ६.३ | ३४.६ | ३१.३ | ७.५ |
| उ.ना. | उ.ना. | १५,८०८ | २,००२ | ३० | ३३ | १.७ | २.६ | ३०.६ | ३४.२ | १५.७ |
| ४३ | ३,८२४ | १,६६,२१९ | २९,५९९ | ३४ | ३३ | ४.७ | ४.१ | ३५.६ | ३४.६ | १७.१ |
| उ.ना. | उ.ना. | ८८,९६८ | १०,५७९ | ४६ | ३७ | ०.८ | १.८ | ४६.२ | ३७.७ | १४.७ |
| ४३ | ३,०४३ | ६०,१९३ | ८,४८८ | ४० | ३६ | १.८ | २.५ | ४०.३ | ३७.० | १७.१ |
| उ.ना. | उ.ना. | ६४,२०६ | २०,२४७ | ५१ | ३६ | १.६ | ४.९ | ५२.० | ३७.७ | १५.६ |
| उ.ना. | उ.ना. | १०,७०४ | २,५४४ | ४३ | ३५ | २.५ | ६.० | ४४.२ | ३६.९ | १०.७ |
| उ.ना. | उ.ना. | ३९,०९८ | ७,३६४ | ५० | ३८ | ०.५ | २.७ | ४९.९ | ३९.३ | ३२.७ |
| उ.ना. | उ.ना. | २०,५९९ | २,२३८ | ३८ | ३६ | ७.५ | ७.३ | ४१.४ | ३९.१ | ४०.१ |
| उ.ना. | उ.ना. | १२,९१७ | २,१४६ | ४३ | ३३ | ०.७ | २.९ | ४२.९ | ३३.५ | १३.८ |
| उ.ना. | उ.ना. | ३२,००९ | ६,९६० | ४४ | ३१ | ०.६ | २.९ | ४४.५ | ३२.२ | १३.९ |
| **३१** | **१,३९१** | **५५,१०८** | **१०,३६५** | **४९** | **३८** | **०.६** | **३.२** | **४९.१** | **३९.२** | **१६.८** |
| उ.ना. | उ.ना. | २५४ | ४७ | ३६ | ३२ | ३.८ | ४.८ | ३७.५ | ३३.१ | २४.१ |
| उ.ना. | उ.ना. | ७,५२४ | २,०५० | ४८ | ३३ | ०.४ | ५.१ | ४८.२ | ३५.१ | ३०.७ |
| उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ५१ | ४० | १.३ | २.८ | ५१.२ | ४१.५ | २६.४ |
| उ.ना. | उ.ना. | ५८१ | १२८ | ४१ | २९ | १०.६ | ९.२ | ४६.० | ३२.३ | २३.४ |
| ६ | ५४० | १७,३२५ | ४,१५४ | ४१ | ३५ | ३.० | ४.२ | ४२.३ | ३६.५ | १५.३ |
| ६४ | २,१९७ | ३९,४२५ | ४,६९६ | ३९ | ३७ | २.६ | ४.८ | ४०.१ | ३८.३ | २१.३ |
| १८ | ९१८ | १३,८९२ | २,५८७ | ४४ | ३२ | ०.४ | २.२ | ४३.७ | ३३.० | १७.४ |
| उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ४४ | ४० | ४.३ | ०.० | ४६.२ | ३९.९ | उ.ना. |
| उ.ना. | उ.ना. | ४५,०९० | ५,९५३ | ५० | ३८ | १.५ | ३.२ | ५०.९ | ३९.५ | ३३.७ |
| ४६ | १,४४७ | २,१३९ | ४३९ | ३९ | ३३ | ९.२ | १७.१ | ४२.९ | ३९.४ | २२.१ |
| ७ | ४७८ | १०,३९१ | १,२५१ | ३४ | ३० | १.० | २.९ | ३४.८ | ३०.९ | ११.६ |
| उ.ना. | उ.ना. | ८६,५८६ | २९,६८९ | ४३ | ३४ | १.६ | २.९ | ४३.८ | ३४.६ | १४.३ |
| उ.ना. | उ.ना. | १६,०२९ | १,८७६ | ३९ | ३७ | १.९ | ४.० | ३९.९ | ३८.६ | १२.५ |
| **११** | **५०९** | **२८,२४४** | **४,५५५** | **४१** | **३५** | **१.६** | **३.४** | **४१.४** | **३६.२** | **१९.९** |

* अस्थायी          उ.ना. - उपलब्ध नाही

# राष्ट्रीय नमुना पाहणी, ६६ वी फेरी (२००९-१०) वर आधारित , केंद्रिय नमुना. एकूण लोकसंख्येशी टक्केवारी [नित्य कार्यस्थिती (मुख्य + गौण) एकूण]

@ राष्ट्रीय नमुना पाहणी, ६६ वी फेरी (२००९-१०) वर आधारित , केंद्रिय नमुना. एकूण श्रमशक्तीशी टक्केवारी [नित्य कार्यस्थिती (मुख्य + गौण) एकूण]

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | आर्थिक गणना | | | | दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता (मे.वॅ.) | दरडोई विद्युत निर्मिती (किलो वॅट तास) | वार्षिक दरडोई वीजेचा वापर (किलो वॅट तास) | | | | ग्रामीण विद्युती-करणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दर लाख लोकसंख्येमागे आस्थापनांची संख्या | दर लाख लोकसंख्येमागे आस्थापनांमधील रोजगारांची संख्या | चक्रवाढ वार्षिक वृद्धीदर | | | | एकूण | घरगुती | औद्योगिक | कृषि | |
| | | | आस्थापना | रोजगार | | | | | | | |
| संदर्भ वर्ष किंवा दिनांक | (२००५) | (२००५) | (१९९८-२००५) | | (३१-०३-२०११) | (२००९-१०) | (२००९-१०) | | | | (२००९-१०) |
| (१) | (६५) | (६६) | (६७) | (६८) | (६९) | (७०) | (७१) | (७२) | (७३) | (७४) | (७५) |
| आंध्र प्रदेश | ४,९९६ | १४,००२ | ४.६८ | ५.८७ | १४.४० | ६१८.७४ | ७१३.४२ | १५८.०४ | २२०.०३ | २२५.०५ | १००.०० |
| अरुणाचल प्रदेश | २,३९५ | ९,१९९ | ४.८० | ४.६१ | ६.८५ | १९१.७८ | २१५.८८ | ९४.६० | ६३.६३ | ०.०० | ५६.८२ |
| आसाम | ३,४१६ | ७,६६७ | ७.४९ | ०.०९ | १.५१ | ६२.७० | १०८.४२ | ४१.६४ | ३५.६५ | १.०७ | ७८.५७ |
| बिहार | १,३५८ | २,५१६ | २.३१ | ०.२३ | ०.५८ | ९.५४ | ६३.३० | २०.५० | १७.४० | ८.२८ | ६१.२९ |
| झारखंड | १,६९४ | ३,९७४ | ३.०२ | -०.५३ | ५.११ | १८४.२४ | ४२३.८० | ७३.०८ | ३०२.०५ | २.१३ | ३१.०७ |
| दिल्ली | ४,७६६ | २२,३६७ | १.४३ | ०.२३ | ९.०१ | २७८.१६ | १,०८८.३२ | ५०८.७९ | १६३.६६ | २.२४ | १००.०० |
| गोवा | ४,९०१ | १५,२०९ | ०.३७ | ०.८० | ५.३५ | २३५.७९ | १,५७२.५६ | ३७१.६२ | ९१९.२१ | ६५.५४ | १००.०० |
| गुजरात | ४,४४३ | ११,१७१ | ३.४४ | २.०८ | २१.७१ | ९६२.४६ | ८५९.५७ | १४४.०१ | ३८९.५५ | २२१.२७ | ९९.७२ |
| हरियाणा | ३,६४१ | ९,८०३ | ६.६१ | ५.३५ | १७.४७ | ७३६.१८ | ९१७.८८ | १७४.०० | २४३.६२ | ३६९.८२ | १००.०० |
| हिमाचल प्रदेश | ४,१८४ | १०,३०४ | २.४९ | १.९३ | १९.६५ | ६१७.५८ | ८६७.८४ | १६५.९९ | ५३६.८४ | ५.५० | ९८.२२ |
| जम्मू व काश्मीर | २,८२५ | ६,५३५ | ६.०३ | ६.८२ | ८.७१ | ३४६.४४ | ३०७.४५ | १२०.८५ | ६१.३० | १७.८० | ९८.२४ |
| कर्नाटक | ४,५४२ | ११,३५२ | ४.१४ | २.७३ | १६.५७ | ६३८.५१ | ६१८.२५ | १२४.३१ | १६६.९० | २११.५२ | ९९.९२ |
| केरळ | ८,३९५ | १७,१६४ | ८.६९ | ५.८६ | ७.३६ | २३६.४३ | ४०८.१६ | १९३.३७ | ११३.४० | ७.७७ | १००.०० |
| मध्य प्रदेश | २,६१७ | ६,००१ | १.२३ | ०.१९ | ६.५८ | २६८.४९ | ३१६.२९ | ७३.४१ | ८२.११ | ८४.८१ | ९६.३७ |
| छत्तीसगड | २,८०८ | ६,६७५ | २.६४ | १.८९ | १५.७८ | १,०३०.१७ | ४७५.२७ | १०८.४० | २१५.२४ | ७३.६० | ९५.६१ |
| **महाराष्ट्र** | **४,०५५** | **१०,८५३** | **३.८९** | **१.१४** | **१५.३०** | **६५८.९५** | **७१६.२९**[@] | **१६४.४७**[@] | **२७९.३७**[@] | **१२६.०४**[@] | **८८.३२** |
| मणिपूर | ४,१८९ | ९,४४३ | ३.८३ | २.३४ | १.८७ | ८.३२ | ९१.५६ | ५२.९० | ३.६६ | ०.२९ | ८६.३० |
| मेघालय | ३,३२८ | ९,६९४ | ५.६९ | ३.९८ | ६.३८ | २२८.३० | ३४८.२२ | १०२.३९ | १८१.६४ | ०.२४ | ५९.२९ |
| मिझोराम | ५,३०३ | ११,८५६ | ९.७१ | ४.६८ | ८.१० | १०३.८७ | १९३.२६ | १३०.४६ | २.४० | ०.५१ | ८०.६२ |
| नागालँड | १,६९४ | ८,३४१ | २.७० | ०.०४ | १.५५ | ४५.०२ | १०१.८१ | ९४.२१ | ०.७७ | ०.०० | ६४.४० |
| ओडिशा | ४,७०५ | ९,५२६ | ३.३९ | २.६१ | ८.९७ | १८१.१० | ३०३.८७ | ८२.६७ | १६२.६४ | ३.७२ | ६२.५६ |
| पंजाब | ४,१५४ | १०,४७३ | ५.९१ | ३.६७ | १८.८२ | १,०५१.०२ | १,१४८.७३ | २५७.२५ | ३९०.३७ | ३८४.३४ | १००.०० |
| राजस्थान | ३,१६४ | ६,९३८ | ३.६१ | २.८१ | ९.८९ | ४११.५७ | ४६१.८१ | ८७.८१ | १२५.१९ | १८२.०६ | ७१.१० |
| सिक्कीम | ३,२२७ | ११,४१५ | ५.७९ | ५.३३ | ८.५८ | २७२.६२ | ५०२.५० | १९०.९५ | ७५.३८ | ०.०० | ९४.४४ |
| तामीळनाडू | ६,८२१ | १५,४८१ | ८.४४ | ४.९२ | १७.४६ | ६६२.१६ | ८६३.५९ | २०८.५४ | ३४५.१३ | १७८.८० | १००.०० |
| त्रिपूरा | ५,५७१ | ११,३४४ | ८.८८ | ५.३२ | ४.६१ | १८९.७१ | १२२.५० | ७३.६६ | २४.३६ | ११.१६ | ५७.२३ |
| उत्तर प्रदेश | २,२०४ | ४,४६६ | ५.१६ | २.३४ | २.९१ | १३३.०७ | २१२.५५ | ८३.३७ | ५७.०९ | ३७.४८ | ८८.२७ |
| उत्तराखंड | ३,५३४ | ८,०२० | ६.०५ | ४.२३ | १७.७८ | ६५६.२८ | ६४१.६० | १४२.४३ | ३४८.९९ | ३०.६१ | ९६.५२ |
| पश्चिम बंगाल | ४,९२९ | ११,७६१ | ३.८२ | १.९४ | ८.०७ | ३८०.८१ | १३३.२७ | ९३.८८ | १८२.२९ | १४.९८ | ९९.५० |
| **भारत $** | **३,७७६** | **९,१०९** | **४.६९** | **२.७८** | **१४.३५** | **६८३.४५** | **४८६.७२** | **१२१.२०** | **१७८.७६** | **१०२.१०** | **८३.९०** |

$ केंद्रशासित प्रदेश धरुन

@ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण), टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| दर लाख लोकसंख्येमागे मोटर वाहनांची संख्या * | प्रति शंभर चौ.कि.मी. क्षेत्रामागे एकूण रस्त्यांची लांबी Ω (कि.मी.) | प्रति शंभर चौ.कि.मी. क्षेत्रामागे लोहमार्गाची लांबी (कि.मी.) | दूरध्वनीची घनता | | एकूण खनिज उत्पादनाच्या किंमतीमधील राज्याचा हिस्सा | दर हजार लोकसंख्येमागे प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील पटांवरील विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | तारी | बिनतारी | | |
| (३१-३-२००९) | (३१-३-२००८) | (२०१०-११) | (३०-९-२०११) | (३०-९-२०११) | (२०१०-११) | (२००९-१०) |
| (७६) | (७७) | (७८) | (७९) | (८०) | (८१) | (८२) |
| ९,७४८ | ७९ | १.९१ | २.७६ | ७६.२१ | ६.५३ | १५५ |
| १,८२८ | २० | नगण्य | उ.ना. | उ.ना. | ०.२३ | २७० |
| ४,०९० | २९४ | ३.१० | ०.८२ | ४३.४९ | ७.१० | १६२ |
| २,०७० | १२८ | ३.८४ | ०.४७ | ४५.२२ | ०.०२ | २०५ |
| ६,७३८ | २२ | २.४९ | उ.ना. | उ.ना. | ११.८२ | २३६ |
| ३६,२५९ | उ.ना. | १२.३४ | १५.२९ | २२०.२२ | ०.०० | १७९ |
| ४०,६९५ | २८५ | ४.७३ | उ.ना. | उ.ना. | ५.३५ | १३६ |
| १९,२५९ | ७५ | २.६९ | ३.१४ | ८३.३७ | ९.२० | १८७ |
| १८,४५५ | ६७ | ३.४८ | २.४१ | ८५.२३ | ०.०० | १६६ |
| ७,५०८ | ६५ | ०.५३ | ४.७५ | ११३.०८ | ०.०९ | १९० |
| ५,३०३ | १० | ०.१२ | १.८० | ४९.२१ | ०.०० | १७३ |
| १२,०३८ | १३३ | १.७३ | ४.५५ | ८७.५८ | ५.०० | १७२ |
| १४,११९ | ५२७ | २.७० | ९.३६ | ९६.४० | ०.०३ | १४७ |
| ८,५८८ | ५४ | १.६१ | १.२५ | ५०.२६ | ६.८८ | २६० |
| ८,८५९ | ५५ | ०.८८ | उ.ना. | उ.ना. | १०.०२ | २११ |
| **१३,२६९** | **७३** | **१.९४** | **४.९६** | **८९.९७** | **४.०५** | **१७१** |
| ५,५७३ | ७४ | नगण्य | उ.ना. | उ.ना. | ०.०० | २२४ |
| ५,५५५ | ४४ | -- | उ.ना. | उ.ना. | १.५५ | २६३ |
| ७,०८७ | २९ | ०.०१ | उ.ना. | उ.ना. | ०.०० | २३३ |
| १०,८८८ | १३५ | ०.०८ | उ.ना. | उ.ना. | ०.०० | १५३ |
| ६,४९६ | १३८ | १.५८ | १.४० | ६०.३८ | १६.२५ | १८३ |
| १८,०५३ | ९० | ४.२४ | ५.१७ | १०६.०८ | ०.०० | १६२ |
| ९,९४४ | ५० | १.६९ | १.७७ | ६६.८१ | ९.८७ | २१८ |
| ४,७७४ | २६ | -- | उ.ना. | उ.ना. | ०.०० | २१० |
| १९,३२४ | १३९ | ३.१२ | ४.९० | १०७.६२ | ३.२३ | १७६ |
| ४,०६९ | ३०३ | १.४४ | उ.ना. | उ.ना. | ०.१६ | २१५ |
| ५,५८७ | ११८ | ३.६४ | १.०६ | ५६.३८ | १.२३ | २०९ |
| ८,२२१ | ७७ | ०.६५ | उ.ना. | उ.ना. | ०.०२ | २१३ |
| ३,४४१ | २३९ | ४.४४ | २.२७ | ७३.५० | १.३६ | १८४ |
| **९,९२०** | **९२** | **१.९८** | **२.७७** | **७२.७०** | **१००.००** | **१९२** |

* अस्थायी    उ.ना. - उपलब्ध नाही

Ω जवाहर रोजगार योजना आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना याअंतर्गत बांधण्यात आलेले रस्ते वगळून

# भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | स्थूल पटसंख्येचे प्रमाण | | | विद्यार्थी-शिक्षक प्रमाण | | | लिंग समानता निर्देशांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ग १ ते ८ (६-१३ वर्षे) | | | प्राथमिक शाळा | माध्यमिक शाळा | उच्च माध्यमिक शाळा | वर्ग १ ते ८ | वर्ग १ ते १२ |
| | मुले | मुली | एकूण | | | | | |
| संदर्भ वर्ष किंवा दिनांक | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) |
| (१) | (८३) | (८४) | (८५) | (८६) | (८७) | (८८) | (८९) | (९०) |
| आंध्र प्रदेश | ९०.१८ | ९०.११ | ९०.१५ | ३२ | २७ | ३४ | १.०० | ०.९८ |
| अरुणाचल प्रदेश | १४६.३१ | १३८.१० | १४२.२६ | २१ | २३ | २७ | ०.९४ | ०.९५ |
| आसाम | ८२.२१ | ८४.९० | ८३.५४ | २८ | २१ | २६ | १.०३ | १.०२ |
| बिहार | १००.७९ | ८६.०३ | ९३.७२ | ८० | ५३ | ३३ | ०.८५ | ०.८५ |
| झारखंड | १२३.८२ | ११५.६२ | ११९.८० | ७३ | ५५ | ४७ | ०.९३ | ०.९२ |
| दिल्ली | ११६.३१ | ११६.३५ | ११६.३३ | ४० | ३० | ३२ | १.०० | ०.९९ |
| गोवा | ८८.७५ | ८६.१३ | ८७.५० | २६ | २९ | २० | ०.९७ | ०.९९ |
| गुजरात | १०८.८८ | १०६.०४ | १०७.५६ | ३० | ३६ | ४१ | ०.९७ | ०.९४ |
| हरियाणा | ८४.३१ | ८७.५८ | ८५.७९ | ५२ | ४१ | २५ | १.०४ | १.०५ |
| हिमाचल प्रदेश | ११०.३७ | १०९.३८ | १०९.९० | १५ | १३ | २२ | ०.९९ | १.०१ |
| जम्मू व काश्मीर | १०४.६७ | १०४.२७ | १०४.४८ | २३ | १५ | १४ | १.०० | ०.९८ |
| कर्नाटक | ९९.८१ | ९७.६६ | ९८.७६ | १८ | २९ | ३७ | ०.९८ | ०.९८ |
| केरळ | ९८.५८ | ९७.११ | ९७.८६ | ३० | २६ | २७ | ०.९९ | १.०० |
| मध्य प्रदेश | १३३.३२ | १३०.१८ | १३१.८१ | ४१ | ३२ | २४ | ०.९८ | ०.९२ |
| छत्तीसगड | १११.५७ | १०५.६० | १०८.६२ | २९ | २३ | २१ | ०.९५ | ०.९३ |
| **महाराष्ट्र** | **९९.८२** | **९६.४०** | **९८.१८** | **३३** | **३२** | **६९** | **०.९७** | **०.९५** |
| मणिपूर | १५५.४४ | १४७.७३ | १५१.६४ | ३३ | २२ | २३ | ०.९५ | ०.९४ |
| मेघालय | १३५.१५ | १४१.८६ | १३८.४९ | ४५ | १८ | २१ | १.०५ | १.०६ |
| मिझोराम | १४२.९८ | १३३.५८ | १३८.३३ | १८ | ९ | १४ | ०.९३ | ०.९५ |
| नागालँड | ८३.२० | ८३.४५ | ८३.३२ | २० | १५ | ३१ | १.०० | १.०१ |
| ओडिशा | १०५.६२ | १०४.६८ | १०५.१६ | ३३ | २७ | १६ | ०.९९ | ०.९७ |
| पंजाब | १०२.८४ | १००.६० | १०१.८३ | ३५ | १४ | ३७ | ०.९८ | ०.९९ |
| राजस्थान | १०९.९७ | ९८.७१ | १०४.६३ | ४४ | २८ | २९ | ०.९० | ०.८५ |
| सिक्कीम | ११८.८२ | १२३.३७ | १२१.०८ | १४ | १५ | १५ | १.०४ | १.०४ |
| तामीळनाडू | ११४.३२ | ११४.०७ | ११४.२० | ४३ | ४९ | ४३ | १.०० | १.०२ |
| त्रिपूरा | १२३.५६ | १२१.७४ | १२२.६६ | २५ | १६ | २६ | ०.९९ | ०.९८ |
| उत्तर प्रदेश | ९४.६५ | ९६.२७ | ९५.४२ | ६७ | ७८ | ६४ | १.०२ | ०.९७ |
| उत्तराखंड | १०५.७९ | ११०.३२ | १०७.९५ | २४ | २७ | १५ | १.०४ | १.०१ |
| पश्चिम बंगाल | १०७.१६ | ११०.७४ | १०८.९२ | ३४ | ३३ | ६२ | १.०३ | १.०३ |
| **भारत $** | **१०३.७५** | **१०१.०९** | **१०२.४७** | **४२** | **३४** | **३९** | **०.९७** | **०.९५** |

$ केंद्रशासित प्रदेश धरुन

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| गळतीचे प्रमाण | | | | | | प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील संयुक्त शैक्षणिक विकास निर्देशांक | प्रति शाळा शिक्षकांची सरासरी संख्या * | स्त्री शिक्षकांची टक्केवारी * | मुलींच्या पटसंख्येची टक्केवारी * | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ग १ ते ५ | | वर्ग १ ते ८ | | वर्ग १ ते १०# | | | | | (वर्ग १ ते ५) | (वर्ग ६ ते ८) |
| मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | | | | | |
| (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२००९-१०) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) | (२०१०-११) |
| (९१) | (९२) | (९३) | (९४) | (९५) | (९६) | (९७) | (९८) | (९९) | (१००) | (१०१) |
| १६.३४ | १५.२४ | ४०.९० | ४१.६८ | ५२.७३ | ५४.०२ | ०.६६२ | ४.३६ | ४६.८९ | ४८.७९ | ४९.१० |
| ४३.१४ | ३९.२३ | ४८.४९ | ४५.१३ | ६५.०० | ६४.७० | ०.४७४ | ३.६० | ३७.५८ | ४८.६२ | ४८.८० |
| ३८.९९ | ३२.६७ | ५९.९४ | ६२.५५ | ७७.४१ | ७७.८२ | ०.४४५ | ३.७६ | ३०.६८ | ४९.५० | ५१.४१ |
| ४३.५१ | ४०.९७ | ६४.९८ | ६७.३३ | ७८.४६ | ७६.०६ | ०.४२१ | ४.९५ | ३८.५३ | ४८.५३ | ४७.७३ |
| २७.६१ | २६.४१ | ५६.२६ | ६८.४४ | -- | -- | ०.४३१ | ३.३३ | २९.२२ | ४९.२३ | ४९.१० |
| ९.८२ | १७.०७ | ०.०० | ०.०० | ०.०० | ९.१५ | ०.७२० | १४.७८ | ७३.४८ | ४६.९० | ४५.९७ |
| ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३५.८५ | ३२.६३ | ०.६९२ | २.९६ | ७७.४१ | ४८.२७ | ४७.१८ |
| ३६.८९ | ६.५२ | ३२.२४ | ४८.०८ | ६०.३७ | ६४.४१ | ०.६५७ | ५.९१ | ५४.४३ | ४६.२७ | ४५.६३ |
| ०.०० | ०.०० | १९.५९ | ८.१० | २०.१७ | १९.४६ | ०.६८० | ५.१९ | ४९.४२ | ४५.५२ | ४५.०० |
| ०.३५ | १.१७ | १.४२ | ३.४१ | २२.२८ | १८.९३ | ०.६५४ | ३.२० | ४३.५५ | ४७.५९ | ४६.७१ |
| ९.७९ | ६.८२ | २३.७५ | १९.७९ | ४७.१६ | ४०.६३ | ०.५१२ | ४.३७ | ४३.४९ | ४७.४३ | ४६.५३ |
| ११.६० | १०.६१ | २५.०५ | २६.७३ | ४६.८९ | ४६.३३ | ०.६५६ | ४.१८ | ५६.३७ | ४८.२६ | ४८.२५ |
| ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.७७२ | ११.०२ | ७४.०५ | ४९.४६ | ४८.९१ |
| २१.७७ | २०.४९ | १९.७१ | २३.३६ | ६०.९८ | ७१.३२ | ०.४८६ | २.३८ | ४०.४३ | ४९.२२ | ४९.४४ |
| ४०.८५ | २४.९४ | ३८.९८ | ४२.४३ | -- | -- | ०.४९८ | ३.३५ | ३७.२७ | ४८.९६ | ४८.९६ |
| **२०.१९** | **२२.५४** | **२४.३६** | **२७.५५** | **३८.६३** | **४२.६२** | **०.६६३** | **४.१९** | **४४.४३** | **४७.१३** | **४६.७९** |
| ३३.०५ | ४०.०८ | ५७.६५ | ५६.५९ | ५७.८२ | ५५.७१ | ०.५१९ | ५.९० | ४४.३६ | ४९.६७ | ४९.६१ |
| ६०.५२ | ५४.५१ | ७४.२५ | ७०.३३ | ७९.३१ | ७६.४६ | ०.४३३ | २.९४ | ५२.५० | ५०.४१ | ५२.९४ |
| ४४.६८ | ४७.४६ | ५६.३७ | ५३.७० | ६४.७९ | ६०.७२ | ०.६४१ | ५.१२ | ४२.२२ | ४७.५३ | ४७.८८ |
| ४०.१० | ३९.७८ | ३२.५५ | ३०.५२ | ७५.६९ | ७३.९७ | ०.६२४ | ५.७२ | ४४.२४ | ४९.०७ | ४९.४३ |
| २६.७१ | २६.१८ | ५३.१३ | ५५.५६ | ६९.९८ | ६५.९१ | ०.४९६ | ३.३५ | ३६.३५ | ४८.६१ | ४८.६३ |
| ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ४१.२३ | ३९.४५ | ०.७३० | ५.१५ | ७०.६९ | ४४.३५ | ४३.७१ |
| ४९.११ | ५२.११ | ४१.१९ | ५९.६८ | ७०.५२ | ७३.४२ | ०.५४४ | ३.४९ | ३०.१५ | ४६.८१ | ४३.७२ |
| २४.५७ | ११.९८ | ५०.९८ | ३८.१५ | ८२.०७ | ७९.३६ | ०.६७८ | ९.०५ | ४८.८६ | ४८.४५ | ५४.२८ |
| ०.२९ | ०.४२ | ९.०९ | ८.२२ | ३७.५६ | ३०.२८ | ०.७४४ | ४.१८ | ७७.४३ | ४८.६० | ४८.३४ |
| २५.९५ | २४.९७ | ४५.४२ | ४१.७७ | ६३.४२ | ६२.३४ | ०.४९१ | ७.०८ | २६.३७ | ४८.९५ | ४९.१३ |
| ४२.३८ | ४१.७० | ५०.६६ | ५५.२३ | २९.१९ | १५.०९ | ०.५२३ | ३.२४ | ३९.५६ | ४९.३७ | ५०.६४ |
| ३३.८२ | ३१.३३ | ३२.६९ | २८.७२ | -- | -- | ०.५८७ | २.६३ | ४७.६६ | ४७.६९ | ४८.५६ |
| २४.५५ | १६.१५ | ५२.८५ | ४७.९८ | ७२.८९ | ७०.७० | ०.५०३ | ५.२६ | ४१.२१ | ४९.३८ | ५१.५८ |
| **३०.२५** | **२७.२५** | **४०.५९** | **४४.३९** | **५३.३८** | **५१.९७** | **-** | **३.९५** | **४५.५१** | **४८.४१** | **४८.३९** |

* अस्थायी

# झारखंड, छत्तीसगड आणि उत्तराखंड या राज्यांसाठी गळतीचे प्रमाण पूर्वीच्या अविभाजित राज्यांमध्ये दर्शविले आहे.

## भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक

| राज्य | महिलांवरील अत्याचार (संख्या) | बालकांवरील अत्याचार (संख्या) | स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध असलेल्या कुटुंबांची टक्केवारी | दर लाख लोकसंख्येमागे रास्त भाव धान्य / शिधावाटप दुकानांची संख्या | दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी @ |
|---|---|---|---|---|---|
| संदर्भ वर्ष किंवा दिनांक | (२०१०) | (२०१०) | (२००१) | (३१-१२-२०११) | (२००४-०५) |
| (१) | (१०२) | (१०३) | (१०४) | (१०५) | (१०६) |
| आंध्र प्रदेश | २७,२४४ | १,८२३ | ८०.१ | ५२ | ११.१० |
| अरुणाचल प्रदेश | १९० | २० | ७७.५ | ११३ | १३.४० |
| आसाम | ११,५५५ | १९७ | ५८.८ | १०९ | १५.०० |
| बिहार | ८,४७१ | १,८४३ | ८६.६ | ४३ | ३२.५० |
| झारखंड | ३,०८७ | ५४ | ४२.६ | ४४ | ४.२० |
| दिल्ली | ४,५१८ | ३,६३० | ९७.२ | १५ | ८.०० |
| गोवा | १४० | ७९ | ७०.१ | ३४ | १०.२० |
| गुजरात | ८,१४८ | १,००६ | ८४.१ | २७ | १२.०० |
| हरियाणा | ५,५६२ | ३०३ | ८६.१ | ३७ | १२.५० |
| हिमाचल प्रदेश | १,०२८ | २४६ | ८८.६ | ६४ | ९.९० |
| जम्मू व काश्मीर | २,६११ | १७ | ६५.२ | ४६ | ६.७० |
| कर्नाटक | ८,८०७ | ४०९ | ८४.६ | ३३ | ३४.८० |
| केरळ | ९,४६३ | ५९६ | २३.४ | ४३ | १७.४० |
| मध्य प्रदेश | १६,४६८ | ४,९१२ | ६८.४ | २८ | ११.४० |
| छत्तीसगड | ४,१७६ | १,४६३ | ७०.५ | ४१ | ३२.०० |
| **महाराष्ट्र** | **१५,७३७** | **३,२६४** | **७९.८** | **४५** | **३२.४०** |
| मणिपूर | १९० | ७३ | ३७.० | ९४ | २५.२० |
| मेघालय | २६१ | ११० | ३९.० | १४२ | १३.२० |
| मिझोराम | १७० | ५० | ३६.० | ११४ | १४.१० |
| नागालँड | ४१ | १० | ४६.५ | १३ | ९.५० |
| ओडिशा | ८,५०१ | १९४ | ६४.२ | ६९ | १४.५० |
| पंजाब | २,८५३ | ६२७ | ९७.६ | ५२ | ३९.९० |
| राजस्थान | १८,१८२ | १,३१८ | ६८.२ | ३३ | ५.२० |
| सिक्कीम | ४२ | २९ | ७०.७ | २३३ | १७.५० |
| तामीळनाडू | ६,७०८ | ८१० | ८५.६ | ४६ | १५.२० |
| त्रिपूरा | १,६७८ | २२७ | ५२.५ | ४३ | १७.८० |
| उत्तर प्रदेश | २०,१६९ | २,३३२ | ८७.८ | ३७ | १४.४० |
| उत्तराखंड | १,०७४ | ३१ | ८६.७ | ८६ | २५.५० |
| पश्चिम बंगाल | २६,१२५ | ८८० | ८८.५ | २२ | ३१.८० |
| भारत $ | **२,१३,५८५** | **२६,६९४** | **७७.९** | **४२** | **२१.८०** |

$ केंद्रशासित प्रदेश धरुन

@ मिश्र संदर्भाधीन कालावधी